चलनशास्त्र
व
चलननीति

(MONETARY THEORY & MONETARY POLICY)

प्रा. व. गो. सहस्रबुद्धे

अ. वि. गृह प्रकाशन : विद्यापीठ ग्रंथमाला पुष्प १३ वें

चलन-शास्त्र व चलन-नीति

(MONETARY THEORY & MONETARY POLICY)

[आधुनिक आर्थिक विचार व अलीकडील आर्थिक घडामोडी ह्यांचा मागोवा घेत चलनशास्त्राच्या मूलतत्त्वांचें व तदनुरोधानें चलननीतीचें सुबोध व सांगोपांग विवेचन करणारा ग्रंथ]

[A lucid exposition of principles of monetary theory and policy in the light of recent developments in the field of monetary theory and monetary experience.]

लेखक

प्रा. व. गो. सहस्रबुद्धे,

एम्.ए., बी.ई.एस्.

अर्थशास्त्रविभागप्रमुख,

सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड अिकॉनॉमिक्स, मुंबई १.

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे

प्रथमावृत्ति

जानेवारी] किंमत आठ रुपये [१९५९

: प्रकाशक :
शं. दा. चितळे, एम्.ए., बी.टी.,
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २.

प्रा. व. गो. सहस्रबुद्धे यांचे अर्थशास्त्रविषयक ग्रंथ

१. सुलभ अर्थशास्त्र : प्रथमावृत्ति १९४८; द्वितीयावृत्ति १९५४; तृतीयावृत्ति १९५६; चतुर्थावृत्ति १९५७, पंचमावृत्ति १९५८, षष्ठावृत्ति १९५८
२. अर्थशास्त्राचा विकास : १९५१ (मुंबई विद्यापीठाचें १९५२ चें तर्खडकर पारितोषिक मिळालेला ग्रंथ).
३. भारताचें आर्थिक जीवन : १९५५ (मुंबई विद्यापीठाचें १९५५ चें तर्खडकर पारितोषिक मिळालेला ग्रंथ).
४. देशोदेशांचा आर्थिक विकास : जुलै १९५७ (युरोपच्या आर्थिक विकासावरील पहिलाच मराठी ग्रंथ).
५. अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें : डिसेंबर १९५७ (आधुनिक अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचें निरूपण करणारा पहिलाच मराठी ग्रंथ.)
६. चलनशास्त्र व चलननीति : १९५९ (चलनशास्त्राच्या मूलतत्त्वांचें व तदनुरोधानें चलननीतीचें समग्र व सांगोपांग विवेचन करणारा ग्रंथ.)
७. अर्थशास्त्र-परिचय
८. कल्याणकारी राज्याचें अर्थकारण
९. अप्रगत देशांचें अर्थकारण
१०. भारतीय अर्थव्यवस्था व अर्थकारण
: (लौकरच प्रकाशित होतील).

★

: मुद्रक :
दि. दा. गांगल, एम्.एस्सी.,
लोकसंग्रह छापखान्यासाठीं.
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २.

लेखकाचें निवेदन

अर्थशास्त्राच्या मूलतत्त्वांचा हा दुसरा भाग 'चलनशास्त्र व चलननीति' ह्या नांवानें प्रसिद्ध होत आहे. ह्या भागांत केवळ चलनविषयक विवेचन अंतर्भूत करण्यांत आलें आहे. ह्या पुढील तिसरा भाग 'कल्याणकारी राज्याचें अर्थकारण' ह्या नांवानें प्रसिद्ध होईल. त्या भागांत 'पब्लिक फायनान्स' ह्या नांवानें ओळखला जाणारा अर्थशास्त्राचा पोटविषय येईल.

पहिल्या भागाप्रमाणेंच ह्या भागांतहि इंग्रजी मजकूर देण्यांत आला आहे. त्यामुळें इंग्रजींतून अर्थशास्त्राचें अध्ययन करणारांनाहि हा ग्रंथ उपयुक्त होईल अशी आशा आहे.

ह्या ग्रंथांतच भारताच्या चलनविषयक प्रश्नांचें विवेचन करण्याचा माझा विचार होता. पण कांहीं कारणांमुळें तें जमलें नाहीं. पुढें केव्हां तरी ह्या ग्रंथालाच तें विवेचन जोडलें जाईल.

पारिभाषिक शब्दांची अडचण ह्या ग्रंथाच्या लिखाणांत विशेष जाणवली. शब्दांची निवड करतांना ज्या शब्दापासून सामासिक शब्द करणें सुलभ होईल असेच शब्द शक्य तों निवडले आहेत. उदाहरणार्थ, 'पैसा' ह्या शब्दाऐवजीं 'चलन' हा शब्द वापरतांना किंवा 'किंमत' ह्या शब्दाऐवजीं 'भाव' हा शब्द वापरतांना हीच दृष्टि ठेवली आहे.

ह्या ग्रंथाचें प्रकाशन नेहमींच्याच कार्यक्षमतेनें व तत्परतेनें केल्याबद्दल मी 'अनाथ विद्यार्थी गृह' प्रकाशन विभागाचे मनःपूर्वक आभार मानतों.

सिडनहॅम कॉलेज, मुंबई १
डिसेंबर १९५८

व. गो. सहस्रबुद्धे

REFERENCE BOOKS

No	Name of the Author	Name of the Book
1.	American Economic Association	(A) Readings in Monetary Theory. (B) Readings in Business Cycle.
2.	Brown—	The Great Inflation.
3.	Charlesworth—	Economics of Repressed Inflation.
4.	Day—	Outline of Monetary Economics.
5.	Fisher—	Purchasing Power of Money.
6.	Gayer—	Monetary Policy and Economic Stabilisation.
7.	Haberler—	Theory of International Trade.
8.	Hansen	(A) Business Cycles and National Income. (B) A Guide to Keynes. (C) Monetary Theory and Fiscal Policy.
9.	Harris—(Ed)	The New Economics.
10.	Hawtrey—	(A) The Art of Central Banking. (B) Currency And Credit.
11.	Hayek—	Monetary Theory and the Trade Cycle.
12.	Hicks—	The Trade Cycle.
13.	Keynes—	(A) Treatise on Money. (B) General Theory of Interest, Employment, and Money.
14.	Kurihara—	(A) Monetary Theory and Public Policy. (B) Post—Keynesian Economics.
15.	Kindleberger—	International Economics.
16.	Ohlin—	Inter-regional and International Trade.
17.	Robertson—	(A) Money. (B) Essays in Monetary Theory.
18.	Sauliner—	Contemporary Monetary Theory.
19.	Sayers—	(A) Modern Banking. (B) Central Banking Since Bagehot.
20.	Scammel—	International Monetary Policy.
21.	Viner—	(A) Studies in the Theory of International Trade. (B) International Trade and Economic Development.

अनुक्रमणिका

(कंसांत पृष्ठांक दिलें आहेत)

चलनशास्त्राचीं मूलतत्त्वें

प्रकरण १ लें : आधुनिक अर्थव्यवस्थेंतील पैशाचें स्थान-- पृष्ठांक १ ते १३.

आधुनिक अर्थव्यवस्थेचें स्वरूप (१), विनिमयाची आवश्यकता (२), पैशाचा उपयोग (३), विनिमय माध्यमाचें महत्त्व (४), मूल्यमापनाचें कार्य (४), मूल्य संग्रहासाठीं वापर (६), उधार उसनवारीसाठीं उपयोग (७), वर्तमान व भविष्य ह्यांतील दुवा (७), भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत पैशाचें महत्त्व (९), मूल्यमापनाचें कार्य विशेष महत्त्वाचें (१०), मूल्यसंग्रहाचें कार्यहि तेवढेंच महत्त्वाचें (११), समाजवादी अर्थव्यवस्थेंतील पैशाचें स्थान (१२).

प्रकरण २ रें : चलन निर्मिति व चलन नियंत्रण-- पृष्ठांक १४ ते ४०.

चलन व पतचलन (१४), चलननिर्मिति व चलन नियंत्रण (१४), **व्यापारी बँका व पतचलन निर्मिति** (१५), बँकांकडून होणारी पतचलन निर्मिति (१५), पतचलन निर्मितीच्या मर्यादा (१८), मध्यवर्ती बँकेचें नियंत्रण (२४), मध्यवर्ती बँकेचा पैशाच्या निर्मितींतील भाग-एकमेव रोकड निर्मिति (२५), रोकडनिर्मितीच्या अधिकाराच्या मर्यादा (२५), चलन पुरवठ्याची वाढती लवचिकता (२६), पतचलन नियंत्रण (२७), बँकरेट (२८), बँकरेटच्या मर्यादा (३०), पतचलनोपयोग नियंत्रण (३३), राखीव रोकडीच्या प्रमाणांत बदल (३४), बँकांची बँक हें कार्य महत्त्वाचें (३६), **सरकार व लोक**-(३६), चलन निर्मितींतील सरकारचा भाग (३६), चलननिर्मितींतील सरकारचा पुढाकार (३७), चलननिर्मितींतील लोकांचा भाग (३८), मध्यवर्ती बँकेच्या धोरणाचें महत्त्व (३९).

प्रकरण ३ रें : चलनमूल्य-- पृष्ठांक ४१ ते ६९.

चलनमूल्य (४१), चलन परिमिति सिद्धान्त (४१), फिशरचें समीकरण (४३), विनिमय व्यवहाराचें समीकरण व चलन परिमिति सिद्धान्त (४४), चलनपरिमिति सिद्धान्ताचीं गृहीतें (४५), चलनपरिमिति सिद्धान्तांतील गृहीत कृत्याचें समर्थन (४६), **चलनपरिमिति सिद्धान्तांतील उणीवा** (४८), चलनगति स्थिर राहील असें गृहीत धरणें योग्य नाहीं. (४८), उत्पादन स्थिर राहील हें गृहीतकृत्य चुकीचें (५०), केंब्रिज समीकरण (५२), चलनपरिमिति सिद्धान्ताचें मूल्यमापन (५७),

चलनविस्ताराच्या परिणामांची आधुनिक मीमांसा (५८), चलनमूल्यांतील फेरफारांची आधुनिक मीमांसा (६१), चलनमूल्याच्या आधुनिक मीमांसेचे गुण (६४), **भावफुगवण** (६६), अतिचलन विस्तार किंवा भावफुगवणीची प्रक्रिया (६६), अप्रकट व प्रकट भावफुगवण (६६), भावफुगवणीची सुरुवात (६८), भांडवल-गुंतवण वाजवीपेक्षां अधिक होणें हें भावफुगवणीचें कारण. (६८).

प्रकरण ४ थें : चलनमूल्य मापन-- **पृष्ठांक ७० ते ७७.**

निर्देशांक (७०), विविध प्रकारचे निर्देशांक (७०), निर्देशांक तयार करण्यांतील महत्त्वाच्या गोष्टी (७१), मूळ वर्षाची निवड (७२), वस्तूंची निवड (७३), भारान्वित निर्देशांक (७४), भार ठरविण्याचा टप्पा (७५), शेवटचा टप्पा (७५), निर्देशांकाचे उपयोग (७६).

प्रकरण ५ वें : चलनमूल्यांतील फेरफारांचे परिणाम—पृष्ठांक ७८ ते ८४.

चलनमूल्यांतील फेरफार कां जाणवतात (७८), कर्जदार व सावकार (७८), उद्योगपति व कामगार (७८), मंदी व कामगारवर्ग (८०), व्याजावर अवलंबून असणाऱ्यांचा वर्ग (८१), उत्पादकांच्या तौलनिक स्थितींत बदल (८२), चलन-मूल्यांतील बदलाचे विभाजनावर परिणाम (८२), चलनमूल्यांतील फेरफार व उत्पादन (८२), तेजी चांगली कीं मंदी (८३), तेजी मंदी सारखीच त्याज्य (८३).

प्रकरण ६ वें : तेजीमंदी चक्र-- **पृष्ठांक ८४ ते ११४**

तेजी मंदी चक्र म्हणजे काय (८४), तेजी मंदी चक्राचे चार टप्पे (८७), तेजी मंदी चक्राची फिरती--तेजी (८७), घसरण (८७), मंदी (८८), पुनर्जीवन (८९), तेजी मंदी चक्राची उपपत्ति (९०), तेजीमंदीला निसर्ग जबाबदार (९०), मानसशास्त्रीय मीमांसा (९१), तेजी मंदी चक्र ही चलनजन्य घटना (९३), तेजी मंदी चक्राची चलन गौरव मीमांसा (९३), तेजीची वाटचाल (९४), तेजीचा अस्त अपरिहार्य (९५), आर्थिक अरिष्टाचा उद्‌भव (९६), मंदीची वाटचाल (९७), मंदीचा रोकड-संचलनावर होणारा परिणाम (९७), तेजी-मंदी चक्राचें निवारण (९८), तेजी-मंदी चक्रावरील उपाय-योजना (९८), चलन-मीमांसेचीं मुख्य सूत्रें (१००), तेजी-मंदी चक्र चलनरूप भांडवलाच्या अतिगुंतवणीचा परिणाम (१००), प्रा. हायक यांची मीमांसा (१०१), अतिभांडवल गुंतवणीला बँका कारण (१०१), तटस्थ चलनाचा तोडगा (१०४), चलनगौरव व चलनलाघव मीमांसेंतील भेद (१०५), अतिभांडवल गुंतवणीचा दुसरा प्रकार (१०५), उपभोगन्यूनतेची मीमांसा (१०७), कीन्सची मीमांसा (१०८), तेजीचें विश्लेषण (१०९), स्वयंवृद्धीचा खुलासा (१११), मंदी कां येते ? (१११), मंदीची प्रक्रिया (११२), तेजी-मंदी चक्रांतील चलन संस्थेचें स्थान (११३), तेजी-मंदी चक्रावरील उपाययोजना (११४).

प्रकरण ७ वें : विविध चलनव्यवस्था— **पृष्ठांक ११५ ते १२६.**

चलनव्यवस्था व तिचे घटक (११५), सुवर्णपरिमाण व्यवस्था (११५), सुवर्णपरिमाणाचे प्रकार (११६), सुवर्ण-परिमाणाचीं वैशिष्टचें (११८), सुवर्ण-परिमाणाचा आणखी एक नमुना (१२०), सुवर्ण विनिमय परिमाणाचे गुण-दोष (१२१), सुवर्ण-परिमाणाचें आंतरराष्ट्रीय स्वरूप (१२२), आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाण (१२३), सुवर्ण परिमाणाची व्याख्या (१२४), शासित चलन-व्यवस्था (१२४), शासित चलन-व्यवस्थेचीं दोन लक्षणें (१२५).

आंतरराष्ट्रीय अर्थकारण व चलनकारण

प्रकरण ८ वें : आंतरराष्ट्रीय व्यापार-- **पृष्ठांक १२९ ते १४५.**

(अ) **आंतरराष्ट्रीय व्यापाराची कारणमीमांसा** (१२९), देशोदेशांच्या उत्पादनक्षमतेंतील भिन्नता (१२९), आंतरराष्ट्रीय व्यापाराचा स्वतंत्र अभ्यास कां हवा? (१३०), आंतरराष्ट्रीय व्यापार हा उत्पादन साधनांच्या मर्यादित गतिसौकर्याचा परिणाम (१३१), आंतरराष्ट्रीय व्यापाराचें मूलगामी कारण (१३२), उत्पादन खर्चांतील भिन्नतेचे विविध प्रकार (१३३), तौलनिक उत्पादन-खर्चाचा सिद्धान्त (१३४), उत्पादन फलसिद्धान्ताच्या अंमलाचा परिणाम (१३६), **तौलनिक उत्पादन खर्च सिद्धान्ताच्या व्यावहारिक व तात्त्विक मर्यादा** (१३७), परराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंधामुळें पडणारी मर्यादा (१३७), आर्थिक परिस्थितींतील गतिमानतेमुळें पडणारी मर्यादा (१३८), स्पर्धेच्या अभावामुळें पडणारी मर्यादा (१३९), तौलनिक उत्पादन खर्चाच्या सिद्धान्ताचा अपुरेपणा (१३९), (आ) **आंतरराष्ट्रीय व्यापारांतील लाभप्रमाण** (१४०). आंतरराष्ट्रीय व्यापार हा वस्तुविनिमय (१४०), आंतरराष्ट्रीय व्यापारांतील लाभहानीचें मापन १४१), व्यापारशर्ती अनुकूल करणारी परिस्थिति (१४२), लोकांच्या आवडीनिवडींतील बदल (१४२), लोकांच्या उत्पन्नांतील व खर्चांतील बदल (१४३), सरकारची आर्थिक नीति (१४३), उत्पादनखर्चांतील फेरबदल (१४४).

प्रकरण ९ वें : आंतरराष्ट्रीय व्यापारनीति—पृष्ठांक १४६ ते १६७.

(अ) **अनिर्बंध व्यापारनीति** (१४६), अनिर्बंध व्यापारनीतीचे फायदे (१४७), अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे मिळण्यास अनुकूल परिस्थिति (१४८), **(आ) संरक्षण-नीति** (१५०). संरक्षण नीतीची आवश्यकता (१५०), बालोद्योगांना संरक्षणाची जरुरी (१५१), व्यवहारांतील अडचणी (१५१), रोजगार वृद्धीचा युक्तिवाद (१५२), आर्थिक विकासाचा युक्तिवाद (१५४), परराष्ट्रीय व्यापारांतील लाभ

वाढविण्याचा युक्तिवाद (१५५), प्रतिकाराचा युक्तिवाद (१५७), गृहीत परिस्थितीचा अभाव (१५८), अनार्थिक युक्तिवाद (१५९), राष्ट्रसंरक्षणासाठीं स्वयंपूर्णतेची आवश्यकता (१५९), वरील विवेचनाचे निष्कर्ष (१६०), (इ) **परराष्ट्रव्यापार नियंत्रणाचे विविध मार्ग** (१६१), आयातीवरील जकाती (१६१), सरकारी हस्तक्षेपाचें वाढतें क्षेत्र (१६५), राज्यसंस्थेमार्फत व्यापार (१६६), निर्यात नियंत्रण (१६७).

प्रकरण १० वें : भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय हालचाली—पृष्ठांक १६८ ते १७३.

अल्पकालीन व दीर्घकालीन भांडवल (१६८), भांडवलाच्या हालचालीमागील हेतु (१६९), दीर्घकालीन भांडवलाच्या हालचाली (१७०), परराष्ट्रीय भांडवलाविषयीचें धोरण (१७१).

प्रकरण ११ वें : आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचा तोल— पृष्ठांक १७४ ते १८२.

आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याचा तोल (१७४), आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांच्या हिशेबाचा नमुना (१७५), भांडवली व्यवहार (१७७), अनुकूल, प्रतिकूल व समतोलाचे आर्थिक व्यवहार (१७८), शेवटीं समतोल होणें अपरिहार्य (१७८), आन्तरराष्ट्रीय देणीं-घेणीं आणि अंतर्गत अर्थव्यवस्था (१८०), तेजीहि सांसर्गिक (१८१).

प्रकरण १२ वें : हुंडणावळीचा दर— पृष्ठांक १८२ ते १९१.

हुंडणावळीचा दर (१८२), हुंडणावळीचा व्यावहारिक दर (१८३), हुंडणावळीचा प्रमाणभूत दर (१८४), सुवर्णपरिमाणामुळें हुंडणावळीच्या दरांत स्थैर्य कसें येतें (१८५), समक्रयशक्ति सिद्धान्त (१८६), समक्रयशक्ति सिद्धान्ताचें अधिक स्पष्टीकरण (१८७), तौलनिक क्रयशक्ति बदलली कीं हुंडणावळीचा दर बदलणें अपरिहार्य (१८७), समक्रयशक्ति सिद्धान्ताचा अपुरेपणा (१८८), इतर आक्षेप (१८९), बद्ध हुंडणावळीचा दर (१९०), समक्रयशक्ति सिद्धान्ताची उपयुक्तता (१९१).

प्रकरण १३ वें : बाह्यसमतोल— पृष्ठांक १९२ ते २०७.

बाह्यसमतोलाची खूण (१९२), हुंडणावळीचा अधिकृत दर कसा टिकविला जातो (१९२), हुंडणावळीचा अथवा सुवर्णाचा पुरेसा सांठा आवश्यक (१९३), आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील प्रतिकूल तफावतींवरील उपाययोजना (१९४), अवमूल्यन (१९४), अवमूल्यनाची इष्टानिष्टता (१९५), चलनघट, (१९७),

चलनघटीची इष्टानिष्टता (२००), आयात कमी करण्याचे व निर्यात वाढविण्याचे प्रत्यक्ष उपाय (२०१), तीन प्रकारचीं प्रत्यक्ष नियंत्रणें (२०१), हुंडणावळीच्या व्यवहारावरील नियंत्रणें (२०२), परराष्ट्रीय अर्थव्यवहारांतील नियंत्रणें (२०२), अर्थ संकल्पीय नियंत्रणें (२०३), नियंत्रणाची इष्टानिष्टता (२०३), सारांश (२०४), अंतर्गत अर्थव्यवहाराचा समतोल व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचा समतोल ह्यांच्यांतील संघर्ष (२०५), देशोदेशांचे हितसंबंध भिन्न (२०६), कोणत्याहि उपाययोजनेची इष्टानिष्टता व परिणामकारकता परिस्थिति सापेक्ष (२०७).

प्रकरण १४ वें : आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था— पृष्ठांक २०८ ते २३४.

(अ) **आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिणाम व्यवस्था** (२०८), तीन काल-खंड (२०८), आंतरराष्ट्रीय सुवर्ण परिमाणांचा वैभवकाळ (२०८), सुवर्ण-परिमाणाचें यशापयश परिस्थितिसापेक्ष (२०९), सुवर्ण परिमाणाचे गुण—सुगमता (२०९), चलननिर्मितीची नियमबद्धता (२०९), हुंडणावळीचें स्थैर्य (२१०), आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य (२११), सुवर्ण-परिमाणाचे दोष (२१३), लवचिकपणाचा अभाव (२१४), चलननीति-स्वातंत्र्याचा अभाव (२१४), बाह्य समतोलासाठीं अंतर्गत समतोलाचा बळी (२१५), अप्रगत देशांना विशेष हानिकारक (२१५), पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिणाम यशस्वी होण्याचीं कारणें (२१६), ग्रेटब्रिटनचें आर्थिक वर्चस्व (२१७), अर्थशास्त्राची मान्यता (२१८), आर्थिक हवामानाची अनुकूलता (२१८), आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाणाचा पडता काळ (२१९), आंतरराष्ट्रीय सुवर्ण परिमाणाच्या अस्ताचीं कारणें (२२०), अंतर्गत समतोलाचें वाढतें महत्त्व (२२०), मोठ्या प्रमाणावरील आर्थिक उलाढालीचा परिणाम (२२१), अंतर्गत अर्थव्यवहारांत चिवटपणाची वाढ (२२२), आर्थिक हवामानाची प्रतिकूलता (२२३), आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचें भवितव्य (२२४), (ब) **इंटर नॅशनल मॉनेटरी फंड** (२२५), आंतरराष्ट्रीय चलन क्षेत्रांतील अराजक (२२५), सुलभता (२२५), एकमेव पर्याय (२२५), उलट बाजूचा युक्तिवाद (२२६), चूक होण्याचा संभव (२२६), अनिश्चितता (२२६), देशादेशांत अनिष्ट चुरस (२२६), प्रत्यक्ष अनुभव (२२६), इंटर नॅशनल मॉनेटरी फंडाची तात्त्विक बैठक (२२७), इंटर नॅशनल मॉनेटरी फंडाच्या कारभाराचीं सूत्रें (२२७), हुंडणावळीच्या दरांतील बदलांवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण (२२७), तात्कालिक आपत्तींत मदत (२२८), आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहार अनिर्बंध असावेत म्हणून प्रयत्न (२२९), प्रत्येक देशाचा प्रश्न हा सर्वांचाच प्रश्न (२३०), नियंत्रण संस्थेची आवश्यकता (२३१), पूरक आंतरराष्ट्रीय संस्थांची स्थापना (२३२), कांहीं महत्त्वाचे निष्कर्ष (२३४).

चलननीति साध्यें व साधनें

प्रकरण १५ वें : चलननीतीचीं साध्यें-- **पृष्ठांक २३७ ते २४८.**

चलननीतीचीं साध्यें (२३७)—भावमान स्थैर्य (२३७), भावमान स्थैर्याच्या विरोधकांचा युक्तिवाद (२३८), घटत्या भावमानाचा पुरस्कार (२३९), चलननीति व आर्थिक नीति (२४०), पूर्ण रोजगार व चलननीति (२४१), पूर्ण रोजगाराची चलननीति (२४२), पतचलनोपयोग नियंत्रणाचें वाढतें महत्त्व (२४३), अर्थसंकल्पनीतीची जोड चलननीतीला देण्याची आवश्यकता (२४४), अप्रगत देशाची चलननीति (२४४), अप्रगत देशांतील चलननीतीचीं साध्यें (२४५), **चलननीतीचीं साधनें**--(२४५), चलननीतीचा तपशील (२४५).

चलनशास्त्राचीं मूलतत्त्वें

[PRINCIPLES OF MONETARY THEORY]

चलन-शास्त्र व चलन-नीति

(MONETARY THEORY & MONETARY POLICY)

: १ : आधुनिक अर्थव्यवस्थेंतील पैशाचें स्थान

(MONEY IN THE MODERN ECONOMY)

आधुनिक अर्थव्यवस्थेचें स्वरूप :—आधुनिक अर्थव्यवस्था श्रमविभागणीवर अधिष्ठित आहे. ह्या अर्थव्यवस्थेंत असंख्य वस्तूंचें उत्पादन होत असतें व प्रत्येक वस्तूच्या उत्पादनाची विभागणी कित्येक प्रक्रियांत झालेली असते. साहजिकच एकंदर उत्पादनकार्याचा पसारा अफाट असाच आहे. पण श्रमविभागणीमुळें उत्पादनकार्यांतील प्रत्येक व्यक्तीचा वांटा अगदीं मर्यादित होतो. कोणत्याहि व्यक्तीचा एकंदर उत्पादनाशीं किती प्रमाणांत संबंध आहे, असा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, हा संबंध फार थोडा असतो. श्रमविभागणीमुळें व्यक्तीचा संबंध फार तर एखाद-दुसऱ्या वस्तूच्या उत्पादनाशीं येतो. एवढेंच कशाला, त्याहीपुढें जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, बहुतेकांचा संबंध वस्तूच्या उत्पादनांतील एखाद-दुसऱ्या प्रक्रियेशींच येतो. मोठमोठ्या कारखान्यांत कित्येक कामगार असे असतात कीं, एकाच प्रकारचें किंवा एकच काम करण्यांत ते आपली उभी हयात खर्च करतात व त्या कामापलीकडे उत्पादनाशीं त्यांचा संबंध येत नाहीं. कर्तृत्ववान् म्हणून प्रसिद्ध असलेले उद्योगपति किंवा भांडवलदार पाहिले तरी त्यांचाहि संबंध उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या एकंदर संख्येच्या मानानें फारच थोडया वस्तूंशीं येतो असें दिसून येईल. सांगण्याचा मुद्दा असा कीं, आधुनिक अर्थव्यवस्थेंत उत्पादनाचें कार्य अगणित लहानमोठ्या कामांत विभागलेलें आहे. त्यामुळें प्रत्येक व्यक्तीचा उत्पादनांतील वांटा अत्यल्प होतो. ह्या अर्थव्यवस्थेसंबंधीं असेंहि सांगतां येईल कीं, व्यक्ति करीत असलेलें काम व व्यक्तीच्या गरजा ह्यांचा प्रत्यक्ष संबंध असेलच असें नाहीं. बहुधा तो नसतोच. मोटारच्या कारखान्यांत काम करणारे कितीजण मोटार वापरतात ? धान्योत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला धान्य हवें असतें; पण तो जेवढ्या धान्याचें उत्पादन करतो त्यांपैकीं फारच थोडें त्याला स्वतःसाठीं हवें असतें आणि धान्यांखेरीज त्याला इतर कितीतरी वस्तु हव्या असतात. सारांश, उपभोगासाठीं उत्पादन हें एकंदर अर्थव्यवस्थेच्या बाबतींत खरें असलें तरी प्रत्येक व्यक्तीपुरतें बोलावयाचें झाल्यास उत्पादन व उपभोग ह्यांचा सरळ सरळ संबंध असतोच;

म्हणजेच व्यक्तीचा ज्या वस्तूच्या उत्पादनाशीं संबंध येतो त्या वस्तूपुरताच व्यक्तीचा उपभोग मर्यादित असतो अशी ग्वाही देतां येणार नाहीं. आपल्या सर्व गरजा भागविणाऱ्या सर्व वस्तूंचें उत्पादन संपूर्णपणें करणारी व्यक्ति आधुनिक अर्थव्यवस्थेंत औषधाला सुद्धां सांपडावयाची नाहीं.[१]

विनिमयाची आवश्यकता :––श्रम-विभागणीच्या तत्त्वावर अधिष्ठित झालेली अर्थव्यवस्था विनिमयाशिवाय यशस्वी होणें शक्यच नाहीं. **विनिमय** (Exchange) करण्याची कांहींतरी व्यवस्था नसेल तर उत्पादक ह्या नात्यानें एखाद-दुसऱ्या वस्तूशींच जिचा संबंध पोंचतो अशा व्यक्तीच्या इतर वस्तूंकरितां असलेल्या गरजा भागाव्या कशा ? आपण उत्पादित करीत असलेल्या वस्तूंच्या मोबदल्यांत इतर वस्तु मिळविण्याची कांहींतरी सोय असेल तरच एकाच वस्तूचें किंवा एका वस्तूच्या एखाद्या लहानशा भागाचेंच उत्पादन करून व्यक्तीला आपल्या सर्व गरजा भागवितां येतील हें उघड आहे. ती सोय विनिमयानें होऊं शकते. म्हणूनच श्रम-विभागणीला विनिमयाची जोड अपरिहार्यपणें द्यावी लागते.[२]

वस्तु विनिमय :–विनिमयाचा अगदीं साधा प्रकार म्हणजे **वस्तु-विनिमय** (Barter Exchange) होय. ह्या प्रकारांत एक वस्तु देऊन तिच्या मोबदल्यांत दुसरी वस्तु स्वीकारली जाते. विनिमयाच्या ह्या साध्या प्रकाराला आजच्या अर्थव्यवस्थेंत फारसें स्थान मिळणें शक्य नाहीं, हें सहज समजण्याजोगें आहे. वस्तु-विनिमयांत दोन महत्त्वाच्या अडचणी येतात. पहिली अडचण म्हणजे **गरजांचा संयोग** (Coincidence of Wants) होण्याची. 'अ' जवळ जी वस्तु आहे तीच 'ब' ला हवी असली आणि नेमक्या त्याच वेळीं 'ब' जवळ असलेली वस्तु 'अ' ला हवी असली तर उभयतांच्या गरजांचा समन्वय झाला असें म्हणतां येईल. अशा प्रकारचा संयोग झाल्याशिवाय दोन व्यक्तींमध्यें वस्तु-विनिमयाचा व्यवहार होणें शक्य नाहीं. वस्तु-विनिमयासाठीं आवश्यक असलेला गरजांचा संयोग जिच्यांत असंख्य वस्तूंचें उत्पादन होत आहे––आणि त्या उत्पादनांतील प्रत्येक वस्तु प्रत्येकाला हवी असतेच असें नाहीं––अशा आधुनिक अर्थव्यवस्थेंत नेहमीं होईलच अशी हमी कशी देतां येईल? तो न होणें हेंच अधिक स्वाभाविक होय. वस्तु-विनिमयांतील दुसरी अडचण अशी कीं, वस्तु-विनिमय होत असतां प्रत्येक वस्तूचें मोल जेव्हां जेव्हां प्रसंग उद्भवेल तेव्हां तेव्हां प्रत्येक इतर वस्तूच्या बाबतींत स्वतंत्रपणें ठरवावें लागतें. उदाहरणार्थ, धान्य व कापड ह्यांचा जेव्हां विनिमय व्हाव-

[१] Division of labour is the basis of the present economic system. As a result every individual produces not for personal consumption but for the market.

[२] Division of labour inevitably gives rise to exchange. Without some system of exchange division of labour cannot be practised. Division of labour and exchange cannot be separated from each other.

याचा असेल तेव्हां धान्याचें मूल्य कापडाच्या मापानें ठरवावें लागतें. ह्याचप्रमाणें धान्याचें मूल्य इतर वस्तूंच्या मापानेंहि ठरविण्याचे प्रसंग उद्‌भवतात. विविध प्रकारच्या असंख्य वस्तूंचें उत्पादन होत असलेल्या आधुनिक अर्थव्यवस्थेंत प्रत्येक वस्तूचें मूल्य प्रत्येक वस्तूच्या मापांत दरवेळीं स्वतंत्रपणें ठरविणें सर्वथैव अशक्य आहे, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. वस्तुविनिमयांत तिसरीहि एक अडचण आहे. सर्व वस्तू सारख्या मोलाच्या असणें शक्य नाहीं. कांहीं वस्तू जास्त मोलाच्या व कांहीं वस्तू कमी मोलाच्या असें असणारच. जास्त मोलाची वस्तू व कमी मोलाची वस्तू ह्यांच्यांतील विनिमय व्यवहारासाठीं जास्त मोलाची वस्तू ज्याच्याकडे आहे त्यानें कमी मोलाच्या वस्तूचें मोठें प्रमाण स्वीकारावयास तयार असलें पाहिजे. तसें नेहमींच होईल असें कसें सांगावें? उदाहरणार्थ मोटारीच्या मोबदल्यांत केळीं द्यावयाचीं ठरल्यास देणाऱ्यानें तीं कितीं द्यावीं व घेणाऱ्यानें कितीं घ्यावीं? ह्या एकाच उदाहरणावरून सध्याच्या अर्थव्यवस्थेंत वस्तुविनिमय किती अव्यवहार्य आहे हें कळून येईल.[३] सारांश, वस्तु-विनिमयांतील अडचणी अशा स्वरूपाच्या आहेत कीं, वस्तु-विनिमयाचा आधुनिक अर्थव्यवस्थेंत टिकाव लागणें शक्य नाहीं.

पैशाचा उपयोग :—वस्तु-विनिमयांतील वरील अडचणी आधुनिक अर्थव्यवस्थेंत पैशाच्या सहाय्यानें निवारल्या जातात. **पैसा म्हणजे देणीं भागविण्यासाठीं सर्वसामान्य-पणें वापरण्यांत येणारी कोणतीहि गोष्ट.**[४] आधुनिक अर्थव्यवस्थेंत **पैसा** (Money) जीं दोन महत्त्वाचीं कार्यें करतो त्यामुळें वरील दोन्ही अडचणी नाहींशा होतात. आधुनिक अर्थव्यवस्थेंत पैसा किंवा चलन हें **विनिमय-माध्यम** (Medium of Exchange) आहे. विनिमयाचे सर्व व्यवहार हल्लीं पैशाचा उपयोग करून केले जातात. ज्याला आपल्या मालकीचा उत्पादन-घटक किंवा आपल्या मालकीची वस्तु विकावयाची असेल तो त्या घटकाच्या अगर वस्तूच्या मोबदल्यांत इतर वस्तूंची अपेक्षा न करतां पैसा स्वीकारण्यास तयार असतो. ह्याच कारणामुळें ज्याला एखादी वस्तु अथवा घटक हवा असेल त्याला

---

[३] There are several drawbacks to barter. (i) The necessity of bringing together two people, each of whom can offer something the other desires—that is, there must be as it is said a double coincidence of wants (ii) The rate at which one commodity can be exchanged for another has to be separately decided as a preliminary to every transaction. (iii) Some commodities are much dearer than others and the person who wishes to dispose off the dearer commodity may be unwilling to accept in exchange a large amount of the cheaper commodity. All these difficulties can be surmounted if a medium of exchange is used—**Hanson.**

[४] Money (is) anything which is widely accepted in payment for goods, or in discharge of other kinds of business obligations.

—**Robertson.**

ती वस्तु अगर तो घटक पैसा खर्चून मिळूं शकतो. श्रमशक्तीची खरेदी-विक्री, भांडवलाची देवाण-घेवाण, वस्तूंची खरेदी-विक्री इत्यादि सर्व बाबतींत आधुनिक अर्थव्यवस्थेंत पैशाचें सहाय्य घेतलें जात असल्यामुळें पैसा व विनिमय-व्यवहार ह्यांचा स्वतंत्रपणें विचार करणें शक्यच होत नाहीं असें म्हटल्यास तें चूक होणार नाहीं.

विनिमय माध्यमाचें महत्त्व :—विनिमयमाध्यम ह्या नात्यानें पैसा किती महत्त्वाचें कार्य करतो हें विस्तारानें सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. पैसा नसेल तर काय होईल ह्याची केवळ कल्पना केल्यानें ते समजूं शकेल. पैसा नसेल तर विनिमय व्यवहार सुकर होणें शक्य नाहीं. विनिमयव्यवहार सुकर होण्याची शक्यता नसल्यास श्रमविभागणीवर उभारलेली अर्थव्यवस्था कोलमडून पडण्यास वेळ लागणार नाहीं. श्रमविभागणी नसेल तर **विशेषीकरणाचे फायदे** कोठून व कसे मिळणार? जगाची आज जी आर्थिक प्रगति झाली आहे तिच्यांत श्रमविभागणीचा वांटा केवढा मोठा आहे ह्याची जाणीव ज्यांना आहे ते श्रमविभागणीच्या सर्व फायद्यांचें श्रेय पर्यायानें पैशाकडे जातें हें नाकबूल करणार नाहींत. पैशामुळें श्रमविभागणी सुकर तर होतेच; पण वस्तूविनिमयांतील कटकटी नाहींशा होऊन आपल्या मुख्य कामावर आपल्या सर्व शक्ति केन्द्रित करतां येतात. ह्या गोष्टीचा उत्पादनाच्या दृष्टीनें अपरिमित फायदा होतो हें सांगावयास नकोच.[५]

मूल्यमापनाचें कार्य :—आधुनिक अर्थव्यवस्थेंत पैसा हा विनिमयमाध्यम तर आहेच; पण विनिमयमाध्यम असल्यामुळेंच तो **मूल्यमाप** (Measure of Value) झालेला आहे. पैसा विनिमयमाध्यम झाला म्हणजे पैशाच्या मोबदल्यांत स्वीकारल्या (दिल्या) जाणाऱ्या प्रत्येक वस्तूचें मूल्य पैशांत ठरवावेंच लागतें. साहजिकच त्यामुळें सर्व वस्तूंच्या मूल्यमापनासाठीं एकच माप लाभतें. तें माप म्हणजेच पैसा होय. मूल्यमाप म्हणून पैशाचा उपयोग व विनिमयमाध्यम म्हणून पैशाचा उपयोग परस्परांशीं निगडीत आहेत असें म्हणावयास हरकत दिसत नाहीं. कारण सामान्यत: असेंच दिसून येतें कीं, मूल्यमाप म्हणून जिचा उपयोग करतां येतो अशीच वस्तू, म्हणजे जी परिमाणांच्या भाषेंत व्यक्त करतां येईल अशीच वस्तू विनियममाध्यम म्हणून सर्वमान्य होते.[६]

---

[५] The great achievement of money is that it enables man as producer to concentrate his attention on his own job, and so to add more effectively to the general flow of goods which constitutes the real income of society—The specialisation and division on which our economic structure is founded would be impossible if every man had to spend a large part of his time and energies in bartering his products for the materials of his industry and the goods which he requires for his own consumption.

—**Robertson.**

पैशाचा मूल्यमाप म्हणून उपयोग होऊं लागला कीं, वस्तुविनिमयांतील वरील दोन अडचणींपैकीं दुसरी अडचण निवारली जाते हें लक्षांत येईल. पैशाचा मूल्यमाप म्हणून उपयोग होऊं लागला म्हणजे प्रत्येक गोष्टीचें मोल प्रत्येक इतर गोष्टींत ठरविण्याचें कारण पडत नाहीं. पैशांत प्रत्येक गोष्टीचें मूल्य ठरविलें कीं, काम भागतें. सर्व वस्तूंसाठीं मूल्यमाप म्हणून पैशाचा उपयोग होऊं लागला म्हणजे वस्तूंचा परस्परसंबंध आपोआपच ठरतो. एक टेबलाची किंमत दहा रुपये व एका खुर्चीची किंमत पांच रुपये असें ठरविलें म्हणजे एक टेबल = दोन खुर्च्या असें ओघानेंच ठरतें. पैसा हें मूल्यमाप झाल्याचे परिणाम अर्थव्यवस्थेवर फार मूलगामी स्वरूपाचे होतात, हें लक्षांत ठेवणें अत्यावश्यक आहे. पैसा हें मूल्यमाप झालें कीं, पैशाच्या भाषेंत सर्व गोष्टींचा विचार करावयाची संवय नकळतच लागते. पैसा मूल्यमाप झाल्यानंतर सर्व हिशेब साहजिकच पैशांत ठेवले जातात. आपले आर्थिक व्यवहार नीट चालले आहेत कीं नाहींत. हें प्रत्येक व्यक्ति आपलें उत्पन्न व खर्च ह्यांचा मेळ पैशांत बसतो कीं नाहीं, हें पाहून ठरवूं लागते. आपला व्यवहार तोटयाचा कीं फायद्याचा, हें ठरविण्यासाठीं उत्पादक पैशाचाच उपयोग करूं लागतात. विविध गरजांची तौलनिक तीव्रता त्या भागविण्यासाठीं कोण किती खर्च करावयास तयार आहे ह्यावरून अजमावण्याची समाजाला संवय जडते. ज्या वस्तूंना किंमत अधिक त्या वस्तु अधिक महत्त्वाच्या किंवा ज्या घटकांपासून अधिक प्राप्ति होते ते घटक अधिक महत्त्वाचे समजले जाऊं लागतात. एवढेंच नव्हे तर ज्या व्यक्तीचें उत्पन्न पैशांत अधिक त्या व्यक्तींना अधिक मान देण्याची प्रवृत्तीहि समाजांत दिसून येऊं लागते. मूल्यमाप झालेला पैसा साहजिकच **हिशेबाचें साधनहि** (Unit of Accounting) होतो.[७] त्यानंतर राष्ट्रीय उत्पन्न, वैयक्तिक उत्पन्न, राष्ट्रीय खर्च, वैयक्तिक खर्च, राष्ट्रीय मालमत्ता, वैयक्तिक मालमत्ता, राष्ट्राकडून होणारी किंवा व्यक्तीकडून होणारी बचत व भांडवलगुंतवण ह्या सर्वांची मोजदाद पैशाच्या भाषेंत होऊं लागते. पैशांतच सर्व हिशेब करण्याची

---

[६] The property of being widely acceptable generally, though not always, involves another, namely, the property of being expressed in units, in terms of which it is common to reckon the value of all those goods and services which men are in the habit of exchanging with one another—A thing will not as a rule be widely acceptable unless it is expressed as a multiple of some unit which is regarded as a measure of standard of the value of things in general—**Robertson.**

[७] Money is used not merely as a medium of exchange but also as means of indicating prices. When performing this function, money is said to be a unit of account. The second function of money, that of providing a standard of value naturally arises out of the first.

संवय समाजांत फार भिनली तर एक मोठा धोका संभवतो. तो धोका असा कीं, पैसा हें साधन आहे हें विसरलें जाऊन पैसा हें साध्य आहे असा समज पसरतो. निराळ्या शब्दांत, मूल्यमाप व त्यामुळें हिशेबाचें साधन अशा स्वरूपांत पैशाचा फार उपयोग होऊं लागला कीं, पैशाच्या **वास्तव स्वरूपाविषयीं भ्रम** (Money Illusion) निर्माण होतो. खरी संपत्ति बाजूलाच राहून पैसा हीच संपत्ति मानली जाऊं लागते.[८]

मूल्यसंग्रहासाठीं वापर :—विनिमय-माध्यम व मूल्यमाप असा पैशाचा दुहेरी उपयोग होऊं लागल्यानंतर तिसऱ्या एका कामासाठीं पैशाचा उपयोग अपरिहार्यपणेंच होऊं लागतो. तो असा कीं, पैसा **मूल्यसंग्रह** (Store of Value) म्हणून वापरला जाऊं लागतो. विनिमय-माध्यम म्हणून वापरली जाणारी वस्तु सामान्यपणें टिकावू असावी अशी दक्षता घेतली जाते. त्यामुळें एक मोठाच फायदा होतो. अशी वस्तु विनिमय-माध्यम म्हणून हातांत आल्याबरोबर किंवा सत्वर वापरलीच पाहिजे अशी घाई नसते. ती कालान्तरानें—दीर्घ कालानंतरहि—वापरली तरी चालण्याजोगें असतें. ती वस्तु दीर्घजीवी असते म्हणूनच नव्हे, तर ती वस्तु अशीच असते कीं, केव्हांहि, कोठेंहि, कोणीहि कशाच्याहि मोबदल्यांत ती स्वीकारावयास तयार असतो, म्हणूनहि विनिमय-माध्यम म्हणून असलेलें तिचें महत्त्व अबाधित राहतें. पैशाच्या मोबदल्यांत आज मिळणाऱ्या वस्तु पुढें केव्हांहि मिळू शकत असल्या तर पैसा ताबडतोब खर्च करावा न लागतां सोयीप्रमाणें खर्च करतां येतो. आजच्या गरजांपेक्षां भावी काळांतील गरजा महत्त्वाच्या वाटत असल्यास किंवा अन्य कांहीं कारणाकरितां आज पैसा खर्च करणें सोयीचें किंवा फायद्याचें वाटत नसल्यास भावी काळाकरितां पैसा राखून ठेवून नंतर आपल्या मर्जीप्रमाणें खर्च करतां येतो. उपभोक्त्यांच्या दृष्टीनें हा मोठाच फायदा होय.[९]

अधिक खोलांत जाऊन विचार केला तर असें दिसून येईल कीं, भावी काळाकरितां पैसा राखून ठेवणें ह्याचाच अर्थ पैशाचें आजचें जें मूल्य असेल (म्हणजे पैशाची क्रयशक्ति) तें आजच्या गरजा भागविण्यासाठीं न वापरतां त्या मूल्याचा संग्रह भावी काळासाठीं करावयाचा असा होतो. विनिमय-माध्यम म्हणून वापरला जाणारा पैसा व्यक्तीच्या हातीं सारखा येत असतो. व्यक्तींच्या हातांत आलेला एकंदर पैसा व्यक्तीची एकंदर क्रयशक्ति किती आहे तें दर्शवितो. ती क्रयशक्ति ताबडतोब वापरून पैशाचें रूपान्तर वस्तूंत करावयाचें कीं, आपली क्रयशक्ति पैशाच्या रूपांत आपल्याजवळ बाळगावयाची हें व्यक्तीला ठरवावें

---

[८] People tend to confuse the pieces of money, which are mere certificates of a right to draw goods which may not even exist with the goods themselves, and to lay up all sorts of trouble and disillusionment for themselves—**Robertson**.

[९] The first great achievement of money is that it enables man as consumer to generalise his purchasing power and to make his claim on society in the form which suits him best—**Robertson**.

लागतें. ह्या बाबतींत असें दिसून येईल कीं, व्यक्तीजवळ कोणत्याहि एका वेळीं तिच्या एकंदर क्रयशक्तीचा कांहीं भाग पैशाच्या रूपानें राखून ठेवला असल्याचें आढळून येतें. असें व्यक्तीला करतां येतें कारण उत्पादन कार्यांत भाग घेतल्यामुळें उत्पादित संपत्तीवर व्यक्तीचा जो हक्क प्रस्थापित होतो तो तिला प्रचलित अर्थ-व्यवस्थेंत पैशाच्या रूपानें प्राप्त होतो. पैशाचा सर्वांत मोठा गुण हा कीं, आपला हक्क वापरून प्रत्यक्ष वस्तूंत पैशाचें रूपान्तर केव्हां व कसें करावयाचें हें व्यक्तीला आपल्या सोयीप्रमाणें ठरवितां येतें.[१०] ह्या घटनेला उद्देशूनच निराळ्या शब्दांत पैसा हा नेहमींच मूल्य-संग्रह असतो किंवा मूल्य-संग्रह करणें हें पैशाचें तिसरें महत्त्वाचें कार्य झालें आहे असें म्हणतां येईल.

उधार-उसनवारीसाठीं उपयोगः–आजचा पैसा उद्यां जसा वापरतां येईल तसाच उद्यांचा पैसा आज वापरतां येईल. भावी काळांत पैसा द्यावयाच्या बोलीनें वर्तमान काळांत जेव्हां उधार-उसनवारीचे व्यवहार करण्यांत येतात तेव्हां त्यांत उद्यांचा पैसा आज वापरण्याचीच दृष्टि असते. आज द्यावयाचीं देणीं लांबविण्याकरितां जेव्हां पैशाचा उपयोग केला जातो तेव्हां पैसा **उधार-उसनवारीचें माध्यम** (Standard of deferred payment) म्हणून कार्य करतो. पैशाचें हें कार्यहि मूलगामी महत्त्वाचें आहे. कारण उत्पादन ही काळखाऊ प्रक्रिया असल्यानें भावी काळाचा वायदा देऊन बरेच व्यवहार उत्पादनाच्या सुकरतेसाठीं करावे लागतात. उदाहरणार्थ, भावी काळांत होणाऱ्या उत्पादनाच्या अपेक्षेनें अगाऊ भांडवल-गुंतवण करावी लागते. भावी काळांत कर्जफेड करण्याचें वचन देऊन कर्जें काढावीं लागतात. जमविलेल्या भांडवलांतूनच भांडवली वस्तू जशा खरेदी केल्या जातात, तशीच कामगारांची मजुरीहि दिली जाते. ती आगाऊ देण्यास उत्पादक पुढें गुंतविलेले सर्व भांडवल वसूल होईल ह्या अपेक्षेमुळेंच तयार होतो. आगाऊ केलेलें हें व्यवहार वस्तूंच्या रूपांत करावे लागले असते तर तें करणें फारच मुष्किल झालें असतें. कदाचित तें व्यवहार नीटपणें करतांहि आले नसते. पण हे सर्व व्यवहार करणें पैशामुळें अतिशय सुलभ होते ह्यांत शंका नाहीं. उत्पादनासाठीं अपरिहार्यपणें वेळ लागत असल्यामुळें कर्जाचे, उधारीचे, आगाऊ देण्या-घेण्याचे व्यवहार शक्य व सुकर झाले नाहींत तर उत्पादनाचा गाडा पुढें रेटला जाणारच नाहीं. पैशामुळें म्हणजे उधार-उसनवारीचें माध्यम म्हणून पैसा वापरतां येत असल्यामुळें हे सर्व व्यवहार सुकर होतात व त्यामुळें उत्पादन कार्य आडून बसण्याचा प्रसंग येत नाहीं हें पैशाचें महान् कार्य आहे असें कोण म्हणणार नाहीं ?[११]

वर्तमान व भविष्य ह्यांतील दुवा :—मूल्यसंग्रहाचें साधन व उधार-उसनवारीचें माध्यम ह्या पैशाच्या दोन कार्यांना आधुनिक अर्थव्यवस्थेंत असाधारण महत्त्व

१० Money is a claim—Money is the most convenient way of laying claims to such goods and services as one wishes to buy—**Day**.

प्राप्त झालें आहे. ह्या दोन कार्यांमुळें पैसा हा वर्तमानकाळ व भविष्यकाळ ह्यांच्यांतील दुवा ठरतो, हें लक्षांत घेणें अत्यावश्यक आहे. हा दुवा कितपत कच्चा किंवा पक्का आहे हें पैशाचें मूल्य म्हणजेच पैशाची क्रयशक्ति किती प्रमाणांत स्थिर राहते, ह्यावर अवलंबून राहतें. पैशाचें मूल्य कधींहि न बदलल्यास मूल्य-संग्रहासाठीं किंवा उधार-उसनवारीसाठीं पैशाचा वापर करण्यांत कोणतीच अडचण उपस्थित होत नाहीं व पैशाच्या माध्यमानें होणारे सर्व व्यवहार सुरळीतपणें पार पडतात; पण पैशाचें मूल्य स्थिर राहतें, असा जगाचा आजपर्यंतचा अनुभव सांगत नाहीं. किंबहुना पैशाचें मूल्य फारच अस्थिर असतें.[१२] त्यामुळें **पैसा हा अर्थव्यवस्थेंतील सर्वांत गतिमान् घटक आहे**.[१३] असाच खरा अनुभव आहे. पैशाचें मूल्य सतत बदलतें असल्यास पैशाच्या माध्यमानें होणाऱ्या सर्व व्यवहारांवर अनिश्चिततेची छाया पडते. कारण भविष्यकाळांत पैशाचें मूल्य कसें व किती बदलेल ह्याचा अंदाज घेऊन हे सर्व व्यवहार केले जातात. साहजिकच पैशाचें मूल्यच जर अस्थिर असेल तर त्या मूल्यासंबंधींच्या अपेक्षांवर आधारलेले सर्व आर्थिक व्यवहार कमालीचे अस्थिर असल्यास त्यांत नवल नाहीं. पैशाचें मूल्य किंवा त्यासंबंधींच्या अपेक्षांचा संबंध अर्थव्यवस्थेच्या एखाद-दुसऱ्या भागाशीं मर्यादित नसल्यामुळें पैशाचें मूल्य किंवा त्यासंबंधींच्या अपेक्षा बदलण्याचे परिणाम समस्त अर्थव्यवस्थेला भोगावे लागतात. पैशाच्या मूल्यांत अगर त्या बाबतच्या अपेक्षांत बदल झाले कीं, मुळांत अर्थव्यवस्थेला समतोल प्राप्त झाला असेल तर तो ढांसळतो. पैशाच्या मूल्याचा अर्थव्यवस्थेंतील समतोलाशीं अतिघनिष्ठ संबंध असल्यामुळें पैशाचें मूल्य कसें ठरतें व त्याबाबत राज्यसंस्थेचें धोरण काय असावें, ह्या प्रश्नांना अर्थशास्त्रांत अलीकडे बरेंच महत्त्व दिलें जातें. पैशाची गंमत हीच आहे कीं, पैसा आपलीं कार्यें जोंपर्यन्त सौकर्यानें पार पाडीत असतो तोंपर्यंत पैशाच्या अस्तित्वाची दखल घ्यावी असें फारसें कोणाला वाटत नाहीं. पण पैशाकडून व्हावयाच्या कार्यांत थोडा जरी बिघाड झाला, थोडी जरी कसूर आढळन आली तरी त्या

[११] Money immensely facilitates the making of loans and payments in advance of all kinds.—For this reason the existence of money seems to be essential to our modern system of production, which rests so largely upon the willingness of one man to transfer command over goods to another—**Robertson.**

[१२] Money is a link between the present and the future. As such, stability in its value is a matter of great importance. Its value does not, even in ordinary times, remain perfectly stable and in times of disturbance is liable to a very great variation.

[१३] Money is the most dynamic element of modern economy.
—**Kurihara.**

संबंधांत एकदम बराच गवगवा होतो. बराच खल होऊं लागतो.[१४] सनातन अर्थशास्त्रांत पैशासंबंधींच्या प्रश्नांना विशेष स्थान मिळत नसें. कारण पैशाची किंमत नेहमींच स्थिर राहील असें त्यांत गृहीत धरलेलें असें. पैशाचें मूल्य स्थिर आहे, असें गृहीत धरल्यास पैशामुळें अर्थव्यवस्थेचा समतोल बिघडण्याचें कांहींच कारण रहात नाहीं आणि त्यामुळें पैशाला महत्त्व देण्याचें प्रयोजनहि रहात नाहीं.[१५] पण ह्या गृहीत कृत्याला अनुभवानें दुजोरा मिळत नसल्यामुळें पैशासंबंधीच्या प्रश्नांना आजच्या अर्थव्यवस्थेंत फारच महत्त्व दिलें जातें. कदाचित् असेंहि म्हणतां येईल कीं, पैसा जात्याच अस्थिर असतो असें आजचें अर्थशास्त्रज्ञ धरूनच चालतात.[१६] ते कसेंहि असलें तरी एवढी गोष्ट मात्र खरी कीं, समस्त अर्थव्यवस्थेशीं संबंधित असलेली पैसा हीच गोष्ट अर्थव्यवस्थेंत असते. शिवाय पैशाशिवाय चालणारी अर्थव्यवस्था कल्पनेनें मनश्चक्षूसमोर आणतां येणें शक्य असलें तरी प्रत्यक्षांत अर्थव्यवस्था व पैसा ह्या गोष्टी एकरूप झाल्यासारख्या आहेत.[१७]

भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत पैशाचें महत्त्व :—वर सांगितल्याप्रमाणें (१) **विनिमय-माध्यम**, (२) **मूल्यमापन व हिशेबाचें साधन** व (३) **मूल्यसंग्रहाचें साधन** आणि (४) **उधार उसनवारीचें माध्यम होणें हीं पैशाचीं चार कार्यें** आहेत. ह्यांपैकीं प्रत्येक कार्य आपापल्या परीनें महत्त्वाचें असतेंच; पण परिस्थिति जशी बदलत जाते तेव्हां पैशाच्या कार्यांचें तौलनिक महत्त्वहि बदलत जातें. जेव्हां वस्तु-विनिमयांतील अडचणी लक्षांत येऊन विनिमय-माध्यमाची आवश्यकता वाटूं लागली तेव्हां अर्थातच विनिमयमाध्यम होणें ह्या पैशाच्या कार्याला सर्वांत अधिक महत्त्व होतें. आज विनिमयमाध्यम म्हणन पैशाकडून केलें जाणारें कार्य अर्थशास्त्रीय विचारांत

---

[१४] A monetary system is like a liver. It does not take up much of our thoughts when it goes right. But it attracts a deal of attention when it goes wrong—**Robertson**.

Money does play an enormously important role in economic life. We become painfully aware of this when something goes wrong—**Hansen.**

[१५] In the classical theory money is neutral. On this assumption one could cogently argue that money could never be a disequilibriating factor and therefore could dismiss it as irrelevant—**Kurihara**.

[१६] The starting point of modern monetary theory is that money is inherently unstable—**Kurihara**.

[१७] We cannot get rid of money. So long as there is any durable asset, it is capable of possessing monetary attributes and, therefore of giving rising to the characteristic problems of a monetary economy—**Keynes.**

महत्त्वाचें समजलें जात नाहीं. कारण एकतर अर्थव्यवस्थेंत पैसा ह्या संस्थेचीं पाळेंमुळें इतकीं खोल गेलीं आहेत कीं, विनिमयमाध्यम जींत नाहीं अशी अर्थ-व्यवस्था कल्पून त्यांतील अडचणींचें वर्णन करणें ह्या गोष्टीला फक्त तात्त्विक महत्त्व दिलें जातें. अर्थव्यवस्था विनिमयमाध्यमयुक्त आहे, असें धरूनच आजच्या अर्थशास्त्रांतील सर्व विवेचन केलें जातें. दुसरें असें कीं, विनिमयमाध्यमाचा प्रत्यक्ष वापर न करतां केवळ काल्पनिक वापर करून अर्थव्यवहार पार पाडण्याची प्रथा आजकाल वाढत चालली आहे. चेकच्या माध्यमानें होणारे व्यवहार उदाहरणादाखल दाखवितां येतील. 'ब' ला चेक देऊन 'अ' त्याच्याकडून कोणतीहि वस्तु विकत घेऊं शकतो. चेक दिल्यामुळें प्रत्यक्ष पैसा उचलून देण्याचें 'अ' ला कारण पडत नाहीं. 'ब' च्या हातांत प्रत्यक्ष पैसा येतोच असें नाहीं. 'अ' च्या बँक खात्यांतील रक्कम कमी करून 'ब' च्या खात्यांतील रक्कम वाढविणाऱ्या दोन नोंदी केल्या कीं, हा व्यवहार पुरा होतो. ह्या व्यवहारांत पैशाला विनिमयमाध्यम म्हणून महत्त्व असण्याऐवजीं मूल्यमाप व हिशेबाचें साधन म्हणूनच अधिक महत्त्व आहे, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे.

मूल्यमापनाचें कार्य विशेष महत्त्वाचें :—सारांश, आधुनिक अर्थव्यवस्थेंत पैशाला हिशेबाचें साधन म्हणूनच अधिक महत्त्व आहे. इतकें कीं आधुनिक अर्थव्यवहार एक वेळ विनिमय-माध्यमाशिवाय चालू शकतील, पण हिशेबाचें साधन असल्याखेरीज आधुनिक अर्थव्यवहार चालणें शक्यच नाहीं असें म्हटलें तर त्यांत चूक होणार नाहीं.[१८] पैशांत केल्या जाणाऱ्या हिशेबांना महत्त्व असतें. कारण त्या हिशेबावरच बहुतांशीं व्यक्तींकडून घेतले जाणारे आर्थिक स्वरूपाचे निर्णय अवलंबून असतात. उपभोक्ता किंवा उत्पादक ह्या नात्यानें व्यक्तींकडून जे जे निर्णय घेतले जातात त्यांतील बहुतेक सर्व महत्त्वाच्या निर्णयांना पैशांत केल्या जाणाऱ्या हिशेबांचें अधिष्ठान असतें. उत्पादकांच्या निर्णयामागें नफ्याची प्रेरणा असते, हें सर्वपरिचित आहे. पण कोणते निर्णय घेतल्यानें नफा अधिक होईल, हें अपेक्षित प्राप्ति व अपेक्षित खर्च ह्यांचा पैशांत हिशेब केल्यानेंच समजेल हें उघड आहे. उपभोक्त्यांना त्यांचें उत्पन्न पैशाच्या स्वरूपांतच मिळतें. उपभोक्त्यांचें उत्पन्न हा एक प्रकारें पैशांत केलेला हिशेबच असतो. उत्पादनाच्या कार्यांतील एक भागीदार म्हणून व्यक्तींच्या कामाचें मोल पैशांत केलें जात असतें. तें मोल म्हणजेच व्यक्तीला मिळणारें पैशांतील उत्पन्न होय. जिला उत्पन्न मिळतें त्या व्यक्तीला आपल्या वर्तमानकालीन गरजांचें मूल्य-मापन पैशांत करावें लागतें व त्या अनुरोधानें आपलें उत्पन्न व आपला खर्च ह्यांचा मेळ बसेल अशा बेतानें उपभोगविषयक निर्णय—ह्यांत बचत किती करावयाची हा

[१८] A modern community might conceivably get on without a medium of exchange, but not without a unit of account.

निर्णयहि ेतो. कारण बचत करणें म्हणजे वर्तमान गरजांना प्राधान्य द्यावयाचें नाहीं असें ठरविणें होय—घ्यावे लागतात. अशा प्रकारें उत्पादनविषयक व उपभोगविषयक निर्णयांमागें पैशांत केले गेलेले हिशेव असतात. निराळ्या शब्दांत, विनिमय-माध्यम म्हणून पैशाला असलेलें महत्त्व कमी झालें नसलें तरी मूल्यमाप ह्या पैशाच्या कार्याला विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. सध्यांच्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत गरजांचें तौलनिक महत्त्वमापन पैशांतच केलें जातें. ज्या गरजा भागविण्यास पुरेसें पैशाचें पाठबळ असतें त्या गरजा महत्त्वाच्या समजल्या जातात आणि त्याच गरजा भागविल्या जातात. त्याचप्रमाणें उत्पादन-साधनांचें तौलनिक महत्त्वमापनहि पैशाच्या मापानेंच केलें जातें आणि ज्या उत्पादन-साधनांची टंचाई असेल त्यांना अधिक मोबदला दिला जातो. हा मोबदला त्यांना ज्या वस्तूंची किंमत अधिक असते त्या वस्तूंच्या उत्पादनांतच मिळू शकत असल्यामुळें महत्त्वाच्या उत्पादन-साधनांचा ओघ साहजिकच महत्त्वाच्या गरजा भागविणाऱ्या उत्पादनाकड वळतो. अशा प्रकारें पैशांत होणारें मूल्यमापन अर्थव्यवस्थेचें स्वरूप बहुतांशीं निश्चित करतें.

मूल्यसंग्रहाचें कार्यहि तेवढेंच महत्त्वाचें :–पैशांत होणारें मूल्यमापन आधुनिक अर्थव्यवस्थेंतील सर्व अर्थव्यवहारांचें मूळ असतें असें म्हणतां येईल. **पैसा** ही संस्था **आधुनिक अर्थव्यवस्थेचें मर्मस्थळ** आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेंतील अर्थव्यवहारांचा पैसा हा केंद्र-बिंदु असण्याचें अेक कारण असें सांगतां येईल कीं, मूल्यमाप ह्या नात्यानें सर्व प्रकारची देवाण-घेवाण पैशांतच होतें. संबंधित आर्थिक व्यवहार खरेदी-विक्रीचा असो वा कर्ज देण्या-घेण्याचा असो, किंवा इतर कसलाहि असो, शेवटीं पैशाच्या सहाय्यानेंच तो पुरा करावा लागतो.[१९] तौलनिक मूल्यमापन करणारा पैसा मूल्याचा संग्रह करण्यासाठीं अर्थातच वापरला जातो. निरनिराळ्या शब्दांत आधुनिक अर्थ-व्यवस्थेंत संपत्ति प्रामुख्यानें पैशाच्या रूपानें सांठविली जाते. पैशाच्या ह्या कार्यालाहि वर सांगितल्याप्रमाणें प्रचलित अर्थव्यवस्थेंत महत्त्व प्राप्त झालें आहे.[२०] ह्या कार्याला महत्त्व देण्याचें कारण असें सांगतां येईल कीं, अर्थव्यवस्थेंत घेतले जाणारे

---

[१९] The central position of money arises from the fact that majority of debts in developed communities are settled by means of one or the other of the various forms of money. Sales and purchases of goods, giving and taking loans, receiving and spending income, payment of taxes are all generally made with the agency of money.

[२०] The main characteristic, which goes to explain its central significance in a large part of economic theory, is that one of the most important ways in which wealth can be held is money—**Day.**

Money is not just another form of wealth; it is the standard of wealth and the universal objective of business activity.

सर्व निर्णय भविष्यकाळाशीं संबंधित असतात. उत्पादक जे निर्णय घेतो त्यांची फलश्रुति भविष्यकाळांतच होते. बचत किती करावयाची, हें भावी काळांतील गरजांच्या अनुरोधानेंच ठरविलें जातें. भविष्यकाळासंबंधींच्या अपेक्षा करून ज्या पैशांतील हिशेबावर हे निर्णय आधारलेले असतात त्या पैशाचें मूल्य फारच अस्थिर असलें तर ह्या निर्णयांना फारसा अर्थ उरणार नाहीं हें उघड आहे. मूल्यसंग्रह म्हणून पैशाचें कार्य पैशाकडून किती प्रमाणांत यशस्वीपणें पार पाडलें जातें, ह्यावर हिशेबाचें साधन म्हणून पैशाला किती महत्त्व दिलें पाहिजे हें अवलंबून असतें. असो. सांगण्याचा मुद्दा असा कीं, मूल्यमापनाचें व मूल्यसंग्रहाचें साधन म्हणून आधुनिक अर्थव्यवस्थेंत पैशाला महत्त्व आहे. त्या मानानें विनिमय-माध्यम म्हणून प्रगत भांडवलशाहींत पैशाचें स्थान गौण आहे. भांडवलशाहींत मूल्ययंत्रणेला महत्त्व असतें आणि त्या मूल्ययंत्रणें-तील सर्व मूल्यें पैशांत व्यक्त होत असल्यानें पैशालाहि महत्त्व प्राप्त होतें, ह्या शब्दांत भांडवलशाहींत पैशाला जें महत्त्व असतें त्याचें यथार्थ वर्णन करतां येतें.[२१]

समाजवादी अर्थव्यवस्थेंतील पैशाचें स्थान :––भांडवलशाही अर्थव्यवस्थेंत पैशाचें स्थान कोणत्या कार्यामुळें मुख्यतः टिकून आहे, ह्याचा विचार केल्यानंतर साहजिकच असा प्रश्न उपस्थित होतो कीं, समाजवादी अर्थव्यवस्थेंत पैशाचें स्थान काय राहील ? हा प्रश्न बराच वादग्रस्त असा आहे. ह्या प्रश्नाची पुरेशी चर्चा करणें ह्या ग्रंथाच्या कक्षेपलीकडे आहे. ह्या प्रश्नावर थोडक्यांत कांहीं विचार मांडावयाचे झाल्यास असें म्हणतां येईल कीं, उत्पादनविषयक निर्णय हे नियोजकांच्या लहरीचे खेळ होऊं द्यावयाचे नसल्यास गरजांचें उत्पादनसाधनांचें तौलनिक महत्त्व-मापन करण्यासाठीं नियोजनाधिष्ठित अर्थव्यवस्थेला सुद्धां कांहीं तरी साधन वापरावेंच लागेल. नाहीं तर कोणत्या गरजा खरोखरच महत्त्वाच्या आहेत व कोणतीं उत्पादन-साधनें काटकसरीनें व त्यांच्या अनेक पर्यायी उपयोगापैकीं कोणत्या उपयोगासाठीं वापरणें योग्य आहे हें ठरविण्याची पंचाईत पडेल. गरजांच्या व उत्पादनसाधनांच्या तौलनिक महत्त्वमापनासाठीं सध्यांच्या अर्थव्यवस्थेंत पैशाचा उपयोग केला जातो. पैशाचा हा उपयोग संपूर्णपणें समाधानकारक आहे असें म्हणतां येणार नाहीं. कारण सध्यांच्या अर्थव्यवस्थेंत गरिबांच्या महत्त्वाच्या गरजा केवळ त्यांना पैशाचें पाठबळ नाहीं म्हणून श्रीमंतांच्या तुलनेनें खरोखरीच महत्त्वानें कमी असलेल्या गरजांच्या मागें पडण्याचा संभव असतो. तसेंच सध्यांच्या अर्थव्यवस्थेंत सर्वांना समान संधि मिळत

[२१] By the use of money, not only it is possible to overcome the clumsiness of barter and to extend the division of labour, but at the same time money is the basis of the pricing process by means of which the economy is guided––**Halm**.

—At the very heart of nearly all economic relationships in communities that have attained any considerable degree of economic development lies the institution of money—**Day**.

नसल्यामुळें कांहीं उत्पादनघटकांची टंचाई व कांहींची विपुलता ह्या दोन्ही गोष्टी कृत्रिम असण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ, डॉक्टर व इंजिनियर ह्यांना मिळणारीं अफाट उत्पन्नें त्यांचें तौलनिक महत्त्व यथार्थपणें दर्शविणारीं नसून सर्वांना समान संधि मिळत नाहीं ह्याचींच द्योतक ठरतात. अशा परिस्थितींत पैशाकरवीं होणारें गरजांचें किंवा उत्पादनसाधनांचें महत्त्वमापन संपूर्णपणें समाधानकारक असतें, असें म्हणणें धाष्टर्याचें ठरेल. तथापि त्याचबरोबर हीहि गोष्ट कबूल करावी लागते कीं, गरजांचे व उत्पादनसाधनांचें तौलनिक महत्त्वमापन करण्यासाठीं पैशाखेरीज दुसरें चांगलें असें साधन अद्यापतरी उपलब्ध नाहीं. त्यामुळें समाजवादी अर्थव्यवस्थेंतहि गरजांचें तौलनिक महत्त्वमापन करण्यासाठीं कांहीं प्रमाणांत तरी बाजारांत ठरणाऱ्या किंमती ग्राह्य धराव्या लागतीलच असें दिसतें. ह्या ठिकाणीं एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे, ती अशी कीं, उत्पन्नांतील विषमता समाजवादी अर्थव्यवस्थेंत बऱ्याच प्रमाणांत कमी होत असल्यामुळें व्यक्तीची पैसा खर्च करावयाची तयारी गरजेच्या तीव्रतेचें चांगल्या प्रकारचें गमक होऊं शकते. म्हणजे पैसा हें गरजांच्या तौलनिक महत्त्वमापनाचें साधन म्हणून वापरण्यांतला एक मोठा दोष समाजवादी अर्थ-व्यवस्थेंत नाहींसा होण्याचा संभव असतो. मात्र हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, समाजवादी अर्थव्यवस्थेंत खील उत्पादनसाधनांचा योग्य वापर होण्याच्या दृष्टीनें उत्पन्नांतील विषमता संपूर्णपणें नाहींशी करणें उचित होईलच असा निर्वाळा देतां यावयाचा नाहीं. सर्वांना समान संधि दिल्यानंतरहि कांहीं विशिष्ट प्रकारचें मनुष्यबळ गरजेच्या मानानें अनुपलब्ध असल्यास त्याच्यासाठीं अधिक मोबदला देणें प्राप्त होईल; अन्यथा तें मनुष्यबळ कमी महत्त्वाच्या उपयोगांत वायां जाईल. ह्या सर्व गोष्टींवरून असा निष्कर्ष निघतो कीं, समाजवादी अर्थव्यवस्थेंत देखील गरजांच्या व उत्पादनसाधनांच्या तौलनिक मूल्यमापनासाठीं होणारा पैशाचा उपयोग संपूर्णपणें टाळतां यावयाचा नाहीं.[२२]

---

[२२] No one who has grasped the complexity of the processes of a modern economy has any doubt about the necessity of calculations in terms of money. Socialist economy is no exception to this because even in that economy the basic economic problem of scarcity continues to exist. A unit of accounting is as much necessary in a socialist economy as in a capitalistic economy.

: २ : चलन-निर्मिति व चलन-नियंत्रण

(CREATION & CONTROL OF MONEY)

चलन व पतचलन :—देशांतील एकंदर पैशांत **रोख-चलन** (Currency) म्हणजेच मध्यवर्ती बँकेनें निर्माण केलेला पैसा व **पत-चलन** (Credit) म्हणजे इतर बँकांनीं निर्माण केलेला पैसा ह्यांचा समावेश होतो. रोख-चलनांत सरकारनें किंवा सरकारतर्फे मध्यवर्ति बँकेनें काढलेल्या नोटा व नाण्यांचा समावेश होतो. मोडवजा वापरण्यांत येणाऱ्या नाण्या-नोटांची निर्मिति सामान्यपणें सरकारच्या हातांत असते. पण एकंदर चलनांत त्यांचा भाग उपेक्षणीय असावा असा प्रघात पडला असल्यामुळें रोख-चलन म्हणजे मुख्यतः मध्यवर्ती बँकेच्या नोटा असें म्हणावयास हरकत नाहीं. मध्यवर्ती बँकेनें काढलेल्या चलनाला **रोकड** (Cash) असेंहि संबोधण्यांत येते. पतचलन म्हणजे बँकांतील **ठेवी** (Bank Deposits). बँकांतील ठेवींपैकीं मुदतीच्या ठेवींना चलन म्हणतां येणार नाहीं. कारण त्यांच्यावर चेक देतां येत नसल्यामुळें विनिमय-माध्यम म्हणून त्यांचा उपयोग करतां येत नाहीं. **चालू ठेवी** (Current deposits) व **शिलकी ठेवी** (Saving deposits) ह्यांचा चेकच्या माध्यमानें उपयोग करतां येत असल्यामुळें त्यांचा पैशांत अंतर्भाव होतो. बँकांतील ठेवींचा चलनाप्रमाणें उपयोग करतां येत असल्यामुळें चलनाचा तो एक प्रकार होय ह्यांत शंका नाहीं. ठेवींना-पत-चलन म्हणण्यांत येते, कारण त्यांचा चलन म्हणून जो उपयोग होतो त्याला बँकांची पत हाच एक आधार असतो. थोडक्यांत असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, रोकड व ठेवी मिळून देशांत एकंदर पैसा किती आहे हें ठरतें. **एकंदर पैसा** = रोकड + ठेवी किंवा **रोख-चलन + पत-चलन = एकंदर चलन** असें समीकरण मांडण्यास हरकत नाहीं.[1]

चलन-निर्मिति व चलन-नियंत्रण :–जेव्हां **रोख-चलन-निर्मिति** (Creation of Currency) होते, किंवा **पत-चलन निर्मिति** (Creation of Credit) होते तेव्हां देशांतील एकंदर पैशाचा पुरवठा वाढतो. उलट जेव्हां **रोख-चलन नियंत्रण** (Control of Currency) किंवा **पतचलन नियंत्रण** (Control of Credit) केलें जातें तेव्हां देशांतील एकंदर पैसा कमी होतो. चलन-निर्मितीमुळें होणारा **चलन-विस्तार** (Expansion of Money) वाजवीपेक्षां अधिक होतो, तेव्हां त्या परिस्थितीला उद्देशून **अति-चलनविस्तार** (Monetary Inflation) असें म्हणतां

[1] Public's money supply consists under modern conditions of currency and deposits. Currency consists of, apart from small coins, mostly the notes issued by the central bank of a country. Deposit money includes demand and time liabilities of banking institutions.

येईल. उलट चलन-नियंत्रणामुळें **चलन-संकोच** (Contraction of Money) वाजवीपेक्षां कमी होतो तेव्हां **अति-चलनसंकोच** (Monetary Deflation) होतो. रोख-चलन व पत-चलन हे आधुनिक अर्थव्यवस्थेंतील पैशाचे जे दोन प्रकार आहेत त्यांची निर्मिति व नियंत्रण ह्या दोन्ही गोष्टींना सरकार, मध्यवर्ती बँक, व व्यापारी बँका हे त्रिपक्ष जबाबदार आहेत.

व्यापारी बँका व पतचलन-निर्मिति

बँकांकडून होणारी पतचलन-निर्मिति :—मध्यवर्ती बँक किंवा सरकार चलनाच्या निर्मितीला किंवा चलन-नियंत्रणाला कसें कारणीभूत होतें, हें समजण्यापूर्वी व्यापारी बँकांकडून पतचलन-निर्मिति किंवा पतचलन-नियंत्रण कसें होतें, हें समजून घेणें आवश्यक आहे. कारण सरकार किंवा मध्यवर्ती बँक आपला कार्यभाग पुष्कळ वेळां व्यापारी बँकेमार्फतच साधीत असतें. शिवाय अलीकडे एकंदर **पैशांत**, निदान प्रगत देशांत तरी, **बँक-निर्मित चलनाचाच भाग मोठा** असतो. बहुतेक सर्व महत्त्वाच्या देशांत रोकडीपेक्षां ठेवींनाच आजकाल प्राधान्य आहे.[२] व्यापारी बँकांकडून चलनांत होणारी वाढ 'ठेवरूप' चलनांतच होत असते, हेंहि अर्थात् लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण रोकड-निर्मितीचा अधिकार फक्त मध्यवर्ती बँकेलाच दिलेला असतो आणि तोसुद्धां सरकारची प्रतिनिधि ह्या नात्यानेंच त्या बँकेला दिला जातो.

ठेवींचीं दोन उगमस्थानें असतात. बँकांत ठेवीदार जेव्हां रोकड भरतात तेव्हां ती रोकड ठेव म्हणून त्यांच्या नांवावर दाखल होते व चलन म्हणून केव्हांहि वापरावयास त्यांना उपलब्ध होते. रोकड भरल्यामुळें ज्या ठेवींचा उद्भव होतो त्या ठेवींमुळें बँकांनीं चलन-निर्मिति केली असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण **ठेवरूप-चलन** (Deposit Money) जेवढें वाढतें तेवढें वापरांतील रोकडरूप चलन कमी होतें. त्यामुळें वापरावयास उपलब्ध होणाऱ्या पैशांत कांहींच भर पडत नाहीं.

बँकांत ठेवी उद्भवण्याचें दुसरें कारण विशेष महत्त्वाचें आहे. व्यापारी बँका जेव्हां लोकांना कर्जे देतात तेव्हां त्या कर्जांतून ठेवींचा उद्भव होतो. बँक एखाद्याला जें कर्ज देते तें सामान्यपणें ठेव म्हणून त्याच्या नांवावर दाखल केलें जातें आणि पतचलन म्हणून कर्ज घेणाऱ्याला वापरावयास उपलब्ध होतें. कर्जांतून उद्भवणाऱ्या ठेवीमुळें एकंदर उपलब्ध पतचलनांत भर पडते आणि त्यामुळें पतचलन-निर्मिति बँकेनें केली असें म्हणावें लागतें. उदाहरणानें हा मुद्दा स्पष्ट होईल. 'अ'नें बँकेंत १० हजार रुपये ठेवून आपल्या नांवाचें खातें उघडलें तर बँकेनें १० हजार रुपये निर्माण केले असें म्हणतां यावयाचें नाहीं. फारतर एवढेंच म्हणतां येईल कीं, मुळांत असलेल्या चलनाचें

[२] In fact all countries of any economic importance have to a greater or smaller extent, come to be based on a credit economy rather than on a money economy—**Dekock.**

स्वरूप बदललें. रोकडरूप चलन ठेवरूप झालें असें म्हटलें तरी चालेल.[३] सारांश, जोंपर्यंत बँकेजवळीऴ रोकड व बँकेंतील ठेवी सारख्याच असतात तोपर्यंत बँकेनें पत-चलन-निर्मिति केली असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. पण बँकेंतील ठवी बँकेकडील 'ब' नें घर गहाण ठेवून १० हजार रुपयांचें कर्ज बँकेकडून मिळविलें. आणि तें ठेव म्हणून त्याच्या नांवावर दाखल झालें तर दहा हजार रुपयांची पतचलनांत भर पडली असेंच म्हणावें लागेल. असें झाल्यास बँकेंतील रोकडीपेक्षां बँकेतील ठेवी अधिक होतील. **बँकेंतील ठेवी बँकेंतील रोकडीपेक्षां जेव्हां अधिक होतात तेव्हां बँकेनें पतचलन-निर्मिति केली असें म्हणावयास मुळींच हरकत नसते.** कर्ज दिल्यामुळें जेव्हां ठेवींचा उद्भव होतो तेव्हां त्या ठेवींतून ह्याच कारणामुळें चलन-निर्मिति होते. नवी ठेव निर्माण करून जेव्हां कर्ज दिलें जातें तेव्हां संबंधित रकमेपुरती बँक आपल्या अशीलाची देणेंकरी बनते आणि उलट बाजूनें तेवढ्याच रकमेपुरता बँकेचा अशील बँकेचा देणेकरी होतो. बँकेकडून पतचलननिर्मिति होण्याची सर्व सामान्य पद्धत हीच आहे.[४]

बँका कांहीं तारणाशिवाय कर्ज देत नाहींत. बँकेनें दिलेल्या प्रत्येक कर्जाला भरभक्कम पाठबळ असतें आणि कर्ज दिल्यामुळें बँकेचीं **देणीं** (Liabilities) जेवढीं वाढतात तेवढींच तारणामुळें **येणीं** (Assets) वाढतात असें म्हणून बँका पैसा निर्माण करीत नाहींत असें सिद्ध करतां यावयाचें नाहीं. असें कोणी म्हणाला तर त्याला एवढेंच उत्तर पुरेसें होईल कीं, तारण म्हणून न ठेवलेली कोणतीहि मालमत्ता किंवा अन्य गोष्ट पैसा म्हणून वापरतां येत नाहीं. पण तीच गोष्ट बँकेंत तारण म्हणून दाखल झाली कीं पैशांत भर पडण्यास कारणीभत होते. कारण तिच्या आधारावर दिलेलें कर्ज ठेवरूप घेऊन विनिमय-व्यवहारास उपलब्ध होतें. वरील उदाहरणांत घर हें घर म्हणून

[३] All that has happened is that the character of a part of money in active circulation has changed. A part of the currency is sterilized and is lying unused with the bank, awaiting the time when someone thinks that cash is preferable to a proper claim. The deposits simply stand in place of cash replacing it but not supplementing it. This continues to be the case so long as the banker considers it desirable to keep as much cash with him as there are deposits.

[४] Normally creation of money by the banks occurs when two opposite transactions occur simultaneously between a bank and a customer as part of one contract. The bank increases its debt to the customer by an agreed amount and the customer simultaneously puts himself into debt by the same amount.

—Day.

पैसा ठरूं शकत नाहीं. पण तेंच घर तारण म्हणून बँकेकडून कर्ज घेण्यासाठीं वापरलें कीं नवा पैसा निर्माण होऊं शकतो. ह्या ठिकाणीं घराची किंमत व बँकेनें दिलेलें कर्ज समान आहे असें दाखविणें अप्रस्तुत आहे. कारण तारण नसलेल्या घरालाहि किंमत असतेच; पण त्यामुळें त्या किंमतीएवढें चलन वापरावयास उपलब्ध होऊं शकत नाहीं. पण तारण म्हणून बँकेकडे घर गहाण ठेवल्यास घरावर दिलेल्या कर्जाएवढ्या रकमेची पतचलनांत लगोलग भर पडते. सारांश, बँकेच्या प्रत्येक कर्जाला तारण असतें हें जरी खरें असलें तरी बँकेच्या प्रत्येक कर्जामुळें चलन-निर्मिति होते हें तेवढेंच खरें. बँकेकडून चलन-निर्मिति होण्यास बँकेकडून होणाऱ्या व्यवहारास कर्जाचें स्वरूप असलें पाहिजे असें नाहीं. खरेदीचें स्वरूप असलें तरी चालेल. उदाहरणार्थ, बँकेनें 'अ'कडून १० हजार रुपयांचें सोनें खरेदी केलें व ते १० हजार रुपये 'ठेव' म्हणून 'अ'च्या खात्यांत जमा केले तर ह्या व्यवहारांतूनहि चलन-निर्मिति होते. बँकेनें भांडवल-गुंतवण करावयाचें ठरवून एखाद्या संयुक्त-भांडवल संस्थेचे शेअर्स खरेदी केले व त्यांची किंमत म्हणून ठेवी निर्माण केल्या; तर तीहि चलन-निर्मितीच ठरेल. ह्या ठिकाणीं मुख्य लक्षांत ठेवण्याची गोष्ट अशी कीं, रोकड ठेवल्यामुळें निर्माण होणाऱ्या ठेवी सोडून इतर कोणत्याहि कारणामुळें निर्माण होणाऱ्या ठेवी चलन-निर्मितीस कारणीभूत होतात. जेव्हां बँकेकडून चलन-निर्मिति होते तेव्हां एका बाजूनें बँकेचीं देणीं वाढतात.—ठेव म्हणून कोणत्याहि खात्यांत असलेल्या रकमा बँकेला देणेकरी बनवितात. कारण त्या रकमा केव्हांहि देण्यास बँका बांधील असतात--आणि दुसऱ्या बाजूनें बँकेची येणीं वाढतात. कारण खरेदी केलेल्या गोष्टी परत विकतां येतात आणि दिलेलीं कर्जें परत येण्यास लोक बांधील असतात. तेव्हां असेंहि म्हणतां येईल कीं, सामान्यतः **आपल्या 'येण्यांत' भर टाकून व देणेकरी बनून बँका चलन-निर्मिति करतात.**[५] निर्माण केलेली प्रत्येक ठेव एक प्रकारचा हक्क प्रस्थापित करते व हा हक्क चलन म्हणून वापरतां येतो. त्यामुळें चलनांत भर पडते.[६] बँकेच्या व्यवहारासंबंधीं दिलेल्या ह्या माहितीवरून बँका चलन-निर्मिति करतात ह्यासंबंधीं संशय राहूं नये. बँकांतील एकूण ठेवी बँकेकडील एकूण रोकडीच्या एवढ्याच नसून तिच्या कांहीं पट असतात हीच गोष्ट व्यापारी बँका चलननिर्मिति करतात हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. **बँकांतील ठेवी व त्यांच्या जवळील रोकड ह्यांच्यांतील फरक म्हणजेच बँकांनीं निर्मिलेलें पतचलन** होय.[७]

---

[५] The money supply is normally increased through an increase in the assets of the commercial banks—**Hansen.**

[६] The claim against the bank can be used as general purchasing power. It is money—The operation therefore adds to the total supply of money—**Sayers.**

बँकांना पतचलन-निर्मात्या अशी जी पदवी देण्यांत आली आहे ती अगदीं सार्थ आहे.[८] बँका पैसा निर्माण करतात ह्यांत बिलकुल शंका नाहीं.

ज्यांना चलन-निर्मिति करतां येते त्यांना चलनसंहारहि करतां येतो, हें स्पष्ट आहे. ज्यायोगें बँका ठेवी कमी करतात त्यायोगें पतचलन कमी होतें. उदाहरणार्थ, बँकेनें दिलेलीं कर्जें परत मागितल्यास कर्जदारांचा बँकेवरील हक्क नष्ट होऊन ठेवरूप चलन कमी होतें. तसेंच बँकांनीं ठेवी निर्माण करून जी भांडवल-गुंतवण केली असेल ती कमी केल्यास––म्हणजेच निराळ्या शब्दांत त्या भांडवल-गुंतवणीचें रोकडींत रूपान्तर करून पूर्वी निर्माण केलेले ठेवीदारांचे हक्क नष्ट केल्यास––ठेवरूप चलन कमी होते.[९]. चलन-निर्मितीला जे व्यवहार कारणीभूत होतात त्याच्या अगदीं उलट स्वरूपाचे व्यवहार चलन कमी करण्यास कारणीभूत होतात. पतचलननिर्मिती-मुळें बँकेच्या येणें व देणें ह्या दोन्हीत सारख्या रकमेची भर पडते. बँका जेव्हां पतचलन कमी करण्यास प्रवृत्त होतात तेव्हां त्यांचें देणें ज्या रकमेनें कमी होतें त्याच रकमेनें येणेंहि कमी होतें हें ओघानें आलेंच. ठेवी निर्माण करून बँकांनीं कर्जें दिलीं, खरेदी केली किंवा भांडवल-गुंतवण केली तर पतचलननिर्मिति होते. उलट ठेवी नष्ट करून बँकांनीं कर्जें वसूल केलीं, विक्री केली अगर भांडवल-सोडवणूक केली तर चलन-संहार होतो.

पतचलन-निर्मितीच्या मर्यादा :—व्यापारी बँका पतचलन-निर्मिति करतात असें मान्य केल्यानंतर दुसरा एक प्रश्न उपस्थित होतो. बँकांची पतचलन-निर्मितीची शक्ति अमर्यादित असते काय ? ह्या प्रश्नाचें उत्तर नाहीं असेंच द्यावें लागतें. व्यापारी बँकांच्या पतचलन-निर्मितीच्या शक्तीवर विविध प्रकारच्या मर्यादा असतात. त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणें करतां येईल :––

(१) बँकेच्या कोणत्याहि ठेवीदाराला—मग त्याची ठेव त्यानें रोकड ठेवल्या-मुळें निर्माण झालेली असो किंवा बँकेनें कर्ज दिल्यामुळें निर्माण झालेली असो––तो मागेल तेव्हां रोकड देण्यास बँक बांधील असते. निराळ्या शब्दांत, बँकेंतील ठेव

[७] We know, as a fact, that an addition to bank cash is accompanied or closely followed by, a multiple addition to deposits which cannot be attributed to any other cause but action by the banks. This is sufficient proof to say that banks can create and do create money. "From the point of view of the economy as a whole there is no doubt that the commercial banking system can and does create money".—**Day**.

[८] Banks are not merely traders in money but also in an important sense manufacturers of money—**Sayers**.

[९] Bank credit can be destroyed through a reduction in bank loans and investment—**Kurihara**.

ठेवीदाराच्या दृष्टीनें रोकडींत **परिवर्तनीय** (Convertible) असते. रोकड ही जशी **विधिमान्य चलन** (Legal Tender) आहे तशी ठेव नाहीं. ठेवीदारानें दिलेला चेक त्याच्या घेणेदारानें स्वीकारलाच पाहिजे अशी सक्ति करतां येत नाहीं. देणें भागविण्यास दिलेला चेक नाकारतां येतो. रोकड नाकारतां येत नाहीं. त्यामुळें ठेव हा रोकडीचा पैसा म्हणून **परिपूर्ण पर्याय** (Perfect Substitute) होऊं शकत नाहीं. ठेवीच्या वापरावर अशा मर्यादा असल्यामुळें मुख्यतः ठेवीदाराला केव्हांहि रोकड मागण्याची सवलत असते आणि बँकेला रोकड देणें भाग असतें. ठेवीदारानें रोकड मागितली आणि जवळ द्यायला रोकड तर नाहीं, अशी परिस्थिति स्वतःवर येऊं देणें बँकेला इष्ट नसतें. कारण तशी परिस्थिति उद्‌भवली रे उद्‌भवली कीं, बँकेवरील लोकांचा विश्वास एकदम ढांसळतो. बँकेचा व्यवसाय किती नाजूक आहे, बँकेची लोकांत जी पत असते तिच्यावर तो किती आधारलेला आहे, हें वर्णन करून सांगण्याची गरज आहे असें नाहीं. त्यावरून लक्षांत एवढेंच घ्यावयाचें कीं, पतचलन रोख-चलनांत परिवर्तनीय असल्यामुळें बँकेला आपल्या एकंदर ठेवीचा कांहीं भाग 'रोकड' रूपानें जवळ बाळगावाच लागतो.[१०] रोकड व एकंदर ठेवी ह्यांचें परस्परांशीं प्रमाण काय असावें हें बँका स्वतःच ठरवितात किंवा बँकांकरितां कायद्यानें तें ठरविलें जातें. रोकडीच्या किती पट ठेवी असल्या तर व्यवहार अडत नाहीं, हें एकदां ठरलें म्हणजे त्या मर्यादेंतच बँकांना चलन-निर्मिति करतां येते. उदाहरणार्थ, रोकडीच्या दहा पट ठेवी असाव्यात किंवा निराळ्या शब्दांत ठेवींच्या एकदशांश रोकड असावी, असें कायद्यानें किंवा रूढीनें ठरलेलें असल्यास ज्या बँकेजवळ पांच हजार रुपयांची **राखीव रोकड** (Cash Reserve) आहे त्या बँकेंतील एकूण ठेवी पन्नास हजारांपेक्षां अधिक असं शकत नाहींत. म्हणजेच पंचेचाळीस हजारांपेक्षां अधिक चलनाची त्या बँकेला निर्मिति करतां येत नाहीं. सारांश, कायद्यानें किंवा रूढीनें जें राखीव रोकडीचें प्रमाण ठरतें त्यामुळें व्यापारी बँकांची चलन-निर्मितीची शक्ति मर्यादित केली जाते.[११] बँकेजवळील राखीव रोकडींत प्रत्यक्ष रोकडीखेरीज मध्यवर्ती बँकेंत त्या त्या बँकेच्या नांवावर असलेली रक्कमही समाविष्ट होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण मध्यवर्ती बँकहि आपल्या खातेदार बँकांना रोकड देण्यास बांधील असते.

---

[१०] If we enquire why the value of deposits should bear any reference to the value of the common money the answer is not far to seek. It lies in the familiar fact that bank money is convertible—**Robertson**.

[११] The system of fractional reserves whether fixed by law (as in United States) or roughly adhered to in practice (as in England) imposes a limit on the expansion of bank credit and so upon the quantity of money which the banks can issue.

—**Hansen.**

सारांश, बँकेचा व्यवसाय अतिशय नाजूक स्वरूपाचा असल्यामुळें पतचलननिर्मितीच्या बाबतींत बँकांना अतिशय सावधगिरीनें वागावें लागतें आपली पत ढासळूं नये, आपल्यावरील लोकांचा विश्वास उडूं नये म्हणून अतिशय दक्षता घ्यावी लागते. त्यामुळें पतचलननिर्मिति करतांना बँका सुरक्षिततेकडेच अधिक झुकतात. पतचलननिर्मिति ज्या प्रमाणांत शक्य असेल त्या पेक्षां थोडी कमी झाली तरी चालेल; पण ती कोणत्याहि परिस्थितींत अधिक असूं नये असेंच बँकांचें व्यावहारिक धोरण असतें. ह्या सर्वांचा अर्थ असा कीं, व्यापारी बँकाकडून होणाऱ्या पतचलननिर्मितीवर पडणारी **पहिली मर्यादा बँकिंगच्या व्यवसायाच्या स्वरूपांतून उद्‌भवलेली** असते. [१२]

बँकिंगचा व्यवसाय नाजूक असल्यामुळें लोकांचा विश्वास टिकून राहण्यासाठीं आपल्या कर्जव्यवहाराबाबत म्हणजे पर्यायानें पतचलननिर्मितीबाबत व्यापारी बँका अनेक प्रकारें दक्षता घेतात. एक तर पतचलननिर्मितीचे आपले अधिकार आपल्या स्वतःच्या फायद्यासाठींच केवळ आपण वापरत आहों असा संशय निर्माण होण्याजोगी परिस्थिति चतुर बँकचालक सहसा उद्‌भवूं देत नाहीं. त्यामुळें बँकेंतील चालकवर्ग इतर उद्योग करीत तरी नाहींत किंवा केल्यास त्यांना आपल्या बँकिंगच्या व्यवसायापासून संपूर्णपणें अलग ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. [१३] तसेंच जीं कर्जें दिलीं जातात तीं शक्य तेवढ्या कमी मुदतीचीं असावींत अशी दुसरी एक दक्षता तो घेतो. हेतु असा कीं, पैसा हातांत सारखा येत राहणारा असावा व आणीबाणीची परिस्थिति सहसा उद्‌भवूं नये; पण एवढी दक्षता घेतली तरी ती पुरी पडेलच असें नाहीं, म्हणून आपल्या कर्जांच्या प्रमाणावर मर्यादा बँकेला कोठेंतरी घालावी लागते. वारेमाप कर्जे न देणें हीच सर्वांत महत्त्वाची दक्षता होय. म्हणूनच बँकाना आपली रोकड व आपल्या

[१२] The reason why bankers have learned to be cautious about such activities—in particular about creating money—is that their whole position depends upon the confidence of the general public. Once a fear develops that a banker cannot pay his liabilities freely on demand there is a run on the bank and if it persists for a fairly long time, a banker is forced to close his doors. A prudent banker has only one answer to this difficulty; to make sure that the general public will never lose confidence in him so that there will be no possibility of a run which will exhaust the reserves that he can realize—**Day.**

[१३] One way in which he can avoid the danger of loss of public confidence is to avoid any suspicion that he is using his power of money creation directly to his own advantages. This means that a wise banker will keep his banking activities well separated from any other business he may conduct, or better that he should not conduct any other business.—**Day.**

ठेवी ह्यांचा परस्पर संबंध ठरवावाच लागतो व स्वतःवर घालून घेतलेलीं बंधनें पाळावीं लागतात.[१४]

(२) बँकांची पतचलन-निर्मितीची शक्ति लोकांकडून दोन प्रकारें मर्यादित केली जाते. एकतर देशांत मध्यवर्ती बँकेनें उपलब्ध करून दिलेल्या रोकडीचा किती भाग बँकेंत ठेव म्हणून ठेवावयाचा हें लोकच ठरवितात. प्रत्येक व्यक्ति आपल्या उत्पन्नाचा किती भाग जवळ ठेवावयाचा व किती भाग बँकेंत ठेवावयाचा हें ठरवीत असते. त्यांतूनच एकंदर देशांतील रोकडीचा किती भाग बँकेंत जातो हें आपसूकच ठरतें. ह्या बाबतींत सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, रोकडीचा किती भाग बँकेंत जातो हें लोकांच्या संवयी, त्यांचीं उत्पन्नें व बँकिंग व्यवसायाची वाढ ह्या तीन गोष्टींवर अवलंबून असतें.[१५] प्रत्येक देशांतील परिस्थिति अर्थातच भिन्न असते. पण स्थूलपणें असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, प्रगत देशांत मध्यवर्ती बँकेनें निर्माण केलेल्या रोकडीचा बराच मोठा भाग बँकांत जातो. अशा देशांत आपल्या देण्या-घेण्यासाठीं बँकेचा उपयोग करण्याची लोकांना संवय झालेली असते. त्यामुळें बरेचसे व्यवहार चेकच्या द्वारांच केले जातात. त्यांना तसें करण्यांत फार अडचणीहि येत नाहींत. कारण लोकांचीं उत्पन्नें मोठीं असल्यानें देणें-घेणेंहि मोठें असतें. मोठ्या रकमांचे व्यवहार करण्यास चेकचें माध्यम चांगलें असतें. अशा देशांत बँकिंगच्या व्यवसायाची वाढहि बरीच झाली असल्यानें विश्वासार्ह अशा सुस्थिर व सुप्रतिष्ठित बँकाहि तेथें असतात. प्रगत देशांच्या तुलनेनें अप्रगत देशांत बँकांजवळ रोकड कमी असते. कारण एकंदर रोकडीचा थोडाच भाग बँकांत ठेवला जातो. लोकांना बँकिंगची संवय नसते. उत्पन्नें लहान असल्यामुळें देणीं-घेणींहि चिल्लर असतात. त्यासाठीं चेकचें माध्यम उपयोगी पडत नाहीं. चांगल्या बँका थोड्या असल्यानें बँकांत

---

[१४] A second way in which a prudent banker can avoid a loss of confidence is to make loans which are repayable fairly quickly—Caution about the kinds of loans that are made is not a sufficient guarantee of a banker's solvency—The final and most important safeguard of the banker's position is that he should avoid making too many loans. He must always maintain sufficiently large holdings of cash. What a minimum necessary proportion between holdings of reserve of cash and his total liabilities will be, can only be decided by experience.—**Day.**

[१५] There exists at any time a certain proportion, depending on the habits and customs of people, between the value of payments and the value of payments ordinarily made by cheques. The banks no doubt can exercise a gradual influence on the habits of the community in that respect but they cannot entirely control nor speedily change them.

पैसा ठेवण्यास लोक धजावतहि नाहींत. ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या तर असें म्हणतां येईल कीं, प्रगत देशांत अप्रगत देशांच्या तुलनेनें बँकांचें चलन-निर्मीतीचें क्षेत्र बरेंच विस्तृत असतें. असें म्हणण्यास आणखी एक कारण आहे. राखीव निधीचें जें प्रमाण असतें तें सुद्धां लोकांच्यांत बँकांचा उपयोग करून घेण्याची प्रवृत्ति कितपत रुजली आहे त्यावर अवलंबून असतें. अमेरिकेंत एकंदर ठेवींच्या एक-दशांश रोकड ठेवण्यास हरकत नसली तर तेंच प्रमाण भारतांत चालूं शकेल असें नाहीं. भारतांत राखीव रोकडीचें प्रमाण अधिक ठेवावें लागेल. कारण बँकिंगची संवय कमी असल्यानें लोकांना रोकड द्यावी लागण्याचे प्रसंग अधिक उद्‌भवतील. त्यामुळें भारतासारख्या देशांत बँकांची पतचलन-निर्मितीची शक्ति अधिकच मर्यादित केली जाते. ह्याचा अर्थ असा कीं, **आपल्या पतचलननिर्मितीचें प्रमाण ठरवितांना व्यापारी बँकांना लोकांच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाहीं.** लोकांना पचेल एवढीच चलननिर्मिति त्यांना करतां येते. त्यापेक्षां अधिक निर्मिति त्यांनीं केल्यास व्यापारी बँकांतील ठेवी व बाहेरील रोकड ह्यांचें लोकांच्या संवयीमुळें होणारें प्रमाण ढासळून लोकांना अधिक रोकड लागूं लागते. त्यामुळें बँकांतून रोकड बाहेर जाऊं लागते व त्यांना आपल्या व्यवहाराबाबत पुनर्विचार करावा लागतो.[१६]

(३) दुसरें असें कीं, बँकांना कर्जें देऊन पतचलन-निर्मिति करतां येतें ह्याचें कारण लोकांना बँकांकडून कर्जें हवीं असतात हेंच नाहीं काय? बँका कर्जें देण्यास खूप तयार असतील; पण लोकांना कर्जें नकोच असलीं तर बँकांच्या कर्जें देण्याच्या तयारीचा उपयोग काय? लोकांचीं कर्जें घेण्याची तयारी असली तरीसुद्धां ती नुसती तयारी पुरत नाहीं. बँकांना मान्य होणारें तारण लोकांजवळ असलें तरच त्या तयारीचा उपयोग. सारांश, बँकांची पतचलन-निर्मितीची शक्ति लोकांच्या सहकार्यावांचून वापरतां येत नाहीं. ह्या परिस्थितीमुळें पतचलन-निर्मितीच्या त्यांच्या शक्तीवर बरीच मर्यादा पडते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.[१७] वर दाखविल्याप्रमाणें प्रगत देशांत लोकांच्यामुळें व्यापारी बँकांच्या पतचलन-निर्मितीच्या शक्तीवर पडणाऱ्या मर्यादा विशेष जाणवण्याचें कारण नसतें. अप्रगत देशांत ह्या मर्यादा लगेच जाणवतात.

(४) रोकड देण्याचे प्रसंग बँकांवर विविध कारणांमुळें येतात. ठेवीदार मागतात म्हणून रोकड ज्याप्रमाणें द्यावी लागते त्याचप्रमाणें ठेवीदारांच्या मार्फत इतर

[१६] The volume of bank money "depends only in part on the more or less arbitrary decisions of bankers regarding their reserves. It depends also partly on something more fundamental, though not unalterable, the business habits and preferences of the community—**Robertson**.

[१७] It is evident that the banks can lend out only as much money as the people are willing to borrow. This acts as a brake on the power of banks to create money through loans.

बँकांनाहि रोकड द्यावी लागते. विविध बँकांच्या ठेवीदारांचे परस्परांबरोबर जे देण्याघेण्याचे व्यवहार चालू असतात त्यामुळें बँका एकमेकांच्या देणेंकरी बनतात. बँका एकमेकाला जें देणें लागतात त्यांचा हिशेब **वजावाट केन्द्रावर** (Clearing House) होत असतो. ह्या हिशेबांत बँकेच्या देण्याची व येण्याची फिटंफाट झाली तर उत्तमच. पण ती न झाली तर ज्या बँकांचें येण्यापेक्षां देणें अधिक असेल त्यांना केव्हांतरी रोकड देऊनच तें देणें भागवावें लागतें. ह्या गोष्टीचा एक महत्त्वाचा परिणाम बँकिंगच्या व्यवहारावर होतो. तो असा कीं, कोणत्याहि एका बँकेला इतर बँकांच्या विशेष पुढें जाऊन पतचलन-निर्मिति करतां येत नाहीं. एखाद्या बँकेनें इतर बँका काय करीत आहेत, ह्याकडे दुर्लक्ष करून भरमसाट कर्जे देण्यास सुरुवात केली तर त्या बँकेंतील ठेवी वाढतात; पण त्याच प्रमाणांत इतर बँकांतील ठेवीदारांना त्या बँकेंतील ठेवीदारांनीं दिलेल्या चेक्सची संख्या व चेकच्या रूपानें देऊ केलेल्या रकमा वाढण्याचा संभव असतो. त्यामुळें ती बँक इतर बँकांची अधिकाधिक प्रमाणांत देणेकरी बनत जाते व तिजवर रोकड गमाविण्याची पाळी येते. रोकड गमावीत जाणें कोणत्याहि बँकेला फार काळ परवडणार नाहीं हें उघड आहे. सतत रोकड गमावणाऱ्या बँकेला केव्हांना केव्हां तरी आपलें कर्जव्यवहार कमी करून राखीव रोकड योग्य प्रमाणांत बाळगण्याची सावधगिरी घ्यावीच लागते.[१८] ह्यावरून ओघानेंच असा निष्कर्ष निघतो कीं पतचलन-निर्मितीच्या बाबतींत एका तालानेंच चालावें लागतें. म्हणजेच निराळ्या शब्दांत इतर बँका काय करीत आहेत ह्याकडे दुर्लक्ष करून कोणत्याहि बँकेला चालत नाहीं.[१९] त्यामुळें पतचलन-निर्मितीच्या बाबतींत कोणत्याहि एका बँकेच्या शक्तीवर बरीच मोठी मर्यादा पडते. जें काय करावयाचें तें सर्वांनीं मिळूनच केलें पाहिजे, अशी बँकांवर अप्रत्यक्षपणें सक्ति होते.[२०] जेव्हां एखादें धोरण सर्वांनीं मिळून ठरवावयाचें असतें तेव्हां तें धोरण ठरलें जाणें सामान्यत: अधिक कठिण होतें. म्हणूनच एका बँकेच्या चलन-निर्मितीच्या शक्तीवर पडणारी मर्यादा स्वतंत्रपणें प्रत्येकावर पडून एकंदर बँकांचीच चलन-निर्मितीची शक्ति मर्यादित होते. एखाद्या देशांत एकच बँक जर असेल तर ही मर्यादा राहणार नाहीं हें उघड

---

१८ The bank that is losing cash will have to demand the repayment of some advances in order to get its cash ratio to a suitably prudent ratio.

१९ Every movement forward by an individual bank weakens it, but every such movement by one of its neighbour banks strengthens it, so that if all move forward together no one is weakened on balance. Thus the behaviour of each bank, though it cannot afford to move more than one step in advance of the others, will be governed by the average behaviour of the banks as a whole—**Keynes.**

आहे. पण तशी वस्तुस्थिति कोणत्याच देशांत नसल्यानें ती गोष्ट विचारांत घेण्याचें कारण नाहीं. अलीकडे कित्येक देशांत प्रत्यक्ष व्यवहारांत ही मर्यादा फारशी जाणवत नाहीं. कारण बँकिंगच्या व्यवसायांत केन्द्रीकरण होऊन बँकिंगचीं सूत्रें थोडयांच्या हातांत आलीं असल्यामुळें एकसूत्री धोरण आंखलें जाणें अधिक सुलभ झालें आहे.

मध्यवर्ति बँकेचें नियंत्रण :—व्यापारी बँकांच्या पतचलननिर्मितीवर मोठ्यांत मोठी पडणारी मर्यादा म्हणजे मध्यवर्ती बँकेचें नियंत्रण ही होय. मध्यवर्ती बँकेला **चलन-शासनसंस्था** (Monetary Authority) यथार्थपणें म्हणतां येते. आधुनिक अर्थव्यवस्थेंत पतचलननिर्मितीच्या बाबतींत बँकांना स्वैरपणें वागूं दिलें जात नाहीं. चलन-वैपुल्य किंवा चलन तुटवडा झाला म्हणजे त्याचे परिणाम फारच बाधक होत असल्यामुळें चलननिर्मिति योग्य मर्यादेंत ठेवणें इष्ट समजलें जातें. त्यामुळें मध्यवर्ति बँकेला जरूर ते अधिकार देऊन व जरूर ते उपाय योजण्याचें सामर्थ्य तिच्यांत निर्माण करून तिच्या करवीं बँकांकडून होणारी पतचलननिर्मिति नियंत्रित केली जाते. अलीकडे अलीकडे बहुतेक सर्व महत्त्वाच्या देशांत मध्यवर्ती बँकेचें पतचलननियंत्रणाचें सामर्थ्य इतकें वाढलें असल्याचें—अर्थात् ह्या सामर्थ्यालाहि मर्यादा असतात हें सांगावयास नकोच—दिसून आलें आहे कीं, पतचलननिर्मितीच्या बाबतींत मध्यवर्ती बँकेच्या तालावर इतर बँकांना नाचावें लागतें, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. 'राजा बोले दळ हाले' ह्या न्यायाप्रमाणें मध्यवर्ती ँक बोले आणि बँकिंगचा व्यवसाय हाले, अशी आज जिकडे तिकडे परिस्थिति आहे.[२१] पतचलनविस्तार व्हावा कीं, पतचलन-संकोच व्हावा, हें ठरवून मध्यवर्ती बँक इतर बँकांना त्या बरहुकूम वागावयास भाग पाडते.[२२] सारांश, इतर बँकांची पतचलननिर्मीतिशक्ति मध्यवर्ती बँकेच्या धोरणांत चपखल बसेल एवढ्या प्रमाणांतच वापरतां येते. त्यामुळें पतचलननिर्मीतीच्या बाबतींत मध्यवर्ती बँकेलाच सर्वांत अधिक महत्त्व दिलें पाहिजे. मध्यवर्ती बँक हें सर्व कशाच्या बळावर साधूं शकते व तिचीं पतचलननियंत्रणाचीं आयुधें कोणतीं, हें पाहिलें म्हणजे ह्या मर्यादेचें स्वरूप समजेल. चलननिर्मितीच्या क्षे ंत मध्यवर्ती बँकेचा नेमका काय

[२०] Additional complications arise when several commercial banks exist and not merely one. In that case the banks have to take into account the possibility of losing cash at the clearing house. This acts as another limitation on the power of banks to create money. There is no doubt that the power of banking system to create money is considerably much less when there are several banks than it would be if there were only one bank.

[२१] The banks so long as they maintain steady ratios of cash to deposits are merely passive agents of central bank policy.

[२२] One of the most important ways in which expansion or contraction of bank deposits can come about is through the initiative of the central bank.

भाग असतो, हें पाहिलें म्हणजे मध्यवर्ती बँकेचें नियंत्रण कसें असतें, हें आपोआपच समजेल. तेव्हां आतां त्या विषयाकडे वळणें उचित होईल.

मध्यवर्ती बँकेचा पैशाच्या निर्मितींतील भाग

एकमेव रोकड निर्माती :—पैशाचे रोकड व ठेवी असे दोन भाग असतात, हें वर सांगितलेंच आहे. पैकीं रोकडनिर्मितीचे म्हणजेच रोखचलन निर्मीतीचे अधिकार संपूर्णपणें मध्यवर्ती बँकेकडे असतात.[२३] चिल्लर समजली जाणारी कांहीं रोकड सरकार स्वत: काढतें; पण तिचा भाग एकंदर चलनांत उपेक्षणीय असतो. तेव्हा मध्यवर्ती बँक हीच रोकडीची एकमेव निर्माती असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. रोकड निर्मितीबाबत मध्यवर्ती बँकेचें हें जें अद्वितीय स्थान असतें त्याचा चलनवृद्धीसाठीं अथवा चलनसंकोचासाठीं मध्यवर्ती बँकेला फार मोठ्या प्रमाणांत उपयोग करतां येतो असें आढळून आलें आहे. रोकड कमीजास्त करण्याचें धोरण मध्यवर्ती बँकेनें स्वीकारल्यास एकंदर रोकडीच्या प्रमाणांत तर फरक होतोच; पण त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी कीं, रोकडीचें प्रमाण बदलल्यामुळेंच ठेवींचें प्रमाणहि बदलतें. कारण आपल्या उत्पन्नाचा किती भाग रोकडीच्या रूपानें ठेवावयाचा व किती भाग ठेवींच्या रूपानें ठेवावयाचा ह्याबाबत लोकांच्या संवयी सामान्यतः स्थिर असतात. निदान त्या जलद बदलत नाहींत. त्यामुळें एकंदर रोकड कमी झाल्यास बँकांना आपल्या व्यवहारांसाठीं उपलब्ध होणारी रोकड कमी कमी होते व त्यांना आपली पतचलननिर्मीति कमी करावी लागते. उलट एकंदर रोकड वाढल्यास बँकाजवळील रोकडहि वाढून त्यांना अधिक प्रमाणांत ठेवी निर्माण करतां येतात. मध्यवर्ती बँकेचें रोकडनिर्मीतींतील अद्वितीय स्थान पैशाच्या एकंदर चलन पुरवठ्याच्या दृष्टीनें मूलभूत महत्त्वाचें असतें ह्यांत शंका नाहीं.[२४]

रोकडनिर्मितीच्या अधिकाराच्या मर्यादा :—मध्यवर्ती बँकेचा नोटा काढण्याचा अधिकार अमर्यादित नसतो. कायद्यानें त्याची मर्यादा बांधून दिलेली असते. मध्यवर्ती बँकेच्या नोटा काढण्याच्या अधिकारावर मर्यादा घालण्याच्या विविध पद्धति आहेत. त्यांतील मुख्य पद्धत म्हणजे कोणत्या ना कोणत्या प्रकारानें मध्यवर्ती बँकेजवळील सुवर्णसांठ्याच्या मूल्याशीं काढलेल्या नोटांच्या मूल्याची सांगड घालून देणें. सुवर्णपरिमाणाचा चलनव्यवस्था म्हणून जेव्हां स्वीकार केला जातो तेव्हां ही पद्धत अपरिहार्यच ठरते.

---

[२३] Central Bank is usually the sole or at least the largest issuer of bank-notes—**Sayers.**

[२४] The central bank has traditionally depended, in its efforts to control the banking system, upon its control of the supply of cash. Indeed it is because it controlled the supply of cash that the bank of England came to assume full responsibility for the behaviour of the financial system. For cash consists in the modern banking system, of the liabilities of the central bank—**Sayers.**

कारण त्या व्यवस्थेंत लोकांजवळील नोटा सुवर्णांत परिवर्तनीय असतात. त्यामुळें नोटांच्या मूल्याच्या मानानें सुवर्णाचा पुरेसा सांठा मध्यवर्ती बँकेला जवळ बाळगावाच लागतो. सुवर्णसांठ्याचें मूल्य व नोटांचें मूल्य ह्यांचा संबंध जोडण्याचा सुवर्ण-साठ्याच्या मूल्याइतकेंच नोटांचें मूल्य असलें पाहिजे, असें ठरविणें हा आत्यंतिक प्रकार झाला. तो सोडला तर दुसरा सामान्यतः उपयोगांत आणला जाणारा प्रकार म्हणजे सुवर्णसांठ्याच्या मूल्याच्या विशिष्ट प्रमाणांतच काढलेल्या नोटांचें जास्तींत जास्त मूल्य असलें पाहिजे असें बंधन मध्यवर्ती बँकेवर घालणें. उदाहरणार्थ, काढलेल्या नोटांच्या मूल्याच्या किमान चाळीस टक्के मूल्य असलेलें सुवर्ण मध्यवर्ती बँकेजवळ असलेंच पाहिजे, असें ठरविल्यास सुवर्णमूल्याच्या अडीचपट मूल्य ही नोटा काढण्याची कमाल मर्यादा होईल. सुवर्ण व नोटा ह्यांचा संबंध जोडण्याचा दुसरा एक प्रकार म्हणजे कांहीं एका मर्यादेपलीकडे नोटांचें मूल्य जाऊं द्यावयाचें असल्यास त्यानंतरच्या प्रत्येक नोटेला शंभर टक्के सुवर्णाचें पाठबळ असलें पाहिजे, असें बंधन घालणें. सुवर्णपरिणाम ही चलनव्यवस्था आतां इतिहासजमा झाली आहे. त्यामुळें सुवर्णमूल्य व रोकडमूल्य ह्यांची सांगड सहसा घातली जात नाहीं. घातली गेली तरी सोयीप्रमाणें सुवर्णसांठा तेवढाच असला तरी त्याचें मूल्य कमी-अधिक केलें जातें. सुवर्णमूल्याच्या अपेक्षित प्रमाणांतहि इतका फेरफार केला जातो कीं, सुवर्णमूल्य व रोकडमूल्य ह्यांचा संबंध आहे असें म्हणण्याला अर्थच रहात नाहीं. ह्याचा अर्थ मध्यवर्ती बँकेचा रोकडनिर्मितीचा अधिकार अनिर्बंध असतो असें नाहीं. काढलेल्या रोकडमूल्याला सरकारमान्य असें कोणतें तरी पाठबळ असलें पाहिजे, असें बंधन मध्यवर्ती बँकेवर असतें. सरकारमान्य पाठबळांत प्रामुख्यानें सुवर्ण व सरकारचे कर्जरोखे ह्यांचाच समावेश होतो. त्यांतहि अलीकडे सुवर्णाचें महत्त्व अधिकाधिक प्रमाणांत कमी होत असून सरकारी कर्जरोख्यांचें प्रमाण वाढत आहे असें दिसून येतें. चलनाचें पाठबळ म्हणून सुवर्णसांठ्याचें महत्त्व अलीकडे किती कमी झालें आहे, ह्याची कल्पना बँक ऑफ इंग्लंडनें इ. स. १९४९ डिसेंबरमध्यें काढलेल्या नोटांचें मूल्य १३० कोटि पौण्डांपेक्षां अधिक होतें. त्यांपैकीं १२८ कोटीपेक्षां अधिक नोटांना सरकारी कर्जरोख्यांचें पाठबळ होतें व बँकेजवळ असलेल्या सुवर्णसांठ्याचें मूल्य तेव्हां फक्त सुमारें ३॥ लाख पौण्ड होतें ह्या माहितीवरून येईल. इंग्लंड हा देश एका काळीं सुवर्णपरिमाणाचा कट्टा पुरस्कर्ता होता, हें लक्षांत घेतलें म्हणज झालेला बदल किती महत्त्वाचा आहे तें समजतें.

चलनपुरवठ्याची वाढती लवचिकता :—अलीकडील काळांत सुवर्णावर रोकड-निर्मिति अवलंबून नसल्यामुळेंच मध्यवर्ती बँकेला चलनपुरवठ्याच्या बाबतींत फार महत्त्व प्राप्त झालें आहे. कारण त्यामुळें रोकडनिर्मिति अतिशय लवचिक होऊं शकली आहे. तसेंच रोकडनिर्मितिबाबत स्वतःची तारतम्य बुद्धि वापरून योग्य ते निर्णय घेणें मध्यवर्ती बँकेला शक्य होऊं लागलें आहे. मध्यवर्ती बँकेकडून होणारी रोकडनिर्मिति जेव्हां मध्यवर्ति बँकेजवळील सुवर्णावर अवलंबून असतें

तेव्हां मध्यवर्ती बँकेच्या कारभारांत क्रियाशीलतेचा एक प्रकारें अभाव असतो. सुवर्णसांठा वाढला कीं, रोकडवृद्धि करावयाची; सुवर्णसांठा कमी झाला कीं. रोकडसंकोच करावयाचा असें ठोकळेबाज धोरण मध्यवर्ती बँकेला स्वीकारावें लागते. हल्लीं ही परिस्थिति राहिली नाहीं. हल्लीं मध्यवर्ती बँकेची रोकडनिर्मिति कशाशींहि जखडली गेली नसल्यामुळें मध्यवर्ति बँकेला आपला रोकड-निर्मितीचा अधिकार फारच काळजीपूर्वक व पूर्ण विचार करून वापरावा लागतो. म्हणूनच मध्यवर्ती बँकेच्या तारतम्य बुद्धीला आज विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. रोकडनिर्मितीच्या मध्यवर्ती बँकेच्या अधिकारांत आजकाल जो व्याप्तपणा दिसून येतो, मध्यवर्ती बँकेच्या भूमिकेंत जो अधिक क्रियाशीलपणा दिसून येतो, त्यामागें एक मोठी वैचारिक क्रान्ति दडलेली आहे. सुवर्णसाठ्याशीं रोकडनिर्मिति जखडून टाकण्यांत जुन्या अर्थशास्त्रज्ञांची विचारसरणी अशी होती कीं, अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें पैसा ही संस्था सर्वस्पर्शी व दूरगामी महत्त्वाची असल्यानें मनुष्याच्या हातांतील खेळ बनूं नये.[२५] ह्या बाबतींतली आधुनिक विचारसरणी अगदीं उलट आहे. रोकड-निर्मितीच्या बात्रीसाठीं सत्ता मध्यवर्ती बँकेच्या हातांत केंद्रित करण्यांतील धोका मान्य करूनहि आधुनिक अर्थशास्त्रज्ञ असें प्रतिपादितात कीं, आपल्या अधिकाराचा मध्यवर्ती बँकेकडून दुरुपयोग होईल ह्या भीतीनें मध्यवर्ती बँकेला हे अधिकारच नाकारणें कदापि योग्य नाहीं. मनुष्याच्या व्यवहाराचें नियंत्रण मनुष्याकडून जाणते-पणें होणें उचित आहे. तेव्हां व्यापक अधिकारानें युक्त असलेल्या मध्यवर्ती बँका असणें अत्यावश्यक आहे. तसेंच मध्यवर्ती बँकेला अनुभवाचें पाठबळ जसजसें मिळत जाईल तसतसें संभाव्य चुकामुळें निर्माण होणारें धोके कमी होत जातील.[२६] ह्या विचारसरणीचा प्रभाव अलीकडे अधिक पडत असल्यानें मध्यवर्ती बँकेचे रोकड-निर्मितीचे व ठेवींच्या नियंत्रणाचे अधिकार वाढण्याची प्रवृत्ति सर्वत्र विशेषेकरून दिसून येत आहे. साहजिकच मध्यवर्ती बँकेचें स्थानमहात्म्य वाढत आहे.

पतचलन नियंत्रण (Credit Control) :—पैशाचा दुसरा प्रकार जो ठेवी त्या बाबतींत मध्यवर्ती बँकेची भूमिका नियंत्रकाची असते. मध्यवर्ती बँकेला व्यापारी

---

[२५] Supply of money should be so closely tied to conditions in the market for gold that there should be no room for human manipulation, however, well intentioned—Most of these arguments boil down to an assertion that men are not to be vested with discretionary powers and that departures from automatism in the regulation of the monetary system sooner or later lead to troubles and bad trouble at that—**Sayers.**

[२६] We must have central bankers to exercise a discretionary influence over monetary situation—As experience in central banking accumulates, it is reasonable to expect that the inherent weaknesses will be kept increasingly under control—**Sayers.**

बँकाच्या व्यवहारांचें नियंत्रण करतां येतें ह्याचें मुख्य कारण असें कीं, मध्यवर्ती बँक ही 'बँकांची बँक' असते. इतर बँकांच्या ठेवी मध्यवर्ती बँकांत असतात, इतर बँकांना अडीअडचणीच्या वेळीं कर्ज देण्याची जबाबदारी मध्यवर्ती बँकेवर असते.[२७] मध्यवर्ती बँक अशा प्रकारचें धोरण आंखू शकते कीं, त्यामुळें बँकनिर्मित चलन वाढविणारे अगर कमी करणारे प्रवाह अर्थव्यवस्थेंत निर्माण व्हावेत. बँकनिर्मित चलन नियंत्रित करण्याची मध्यवर्ती बँकेंत जी शक्ति असते ती तिला कशामुळें प्राप्त होते व ती वापरण्याचे मार्ग कोणते, हें समजून घेणें अगत्याचें आहे. कारण आधुनिक चलनशास्त्रांत त्या गोष्टीला फार महत्त्व दिलें जातें.

मध्यवर्ती बँकेची ठेवरूप चलन किंवा पतचलन नियंत्रित करण्याची शक्ति दोन महत्त्वाच्या गोष्टींवर आधारलेली आहे. व्यापारी बँकांकडून राखीव रोकडीला दिलें जाणारें महत्त्व व रोकडनिर्माती म्हणून मध्यवर्ती बँकेला प्राप्त होणारी सत्ता ह्या त्या गोष्टी होत.[२८] जेथें राखीव रोकडीचें प्रमाण कायद्यानेंच ठरविलेलें असतें तेथें राखीव रोकड बँकांना विचारांत घ्यावीच लागते. पण एरवीं सुद्धां राखीव रोकडीला महत्त्व दिलें जातें असा अनुभव आहे. रोकड-निर्मितीची सत्ता मध्यवर्ती बँकेस असते हें सर्वमान्यच आहे. कायद्याच्या सक्तीमुळें असो किंवा पडलेल्या प्रथांमुळें असो; इतर बँका आपल्या राखीव रोकडीकडे पाहून आपल्या चलन-निर्मितीच्या मर्यादा ठरवीत असल्या तर रोकडीची एकमेव निर्माती म्हणून मध्यवर्ती बँकेला अर्थव्यवस्थेंत असाधारण महत्त्व प्राप्त होतें. कारण त्यामुळेंच मध्यवर्ती बँकेला परिणामकारक रीत्या ठेवरूप चलनाचें नियंत्रण करतां येतें. तें कसें हें मध्यवर्ती बँकेची बँकनिर्मित चलन नियंत्रित करण्याचीं साधनें व त्या साधनांची कार्यपद्धति काळजीपूर्वक पाहिल्यास समजेल.

बँक रेट :—बँक रेट म्हणजे मध्यवर्ती बँकेचा व्याजाचा दर.[२९] हें ठेवींचें नियंत्रण करण्याचें मध्यवर्ती बँकेचें एक साधन आहे. पतचलनाचा पुरवठा कमी अधिक करणें हें जसें बँक रेटचें कार्य असतें तसेंच बँक रेटमध्यें बदल करण्यास देशांतील व्याजाच्या दरांत बदल व्हावा असाहि हेतु होतो. बँक रेटला महत्त्व देण्याचे मुख्य कारण असें कीं इतर बँकांचा व्याजाचा दर बँक रेटपेक्षां अधिक असावा

---

[२७] The most important foundation of a central bank's power derives from its position as the bank at which commercial banks hold their deposits i. e. from its position as the banker's bank.—**Day.**

[२८] Its control of the commercial banks is based on two facts-(i) The regard paid by the commercial banks, in the regulation of their most important operations to the size of their cash reserves and (ii) It's position—as the source of cash.
—**Sayers.**

अशी प्रथा असते. ही प्रथा पडण्याचें कारण असें सांगतां येईल कीं, मध्यवर्ती बँक ही व्यापारी बँकांची अंतिम सावकार असते. म्हणजे व्यापारी बँकांना अडचणीच्या वेळीं कर्जरूप मदत करण्याची जबाबदारी तिच्यावर असते. व्यापारी बँका कर्जा-करितां शेवटीं मध्यवर्ती बँकेवरच अवलंबून राहत असल्यामुळें साहजिकच आपला व्याजाचा दर त्या बँक रेटपेक्षां अधिक ठेवतात. [३०] त्यामुळें बँक रेटमधील फेरफारांचा परिणाम दूरगामी होण्याचा संभव निर्माण होतो. जेव्हां बँक रेट वाढवला जातो, तेव्हां व्यापारी बँकांच्या व्याजाचा दर वाढतो. त्यामुळें बँकांकडून घेतल्या जाणाऱ्या कर्जासाठीं असलेली मागणी कमी होण्याची शक्यता असते. तसें झाल्यास ठेवरूप चलन ओघानेंच कमी होतें. उलट मध्यवर्ती बँकेनें बँक रेट कमी केल्यास त्यामुळें व्यापारी बँकांचा व्याजाचा दर कमी व्हावयाचा, म्हणून कर्जाकरितां मागणी वाढण्याचा आणि त्या कारणानें ठेवरूप चलन वाढण्याचा संभव निर्माण होतो. बँक रेट व ठेवरूप चलन ह्यांचा हा संबंध असल्यामुळें **चलनवाढ करण्यासाठीं बँकरेट कमी करण्याचें व चलनसंकोच हवा असेल तेव्हां बँकरेट वाढविण्याचें धोरण** मध्य-वर्ती बँकेकडून स्वीकारलें जातें. [३१] मध्यवर्ती बँकेच्या दराला अलीकडे इतकें महत्त्व प्राप्त झालें आहे कीं बँक रेटमधील बदल घोषित केला गेला कीं लगेच तसें करण्यांतील मध्यवर्ती बँकेचा हेतु ओळखून इतर बँका आपल्या कर्जाच्या प्रमाणांत बदल करतात. कित्येकदां इतर बँका आपला दर न बदलतांहि कर्जाचें प्रमाण कमी अधिक करतात. कारण कोणत्याहि परिस्थितींत कोणालाहि कर्ज नाकारण्याचा कोणत्याहि बँकेस अधिकार असतोच. [३२] ह्या विवेचनावरून ही गोष्ट समजण्यास

[२९] Bank rate is the minimum rate at which the central bank, as the lender of the last resort, is prepared to lend to the commercial banks. Changes in the bank rate are effective if within the banking system itself interest rates move substantially with bank rate and if a movement in the bank rate is accompanied by some change in the availability of bank credit.

[३०] The other banks must have adequate supplies of currency, which can, in the last resort only be abtained from the central bank. That gives the central bank great power of control over credit. The market rate of interest on short term advance will always tend to approximate to the rate charged by the central bank. So long as a bank has to borrow from the central bank in order to accommodate its customers, it cannot afford to lend to them at less than bank rate, indeed it will charge them a rate exceeding bank rate by a customary margin—**Hawtrey.**

[३१] Theory of bank rate changes is that a contraction of credit is achieved by raising bank rate, and an expansion of credit brought about by reducing it.

अडचण पडूं नये कीं, मध्यवर्ती बँक ही अंतिम सावकार असल्यामुळेंच बँक रेटला महत्त्व असतें.[३३] रोकडीची एकमेव निर्मिती असल्यामुळेंच मध्यवर्ती बँकेला अंतिम सावकाराची भूमिका पार पाडतां येते.

बँकरेटच्या मर्यादा :—बँक रेटमधील फेरफार हें चलन-नियंत्रणाचें महत्त्वाचें साधन मानलें जात असलें तरी तें साधन कोणत्याहि परिस्थितींत हमखास यशस्वी होईलच असा निर्वाळा मात्र देतां यावयाचा नाहीं. बँक रेटची परिणाम-कारकता व्याजाच्या दरांतील फेरफाराची प्रतिक्रिया कर्ज घेणाऱ्यावर काय होते, ह्यावर अवलंबून असते. ती प्रतिक्रिया हवी तशी होईलच असें नाहीं. अनुभव असा आहे कीं, ज्या वेळीं भांडवल-गुंतवण करणारे कमालीचे आशावादी असतात, तेव्हां —म्हणजे किंमती जेव्हां वाढत असतात, उत्पादन, उपभोग आदि अर्थव्यवहारांना वेग आलेला असतो तेव्हां—थोडेंसें व्याज वाढलें तरी कर्जदारावर त्याचा फारसा परिणाम होत नाहीं. व्याज वाढूनहि कर्जांना मागणी वाढतच असते. उलट अनुभव मंदीच्या काळांत येतो. तेव्हां व्याज कमी झालें कीं, कर्ज काढायला लोक अधिक प्रमाणांत प्रवृत्त होतीलच, असें निश्चितपणें सांगतां येणार नाहीं.[३४] बँक रेटमध्यें फारच मोठा फेरफार केला तर इष्ट परिणाम होण्याची शक्यता वाढते हें खरें; पण असें मोठे फरक सामान्यपणें करण्यांत येत नाहींत. कारण त्यामुळें उलटें टोंक गांठलें जाण्याचा धोका असतो. तेव्हां बँक रेटला खुल्या बाजारांतील व्यवहाराची जोड द्यावी लागते. खुल्या बाजारांतील व्यवहार मध्यवर्ती बँकेकडून स्वतंत्रपणेंहि करण्यांत येतात.

खुल्या बाजारांतील व्यवहार[३५] म्हणजे **मध्यवर्ती बँकेकडून केले जाणारे खरेदी विक्रीचे व्यवहार होत.** मध्यवर्ती बँकेकडून सामान्यपणें सरकारी कर्जरोख्याची खरेदी केली जाते. ही खरेदी-विक्री हें मध्यवर्ती बँकेचें पतचलन-नियंत्रणाचें एक महत्त्वाचें हत्यार

[३२] The rise or fall of bank rate not only reacts on the market rate but acts as a signal to the banks to apply or relax restraints on borrowing—**Hawtrey.**

[३३] If the central bank alters the rate of interest at which it will lend to the commercial banking system when the commercial banks are in difficulties, the latter have a strong incentive to alter the rates of interest at which they are willing to lend—In turn these changes in the interest rates at which commercial banks lend affect the demand for loans and the rates of interest on all kinds of securities—**Day.**

[३४] In depression, however low the rate of interest, businessmen may not borrow if they take a pessimistic view of the future—All instruments of monetary policy are more effective in checking economic activity than in stimulating it.

आहे. मध्यवर्ती बँक जेव्हां मोठ्या प्रमाणावर खरेदी करते तेव्हां खरेदीची किंमत मध्यवर्ती बँकेला रोकडीच्या रूपानें किंवा चेकच्या रूपानें द्यावी लागते. चेक लोकांनीं आपापल्या बँकांत भरल्यास मध्यवर्ती बँक इतर बँकांची देणेकरी होते. त्याचा परिणाम इतर बँकांच्या नांवें मध्यवर्ती बँकांत असलेल्या रकमा वाढण्यांत होतो. आपल्या खात्यांत मध्यवर्ती बँकेंत असलेल्या रकमा राखीव रोकडींत धरण्याचा बँकांचा प्रघात असल्यामुळें त्यांची मध्यवर्ती बँकेंतली रक्कम वाढली कीं, बँकांना कर्जें देऊन बँकनिर्मित चलन वाढविण्यास वाव मिळतो व अशा प्रकारें पतचलनवाढ होते. खरेदीची किंमत मध्यवर्ती बँकेनें संपूर्णपणें रोकडीच्या स्वरूपांत दिली आहे असें धरलें तरी त्यामुळें ह्या विवेचनाला बाध येत नाहीं. तसें झाल्यास प्रथम रोकड वाढून देशांतील चलन वाढतें. नव्या रोकडीचा कांहीं भाग बँकांत जातो आणि त्यामुळें व्यापारी बँकांची राखीव रोकड वाढून त्यांना अधिक पतचलन-निर्मिति करण्यास प्रोत्साहन मिळतें. सारांश, मध्यवर्ती बँकेनें खुल्या बाजारांत खरेदीचे व्यवहार केल्यास चलनवाढ होते.[३६]

उलट मध्यवर्ती बँकेनें खुल्या बाजारांत विक्रीचे व्यवहार केल्यास चलन-संकोच होण्यास मदत होते. मध्यवर्ती बँकेकडून सरकारी कर्जरोखे खरेदी करणाऱ्यांनीं त्यांची किंमत रोकडीच्या रूपानें दिल्यास त्यानिमित्त बँकांतून रोकड काढली जाते आणि बँकांना परिणामीं पतचलनसंकोच करणें भाग पडतें. बँकांतून रोकड काढली न गेली तरी प्रथम देशांतील रोकड कमी होतेच आणि केव्हांतरी बँकांना रोकड काढून देण्याची पाळी येते. अर्थातच इतर बँकांवरील चेक मध्यवर्ती बँकेला बहुधा दिले जातात. त्या परिस्थितींत इतर बँकांच्या खात्यांतील रकमा कमी होऊन त्यांना पतचलनसंकोच करावा लागतो. राखीव रोकडीसंबंधींच्या प्रथा बँका पाळीत असतील तरच पतचलनसंकोच अपरिहार्य होतो; पण सामान्यतः असें म्हणण्यास

[३५] Open market operations mean the action of the central bank in buying or selling securities of various kinds in the open market on its own initiative. One purpose of open market operations is to influence directly the prices of securities concerned i. e. to have direct influence on interest rates. The other purpose is to alter the cash reserves of the commercial banks.

[३६] Open market purchases lead to falling interest rates and to an expansion of cash reserves of commercial banks and so to an increase in the money supply if the commercial banks hold their cash reserve ratios intact. Open market sales lead to rising interest rates and to a contraction of cash reserves of commercial banks. This makes the commercial banks reduce their deposit liabilities by demanding repayment of existing loans and by tightening the conditions under which they grant new loans.

हरकत नाही कीं, मध्यवर्ती बँकेवर व्यापारी बँका बऱ्याच प्रमाणांत अवलंबून रहात असल्यामुळें--विशेषतः मध्यवर्ती बँकच कोणत्याहि परिस्थितींत व्यापारी बँकांचा आधारस्तंभ असल्यानें--मध्यवर्ती बँकेचा कल पाहूनच त्या आपलें धोरण आंखतात. पतचलनसंकोच हा केवळ व्यापारी बँकांचाच व्यवहार असल्यानें व कर्जें परत मागितलीं कीं तीं द्यावींच लागत असल्यामुळें खुल्या बाजारांतील व्यवहारामुळें पतचलनसंकोच त्वरित होण्यास हरकत नसते. पतचलन वाढीबाबत असें निश्चयानें बोलतां येत नाहीं. कारण पतचलनवाढीला बँका तयार झाल्या तरी कर्जदार तयार असावे लागतात; पण एवढें मात्र खरें कीं, खुल्या बाजारांतील व्यवहारांचा परिणाम चलनावर प्रत्यक्ष स्वरूपाचा असतो, त्यामुळें खुल्या बाजारांतील व्यवहार नेहमींच तुलनेनें परिणामकारक होतात. खुल्या बाजारांतील व्यवहारामुळें पतचलनपुरवठा कमी जास्त होतो. ह्यापेक्षांहि महत्त्वाची गोष्ट अशी कीं व्याजाच्या दरांवरहि त्यांचा प्रत्यक्ष स्वरूपाचा परिणाम होतो. ज्या कर्जरोख्यांची खरेदी मध्यवर्ती बँकेकडून करण्यांत येते, त्यांच्या किंमती वाढतात म्हणजेच पर्यायानें व्याज कमी होते. ज्यांना कर्जरोख्यांच्या बाजारांत महत्त्वाचें स्थान असतें असें कर्जरोखे खरेदी केले जात असल्यामुळें खुल्या बाजारांतील खरेदीचा परिणाम व्याजाच्या दरावर सर्वत्र झाल्याशिवाय राहत नाहीं. खुल्या बाजारांत मध्यवर्ती बँकेनें विक्री केल्यास कर्जरोख्यांच्या किंमती पडून व्याजाचा दर वाढतो, खुल्या बाजारांतील व्यवहाराबाबत ब्रिटनमध्यें अवलंबिलेलें तंत्र पहातां असें दिसतें कीं, खुल्या बाजारांतील व्यवहारांच्या आधारें अल्पकालीन व्याजाचें दर नियंत्रित करणें विशेष सुलभ असतें. ब्रिटनमध्यें अशी परंपरा पडली आहे कीं, खुल्या बाजारांतील व्यवहार मुख्यतः अल्प मुदतीच्या सरकारी कर्जरोख्यांच्या संबंधांत करण्यांत येतात. त्यामुळें त्यांच्या किंमती म्हणजेच त्यांच्यावरील व्याज स्थिर राखण्यांत किंवा त्याला योग्य तें वळण देण्यांत मध्यवर्ती बँकेला यश मिळूं शकतें.[३७] बँक रेट मधील फेरफाराची त्यांना जोड दिली म्हणजे यश विशेष निश्चित होतें. बँक रेटची जोड दिल्यानें ज्या प्रमाणें खुल्या बाजारांतील व्यवहार यशस्वी होतात त्याप्रमाणें बँकरेट बदलण्यांतला हेतु पूर्णांशानें साध्य व्हावयाचा असेल तर त्या बदलाला खुल्या बाजारांतील व्यवहारांची जोड देणें हितावह असते. सारांश, **खुल्या बाजारांतील व्यवहार व बँकरेटमधील बदल हे परस्पर पूरक उपाय** आहेत. ते उपाय-योजण्यामागील हेतूला अर्थातच अधिक महत्त्व असतें. ते हेतू साध्य होण्याच्या दृष्टीनें दोन्हीपैकीं एकच उपाय योजल्यास पुरें होईल काय, तसें असल्यास कोणता उपाय योजावयाचा कीं,

[३७] In controlling the short term rates themselves, the central bank can, as the British example shows, employ open market operations to a great effect—It is much easier for the central bank to exert its influence by pushing short rates up and down relying upon a normal public reaction to bring about a desired movement in long-term rates—**Sayers.**

दोन्ही उपायांचा अवलंब करणें आवश्यक आहे, हें अर्थातच स्थलकाल परिस्थिति पाहून मध्यवर्ती बँकेस ठरवावें लागतें.[३८]

पतचलनोपयोग नियंत्रण (Selective Credit Control) :—बँक रेटमधील फेरफार व खुल्या बाजारांतील व्यवहार हे पतचलननियंत्रणासाठीं मध्यवर्ती बँकेकडून योजिले जाणारे दोन महत्त्वाचे उपाय आहेत. त्या खेरीज इतर उपायहि प्रसंग पडेल त्याप्रमाणें योजिले जातात. कित्येक वेळां मध्यवर्ती बँकेनें इतर बँकांना नुसत्या सूचना केल्या तरी काम भागतें. कारण मध्यवर्ती बँकेकडून वेळोवेळीं मदत लागत असल्यामुळें इतर बँकांत तिच्या इच्छेला मान देण्याची प्रवृत्ति असते. विशिष्ट व्यवहारासाठीं कर्जपुरवठा करूं नये किंवा कमी प्रमाणांत कर्ज द्यावें, अशा प्रकारच्या सूचना मध्यवर्ती बँकेकडून दिल्या जातात. उदाहरणार्थ, अन्नधान्याचे भाव भरमसाट वाढत असतां सांठेबाजांना कर्जें देऊं नयेत, अशा सूचना मध्यवर्ती बँक देते व त्या मानल्या गेल्या तर पतचलननियंत्रणाला मदत होते. उलटपक्षीं विशिष्ट वापरासाठीं कर्जें अधिक प्रमाणांत द्यावीं, अशा स्वरूपाची सूचनाहि मध्यवर्ती बँक करूं शकेल.[३९] कर्जव्यवहारासंबंधीं विशिष्ट प्रकारच्या सूचना देऊन जेव्हां मध्यवर्ती बँक आपला हेतु साधूं पाहाते तेव्हा पतचलननिर्मिति कमी अगर अधिक करण्यापेक्षां पत-चलनाचा ओघ विशिष्ट उपयोगाकडे वळावा यावर मध्यवर्ती बँकेचा रोख अधिक असतो. म्हणजे चलननिर्मिति व चलननियंत्रण हें मध्यवर्ती बँकेचे जें खास क्षेत्र असतें त्यापलीकडे जाऊन एकंदर अर्थव्यवहारांचें नियंत्रण मध्यवर्ती बँक करूं पाहते. मध्यवर्ती बँकेला हा अधिकार अलीकडे प्राप्त झाला आहे, ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं मध्यवर्ती बँक ही चलन क्षेत्रांतील सरकारची प्रतिनिधि

[३८] The way to ensure reality for bank rate policy is to ensure that the central bank is continuously operating in the money market and conditions for success in this can easily be created in an active financial centre—**Sayers.**

[३९] The central bank may give direct instructions to the banks regarding the kind and amount of lending they may do. The central bank may instruct the commercial banks not to lend for certain purposes like speculation, unessential industries etc. This method may be used for credit control but it is more important for changing the channels of credit flow. "The basic argument for a selective credit policy is that while a low stable rate provides a favourable working background for capital development the economy is still liable to run off the rails more easily in some directions than in others and that the central bank should use financial controls to check the unhealthy developments in these particular directions—**Sayers.**

आहे आणि म्हणून सरकारची जी तत्कालिन अर्थनीति असेल तिला आपल्या अधिकाराचा उपयोग करून हातभार लावणें हें मध्यवर्ती बँकेचें कार्य आहे असें आजकाल सर्वत्र समजलें जातें. निराळ्या शब्दांत चलनशासनाची जबाबदारी तात्त्विक दृष्ट्या जरी राज्यसंस्थेवर असली तरी व्यवहारांत ही जबाबदारी मध्यवर्ती बँकेकडे सोंपविली जाते. शिवाय आपली अर्थनीति ठरवितांना चलनशासनसंस्था ह्या नात्यानें मध्यवर्ती बँकेचा सल्ला सरकारकडून घेतला जातोच. अर्थनीति ठरविण्यांत सरकारची जोडीदार असलेली चलनशासन-संस्था ठरलेली अर्थनीति अंमलांत आणण्याच्या दृष्टीनें राज्यसंस्थेशीं सहकार्य करण्यास अर्थातच बांधील असते. म्हणूनच सरकारी धोरणाच्या अनुरोधानें पतचलनाचा ओघ विशिष्ट दिशेनें वळावा अशी खबरदारी मध्यवर्ती बँकेनें घेणें अनुचित समजलें जात नाहीं. सारांश, पतचलनाच्या प्रमाणाचें नियंत्रण मध्यवर्ती बँक ज्याप्रमाणें करूं शकते त्याचप्रमाणें पतचलनाच्या उपयोगावरहि मध्यवर्ती बँक निर्बंध लादूं शकते.

राखीव रोकडीच्या प्रमाणांतील बदल :—राखीव रोकड निधीचें प्रमाण (Cash Reserve Ratio) ठरविण्याचा अधिकार मध्यवर्ती बँकेला असला किंवा मध्यवर्ती बँकेच्या सूचनेवरून हें प्रमाण सरकार ठरवित असलें तर पतचलननियंत्रणाचा एक खास उपाय मध्यवर्ती बँकेस उपलब्ध होतो. चलनवाढ करावयाची असेल तेव्हां राखीव रोकडीचें प्रमाण कमी करून मध्यवर्ती बँक इतर बँकांना कर्जें वाढविण्यास प्रवृत्त करते. उलट राखीव रोकडीचें प्रमाण वाढवून त्यांना पतचलनसंकोच करण्यास ती भाग पाडूं शकते. राखीव रोकडीचें किमान प्रमाण बदलण्याचा हा उपाय खुल्या बाजारांतील व्यवहार किंवा बँकरेटचा बदल परिणामकारक करण्याकरितां चांगल्या प्रकारें वापरतां येतो. खुल्या बाजारांतील व्यवहाराबाबत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, आपल्या ठेवींच्या विशिष्ट किमान प्रमाणांत रोकड बाळगण्याचें बंधन बँका पाळीत असतील तरच खुल्या बाजारांतील व्यवहारांचा हेतु साध्य होऊं शकतो. त्या परिस्थितींतच आपल्याकडील रोकड कमी झाली कीं, बँका आपल्या कर्जव्यवहारांना मुरड घालतील. बँकानीं आपणहूनच संयम पाळावा अशी अपेक्षा असल्यास असें घडेलच असा निर्वाळा देतां येत नाहीं. सावधगिरी व नफा वाढविण्याचा मोह ह्या दोन गोष्टी बँकांना परस्पर विरोधी दिशेनें ओढीत असतात. त्यांतील सावधगिरीचा जोरच नेहमीं अधिक दिसून येईल असें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कित्येक वेळां असें दिसून येतें कीं, कर्जसंकोच करणें आवश्यक असूनहि बँका नफ्याच्या मोहानें तसें करण्याचें टाळतात. म्हणून तर मध्यवर्ती बँकेला रोकडीचें किमान प्रमाण ठरविण्याची सत्ता हातीं घ्यावी लागते.[४०] कायद्यानें ठरविलेलें रोकडीचें किमान प्रमाण

४० In many countries it has been considered that prudence is not always a sufficient force. In those countries the law has imposed minimum cash reserves.

मूळ हेतु साधण्याच्या दृष्टीनें आवश्यक असतें. त्याचें कारण असें सांगतां येईल कीं, कित्येकदां बँकाजवळील रोकडीचें प्रमाण किमानपेक्षां पुष्कळच अधिक असतें. त्या परिस्थितींत खुल्या बाजारांतील व्यवहारांना त्वरित यश मिळणें कठीण होतें. उदाहरणार्थ, कायद्यानें ठरविलेलें प्रमाण आठ टक्के असलें आणि बँका सावधगिरीच्या दृष्टीनें सोळा टक्के रोकड बाळगीत असल्या तर खुल्या बाजारांतील व्यवहारानें बँकाजवळील रोकड आठ टक्क्यांपर्यंत कमी होईपावेतों पतचलनसंकोचास सुरुवात होणार नाहीं. अशा परिस्थितींत किमान रोकडीचें प्रमाण सोळा करतां आल्यास मध्यवर्ती बँकेचा कार्यभाग त्वरित साधूं शकतो. किमान प्रमाणापेक्षां अधिक रोकड बँका जवळ बाळगत असतील तर खुल्या बाजारांतील व्यवहारच नव्हे तर बँकरेट मधील बदलहि यशस्वी होऊं शकत नाहींत. कारण जवळ भरपूर रोकड असल्यास बँकरेट-मधील बदलांकडे दुर्लक्ष करून बँका आपले व्यवहार पूर्ववत चालू ठेवतील हें अगदीं संभवनीय आहे. अशा परिस्थितींत किमान रोकडीचें प्रमाण बदलण्याची सत्ता मध्यवर्ती बँकेच्या हातांत असणें अतिशय महत्त्वाचें आहे.[४१] सारांश, किमान रोकडीचें प्रमाण बदलण्याची सत्ता मध्यवर्ती बँकेकडे असेल तर चलननिर्मिति व चलननियंत्रणाची तिची शक्ति वाढते. ह्या सत्तेचें आणखी एक दोन गुण सांगण्याजोगें आहेत. ह्या सत्तेमुळें मध्यवर्ती बँकेकडून होणारें पतचलननियंत्रण अधिक होईल. खुल्या बाजारांतील व्यवहार काय किंवा बँकरेटमधील बदल काय ह्यांचें कार्य सावकाशपणें होत असतें; पण रोकडीचें किमान प्रमाण मध्यवर्ती बँकेनें बदलल्यास बँकांना मध्यवर्ती बँकेचा हेतु साधणारी कृति तडकाफडकी करावी लागेल. पतचलन-संकोचाच्या बाबतींत ह्या उपायाची परिणामकारकता विशेष उठून दिसेल. दुसरा गुण असा कीं, मागासलेल्या देशांत सुप्रस्थापित बाजारपेठा नसल्यामुळें खुल्या बाजा-रांतील व्यवहारांवर फार मोठ्या मर्यादा पडतात. कारण मोठ्या प्रमाणावर कोण-त्याही कर्जरोख्यांची खरेदीविक्री करणें शक्य नसतें. अशा ठिकाणीं किमान रोकडीचें प्रमाण बदलणें हा उपाय अधिक योग्य व त्वरित गुणकारी ठरूं शकतो.[४२] सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ केन्स ह्यांनीं मुख्यतः ह्या दोन गुणांमुळेंच ह्या तिसऱ्या उपायाचा आग्रहानें पुरस्कार केला. त्यांतल्यात्यांतहि त्यांनीं दुसऱ्या गुणाला विशेष महत्त्व दिलें.[४३]

---

[४१] In such circumstances, the power to vary reserve ratios can fairly be described as vital, for without it, central banking would, at least over long periods, be farcical—Sayers.

[४२] One method achieves its results by a stroke of the pen while the other is likely to spread over some little time—The advantages of the new weapon whereever (as is the case in most countries) the inadequacy of markets stands in the way of open market operations have now been widely recognised—**Sayers.**

बँकांची बँक हें कार्य महत्त्वाचें :—वरील विवेचनावरून एक गोष्ट स्पष्टपणें दिसून येते, ती अशी कीं, मध्यवर्ती बँक ही बँकांची बँक असते; म्हणजे इतर बँका आपल्या ठेवीदारांसाठीं जे व्यवहार करतात ते सर्व (ठेवी ठेवून घेणें, कर्जें देणें यांसारखे) त्यांच्यासाठीं करणारी ती बँक असते. ह्यांत मध्यवर्ती बँकेला इतर बँकांकडून होणाऱ्या पतचलननिर्मितीवर नियंत्रण कां घालतां येतें, ह्याचें रहस्य सांठविलेलें आहे.[४४] तसेंच मध्यवर्ती बँक ही एकमेव रोकडनिर्माती असते; म्हणून तिला आपल्या साऱ्या जबाबदाऱ्या पार पाडतां येतात, हें वर दाखविलेंच आहे. रोकडीची एकमेव निर्माती व ठेवींची नियंत्रक ह्या नात्यानें मध्यवर्ती बँकेचें स्थान अद्वितीय आहे ह्यांत संशय नाहीं. मध्यवर्ती बँकेच्या स्थानमहात्म्यामुळें मध्यवर्ती बँकेनें एखादी गोष्ट केली कीं, तसें करण्यांतील तिचा हेतु ओळखण्याची व त्यानुसार आपलें धोरण ठरविण्याची तत्परता इतर बँका दाखवितात. एवढेंच नव्हेतर कित्येकदां मध्यवर्ती बँक कोणती कृति करील हें आगाऊच ओळखून त्या कृतीला पोषक अशा गोष्टी आधींच करून टाकतात आणि त्यामुळें मध्यवर्ती बँकेला जें साधावयाचें असतें तें आधींच साधलें जातें. सारांश मध्यवर्ती बँकेचें महत्त्व अलीकडील काळांत इतकें वाढलें आहे कीं, मध्यवर्ती बँकेनें दिलेला इषारा सुद्धां कित्येकदां पुरेसा ठरतो.[४५]

सरकार व लोक

चलननिर्मितींतील सरकारचा भाग :—चलननिर्मितीच्या प्रक्रियेंत सरकारचें स्थानहि महत्त्वाचें असतें. कारण मध्यवर्ति बँक ही कांहीं झालें तरी सरकारची प्रतिनिधि, एजन्ट असते. त्या अर्थानें तिला स्वतंत्र अस्तित्व नाहीं. सरकारची जी कांहीं **चलननीति** (Monetary Policy), असेल, चलनविषयक जें कांहीं

[४३] Keynes was attracted by the possibility of varying cash ratios as a method more direct than open market operations, but he saw more important advantages in using this method when the central bank had insufficient securities to absorb, by their sale, excess reserves of the commercial banks—**Sayers.**

[४४] The basis of its control is its relationship with the commercial banks. The central bank is the banker's bank. The central bank thus undertakes for the other banks the more fundamental services which these banks in turn provide for their depositing customers.

[४५] The central bank is amply equipped to be the leader of the credit system. By raising or lowering the bank rate and by selling or buying securities, it can initiate a contraction or expansion of credit at its direction and once its power is recognised, its action becomes a signal to both banks and traders, so that they, by anticipating, assist the attainment of the desired results—**Hawtrey.**

धोरण सरकारकडून आंखण्यांत आलें असेल, त्या धोरणाचा पाठपुरावा करून त्याची अंमलबजावणी मध्यवर्ती बँकेला करावी लागते. सरकारचें चलनविषयक धोरण चलनपुरवठा स्थिर राखणें, चलनवाढ करणें किंवा चलनसंकोच करणें ह्या तिन्हींपैकीं एखादें असूं शकेल. आपली चलननीति ठरवितांना सरकार मध्यवर्ती बँकेशीं सल्लामसलत करतें. मध्यवर्ती बँकेचा सल्ला हा तज्ज्ञांचा सल्ला असल्यानें सरकारला त्या सल्ल्याची योग्य ती बूज राखावी लागते. पण चलननीतिबाबत अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी सरकारचीच असते. जें धोरण ठरेल त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी मध्यवर्ती बँकेकडे येते. सरकारच्या चलननीतीची अंमलबजावणी करणें हें मध्यवर्ती बँकेचें मूलभूत कार्य आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. रोकडनिर्मितीची किंवा व्यापारी बँकांचें नियंत्रण करण्याची तिची सत्ता ह्याच कार्यासाठीं वापरली जाते.[४६]

चलननिर्मितींतील सरकारचा पुढाकार :—स्वतः पुढाकार घेऊनहि सरकार चलननिर्मिति किंवा चलनसंकोच करूं शकतें. चलननिर्मिति करण्यास पुढाकार घेण्याचा सरकारचा रूढ मार्ग म्हणजे मध्यवर्ती बँकांकडून किंवा इतर बँकांकडून कर्जें काढणें हा होय. निराळ्या शब्दांत, सरकार बँकांना आपलेंच कर्जरोखे विकतें. त्यामुळें प्रथम सरकारी ठेवींत वाढ होते. (ठेवींत वाढ करून बँका सरकारच्या कर्जरोख्यांची किंमत देतात. सरकारचें खातें मध्यवर्ती बँकेंत असतें. त्यांत वाढ होते.) त्या ठेवींवर चेक देऊन सरकार आपला खर्च वाढवूं शकतें. त्यामुळें लोकांच्या जवळील रोकडींत तरी भर पडते किंवा लोकांचीं बँकांतील खातीं फुगतात. ज्या प्रमाणांत सरकार आपला खर्च काढलेल्या कर्जांतून वाढवीत जातें त्या प्रमाणांत सरकारच्या खात्यांतील रकमा कमी होऊन लोकांच्या खात्यांतील रकमा वाढतात व अशा प्रकारें खर्चासाठीं उपलब्ध असलेल्या एकंदर चलनांत भर पडते.[४७] ह्या व्यवहारालाच अलीकडे **तुटीचा अर्थव्यवहार** (Deficit Financing) असें नांव देण्यांत आलें आहे. इतर मार्गांनीं मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षां सरकारचा खर्च जेव्हां अधिक असतो तेव्हां सरकार बँकांकडून कर्जें काढण्यास

---

[४६] The fundamental business of a central bank is to control the commercial banks in such a way as to support the monetary policy directed by the State.

[४७] Public borrowing from the banking system leads to the creation of demand deposits in favour of the Government in exchange for Government securities. As Government spends the deposits, people get either cash or demand deposits at their own banks. Commercial banks get additional reserves for further expansion and the public gets additional purchasing power. Thus public borrowing leads to the creation of new money.

प्रवृत्त होतें. आपल्या खर्चापेक्षां इतर मार्गांनीं मिळणारें उत्पन्न वाढवून जेव्हां पूर्वीं काढलेलीं कर्जें सरकार फेडूं लागतें तेव्हां चलन-संकोच होतो.

चलननिर्मितींतील लोकांचा भाग :—चलननिर्मिति व चलननियंत्रण ह्याविषयीचें हें विवेचन संपण्यापूर्वीं चलन-निर्मितीस किंवा चलन-नियंत्रणास लोकांचाहि हातभार लागूं शकतो, हें आग्रहानें सांगितलें पाहिजे. कारण तो भाग नजरेंतून सुटण्याचा धोका असतो. चलननिर्मितीच्या प्रक्रियेंत लोकांना स्थान मिळतें. ह्याचें मुख्य कारण असें कीं, चलन-निर्मीतीचा मुख्य हेतु लोकांची चलनासाठीं जी मागणी असतें ती भागवावी असा असतो. लोकांना तीन कारणाकरितां पैसा हवा असतो. दैनंदिन खर्चाची तरतूद करणें हें पैसा हवा असण्याचें पहिलें कारण होय. दुसरें असें कीं भावी काळांतील अनिश्चिततेविरुद्ध संरक्षण म्हणून त्यांना पैसा हवा असतो. आणि तिसरें महत्त्वाचें कारण असें कीं, त्यांना भविष्यकाळांत जे बदल होण्याची संभाव्यता वाटत असते त्यांतून आपला फायदा व्हावा म्हणून पैसा हवा असतो. पैशाकरितां म्हणजे चलनाकरितां लोकांची जी मागणी असते ती व्यवहार-हेतूंतून (Transactions Motive) दक्षताहेतूंतून (Precautionary Motive) आणि सट्टेबाजीच्या हेतूंतून (Speculative Motive) उद्‌वलेली असते असें थोडक्यांत म्हणतां येईल.[४८] कोणत्याहि मार्गानें चलननिर्मिति होत असतां चलना-साठीं लोकांची जी मागणी असते तिच्यावर काय प्रतिक्रिया होते, हा भाग अतिशय महत्त्वाचा असतो. लोकांची चलनाकरितां असलेली मागणी स्थिर असती किंवा निदान तिच्याबद्दल निश्चित अनुमान करतां आलें असतें तर हा प्रश्न एवढा महत्त्वाचा ठरला नसता. पण वस्तुस्थिति तशी नसते. चलनाकरितां असलेली लोकांची मागणी बरीचशी अनिश्चित स्वरूपाची असते. तसें असावें हें स्वाभाविकच आहे. कारण व्यवहारहेतु वगळल्यास उरलेल्या दोन्ही हेतूंतून उद्‌भवणारी लोकांची चलन-मागणी भावी काळाबाबत लोकांच्या अपेक्षा काय असतात ह्यावर अवलंबून असते. व्यवहार हेतूंतून उद्‌भवणारी चलनमागणी स्थूलमानानें पैशानें होणाऱ्या एकंदर व्यवहारांवर म्हणजेच सर्वसामान्यपणें समस्त राष्ट्रीय उत्पन्नावर अवलंबून असते

४८ A major element in the demand to hold money is a transactions demand. This demand to hold money is based on two characteristics of money, which can be summed up as convenience and certainty. There is another motive similar to the transactions motive but not identical with it. This is the precautionary motive. Money will be held in order to be prepared for the sudden arrival of unforseen contingencies. The demand for money arising out of speculative motive is the result of tendency of people to speculate about the future level of all kinds of prices and to hold those things whose prices they think are going to rise.

असें म्हणावयास हरकत नाहीं. म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यास ती वाढत असल्यानें व तें कमी झाल्यास कमी होत असल्यानें चलनमागणीच्या त्या भागाबाबत अनुमान करतां येतें; पण दक्षता हेतूंतून उद्भवणाऱ्या किंवा सट्टेबाजीच्या हेतूंतून उद्भवणाऱ्या चलन मागणीबाबत कोणत्याहि प्रकारचें निश्चित अनुमान करणें कठीण आहे. आर्थिक परिस्थिति कोणत्याहि प्रकारें बदलली कीं लोकांवर त्या गोष्टीची काय प्रतिक्रिया होत आहे व त्या प्रतिक्रियेचा एकंदर चलनमागणीवर काय परिणाम होत आहे किंवा होण्याचा संभव आहे ह्याची दखल आपली चलननीति आंखताना चलनशासनसंस्थेला घ्यावीच लागते. ती न घेतल्यास कोणतीहि चलननीति यशस्वी होणें सामान्यतः दुरापास्तच आहे. तसेंच हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, लोकांची चलनाची गरज रोकडीनें किंवा ठेवींनीं भागूं शकतें हें खरें; पण ती कशानें भागवावी, हें ठरविणें सर्वस्वीं लोकांच्या हातांत असतें. लोकांची रोकडीची गरज कांहीं कारणानें वाढली तर व्यापारी-बँकांना ती भागविण्यासाठीं आपल्या राखीव रोकडींतून रोकड काढून द्यावी लागते. अशा प्रकारें बरीच रोकड बाहेर गेल्यास बँकांना कर्जांचें प्रमाण पूर्वीइतकें ठेवणें कठीण होऊन बसतें. ह्याच कारणामुळें बँकांकडून होणाऱ्या चलननिर्मितीला लोकांकडून आळा घातला जाण्याचा संभव असतो. बँकांमुळें बरीच चलनवृद्धि झाली आणि त्यामुळें किंमती वाढल्या, उत्पादन वाढलें तर लोकांना आपल्या व्यवहारासाठीं अधिक रोकड लागूं लागते आणि ोकड बाहेर जाऊं लागून बँकांना वेळींच सावध व्हावें लागतें. एकंदर चलनाचा किती भाग रोकडरूपानें जवळ बाळगावा व किती भाग ठेवींच्या रूपानें जवळ बाळगावा, हें लोकच ठरवितात व त्यामुळें चलन निर्मितींत लोकांची प्रतिक्रिया महत्त्वाची असते हें लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे.

मध्यवर्ती बँकेच्या धोरणाचें महत्त्व :—चलननिर्मिति व चलननियंत्रण ह्याबाबत ह्या प्रकरणांत जें विवेचन केलें आहे त्याचा निष्कर्ष असा कीं, देशांत एकंदर चलन व विशेषतः ठेवरूप चलन किती असतें हें ठरलें जाण्यास कारणीभूत होणारे अनेक प्रवाह अर्थव्यवस्थेंत असतात; पण त्यांपैकीं **मध्यवर्ती बँकेचें धोरण हा प्रवाह सर्वांत महत्त्वाचा** आहे. अलीकडे चलननिर्मिति व नियंत्रणाबाबत मध्यवर्ती सत्तेच्या हातांत अधिकाधिक सत्ता केन्द्रित करण्याची प्रवृति सर्व देशांत वाढली असून त्यामुळें सर्वसामान्यपणें मध्यवर्ती बँका फारच प्रबळ झाल्या आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.[४९] देशांत एकंदर चलन किती असावें व चलनी भांडवल कोणत्या व्याजाच्या दरानें उपलब्ध व्हावें हें ठरविण्याची अंतिम जबाबदारी मध्यवर्ती बँकेवरच असते हें तत्त्व आजकाल

---

[४९] The latest decades have seen a consolidation of the powers of world's greatest central banks, of their power, that is to say, to control their respective monetary systems.—**Sayers.**

गृहीतच धरलें जातें. म्हणजे अलीकडे मध्यवर्ती बँका एकंदर चलनपुरवठा नियंत्रित करण्याचें काम तर करतातच; पण त्याच अनुषंगानें व्याजाचे दर नियंत्रित करण्याचाहि प्रयत्न करतात. (व्याजाचे दर रविणाऱ्या प्रवाहामध्यें चलनपुरवठ्याला महत्त्वाचें स्थान असतें हें व्याजाच्या आधुनिक म्हणजे कीन्सकृत मीमांसेशीं परिचय असणाऱ्यांच्या सहज लक्षांत येईल.) ठेवरूप चलन म्हणजे पर्यायानें बँकाकडून केला जाणारा कर्जपुरवठा व त्यावरील व्याजाचा दर ठरविणें हें मध्यवर्ती बँकेचें एक महत्त्वाचें कार्य आहे असें नेहमींच मानण्यांत आलें आहे. मध्यवर्ती बँकेचें चलननिर्मितींतील महत्त्व वाढल्यामुळें बँका चलननिर्मिति करूं शकतात काय आणि करतात काय हा वेळोवेळीं उपस्थित करण्यांत येणारा प्रश्न आज निव्वळ तात्त्विक महत्त्वाचा झाला आहे. कारण बँका चलननिर्मिति करूं शकतात व करतात ह्याबद्दल आतां फारसा मतभेद उरलेला नाहीं. त्यामुळें व्यावहारिक दृष्ट्या बँकाच्या चलननिर्मितीवर कोणकोणत्या मर्यादा पडतात हाच प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो.[५०] ह्या प्रश्नाचें उत्तर म्हणून ज्या मर्यादांचा निर्देश केला जातो, त्यांतील मध्यवर्ती बँकेचें धोरण ही सर्वांत महत्त्वाची मर्यादा असते ह्यांत बिलकुल संदेह नाहीं. असो. प्रस्तुत प्रकरणांत मध्यवर्ती बँकेकडून चलननिर्मिति व चलननियंत्रण कसें होतें ह्यासंबंधीचें जें विवेचन केलें आहे त्यावरून प्रचलित अर्थव्यवस्थेंत चलनशासनसंस्था ह्या नात्यानें मध्यवर्ती बँकेचीं कार्यें नेमकीं काय असतात तें समजण्यास अडचण पडूं नये. तीं कार्यें लक्षांत घेऊन **रोख चलनाची एकमेव निर्माति, पतचलन नियंत्रक, अन्य बँकांची व सरकारची बँक व राज्यसंस्थेची चलनविषयक सल्लागार,**[५१] ह्या शब्दांत मध्यवर्ती बँकेचें वर्णन करतां येईल. ह्या चारही भूमिका अत्यंत महत्त्वाच्या असल्यानें व मध्यवर्ती बँकेंत त्या चारही एकवटल्या जात असल्यामुळेंच मध्यवर्ती बँकेला चलनक्षेत्रांत असाधारण स्थान व चलननिर्मिति व चलननियंत्रण ह्या बाबतींत असाधारण महत्त्व प्राप्त होतें.

---

[५०] The real question is not whether banks can and do create money but what are the limitations on the powers of bank to create money.

[५१] The central bank of a country combines the roles of (a) Monopolist of note issue (b) Controller of credit (c) Bankers' bank (d) Governments' bank and (e) Advisor to Government on monetary matters. Combination of these roles in one and the same institution is certain to make it very powerful in a monetary economy.

: ३ :

चलन-मूल्य
(VALUE OF MONEY)

चलन-मूल्य (Value of Money) :—कोणत्याहि देशांतील चलनाला **अंतर्मूल्य** (Internal Value) व **बाह्यमूल्य** (External Value) असतें. चलनाच्या देशांतल्या देशांतील **क्रयशक्तीला** (Purchasing Power) अंतर्मूल्य म्हणतात. हें मूल्य देशांत उत्पादन होणाऱ्या वस्तु व कामगिऱ्यांची खरेदी करण्याची त्या चलनाची शक्ति व्यक्त करतें. **चलनाचें अंतर्मूल्य म्हणजे देशांत उत्पादित होणाऱ्या वस्तु व कामगिऱ्या मिळविण्याची चलनाची शक्ति अशी व्याख्या करतां येईल.**[1] बाह्यमूल्य म्हणजे **हुंडणावळीचा दर** (Exchange Rate) होय. बाह्यमूल्यामुळें त्या देशाच्या चलनाच्या मोबदल्यांत मिळणाऱ्या इतर देशांच्या चलनाचें प्रमाण व्यक्त होतें. रुपयाच्या हुंडणावळीचा दर १८ पेन्स आहे. म्हणजे १८ पेन्स हें रुपयाचें बाह्यमूल्य आहे. अशा प्रकारें प्रत्येक दुसऱ्या देशाच्या चलनांत रुपयाचें मूल्य सांगतां येईल. बाह्यमूल्यामुळें चलनाची बाहेरील जगांतील क्रयशक्ति व्यक्त होते. रुपयाचा हुंडणावळीचा दर १८ पेन्स आहे. असें म्हणणें म्हणजे इंग्लंडमध्यें १८ पेन्स देऊन ज्या वस्तु खरेदी करतां येतात त्या वस्तु एक रुपया खर्चावयास तयार असलेल्या कोणाहि भारतीयास मिळवितां येतील, असें म्हणण्यासारखेंच आहे. चलनाचें अंतर्मूल्य कसें ठरतें व बाह्यमूल्य किंवा हुंडवणावळीचा दर कसा ठरतो, हें दोन्ही प्रश्न अतिशय महत्त्वाचे असल्यामुळें त्यांचा स्वतंत्रपणें विचार केला पाहिजे. प्रस्तुत प्रकरणांत फक्त अंतर्मूल्याचाच विचार केला आहे.

चलनाची क्रयशक्ति ही **भावमानाची** (Price level) उलट बाजू आहे हें सर्वपरिचित आहे. इतर वस्तूंचे भाव वाढले म्हणजे तेवढेंच चलन खर्च करून मिळणारें इतर वस्तूंचें प्रमाण कमी होतें. म्हणजेच चलनाची क्रयशक्ति किंवा चलन-मूल्य कमी होतें. ह्याच्या उलट इतर भाव उतरले म्हणजे चलन-मूल्य वाढतें. त्यामुळें चलन-मूल्याचा अभ्यास करणें व भावमानाचा अभ्यास करणें ह्या दोन्ही गोष्टी एकच होतात. भावमानांत काय व कसे बदल होतात ह्याचा तपास केल्यास चलनमूल्य कां व कसें बदलतें ह्याचा आपोआप पत्ता लागतो.[2]

चलनपरिमिति-सिद्धान्त (Quantity Theory of Money) :—चलनमूल्यासंबंधीं बराच प्रसिद्ध असलेला अर्थशास्त्रांतील सिद्धान्त म्हणजे चलन परिमिति सिद्धान्त हा होय. मुळांत सांगितलेला चलन-परिमिति-सिद्धान्त असा आहे कीं, **ज्या प्रमाणांत**

---

[1] The internal value of a currency refers to the purchasing power of that currency in terms of domestic goods and services.

[2] The purchasing power of money is the reciprocal of the level of prices. So that the study of the purchasing power of money is identical with the study of the price levels—**Fisher**.

आणि ज्या दिशेनें रोखचलनपरिमितींत बदल होतो त्याच प्रमाणांत आणि त्याच दिशेनें भावमानांत बदल होतो[3] म्हणजे रोखचलनवाढ झाली असतां भावमानांतहि वाढ होते. एवढेंच नव्हे तर ज्या प्रमाणांत रोखचलनवाढ होते त्याच प्रमाणांत भावमान वाढतें. उलट ज्या प्रमाणांत रोखचलन-संकोच होतो त्याच प्रमाणांत भावमान कमी होतें, अगदीं प्रथम जेव्हां चलन-परिमिति-सिद्धान्त सांगितला गेला तेव्हां पतचलनाला अर्थव्यवस्थेंत फारसें प्राधान्य नव्हतें. रोकड हाच चलनाचा महत्त्वाचा प्रकार होता. त्यामुळें रोकड जशी कमीजास्त होते तसें भावमान कमीअधिक होतें, ह्या स्वरूपांत हा सिद्धान्त मांडला गेला; पण पुढें पतचलनाचें महत्त्व वाढून बँकांतील ठेवी हें विनिमय-व्यवहार करण्याचें एक महत्त्वाचें साधन झाल्यानंतर पैसा म्हणजे केवळ रोकड ही कल्पना अपुरी आहे, असें दिसून आलें आणि त्यामुळें बँकनिर्मित चलनाचा एकंदर पैशांत अंतर्भाव करण्यांत आला. ही सुधारणा केली तरी एक अडचण शिल्लक राहिलीच, ती अशी कीं, कोणत्याहि एका वेळचें एकंदर चलन ठरवितांना **च+च′** [**च** म्हणजे रोखचलन व च′ म्हणजे पतचलन] ही मांडणी उपयोगी पडत असली तरी जेव्हां एखाद्या विशिष्ट कालखंडांतील--उदाहरणार्थ, एखाद्या वर्षांतील--चलनाची उपलब्धता ठरवावयाची असते तेव्हां चलनाच्या प्रत्येक परिमाणाला--म्हणजेच रोकडींतील किंवा ठेवींतील प्रत्येक रुपयाला--कांही गति असते, हें विसरून चालत नाहीं. चलन-परिमितींतील फेरफारांचा भावमानावर काय परिणाम होतो, हें पाहतांना काळाचा विचार करावाच लागतो. कारण चलन-परिमितींत होणाऱ्या फेरफारांचा परिणाम कांहीं त्वरित होत नाहीं. तो कालान्तरानेंच होतो. मध्यंतरीच्या काळांत चलनाला गति असते. म्हणजेच निराळ्या शब्दांत प्रत्येक रुपया जेवढ्या वेळां त्या काळांत फिरतो तेवढ्या रुपयांचें काम करतो, ही गोष्ट लक्षांत घ्यायलाच हवी. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन चलन-परिमितिसिद्धान्त असा सांगितला जातो कीं, **चलनगति व विनिमय व्यवहाराचें प्रमाण स्थिर असल्यास ज्या प्रमाणांत चलनपरिमितींत बदल होतो त्याच प्रमाणांत (व त्याच दिशेनें) भावमानांत बदल होतो.** उदाहरणार्थ, चलनपरिमिति दुप्पट झाल्यास भावमान दुप्पट होतें व चलनमूल्य निम्मे होतें. उलट चलनपरिमिति निम्मपट झाल्यास भावमान पन्नास टक्क्यांनीं कमी होऊन चलनमूल्य दुप्पट होतें. थोडक्यांत **चलन-परिमिति व भावमान ह्यांचा संबंध सरळ असतो व चलनपरिमिति व चलनमूल्य ह्यांचा संबंध व्यस्त असतो.**[4] चलनपरिमिति सिद्धान्ताचें जे कडवे पुरस्कर्ते आहेत

[3] Variations in money (M) produce normally proportional changes in price—**Fisher.**

[4] Prices vary directly with the quantity of money in circulation, provided the velocity of circulation of that money and the volume of trade which it is obliged to perform are not changed—**Fisher.**

ते असा आग्रह धरतात कीं, पतचलनाचा अंतर्भाव एकंदर चलनांत केला गेला तरीहि भावमान निव्वळ रोखचलनावरच अवलंबून असतें. पतचलनाचा एकंदर पैशांत अंतर्भाव झाल्यानें ह्या सक्त भूमिकेंत बदल करावा लागत नाहीं. कारण पतचलनांतील बदल स्वतंत्र नसून रोखचलनप्रमाणांत होणाऱ्या बदलाशीं अगदीं निगडित असतात. सामान्यतः रोखचलनाच्या ठराविक प्रमाणांतच पत-चलनाचें प्रमाण असल्याचें आढळून येतें. त्यामुळें रोखचलन ज्या प्रमाणांत वाढतें अगर कमी होतें त्याच प्रमाणांत पतचलन वाढतें अगर कमी होतें, रोखचलन ज्या प्रमाणांत वाढतें आणि कमी होतें त्याचप्रमाणांत पतचलन वाढत अगर कमी होत असल्यामुळें पतचलनामुळें रोखचलन परिमिति सिद्धान्ताला बाध येत नाहीं.[५]

फिशरचें समीकरण :—चलनपरिमिति सिद्धान्ताच्या प्रतिपादनांत सामान्यतः **चग + च'ग' = भव** ($MV + M'V' = PT$) ह्या समीकरणांचा आश्रय केला जातो. हें समीकरण विनिमय व्यवहारासंबंधीचें असून फिशर ह्या अर्थशास्त्रज्ञानें चलन परिमिति सिद्धान्ताचें स्पष्टीकरण करण्याकरितां व त्या सिद्धान्ताची यथार्थता पटविण्याकरितां त्या समीकरणाचा प्रथम उपयोग केला. म्हणून फिशरचें विनिमय व्यवहाराचें समीकरण (Fisher's Equation of Exchange) ह्या नांवानें तें ओळखलें जातें. ह्या समीकरणांत एका बाजूस उत्पादनावर खर्च होणारा एकूण पैसा दाखवला जातो व दुसऱ्या बाजूस उत्पादनाची एकूण किंमत दाखविली जाते. उत्पादनावर खर्च होणारा देशांतील पैसा एकूण चलन पुरवठ्याएवढा असावा हें सरळ आहे. त्याचप्रमाणें उत्पादनावर खर्च होणारा एकूण पैसा व उत्पादनाची एकूण किंमत म्हणजेच विनिमय व्यवहारांची एकंदर संख्या गुणिलें प्रत्येक विनिमय व्यवहार पुरा करण्यासाठीं लागणारी सरासरी रक्कम समान असावी हें सरळच आहे. त्यावरच हें समीकरण आधारलेलें आहे.[६] थोडक्यांत समीकरणाची एक बाजू

---

[५] The quantity of circulating credit tends to hold a definite relation to the quantity of money in circulation. That is multiple deposits are normally a more or less definite multiple of money. —**Fisher.**

[६] The equation of exchange is a statement in a mathematical form, of the total transactions effected in a certain period in a given community. The equation of exchange relates to all the purchases made by money in a certain community during a certain time—The equation thus has a money side and a goods side. The money side is the total money paid and may be considered as the product of the quantity of money multiplied by its rapidity of circulation. The goods side is made up of the products of the quantities of goods exchanged multiplied by their respective prices—**Fisher.**

एकंदर पैसा म्हणजे चलनपरिमिति गुणिलें चलनाच्या प्रत्येक परिमाणाची सरासरी गति दर्शवितें व दुसरी बाजू विनिमय व्यवहारांत अंतर्भूत होणारें एकंदर उत्पादन (बाजारांत न येणारें उत्पादन अर्थातच ह्यांतून वगळलें जातें) व त्या उत्पादनाच्या प्रत्येक परिमाणाची सरासरी किंमत दर्शवितें. ह्याहूनहि थोडक्यांत असें सांगतां येईल कीं, फिशरच्या समीकरणाची एक बाजू विशिष्ट काळांतील पैशाचा पुरवठा दर्शविते व दुसरी बाजू त्या काळांतील पैशाची मागणी दर्शवितें. पैशाचा पुरवठा व मागणी समान असते असें ह्या समीकरणानें सूचित केलें जातें. ह्या समीकरणांतील **भ** ह्या अक्षरानें भावमान दर्शविलें जातें. **च** नें रोकड दर्शविली जाते. **ग** नें त्या रोकडीची गति व्यक्त होते. **च'** ही खूण पतचलनासाठीं व **ग'** ही खूण बँक-निर्मित चलनाची गति दर्शविण्यासाठीं वापरली जाते. आणि **व** हें अक्षर एकंदर विनिमय-व्यवहार सूचित करतें. एकंदर विनिमय-व्यवहार उत्पादनावर अवलंबून असतात, असें अर्थातच ह्या समीकरणांत मानलें गेलें आहे. म्हणजे उत्पादन वाढलें कीं, विनिमय व्यवहार ह्या प्रमाणांत वाढतात व उत्पादन कमी झालें कीं विनिमय व्यवहार त्या प्रमाणांत कमी होतात, अशी कल्पना त्यांत आहे. त्यामुळें **व** ह्या अक्षरा-ऐवजीं एकंदर उत्पादन दर्शविणारें '**उ**' हें अक्षर घातलें तरी फारसें बिघडत नाहीं. अलीकडे वरील कांहींशा बोजड समीकरणाऐवजीं $\text{भ} = \frac{\text{चग}}{\text{उ}}$ म्हणजे $P = \frac{MV}{O}$ असें सुटसुटीत समीकरण मांडण्याची पद्धत पडत चालली आहे. ह्या समीकरणांत **भ** किंवा P नें भावमान दाखविलें जातें. **च** किंवा M नें एकंदर चलनपरिमिती (रोकड व ठेवी मिळून) दाखविली जाते, **ग** किंवा V नें चलनाची सरासरी गति (Velocity) दर्शविली जाते, आणि '**उ**' किंवा O ह्या अक्षरानें एकंदर उत्पादन (Output) सूचित होतें.

विनिमय व्यवहारांचें समीकरण व चलनपरिमिति सिद्धान्त :—वरील दोन्हीपैकीं कोणत्याहि पद्धतीनें विनिमयव्यवहारांचें समीकरण केवळ मांडून कांहींही सिद्ध होत नाहीं; पण अशा समीकरणांचा चलनपरिमिति सिद्धान्त सिद्ध करण्या-साठीं उपयोग मात्र करून घेतां येतो. **फिशरचें समीकरण** उदाहरणादाखल घेऊं. ह्या समीकरणाचा मुख्य गुण असा आहे कीं, भावमानावर ज्यांचा प्रभाव पडतो ते सर्व प्रवाह ह्या समीकरणांत गोंवण्यांत आले आहेत, असा ह्या समीकरणाच्या पुरस्कर्त्यांचा दावा आहे. रोखचलन, रोखचलनाची गति, पतचलन व पतचलनगति व एकंदर व्यापार (म्हणजेच विनिमय-व्यवहारांची संख्या) ह्या पांच व फक्त ह्याच पांच, प्रवाहामुळें भावमान निश्चित होतें असा दावा **फिशर** ह्यांनीं केला आहे.[७] हे पांच प्रवाह अर्थातच अर्थव्यवस्थेशीं संबंधित असलेल्या अनेक गोष्टींचा परिणाम असतात; पण तो प्रश्न वेगळा आहे. कारण त्या गोष्टीचा विनि-मय व्यवहाराच्या समीकरणाशीं प्रत्यक्ष संबंध येत नाहीं. त्या गोष्टीमुळें विनिमय-व्यवहारांत अंतर्भूत होणाऱ्या पांच प्रवाहांचें प्रमाण व दिशा निश्चित झाली कीं,

भावमानाचें प्रमाण निश्चित होतें. कारण विनिमय व्यवहारांच्या समीकरणाच्या अनुरोधानें भावमानाबाबत असें समीकरण सहजच मांडतां येतें कीं :—

$$भ = \frac{चग + च'ग'}{व} \quad \left(P = \frac{MV + M'V'}{T}\right).$$

चलन-परिमिति सिद्धान्ताचीं गृहीतें :—वरील समीकरणावरून कडवा चलन-परिमिति सिद्धान्त सिद्ध करावयाचा असेल तर—म्हणजे रोखचलन ज्या प्रमाणांत कमी-अधिक होतें त्याच प्रमाणांत भावमान कमीअधिक होतें हें सिद्ध करावयाचें असेल तर—चार गोष्टी सिद्ध करतां आल्या पाहिजेत. ह्या चार गोष्टींना कडव्या चलन-परिमिति सिद्धान्ताचीं गृहीतें असें समजण्यास हरकत नाहीं. त्या चार गोष्टी अशा (१) रोखचलन व पतचलन ह्यांचा परस्पर संबंध स्थिर असल्यानें **रोखचलनांत ज्या प्रमाणांत आणि ज्या दिशेनें बदल होतो त्याच प्रमाणांत व त्याच दिशेनें पतचलनांत फेरफार होतात.** उदाहरणार्थ, रोखचलन दुप्पट झालें म्हणजे पतचलनहि दुप्पट होतें आणि रोखचलन निमपट झाल्यास पतचलनहि निम्में होतें. म्हणजेच निराळ्या शब्दांत रोखचलनांत ज्या प्रमाणांत आणि ज्या दिशेनें बदल होतो त्याच प्रमाणांत एकंदर पैसा कमी किंवा अधिक होतो. त्यामुळें पतचलनाचा अंतर्भाव एकंदरपैशांत केला गेला तरी-सुद्धां चलनपरिमिति सिद्धान्तांतील मूळ तत्त्व अबाधितच राहतें.[८] (२) चलन कमी-अधिक होत असतां **चलनाची काय किंवा पतचलनाची काय गति सामान्यतः बदलत नाहीं.** कारण चलनाची गति चलन किती आहे, तें कमी आहे कीं वाढलें आहे, ह्यावर अवलंबून नसतें.[९] (३) चलन कमी-अधिक होत असतां एकंदर विनिमय-व्यवहारांवर त्या घटनेचा कांहींच परिणाम होत नाहीं. निरनिराळ्या शब्दांत **विनिमय-व्यवहारांची संख्या स्थिर रहाते.** कारण विनिमय व्यवहार हा सुद्धां अर्थ-

[७] The purchasing power has been studied as the effect of five, and only five, groups of causes. The five groups are money, deposits, their velocities of circulation and the volume of trade —The five causes, (are) in turn seen to be themselves effects of antecedent causes lying entirely outside the equation of exchange.

[८] The influence of deposit currency does not normally disturb the quantitative relation between money and prices (because) there tends to be a normal ratio of bank deposits (M′) to the quantity of money (M)—**Fisher.**

[९] As a matter of fact the velocities of circulation of money and of deposits bear no discoverable relation to the quantity of money in circulation. Velocity of circulation either of money or of deposits is independent of the quantity of money or of deposits—**Fisher.**

व्यवस्थेंतील एक स्वतंत्र प्रवाह असून चलनप्रमाणावर तो अवलंबून नसतो.[१०] (४) **रोखचलनपरिमितींत होणारें बदल** हें भावमान बदलण्याचें **एकमेव कारण** आहे.

चलनपरिमिति सिद्धान्ताचा गूळचा कडवा नमुना बाजूस ठेवून भावमान केवळ रोखचलनावर अवलंबून नसून एकंदर पैशावर अवलंबून असते हा नमुना जरी घेतला तरी त्यासाठीं किमानपक्षीं एकंदर पैसा कमी अगर अधिक होत असतां (१) चलनगति स्थिर राहते व (२) एकंदर विनिमय व्यवहार (म्हणजेच निराळ्या शब्दांत एकंदर उत्पादन) स्थिर राहतें, ह्या दोन गोष्टी गृहीत धराव्याच लागतात.[११]

चलनपरिमिति सिद्धान्तांतील गृहीतकृत्याचें समर्थन :––चलनपरिमिति सिद्धान्त हा वरील चार, किमानपक्षीं वरीलपैकी शेवटच्या दोन गृहीतांवर आधारलेला असल्यानें त्या सिद्धान्ताचा खरेखोटेपणा जें जें त्यांत गृहीत धरलें आहे तें तें गृहींत धरणें वस्तुस्थिति पहातां कितपत योग्य आहे ह्यावर अवलंबून राहील. ह्या बाबतींत प्रथमच एक गोष्ट सांगून टाकली पाहिजे, ती अशी कीं, पतचलन, चलनगति किंवा एकंदर व्यवहार ह्या प्रवाहांत स्वतंत्रपणें बदल होतो असें दाखवून चलनपरिमिति सिद्धान्त खोटा ठरवितां यावयाचा नाहीं. कारण चलनपरिमिति सिद्धान्ताचे कट्टे पुरस्कर्ते ती गोष्ट नाकारीतच नाहींत आणि त्यांना ती नाकारावयाचें प्रयोजनहि नाहीं. त्यांचा आग्रह एवढाच आहे कीं, चलनपरिमितींत फेरफार होत असतां, मग ते कोणत्याही दिशेनें होवोत, त्या फेरफारामुळें चलनगति किंवा एकंदर व्यापार ह्यांच्यांत बदल होत नाहीं. म्हणजेच चलनपरिमिति व चलनगति किंवा व्यापार ह्यांच्यांत कार्यकारणसंबंध नसतो. चलनपरिमिति बदलत असतां पतचलनप्रमाणांत फेरफार होतात; पण ते रोखचलनपरिमिति सिद्धान्ताला पोषक असेच होतात.[१२]

चलनपरिमिति सिद्धान्ताबाबत दुसरीहि एक गोष्ट सांगण्याजोगी आहे. चलनपरिमितींत बदल झाल्यानंतर त्या सिद्धान्तांत अभिप्रेत असलेला बदल तत्काळ होत नाहीं.

---

[१०] The volume of trade, like the velocity of circulation of money, is independent of the quantity of money—**Fisher.**

[११] The validity of the simple quantity theory depends on the tacit assumption that (a) The velocity of money is stable and (b) That the volume of goods and services to be bought with money remains constant.

[१२] The quantity theory does not claim that while money is increased in quantity, other causes may not affect M,′ V, V′ and thus aggrevate or neutralise the effect of M on P. But these are not the effects of M on the P. So far as M by itself is concerned, its effect on the 'ps' is strictly proportional—**Fisher.**

त्यासाठीं कांहीं काळ जावा लागतो. निराळ्या शब्दांत संक्रमणकालाची आवश्यकता असते. ह्या संक्रमण कालांत चलनपरिमिति कमी अधिक झाल्यामुळें पतचलनपरिमितींत होणारा बदल चलनपरिमिति सिद्धान्तांत अभिप्रेत असलेल्या बदलापेक्षां कमी अगर अधिक होऊं शकेल किंवा चलनगति स्थिर न राहातां कमी अगर अधिक होऊं शकेल, हें त्या सिद्धान्ताच्या पुरस्कर्त्यांना अमान्य नाहीं. उदाहरणार्थ, सतत चलन-विस्तार होत असेल आणि त्यामुळें वाढत्या भावमानाची अपेक्षा निर्माण झाली असेल तर माल भराभर खरेदी करण्याची प्रवृत्ति लोकांत निर्माण होऊन चलनगति वाढेल. उलट किंमती कमी होणार अशी अपेक्षा निर्माण झाली असतां खर्च तात्पुरता लांबविला जाऊन चलनगति कमी होईल. तसेंच भावमान वाढत असतां नफा वांटून उत्पादन वाढण्यासाठीं म्हणून भराभर कर्जें काढलीं जातात व त्यामुळें पतचलनांत वाजवीपेक्षां अधिक वाढ होऊं शकेल. उलट प्रकार चलनपरिमिति कमी होत असतां किंमती कमी होऊं लागल्यास होईल. सारांश, संक्रमणकालांत चलनप्रमाण बदलण्याचा परिणाम विनिमय व्यवहारांच्या समीकरणाच्या सर्व घटकांवर होईल आणि त्यामुळें चलनपरिमिति सिद्धान्तांत अभिप्रेत असलेला कार्यकारणसंबंध अनुभवास कदाचित् येणार नाहीं हें त्या सिद्धान्ताच्या पुरस्कर्त्यांना मान्य आहे. त्यांचा दावा एवढाच आहे कीं, संक्रमणकाल संपल्यानंतर मात्र असेंच आढळून येईल कीं, ज्या प्रमाणांत चलन वाढलें आहे त्याच प्रमाणांत व त्याच दिशेनें सर्वसाधारण किंमतीमान बदललें आहे. सारांश **चलनपरिमिति सिद्धान्त हा अल्पकालीन प्रवृत्तिदर्शक सिद्धान्त नसून दीर्घकालीन प्रवृत्तिबाबतचा सिद्धान्त आहे** ही गोष्ट तो सिद्धान्त मांडणारे नाकारीत नाहींत.[१३]

दीर्घकालीन काळांत चलनपरिमिति सिद्धान्त अनुभवास येतो ह्याचें कारण (१) पतचलन व रोखचलन ह्यांचा संबंध स्थिर असतो व (२) चलनगति व उत्पादन दीर्घकालाच्या संदर्भांत चलनपरिमितीवर अवलंबून नसतें ह्यांत आढळतें. चलनरूपानें लोकांस जें उत्पन्न मिळतें त्याचा ठराविक भागच ठेवरूपानें बँकांत ठेवला जातो व त्या भागाच्या ठराविक पटच पतचलननिर्मिति केली जाते. आपल्या उत्पन्नाचा किती भाग बँकेंत ठेवावयाचा हें विनिमय व्यवहारांबाबतच्या सोयी गैरसोयी, लोकांच्या संवयी ह्यावर अवलंबून असतें. चलनपरिमिति कमी अधिक म्हणून त्यांत बदल होत नाहीं. चलनगतिबाबत हेंच म्हणतां येईल. उत्पादन अनेक गोष्टींवर अवलंबून असतें; पण चलनपरिमिति व उत्पादन ह्यांचा संबंध नसतो.[१४]

---

[१३] The quantity theory will not hold true strictly and absolutely during transition periods—As to the periods of transition increase in 'M' produces effects not only on the 'ps', but on all the magnitudes in the equation of exchange—The strictly proportional effects on prices of an increase in M is only the normal or ultimate effect after transition periods are over—**Fisher.**

चलनपरिमिति सिद्धान्तांतील उणीवा

चलनगति स्थिर राहील असें गृहीत धरणें योग्य नाहीं :—चलनपरिमिति सिद्धान्त वस्तुस्थितीशीं ताडून पाहिल्यास त्यांतील उणीवा तात्काळ ध्यानांत येतात. प्रत्यक्षांत तो सिद्धान्त जसा‌वा तसा अनुभवास येत नाहीं ह्याचें मुख्य कारण असें कीं त्या **सिद्धान्ताचीं गृहीतें अवास्तविक आहेत.** चलनपरिमिति बदलल्याचा चलनगतीवर कांहींच परिणाम होत नाहीं, किंवा रोखचलन ज्या प्रमाणांत व ज्या दिशेनें बदलतें त्याच प्रमाणांत व त्याच दिशेनें पतचलनांत बदल होतो किंवा चलनपरिमिति व एकंदर विनिमयव्यवहार ह्यांचा अर्थाअर्थीं कांहींच संबंध नाहीं असें म्हणणें वस्तुस्थितीशीं विसंगत आहे. प्रथम चलनगतीचा विचार करूं. चलनपरिमिति कमीजास्त होत असतां चलनगति स्थिर राहीलच असा निर्वाळा देतां येत नाहीं. वस्तुस्थितीच्या अनुरोधानें चलनपरिमिति सिद्धान्तावर पहिली टीका अशी करतां येईल कीं चलनगतिबाबतचा त्या सिद्धान्ताचा दृष्टीकोनच मूळांत चुकीचा आहे आणि म्हणून चलनपरिमितीवर चलनगति दीर्घ काळाच्या संदर्भात अवलंबून नसतें ह्या बाबतचा त्या सिद्धान्ताच्या पुरस्कर्त्यांचा खुलासा समाधानकारक नाहीं.[१५] ह्या बाबतींत प्रथम ही गोष्ट नीट समजून घेतली पाहिजे कीं, चलनाची गति चलनाकरितां लोकांच्या मागणीच्या स्वरूपावर अवलंबून असते. चलनपरिमिति सिद्धान्तानें चलनगतीचा संबंध चलन-पुरवठ्याच्या बाजूशीं जोडला. हें वस्तुस्थितीला धरून नाहीं. चलनाकरितां लोकांची मागणी जेव्हां कमी होते तेव्हां हातांत आलेला पैसा लोक त्वरित खर्च करूं लागतात आणि त्यामुळें चलनगति

---

[१४] There tends to be a normal ratio of bank deposits (M′) to the quantity of money (M) because business convenience dictates that the available currency shall be apportioned between deposits and money in a certain more or less definite, even though elastic, ratio—The velocities of circulation of money and of deposits depend on technical conditions and bear no discoverable relation to the quantity of money in circulation. (They) will depend on density of population, commercial customs, rapidity of transport, and other technical conditions, but not on the quantity of money and deposits, nor on the price level —The stream of business depends on natural resources and technical conditions, not on the quantity of money. The whole machinery of production, transportation and sale is a matter of physical capacities and technique, none of which depend on the quantity of money—**Fisher**.

[१५] The old school of quantity theorists gave very scanty answers to the question why velocities of circulation could be expected to be constant—**Day**.

वाढते. उलट ज्या वेळेस लोकांची चलनाकरितां मागणी वाढते तेव्हां हातांत आलेला पैसा शक्यतों ते खर्च करीत नाहींत. त्यामुळें चलनगति कमी होते. कीन्सचे शब्दप्रयोग वापरून हीच गोष्ट अशी सांगतां येईल कीं, **रोकड प्राधान्य-प्रवृत्ति** (Liquidity Preference) जेव्हां वाढते तेव्हां चलनगति कमी होते. ती प्रवृत्ति कमी झाल्यास चलनगति वाढते. चलनगति स्थिर रहाते, हें चलनाकरितां मागणी स्थिर रहाते असें गृहीत धरण्याजोगें आहे. असें मानणें योग्य होईल काय ?

वरील प्रश्नाचें उत्तर नाहीं असेंच आहे. ह्या उत्तराची यथार्थता समजण्यासाठीं लोकांना चलन कां हवें असतें, हें पाहिलें पाहिजे. चलन जवळ बाळगण्याच्या व्यवहारहेतु, दक्षताहेतु व सट्टेबाजीहेतु ह्या तीन हेतुपैकीं व्यवहारहेतु व दक्षता हेतूसाठीं जी मागणी असते ती वस्तूंच्या किंमतीवर अवलंबून असते. भावमान वाढत असतां त्या अनुषंगानें लोक आपल्याजवळ अधिक पैसा ठेवूं पहातात; पण चलनपरिमिति वाढत असतां चलनपुरवठाहि वाढत असल्यानें लोकांना अधिक चलन मिळत रहातें व खर्च करण्याच्या संवयींत बदल करून चलनसंचय करावा अशी वेळ येत नाहीं. सारांश व्यवहार व दक्षता ह्या दोन हेतुप्रीत्यर्थ चलनासाठीं जी मागणी असते तिच्यामुळें चलनगतींत म्हणण्यासारखा फरक पडत नाहीं. चलनाची गरज नेहमींच्या दैनंदिन व्यवहाराकरितां व भावी काळासाठीं बचत म्हणून राखून ठेवण्यासाठीं केवळ लागते. ह्या समजुतीवर चलनपरिमितिसिद्धान्त आधारलेला असल्यानें त्यांत गति स्थिर राहील असें गृहीत धरण्यांत आलें आहे.[१६]

सट्टेबाजीच्या हेतूनें चलनाला जी मागणी असते तिचें स्वरूप जरा वेगळें आहे. पुढील काळांत भावमान काय राहील, ह्याबद्दलच्या अंदाजावर ही मागणी आधारलेली असते. ह्या मागणीमुळें चलनगतींत बदल होण्याचा संभव असतो. जेव्हां भाव वाढणार असा लोकांचा अंदाज असतो तेव्हां ते सढळ हातानें पैसा खर्च करून त्याचें रूपान्तर त्वरित वस्तूंत करूं पाहतात. त्यामुळें चलनगति वाढते. उलट भाव कमी होणार असा जेव्हां अंदाज असतो तेव्हां पुढें कमी होणाऱ्या भावाचा फायदा घेण्याकरितां खर्चाच्या बाबतींत लोक हात आंखडतां घेण्याचा संभव असतो, त्यामुळें चलनगति कमी होते. सट्टेबाजीचा भाग चलनाच्या मागणींत असतो असें एकदां मान्य केलें म्हणजे चलनगति स्थिर राहील असें गृहीत धरणें रास्त ठरत नाहीं.[१७]

---

[१६] The Quantity Theorists neglected the velocity of money because they were preoccupied with what Keynes calls the 'transaction and precautionary' motives of holding money —**Kurihara**.

[१७] As soon as we take into account the speculative motive i. e. the desire for cash for uncertain future price or interest changes, we must admit the possibility of a change in the velocity of money.

तसेंच सट्टेबाजीच्या हेतूमुळें चलनाला जी मागणी असते तिच्यांत अमुक प्रकारचा व अमुक प्रमाणांत बदल होईल असा ठोकताळा सिद्धान्तरूपानें मांडतां येत नाहीं. त्या त्या वेळची परिस्थिति पाहूनच त्या त्या वेळींच ढोबळमानानें ठरवितां येतें. ह्या हेतूमुळें चलनगतींत होणाऱ्या फेरफारांमुळें चलनमूल्याला वेगवान् हेलकावे बसूं शकतात,[१८] असें आढळून आलें आहे. चलन थोडें वाढविलें तरी बाजारभाव फार वाढतात किंवा थोडें चलन कमी करावें आणि एकदम वेगानें बाजारभाव पडावे हा अनुभव नवा नाहीं. सारांश चलनगति स्थिर असते व तींत सहसा स्वतंत्रपणें वेगवान बदल होत नाहींत व झालें तरी चलनपरिमितीशीं त्यांचा संबंध फारसा नसतो असें मानणें चूक आहे. चलनपरिमिति सिद्धान्तानें, विशेषतः फिशरच्या समीकरणाच्या रूपानें, भावमानावर परिणाम घडवून आणणाऱ्या सर्व गोष्टींचा निर्देश केला असला तरी त्या सिद्धान्तानें चलनपुरवठा ह्या प्रवाहावर विशेष भर दिला व तुलनेनें इतर गोष्टींकडे दुर्लक्ष केलें हें नाकारतां यावयाचें नाहीं. भावमानांतील बदल चलनपुरवठ्यांतील बदलाशींच संबंधित असतात असें दाखविणें हाच चलनपरिमितिसिद्धान्ताचा आद्य हेतु होता हें सहज सिद्ध करतां येतें. चलनपुरवठ्याकडे फार लक्ष दिल्यानें व विशेषतः चलनगतीचा अन्तर्भाव पुरवठ्यांतच केल्यानें चलनाच्या मागणींतहि स्वतंत्रपणें व वेगवान फेरफार होऊं शकतात व त्यामुळें चलनपुरवठा स्थिर राहूनहि भावमानांत बदल होतात ही घटना त्या सिद्धान्तांत उपेक्षिली गेली असें म्हणणें चूक होणार नाहीं.[१९]

उत्पादन स्थिर राहील, हें गृहीतकृत्य चुकीचें :—चलनपुरवठ्यांत फेरफार होत असतां उत्पादन वाढणार किंवा कमी होणार नाहीं, हें गृहीत कृत्य कोणत्याहि परिस्थितींत लागू पडत नाहीं. सर्व उत्पादनसाधनें उत्पादनकार्यांत गुंतलीं आहेत अशी परिस्थिति गांठली गेली असतांहि चलनपरिमिति वाढत आहे, असें जेव्हां होईल तेव्हांच चलनपरिमिति सिद्धान्तांतील ठोकताळे अनुभवास येतील. पण त्यासाठीं मुद्दाम प्रयत्न केले नाहींत तर सर्व उत्पादनसाधनांना काम मिळालें आहे, अशी परिस्थिति निर्माण होत नाहीं, असें कीन्सप्रणीत अर्थशास्त्रानें दाखवून दिलें आहे. त्यामुळें चलनपरिमितींत वाढ झाल्यास निकामीं पडून राहिलेलीं उत्पादनसाधनें कामाला लागून उत्पादन वाढण्याचा संभव असतो. चलन वाढल्यामुळें लोकांचा खर्च वाढतो. त्यामुळें उत्पादकांना प्रोत्साहन मिळूं लागतें आणि उत्पादन वाढतें.

---

[१८] This last motive of holding money is capable of causing volatile fluctuations.

[१९] Even though quantity of money is not changed by the forces of the market, the quantity of liquidity is capable of being increased by forces that in some sense are automatic. An increase in the demand for money will tend to increase its value via a fall in prices—Dillard.

चलनपरिमिति वाढल्यामुळें उत्पादनसाधनांना—मुख्यतः मनुष्यबळाला मिळणारें काम वाढण्याचा संभव असतो. ह्या घटनेनें जोंपर्यंत **पूर्ण रोजगार** (Full Employment) प्रस्थापित झालेला नाहीं तोंपर्यंत चलनपरिमिति वाढूनहि किमती वाढत नाहींत. कारण वाढलेलें चलन जुन्या उत्पादनावर खर्च न होतां वाढलेल्या उत्पादनावर खर्च होतें.[२०] पूर्ण रोजगार प्रस्थापित झाल्यानंतर मात्र चलनपरिमितींत वाढ होतच राहिली तर बाजारभावांत वाढ होत राहते. चलनवाढीमुळें ज्याप्रमाणें उत्पादन वाढण्याचा संभव असतो त्याचप्रमाणें चलनसंकोचामुळें उत्पादन कमी होण्याचा संभव असतो. चलनसंकोच होत असतां उत्पादन कमी झालें तर बाजारभाव बरेच पडतील हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. सारांश, चलनपरिमिति कमीजास्त होत असतां उत्पादनावर त्या घटनेचा कांहींच परिणाम होणार नाहीं असें गृहीत धरणें चूक आहे.

चलनपरिमितिसिद्धान्ताविषयीं येथपावेतों केलेल्या विवेचनाचा आशय असा कीं, चलन व भावमान ह्यांच्यांतील संबंध सरळ व साधा नाहीं. चलनपरिमितिसिद्धान्तावरून तो तसा आहे अशी जी कल्पना होते ती चुकीची आहे. चलनवाढीचा किंवा चलनसंकोचाचा उत्पादनावर किंवा चलनगतीवर जो परिणाम होतो त्याकडे दुर्लक्ष करून चालत नाहीं. हा निष्कर्ष धोरण ठरविण्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. चलनपरिमितिसिद्धान्त कोणत्याहि परिस्थितींत जसाचा तसा लागू पडत असला तर चलननीति ठरविणें फारच सोपें झालें असतें. कारण चलननीति हें अंकगणित असेल तर केवळ चलनांत बदल करून किंमतीमानांत हवा तो बदल घडवून आणणें सरकारला साधलें असतें.[२१]

सारांश, अलीकडील कीन्सवादी आर्थिक विचार लक्षांत घेऊन चलनपरिमितिसिद्धान्तावर दोन महत्त्वाच्या टीका करतां येतात. पहिली टीका अशी कीं चलनपरिमिति सिद्धान्तांत चलनगति स्थिर असते व चलनप्रमाणाशीं ती संबंधित नसते असें गृहीत धरलें आहे. पण तसें गृहीत धरणें योग्य नसल्यानें व्यवहारांत त्या सिद्धान्ताचा

---

[२०] If an increase in the quantity of money is offset by an increase in the quantity of goods and services, as is possible at less than full employment, then the general price level may not rise and therefore value of money may not fall.

[२१] If the crude quantity theory of money had its way, the stabilisation of general prices and therefore of the value of money would be a simple matter of manipulating the quantity of money, increasing the latter if prices are too low and decreasing it if prices are too high—A control of the money supply alone would be a sufficient condition for the control of income and the level of prices.

उपयोग होत नाहीं. वाढलेला पैसा खर्च केला जाईलच असें नाहीं.[२२] तसेंच पूर्ण रोजगार प्रस्थापित झाल्यानंतरच तात्त्विक दृष्टया हा सिद्धान्त अनुभवास येण्याची शक्यता असल्यानें त्याची तात्त्विक उपयुक्ततािह फार कमी आहे.[२३]

केंब्रिज समीकरण :—चलनपरिमितिसिद्धान्ताविषयीं वर केलेल्या विवेचनावरून एक गोष्ट लक्षांत येण्याजोगी आहे, ती अशी कीं, चलनमूल्याचा विचार करतांना केवळ चलनपरिमितीकडे लक्ष देऊन चालावयाचें नाहीं. पैशाला मागणी असते आणि त्या मागणींत स्वतंत्ररीत्या किंवा इतर गोष्टींची प्रतिक्रिया म्हणूनहि फेरफार होतात, ही गोष्ट लक्षांत घेणें अगत्याचें आहे. चलनगति ही प्रामुख्यानें मागणीच्या बाजूवर अवलंबून असते. तेव्हां चलन-मूल्याविषयीं कोणताहि विचार मांडतांना त्यांत चलनासाठीं असलेल्या मागणीला यथायोग्य स्थान दिलेंच पाहिजे. म्हणूनच मार्शल, पिगु, रॉबर्टसन् आणि कीन्स ह्या केंब्रिज विद्यापीठाशीं संबंधित असलेल्या ख्यातनाम अर्थशास्त्रज्ञांनीं चलनाच्या मागणीला प्रधान स्थान देणारी नव्या धर्तीचीं समीकरणें चलनपरिमितिसिद्धान्ताच्या प्रतिपादनासाठीं मांडलीं. चलनाची मागणी ही त्यांत चलन-मूल्यांतील फेरफारांची कारण-मीमांसा स्पष्ट करणारी प्रधान गोष्ट[२४] म्हणून मानली गेली आहे, हें केंब्रिज समीकरणांचें वैशिष्टय होय. ह्या समीकरणामुळें चलन-मूल्यविषयक विवेचनाला अगदीं नवी कलाटणी दिली गेली, हें श्रेय त्या समीकरणांना दिलेंच पाहिजे[२५].

---

[२२] An increase in money supplies even with output constant, would not increase prices proportionately, because the new money might be kept unspent rather than spent.

[२३] Keynsian economics criticises the quantity theory of money on two distinct grounds. Firstly it argues that the velocity of money is not a constant of economic behaviour and so questions the usefulness of the quantity theory as a device of applied economic analysis. Secondly it insists that the theory is valid only under highly restrictive assumptions and so questions even its theoretical usefulness—**Patinkin**.

[२४] In the Cambridge equation demand for money is treated as the strategic explanatory variable.

While the Fisher method regarded the velocity of circulation as something which was not subject to variation in any important degree, so that the main factor determining prices was the quantity of money, the Cambridge approach regards changes in the willingness to hold money as a major source of disturbance of the price-level. This emphasis on the demand for money is in sharp contrast with the traditional emphasis on supply side.

मार्शलनें चलन-मूल्याच्या विवेचनासाठीं $M = kY$ असें समीकरण मांडलें. ह्या समीकरणांत M नें चलन-परिमिति दर्शविली जाते. k ह्या अक्षरानें चलना-करितां मागणी दर्शविली जाते व Y ह्या अक्षरानें राष्ट्रांतील एकंदर उत्पादनाचें देशांतील मूल्य दर्शविलें जातें. Y ह्या अक्षराचा अधिक खुलासा व्हावा म्हणून त्या अक्षराऐवजीं P T (म्हणजे एकंदर विनिमय-व्यवहार गुणिले भावमान अर्थात् एकंदर उत्पादनाची पैशांतील किंमत) ही खूणहि वापरतां येईल व तसें केल्यास वरील समीकरण $M = P k T$ असें मांडावें लागेल. ह्या समीकरणांत M नें देशांतील एकंदर चलन, P नें भावमान व T नें एकंदर विनिमय-व्यवहार दर्शविले जातात. प्रा. पिगु ह्यांनीं $P = \frac{k R}{M}$ पद्धतीनें चलनमूल्याचा खुलासा करणारें समीकरण मांडलें. ह्या समीकरणांत P नें भावमान दर्शविलें जातें. R नें वस्तुरूप उत्पन्न दर्शविलें जातें. k नें चलनासाठीं मागणी दर्शविली जातें. व M नें चलनपरिमितीचा बोध होतो. केंब्रिज समीकरणाचा पिगुनें मांडलेलें समीकरण हा प्रातिनिधिक नमुना होय.[२६] ह्या केंब्रिज समीकरणांतील हे तीन्ही घटक चलन-परिमितिसिद्धान्तासाठीं वापरलेल्या जुन्या समीकरणांत आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे. फक्त k हा घटकच नवा आहे. त्यामुळें त्याचा अधिक खुलासा केला पाहिजे.

केंब्रिज समीकरणांतील k ही खूण कालदर्शक आहे. ह्या खुणेनें चलनाचें प्रत्येक परिमाण सरासरीनें प्रत्येक खेपेस किती काळपर्यंत वापरलें न जातां पडून राहतें तें सूचित केलें जातें. हा कालखंड व्यक्त करतांना विशिष्ट मुदतीचा तो कितवा हिस्सा आहे हें दर्शविणारा अपूर्णांक (क्वचित् प्रसंगीं पूर्णांकहि) मांडला जातो. उदाहरणार्थ, एका वर्षाच्या अवधीचा विचार होत असेल—सामान्यतः १२ महिन्यांचें एक वर्ष. मग त्याची सुरुवात कोठूनहि होवो—आणि सरासरीनें प्रत्येक चलन-परिमाण कोणाच्याहि हातांत आल्यानंतर एक महिना खर्च केलें जात नसेल तर k ह्या अक्षरानें $\frac{१}{१२}$ म्हणजे वर्षाचा बारावा हिस्सा व्यक्त होतो. k संबंधीं एवढा खुलासा केल्यानंतर k ही खूण चलनाला असलेल्या मागणीशीं कशी संबंधित आहे, हें कळण्यास अडचण पडू नये. लोकांची पैशाकरितां मागणी जेव्हां वाढते तेव्हां प्रत्येक चलन-परिमाण सरासरीनें पूर्वीपेक्षां अधिक काळपर्यंत पडून राहते व k नें सूचित होणारा अपूर्णांक मोठा होतो. सरासरीनें प्रत्येक चलन-परिमाण दोन महिन्यानंतर खर्च होत असेल तर k मुळें $\frac{१}{६}$ हा भाग

[२५] The Marshallian version of the quantity theory represents a fundamentally new approach to the problem of money and prices—Hansen.

[२६] In the Cambridge equation we have 'P' denoting the purchasing power of money, 'R' the real national income, 'k' is the proportion of 'R' held in the form of money and M is the total quantity of money.

सूचित होईल. ह्याच्या उलट पैशाकरितां मागणी कमी होते तेव्हां k नें वर्षाचा लहान हिस्सा सूचित होतो. कारण हातीं आलेलें चलन लोक त्वरित खर्च करूं लागतात. वरील समीकरणाचा उपयोग करून k चा आणखी खुलासा करावयाचा असेल तर असें म्हणतां येईल कीं, $k = \frac{M}{PT}$ or $k = \frac{M}{R}$ असा निष्कर्ष केंब्रिज समीकरणाच्या आधारेंच निघतो. एकंदर उत्पादन-मूल्यानें एकंदर चलन-परिमाणांच्या संख्येला भागिलें असतां एकंदर उत्पादन-मूल्याचा कितवा हिस्सा लोक चलनाच्या रूपानें ठेवूं इच्छितात,[२७] म्हणजे निराळ्या शब्दांत एकंदर अर्थव्यवहाराच्या मानानें लोकांना किती चलन हवें आहे—तें समजतें. प्रत्यक्ष आंकडे घेतल्यानें ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल. समजा, विनिमय-व्यवहारांची संख्या (T) ६००० आहे. प्रत्येक व्यवहार पुरा करण्यासाठीं १० रु. सरासरीनें लागत आहे म्हणजेच १० रु. हा सरासरी भाव आहे आणि एकंदर चलन ५००० रु. आहे. अशी परिस्थिति असल्यास k $\frac{५०००}{६००००} = \frac{१}{१२}$ होईल. k $\frac{१}{१२}$ आहे ह्याचा अर्थ असा केला जातो कीं, एकंदर उत्पादनाच्या $\frac{१}{१२}$ उत्पादनावरील हक्क किंवा वर्षाच्या उत्पादनांतील १ महिन्याच्या उत्पादनावरील आपला हक्क लोक पैशाच्या रूपानें जवळ बाळगूं इच्छितात. शेवटीं लोकांना चलन हवें असतें कशाला? उत्पादनावर अधिकार प्राप्त होतो म्हणूनच ना? तो अधिकार पैशाच्या स्वरूपांत तसाच ठेवावयाचा कीं त्वरित वापरून पैशाचें रूपान्तर वस्तूंत करून टाकावयाचें, हें जेव्हां लोक ठरवितात तेव्हां त्यांची पैशाकरितां मागणी ओघानेंच ठरते.

k संबंधीं आणखी गोष्ट सांगतां येईल. जुन्या पठडीतल्या समीकरणांतील V किंवा चलनगतीची जागा k नें घेतली असल्याचें दिसून येईल ही गोष्ट योग्यच आहे. कारण जर खोलांत जाऊन विचार केला तर k ही V ची उलटी बाजू आहे असें दिसून येतें. [k = 1/V] V १२ आहे—म्हणजे प्रत्येक रुपया सरासरीनें वर्षांतून १२ वेळां फिरून १२ परिमाणांचें काम करतो असें म्हणणें काय किंवा k $\frac{१}{१२}$ आहे म्हणजे प्रत्येक रुपया एक महिनाभर प्रत्येक वेळां पडून राहूं दिला जाऊन नंतर वापरला जातो म्हणणें काय दोहोंचा अर्थ सारखाच. मग प्रश्न असा उद्भवतो कीं, समीकरणांत बदल करण्याचा—तेंच सांगावयाचें असेल तर—हा व्यर्थ खटाटोप कशाला? ह्या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, चलनगतीऐवजीं चलनाच्या मागणीला समीकरणांत स्थान देणें हा गणितदृष्ट्या नाममात्र बदल असला तरी अर्थव्यवहारांचें विवरण अधिक वास्तवपूर्ण करण्याच्या दृष्टीनें तो बदल नाममात्र नाहीं. तो नाममात्र समजला गेला तर केंब्रिज समीकरणाचें महत्त्व अकारण नाकारल्यासारखें होईल.[२८]

[२७] In every state of society there is some fraction of their income which people find it worth while to keep in the form of currency—**Marshall.**

V आणि k गणितदृष्टचा एकच असले तरी केम्ब्रिज समीकरण अधिक श्रेष्ठ आहे. कारण त्या समीकरणांत चलनासाठीं असलेल्या मागणीला चलनमूल्य ठरविणारा एक प्रवाह म्हणून स्वतंत्र मान्यता दिली आहे. ती देणें वास्तवतेला धरून आहे. कारण चलनपरिमितींत कांहींहि बदल न झाला तरीहि केवळ चलनाला असलेली मागणी मोठ्या प्रमाणांत व अचानक कमीअधिक झाल्यास त्या घटनेचा चलन-मूल्यावर निःसंशय परिणाम होतो.[२९] वरील विवेचनाच्या आधारें भावमानाचा खुलासा $P = \frac{\quad}{k\ T}$ असा करतां येईल. ह्यांतील k मध्यें बदल झाला म्हणजे P त बदल होणार हें उघडच आहे. चलन जवळ बाळगण्याची इच्छा कमी झाल्यास खर्च वाढून बाजारभाव वाढतील. उलटपक्षीं ते कमी होतील. शिवाय चलनाला गति आहे, असें म्हणण्यांत चलनाला प्रधान स्थान व व्यक्तीला गौण स्थान दिल्यासारखें होतें. हें योग्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. त्याऐवजीं लोकांच्या चलनासाठीं असलेल्या मागणीच्या स्वरूपांतून चलनगति निश्चित होते, असें म्हणण्यानें व्यक्ति व तिची मनोरचना हा अर्थव्यवस्थेंतील महत्त्वाचा घटक आहे हें स्पष्ट होतें.[३०] असेंहि म्हणतां येईल कीं प्रत्यक्ष व्यवहारांत फिशरचें समीकरण

---

[२८] Arithmetically 'k' is simply the reciprocal of V in the equation MV = PO. But it does not follow—that therefore the Marshallian analysis is the same thing as Hume-Fisher analysis. To assert this is to miss entirely the significance of k in the Marshallian equation—**Hansen.**

[२९] Sudden and rapid shifts in the desire of the public to hold money may profoundly affect prices even though the monetary authority successfully maintains a high stability in the money supply—**Hansen.**

[३०] The Cambridge equation meets the weakness of the older theory that it provided no satisfactory explanation of the velocity of circulation of money by asking and answering rather a different question. Instead of considering the velocity of circulation i. e. the speed with which an average unit of money passes from hand to hand, the question was asked : Why does money rest in transactor's hands for a certain length of time before being used ?—The change in the form of the questions involved a very important change of emphasis. The Cambridge economists asked why people wished to hold money. An attempt was thus made to analyse the motives. Further there was emphasis on the causes of changes in demand for money rather than on causes of changes in its supply.—**Day.**

व केंब्रिज समीकरण ह्यांच्यांत मूलभूत फरक असण्याचें कारण नाहीं. तरीहि त्यामुळें केंब्रिज समीकरणाचें महत्त्व कमी होत नाहीं. तात्त्विक दृष्ट्या विचार केल्यास केंब्रिज समीकरण तुलनेनें अधिक वास्तवपूर्ण व अधिक मूलगामी आहे ह्यांत शंकाच नाहीं. आणि हाच दावा त्या समीकरणाचे अग्रगण्य पुरस्कर्ते प्रा. पिगु ह्यांनीं केला आहे.[३१]

केंब्रिज समीकरणांत चलनमूल्याची जी मीमांसा आहे तींत चलनाच्या मागणीला म्हणजे आपल्या उत्पन्नाचा कितवा हिस्सा लोक रोकड रूपानें जवळ बाळगूं इच्छितात ह्या गोष्टीला प्रधान स्थान दिलें असल्यानें त्या मीमांसेला चलनमूल्याचा **चलनांश सिद्धान्त** (Cash Balances Theory) असें नांव देण्यास हरकत नाहीं. एकंदर उत्पादन स्थिर आहे असें गृहीत धरल्यास चलनरूपानें उत्पादनाचा जेवढा मोठा हिस्सा लोक आपल्याजवळ बाळगूं इच्छितात—म्हणजे चलनांश जेवढा वाढतो—तेवढ्या प्रमाणांत भावमान कमी होऊन चलनमूल्य वाढतें. उलटपक्षीं चलनांश जेवढा लहान व्हावा तेवढें भावमान वाढून चलनमूल्य कमी होतें. **चलनांश व भावमान ह्यांचा संबंध व्यस्त असतो व चलनांश व चलनमूल्य ह्यांचा संबंध सरळ असतो** ह्या शब्दांत तो सिद्धान्त सांगतां येईल.

केम्ब्रिज समीकरणाचा आणखी एक विशेष असा कीं, एकंदर विनिमय व्यवहारांना प्राधान्य देण्याऐवजीं एकंदर उत्पन्नाच्या कल्पनेला त्या समीकरणानें प्राधान्य दिलें. एका अर्थानें हा बदल जुजबीच आहे; कारण फिशरच्या समीकरणांतहि विनिमय व्यवहाराच्याऐवजीं उत्पादनाला भावमानानें गुणल्यास एकंदर उत्पन्नाची कल्पना अंतर्भूत करतां येते; पण तरीहि एकंदर विनिमय व्यवहारांऐवजीं एकंदर उत्पादनाला समीकरणांत स्थान देऊन भावमानाशीं संबंधित असलेल्या एका महत्त्वाच्या घटकाकडे लक्ष वेधण्याची कामगिरी केम्ब्रिज समीकरणानें केली ह्यांत शंका नाहीं.[३२]

[३१] It is evident that there is no conflict between my formula and that embodied in the quantity theory. But it does not follow that there is nothing to choose between them. Mine is not of course any truer than its rival. They are both equally true. The claim that I make on behalf of mine is merely that it is somewhat more effective engine of analysis. It focusses attention on the proportion of their resources that people choose to keep in the form of legal tender, instead of focussing it on velocity of circulation. This fact gives it, as I think, a real advantage because it brings us at once in relation with volition—an ultimate cause of demand instead of something that seems at first sight accidental and arbitrary—**Pigou.**

चलनपरिमिति सिद्धान्ताचें मूल्यमापन :—केम्ब्रिज समीकरण फिशरच्या जुन्या समीकरणापेक्षां चांगलें असलें तरी त्या समीकरणामुळें चलनपरिमिति सिद्धान्तांतील मूलभूत उणीवा नाहींशा होणार नाहींत.[33] तसें पाहिलें तर कोणतेंहि एक समीकरण घेऊन अमुक एका कारणामुळेंच चलनमूल्य बदलेल असें सांगणें धोक्याचें आहे. कारण भावमानांतील फेरफाराविषयींची आधुनिक विचारसरणी असें सांगते कीं, भावमानांतील फेरफार कोणत्याहि एका गोष्टीवर अवलंबून नसतात. अनेक गोष्टींचा संकलित परिणाम भावमानावर होतो. ह्या दृष्टीनें विचार केल्यास असें म्हणावें लागतें कीं, चलनपरिमिति सिद्धान्त कोणत्याहि समीकरणाच्या आधारें सांगितला तरी भावमानांतील फेरफाराचा खुलासा म्हणून तो संपूर्णपणें समाधान-कारक कधींच ठरावयाचा नाहीं. चलनपरिमिति सिद्धान्तावर एक टीका अशी नेहमींच करण्यांत येते, आणि ती अरास्त आहे असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं, कीं, आधुनिक आर्थिक जीवन गुंतागुंतीचें असल्यामुळें पैसा ज्या प्रमाणांत वाढतो अगर कमी होतो त्याच प्रमाणांत किंमतीमान वाढतें अथवा कमी होते असा ठोकळे-बाज व अगदीं साधासुधा सिद्धान्त मुळींच चालावयाचा नाहीं. अशा प्रकारच्या सिद्धान्तामुळें वस्तुस्थितीचें यथायोग्य आकलन होण्याऐवजीं अपसमज होण्याचा संभव अधिक. वस्तुस्थितीमध्यें किंमतीमानांतील बदल कसें व कोणत्या कारणांमुळें होतात, ह्याविषयीं चलनपरिमिति सिद्धान्तांत अंतर्भूत असलेल्या माहितीपेक्षां अधिक माहिती मिळविणें अर्थकारणावर प्रकाश पडण्याच्या दृष्टीनें आवश्यक असतें.[34] चलनपरिमिति सिद्धान्त आजच्या अर्थव्यवस्थेंत सर्वसाधारण भावमानांत होणाऱ्या फेरफारांचा

---

[32] Instead of being concerned with the total number of transactions it was concerned with the level of income—By introducing the consideration of the level of income the Cambridge version concentrated attention on a concept which has proved most useful in the whole of modern economic theory.—**Hansen.**

[33] Although the Cambridge version of the quantity theory represented a big advance on the Fisher version, it is not in itself an adequate monetary theory. Its weakness is that it is too simple to deal adequately with the complexities of the economic system.

[34] The quantity theory is an inadequate guide to understanding of the reasons for price changes—We need more understanding of the mechanics of price changes than the theory can give—The quantity theory does not help us very much in looking at the problems of monetary economics and in fact its misleading simplicity may obscure more than it reveals—The fact is that monetary economics is too complicated to be dealt with by theories as simple as the quantity theory—**Day.**

खुलासा म्हणून अत्यंत अपुरा असला तरी चलनशास्त्रविषयक विचाराच्या इतिहासांत चलनपरिमिति सिद्धान्तानें प्रगतीचा एक विशिष्ट टप्पा गांठला गेला[३५] कारण त्या सिद्धान्ताच्या आधारेंच भावमानावर परिणाम घडवून आणणाऱ्या विविध प्रवाहाचें ज्ञान झालें हें नाकारणें अनुदारपणाचें होईल.[३६]

चलनविस्ताराच्या परिणामांची आधुनिक मीमांसा :––चलनविस्ताराच्या परिणामांची आधुनिक मीमांसा म्हणजे कीन्सनें केलेली मीमांसा होय. ही मीमांसा सूत्ररूपानें पुढीलप्रमाणें सांगतां येईल :––

(१) चलनपरिमिति बदलण्याचा भावमानावर होणारा परिणाम प्रत्यक्ष नसतो व चलनपरिमिति ज्या प्रमाणांत बदलेल त्याच प्रमाणांत भावमान बदलेलच असें ठामपणें म्हणतां यावयाचें नाहीं. चलनपरिमितींतील बदलांपेक्षां एकंदर उत्पादनाकरितां जी **प्रभावी मागणी** (Effective Demand) ती अधिक महत्त्वाची आहे. प्रभावी मागणी ही अर्थव्यवस्थेंत होणाऱ्या समस्त खर्चावर अवलंबून असते. तसेंच चलनपरिमिति वाढत असतां उत्पादन वाढण्याची शक्यता किती आहे हेंहि पहावें लागेल. तें बऱ्याच प्रमाणांत अर्थव्यवस्थेंत बेकारी आहे कीं नाहीं ह्यावर अवलंबून असतें. चलनपुरवठा ज्या प्रमाणांत वाढतो त्याच प्रमाणांत प्रभावी मागणी वाढते, असें गृहीत धरल्यास एवढेंच म्हणतां येईल कीं, जोंपर्यंत पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला नाहीं तोंपर्यंत चलनपुरवठा वाढेल त्या प्रमाणांत भावमान वाढ न होतां रोजगारांत (म्हणजे उत्पादनांत) वाढ होईल. पूर्ण रोजगार प्रस्थापित झाल्यानंतर चलनप्रमाण वाढण्याची प्रक्रिया चालूच राहिली तर मात्र चलनपरिमितींत ज्या प्रमाणांत वाढ होईल त्याच प्रमाणांत भावमानांत वाढ झाल्याचें दिसून येऊन जुन्या वळणाचा चलनपरिमिति सिद्धान्त अनुभवास येईल.[३७]

[३५] It must be admitted at once that the quantity equations, and even most of the quantity theories, however inadequate and misleading they may have been when improperly applied, represented major forward steps in the historic development of monetary theory. The quantity equation is of course simply an identity, but it also serves to focus attention on certain important over all aggregates reflecting the activity of the economy and it served as a convenient classificatory device for the discussion of the other features of the economy which determine why M, O and T behave as they do—**Lintner**.

[३६] The famous formula PT=MV—has played a very great part in promoting the progress of monetary theory and those of us who have been brought up on it must not be deemed ungrateful to the genius of Prof. Fisher if we find that the requirements of our analysis are outgrowing––**Keynes.**

(२) वरील विधानांत असें गृहीत धरण्यांत आलें आहे कीं, ज्या प्रमाणांत चलनपरिमिति वाढते त्याच प्रमाणांत प्रभावी मागणींत वाढ होते. पण तसें गृहीत धरणें नेहमींच वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. सामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, चलनपरिमिति वाढत असतां प्रभावी मागणी, म्हणजे समस्त खर्च वाढेलच. चलन-परिमिति वाढत असतां समस्त खर्च कमी होणें अगदीं अपवादात्मक परिस्थितींतच शक्य आहे.[३८] तेव्हां चलनपुरवठा वाढत असतां प्रभावी मागणी वाढेल असें धरून चालण्यास हरकत नाहीं. पण ती नेमकी किती प्रमाणांत वाढेल हें लोकांची चलनाकरितां मागणी वाढत आहे कीं कसें, व्याजाचा दर कमी झाल्यामुळें भांडवलाची फलक्षमता सुधारून भांडवलगुंतवणांत किती प्रमाणांत वाढ होईल व त्यामुळें समस्त खर्च किती प्रमाणांत वाढेल ह्यावर अवलंबून राहील. समस्त खर्च चलनपरिमितीपेक्षां अधिक प्रमाणांत वाढतो, कीं त्याच प्रमाणांत वाढतो, हें चलनपरिमितीच्या वाढीचे अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम ठरण्याच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें असतें. चलन-परिमितीच्या प्रमाणांत प्रभावी मागणींत वाढ होणें, न होणें हें प्रामख्यानें रोकड प्राधान्य प्रवृत्ति, भांडवलाची सीमान्त फलक्षमता ह्या प्रवाहावर अवलंबून असतें.[३९]

(३) चलनपरिमितींत वाढ झाल्यामुळें सामान्यतः प्रभावी मागणी वाढते. त्यामुळें उत्पादन वाढण्याची शक्यता निर्माण होते. प्रभावी मागणी ज्या प्रमाणांत वाढेल त्याच प्रमाणांत उत्पादन वाढणार नाहीं. कारण उत्पादनांत वाढ करण्याचा सतत प्रयत्न करूं लागल्यास केव्हां तरी घटत्या फळाचा सिद्धान्त अनुभवास येतोच. त्यामुळें चलनवाढीचा परिणाम होऊन कांहीं प्रमाणांत तरी बाजारभावांत वाढ झाल्याशिवाय राहणार नाहीं. बाजारभाव किती प्रमाणांत वाढतील, हें उत्पादन किती लवचिक आहे ह्यावर अवलंबून राहील. उत्पादन जेवढें लवचिक असेल तेवढें तें अधिक प्रमाणांत वाढेल. तेवढ्या प्रमाणांत भावमानांतील वाढ कमी होईल.[४०]

---

[३७] If effective demand changes in the same proportion as the quantity of money, the quantity theory of money can be restated as follows :–So long as there is unemployment, employment will change in the same proportion as the quantity of money and when there is full employment prices will change in the same proportion as quantity of money—**Keynes.**

[३८] It is only in highly exceptional circumstances that an increase in the quantity of money will be associated with a decrease in the quantity of effective demand—**Keynes.**

[३९] A given increase in M will be associated with a certain increase in effective demand, although it is difficult to say how great that change will be because its quantitative degree is determined by liquidity preferences, marginal efficiency of capital and the investment multiplier.

(४) उत्पादन वाढत असतां भावमानांत वाढ होण्याचें घटत्यां फळाखेरीज आणखी एक कारण सांगतां येईल. तें असें कीं, बेकारी असली तरीहि कामगारांच्या वेतनांत अगदींच वाढ होणार नाहीं असें कदापि म्हणतां येणार नाहीं. इतर घटकांच्या किंमतींतहि थोडीफार वाढ होईलच. सारांश, उत्पादनखर्च वाढल्यामुळेंहि भावमानांत कांहीं प्रमाणांत वाढ होईल.[४१]

(५) वरील सर्व गोष्टी विचारांत घेऊन सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, पूर्ण रोजगार स्थिति प्रस्थापित होईपर्यंतच्या काळांत वाढलेल्या चलनपरिमितीचा परिणाम अंशतः उत्पादनावर होईल व अंशतः भावमानावर होईल.[४२] त्यांतहि असें दिसून येईल कीं, सुरुवातीला बेकारीच्या प्रभावामुळें भावमानांतील वाढ कमी प्रमाणांत होईल आणि त्या मानानें उत्पादन व रोजगार अधिक प्रमाणांत वाढतील. पण कालान्तरानें उत्पादन वाढ करण्यांतील अडचणींना अधिक महत्त्व प्राप्त होऊन भावमानांतील वाढ वेगानें होऊं लागेल.[४३] पूर्ण रोजगार स्थिति

[४०] The extent to which prices will rise—When money expenditure is increased, depends on the elasticity of output—If output elasticity is low, the price elasticity will be high. The sum of the two elasticities is equal to unity. Effective demand spends itself partly in affecting output and partly in affecting price, according to this law—Keynes.

[४१] Keynes goes on to allow for the fact that prices may be expected to rise with increasing output even before the point of full employment for four reasons. First, since productive resources are not homogeneous, an increase in output will generally involve diminishing returns and increasing supply prices, even though the unit cost of all factors, remain unchanged; Secondly wage rates will almost certainly increase, as output is increased though not continuously. Thirdly, the prices of other factors entering into marginal cost will also rise in varying proportions. Finally, prices will also rise before full employment is reached because—supplies in certain markets will become completely inelastic while others are still elastic—**Lintner.**

[४२] Increase in effective demand will, generally speaking, spend itself, partly in increasing the quantity of employment and partly in raising the level of prices.

[४३] It is probable that the general level of prices will not rise very much as output increases, so long as there are available efficient unemployed resources of every type. But as soon as output has increased sufficiently to begin to reach the bottlenecks there is likely to be a sharp rise in the prices of certain commodities.—**Keynes.**

प्रस्थापित झाल्यानंतर मात्र चलनविस्तार चालू राहिल्यास केवळ भावमानांत वाढ होईल.

(६) चलनविस्तार होण्याचे जे परिणाम होतात त्यांच्या उलट स्वरूपाचें परिणाम चलनसंकोचाचे होतात. चलनसंकोचाचा परिणाम उत्पादन, रोजगार व किंमतीमान ह्या तीहींवर अनिष्ट स्वरूपाचा होतो. चलनसंकोचामुळें बाजारभाव कमी होतात, त्यामुळें उत्पादन कमी होतें व उत्पादन कमी झाल्यामुळें रोजगार कमी होतो. चलनविस्तार होत असतां एक वेळ अशी येते कीं, रोजगार वाढण्याचें थांबून भावमानांतील वाढच फक्त होण्याचें शिल्लक राहतें. ह्या स्थितीलाच अति चलन विस्तार म्हणतात. पण चलनसंकोच होत असतांना असें आढळून येतें कीं, त्याचा परिणाम बाजारभाव व रोजगार ह्यांवर सतत होत राहतो. अति चलनविस्तार व अति चलनसंकोच ह्या दोन परिस्थितींतील मुख्य फरक हाच होय.[४४]

चलनमूल्यांतील फेरफारांची आधुनिक मीमांसा :—चलनविस्ताराच्या परिणामाबाबतची वर सांगितलेली जी आधुनिक मीमांसा आहे तिच्यांतच भावमानांत म्हणजे पर्यायानें चलनमूल्यांत फेरफार कां होतात ह्या संबंधीची मीमांसा अभिप्रेत आहे. ही मीमांसा थोडक्यांत पुढीलप्रमाणें सांगतां येईल.

भावमान हें चालूं उत्पादनाचें प्रचलित बाजारभावमान लक्षांत घेऊन ठरणारी एकंदर किंमत व चालू उत्पादनावर होणारा समस्त खर्च—(म्हणजेच निराळ्या शब्दांत चालू उत्पादनासाठीं असणारी समस्त मागणी) ह्यावर अवलंबून असतें. समस्त मागणी ही चलनपरिमिति सिद्धान्तांत सूचित केल्याप्रमाणें चलन-परिमिति (M) व चलनगति (V) ह्यावर अवलंबून नसून अर्थव्यवस्थेंत उपभोग-खर्च किती केला जात आहे व भांडवल गुंतवण किती केली जात आहे ह्यावर अवलंबून असते. कारण समस्त खर्च ही उपभोगखर्च व भांडवलगुंतवण ह्यांची बेरीज असते. समस्त खर्च किंवा समस्त मागणी = भांडवलगुंतवण + उपभोग खर्च (I + C i.e. Investment + Consumption) असें समीकरणाच्या भाषेंत म्हणतां यईल. समस्त मागणीचें असें वर्णन करणें अधिक अर्थपूर्ण आहे. कारण समस्त मागणी ही एक संध, एकरकमेनें दाखवितां येण्याजोगी गोष्ट नसून भाग पाडतां येतात, हें ह्या वर्णनानें चांगल्या प्रकारें व्यक्त होतें.[४५]

---

[४४] Whilst a deflation of effective demand below the level required for full employment will diminish employment as well as prices, an inflation of it above this level will merely affect prices—**Keynes.**

There is thus an asymmetry between inflation and deflation. Deflataion drives both employment and prices down. Inflation can raise only prices, not employment—**Hansen.**

भावमान स्थिर राहावयाचें असेल तर समस्त प्रभावी मागणी समस्त उत्पादन खर्चाएवढी असली पाहिजे. म्हणजे चालू उत्पादनासाठीं जेवढा उत्पादनखर्च होत आहे तेवढाच पैसा त्या उत्पादनाच्या खरेदीवर खर्च केला पाहिजे. तसें न झाल्यास किंमतीमानांत बदल घडवून आणणारे प्रवाह अर्थव्यवस्थेंत वाढूं लागतील. चालू उत्पादनाच्या एकूण किंमतीपेक्षां अधिक पैसा त्या उत्पादनाच्या खरेदीसाठीं खर्च होण्याची प्रवृत्ति अर्थव्यवस्थेंत दिसून आल्यास भावमान वाढूं लागेल. ह्या उलट चालू उत्पादनाच्या एकूण उत्पादनखर्चापेक्षां चालू उत्पादनावरील एकूण खरेदीखर्च कमी भरेल; तर भावमान कमी होऊं लागेल तेव्हां चालू उत्पादनाचा समस्त उत्पादन-खर्च व समस्त खरेदी-खर्च ह्या दोन गोष्टी समान होतीलच, अशी हमी देतां येईल काय, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचें सरळ उत्तर असें आहे कीं, अशी हमी देतां येणार नाहीं. कारण चालू उत्पादनाचें प्रमाण ठरण्याचीं कारणें व त्या उत्पादनावर होणारा खर्च ठरण्याचीं कारणें स्वतंत्र अशींच आहेत. उदाहरणार्थ, चालू उत्पादन ज्या प्रमाणांत वाढत जाईल त्याच प्रमाणांत उपभोग खर्च वाढत जाईल असें सांगतां यावयाचें नाहीं. तसेंच व त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे चालू उत्पादनांतून जी शिल्लक टाकली जाईल तेवढीच भांडवल गुंतवण होईल, अशी हमी देतां येणार नाहीं. कारण भांडवल गुंतवणीचा संबंध चालू उत्पादनाशीं किंवा चालू उत्पादनांतून उपभोग खर्च वजा जातां किती शिल्लक टाकली जाईल, ह्याशीं नसून उद्योगपतींच्या भावी काळाबाबतच्या अपेक्षांशीं—म्हणजेच तांत्रिक भाषेंत भांडवलाच्या सीमान्त फलक्षमतेशीं असतो. उपभोगखर्च + भांडवलगुंतवण = समस्त खर्च व उपभोगखर्च + चालू उत्पन्नांतील शिल्लक = चालू उत्पन्न. अशी परिस्थिति असल्यामुळें चालूं उत्पन्नांतील शिलकीपेक्षां योजलेली भांडवल गुंतवण कमी किंवा अधिक होण्याचा संभव निर्माण झाल्यास चालूं उत्पादनाचा समस्त उत्पादनखर्च व चालू उत्पादनावरील समस्त खरेदीखर्च

[४५] Basically there are two approaches to the problem of aggregate demand, the MV approach and I + C approach. The fundamental difference between them can briefly be put as follows. The MV approach conceives of demand as a global quantity and not as an aggregate of independently determined component parts—The I + C approach stresses the fact that in a capitalistic society, demand is directed towards two quite distinct kinds of products (i) Consumers goods and (ii) Investment goods. The elements determining the demand for investment goods are very different from those determining the demand for consumer's goods. The division of aggregate demand into investment outlays and consumption outlays for purposes of income analysis represented a revolution in thinking—**Hansen.**

ह्यांच्यांत तफावत निर्माण होऊन भावमानांत अस्थिरता निर्माण झाल्यावांचून राहणार नाहीं.[४६]

वरील विवेचनाचा निष्कर्ष असा कीं, समस्त उत्पादन-खर्च व समस्त खरेदी-खर्च ह्यांच्यांत तफावत निर्माण झाल्यामुळें भावमान व पर्यायानें चलन-मूल्यांत बदल होतात. समस्त मागणीच्या उपभोग-खर्च व भांडवल-गुंतवण ह्या दोन घटकांपैकीं प्रामुख्यानें भांडवल-गुंतवणाशीं भावमानांतील बदलांचा संबंध असतो. कारण अर्थव्यवस्थेच्या कारभाराचा अनुभव असेंच दाखवितो कीं, भांडवल-गुंतवणाचें प्रमाण स्थिर नसतें. तसें तें नसावें हें साहजिकच आहे. कारण भांडवल-गुंतवण बोलून-चालून उद्योगपतींच्या भावी काळाबाबतच्या अपेक्षांवर अवलंबून असते. ह्या अपेक्षा अनेक गोष्टींवर व उद्योगपतींच्या मनोवृत्तीवर त्या गोष्टींचा जो परिणाम होतो त्यावर अवलंबून असल्यानें त्यांत व त्यांचा परिणाम होऊन एकंदर भांडवल-गुंतवणांत बदल न झाला तरच नवल. केवळ भांडवल-गुंतवणांतच नव्हे तर उपभोग-खर्चाच्या बाबतींतहि अस्थिरताच दिसून येते असें अलीकडील संशोधनांत दिसून आलें आहे. विशिष्ट उत्पन्नाचा किती भाग उपभोगावर खर्च होईल, हें ठरलेलें असतें व त्या बाबतींत स्थैर्य दिसून येतें, असें धरून चालण्यास कांहीं आधार आहे, असेंहि आजकाल मानलें जात नाहीं.[४७]

भांडवल-गुंतवण व उपभोग-खर्च ह्यांच्यांत स्थैर्य नसेल तर चालू उत्पादनासाठी असणारी प्रभावी मागणी स्थिर राहणार नाहीं हें स्पष्ट आहे. त्यामुळें जेव्हां एकंदर शिलकीपेक्षां योजलेली भांडवल-गुंतवण कमी होते (उपभोग-खर्चाचा येथें विचार केलेला नाहीं. कारण उपभोग-खर्च कमी झाला असतां जेवढी शिल्लक वाढते तेवढीच भांडवल-गुंतवण वाढल्यास एकंदर खर्च कमी होत नाहीं.) तेव्हां **भावघटकारी**

[४६] Aggregate demand I + C may not equal the aggregate supply price (aggregate cost of output). And the reason is (i) That while consumer demand is primarly a function of current income, it does not rise as much as income and (ii) The demand for investment goods is largely determined by factors (technological developments, etc.) unrelated to current income—The determinants of consumption and the determinants of investment are not interconnected in a manner which ensures an adequate aggregate demand so that the sale proceeds will tend to equal the aggregate cost—**Hansen.**

[४७] Clearly, there is no empirical basis for believing the investment component of the aggregate demand to be stable. In recent years doubt has even been cast as to the validity of the assumption of stability for the consumption component of the aggregate demand.

(Deflationary) प्रवाह अर्थव्यवस्थेंत वाहूं लागतात. उलट जेव्हां प्रभावी मागणी वाढते तेव्हां--म्हणजे जेव्हां शिलकीपेक्षां योजलेली भांडवल-गुंतवण अधिक होते तेव्हां **भाववाढकारी** (Inflationary) प्रवाह अर्थव्यवस्थेंत वाहूं लागतात. सारांश, बाजारांतील बदलांचा संबंध समस्त खरेदी-खर्चाशीं--म्हणजेच प्रभावी मागणीशीं आहे. अधिक खोलांत जाऊन असें म्हणतां येईल कीं, तो चालू शिल्लक व योजलेली भांडवल-गुंतवण ह्यांच्याशीं असतो.

समस्त खर्च वाढल्यामुळें भाववाढकारी प्रवाह अर्थव्यवस्थेंत वाहू लागले किंवा समस्त खर्च कमी झाल्यामुळें भावघटकारी प्रवाह अर्थव्यवस्थेंत वाहूं लागले तरी भावमानावर प्रत्यक्ष परिणाम किती होईल, हें अर्थातच समस्त उत्पादनाच्या लवचिकतेवर अवलंबून राहील. उदाहरणार्थ, समस्त खर्च वाढत असतां समस्त उत्पादनाची लवचिकता जेवढी कमी असेल तेवढें भाववाढीचें प्रमाण अधिक होईल. पूर्ण रोजगाराची स्थिति प्रस्थापित झाल्यानंतर समस्त उत्पादन संपूर्णतया अलवचिक होतें किंवा निराळ्या भाषेंत समस्त उत्पादनाची लवचिकता शून्यावर येऊन ठेपते. अशा परिस्थितींत साहजिकच समस्त खर्च म्हणजेच प्रभावी मागणी ज्या प्रमाणांत वाढते त्याच प्रमाणांत भावमानांत वाढ होते. समस्त खर्च कमी असतां सुद्धां होणारी भावघट समस्त उत्पादनाच्या लवचिकतेवरच अवलंबून असते.[४८] समस्त खर्च वाढत असतां प्रभावी मागणी वाढत असते हें खरें; पण प्रत्येक उद्योगधंद्यांतील प्रभावी मागणी सारख्याच प्रमाणांत वाढेल (अगर कमी होईल) असा भरंवसा देतां येत नाहीं. तसेंच उत्पादनाची लवचिकता सर्वच उद्योगधंद्यांत सारखी नसते. त्यामुळें समस्त प्रभावी मागणी वाढत असतां (किंवा कमी होत असतां) विविध उद्योगधंद्यांवर होणारे किंमतीबाबतचे परिणाम समप्रमाण असणार नाहींत, हें पक्कें लक्षांत घेतलें पाहिजे.[४९]

चलनमूल्याच्या आधुनिक मीमांसेचे गुण :-- किंमतीमानांत होणाऱ्या फेरफारांची आधुनिक मीमांसा वरीलप्रमाणें आहे. ही मीमांसा चलन-परिमिति सिद्धान्तांत अभिप्रेत असलेल्या मीमांसेपेक्षां निश्चितच सरस आहे. कारण — (१) आधुनिक मीमांसा अधिक वास्तवता-पूर्ण आहे. समस्त उत्पादनासाठीं जी प्रभावी मागणी असते, जिच्यावर किंमतीमान अवलंबून असणें अपरिहार्य आहे, तिच्या उगमाचा शोध घेण्यास चलन-परिमिति सिद्धान्त

[४८] When no surplus labour is available, output will not alter and prices will rise in exact proportion to changes in aggregate demand.

[४९] Effective Demand in each industry will not change in direct proportion to changes in aggregate demand. Moreover the elasticities of output will vary in different industries. Thus relative prices will change when there is a change in the general level of prices—**Hansen**.

असमर्थ ठरतो. कारण चलन-परिमितींत बदल न होतांहि प्रभावी मागणी कमी-अधिक कां होते, ह्या गोष्टीचा खुलासा तींत आढळत नाहीं. चलन-परिमितींतील बदल अनेकदां भावमानांतील फेरफारांचें कारण नसून परिणाम असतात. प्रभावी मागणी वाढल्यामुळें अर्थव्यवहारांत वाढ होते. ती घटना सुकर करण्यासाठीं चलन-शासन संस्थेला चलनपरिमितींत वाढ करावी लागते, ह्या गोष्टीची दखल न घेणें योग्य होणार नाहीं. हें सर्व सांगण्याचा मुद्दा असा कीं, भावी काळांतील नफ्या-साठीं ज्या अर्थव्यवस्थेंतील उत्पादन चालू असतें त्या अर्थव्यवस्थेच्या कारभाराचें विवरण करतांना लोकांची मनोरचना व अर्थव्यवहारावर तिचे होणारे परिणाम ह्यांचा विचार केला तरच अर्थव्यवस्थेंतील गतिमानतेची आणि त्या गतिमानतेचा आविष्कार ज्या स्वरूपांत होतो त्या स्वरूपाची संगति लागते. चलन-परिमिति सिद्धान्तांत हा विचार अंतर्भूत नाहीं. आधुनिक मीमांसेंत भावमानांतील फेरबदलांची सांगड प्रामुख्यानें शिल्लक व भांडवलगुंतवण ह्या बाबतच्या व्यक्तींनीं घेतलेल्या निर्णयाशीं घालून दिल्यामुळें हा विचार त्यांत निश्चितपणें अंतर्भूत आहे. (२) चलन-परिमिति सिद्धान्तासाठीं पूर्ण रोजगार आहे असें गृहीत धरणें आवश्यक आहे. हें गृहीत-कृत्य वास्तवतेला सोडून आहे हें सांगणें नकोच. पूर्ण रोजगार गृहीत धरल्यामुळें प्रभावी मागणी कमी-जास्त होण्याचे परिणाम संपूर्णतया भावमाना-वर न होतां अंशतः समस्त उत्पादनावर होतात, ह्या गोष्टीकडे त्या सिद्धान्ताचें दुर्लक्ष झालें आहे. साहजिकच चलन-परिमितींत फेरबदल होत असतां भावमानांतील फेरबदल सर्व काळीं सारखे नसतात. ह्या घटनेचा खुलासा चलन-परिमिति सिद्धान्तांत आढळत नाहीं. तो आधुनिक मीमांसेंत आढळतो. (३) चलन-परिमिति-सिद्धान्त सर्व-साधारण भावमानाशींच संबंधित आहे. पण जेव्हां किंमतीमानांत फेरफार होतात. तेव्हां सर्वच वस्तूंच्या किंमती समप्रमाणांत बदलत नाहींत. ही गोष्ट अतिशय महत्त्वाची आहे. सर्व वस्तूंच्या व घटकांच्या किंमती समप्रमाणांत बदलल्या असत्या तर भावमानांतील फेरबदल त्रासदायक ठरले नसते. भावमानांतील फेरबदल समप्रमाणांत होत नाहींत, ही गोष्ट विशेष महत्त्वाची असल्यामुळें तिचा खुलासा होणें अत्यावश्यक आहे. चलन-परिमिति सिद्धान्तांत तो होत नाहीं. आधुनिक मीमांसेंत तो होतो. हा भेद लक्षांत घेतला पाहिजे. सारांश, भावमानांतील—म्हणजेच चलनमूल्यांतील फेरबदलांच्या आधुनिक मीमांसेंत अनावश्यक व अवास्तविक गृहीत-कृत्यांना स्थान नाहीं, भावमानांतील फेरबदलांचा अधिक वास्तवतापूर्ण व परिपूर्ण खुलासा तींत आहे, अर्थव्यवस्थेंतील गतिमान प्रवाहांची गतिमानता कशाचा परिणाम आहे, ह्याचें समग्र व सुसंगत विवेचन तींत असल्यामुळें चलन-परिमिति सिद्धान्तासारखी ती मीमांसा यांत्रिक व तांत्रिक नाहीं आणि म्हणून आर्थिक वास्तवतेचें आकलन होण्याच्या दृष्टीनें ती अधिक उपयुक्त आहे. ह्या शब्दांत किंमतीमानांतील फेरबदलांच्या आधुनिक मीमांसेचें गुणवर्णन करतां येईल.[५०]

भावफुगवण

अतिचलन-विस्तार किंवा भाव फुगवणीची प्रक्रिया :—वरील विवेचनाच्या आधारें १९३९ नंतरच्या काळांत अतिपरिचित झालेल्या एका चलनक्षेत्रीय घटनेची मीमांसा करतां येण्याजोगी आहे. ती घटना म्हणजे भावफुगवण ही होय.[५१] चलनविस्तारामुळें भावमान सतत वाढत गेल्यास जी परिस्थिति निर्माण होते तिला उद्देशून **भावफुगवण** (Inflation) असें म्हणण्यास हरकत नाहीं. भावफुगवणीला जेव्हां चलनविस्तार कारणीभूत होतो तेव्हां चलनविस्तार अति झाला किंवा चलनफुगवण होऊं लागली असें म्हणतां येईल. भावफुगवणीच्या उलट प्रक्रिया म्हणजे **भावघसरण** (Deflation) होय. भावघसरणीचा संबंध अतिचलनसंकोचाशीं असतो. भावफुगवणीची तीन वैशिष्टचें सांगण्यांत येतात. पहिलें वैशिष्टच असें कीं, सर्वसाधारण भावमानांत सातत्यानें वाढ होत असते. दुसरें वैशिष्टच असें कीं, प्रचलित भावमान असतां समस्त उत्पादनासाठीं जी मागणी येते ती भागविणें अशक्य होण्याची परिस्थिति उद्भवल्यामुळें—निराळ्या शब्दांत, प्रचलित किंमतीमान लक्षात घेतां समस्त उत्पादनाची जी एकूण किंमत असेल तिच्यापेक्षां समस्त खर्च अधिक होत असल्या-मुळें—सुरुवातीस होणारी भावमानांतील वाढ उद्भवलेली असते आणि तिसरें वैशिष्टच असें कीं, भावमानांत प्रथम होणारी वाढच त्यानंतरच्या वाढीला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कारणीभूत होत असते.[५२]

अप्रकट व प्रकट भावफुगवण :—जेव्हां भाववाढ प्रकटपणें दिसत नाहीं; पण आर्थिक परीस्थितीमध्यें भाववाढीचीं बीजें असल्याचें इतर कांहीं घटनांमुळें उमजून येतें तेव्हां त्या परिस्थितीला उद्देशून **अप्रकट भाव-**

---

[५०] It dispenses with unrealistically restrictive assumptions, it brings explicitly into an integrated theoretical structure the causes of variations in the various variables in the economy; it gives a more realistic and fairly complete account of variations in the price levels; and it explains why while general price levels are undergoing a change all individual prices do not change in the same proportion. In short, price changes are better explained by the Saving—Investment theory than by traditional quantity theory.

[५१] Inflation consists of a process of rising prices—**Day**.

[५२] There are three features of inflation—It is a process of rising prices. It is initiated by some change which makes it impossible to satisfy the whole of the demand which is forth coming at existing prices, so that initial price rise occurs, and it is propagated by the reactings to the initial price rise so that further price rises are induced—**Day**.

फुगवण (Suppressed or repressed Inflation) असें म्हणतात.[५३] अशा परिस्थितींत विविध प्रकारच्या नियंत्रणांमुळें भाववाढ होण्याची प्रक्रिया दबलेली असते. त्यामुळें प्रकटपणें भाववाढ होत नाहीं. परंतु ह्या परिस्थितीचें वैशिष्टय असें कीं, ज्या योगें भावी काळांत सातत्यानें भाववाढ होत राहावी असे प्रवाह तींत बलशाली होत असतात आणि नियंत्रणें काढलीं गेलीं, सैल झालीं कीं, ते प्रवाह आपलें कार्य वेगानें करूं लागतात आणि भावफुगवणीला प्रकट स्वरूप प्राप्त होतें. कित्येक वेळां **भाववाढकारी प्रवाह** इतके सामर्थ्यवान असतात कीं, नियंत्रणांना लौकरच ते निष्प्रभ करून टाकतात. आणि नियंत्रणें असूनहि भाववाढ होऊं लागते. हा भाग सोडला तर सामान्यतः असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, भाववाढकारी प्रवाहांचें अस्तित्व अर्थव्यवस्थेंत जाणवत असूनहि नियंत्रणामुळें भाववाढ थोपवली गेली असेल तर त्या परिस्थितीचें अप्रकट भावफुगवण असें वर्णन करावयास हरकत नाहीं. ह्या परिस्थितींत उत्पादनाकरितां जी मागणी असते ती अंशतः दाबलेली असते, आणि त्यामुळें भावमानावर तिचा परिणाम दिसून येत नाहीं. ह्या परिस्थितीचें अधिक नेमकें वर्णन करावयाचें असेल तर एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी कीं, सर्वसामान्यपणें, नियंत्रणांचा उद्देश कोणत्याच वस्तूची किंमत वाढूं नये असा नसतो. तसा तो कां नसावा, हें सहज समजण्याजोगे आहे. एकतर सर्वच बाजारपेठांवर नियंत्रण लादणें अव्यवहार्य असतें आणि दुसरें म्हणजे कांहीं वस्तूंच्या उदाहरणार्थ, चैनीच्या वस्तूंच्या--किंमती वाढल्या तरी फारसें बिघडत नाहीं. त्यामुळें विशिष्ट वस्तूंकरितां असलेल्या मागणीचा ओघ दुसऱ्या वस्तूकडे वळावा असाच नियंत्रणाचा उद्देश असतो. आवश्यक म्हणजे स्थूलमानानें सामान्य जनांच्या राहणीमानांत समाविष्ट होणाऱ्या वस्तूंचे किंवा **वेतनवस्तूंचे** (Wage Goods) भाव नियंत्रण करणें हा नियंत्रणनीतीचा उद्देश असतो. हें लक्षांत घेऊन असें म्हणतां येईल कीं, विलासवस्तूंचे भाव वाढणें हें भावफुगवणीशीं विसंगत नाहीं. तेव्हां महत्त्वाच्या वस्तूंचे भाव वाढतील असे प्रवाह अर्थव्यवस्थेंत असूनहि

[५३] An inflation can be termed open or repressed according to the Government's reactions to the presence of inflationary pressures in the economy. If the Government decides on a hands off policy and relies primarily on the price mechanism to ration and distribute goods and services, we have an open inflation, If on the other hand, Government interferes with the working of rationing and distributive functions of price system through controls, we have a repressed inflation. Repressed inflation implies two necessary conditions (i) Excessive monetary demand and (ii) Legal actions prohibiting the demand from exerting its influence on the prices in both the factor and the goods market--**Charleswoth.**

केवळ नियंत्रणामुळें त्यांचे भाव काबूंत ठेवण्यांत आले आहेत. आशा स्थितीला सुद्धां अप्रकट भावफुगवण म्हणावयास हरकत नाहीं. एका अर्थानें अप्रकट भावफुगवण प्रकट भावफुगवणीपेक्षां (Open Inflation) गंभीर स्वरूपाची असते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण कृत्रिम रीत्या दबलेली मागणी जेव्हां स्वैर सोडण्यांत येतें तेव्हां ती एकदम उफाळून वर येते. त्यामुळें आवश्यक वस्तूंचे भाव फारच कडाडतात आणि परिस्थिति आवरतां आवरतां पुरेवाट होते.[५४]

भावफुगवणीची सुरुवात :—चालू उत्पादनासाठीं असणारी प्रभावी मागणी वाढत असते; पण उत्पादनांत वाढ होणें शक्य होत नाहीं, अशा परिस्थितीला भावफुगवण म्हणत असल्यामुळें ती ज्या कारणामुळें उद्‌भवते त्या कारणांतच भावफुगवणीचें मूळ असतें म्हणणें चूक होणार नाहीं. उत्पादन सतत कमी होत असल्यामुळें किंवा प्रभावी मागणी सतत वाढत असल्यामुळें समस्त उत्पादनापेक्षां समस्त मागणी अधिक अशी स्थिति निर्माण होत असल्यामुळें असें म्हणावयासहि हरकत नाहीं कीं, ज्या कारणामुळें समस्त मागणी सतत वाढते किंवा समस्त उत्पादन कमी होत जातें तींच भावफुगवणीचीं कारणें होत.[५५]

भांडवल-गुंतवण बाजवीपेक्षां अधिक होणें हें भावफुगवणीचें कारण :— वरील दोन्हीपैकीं समस्त मागणी समस्त पुरवठ्याच्या—म्हणजे समस्त उत्पादनाच्या —तुलनेनें वाढत जाणें हें कारण भावफुगवणीच्या मुळाशीं असल्याचें बहुधा आढळून येतें. समस्त मागणी वाढत जाण्यास सामान्यपणें वाढती भांडवल-गुंतवण कारणीभूत होते. मग ही भांडवल-गुंतवण भांडवलाची फलक्षमता वाढल्यामुळें खाजगी

[५४] Suppressed inflation is a situation in which controls are used to prevent price rise at the present time, but which are piling up forces that will increase inflationary pressure in the future. In this situation the effect of controls is that expenditure on currently produced output is postponed. In practice, however, it is more appropriate to apply the term suppressed inflation to the situation in which price rises occur but are limited to luxury goods. This is so because it is useful to measure inflation simply in terms of the prices of commodities in general demand (as by a cost of living index). Suppressed inflation may lead to serious open inflation if the controls are removed too precipitately or become ineffective.

[५५] An excess of demand over available supply may result from either a rise in effective demand or a reduction in available supply. There are therefore, two ways in which an inflationary situation may be initiated. They are changes in demand conditions and changes in supply conditions.

उद्योगपतींनीं केलेली असो किंवा विशिष्ट हेतूनें प्रवृत्त होऊन सरकारनें केलेली असो, वाढती भांडवलगुंतवण पूर्ण रोजगाराची स्थिति प्रस्थापित होईपर्यंत सहसा भाववृद्धिकारक ठरत नाहीं आणि ठरलीच तरी तोंपर्यंत होणारी भाववृद्धि भांडवल-गुंतवणीच्या मानानें बेताची असते हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्यानंतर मात्र खऱ्या अर्थानें भावफुगवणीची परिस्थिति उद्‌भवते. योजलेली भांडवल-गुंतवण योजलेल्या शिलकीपेक्षां अधिक झाल्यास, मग त्या भांडवल-गुंतवणीसाठीं जबाबदार कोणीहि असो, समस्त मागणी समस्त पुरवठ्यापेक्षां अधिक होऊन भावफुगवण होते असें थोडक्यांत म्हणावयास हरकत नाहीं. मागणी तेवढीच राहून पुरवठा कमी होत जाण्याचा प्रकार सहसा आढळत नाहीं. पण कामगारांची संख्या किंवा त्यांचें वेतन कमी न होतां त्यांची उत्पादनक्षमता घटूं लागल्यास किंवा त्यांनीं पूर्वींइतकें काम करावयाचेंच नाकारल्यास पुरवठा कमी होत असल्याचा प्रकार दिसून येईल. पण सर्वसाधारणपणें भावफुगवणीकाळांत पुरवठा वाढत आहे. पण त्यापेक्षां तुलनेनें समस्त मागणी वाढत आहे असें दिसून येते. आणि असें दिसून येणें हा अतिभांडवल-गुंतवणीचा परिणाम असल्यामुळें अतिभांडवल-गुंतवण हें भावफुगवणीचें कारण असतें असें म्हटल्यास बिघडणार नाहीं.

भावफुगवणीबाबत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती अशी कीं, प्रथम होणाऱ्या भावमानवृद्धींतून पुढें होणारी भाववृद्धि उद्‌भवते. तसें होण्याची कारणमीमांसा पुढीलप्रमाणें सांगता येईल. भाववृद्धि झाल्यास उपभोक्त्यांना, उत्पादकांना किंवा सरकारला असें आढळून येतें कीं, पूर्वीएवढा खर्च करून पूर्वींइतकें वस्तुप्रमाण आपल्याला मिळूं शकत नाहीं. त्यामुळें एक तर ते आपला **चलनरूप-खर्च** (Money Expenditure) वाढवतात आणि तें शक्य व्हावें म्हणून आपलें **चलनरूप उत्पन्न** (Money Income) वाढवण्याचा प्रयत्न करतात. अशा स्वरूपाच्या प्रयत्नांचा परिणाम साहजिकच समस्त खर्च वाढण्यांत आणि त्यामुळें भावमानाची आणखी वाढ होण्यांत झाल्यावांचून राहात नाहीं. अशा प्रकारें प्रथम कोणत्याहि कारणामुळें समस्त खर्च वाढून भाववृद्धि झाली कीं, खर्च वाढला म्हणून भावमान वाढलें आणि भावमान वाढलें म्हणून खर्च वाढला असें दुष्ट चक्र एकदां फिरूं लागलें कीं थांबतां थांबत नाहीं. भाववृद्धि ही जेव्हां होत असते तेव्हां भांडवलाची सीमान्त-फलक्षमताहि वाढत असते. त्यामुळें भांडवल-गुंतवणाची कमानहि वाढतीच असते. त्यामुळें भावफुगवणीची परिस्थिति बिघडण्यास मदत होते.

: ४ :

चलनमूल्य-मापन
(INDEX NUMBERS)

निर्देशांक (Index Numbers) :—चलनमूल्य-मापनासाठीं किंवा अधिक कटाक्षानें बोलावयाचें झाल्यास चलनमूल्यांत किंवा भावमानांत होणाऱ्या फेरफारांची दिशा व प्रमाण अजमावण्यासाठीं निर्देशांक ह्या साधनाचा उपयोग अर्थशास्त्रांत करण्यांत येतो. निर्देशांक ही संख्याशास्त्राकडून अर्थशास्त्राला मिळालेली देणगी आहे. कोणत्याहि **परिवर्तनशील प्रवाहांत** (Variable) झालेला तौलनिक फेरफार निर्देशांकानें व्यक्त होतो.[1] निर्देशांकांत कोणत्याहि बदलत्या गोष्टीची एक स्थिति व दुसरी स्थिति ह्यांची तुलना असते. ह्या तुलनेंत जिच्याशीं तुलना केली असेल त्या स्थितीला निर्देशाकांचें मूळ (Base) मानण्यांत येतें व ती स्थिति संख्याशास्त्रांतील नियमानुसार १०० ह्या निर्देशांकानें सूचित केली जाते. मूळ स्थितीशीं ज्या स्थितीची तुलना करावयाची असेल ती स्थिति सुचविणारा निर्देशांक काढला कीं, मूळ स्थितीपासून झालेला फरक निश्चित समजतो. तात्त्विक विवेचन उदाहरणानें अधिक स्पष्ट होईल. समजा, १९४७ मधील भारतांतील एकंदर उत्पादन व १९५७ मधील उत्पादन ह्यांची तुलना करून स्वातंत्र्योत्तर दहा वर्षांत उत्पादन कोणत्या दिशेनें व कोणत्या प्रमाणांत बदललें हें अजमावयाचें आहे. त्यासाठीं प्रथम १९४७ चें उत्पादन १०० ह्या निर्देशांकानें सूचित केलें जातें. नंतर १९५७ चा निर्देशांक काढला जातो. समजा, तो १२५ ठरला; तर घेतलेल्या मुदतींत भारतांतील उत्पादन २५ टक्क्यांनीं वाढलें असें म्हणतां येतें.

विविध प्रकारचे निर्देशांक :—अर्थव्यवस्थेंतील विविध गतिमान प्रवाहांतील फेरफार अजमाविण्यासाठीं विविध प्रकारचे निर्देशांक वापरले जातात. त्यांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल. (१) **भाव-निर्देशांक** (Price Index), (२) **परिमिति-निर्देशांक** (Quantity Index) आणि (३) **मूल्य निर्देशांक** (Value Index) ह्यांतील तिसऱ्या प्रकारचे निर्देशांक प्रामुख्यानें राष्ट्रीय उत्पन्न, राष्ट्रीय खर्च, एकंदर निर्यात-मूल्य; एकंदर आयात-मूल्य म्हणजे थोडक्यांत जेथें समस्त मूल्याचा विचार करावयाचा असतो त्या गोष्टींतील फेरफारांचें मापन करण्यासाठीं वापरले जातात. दुसऱ्या प्रकारचे निर्देशांक उत्पादन, रोजगार—ज्यांच्या प्रमाणांत बदल होत असतो—अशांसारख्या गोष्टींतील फेरफार अजमाविण्याकरितां केला जातो. पहिल्या प्रकारचे निर्देशांक प्रस्तुत प्रकरणाच्या दृष्टीनें महत्त्वाचे आहेत. कारण चलनमूल्यांतील फेरफार ही भावमानांतील फेरफारांची उलट बाजू असल्यानें **चलनमूल्य-मापनासाठीं भाव-निर्देशांकाचा उपयोग केला जाणें स्वाभाविक आहे.**

[1] Index numbers express the relative changes in a variable compared with some base which is taken as 100.

भाव-निर्देशांकाची आवश्यकता भासते कारण जेव्हां बाजारभावांत फेरफार होतात तेव्हां ते समप्रमाणांत होत नाहींत. तसें ते झाले असते तर झालेला बदल कोणच्या दिशेनें झाला आहे व किती प्रमाणांत झाला आहे हें ठरविणें अवघड झालें नसतें; पण बाजार भावांत होणारे बदल विविध वस्तूंच्या बाबतींत भिन्न भिन्न प्रमाणांत होतात. क्वचितप्रसंगीं कांहीं वस्तूंचे भाव वाढतात तर कांहीं वस्तूंचे भाव कमी होतात. अशा वेळीं सर्व वस्तूंच्या भावांत होणारे फेरफार एकाच आंकड्यानें दर्शवतां आले तर त्यांत किती सोय होते ह्याचें वर्णन करून सांगण्याची गरज आहे असें नाहीं. अशी सोय भाव निर्देशांकानें होते, हे त्याचें महत्त्व होय.[२]

भाव-निर्देशांकांचेहि विविध प्रकार आहेत. त्यामध्यें ठोक **भाव-निर्देशांक** (Wholesale Price Index), रहाणीमान निर्देशांक (Cost of living Index) आयात वस्तूंचा भाव निर्देशांक (Import Price Index), निर्यात वस्तूंचा भाव निर्देशांक (Export Price Index), उपभोग्य वस्तूंचा भाव निर्देशांक (Consumer Price Index), उत्पादन वस्तूंचा भाव निर्देशांक (Producer Price Index) असे अनेक प्रकार सांगतां येतील व सोयीप्रमाणें आणि जरुरीप्रमाणें नवीन प्रकार काढतां येतील. ह्या सर्व निर्देशांकांपैकीं ठोक किंमत निर्देशांक हा सर्वसाधारण महत्त्वाचा समजला जातो व चलनमूल्यांतील फेरफार अजमावण्याकरितां प्रामुख्यानें वापरला जातो. कीन्स ह्यांच्या मतें उपभोग्य वस्तूंचा ठोक किंमतीचा निर्देशांक हा '**सर्वप्रमुख निर्देशांक**' आहे. ह्या मताचें समर्थन असें करतां येईल कीं, देशांतील महत्त्वाच्या उपभोग वस्तूंच्या बाजारभावाबद्दल सर्वांनाच आस्था असते. म्हणून त्या निर्देशांकाला सर्वसाधारण भाव-निर्देशांक असें यथार्थपणें म्हणतां येईल. तेव्हां तो निर्देशांक स्थिर राहिला तर चलन-मूल्य स्थिर झालें असें म्हणण्यास हरकत नसते.

निर्देशांक तयार करण्यांतील महत्त्वाच्या गोष्टी :—भाव निर्देशांक तयार करतांना कोणत्या बाबतींत अवधान राखलें पाहिजे, ह्याचें विवेचन मुख्यतः ह्या प्रकरणांत करावयाचें आहे. ह्या प्रकरणांतील विवेचन भाव निर्देशांकापुरतेंच मर्यादित असलें, तरी त्यांत सांगितलेले नियम कोणत्याहि प्रकारच्या निर्देशांकाला लागू पडतात, असें म्हणावयास हरकत नाहीं.

---

[२] Practically prices never do move in perfect union. Their dispersion would render impossible the statistical study of general price movements were there no practical method of indicating the general movement. A simple figure indicating the general trend of thousands of prices is a great statistical convenience. Such an indication is called an Index No. of the price level. Its reciprocal indicates, of course, the purchasing power of money—**Fisher.**

मूळ वर्षाची निवड :—भाव-निर्देशांक तयार करण्याच्या पद्धतीचे तीन टप्पे पडतात. **मूळ वर्ष निवडणें हा पहिला टप्पा.** मूळ वर्ष (Base Year) निवडतांना पुढील नियम पाळावे लागतात. (१) **मूळ वर्ष** हें बाजारभावाच्या दृष्टीनें **सर्वसामान्य** (Normal) **वर्ष असावें.** मूळ वर्षांतील बाजारभाव फार खालीं गेलेले किंवा फार वर चढलेले असले तर त्या वर्षाच्या बाजारभावाशीं तुलना केल्यास इतर वर्षाबाबत योग्य कल्पना येऊं शकणार नाहीं हें उघड आहे. मूळ वर्ष **अपवादात्मक** वर्ष **नसावें** हें केव्हांहि चांगलें. (२) मूळ वर्ष फार लांबचें असणें योग्य नाहीं. निर्देशांकाचा उपयोग होण्याच्या दृष्टीनें फार पूर्वीचें वर्ष असण्यांत अर्थ नसतो. उदाहरणार्थ, १८५७ मधील बाजारभावांशीं १९५७ मधल्या बाजारभावांची तुलना करण्यांत आणि तेव्हांच्या मानानें रुपयाचें मूल्य चढलें किंवा पडलें असें दाखविण्यांत अर्थ नाहीं. त्यांतून कांहीं सिद्ध झालें तरी त्याचा कांहीं उपयोगहि नाहीं. तेंच १९४७ ची किंवा १९३७ चीहि १९५७ च्या बाजारभावाशीं तुलना केल्यास वाचणाऱ्याला तिच्यापासून बोध होईल, कांहीं उपयोग होईल अशी ती तुलना असते. नजिकच्या काळांतील कांहीं महत्त्वाच्या घटनांचा बाजारभावावर काय परिणाम झाला आहे हें त्या तुलनेमुळें समजूं शकतें. तेव्हां मूळ वर्ष शक्य तो नजिकचेंच असावें. अर्थात् मूळ वर्षाची निवड कांहींशीं निर्देशांक तयार करण्याच्या हेतूवर अवलंबून राहणें अपरिहार्य आहे. दुसऱ्या महायुद्धाचे बाजारभावावर झालेले परिणाम अजमावयाचे असतील तर १९३९ ह्या वर्षाची निवडच मूळ वर्ष म्हणून योग्य ठरेल. मूळ वर्ष नजीकचें असणें इष्ट असल्यामुळें दर दहापंधरा वर्षांनीं मूळ वर्ष बदलावें लागतें. मूळ वर्षाच्या बाबतींत अशीहि सूचना करण्यांत आली आहे कीं, प्रत्येक वर्षाच्या निर्देशांकासाठीं मागील वर्षास मूळ वर्ष म्हणून धरलें जावें. ह्या पद्धतीनें निर्देशांकांची एक सांखळी तयार होऊं शकेल व त्यामुळें बदलत्या किंमतीमानाची कल्पना अधिक चांगल्या प्रकारें मिळेल.[3]

(३) मूळ वर्षासंबंधीं जरूर ती माहिती उपलब्ध असली पाहिजे आणि ती खात्रीची असली पाहिजे. मूळ वर्षासंबंधीं माहितीच मिळाली नाहीं तर त्या वर्षाचा कांहीं उपयोग नाहीं हें स्पष्ट आहे. नजीकचें मूळ वर्ष असणें ह्याहि दृष्टीनें सोईचें असतें.

(४) विविध प्रकारच्या निर्देशांकांचें मूळ वर्ष एकच असणें तुलना करण्याच्या दृष्टीनें सोयीचें होतें. उदाहरणार्थ, १९५१ हेंच उत्पादन निर्देशांकांचें मूळ वर्ष असेल तर भारतांत नियोजन सुरू झाल्यापासून भावांत काय फरक पडला व उत्पादनांत काय फरक पडला हें स्वतंत्रपणें तर अजमावतां येईलच; पण त्याशिवाय उत्पादन व भावमान ह्यांचा परस्पर संबंधहि प्रस्थापित करण्यास मदत होईल. शिरगणतीच्या वेळीं विविध प्रकारची माहिती जमविली

[3] Instead of employing a fixed base year—each year may be taken as the base for the succeeding year. Thus we obtain a chain of Index No.—**Fisher**.

जात असल्यामुळें शिरगणतीचें वर्ष मूळ वर्ष म्हणून निवडतां आल्यास विशेषच चांगलें असतें.

(५) अलीकडे एखादें वर्ष मूळ म्हणून निवडण्याऐवजीं दोन, चार, पांच वर्षांचा कालखंड मूळ काळ म्हणून निवडणें योग्य समजलें जातें. त्यामुळें पहिला नियम अधिक कसोशीनें पाळला जातो. साधारण स्वरूपाचें एखादें वर्ष मिळण्यापेक्षां चार-पांच वर्षांचा कालखंड घेतला तर एखाद्या वर्षांत कळत किंवा नकळत शिरणाऱ्या अनियमित गोष्टींचा परिणाम बाजूस करतां येईल.

वस्तूंची निवड :—वस्तूंची निवड हा भाव निर्देशांक तयार करण्यांतील दुसरा टप्पा. वस्तूंची निवड करतांना किती वस्तु निवडाव्या आणि कोणत्या वस्तु निवडाव्या हें ठरवावें लागतें. तीन गोष्टी विचारांत घेऊन तें ठरवावें लागतें. निर्देशांक तयार करण्याचा हेतु ही त्यांतील पहिली गोष्ट. निर्देशांक ज्या हेतूनें तयार केला जातो त्या हेतूला पोषक अशा वस्तु निवडणें इष्ट असतें. उदाहरणार्थ, कामगारांचा राहणीमानदर्शक निर्देशांक तयार करावयाचा असेल तर कामगारांच्या खर्चाच्या आराखड्यांत समाविष्ट होणाऱ्या सर्व वस्तु निर्देशांकासाठीं घ्याव्या लागतील. सर्वसाधारण भावमानाचा निर्देशांक तयार करतांना महत्त्वाच्या सर्व उपभोग्य वस्तु विचारांत घ्याव्या लागतील. विशिष्ट भौगोलिक विभागासाठीं जेव्हां निर्देशांक तयार केले जातात तेव्हां त्या विभागांत प्रामुख्यानें खपणाऱ्या वस्तूच निर्देशांकांत घ्याव्या लागतील. आयातीचा किंवा निर्यातीचा निर्देशांक करतांना आन्तरराष्ट्रीय व्यापारांत ज्यांना स्थान प्राप्त होतें अशाच प्रातिनिधिक गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील. वस्तु ठरवितांना उपलब्ध माहिती (Data) ही दुसरी गोष्ट विचारांत घ्यावी लागते. निर्देशांक थोडासा अप्रातिनिधिक झाला तरी चालेल. पण कोणत्याहि परिस्थितींत तो चूक व चुकीचें मार्गदर्शन करणारा असूं नये. ह्या दृष्टीनें ज्या वस्तूंबाबत निश्चित व खात्रीलायक अशी माहिती गोळा होत असेल अशाच वस्तु निर्देशांकांत दाखल करणें इष्ट आहे. वस्तूंच्या निवडीबाबत तिसरी लक्षांत घ्यावयाची गोष्ट ही कीं, निवडलेल्या वस्तु संपूर्णपणें प्रातिनिधिक असाव्यात.[४] वस्तूंची निवड प्रातिनिधिक ठरावी म्हणून प्रथम सर्व वस्तु घेऊन त्यांचे छोटे छोटे विभाग पाडले जातात आणि मग त्यांतील महत्त्वाच्या वस्तु घेतल्या जातात. उदाहरणार्थ, कामगारांचा कांहीं खर्च जळणावर, कांहीं कापडावर होतो. तेव्हां कामगार राहणीमान-निर्देशांक तयार करतांना विविध प्रकारच्या कपड्यांचे व विविध प्रकारच्या जळणाचे स्वतंत्र गट होतात. त्या त्या गटांतील सर्व वस्तु घेतल्या तर निर्देशांक तयार करण्याचें काम फारच किचकट होईल आणि तें पार पाडलें तरी त्यांतून विशेष कांहीं निष्पन्न होईल असें नाहीं.

[४] Price and other data must provide a representative sample.

तेव्हां निवडक व प्रातिनिधिक वस्तूंवरच लक्ष केंद्रित करणें चांगलें. निवडलेल्या वस्तु खरोखरच प्रातिनिधिक आहेत अशी पक्की खात्री मात्र करून घेतली पाहिजे. नाहींतर निर्देशांकाला अगदीं विकृत स्वरूप प्राप्त होईल. **प्रातिनिधिक वस्तूंची निवड करणें हा अतिशय महत्त्वाचा टप्पा आहे.** त्यांत चूक झाली तर मूळ हेतु एक आणि निर्देशांक दाखवितो भलतेंच अशी स्थिति व्हावयाची.[५] **सर्वसाधारण निर्देशांक** (General Index No.) म्हणून ज्याला संबोधिले जातें तो करतांना विशिष्ट वर्गांवर बदलत्या भावमानाचा काय परिणाम होतो हें ठरविणें हा हेतू नसतो. तर एकंदरीनें चलनमूल्यांत काय फेरफार होतात हें अजमावण्याचा उद्देश असतो. तेव्हां निर्देशांकासाठीं पैशाचा उपयोग करून खरेदी केल्या जाणाऱ्या सर्व निदान शक्य तेवढ्या अधिक वस्तू व कामगिऱ्यांचा अंतर्भाव निर्देशांकांत करणें चांगले.[६]

भारान्वित निर्देशांक :—**साधा निर्देशांक** (Simple Index Numbers) तयार करावयाचा असेल तर निवडक वस्तु त्यांत अंतर्भूत होतील एवढी दक्षता पुरते. पण **भारान्वित निर्देशांक** (Weighted Index Number) तयार करावयाचा झाल्यास प्रत्येक वस्तूचा त्या निर्देशांकावर किती भार पडतो हें ठरवावें लागतें. निराळ्या शब्दांत, प्रत्येक वस्तूचा **भार** (Weight) किंवा तिचें तौलनिक महत्त्व निश्चित करावें लागतें. सर्व वस्तु सारख्या महत्त्वाच्या नसल्यानें **साध्या निर्देशांकापेक्षां भारान्वित निर्देशांक अधिक महत्त्वाचा** समजला जातो. भारान्वित निर्देशांकांत प्रत्येक वस्तूला भारदर्शक आंकडा दिला जातो व तेवढ्या वेळां त्या वस्तूचा भावमान-निर्देशांकांत अंतर्भाव केला जातो—म्हणजेच त्या वस्तूच्या बाजारभावांतील फेरफार दर्शविणाऱ्या आंकड्यास भारदर्शक आकड्यानें गुणिलें जातें. अशा प्रकारें भारान्वित झालेला निर्देशांक अधिक समाधानकारक असतो. कारण प्रत्येक वस्तूच्या बाजारभावांतील फेरफार सारख्याच प्रमाणांत लोकांना जाणवत नाहीं. तो निरनिराळ्या प्रमाणांत जाणवतो. साध्या निर्देशांकांत ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें. उदाहरणार्थ, ट्रामचें भाडें दुप्पट झालें आणि अन्नवस्तूंच्या किंमती दुप्पट झाल्या, तर मुंबईच्या कामगारांच्या दृष्टीनें ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या असें म्हणतां यावयाचें नाहीं. अन्नधान्याच्या वाढलेल्या किंमती विशेष जाणवतील. साध्या निर्देशांकांत दोहोंसाठीं २०० हाच आंकडा येईल आणि त्यामुळें निर्देशांकांत दोहोंना सारखेंच महत्त्व दिल्यासारखें होईल.

[५] In any case the proper selection of a representative cross-section of items is the most crucial step in the entire process. Many 'Indexes' fail in this respect—They just don't measure what they purport to represent.

[६] A single series of Index Numbers including articles used and purchased by all classes and including also services would be advisable—**Fisher.**

पण अन्नवस्तूवरील खर्च ट्रामवरील खर्चाच्या दहापट असेल तर ही गोष्ट विचारांत घेऊन ट्रामचें वाढलेलें भाडें २००० ह्या आंकड्यानें सूचित झालें तर भारान्वित निर्देशांकांत अन्नवस्तु दहा वेळां घेतल्या जाऊन शेवटच्या हिशेबांत त्यांच्या नांवें २०० आंकडा येईल. भारान्वित निर्देशांक अधिक समाधानकारक असल्यानें तसेंच निर्देशांक अलीकडे तयार केले जातात.

भार ठरवण्याचा टप्पा :––भारान्वित निर्देशांक काढावयाचा असल्यास निर्देशांकांत अंतर्भूत होणाऱ्या प्रत्येक वस्तूचा भार ठरविणें हा निर्देशांक **तयार करण्यांतील तिसरा टप्पा होतो**. भारान्वित निर्देशांकासाठीं प्रत्येक वस्तूचें वजन ठरवावें लागतें. त्यांतहि बरीच दक्षता घ्यावी लागते. कारण चुकीच्या वस्तु निवडल्यामुळें ज्याप्रमाणें निर्देशांक विकृत होतो त्याचप्रमाणें चुकीचे भार ठरविल्यामुळेंहि तो तसा होण्याचा धोका असतो. प्रत्येक वस्तूवर होणाऱ्या खर्चाचें एकूण खर्चाशीं जें प्रमाण असेल तें त्या वस्तूचा भार म्हणून समजलें जातें. उदाहरणार्थ, एखाद्या वस्तूवर पांच टक्के व दुसऱ्या वस्तूंवर पन्नास टक्के खर्च होत असेल तर पहिल्या वस्तूचा भार पांच व दुसऱ्या वस्तूचा भार पन्नास होईल. सर्व वस्तूंचा मिळून भार शंभर होईल हें उघड आहे. भार ठरविण्याची पद्धति गणितदृष्टचा सोपी असली तरी त्या पद्धतीप्रमाणें निर्देशांक करणाऱ्यावरील जबाबदारी वाढते. भारान्वित निर्देशांक करण्यासाठीं वस्तूच्या किंमतीसंबंधीं माहिती पुरी होत नाहीं. विविध वस्तूंवर किती प्रमाणांत खर्च होतो, ह्या संबंधीं खात्रीलायक माहिती मिळवावी लागते. ही माहिती मिळविणें किती कठिण व कटकटीचें आहे हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. गतिमान अर्थव्यवस्थेंत वस्तूचा भारहि बदलत जातो, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पण मूळ वर्ष नजिकचें घेण्याची खबरदारी घतली तर त्या वर्षांतील भार प्रमाणभूत धरण्यास हरकत नाहीं. भार चुकीचे दिले गेले तर कांहीं वस्तूंच्या किंमतीला वाजवीपेक्षां बरेंच अधिक तर कांहीं वस्तूंच्या किंमतींतील फेरफारांना वाजवीपेक्षां बरेंच कमी महत्त्व दिलें जाण्याचा धोका असतो हें सदैव लक्षांत ठेविलें पाहिजे.[७]

शेवटचा टप्पा :—मूळ वर्षाची निवड, वस्तूची निवड व प्रत्येक वस्तूला द्यावयाचा भारासंबंधीं निर्णय एवढ्या गोष्टी झाल्या कीं, निर्देशांक तयार करण्यांतला **शेवटचा टप्पाच** काय तो शिल्लक राहतो. हा टप्पा म्हणजे **प्रत्यक्ष निर्देशांक काढण्याचा.** प्रत्यक्ष निर्देशांक काढण्यापूर्वीं ज्या वस्तु निर्देशांकांत समाविष्ट केल्या असतील, त्या वस्तूंच्या ज्या वर्षाचा निर्देशांक हवा असेल त्या वर्षांतील किंमती मिळवाव्या लागतात. त्या किंमतीची मूळ वर्षांतील किंमतीशीं—मूळ वर्षांतील किंमतीची माहितीहि मिळविणें अर्थातच आवश्यक आहे––तुलना करून प्रत्येक वस्तूच्या

[७] The Index number tends to understate or overstate the degree of change because of the failure of the weights to represent accurately the relative importance of shifts in the items included.

किंमतींत किती प्रमाणांत व कोणत्या दिशेनें बदल झाला आहे हें दर्शविणारा प्रत्येक वस्तूचा स्वतंत्र निर्देशांक काढावा लागतो. मूळ वर्षांतील किमती शंभर ह्या आंकड्यानें व्यक्त केलेल्या असल्यामुळें प्रत्येक वस्तूची किंमत किती टक्क्यांनी कमी अगर अधिक झाली आहे, हें ठरविलें म्हणजे त्या त्या वस्तूचा निर्देशांक आपोआपच तयार होतो. उदाहरणार्थ, वस्तु 'अ'ची किंमत ३४ टक्क्यांनीं वाढली असेल तर तिचा निर्देशांक १३४ होतो. वस्तु 'ब'ची किमत ४२ टक्क्यांनीं कमी झाली असेल तर तिचा निर्देशांक ५८ होतो. अशा प्रकारें सर्व वस्तूंचे निर्देशांक स्वतंत्रपणें काढल्यानंतर त्यांची बेरीज करून त्यांना वस्तूंच्या संख्येनें भागिलें जातें. ह्या भागाकाराचें जें उत्तर येईल तोच सर्वसाधारण निर्देशांक. हा निर्देशांक वस्तूंच्या किंमतींत सरासरीनें झालेला बदल, त्या बदलाची दिशा व प्रमाण, दर्शवितो. ज्या किंमतीवर हा निर्देशांक आधारलेला असतो त्या किंमतीबाबत मिळालेली माहिती खात्रीलायक आहे हें पाहण्याची अतिशय आवश्यकता असते, हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. कारण खात्रीची माहिती मिळविणें व तिचाच उपयोग करणें ही निर्देशांक तयार करतांना पदोपदीं अगत्याची बाब ठरणारी आहे. त्या बाबतींत प्रत्येक ठिकाणीं दक्षता घेतली नाहीं तर शेवटीं ठरणारा निर्देशांक बेभरंवशाचें कूळ होतो.

निर्देशांकाचे उपयोग :—निर्देशांक काढण्याची पद्धत अलीकडे सर्वत्र वापरली जाते, ह्याचें कारण निर्देशांकपद्धतीच्या फायद्यांत आढळतें. निर्देशांकामुळें काळाच्या ओघांत होणाऱ्या घटनांचा तौलनिक अभ्यास करणें, तसेंच भिन्न भिन्न ठिकाणांच्या परिस्थितीची तुलना करणें सुलभ होतें.[८] अशा प्रकारचा तौलनिक अभ्यास सरकारचें आर्थिक धोरण ठरविण्यास अत्यंत उपयोगीं पडतो. उदाहरणार्थ, देशाची चलननीति ठरवावयाची असेल तर विविध प्रकारचे निर्देशांक पाहूनच ती ठरवितां येईल. किंमती कमी होतील अशी चलननीति ठरविणें किंमती वाढल्या आहेत. व त्या वाजवीपेक्षां अधिक प्रमाणांत वाढल्या आहेत हें निश्चित समजल्या-शिवाय शक्य आणि योग्य होणार नाहीं. धोरण ठरविण्याकरितां एकापेक्षां अधिक निर्देशांकाचाहि उपयोग करावा लागतो. उत्पादनाला पोषक असें किंमतीबाबतचें धोरण ठरवावयाचें असेल तर उत्पादन व किंमती ह्यांचा अन्योन्य संबंध काय हें पाहावें लागते. त्या प्रकारचा अभ्यास करण्यासाठीं उत्पादननिर्देशांक व किंमतीचा निर्देशांक ह्या दोहोंचाहि उपयोग होतो.

केवळ धोरण ठरविण्यासाठीं नव्हे तर ठरविलेलें धोरण यशस्वी होत आहे कीं नाहीं, हें निश्चित करण्यासाठींहि निर्देशांकाचाच उपयोग करणें इष्ट असतें. किंमतीच्या बाबतींत, उत्पादनाच्या बाबतींत अपेक्षित बदल होत आहे कीं नाहीं, हें निर्देशांकाचा उपयोग केल्यास चांगल्या प्रकारें समजूं शकतें.

[८] They provide a simple method of comparing changes from time to time or from place to place.

निर्देशांकांचा उपयोग करतांना दोन महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत. पहिली गोष्ट अशी कीं, जो निर्देशांक वापरावयाचा तो शास्त्रमान्य पद्धतीनें तयार केला आहे अशी खात्री झाल्यानंतरच वापरणें इष्ट असतें. **चुकीच्या माहितीवरून, चुकीच्या पद्धतीनें काढलेला निर्देशांक चुकीच्या धोरणास कारणीभूत होतो, हें विसरणें चूक होईल.** दुसरी गोष्ट अशी कीं, बरोबर असलेला निर्देशांकसुद्धां सरासरीचीच परिस्थिति दर्शवितो, हें माहीत असलें पाहिजे. सरासरीची परिस्थिति पाहून काढलेले कोणतेहि निष्कर्ष शेवटीं स्थूल मानानेंच खरे असतात. तपशिलाच्या बाबतींतहि ते बरोबर असतात, असें धरून चालणें योग्य होणार नाहीं.

मात्र स्थूल असल्यामुळें निर्देशांक उपयोगीं नसतातच अशी भूमिका घेणें योग्य ठरणार नाहीं. खुद्द कीन्स ह्यांनीं अशा प्रकारची भूमिका घेतली आहे. त्यांच्या मते कार्यकारणभावाच्या विवेचनांत सर्व साधारण किंमतीमान ही कल्पना, तिला नेमका अर्थ देणें कठीण असल्यानें, असमाधानकारक वाटते. शिवाय उद्योगपति व व्यापारी वर्गांकडून जे महत्त्वाचें आर्थिक निर्णय घेतले जातात ते सर्वसाधारण किंमतीमान लक्षांत घेऊन घेत जात नसल्यामुळें त्यांच्या निर्णयावर अधिष्ठित असलेल्या अर्थव्यवस्थेचें विश्लेषण करतांना सर्वसाधारण किंमतीमानाची कल्पना अनावश्यकहि आहे.[९] कार्यकारणभावासंबंधींच्या विवेचनांत सर्वसाधारण किंमतीमानाच्या व तत्सम इतर कल्पनांचा उपयोग नाहीं. अत्यंत स्थूल स्वरूपाची तुलना जेव्हां करावयाची असेल तेव्हांच फक्त अशा कल्पनांचा उपयोग होतो आणि तेवढ्या पुरतां त्यांचा उपयोग करण्यास हरकत नसावी असें मत कीन्स ह्यांनीं व्यक्त केलें आहे.[१०] कीन्स ह्यांनीं अशी भूमिका घेतली असली तरी सर्वसाधारण किंमतीमानासारख्या कल्पना, स्थूलमानानें कां होईना, पण व्यवहारांत व तात्विक विवेचनांत उपयोगीं पडूं शकतात असें बहुतेक अर्थशास्त्रज्ञ मान्य करतात असें आढळते.[११]

---

[९] The well-known, but unavoidable, element of vagueness which admittedly attends the concept of the general price level makes this term very unsatisfactory for the purpose of causal analysis which ought to be exact—**Keynes**.

[१०] The fact that two incommensurable collections of miscellaneous objects cannot in themselves provide the material for a quantitative analysis need not, of course, prevent us from making approximate statistical comparisons, depending upon some broad element of judgment rather than of strict calculations which may possess significance and validity within certain limits.

[११] It is the general consensus that the methods devised and the results reached are tolerable for both analytical and practical purposes. Output, capital stock, and the general price level are usable concepts and their magnitudes are, within reason, measurable—**Hansen**.

: ५ : चलन-मूल्यांतील फेरफारांचे परिणाम (ECONOMIC EFFECTS OF CHANGES IN THE VALUE OF MONEY)

चलन-मूल्यांतील फेरफार कां जाणवतात ? :––चलन-मूल्यांतील फेरफार जाणवतात ह्याचें मुख्य कारण असें कीं, चलनाचा मूल्यसंग्रह म्हणून उपयोग केला जातो. चलनाचें वर्तमानमूल्य स्थिर राहील, ह्या अपेक्षेनें भावी काळाच्या वायद्यानें वर्तमानकाळांत केलेले व्यवहार चलन-मूल्यांत फेरफार झाल्यानंतर अंगलट तरी येतात किंवा लाभप्रद तरी ठरतात. चलन-मूल्यात होणाऱ्या फेरफारांची दिशा व प्रमाण सर्वांच्या दृष्टीनें सारखेंच असलें तरी त्यांचे परिणाम मात्र सर्वांवर सारखे होत नाहींत. ज्याच्या त्याच्या परिस्थितीनुसार ते परिणाम लाभप्रद अथवा हानिकारक ठरतात, त्यामुळें समाजांतील भिन्नभिन्न वर्गाचा स्वतंत्रपणें विचार करून केलेलें चलन-मूल्यांतील फेरफारांच्या परिणामाचें विवरण उपयुक्त ठरतें.[१]

कर्जदार व सावकार :––चलन-मूल्य कमी होण्याच्या काळांत कर्जदार (Debtor) वर्गाचा फायदा होतो. एकतर त्या काळांत वाढत्या किंमतीमुळें त्यांचीं उत्पन्नें वाढत असल्यानें कर्जफेड करणें त्यांना सुलभ जातें आणि शिवाय कर्ज काढते वेळीं घेतलेल्या रकमेचें वस्तूंच्या रूपांत जें मूल्य होतें त्यापेक्षां कर्ज फेडतेवेळचें मूल्य कमी असतें. म्हणजे कर्ज घेऊन त्यांच्या पदरांत जें पडलें असेल त्यापेक्षां कमी मूल्य त्यांना कर्ज फेडलें गेल्यामुळें प्राप्त होतें.[२] ह्याच काळांत उलटच्या कारणांमुळें सावकारवर्गाचा तोटा होतो. कांहीं लोक एकाच वेळीं कर्जदार आणि **सावकार** (Creditor) असूं शकतात. उदाहरणार्थ:—पूर्वीचें कर्ज फेडण्याची वेळ जेव्हां येतें तेव्हांच पूर्वी गुंतविलेला पैसा, सरकारी कर्जरोख्यांत, विम्यांत, वगैरे, परत मिळण्याची वेळ येते. अशा परिस्थितींत कोणाचा फायदा होईल, कोणाचा तोटा होईल, हें अर्थातच ज्याच्या त्याच्या परिस्थितीचा स्वतंत्रपणें अभ्यास करून ठरवावें लागेल. फेडावयाची रक्कम मिळावयाच्या रकमेपेक्षां अधिक असल्यास फायदा होईल, अन्यथा तोटा होईल. चलनमूल्य जेव्हां वाढत असतें––म्हणजे वस्तूंच्या किंमती कमी होत असतात तेव्हां कर्जदारांचा तोटा होऊन सावकारांचा फायदा होतो. पूर्वी काढलेल्या कर्जापासून झालेल्या फायद्यापेक्षां अधिक त्याग कर्जदारांना कर्जफेडीसाठीं करावा लागतो. सावकारांना ह्याच परिस्थितींत पूर्वीच्यापेक्षां अधिक मिळतें.

उद्योगपति व कामगार :—चलनमूल्य कमी होण्याचा म्हणजे किंमती वाढण्याचा काळ ही उद्योगपतिवर्गाच्या दृष्टीनें मोठीच पर्वणी असते. वस्तूंचा कांहीं सांठा

[१] The impact of changing value of money is felt unevenly by different groups of individuals within the national economy.

[२] Debtors as a group fare well during the period of inflation. —Creditors on the other hand stand to lose by inflation.

त्याच्या जवळ असेल तर त्याची किंमत वाढतें. उत्पादन वाढविण्यास किंवा नवीन उद्योगधंदे काढण्यास त्याला चांगलेंच प्रोत्साहन मिळतें. कारण भाव वाढत असल्यामुळें नफा वाढत असतो. वाढत्या किंमतीचा त्याच्या नफ्याच्या मूल्यावर प्रतिकूल परिणाम होत नाहीं. कारण किंमती वाढतात त्यापेक्षां अधिक प्रमाणांत नफा वाढतो. नफा अधिक वाढण्याचें मुख्य कारण म्हणजे किंमतींत ज्या मानानें वाढ होते त्या मानानें आणि त्या वेगानें उत्पादनखर्चांत वाढ होत नाहीं. उत्पादन-खर्चाचा कांहीं भाग बहुतांशीं स्थिर स्वरूपाचा असतो. उरलेल्या भागांपैकीं कच्चा माल वगैरेंच्या किंमती सामान्यतः नफ्याच्या प्रमाणांत वाढत असतात; पण घटकांच्या ज्या किमती असतात त्यांच्या बाबतींत एक तर नफ्याच्या प्रमाणांत वाढ होत नाहीं आणि दुसरें म्हणजे कालदृष्टया नफ्यांतील वाढ नेहमींच घटकांच्या पुढें राहतें म्हणजे नफा आधीं वाढतो आणि कालान्तरानें त्यापेक्षां कमी प्रमाणांत घटकांचें भाव वाढतात. उलट चलनमूल्य वाढूं लागण्याच्या, म्हणजे किंमती कमी होण्याच्या काळांत नफा कमी झाल्यामुळें उद्योगपतिवर्गाचें बरेंच नुकसान होतें. उत्पादनाला कोणतेंच प्रोत्साहन रहात नाहीं आणि ज्या प्रमाणांत किंमती कमी होतात त्यापेक्षां अधिक प्रमाणांत नफा कमी होऊन त्यांच्या उत्पन्नाचें एकंदर **वास्तव मूल्य** (Real Value) कमी होण्याचा धोका संभवतो. ज्या मानानें किंमती कमी होतात त्या मानानें उत्पादनखर्च कमी होत नाहीं. कारण स्थिर खर्च जेवढयाच्या तेवढाच रहातो. कच्च्या मालाच्या वगैरे किंमती उतरतात. पण घटकांच्या किंमती तेवढया प्रमाणांत कमी करणें साधत नाहीं. 'वेतन' चिकट असतें, ही गोष्ट किंमती वाढण्याच्या काळांत उद्योगपतिवर्गाला उपकारक ठरते आणि नेमकी तीच गोष्ट किंमती कमी होण्याच्या काळांत अपकारक ठरते.[3]

ज्या परिस्थितीचा उद्योगपतिवर्गाला फायदा होतो तीच परिस्थिति कामगारवर्गाला बाधक ठरते आणि उलटी परिस्थिति हितकारक ठरण्याचा संभव असतो. मजुरी व पगारावर ज्यांचें उत्पन्नअवलंबून असतें—म्हणजेच निराळया शब्दांत जो वर्ग श्रमजीवी असतो—त्या वर्गाचीं उत्पन्नें चिकट असतात. तेजीच्या काळांत तीं फार वाढत नाहींत. मंदीच्या काळांत फार पडत नाहींत. हें विधान सामान्यपणें खरें असलें तरी श्रमजीवी वर्गांत अनेक उपवर्ग असल्यानें त्यांच्या बाबतींत सरसकट विधान पूर्णपणें खरें ठरणार नाहीं. अधिक खोलांत जाऊन असें म्हणावें लागेल का, श्रमजीवी वर्गापैकीं जो संघटित असतो आणि तेजीमुळें ज्यांच्या श्रमाकरितां मागणी वाढूं लागते त्यांना किंमती वाढत असतां मजुरीचे दरहि वाढून मिळतात, अर्थात् ह्या वर्गाच्या बाबतींतहि वाढत्या किंमतींच्या काळांत एकंदरीनें तोटाच होतो असें म्हणावें लागेल. कारण

[3] Inflation is a great stimulant and deflation a great deterrent to enterprise.

किंमती व मजुरी ह्यांच्या शर्यतींत मजूरी नेहमींच मागें पडते असा अनुभव आहे. त्यामुळें मजुरीचें वास्तविक मूल्य शेवटीं कमीच रहातें आणि त्यामुळें रहाणीमान कमी होण्याचा संभव निर्माण होतो.[४] श्रमजीवी वर्गाचा जो भाग संघटित नसतो त्याची स्थिति मात्र वाढत्या किंमतीच्या काळांत फारच अनुकंपनीय होते. उत्पन्न व खर्च ह्यांच्यांत वाढत्या किंमतीमुळें खड्डा पडतो. किंमती जशा वाढत जातात तशा तो खड्डाहि मोठा होत जातो. श्रमजीवी वर्गातला जो मध्यमवर्गीय भाग असतो त्याची परिस्थिति सामान्यपणें अशी होते. सर्वांत अनुकंपनीय स्थिति सेवानिवृत्तांची होते. कारण त्यांच्या उत्पन्नांत थोडीदेखील वाढ होण्यास परिस्थिति अनुकूल नसते.

किंमती वाढण्याच्या काळाचे मजूरवर्गावर काय परिणाम होतात, ह्याचा विचार पुरा करण्यापूर्वी दोन गोष्टींकडे लक्ष वेधणें अगत्याचें आहे. पहिली गोष्ट अशी कीं, किंमती वाढण्याच्या काळांत रोजगारांतहि वाढ होत असते आणि त्यामुळें कामगारांचें कौटुंबिक उत्पन्न बरेंच वाढण्याचा संभव असतो. एकंदरीनें कामगारवर्गाचा तोटा झाला कीं, फायदा हें ठरवितांना वाढलेला रोजगार अवश्य विचारांत घ्यावा लागतो. वाढलेल्या रोजगाराचा फायदा सर्व कुटुंबांना सारखाच मिळतो असें नाहीं. त्यामुळें कांहींचा फायदा होतो तर कांहींचा तोटा होतो. ह्या बाबतींतहि सर्वसाधारणपणें असेंच दिसून येतें कीं, मध्यमवर्गीय श्रमजीवीपैकीं ज्यांच्या कौटुंबिक उत्पन्नांत वाढ झाली आहे आणि तीहि खर्चाच्यापेक्षां अधिक प्रमाणांत झाली आहे असा भाग फार थोडा असतो. त्या मानानें खालच्या वर्गांत हें प्रमाण अधिक आढळतें. कारण ह्या वर्गांतील स्त्रिया सरसकट रोजगारासाठीं तयार असतात आणि मुलेंहि लौकरच कामास लागतात.

दुसरी गोष्ट अशी कीं, कामगार संघटित होण्यास भाववाढीची वेळ अनुकूल असते. ह्या काळांत कामगारांना वाढत्या मजुरीसाठीं वारंवार झगडावें लागतें आणि त्या झगड्यांत यशस्वी होण्यास संघटन प्रबळ करण्याशिवाय दुसरा मार्ग नसतो. शिवाय रोजगार भरपूर असल्यामुळें फुटीर वृत्ति निर्माण होण्याची भीति कमी असते. कामगारवर्गासाठीं मागणी वाढत असल्यामुळें जें बळ प्राप्त होतें त्याचाहि ह्या बाबतींत अनुकूल परिणाम होतो.

मंदी व कामगारवर्ग :—मंदीचा म्हणजे किंमती कमी होण्याचा काळ कामगार वर्गावर एकप्रकारें अनुकूल तर एकप्रकारें बराच प्रतिकूल असतो. ज्यांचा रोजगार टिकून रहातो त्यांना हा काळ फारच अनुकूल ठरतो. कारण त्यांचीं उत्पन्नें बऱ्याच प्रमाणांत स्थिर असतात आणि किंमती मात्र वेगानें पडत असतात; पण हाच काळ बेकारींत वाढ होण्याचा असतो आणि बेकारींतील वाढ विशेष

[४] Although wage earners can chase rising prices, they seldom win the race and the result is lower real wages throughout the period of price rise.

वेगानें होत असल्यास एकंदर कामगार वर्गाचें फारच नुकसान होतें. त्यांतल्या त्यांत असें म्हणतां येईल कीं, मध्यमवर्गीय कामगार वर्गाला हे दिवस सुस्थितीचे असतात. कारण त्यांचीं उत्पन्नें तुलनेनें अधिक स्थिर असतात अणि त्यांच्या नोकऱ्यांत—मुख्यतः सरकारी नोकरींत—अधिक शाश्वति असल्यामुळें बेकारीची कुऱ्हाड त्यांना कमी त्रासदायक होते. सेवानिवृत्तांना हा काळ सर्वांत सुखाचा असें म्हटल्यास अतिशयोक्ति नाहीं. उत्पन्न अगदीं स्थिर, उत्पन्नाचें मूल्य मात्र वाढतें अशी अत्यंत अनुकूल परिस्थिति त्यांच्या वांट्यास येतें. दुःख एवढेंच कीं, सुखाचा उपभोग घेणें वय होऊन गेल्यामुळें कठिण होतें! मंदीचा काळ कामगार संघटनेच्या दृष्टीनें अनुकूल ठरत नाहीं. बेकारीमुळें कामगारांचे प्रश्न एकप्रकारें बिकट होऊन संघटन होण्यास मदत व्हावी हें खरें आहे; पण बेकारीमुळेंच कामगार वर्गांत फुटीरपणाची वाढ होते. संघटन फोडण्यास परिस्थिति अनुकूल असते. कारण एका कामगाराची जागा घेण्यास दुसरा तयारच असतो. बेकारीमुळें संघटनांची वर्गणी नीट वसूल होत नाहीं आणि त्यांची सांपत्तिक स्थिति खराब होते. संप हें कामगार संघटनांचें महत्त्वाचें हत्यार निष्प्रभ ठरतें. कारण उत्पादन कमी करूं पहाणाऱ्या उद्योगपति वर्गाला संप झाले तर हवेच असतात.

व्याजावर अवलंबून असणाऱ्यांचा वर्ग :—मजुरी व पगार ह्यांवर अवलंबून रहाणारांचा वर्ग ज्याप्रमाणें समाजांत असतो त्याप्रमाणें आपल्या उत्पन्नासाठीं मुख्यतः व्याज व खंड ह्यांसारख्या अकष्टार्जित—अनार्जित—उत्पन्नावर अवलंबून रहाणाराहि वर्ग समाजांत असतो. किंवा कित्येकांच्या उत्पन्नांत व्याजाला महत्त्वाचें स्थान असतें. त्यामुळें त्या उत्पन्नावर काय परिणाम होतो हें पाहिलें पाहिजे. त्या वर्गापैकीं ज्यांचें उत्पन्न शेअर्स वरती मिळणाऱ्या **लाभांशावर** (Dividend) अवलंबून असतें त्यांचा भाववाढीच्या काळांत सामान्यपणें फायदा होतो. कारण नफ्यांत वाढ होत असते आणि अर्थातच त्यांतील कांहीं भाग त्यांच्या वांट्यास येतो. पूर्वनिश्चित व्याजानें ज्यांनीं आपली बचत बँकांत, विमा संस्थांत, सरकारी अगर तत्सम कर्ज-रोख्यांत गुंतवली असेल त्यांचा मात्र निश्चित तोटा होतो. बचत गुंतवणारा मध्यम-वर्ग बहुशः ह्या वर्गांत असतो. लहान प्रमाणावर ज्यांची बचत असते आणि ज्यांना मिळणारें ठराविक व्याज अत्यल्प असतें त्यांचे भाववाढीच्या काळांत फारच हाल होतात.[५] पूर्वनिश्चित व्याज मिळविणाऱ्या वर्गाला किंमत कमी होण्याच्या काळांत

[५] The small middle class investor has much to lose during inflation, since he usually places his savings in fixed interest bearing securities, insurance and saving accounts. In many countries the small investor has had his savings largely, if not completely, wiped out by the violent depreciation of purchasing power of money.

फायदा होतो आणि लाभांश मिळविणाऱ्यांचें उत्पन्न कमी होतें ह्या गोष्टी ओघानें आल्याच.

उत्पादकांच्या तौलनिक स्थितींत बदल:--किमती वाढत असतां अगर कमी होत असतां सर्वच वस्तूंच्या किमती सारख्याच प्रमाणांत वाढत अगर कमी होत नाहींत. तसें होत नाहीं म्हणून तर किमतींतील वाढ किंवा घट हा काळजीचा विषय होतो. सर्व वस्तूंच्या किंमती सारख्या प्रमाणांत वाढत नाहींत अगर कमी होत नाहींत. ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं, सर्व वस्तूंच्या मागणी-पुरवठ्याची परिस्थिति सारखी नसते. सर्व वस्तूंच्या परिस्थितीचा येथें विचार करतां यावयाचा नाहीं. पण स्थूलमानानें दिसून येणाऱ्या एका गोष्टीचा मात्र येथें उल्लेख केला पाहिजे. शेतकी वस्तूंचा पुरवठा औद्योगिक वस्तूंच्या तुलनेनें विशेष प्रमाणांत ताठर असल्याचें आढळून आलें आहे. त्यामुळें शेतकी वस्तूंच्या किंमती भाववाढीच्या काळांत फारच वाढतात व भावघटीच्या काळांत फारच पडतात. ह्यावरून एक निष्कर्ष सहजच निघतो. तो असा कीं, भाववाढीचा काळ शेतकरी वर्गाला भरभराटीचा असतो. मंदीचा काळ हा शेतकरी वर्गाला मारक ठरतो.

वरील विधान अर्थातच सर्वसामान्य स्वरूपाचें झालें. प्रत्यक्षांत शेतकरी वर्गाचा भाववाढीच्या काळांत फायदा किती होईल, हें अर्थातच त्या त्या देशांतल्या विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून राहील. भारतांतला अनुभव असा सांगतां येईल कीं, वरील नियमाप्रमाणें शेतमालाच्या किंमती भाववाढीच्या काळांत विशेष वाढतात ही गोष्ट अगदीं खरी आहे. पण भारतांतला बहुसंख्य शेतकरी वर्ग छोटा, असहाय्य व असंघटित असल्यामुळें वाढलेल्या किंमतीचा फायदा शेतकरी वर्गाच्या पदरांत ज्या मानानें पडतो त्यापेक्षां अधिक प्रमाणांत व्यापाऱ्यांच्या पदरांत पडतो. मंदीची झळ मात्र सर्वस्वी शेतकरी वर्गाला लागते.

चलनमूल्यांतील बदलांचे विभाजनावर परिणाम:—भाववाढीचे किंवा भावघटीचे विविध वर्गांवर काय परिणाम होतात ह्याचें वर्णन वर केलें आहे. त्यावरून असें दिसून येईल कीं, चलनमूल्य बदलतें तेव्हां त्याबरोबरच विभाजनाचा आराखडाहि बदलतो. भाववाढ होत असते तेव्हां संपत्तीचें विभाजन उपभोक्ते, सावकार, छोट्या बचतींची गुंतवण करणारा वर्ग किंवा ठरीव उत्पन्नावर जगणारा वर्ग ह्यांना प्रतिकूल व व्यापारी, उत्पादक विशेषतः शेतकरी वर्ग, आणि कर्जदार वर्ग ह्यांना अनुकूल असें होतें. भाववाढीच्या काळांत ज्यांचा फायदा होतो त्यांचा भावघटीच्या काळांत तोटा होतो आणि उलट भाववाढीच्या काळांत ज्यांचे नुकसान होतें त्यांना भावघट होत असतां तुलनेनें बरे दिवस येतात. चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे, हा न्याय येथें उत्तमपैकीं लागू पडतो.

चलनमूल्यांतील फेरफार व उत्पादन:--भाववाढ होण्याच्या किंवा भावघट होण्याच्या काळांत विभाजनावर ज्याप्रमाणें परिणाम होतात त्याचप्रमाणें उत्पा-

दनावरहि होतात. भाववाढीनें नफा वाढूं लागून उत्पादनाला उत्तेजन मिळतें. भाववाढ होत असतां जोंपर्यंत उत्पादन-साधनांचा पूर्ण उपयोग केलेला नसतो तोंपर्यंत उत्पादन वाढूं शकतें. पण उत्पादन साधनांच्या बाबतींत पूर्णोद्योगाची स्थिति एकदां गांठली गेली कीं, साहजिकच मग उत्पादनांतील वाढ थांबते आणि नुसती भाववाढच चालू राहते. मंदीच्या काळांत किंमती पडत असतात आणि त्यामुळें उत्पादन झपाट्यानें कमी होत असतें. भाववाढीचा काळ हा बेकारी कमी करण्यास अनुकूल असतो आणि भावघटीचा काळ बेकारी वाढण्यास कारणीभूत होतो, असा उल्लेख वर केलाच आहे.

तेजी चांगली कीं मंदी ? :—तेजीमंदीचे वर सांगितलेले परिणाम पाहतां तेजी चांगली कीं मंदी असा प्रश्न उपस्थित होतो. ह्या प्रश्नाचें उत्तर असें द्यावें लागेल कीं, तेजी व मंदी, ह्या दोहोंतहि एक फार मोठा दोष आहे. तो असा कीं, दोहोंमुळें अर्थव्यवस्था अतिशय अस्थिर होते, आणि त्यामुळें तेजीमंदीचा प्रकार सतत चालू राहिला तर अर्थव्यवस्थेचें आसन डळमळीत होतें. चलनमूल्यांत कमालीची अस्थिरता जर दिसून येईल तर लोकांचा चलनावरचाच विश्वास उडून जाण्याचा धोका असतो. भाववाढीमुळें काय किंवा सतत होणाऱ्या भावघटीमुळें काय एखाद्याच वर्गाचें सारखें नुकसान होऊं लागलें कीं, जगांत न्याय नाहींच ही कल्पना त्यांच्या मनांत घर करून बसते आणि त्यामुळें असंतोषाचीं बीजें रोवलीं जातात. अर्थव्यवस्थेचें कार्य सुकररीतीनें चालावयाचें असेल तर ही स्थिति कोणत्याहि प्रकारें इष्ट नाहीं हें सहज समजण्याजोगें आहे म्हणून मंदीचा काळ चांगला कीं तेज़ीचा, असा प्रश्न उपस्थित केल्यास दोन्हीहि त्याज्य असेंच उत्तर स्पष्टपणें द्यावें लागतें.[६]

तेजी व मंदी सारखीच त्याज्य :—भाववाढीचा काळ व भावघटीचा काळ हे दोन्ही त्याज्य असतात, हें नाकारतां यावयाचें नाहीं. दोहोंत तुलना करून त्यांतील एकाची निवड करण्याचा प्रसंग आला तर तेजीपेक्षां मंदीस कमी गुण दिले जातील. तेजीच्या काळांत विभजनावर होणारे परिणाम अतिशय अनिष्ट असतात. कारण कमी उत्पन्नाच्या गरीब लोकांवर तेजीचा भार पडतो. पण त्याचबरोबर एकंदर रोजगार व एकंदर उत्पादन ह्यांची कमाल मर्यादा तेजीच्या काळांत गांठली जाते हा फायदाच होय.[७] भावघटीच्या काळांत विभजनाच्या दृष्टीनें कांहीं वर्गांचा फायदा होत असला तरी बेकारी व कमी होणारें उत्पादन ह्यामुळें ह्या फायद्याचें प्रमाण फारच संशयास्पद ठरतें.

[६] The dichotomy between inflation and deflation is a false one, since both are socially undesirable and economically unsound. The crux of the matter is that the smooth functioning of a market economy presupposes and requires stability in the purchasing power of money—Both inflation and deflation injure general confidence in the stability of value of this common measuring rod and therefore in the possibility of a continuing stable economy—**Kurihara.**

कामगारवर्ग उदाहरणादाखल घेतला तर वर दाखविल्याप्रमाणें ज्यांचा रोजगार टिकून राहतो त्यांना भावघट बरी वाटेल; पण मोठ्या प्रमाणावरील बेकारीनें एकंदर कामगारवर्गाचा फायदा होईल असें सांगतां येणें कठिण. भावघटीचा फायदा निःसंशय असा ज्यांना मिळतो तो वर्ग अल्पसंख्य असतो आणि म्हणून बहुसंख्य लोक भाववाढीचा काळ अधिक पसंत करण्याचा संभव असतो.

पण वर सांगितल्याप्रमाणें वेगवेगळ्या कारणांसाठीं दोन्ही त्याज्य हें म्हणणें अधिक योग्य आहे. ह्याचा अर्थ असा कीं, प्रमाणबाह्य भाववाढहि होणार नाहीं आणि शिवाय उत्पादनावर अनिष्ट परिणाम होणार नाहीं ह्यासाठींच प्रयत्न केला पाहिजे.[८]

: ६ :

तेजी-मंदी-चक्र

(TRADE CYCLE)

तेजी-मंदी-चक्र म्हणजे काय ? :—अर्थव्यवस्था गतिमान असते. अर्थ-व्यवस्थेंत उत्पादन, रोजगार, किंमतीमान, हे सर्व महत्त्वाचे प्रवाह-गतिमान असल्यामुळें त्यांच्यांत सतत कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा संख्यात्मक बदल होत असतो. ह्यांतील विशिष्ट स्वरूपाच्या बदलांना तेजी-मंदी-चक्र असें नांव देण्यांत आलें आहे. तेजी-मंदी-चक्र हा आधुनिक अर्थव्यवस्थेचा अंगभूत भाग आहे अस निष्कर्ष अलीकडील आर्थिक इतिहासावरून निःसंशय निघतो.[१] **तेजी-मंदी-चक्र** (Trade Cycle) ह्या शब्दप्रयोगांत अभिप्रत असलेल्या बदलांचीं दोन वैशिष्टयें सांगतां येतील. तीं अशीं (१) हे बदल अर्थव्यवस्थेंतील विशिष्ट बाजारपेठे-पुरते मर्यादित नसतात. हे बदल सर्वव्यापी असतात. अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांत

[७] Inflation is better than deflation as far as aggregate production and employment are concerned but worse than deflation as far as distribution of wealth and income is concerned—it provides the economy subject to under employment with maximum output and employment—**Kurihara**.

[८] The value of money need not and should not be allowed to fluctuate so as to endanger the stability of the whole economy.

[१] That the economic systems of modern times are liable to fluctuation of a particular sort, which can properly be called cyclical, is a very obvious inductive generalisation from the main facts of economic history—**Hicks.**

एकाच वेळीं हे बदल होत असतात. विशेष सांगावयाची गोष्ट म्हणजे सर्व क्षेत्रांतील बदलांची दिशा एकच असते. वाढ होत असते तेव्हां सर्व क्षेत्रांत वाढ होत असते. घट होत असते तेव्हां सर्व क्षेत्रांत ती होत असते. (२) हे बदल हंगामी नसून चक्री (Cyclical) असतात. चक्र फिरत असतां त्यांतील प्रत्येक भाग एकापाठोपाठ ह्या क्रमानें येतो. आणि त्यांतील प्रत्येक भाग पुन्हां पुन्हां त्याच ठिकाणीं येतो. त्याचप्रमाणें तेजी-मंदीचें आहे. तेजी-पाठोपाठ मंदी व मंदी-पाठोपाठ तेजी हें चक्र किंवा रहाटगाडगें सतत चालू असतें. त्या चक्रांत त्याच गोष्टीचा पुन्हां पुन्हां प्रत्यय होत असतो. त्यांत खंड पडत नाहीं[२]. तेजी-मं ी-चक्राला एक भ्रमण पुरें करावयास ठराविक वेळ लागतो कीं काय हा प्रश्न वादग्रस्त आहे. कांही अर्थशास्त्रज्ञांच्या मतें तेजीमंदी-चक्राची फिरती ठराविक काळांत पुरी होते व यानंतर दुसरी फिरती सुरू होते.[३] तर इतरांच्या मतें तेजीमंदी-चक्राची फिरती कालदृष्ट्याहि नियमित असते असें दाखविण्यास पुरेसा पुरावा नाहीं. तसेंच तेजीमंदीची तीव्रता प्रत्येक चक्रांत सारखीच असते कीं काय ह्याबद्दल संदेह आहे. उपलब्ध आंकडेवारीचा पुरावा तेजी-मंदीची तीव्रता सारखी असते असें दाखविण्यास पुरेसा नाहीं. एका तेजींत गांठलें जाणारें उत्पादन, रोजगार, किंमतीमानाची अत्युच्च पातळी दुसऱ्या तेजीत गांठल्या जाणाऱ्या पातळीपेक्षां बरीच कमी अधिक असल्याचें दिसून येते. असाच अनुभव मंदींतील किमान रोजगार, उत्पादन व किंमतीमान ह्याबाबत दिसून येतो.[४] पण तेजी-मंदी-चक्र सतत फिरत असतें ह्याबद्दल वाद नाहीं.[५] तेजी-मंदी चक्रासंबंधींचें आधुनिक अर्थशास्त्रज्ञाचें लिखाण पाहिलें तर असें दिसून येतें कीं, तेजी-मंदी-चक्राची कालमर्यादा ठराविक नसते, व तेजीची किंवा मंदीची तीव्रता प्रत्येक खेपेस सारखी नसते असाच सर्वसाधारण निष्कर्ष आहे.[६] तेजी-मंदी-चक्र सतत

[२] Cycle is any pattern of economic development that tends to repeat itself. Business and economic activities tend to expand, for some time, then to contract and then again to expand the whole process being repeated time after time over the years. —Hald.

[३] The cycle consists of fluctuations in real income, output, employment and prices, which occur with some degree of regularity. They show some tendency to take a period of about ten years to work round, from the boom of one cycle to the boom of the next—Day.

[४] There is no uniformity in regard to amplitude of a Trade Cycle. Cycles vary greatly in their severity as to both upper and lower turning points. This sequence of change is recurrent but not its periodicity. In duration business cycles vary from more than one year to ten or twelve years.

फिरत असते, तेजी-मंदीचा रोजगार, उत्पादन व भावमान ह्या तीन्ही गोष्टीवर सामान्यपणें एकसमयावच्छेदेंकरून व एकाच स्वरूपाचा बदल होत असतो व तेजी किंवा मंदी आली कीं कांहीं काळपर्यंत विशिष्ट स्वरूपाच्या बदलांची गति वा जोर वाढत जातो आणि त्यांतून उलटचा प्रकारच्या बदलांची पार्श्वभूमि तयार होते ह्याबद्दल अर्थशास्त्रांत एकवाक्यता दिसते. ही गोष्ट उल्लेखनीय म्हटली पाहिजे. कोणतेहि बदल होत असतां विशिष्ट कालानंतर त्या बदलांना विरोधी असे वारे अर्थव्यवस्थेंत आपोआपच वाहूं लागतात व ते वारे प्रभावी ठरावें अशी परिस्थिति निर्माण होऊं लागते ही गोष्ट तेजीमंदी चक्रांत उत्तम प्रकारें दिसून येते.

---

५ The term cycle is used in biology and other sciences to denote a sequence of events that is constantly repeated but not necessarily in the same degree or precisely in the same perid of time. It is a reasonably defensible proposition that the movements of industry and business run in cycles consisting of a sequence of changes which is recurrent but not rigorously periodic. Moreover the analysis of these fluctuations gives strong support to the view that a movement once started in one direction tends to cumulate and grow stronger and stronger upto a certain point beyond which the generating forces weaken until a reverse movement develops in the opposite direction. If this is true the movement is indeed wavelike in character and not merely an erratic fluctuation--**Hansen.**

६ Successive cycles differ not only in length but also in violence and in the relative prominence of their various manifestations. These differences in business cycles arise from the fact that the business situation at any given moment is the net resultant of a complex of forces among which the rhythm of business activity is only one. Harvest conditions, domestic policies, changes in monetary and banking systems, international relations, the making of war or peace, the discovery of new industrial methods or resources and a thousand other matters, all affect the prospects of profits favourably or adversely, and therefore tend to quicken or slacken the pace of business. The fact that the rhythm of business can be traced in the net resultants produced by these many factors argues that it is one of the most constantly acting and probably one of the most powerful factors among them--**Mitchill.**

The cycles are not uniform. They differ among themselves quite considerably; but there can surely be no doubt about their family likeness--**Hicks.**

तेजीमंदी चक्राचे चार टप्पे :—सतत फिरणाऱ्या तेजीमंदी चक्रांत तेजी व मंदी हे दोन महत्त्वाचे टप्पे असले तरी एकंदर चार टप्पे असल्याचें दिसून येतें. (१) **तेजी** (Expansion), (२) **घसरण** (Recession), (३) **मंदी** (Contraction) आणि (४) **पुनर्जीवन** (Revival) हे ते चार टप्पे होत. तेजी-मंदीचें हें चक्र नफ्याच्या प्रेरणेनें चालणाऱ्या अर्थव्यवस्थेंतच खात्रीनें आढळून येते. एवढेंच नव्हे तर त्या अर्थव्यवस्थेचा तो अंगभूत विशेष असतो हें आग्रहानें सांगितलें पाहिजे.[७] अमेरिकेंतील National Bureau of Economic Research ह्या संस्थेनें तेजी-मंदी-चक्राची जी वर्णनात्मक व्याख्या केली आहे ती प्रमाणभूत समजली जाते. त्या व्याख्येप्रमाणें **नफ्याच्या प्रेरणेवर चालणाऱ्या अर्थव्यवस्थेंत होणाऱ्या सर्वव्यापी अशा चक्री बदलांना तेजी-मंदीचें चक्र म्हणतात.** ह्या चक्रांत तेजी, घसरण, मंदी आणि पुनर्जीवन हे चार टप्पे असतात. त्यांतील पहिला टप्पा मागल्या चक्रांतून बाहेर पडलेला असतो आणि चौथा टप्पा पुढील चक्राची नांदी असते,[८]

तेजी-मंदी-चक्राची फिरती :—तेजी :—तेजी-मंदी-चक्राचे वर जे टप्पे सांगितले आहेत त्यांचें स्वरूप काय असतें व त्याच्याशीं संबंधित असलेल्या घटना कोणत्या असतात हें आतां पाहूं. तसें पाहिलें तर चक्राला सुरुवात अशी नसतेच. पण सोयीसाठीं कोठला तरी टप्पा सुरुवातीचा म्हणून धरला पाहिजे. तेव्हां तेजीपासून जर सुरुवात केली तर असें दिसून येईल कीं, तेजीच्या काळांत अर्थव्यवस्थेंत सर्व गोष्टींची वाढ होत असते. ह्या काळांत उत्पादन वाढत असतें; उत्पादन वाढत असतें म्हणून रोजगार वाढत असतो. रोजगार वाढत असतो; म्हणून लोकांचें उत्पन्न वाढत असतें; उत्पन्न वाढत असतें म्हणन खर्च वाढत असतो, खर्च वाढत असतो म्हणून किंमती वाढत असतात. किंमती वाढतात म्हणन नफा वाढत असतो; नफा वाढत असतो म्हणून भांडवल-गुंतवण वाढत असते; आणि भांडवल-गुंतवण वाढत असते म्हणून पुनः उत्पादन, रोजगार, किमती ह्यांची वाढ होत असते. **ही सर्व प्रक्रिया स्वयंवृद्धीची** (Cumulative) **असते**. म्हणजे कोणत्याहि गोष्टीची वाढ एकदां सुरू झाली कीं, तिला पोषक असें वातावरण आपोआपच निर्माण होऊन ती चालू रहाते.[९]

घसरण :—पण स्वयंवृद्धीची असली त ी वरील प्रक्रिया अनंत काळपर्यंत चालू रहात नाहीं. केव्हां तरी तिला उलटें वळण मिळतेंच. उलटी दिशा स्पष्टपणें

[७] Tendency to fluctuate is not a pathological disease. It is an inherent characteristic of the private enterprise market economy—**Hansen.**

[८] Business cycles are a type of economic fluctuations found in the aggregate economic activity of nations that organise their work mainly in business enterprises. A cycle consists of expansions occuring at about the same time in many economic activities, followed by similarly general recessions, contractions and revivals which merge into the expansion phase of next trade cycle.

सुरू होण्यापूर्वीं मध्यंतरीं कांहीं काळ असा जातो कीं, त्या वेळीं मंदी सुरू झालेली नसते; पण मंदीची चाहूल मात्र लागते. ह्या काळांत अर्थव्यवस्थेच्या कोठल्या तरी प्रवाहांत, कोठल्या तरी भागांत घट होऊं लागते, निदान वाढ होणें थांबतें. त्याचे पडसाद इतर भागांत उमटणार अशीं चिन्हें दिसूं लागतात. सर्वत्र भीतीचें, काळजीचें, साशंकतेचें, निराशेचें वातावरण पसरूं लागतें आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जी भांडवल-गुंतवण अर्थव्यवस्थेला आधारभूत होत असते ती पूर्वीं इतक्या प्रमाणांत करावयास उद्योगपति-वर्ग बिचकूं लागतो आणि त्यामुळेंच मुख्यतः आगामी मंदीची छाया सर्व व्यवहारावर पडते. घसरणीचा काळ सुरूं होण्याचीं बीजें तेजीच्या काळांत ज्या घटना घडतात त्यांतच आढळतात हें अगत्यानें लक्षांत ठेवलें पाहिजे. तेजीच्या काळांत रोजगार, उत्पादन व भावमान ह्यांच्यांत सातत्यानें वाढ होण्यास हातभार लावत असते. पण त्यामुळें कालान्तरानें भांडवल बाजारांत व कामगारांच्या बाजारांत ताण पडणें अपरिहार्य होतें. त्यामुळें व्याजाचे दर व वेतनाचें प्रमाण वाढूं लागून तेजीच्या काळांतील नफ्याचें प्रमाण टिकून राहील कीं नाहीं ह्यासंबंधीं उद्योगपतीच्या मनांत साशंकता निर्माण होते. तेजीच्या काळांत बँकाजवळील राखीव रोकडीचें प्रमाण त्यांच्या कर्ज व्यवहारांच्या मानानें कमीकमी होत असते. ते जेव्हां फारच कमी होतें तेव्हां बँकांना आपल्या कर्जव्यवहारांना आवर घालण्याची वेळ आली आहे असें वाटूं लागते व आपलें कर्जव्यवहार आंखडते घेण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत दिसून येते. तेजी टिकून राहण्यास ही प्रवृत्ति अनुकूल नसतें हें उघड आहे. अशा प्रकारें तेजीचें परिवर्तन तेजीमुळेंच घसरणींत होते.[१०]

मंदी :—अर्थव्यवस्थेच्या एखाद्या क्षेत्रांत सुरू झालेली घसरण सर्वत्र पसरणें व तिचा वेग वाढणें म्हणजेच मंदी.[११] तेजीच्या अगदीं बरोबर उलट अशा सर्व

[९] The fundamental fact about the upswing, however, is that it is the gathering together of the powerful forces of cumulation, driving the economy to higher and higher prices, output, employment and income.

[१०] While the processes of increasing production, investment, employment and price levels work cumulatively for a time to enhance prosperity, they also cause a slow accumulation of stresses which ultimately undermine, the conditions upon which business prosperity rests. These stresses are the gradual increase in the costs of doing business, accumulating tensions of the investment and of money market. These conditions are unfavourable to the continuance of prosperity, not only because they reduce the prospective margin of profits but also because they check the expansion in the volume of trade out of which prosperity developed.

घटना मंदीच्या काळांत घडतात. सर्व वस्तूंच्या मागणींत घट हें मंदीचें मुख्य वैशिष्ठच असतें. वाढत्या बेकारीमुळें उपभोग्य वस्तूंची मागणी कमी होते. उपभोग्य वस्तूंची मागणी कमी झाल्यामुळें उपभोग्य वस्तूंच्या निर्मितींत अन्तर्भूत होणाऱ्या कच्च्या मालाची व सहाय्यक भांडवली वस्तूंची मागणी कमी होते. स्थिर भांडवली वस्तूंसाठीं असलेल्या मागणीतील घट विशेषच तीव्रतेनें जाणवते. जोंपर्यंत भांडवलाची फलक्षमता कमी असते तोंपर्यंत दीर्घ मुदतीनें फल देणारी भांडवलगुंतवण करण्यास उद्योगपति वर्ग मुळींच तयार नसतो. मागणी कमी झाल्याचा व्यापारावर जो विपरीत परिणाम होतो त्यामुळें मंदीचा जोर अधिकच वाढतो. कारण व्यापार कमी होऊं लागला कीं उत्पादन कमी होणें अटळच असतें. उत्पादन कमी झाल्यामुळें मूळच्या बेकारींत भर पडते व त्यामुळें मागणी आणखी कमी होते. अशा परिस्थितींत मूळचे बाजारभाव तरी कसे टिकून राहावे ? ते पडतातच. पण बाजारभाव पडले कीं त्यांचा उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होतो व त्यामुळेंहि भाव कमी होण्याच्या प्रवृत्तीचा जोर वाढतो, बाजारभाव कमी झाल्यामुळें उत्पादकांत नैराश्य पसरावें व त्यामुळें प्रतिकूल परिस्थिति अधिक प्रतिकूल व्हावी हें साहजिक आहे. भांडवल-गुंतवण कमी म्हणून उत्पादन कमी, म्हणून बेकारींत वाढ, म्हणून लोकांच्या उत्पन्नांत घट, म्हणून त्यांच्या खर्चांत कपात, म्हणून बाजारांत वस्तूंना मागणी कमी, म्हणून किमतींत घट, म्हणून नफा कमी, म्हणून भांडवल-गुंतवणांत अधिक कपात आणि म्हणून सर्व गोष्टींची पुनरावृत्ति असा मंदीचा खाक्या असतो. **तेजीप्रमाणें मंदीची प्रक्रियासुद्धां स्वयंवृद्धीची** असते, म्हणजे ती एकदां सुरू झाली कीं, थांबतां थांबत नाहीं.[१२]

पुनर्जीवन :—पण जी थांबते कीं नाहीं असें वाटत असतें ती मंदी अखेर केव्हां तरी संपुष्टांत येऊन पुनः अर्थव्यवहाराचें चक्र उलट्या दिशेनें फिरूं लागतें. तेजी संपून मंदी येण्यापूर्वीं ज्याप्रमाणें एक संक्रमण-काल असतो. त्याचप्रमाणें मंदी व तेजीच्या मध्यें सुद्धां एक छोटासा संक्रमण-काल असतो. ह्या काळांत अर्थव्यवहारांना आलेली अवकळा नाहींशी होणार असें दिसूं लागतें. मंदीच्या काळांत घडलेल्या कांहीं गोष्टीच ह्या अवस्थेला कारणीभूत होतात. मंदीमुळें किंमती फारच प्रमाणांत पडल्या आहेत, उत्पादनखर्चांत उल्लेखनीय कपात झाली आहे, बँकाजवळील राखीव रोकड फार वाढल्यामुळें कर्ज देण्यास त्या अतिशय उत्सुक आहेत अशी परिस्थिति निर्माण होते. ही परिस्थिति केव्हां तरी एकंदर वस्तूंची विक्री वाढण्यास कारणीभूत होतेच. विक्री वाढल्यामुळें व्यापाऱ्याकडील वस्तूंचें सांठे कमी होऊं लागतात. त्यामुळें त्यांची मागणी वाढून उत्पादनास उत्तेजन मिळतें. व्यापारांत होणारी वृद्धि थोड्याच अवधींत भावमान वाढविल्याखेरीज राहात नाहीं. भाववाढ प्रथम कोठेंही होवो ती लवकरच सर्वत्र पसरते. त्यामुळेंच मुख्यतः आर्थिक व्यवहारांवर पडलेली निराशेची छाया दूर होऊं लागून आशेचे किरण पुनः दिसूं लागतात.

[११] The depression is the continuation and intensification of the downward movement of the recession.

अंधारी रात्र संपून प्रकाशमय सकाळ सुरू होण्यापूर्वीची ही प्रभात असते. ह्या काळांत अर्थव्यवहारांना पुनः टवटवी येते. त्यांना नवी पालवी फुटूं लागते आणि ह्या सर्वाला कारण उद्योगपति असतात. मंदीच्या काळांत निष्क्रिय, हतबल होऊन बसलेले उद्योगपति पुनः पुढें सरसावतात आणि त्यामुळें अर्थव्यवस्थेंतील सर्व प्रवाहाना चढणीचें वळण मिळण्यास मदत होते. एकदां चढण सुरू झाली कीं, तिची स्वयं वृद्धि होत जाऊन पुनः तेजी येते.[१३]

तेजी-मंदी चक्राची उपपत्ति :--तेजी-मंदी चक्राची मीमांसा अनेकांनीं अनेक प्रकारें केली आहे. त्यामुळें तेजी-मंदी चक्रासंबंधीं विविध उपपत्त्या प्रचलित आहेत. तेजी-मंदी चक्राची मीमांसा करणाऱ्याला प्रामुख्यानें पुढील तीन प्रश्नांचा उलगडा करावा लागतो. (१) तेजी किंवा मंदीची सुरुवात अर्थव्यवस्थेंतील कोणत्याहि एका प्रवाहामुळें होते काय? असल्यास तो प्रवाह कोणता? (२) अर्थव्यवहारांना दोनदां '**पलट**' (Turning Point) मिळण्याचीं नेमकीं कारणें काय आणि (३) तेजीची किंवा मंदीची स्वयंवृद्धि कशामुळें होते? हे तीन प्रश्न लक्षांत ठेवूनच कोणत्याहि उपपत्तीचा विचार करावा लागतो व ती उपपत्ति कितपत समाधानकारक आहे हें ठरवावें लागतें.

तेजी-मंदीला निसर्ग जबाबदार :--तेजी-मंदी चक्रासंबंधीं ज्या अनेक उपपत्त्या आहेत त्यांत तेजी-मंदीला निसर्गच जबाबदार असतो, अशीहि एक उपपत्ति आहे. ही

[१२] There follows a period during which depression spreads over the whole field of business and grows more and more severe. Consumer's demand declines in consequence of wholesale discharge of wage earners, the gradual exhaustion of past savings and the reduction of other classes of family incomes. With consumer's demand falls the business demand for raw materials, current supplies and equipment used in making consumer's goods. Still more severe is the shrinkage of producer's demand for construction work of all kind, since few individuals and enterprises care to risk money in business ventures so long as the trade remains depressed and the price level is declining. The contraction in the physical volume of business which results from these several shrinkages in demand is cumulative, since every reduction of employment which causes a reduction of consumer's demand depresses current business demand and discourages investment, thereby causing further discharges of employees, and reducing consumer's demand once more. With contraction in the physical volume of trade goes a fall of prices. For the decline spreads through the regular commercial channels which connect one enterprise with another and is cumulative.

उपपत्ति सांगणाऱ्यांचें म्हणणें असें कीं, नैसर्गिक परिस्थितींतील म्हणजे हवामानांतील बदल चक्री स्वरूपाचा असतो आणि हवामानाचा अर्थव्यवहारांवर परिणाम होत असल्यामुळें अर्थव्यवहारांतील चढउतारांनाहि चक्री स्वरूप प्राप्त होतें. ह्या उपपत्तीला अलीकडील आर्थिक विचारांत अजिबांत महत्त्व दिलें जात नाहीं. कारण हवामानांतील बदल चक्री स्वरूपाचे कदाचित् असतीलहि. ते तसे असतात कीं नाहीं हा अर्थशास्त्राचा प्रश्न नाहीं; पण हवामानांतील बदलावर अर्थव्यवहारांतील बदल अवलंबून असतात, असें कोणत्याहि प्रकारच्या पुराव्यानें सिद्ध होत नाहीं.

मानसशास्त्रीय मीमांसा :—मानसशास्त्राच्या आधारें तेजी-मंदी चक्राची एक मीमांसा अशी केली जाते कीं, आशावादाची लाट जेव्हां उद्योगपतींच्या वर्गांत यते तेव्हां ती तेजीला कारणीभूत होते. पण हा आशावादच शेवटीं बाधक ठरतो. कारण

---

[१३] A period of depression produces after a time certain conditions which favour an increase of business activity. Among these conditions are a level of prices low in comparison with the prices of prosperous times, drastic reductions in the cost of doing business, narrow margin of profits, ample bank reserves—These conditions are accompanied sooner or later by an increase in the physical volume of purchases—There is a gradual increase in buying and as the sellers' stocks are gradually reduced there is also a slow increase of manufacturing. Experience indicates that once begun a recovery of this sort tends to grow cumulatively—While the price rise is often sagging slowly when a revival begins, the cumulative expansion in the physical volume of trade presently stops the fall and starts a rise—Like the increase in the physical volume of business, the rise of price spreads rapidly. The resulting changes in prices are far from even—In the majority of enterprises larger profits result from these divergent price fluctuations coupled with the greater physical volume of sales. This increase of profits combined with prevalence of business optimism leads to a marked expansion of business investments.

Indeed the salient characterstic of this phase of business cycle is the cumulative working of the various processes which are converting a revival of trade into intense prosperity. Not only does every increase in physical volume of trade causes other increases, every convert to optimism makes new converts and every advance of prices furnishes an incentive for fresh advances but the growth of trade helps to spread optimism and to raise prices, while optimism and rising prices both support each other and stimulate the growth of trade—**Mitchell.**

आशावादाच्या प्रभावामुळें उत्पादन वाजवीपेक्षां अधिक वाढविण्याची घोडचूक हा वर्ग करून ठेवतो. ही चूक लक्षांत आली, उत्पादिलेला माल विकत नाहीं असें दिसून आलें कीं, आशावादाच्या जागीं निराशावाद येतो. आशावादाप्रमाणें निराशावादहि सांसर्गिक असतो. एकाला त्यानें पछाडलें कीं, इतर सर्वांना तो बाधतो. निराशावादाच्या प्रभावामुळें उद्योगपतींचा वर्ग दुसरें टोंक गांठण्याची घोडचूक करतो, उत्पादन एवढें कमी होतें कीं, मंदी त्यांतून अपरिहार्यपणें येते. ह्या मीमांसेनुसार एका पाठोपाठ येणाऱ्या आशावादाच्या आणि निराशावादाच्या लाटांमुळें तेजीमंदीच्या चक्री स्वरूपाचा खुलासा होतो.[१४] तेजीची किंवा मंदीची स्वयंवृद्धि होते. कारण आशा व निराशा सांसर्गिक असतात. तेजीला मंदीची कलाटणी मिळते किंवा मंदीला तेजीची कलाटणी मिळते. कारण प्रत्यक्ष अनुभवानें केव्हां तरी आशा-भंग होतो आणि निराशावाद अवास्तव व अस्थानीं असल्याचें दिसून येते. आशावादामुळें जी भांडवल-गुंतवण होते तिचीं फळें बाजारांत प्रत्यक्ष वस्तूंच्या रूपानें दिसून आलीं असून उत्पादन फार त्या मानानें मागणी कमी असें दिसून आलें कीं, आशाभंग होण्यास वेळ लागत नाहीं. निराशेचें पटल दूर होण्यास कांहीं साहसी उद्योगपति जबाबदार असतात. भोंवतालीं निराशेचें वातावरण पसरलें असतांहि ते डगमगत नाहींत. आणि आपलें प्रयत्न चालू ठेवतात. त्यांना यश लाभून नफा होऊं लागतो तेव्हां पुनश्च आशेचें वातावरण निर्माण होतें.[१५] ह्या मानसशास्त्रीय मीमांसेबद्दल एवढेंच म्हणतां येईल कीं, व्यापार-चक्राच्या प्रक्रियेंत आशा-निराशेला स्थान जरूर असतें. पण आशा किंवा निराशा एखाद्या गोष्टीचें कारण असण्यापेक्षां परिणाम असते. मुळांत उद्योगपतींचा वर्ग आशावादी किंवा निराशावादी कशामुळें होतो. हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आशा-निराशेच्या लाटांच्या संदर्भांत व्यापार-चक्राचा केलेला खुलासा फारच भोंगळ आहे. त्यांत सखोल विश्लेषण नाहीं आणि कोणत्याहि प्रकारची निश्चितता नाहीं. म्हणून मानसशास्त्रीय खुलासा हा अगदीं अपुरा पडतो.[१६]

---

[१४] Waves of optimistic error and pessimistic error give rise to one another in an endless chain—**Hald.**

[१५] Excessive optimism or pessimism are discovered to be wrong in terms of realisations. The mood of excessive optimism that gives rise to a high level of investment prevails until the increased output of salable goods resulting from the increased capacity is offered on the market. Contagious pessimism quickly becomes so widespread that the earlier error of optimism is now replaced by a contrary error of pessimism.

[१६] When it comes, however, to a more precise explanation of the rhythm of the cycle and of specific developments and processes that lead to turning points, the psychological theories are far from adequate—**Hald.**

तेजीमंदी चक्र ही चलनजन्य घटना :—तेजीमंदीसंबंधींच्या वर दिलेल्या दोन उपपत्त्या वगळतां उरलेल्या उपपत्त्यांचे दोन प्रमुख भाग पडतात. पहिल्या भागांत तेजीमंदी चक्र ही संपूर्णपणें **चलन-घटना** (Monetary Phenomenon) आहे असे मानणाऱ्या उपपत्त्या येतात. ह्या उपपत्त्यांचा विशेष असा सांगतां येईल कीं, चलनक्षेत्रांत विशिष्ट स्वरूपाचे बदल झाल्याशिवाय तेजी किंवा मंदी चालू राहूं शकणार नाहीं असा त्यांचा आग्रह असतो. त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी कीं, तेजीमंदी चक्राची कारणमीमांसा चलनक्षेत्रांतच शोधली पाहिजे, इतरत्र ती आढळणार नाहीं असा त्यांचा दावा असतो.[१७] दुसऱ्या भागांत ज्या उपपत्त्या येतात त्यांच्याकडून तेजीमंदीचक्राचा खुलासा आर्थिक क्षेत्रांतील कांहीं अंगभूत प्रवृत्तींच्या भाषेंत दिला जातो. पहिल्या भागांतील उपपत्त्यांना तेजीमंदी चक्राच्या **चलनगौरव मीमांसा** (Monetary Theories) असें म्हणणें चूक होणार नाहीं. दुसऱ्या भागांतील उपपत्त्यांना **चलनालाघव मीमांसा** (Non-Monetory Theories) किंवा **वास्तव प्रधान मीमांसा** (Real Theories) असें म्हणतां येईल. तेजीमंदी चक्रासंबंधीच्या उपपत्यांचें हें जें वर्गीकरण केलें आहे तें तेजीमंदीला कारणीभूत होणाऱ्या प्रमुख प्रवाहांच्या अनुरोधानें केलें आहे, हें स्पष्ट केलें पाहिजे. ह्या वर्गीकरणाचा अर्थ असा नाहीं कीं, तेजीमंदी चक्र ही चलनघटना आहे; असें मानणारे अर्थशास्त्रज्ञ चलनप्रवाहाव्यतिरिक्त इतर गोष्टींना आपल्या मीमांसेंत अजिबात स्थान देतच नाहींत, किंवा चलनप्रवाहांचें महत्त्व ज्यांना मान्य नाहीं ते त्या प्रवाहांचें अस्तित्वच नाकारतात. ह्या वर्गीकरणाचा अर्थ एवढाच घ्यावयाचा कीं, कांहीं अर्थशास्त्रांच्या मतें तेजी-मंदीचक्राचें आद्य कारण चलनसंस्थेशीं निगडित असतें व इतर अर्थप्रवाहांत होणारे बदल केवळ आनुषंगिक असतात आणि इतर अर्थशास्त्राच्या मतें चलनक्षेत्रांत होणारे फेरफार तेजीमंदीचक्राचे मूळ नसून केवळ त्याला पोषक असतात.

तेजीमंदी चक्राची चलनगौरव मीमांसा :—तेजीमंदीचक्र ही प्रामुख्यानें चलनघटना आहे. ह्या मताचें उत्तम उदाहरण म्हणून Hawtrey ह्यांनीं केलेल्या तेजीमंदीच्या मीमांसेकडे बोट दाखवितां येईल. त्यांची मीमांसा थोडक्यांत खालीं दिली आहे.

देशांतील उत्पादनाकरितां जी समस्त मागणी असते तिच्यांत वाढ होत असल्याचा अनुभव तेजीच्या काळांत व घट होत असल्याचा अनुभव मंदीच्या काळांत

[१७] The following these are important for monetary trade-cycle theories according to Mr. Hawtrey (i) That certain monetary and credit movements are necessary and sufficient conditions of the observed phenomenon of the Trade Cycle and (ii) That the periodicity of those phenomena can be explained by purely monetary tendencies which cause the movements to take place successively and to be spread over a considerable period of years.

येतो. **समस्त मागणींत वाढ होणें किंवा घट होणें हे एकंदर पैसा** वाढल्याखेरीज **किंवा कमी झाल्याशिवाय शक्य नाहीं.** एकंदर पैसा जेव्हां वाढतो तेव्हां समस्त मागणींत वाढ होऊन तेजी येते व समस्त मागणींत जेव्हां घट होते तेव्हां मंदी उद्भवते. मंदी म्हणजे दुसरें-तिसरें कांहीं नसून समस्त मागणीची (समस्त उत्पानाच्या तुलनेनें) कमतरताच होय. चलनक्षेत्रांतील अस्थिरता हें तेजीमंदीचक्राचें मूलगामी कारण होय. चलनक्षेत्रांत सुद्धां **पत-चलनांत होणारे फेरफार विशेष महत्त्वाचे** असतात. सामान्यतः पतचलनांत वाढ होऊनच समस्त मागणी वाढते आणि पतचलन कमी झाल्यामुळें समस्त मागणी कमी होते. पत-चलनांतील वाढ ही तेजीची व पतचलनांतील घट ही मंदीची खूण होय. [१८] पत-चलनांतील वाढीमुळें लोकांची पैशांतील उत्पन्नें वाढतात व त्यामुळें मागणी वाढते. उलट पतचलनसंकोच झाल्यास उत्पन्नें कमी होऊन मागणी कमी होते. [१९] Hawtrey नें तेजीमंदी चक्राबाबत जी मीमांसा केली आहे तिच्यांत चलन-क्षेत्रांतील घडामोडींना किती महत्त्वाचें स्थान आहे, हें त्यानें केलेलें तेजीमंदीचक्राच्या प्रक्रियेचें वर्णन पाहिल्यास उमजेल. तेजीमंदीचक्राला प्रथम सुरुवात कशी होते, ह्या प्रश्नाला त्यानें विशेष महत्त्व दिलेलें नाहीं. त्याच्या मतें ज्यांचा परिणाम पतचलनाच्या उपलब्धतेवर होतो किंवा व्यापारी लोकांच्या भावी घटनाबाबतच्या अपेक्षांवर होतो अशा कोणत्याहि गोष्टीमुळें तेजीमंदी चक्राची सुरुवात होऊं शकेल; पण एकदां तेजीमंदीचें चक्र फिरूं लागलें कीं, चलनविषयक घडामोडींचाच त्याच्यावर संपूर्णपणें ताबा बसतो. हें विधान समजण्यासाठीं Hawtrey नें केलेलें तेजीमंदीचे वर्णन खालीं दिलें आहे.

तेजीची वाटचाल :—समजा, कोणत्याहि कारणामुळें आर्थिक स्थिति सुधारण्याची अपेक्षा निर्माण झाली. ही अपेक्षा बहुधा प्रथम ठोक व्यापाऱ्यांच्या मनांत निर्माण होईल. कारण अर्थव्यवस्थेची नाडी त्यांच्याइतकी दुसऱ्या कोणालाच समजत नाहीं. ठोक व्यापाऱ्यांच्या व्यापाराबाबतच्या अपेक्षा वाढल्यास ते लागलीच आपल्या सांठ्यांत वाढ करूं पहातील. त्यासाठीं त्यांना जें कामचलाऊ भांडवल लागेल त्यासाठीं त्यांच्याकडून बँकांकडे मागणी केली जाईल. त्याचबरोबरीनें मालासाठीं उत्पादकांकडे मागणी नोंदवली जाईल. व्यापाऱ्यांची कर्जासाठीं मागणी बँकाकडून अर्थातच पतचलन निर्मिति करून भागविली जाईल. नव्यानें निर्माण होणाऱ्या ह्या

---

१८ Variations in effective demand, which are the real substance of the Trade Cycle must be traced to changes in bank credit—**Hawtrey.**

१९ An acceleration or retardation of the credit creation means corresponding increase or decrease in peoples income. Substantially an addition to the amount of credit created in an interval of time is reflected in an equal addition to incomes. An increase or decrease in peoples income will lead to an increase or decrease in their expendituves.

पतचलनामुळें समस्त मागणींत जी वाढ होऊं लागेल तिच्यामुळें अर्थव्यवस्थेंत तेजीचीं परिस्थिति, म्हणजे वाढता खर्च, वाढतें उत्पन्न व वाढता रोजगार अशी परिस्थिति दिसून येईल. तेजीची परिस्थिति सामान्यतः स्वयंपोषक अशीच असते. कारण पतचलनांत पडणाऱ्या प्रत्येक भरीमुळें लोकांचीं उत्पन्नें व खर्च वाढतो. त्यामुळें व्यापाराबाबतच्या अपेक्षा अधिकच सुधारून व्यापारी आणखी कर्जाची मागणी करतात आणि ती भागवली गेल्यास अर्थव्यवहारांना अधिकच तेजी येते. तेजीच्या काळांत केवळ चलनपरिमिति वाढते असें नाहीं. तर चलनगतिहि वाढते आणि त्यामुळें तेजी अधिकच वाढते.[२०] **तेजीची प्रक्रिया बराच काळपर्यन्त चालू राहण्यांत पत-चलन-वाढ होऊं शकते. ह्या घटनेचा वांटा महत्त्वाचा आहे. पतचलन-वाढ होऊं न शकल्यास समस्त मागणी वाढणार नाहीं** आणि तेजीचें बीज मूळांतच उखडलें जाईल. पतचलनवाढ ही चलन-क्षेत्रांतील महत्त्वाची घटना तेजीसाठीं आवश्यक आहे. म्हणजेच तेजी ह्या शब्दानें सूचित होणाऱ्या वाढत्या अर्थव्यवहारांचा खुलासा चलनक्षेत्रांतच शोधावा लागतो. ह्याच अर्थानें तेजीचें मूळ चलनक्षेत्रांत आढळतें. वाढता पतचलन-पुरवठा हेंच तेजीचें रहस्य होय असें म्हणणें चूक होणार नाहीं.[२१]

तेजीचा अस्त अपरिहार्य :—वाढत्या पतचलनामुळें पोसली जाणारी तेजी बेमुदत चालू कां राहूं नये? ती संपुष्टांत कां यावी? ह्याचें कारण चलनक्षेत्रांतच आढळतें. वाढत्या पतचलनामुळें लोकांचीं उत्पन्नें वाढतात. त्याचा सुरुवातीला लोकांची रोकडीकरितां जी मागणी असते तिच्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. कारण किती रोकड जवळ बाळगावी, ह्याबाबत लोकांच्या संवयी एकदम पालटत नाहींत; पण उत्पन्नें वाढूं लागल्यास व वाढत्या पतचलनामुळें किंमती वाढूं लागल्यास केव्हांना केव्हां तरी लोकांना अधिक रोकडीची आवश्यकता वाटूं लागणें अपरिहार्य आहे. त्यामुळें बँकांतून रोकड काढली जाऊं लागते. साहजिकच बँकांच्या राखीव रोकडीवर ताण पडूं लागतो व पतचलनसंकोच

[२०] There is a principle of the instability of the velocity of money which is quite distinct from the principle of the instability of credit but is apt to aggrevate its effects—**Hawtrey.**

[२१] Every loan that bankers make to traders sets in motion the expansion of demand that eventually makes the traders wish to borrow more.

The upswing of the Trade Cycle is brought about by an expansion of credit and lasts so long as the credit expansion goes on or atleast is not followed by a credit contraction—If the restriction of credit did not occur the active phase of the Trade Cycle could be indefinitely prolonged.

करण्यास त्या प्रवृत्त होतात. ह्याचा अर्थव्यवहारांवर अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं.[२२] सारांश, बँकाच्या पतचलन-निर्मितीच्या शक्तीवर मर्यादा असतात त्यांच्यामुळें तेजी संपुष्टांत येते.[२३]

आर्थिक अरिष्टाचा उद्भव :—ह्या परिस्थितींत बँकांना पतचलननिर्मितीबाबतचें आपलें धोरण उलटावें लागतें. त्यामुळें त्यांच्याकडून व्याजाचा दर वाढविला जातो. व्याजाचा दर वाढल्याचा परिणाम लगेच अर्थव्यवहारावर न झाला तरी केव्हां तरी होतोच. पतचलनसंकोचामुळें लोकांची वस्तूंकरितां मागणी कमी होऊं लागते. त्यामुळें व्यापारी लोक मालाचे सांठे मोठ्या प्रमाणांत ठेवण्यास अनुत्सुक होऊं लागतात. त्यांच्या अनुत्सुकतेला आणखीहि एक कारण असतें. पतचलनसंकोच करण्यासाठीं बँका व्याजाचा दर वाढवितात. त्यामुळें मोठे सांठे फार काळपर्यंत ठेवून घेणें महागांत पडूं लागतें. साहजिकच प्रथम उपभोक्त्यांची व नंतर त्या अनुषंगानें व्यापाऱ्यांची मालाला मागणी कमी होते. त्यामुळें लौकरच उत्पादकांना उत्पादन कमी करणें भाग पडतें. त्यामुळें बेकारींत वाढ होते आणि लोकांचीं उत्पन्नें कमी होतात. सारांश, सर्वत्र अर्थव्यवहारांचा संकोच होऊं लागतो. केवळ अर्थव्यवहारांचा संकोच होतो; एवढेंच नव्हे तर त्याहीपेक्षां भयानक असें परिणाम अर्थव्यवस्थेवर होतात. व्यापाऱ्यांचा नफा व मालमत्तेची किंमत ज्या मानानें कमी होते त्या मानानें त्यांचा खर्च किंवा देणीं कमी होत नाहींत. त्यामुळें व्यापारी दिवाळीं काढूं लागतात. बँकांचीं कर्जें वेळेवर फेडलीं जात नाहींत. त्यामुळें त्याहि आपत्तीच्या भोंवऱ्यांत सांपडतात. सारांश, सर्वत्र अविश्वासाचें, भीतीचें वातावरण निर्माण होतें. ज्याला **आर्थिक अरिष्ट** (Crisis) असें यथार्थतेनें संबोधता येईल तें अर्थव्यवस्थेला ग्रासून टाकते, सामान्यतः अरिष्ट उद्भवण्याच्या वेळीं

---

[२२] As consumers experience a rise in incomes, they do not for a time add appreciably to their cash balances, being creatures of habit. As time goes on, however, and as prices and income continue to rise, the total amount of cash in circulation must also rise. This delayed reaction eventually puts pressure on bank reserves, since it results in a withdrawal of cash from banks at a time when their deposits are rising.

[२३] What ultimately limits the expansion of credit is the absorption of money into circulation—mainly by the wage earning classes—**Hawtrey.**

It is only very gradually that the bankers can become aware that the growth of credit is threatening their reserves of coin. By the time, the drain of coin becomes perceptible, credits will already have been increased to such a point that there would be heavy additional drain of coin even if there is no further expansion of credit—**Hawtrey**

लोकांची रोकड प्राधान्य प्रवृत्ति कमालीची वाढलेली असते. रोकड प्राधान्य प्रवृत्तींत भयानक वाढ ही आर्थिक आरिष्टाची खूण मानता येईल.[२४]

मंदीची वाटचाल :—अर्थव्यवहारांचा संकोच होऊं लागल्याची परिणतीच सामान्यपणें जिला मंदी म्हणतात अशी परिस्थिति उद्‌भवण्यांत होतो, मंदीचें मुख्य वैशिष्टय असें कीं, चलनी भांडवलाच्या उपलब्धतेच्या मानानें प्रत्यक्ष भांडवल-गुंतवण फारच कमी प्रमाणांत होते. कांहीं काळपर्यंत तर असें दिसून येत असतें कीं, व्याजाचा दर कमी होत आहे; पण तरीहि भांडवल गुंतवण्यास यत्किंचितहि प्रोत्साहन नाहीं आणि त्यामुळें नवी भांडवल-गुंतवण होणें जवळजवळ थांबलेलें आहे.

मंदीचा रोकड संचलनावर होणारा परिणाम :—पतचलनसंकोच होऊन त्यांतून मंदी उद्‌भवलेली असतां तिचे परिणाम अपरिहार्यपणें लोकांची रोकडीकरितां जी मागणी असते तिच्यावर होतात. मंदीमुळें किंमती कमी झाल्याचा परिणाम प्रथम नफ्यावर होतो. पण अल्पावधींतच कामगाराचें वेतन व रोजगार कमी होऊं लागतो. लोकांचीं उत्पन्नें व किंमती कमी झाल्यामुळें लोकांची रोकडीची मागणी सावकाश-पणें पण अटळपणें कमी होत जाते. त्यामुळें रोकड वाढत्या प्रमाणावर बँकांत जाऊं लागते. जेव्हां मंदीचा काळ संपून पुनः एकदां अर्थव्यवहारांना ऊर्जितावस्था प्राप्त होते तेव्हां अशा प्रकारें बँकांत जमा झालेली रोकड बँकांना पत-चलन-विस्तार करण्यास व त्यायोगें तेजीचें पोषण करण्यास उपयोगीं पडते.[२५]

तेजीमंदी-चक्राच्या प्रक्रियेचें Hawtrey ह्यानें केलेलें वर दिलेलें वर्णन पहातां तेजीमंदी-चक्राचा व चलन-संस्थेचा किती घनिष्ट संबंध आहे हें, समजण्यास अडचण पडूं नये. Hawtrey कृत मीमांसेचा सारांश, थोडक्यांत सांगावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, पतन-चलन-विस्तारास सुरुवात झाल्यापासून पत-चलन-

---

[२४] Just as expanding demand leads traders to accelerate their purchases so shrinking demand leads them to retard their purchases—when credit has definitely turned the corner, and a contraction has succeeded to an expansion, the process of contraction will continue of its own momentum, even though the rate of interest is no longer, according to ordinary standards high —Hawtrey.

[२५] The depletion of people's cash balances is as gradual as their accumulation, and the return of currency from circulation continues for a long time after the banks have ceased to contract credit. When the revival of business begins, there is an accumulation of superfluous money in the banks, which provides the opportunity for a renewed credit expansion.

विस्तारामुळें लोकांची रोकडीची मागणी वाढून बँकांची राखीव रोकड बरीच कमी होईपर्यंत तेजी चालू राहते. त्यानंतर मुख्यतः पतचलनसंकोचामुळें मंदीची वाटचाल सुरू होते आणि पत-चलन-संकोचाचा परिणाम होऊन लोकांची रोकडी मागणी कमी होऊन बँकांजवळील राखीव रोकड जेव्हां बरीच वाढते तेव्हां तेजीची पार्श्वभूमि तयार होते. अशा प्रकारें **तेजीमंदीचें पोषण होण्यास व तेजीमंदीची कालमर्यादा ठरविण्यास चलनसंबंधित घटनाच कारणीभूत होतात.**[२६]

तेजी-मंदी-चक्राचें निवारण :—तेजी-मंदी-चक्राचें आद्य कारण पत-चलनाच्या अस्थैर्यांत आढळतें असें Hawtrey ह्यांचें मत असल्यामुळें त्यांनीं तेजी-मंदी-चक्रावरील उपाय-योजना म्हणून योग्य चलन-नीतीचा पुरस्कार करावा हें साहजिकच म्हणतां यईल. तेजी व मंदी ह्या दोन्ही गोष्टी टाळल्या पाहिजेत, ह्यासंबंधीं Hawtrey ह्यांच्या मनांत संदेह नाहीं. ह्या बाबतींतल्या त्यांच्या मताचा सारांश असा सांगतां येईल कीं, मंदी व तेजी ह्या दोन्ही अवस्था वेगवेगळ्या कारणाकरितां वाईट असतात, मंदी वाईट असते हें उघडच आहे. कारण कमी होणारें उत्पादन व वाढणारी बेकारी ह्या गोष्टी निःसंशय अनिष्ट होत. पण तेजीसुद्धां एकंदरीनें अनिष्टच असते. कारण तिचा फायदा मुख्यतः धनवानांनाच होतो. उत्पादन वाढतें आणि रोजगारहि वाढतो हें खरें पण ज्या मानानें किंमती वाढतात त्या मानानें कामगारांचें वेतन वाढत नसल्यानें कामगारवर्गाचा फायदा कळे न कळे असाच होतो. अर्थव्यवहारांच्या अस्थिरतेपेक्षां स्थैर्य असणें कोणत्याहि वर्गाच्या दृष्टीनें श्रेयस्कर आणि म्हणून मधून मधून येणारी तेजीहि अनिष्टच होय.[२७]

तेजी-मंदी-चक्रावरील उपाय-योजना :—तेजी-मंदीचक्राच्या निवारणासाठीं Hawtrey ह्यांनीं जी उपाय-योजना सुचविली आहे तिच्यांत बँकरेटमधील फेरफार ह्या चलन-क्षेत्रीय उपायाला सर्वांत महत्त्वाचें स्थान आहे. तेजीमंदीची Hawtrey

[२६] The trade cycle is a monetary phenomenon because general demand is itself a monetary phenomenon—It is the periodical character of the fluctuations in forming the trade cycle that I believe to be wholly due to monetary causes—certain monetary or credit movements are necessary and sufficient conditions of the trade cycle—**Hawtrey.**

[२७] Prosperity is largely a matter of high profits. Employment is good and the output being in proportion, there is more wealth to go round. But wages do not rise as quickly as prices and on balance the mass of people may be little better off than in depression. Certainly they are worse off than they would be under truly stable conditions with full employment and prices and profits remaining in normal proportion to wages —**Hawtrey.**

ह्यांनीं केलेली वरील मीमांसा काळजीपूर्वक वाचल्यास व्यापारी वर्गाला त्यांच्या मतें तेजीमंदीच्या प्रक्रियेंत किती महत्त्वाचें स्थान आहे हें लक्षांत येईल. व्यापारी वर्गाला गिऱ्हाइकांची पारख असल्यानें अर्थव्यवहार कोणत्या दिशेकडे झुकत आहेत, हें लौकर उमगतें. म्हणून तर त्यांचें महत्त्व आहेच; पण पत-चलनाचा विस्तार अगर संकोच मुख्यतः त्यांच्या द्वारां होतो. म्हणूनहि त्यांचें महत्त्व आहे. व्यापारी लोकांच्या भांडवलांत स्थिर भांडवल कामचलाऊ भांडवलाच्या मानानें फारच कमी प्रमाणांत असतें. प्रचलित अर्थव्यवस्थेंत कामचलाऊ भांडवलाचा पुरवठा प्रामुख्यानें बँकांकडून होत असल्यानें व्यापारी वर्ग बँकांवर बराच अवलंबून असतो. तसेंच व्यापारी वर्गाचा जो खर्च असतो त्यांत व्याजाचा वांटा फार मोठा असतो. कारण बँकांकडून कर्जें घेऊन मालाचे सांठे घेण्यासाठीं त्यांचा उपयोग करावयाचा, हें व्यापाऱ्यांचें मुख्य काम असतें. ते सांठे जोंपर्यंत मोकळे होत नाहींत तोंपर्यंत कर्जावरील व्याज द्यावें लागतें. त्यामुळें बँकांकडून आकारल्या जाणाऱ्या व्याजाचा सर्वांत अधिक परिणाम व्यापाऱ्यांच्या वर्तनावर होतो. ह्या गोष्टीचा फायदा घेऊन बँकरेटमध्यें जरूर ते फेरफार करून मध्यवर्ती बँकेला तेजीला किंवा मंदीला आळा घालतां येतो. मध्यवर्ती बँकेनें व्याजाचा दर परिणामकारकरीत्या वाढविल्यास व्यापारी वर्ग सांठे वाढविण्यास अनुत्सुक होतो व व्यापाऱ्याकडून येणाऱ्या मालाच्या मागण्या कमी झाल्यामुळें कालान्तरानें उत्पादन-संकोच होतो. ह्याहीं पेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यापारी लोक कर्जें काढण्याचें प्रमाण कमी करीत असल्यामुळें पत-चलन-विस्तारास आपोआपच आळा बसतो आणि साहजिकच तेजीचे परिणाम कमी होऊं लागतात. ह्याच्या उलट व्याजाचा दर कमी करण्याचें धोरण स्वीकारून मध्यवर्ती बँकेला मंदीची वाटचाल थोपवितां येते.[२८] Hawtrey ह्यांचा बँकरेटमधील फेरफारांवर फारच विश्वास असला तरी त्या बाबत त्यांनीं जो एक महत्त्वाचा इशारा दिला आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. तो इशारा

[२८] The immediate reaction of the rate of interest on bank advances is on the dealers in commodities who are the economic leaders. They take the initiative in production and the activity of manufacturers depends on the orders they give—An apparently slight change in the cost of borrowing, if it is just sufficient to start a movement of expansion or contraction is reinforced by the inherent instability of credit. When easy credit evokes increased orders, production feeds demand and demand stimulates production. When the brake is put on, the dealers curtail their orders, production flogs and checks demand; demand flogs and checks production--**Hawtrey.**

One of the virtues of credit regulation through bank rate is that its application can be promptly and delicately adjusted to the situation of the moment.—**Hawtrey.**

असा कीं, बँकरेटमधील फेरफार योग्य वेळीं करणें अत्यावश्यक आहे. तेजी किंवा मंदीचीं चिन्हें दिसतांच जरूर ती उपाय-योजना केली पाहिजे. नाहीं तर तेजी किंवा मंदी हाताबाहेर जाण्याचा धोका असतो. तशी परिस्थिति उद्‌भवल्यास आर्थिक परिस्थिति बँकरेटमधील फेरफारांनाहि दाद देत नाहीं.[२९]

चलनप्रधान मीमांसेचीं मुख्य सूत्रें :—तेजीमंदीसंबंधींची Hawtrey ह्यांची मीमांसा मुद्दामच वर विस्तारानें दिली आहे. ती पहातां तेजीमंदीचक्र ही चलनक्षेत्रीय घटना आहे, ह्या सिद्धान्ताचीं मुख्य सूत्रें लक्षांत येण्यास अडचण पडूं नये. तीं सूत्रें सारांशरूपानें पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—

(१) चलनक्षेत्रांतील अस्थिरता तेजीमंदीमुळें निर्माण होणाऱ्या आर्थिक अस्थिरतेच्या मुळाशीं असते, (२) तेजी किंवा मंदीचा उगम चलनसंबंधित घटनांतच आढळतो. असें दाखवितां येत नसलें तरी तेजी किंवा मंदीची वाटचाल अनुक्रमें पतचलनविस्तार किंवा पतचलनसंकोच होण्यावरच अवलंबून असते आणि तेजीची किंवा मंदीची कालमर्यादा त्या अनुरोधानेंच ठरतें. (३) **चलन-स्थैर्य** (Monetary Stability) आर्थिक स्थैर्यासाठी अत्यावश्यक आहे आणि (४) **चलन-नियंत्रणाचा** (Monetary Controls) उपयोग करूनच तेजी-मंदी-चक्रावर परिणामकारक उपाय-योजना करतां येते.[३०]

तेजीमंदीचक्र चलनरूप भांडवलाच्या अति गुंतवणीचा परिणाम :—तेजीमंदीचक्र ही प्रामुख्यानें चलनघटना आहे असें मानणारे Hawtrey खेरीज आणखी कांही अर्थशास्त्रज्ञ आहेत. प्रा. Hayek ह्यांना त्यांचे प्रतिनिधि समजतां येईल. हे अर्थशास्त्रज्ञ व Hawtrey ह्यांच्यांत थोडासा फरक आहे. तो असा कीं, Hayek प्रभृति अर्थ-

---

[२९] It is important to appreciate what an extremely and delicate instrument bank rate is. Its successful use depends on unceasing attention to the tendencies of economic activity and to all the various symptoms by which monetary policy and credit policy have to be guided.

Bank rate can always be used to contract credit if only it be raised high enough. But there is a limit to the power of stimulating an expansion of credit by lowering the bank rate.

In a wisely managed credit system any tendency to depression or to undue activity will be discerned at an early stage before the vicious circle has been joined. If action is taken before the incipient contraction or expansion of credit has gone far enough to influence the attitude of the majority of the traders towards their stock of goods or their expectations of future prices, a change in the cost of short term borrowing will have a clear field to work its effect and will not have to meet the competition of rival forces—Hawtrey.

शास्त्रज्ञ चलनविषयक घडामोडींना तेजीमंदीच्या खुलाशांत बरेंच महत्त्व देत असले तरी तेजीमंदीचक्र ही संपूर्णपणें चलन-घटना आहे असें मात्र मानीत नाहींत. आर्थिक वास्तवतेंतून उद्‌भवलेल्या प्रवाहांनाहि त्यांच्या विवेचनांत कांहीं प्रमाणांत स्थान दिलें असल्याचें आढळन येतें. एका अर्थानें मात्र त्याची मीमांसा अधिक चलन-प्रधान आहे. कारण तेजी-मंदी-चक्राची सुरुवात होण्यास देखील चलन-क्षेत्रांतील घटनाच जबाबदार असतात असे ते मानतात. उदाहरणार्थ हायक ह्यांच्या मीमांसेंत तेजी-मंदी-चक्राची जबाबदारी मुख्यत: बँकांवरच टाकल्याचें आढळून येईल.

प्रा. हायक ह्यांची मीमांसा :—Hayek ह्यांच्या मीमांसेचा सारांश थोडक्यांत असा सांगतां येईल कीं, आधुनिक अर्थव्यवस्थेंतील पतचलनपरिमितीच्या लवचिकतेमुळें व्याजाचा नैसर्गिक दर व व्याजाचा व्यावहारिक दर ह्यांच्यांत तफावत पडते आणि त्यामुळें लोकांची स्वयंस्फूर्त शिल्लक व भांडवलगुंतवण ह्यांचा समतोल वारंवार ढासळतो हेंच तेजीमंदीचक्राचें मूलभूत कारण होय. ह्या मताचा अधिक खुलासा करणें अगत्याचें आहे.[31]

अति भांडवल गुंतवणीला बँका कारण :—बँका जेव्हां पतचलननिर्मीति करून उद्योगपतींना भांडवलपुरवठा करूं लागतात तेव्हां स्वयंस्फूर्त शिल्लकीपेक्षां भांडवलपुरवठा अधिक होऊन व्याजांचा दर कृत्रिम-रीत्या खालीं येतो. त्यामुळें भांडवलगुंतवणीला प्रोत्साहन मिळून उपभोग्य वस्तूंच्या तुलनेनें उत्पादन वस्तूंसाठीं असलेली मागणी वाढते. भांडवलगुंतवण स्वयंस्फूर्त शिल्लकीपेक्षां अधिक झाल्यामुळें जी परिस्थिति उद्‌भवते तिला **अतिभांडवलगुंतवण** (Over-Investment) असें म्हणतां येईल. ही अतिभांडवलगुंतवण होण्यास पतचलनांतील लवचिकता म्हणजे पर्यायानें बँका कारणीभूत असतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अशा प्रकारच्या भांडवल गुंतवणीमुळें बाजारांत तेजी येते. जोंपर्यंत बँका पतचलननिर्मीति करावयास तयार

[30] The main features of the monetary theory of the trade cycle are as follows:—(a) Monetary expansion or contraction may not be the initiating cause but it is an essential condition of the Trade Cycle process, (b) Periodical character of cyclical fluctuations can be explained only on monetary grounds, (c) Monetary stability is the fundamental condition of economic stability, and (d) Monetary measures, if timely, are sufficient to regulate the course of a Trade Cycle.

[31] The determining cause of cyclical fluctuations is the fact that on account of the elasticity of the volume of currency media, the rate of interest demanded by the banks is not necessarily always equal to the equilibrium rate, but is in the short run, determined by considerations of banking liquidity —**Hayek.**

आहेत तोंपर्यंत कृत्रिमरीत्या बाजारांत येणारी तेजी टिकून राहण्यास हरकत नसते. पण तेजी अखंड चालू राहत नाहीं हयाचें मुख्य कारण असें कीं, बँकांकडून होणारी पतचलननिर्मीति केव्हांना केव्हां तरी थांबणें अटळच आहे. विशेषत: पतचलन-विस्ताराचा परिणाम म्हणून लोकांना जेव्हां रोखचलन अधिक प्रमाणांत लागते तेव्हां बँकांना त्या घटनकडे फार काळ दुर्लक्ष करून चालत नाहीं. लोकांची रोकडीकरतां मागणी वाढल्यास बँकांतून रोकड बाहेर जाऊं लागते आणि त्यांच्याकडील राखीव रोकड कमी होऊं लागते. अशा परिस्थितींत बँकाना आपले कर्ज व्यवहार कमी करावे लागतात व हें शक्य व्हावें म्हणून व्याजाचा दर वाढवावा लागतो. व्याजाचा दर जसा वाढतो तशी भांडवलगुंतवण कमी होऊन तेजीला आळा बसतो.[32] बँका जेव्हां व्याजाचा दर कमी करतात तेव्हां तेजी येते. उलट बँका जेव्हां व्याजाचा दर वाढवतात तेव्हां भांडवलगुंतवण कमी होऊन मंदी येते. बँकांचें वर्तन व त्यामुळें पत-चलनविस्तारांतूनच अपरिहार्यपणें उद्भवणारा पतचलनसंकोच हे तेजी पाठोपाठ मंदी येण्याचें चलनक्षेत्रीय कारण झालें. पण मंदी येण्याचें दुसरेंहि एक कारण असतें आणि तें कांहींसे चलनक्षेत्रबाह्य असतें. तें कारण विशे काळजीपूर्वक समजून घेणें आवश्यक आहे.

पतचलननिर्मीतिमुळें भांडवल गुंतवणांत जी वाढ होते तीमुळें **उत्पादनाचा सांचाच** (Structure of Production) बदलतो. भांडवलगुंतवणींत जेव्हां वाढ होते तेव्हां भांडवली वस्तूंचें उत्पादन वाढूं लागतें. भांडवली वस्तूंकरितां मागणी असल्यानें त्यांची किंमत वाढू लागते. साहजिकच उत्पादनसाधनांचा ओघ त्या त्या वस्तूंच्या उत्पादनाकडे वळतो. त्यामुळें उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनांत गुंतलेली उत्पादन साधनें कमी होऊन उपभोग्य वस्तूंच्या किंमती वाढतात. भांडवली वस्तूंचे उत्पादन वाढणें व उपभोग्य वस्तूंचें उत्पादन कमी होणें हा उत्पादनसांच्यांतील बदल महत्त्वाचा होय. हा किंवा हयाच्या उलट प्रकारचा बदल जव्हां लोकांची स्वयंस्फूर्त शिल्लक कमीअधिक होते तेव्हां होतो किंवा भांडवली वस्तूंच्या खरेदीसाठीं उपलब्ध होणारा पैसा बँकांमुळें कृत्रिमरीत्या कमी झाल्यास होतो.[33] लोकांची स्वयंस्फूर्त शिल्लक वाढल्यामुळें किंवा बँकानीं पतचलननिर्मिति करून भांडवलगुंतवण करणाऱ्यांना पैसा उपलब्ध करून दिल्यामुळें होणारा परिणाम एकाच स्वरूपाचा असला, म्हणजे दोहोंमुळें भांडवली वस्तूंचें उत्पादन तुलनेनें वाढत असलें, तरी त्या दोहोंत एक महत्त्वाचा भेद असतो. तो असा कीं, लोकांची स्वयंस्फूर्त शिल्लक वाढल्यामुळें होणारा उत्पादनसांच्यांतील बदल टिकाऊ स्वरूपाचा असतो. उलट लोकांना आपला उपभोग कमी करणें भाग पडल्यामुळें उत्पादनसांच्यांत होणारा बदल

---

[32] It is clear that a process of progressive increase in the supply of money cannot be maintained under our existing credit system, especially since as it proceeds more extensive use will be made of cash—**Hayek.**

जात्याच बिन टिकाऊ असतो.[३४] कृत्रिम भांडवलपुरवठ्यासाठीं उपभोगाचा त्याग करावा लागतोच, पण तो त्याग उपभोक्त्यांनीं स्वखुषीनें केलेला नसतो. तो त्यांच्या-वर लादलेला असतो. त्यांचा उपभोग कमी होतो ह्याचें कारण तसें करण्याची त्यांची तयारी असते असें नसून उपभोग्य वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळें त्यांच्या उत्पन्नांत पूर्वींएवढें उपभोगाचें प्रमाण बसत नाहीं हें असतें. त्यांतहि विशेष गोष्ट ही कीं अशा प्रकारें सक्तीचा त्याग ज्यांना करावा लागतो त्यांना त्याचा फायदा न मिळतां इतरांनाच मिळतो. स्वखुषीनें जे उपभोग कमी करतात त्यांना आपल्या वाढलेल्या शिलकीच्या उपभोग आपल्या फायद्यासाठीं करतां येतो. पण किंमती वाढल्यामुळ जेव्हां उपभोग कमी करावा लागतो तेव्हां त्याग करणाराला त्या त्यागाचा कांहींच फायदा मिळूं शकत नाहीं.[३५]

कृत्रिमरीत्या भांडवलगुंतवण झाल्यामुळें उत्पादनसांच्यांत होणारा बदल जात्याच अल्पकाल टिकणारा असतो. कारण उपभोग कमी करणें ज्यांच्यावर लादलें गेलें असतें ते संधि मिळताच म्हणजे चलनरूप उत्पन्न वाढतां च उपभोगांत वाढ कर-ण्याचा प्रयत्न करतात.[३६] ह्याच कारणामुळें तेजीच्या काळांत उपभोग्य वस्तूसाठीं

---

[३३] A transition to more (or less) capitalistic method of production will take place if the total demand for producers' goods (expressed in money) increases (or decreases) relatively to the demand for consumption goods. This may come about in one of two ways; either as a result of changes in the volume of voluntary savings (or its opposite) or as a result of a change in the quantity of money which alter the funds at the disposal of entrepreneurs for the purchase of production goods—**Hayek.**

[३४] When a change in the structure of production is brought about by saving, we are justified in assuming that the changed distribution of demand between consumption goods and production goods would remain permanent since it is the effect of voluntary decisions on the part of individuals.

[३५] This sacrifice is not voluntary and is not made by those who will reap the benefit of new investments. It is made by consumers in general who, because of the increased competition from the entrepreneurs who have received the additional money are forced to forgo a part of what they used to consume. It comes about not because they want to consume less but because they get less goods for their money income—**Hayek.**

[३६] There can be no doubt that if their money receipts should rise again they would immediately attempt to expand consumption.

असलेली मागणी वाढत जाते. त्या वस्तूंच्या किंमतीहि वाढत असतात. जोंपर्यंत बँकांकडून कृत्रिमरीत्या भांडवलपुरवठा केला जातो तोंपर्यंत उत्पादनवस्तूंची मागणी व त्यांच्या किंमतीहि वाढत जाऊन अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होत नाहीं; पण बँकांकडून भांडवलपुरवठ्यांत होणारी वाढ थांबली रे थांबली कीं, उपभोग्य वस्तूंवर जो खर्च वाढतो त्या प्रमाणांत भांडवली वस्तूंवरील खर्च वाढत नाहीं. [३७] परिणामीं बँकाकडून होणारा भांडवलपुरवठा वाढण्याचें थांबल्यानंतर भांडवली वस्तूंच्या—विशेषतः स्थिर भांडवलांत समाविष्ट होणाऱ्या वस्तूंच्या—किंमती पडूं लागतात व त्यांतून मंदी उद्भवते. बँकांकडून होणारी भांडवलपुरवठ्यांतील वाढ थांबल्यास हा परिणाम निश्चितपणें होतो हें खरें असलें तरी ह्या ठिकाणीं मुख्य लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, बँकांकडून होणारा भांडवलपुरवठा वाढत गेला तरीसुद्धां व्हावयाचें तें टळत नाहीं. कारण केव्हां ना केव्हां तरी उपभोग्य वस्तूंची मागणी भांडवली वस्तूंच्या तुलनेनें वाढणें आणि त्यामुळें उपभोग्य वस्तूंच्या मानानें भांडवली वस्तूवरील खर्च कमी होऊन त्यांच्या किंमती पडणें अपरिहार्य असतें. [३८]

तटस्थ चलनाचा तोडगा :—प्रा. हायक ह्यांनीं तेजीमंदीची जी मीमांसा केली आहे तिच्यांत चलन-पुरवठ्यांत होणाऱ्या बदलांना मध्यवर्ती स्थान आहे. चलनपुरवठ्यांत जेव्हां वाढ करण्यांत येते तेव्हां ती वाढ तेजीस कारणीभूत होते. मंदीचे वारे वाहूं लागण्याचीं जीं कारणें असतात त्यामध्यें चलनपुरवठ्यांत वाढ होणें थांबणें किंवा चलनपुरवठा कमीच होणें हें कारण सर्वांत महत्त्वाचें असतें. ह्यावरून प्रा. हायक ह्यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं, तेजीमंदी टाळावयाची असेल तर चलनपरिमितींत बदल न करणें हा सर्वोत्तम मार्ग. चलनपरिमिति स्थिर ठेवल्यास, प्रा. हायक ह्यांच्या मतें, चलनसंस्था अर्थव्यवस्थेंत घोटाळे निर्माण करण्यास कारणीभूत होत नाहीं. म्हणून चलनपरिमिति स्थिर राखणें हा प्रा. हायक ह्यांनी सूचवलेला तेजीमंदी चक्रावरील तोडगा होय. हा तोडगा मान्य करणें म्हणजेच चलनाला **तटस्थ चलन** (Neutral Money) बनविणें होय. चलनपरिमिति स्थिर केल्यास चलन तटस्थ होतें ह्याचा अर्थ असा कीं, त्या परिस्थितींत अर्थव्यवस्थेंत जे बदल होतात त्यांची जबाबदारी चलनसंस्थेवर अजिबात पडत नाहीं.

---

[३७] The immediate effect of the banks ceasing to add to their loans is that the absolute increase in the amount of money spent on consumption goods is no longer compensated by a proportional increase in the demand for consumption goods —Hayek.

[३८] For obvious reasons the banks cannot continue indefinitely to expand credit and even if they could the other effects of a rapid and continuous rise of prices, after a while, make it necessary to stop the process of inflation.

चलनगौरव व चलनलाघव मीमांसांतील भेद :—प्रा. हायक ह्यांनीं तेजीमंदीची जी मीमांसा केली आहे तिच्यांत चलनबाह्य घटनांचा समावेश झालेला असला तरी त्या मीमांसेला चलनगौरव मीमांसा असेंच म्हणावें लागतें. कारण तेजीमंदी-चक्राचें मूळ असलेली अतिभांडवलगुंतवण होण्यास कृत्रिमरित्या वाढलेली चलन-परिमितीच जबाबदार असते. निराळ्या शब्दांत प्रा. हायक प्रभृतींच्या मीमांसेप्रमाणें **चलनरूप भांडवलगुंतवण** (Monetary Investment) वाजवीपेक्षां अधिक होते हें तेजीमंदीचक्राचें कारण असल्यानें ती मीमांसा चलनगौरव मीमांसा समजली जावी हें स्वाभाविकच आहे. चलनगौरव मीमांसेच्या उलट प्रकारची तेजीमंदीचक्राची जी मीमांसा असते तिला चलनलाघव मीमांसा म्हणतां येईल. अशा मीमांसेंत चलन-परिमितींत होणाऱ्या बदलांची दखल घेतली जाते; पण तेजीमंदीत ह्या बदलांचें स्थान गौण असतें असा युक्तिवाद केला जातो. चलनलाघव मीमांसेला वास्तव प्रधान मीमांसा असेंहि म्हणता येईल. कारण चलनसंस्थेचें आवरण बाजूस केल्यास अर्थव्यवस्थेंत जे वास्तव प्रवाह दिसून येतील त्यांना त्या मीमांसेत प्रमुख स्थान दिले जातें. तेजीमंदीचक्राची चलनगौरव मीमांसा व चलनलाघव मीमांसा ह्यांच्यातील मुख्य भेद असा सांगतां येईल कीं, पहिल्या प्रकारच्या मीमांसेंत चलनसंस्थेंत व विशेषत: चलनपरिमितींत होणाऱ्या बदलांना कारण म्हणून प्रधान स्थान दिलें जातें तर दुसऱ्या प्रकारच्या मीमांसेंत चलनसंस्थेचें स्थान तुलनेनें गौण असते.[३९]

अति भांडवलगुंतवणीचा दुसरा प्रकार :—चलनलाघव मीमांसा दोन प्रकारच्या आहेत. पहिल्या प्रकारच्या मीमांसेंत तेजी मंदीची जबाबदारी **वस्तुरूप भांडवल गुंतवण** (Real Investment) वाजवीपेक्षां अधिक होते ह्यावर टाकली जाते. दुसऱ्या प्रकारच्या मीमांसेंत भांडवलशाही अर्थ-व्यवस्थेंत उत्पादनाच्या मानानें उपभोग कमी पडतो, ही घटना तेजीमंदीस जबाबदार आहे असें दाखविलें जाते. पहिल्या प्रकारची मीमांसा करणारांचा युक्तिवाद असा कीं चलनपरिमिति स्थिर राहिली तरीहि भांडवलशाही अर्थ-व्यवस्था तेजीमंदीचक्रापासून मुक्त व्हावयाची नाहीं, कारण मधून मधून अर्थव्यवस्थेला भांडवलगुंतवणीचे झटके येतात. त्यावेळेस चालू उत्पादनाचा बराच मोठा भाग भांडवल निर्मितीसाठीं वापरला जातो. भांडवलगुंतवण वाढल्यास उद्योगपतींचा

[३९] The difference between monetary and non-monetary theories concerns, as the names suggest, the role of money and monetary factors in bringing about the boom and the depression. The theory of the writers of this (non monetary) group does not run in monetary terms. They mention monetary forces but relegate them to a relatively subordinate rate. Monetary factors are for them passive conditions which are to be taken for granted, rather than impelling forces—**Haberler**.

आशावाद कारणीभूत होतो हें खरेंच पण हा आशावाद विनाकारण नसतो. त्या काळांत भांडवलदारांना मिळणारा नफा कांहीं आर्थिक घडामोडीमुळें खरोखरच वाढत असतो आणि भांडवलदारांचा आशावाद व होणारी भांडवल-गुंतवण ह्यांना खरोखरच सबळ कारण असतें. पण खऱ्या कारणानें होणारी भांडवलगुंतवणहि भांडवशाहीत 'अति' होते. असें होण्याचें मुख्य कारण म्हणजे भांडवलशाही ही अनियोजित अर्थव्यवस्था असते हें होय. प्रत्येक उद्योगपति आपल्या पुरता स्वतंत्रपणें निर्णय घेतो. सर्व आर्थिक व्यवस्थेचा विचार करण्याचें प्रयोजन कोणासच नसतें. त्यामुळेंच प्रत्येकजण आपली भांडवलगुंतवण वाढवूं लागला कीं समस्त भांडवलगुंतवण बहुधा जरुरीपेक्षां अधिक होते. ती अधिक झाली आहे हें जेव्हां नव्यानें निर्माण होणाऱ्या भांडवलाचा उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठीं उपयोग होऊं लागला कीं उमजतें. त्यावेळेस असें आढळून येतें कीं नव्यानें बाजारांत येणाऱ्या उत्पादनाला त्या उत्पादनाचा उठाव व्हावा एवढी मागणी नसते. हें ज्व्हां आढळून येते. तेव्हां भांडवलगुंतवणावर मिळणारा नफा कमी होतो आणि बाजारांत ज्याला **अत्युत्पादन** (Over Production) म्हणण्यांत येते ती परिस्थिति उद्‌भवते. ही परिस्थितीच मंदीला कारणीभूत होते.[४०] सारांश, मधूनमधून होणारी अति भांडवल गुंतवण हें मंदीचें मूळ होय. अति भांडवलगुंतवणामुळें होणारी तेजीमंदी चक्री स्वरूपाची असते. कारण मूळांत भांडवलगुंतवण होण्यास जी गोष्ट कारणीभूत होते ती पुन्हा पुन्हा उद्‌भवणारी असते. ह्या प्रकारच्या युक्तिवादाचा पुरावा म्हणून Schumpeter ह्यांनीं तेजीमंदीचक्राची जी मीमांसा केली आहे, तिच्याकडे बोट दाखवितां येईल. त्यांच्या मतें आर्थिक इतिहासक्रमाचा अनुभव असा आहे कीं, अर्थव्यवस्थेंत नवीन शोध—नव्या वस्तूंचा, बाजार पेठेचा किंवा उत्पादनतंत्रांतील सुधारणांचा—लागण्याच्या लाटा येत असतात. शोधाच्या प्रत्येक लाटेमुळें-उत्पादन खर्चांत कपात झाल्यामुळें किंवा वस्तूंचें भाव वाढल्यामुळें—उद्योगपतींचा नफा वाढून भांडवल गुंतवणीस प्रोत्साहन मिळतें. वर दाखविल्याप्रमाणें ही भांडवलगुंतवण जरुरीपेक्षां अधिक होऊन मंदीस कारणीभूत होते. शोधांची दुसरी लाट येईपर्यंत ही मंदी टिकते, मग पुनः तेजीमंदीचें चक्र येतें.[४१]

---

[४०] Good trade leads to a rapid increase in industrial equipment and later output and finally to a decline in the marginal demand price for consumers goods. A depression follows in which the growth of industrial equipment and output is checked. The marginal demand prices for consumption goods rise again and a new period of activity begins.

[४१] There is no reason why inventions should not be distributed more or less evenly in time but there are good reasons for believing that in practice new methods come into use in a mass—**Schumpeter.**

उपभोगन्यूनतेची मीमांसा (Under Consumption Theory) :— मंदीला उपभोगाची कमतरता जबाबदार आहे असें म्हणणाऱ्यांचा युक्तिवाद असा कीं भांडवलशाहींतील आर्थिक विषमतेमुळें बहुसंख्य लोकांच्या हातांत फारशी क्रयशक्ति येतच नाहीं. ज्यांच्या हातांत ती केंद्रित होते त्यांच्यांत आपल्या उत्पन्नाचा उपभोग न घेतां भांडवलसंचय करण्याची प्रवृत्तीच दिसून येते. त्यामुळें कालान्तरानें असें दिसून येतें कीं, उत्पादन ज्या मानानें वाढत आहे त्या मानानें उपभोग वाढत नाहीं. बहुसंख्य लोकांना क्रयशक्ति कमी पडल्यामुळें, त्यांच्या गरजा अतृप्त असूनहि व त्या भागविण्याची इच्छा असूनहि उपभोग वाढवितां येत नाहीं व उरलेल्या अल्पसंख्याकांना उपभोग वाढविणें शक्य असूनहि तो वाढविण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत नसते. ह्या परिस्थितीमुळें मंदी येते. मंदीच्या काळांत भांड-वल संचयाच्या प्रवृत्तीला कांहीं काळ आळा बसतो. पण कांहीं काळपर्यंतच भांडवलसंचयाची प्रवृत्ति भांडवलदारांना स्वस्थ बसूं देत नाहीं आणि पुनः येरे माझ्या मागल्या ह्या न्यायानें ते भांडवलसंचय जोमानें सुरू करतात व पुनः एकदां मंदीचा प्रसंग आपल्यावर ओढवून घेतात. सारांश, भांडवलशाहींत अपरिहार्यपणें दिसून येणारी आर्थिक विषमता व भांडवलदार वर्गाची अनावर भांडवलसंचय प्रवृत्ति व ह्या दोहोंमुळें पडणारी उपभोगाची कमतरता ह्या गोष्टी तेजीमंदी चक्राबद्दल जबाब-दार असतात. मधूनमधून येणारी मंदीहि भांडवशाहीची तार्किक परिणति होय. साहजिकच ती अटळ असते.[४२] तेजीमंदी चक्राची ही जी मीमांसा आहे तिला

---

४२ In modern societies a larger portion of the wealth produced belongs to a small class. In active times their incomes rise more rapidly than their consumption and the surplus income is saved. There results for the community as a whole a slight deficiency of spending and a corresponding excess of savings. The wealthy class seeks to invest its new saving in productive enterprises, and thereby increasing the supply of goods and also increasing the income from which further savings will be made. This process runs cumulatively during the years of prosperity until finally the market becomes congested with goods which cannot be sold at profit. Then prices fall, liquidation ensues—During the period of depression the glut of goods weighing upon the markets is gradually worked off and the prospect of profitable investment slowly returns. But after a while the chronic impulse towards over-saving becomes fully operative once more; soon or late it begets another congestion of the market and this congestion begets another depression—**Hobson.**

विशेष महत्त्व प्राप्त होण्याचें कारण एवढेंच सांगतां येईल कीं, **कार्ल मार्क्सच्या** भांडवलशाही विषयक विवेचनांत हीच मीमांसा अभिप्रेत आहे.

कीन्सची मीमांसा:—तेजी-मंदी चक्रासंबंधींची Keynes ह्यांची मीमांसा आधुनिक अर्थशास्त्रांत विशेष मानली जाते. तेव्हां तिचें विवेचन विस्तारानें केलें पाहिजे. त्यापूर्वी हें सांगितलें पाहिजे कीं, खालीं दिलेली मीमांसा कीन्सची म्हणण्यापेक्षां कीन्सप्रेरित म्हणणें अधिक बरोबर होईल. कारण कीन्स ह्यांनी स्वतः केलेली मीमांसा बरीच त्रोटक होती. तिच्यांत कीन्स ह्यांच्या अनुयायांनी व त्यांच्याशीं सहमत होणाऱ्या Hicks प्रभृति अर्थशास्त्रज्ञांनीं जी भर टाकली तिच्यामुळेंच कीन्स ह्यांनीं मूळांत केलेल्या मीमांसेला विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें आहे.

कीन्स ह्यांच्या मतें खाजगी रीत्या होणाऱ्या भांडवल-गुंतवणींत (Private Investment) जे फेरफार होत असतात त्यांत तेजीमंदी चक्राचा खुलासा आढळतो. खाजगी भांडवलगुंतवणीच्या प्रमाणांतील गतिमान बदल हें तेजीमंदी चक्राचें कारण आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.[४३] पण खाजगी भांडवलगुंतवण अस्थिर असते ह्याचें तरी कारण काय? कीन्सवादी अर्थशास्त्राची परिभाषा वापरून असें म्हणतां यईल कीं, भांडवलाची **सीमान्त लाभक्षमता** (Marginal Efficiency of Capital) अस्थिर असते म्हणून खाजगी भांडवलगुंतवण अस्थिर होते. भांडवलाची लाभक्षमता म्हणजे भांडवलगुंतवण करण्यापासून मिळणाऱ्या नफ्याचें अपेक्षित प्रमाण. हें अपेक्षित प्रमाण प्रचलित व्याजाच्या दरापेक्षां अधिक असेल तर भांडवलगुंतवण केली जाते. अन्यथा ती केली जात नाहीं. कोणत्याहि वेळीं भांडवलगुंतवण करावयाची असेल तर भांडवलाच्या सीमान्त लाभक्षमतेचीच—म्हणजे जें भांडवल नव्यानें गुंतवावयाचें असेल त्यावरील अपेक्षित नफ्याचीच—व्याजाच्या दराशीं तुलना करून नवी भांडवल-गुंतवण इष्ट कीं, अनिष्ट हें ठरविलें जातें. भांडवलाची सीमान्त लाभक्षमता स्थिर असती तर भांडवल गुंतवण अस्थिर झाली नसती; भांडवलाची सीमान्त फलक्षमता स्थिर असून व्याजाचा दर अस्थिर असतांहि भांडवलगुंतवण अस्थिर झाली असती. पण व्याजाचा दर सामान्यतः चिकट व सहसा आपणहून न बदलणारा असा असतो. पण भांडवलाची सीमान्त लाभक्षमता अस्थिर असते म्हणून भांडवल गुंतवण अस्थिर असते. आणि भांडवल गुंतवणीच्या अस्थिरतेंतून तेजीमंदीचक्र उद्‌भवतें, असा तेजीमंदीचक्राचा खुलासा देतां येईल.[४४]

The last cause of all real crises always remains the poverty and restricted consumption of the masses as compared to the tendency of capitalist production to develop in such a way that only the absolute power of consumption of the entire society would be their limit—Marx.

[४३] Business cycles result from the variations in the rate of private investment.

पण भांडवलाची सीमान्त कार्यक्षमता अस्थिर कां असावी आणि तिच्यांतील अस्थिरतेमुळें चक्री स्वरूपाचे फेरफार अर्थव्यवहारांत कां दिसून यावेत, हे प्रश्न लगेच उपस्थित होतात. त्यांचें उत्तर दिल्याशिवाय आणि तेजीमंदीची स्वयंवृद्धि कां होते, हें सांगितल्याशिवाय तेजीमंदीची संगति नीट लागावयाची नाहीं. त्यासाठीं तेजीमंदीचक्रांतील घटना कशा व कां होतात हें सांगितलें पाहिजे.

तेजीचें विश्लेषण :—प्रथम तेजी विचारांत घेऊं. भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढावयास लागून तेजीची सुरुवात होते. भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढण्याचें कारण त्या पूर्वीच्या मंदींत आढळतें, हें यथाकाल दाखविण्यांत येईलच. भांडवलाची लाभक्षमता वाढली म्हणजे खाजगी भांडवल गुंतवण वाढते. ती वाढली कीं, अर्थव्यवस्थेचीं चक्रें वेगानें फिरूं लागतात. भांडवलगुंतवण वाढते ह्याचा अर्थ उत्पादकाकडून पूर्वीपेक्षां अधिक खर्च भांडवली वस्तूंवर केला जातो असाच होतो. त्यामुळें भांडवल गुंतवण जेवढी वाढते तेवढ्या रकमेनें अर्थव्यवस्थेंतून उद्‌भूत होणारीं उत्पन्नें लगेच वाढतात. उदाहरणार्थ, १० कोटींची नवी गुंतवण झाली म्हणजे उत्पन्नांत दहा कोटींची भर पडते; उत्पन्न वाढल्यामुळें उपभोग्य वस्तूंवरील खर्च वाढण्यास चालना मिळते. उपभोगावरील खर्च किती वाढतो, हें नव्यानें मिळणाऱ्या उत्पन्नाचा किती भाग लोकांकडून उपभोग्यवस्तूवर खर्च केला जातो ह्यावर अवलंबून असतें. हा भाग सीमान्त उपभोग प्रवृत्तीवरून निश्चित होतो.

सीमान्त उपभोगप्रवृत्ति ५० टक्के असेल——म्हणजे नव्यानें मिळणाऱ्या उत्पन्नाचा निम्मा भाग उपभोगावर खर्च करण्यास लोक प्रवृत्त होत असतील—तर जेवढी भांडवलगुंतवण प्रथम केलेली असते तेवढीच भर उपभोग खर्चांत पडते असें दाखवितां येईल. कशी तें प्रत्यक्ष आंकडेवारीनेंच स्पष्ट होईल. समजा, मूळची भांडवल-गुंतवण १६ कोटी आहे. लगेच १६ कोटींनीं लोकांचीं उत्पन्नें वाढतील. त्यांतील ८ कोटि उपभोगावर खर्च केले जातील. त्यामुळें उपभोग्य वस्तूंची निर्मिति करणाऱ्या उद्योगधंद्यांतून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नांत ८ कोटींची भर पडेल. त्यामुळें उपभोगांत पुनः चार कोटींची भर पडेल. त्यामुळें चार कोटींनीं उत्पन्नांत भर पडून उपभोग दोन कोटींनीं वाढेल. नंतरच्या टप्प्याला उपभोग एक कोटीनें वाढेल, नंतर

४४ Keynes finds the essence of business cycle in variations in the rate of investment caused by cyclical fluctuations in the marginal efficiency of capital. The rate of interest which along with marginal efficiency of capital determines the rate of investment is relatively sticky or stable and is not a motivating force in cyclical fluctuations. Propensity to consume which is relatively stable is not an important factor accounting for cyclical fluctuations. It is the marginal efficiency of capital which plays the all important role in cyclical fluctuations—**Dillard.**

तो ५० लाखानें वाढेल, नंतर २५ लाखानें वाढेल आणि अशा वाढीमुळें शेवटीं उपभोग खर्चांत जेवढी भांडवल गुंतवण झाली असेल तेवढीच भर पडली असल्याचें दिसून येईल. म्हणजे भांडवल गुंतवण म्हणून खर्च केलेल्या प्रत्येक रुपयामुळें दोन रुपयांची उत्पन्नांत भर पडेल. (एक रुपया मूळचा व एक रुपया उपभोग वाढल्यामुळें निर्माण होणाऱ्या उत्पन्नाचा) मूळची भांडवल गुंतवण व शेवटीं वाढणारें उत्पन्न ह्यांच्यांतील प्रमाणालाच कीन्स ह्यांनी **गुणक** (Multiplier) असें नांव दिलें आहे. हें प्रमाण १:२ असें असेल तेव्हां गुणक दोन होतो.[४५] सीमान्त उपभोग प्रवृत्ति जेवढी अधिक तेवढा गुणक अधिक होईल, हें गणित जाणणाऱ्यांच्या सहज लक्षांत येईल.[४६] सीमान्त उपभोग प्रवृत्ति शून्य असेल म्हणजे वाढलेल्या उत्पन्नांतून कांहींच खर्च केला जाणार नाहीं, अशी परिस्थिति असेल तर प्राथमिक भांडवलगुंतवणीमुळें उत्पन्नांत जेवढी भर पडते त्यापेक्षां अधिक भर पडावयाची नाहीं; पण सीमान्त उपभोग-प्रवृत्ति शंभर टक्के असेल––म्हणजे मिळेल तें उत्पन्न लोकांकडून लगेच खर्च होणार असेल––तर मूळच्या भांडवलगुंतवणीमुळें एकंदर खर्चांत किती भर पडेल हें सांगतांच यावयाचें नाहीं. निराळ्या शब्दांत, त्या परिस्थितींत गुणक अमाप असेल.

गुणकाची कल्पना मूळच्या भांडवली खर्चामुळें उपभोगांत किती भर पडते हें समजण्यास मदत करते; पण ही प्रक्रिया तेवढ्यावरच थांबत नाहीं. कारण उपभोग वाढला म्हणून पुनः भांडवली खर्चांत वाढ करणें भाग पडतें. म्हणजेच ज्याप्रमाणें नव्या भांडवलगुंतवणींतून उद्‌भवणारा **उपभोग** किंवा थोडक्यांत **गुंतवण-जन्य उपभोग** (Investment Induced Consumption) असतो, त्याप्रमाणें नव्या उपभोगांतून उद्‌भवणारी भांडवल गुंतवण किंवा थोडक्यांत **उपभोग-जन्य गुंतवण** (Consumption induced Investment) असते. उपभोगावर वाढणारा खर्च व त्यासाठीं करावी लागणारी भांडवल गुंतवण ह्यांच्यांतील प्रमाणाला उद्देशून **प्रवृद्धिप्रमाण** (Accelerator) असें नांव कीन्सवादी अर्थशास्त्रांत देण्यांत आलें आहे.[४७] उत्पादन वाढत जाण्याचा भांडवल-गुंतवण प्रमाणावर जो परिणाम होतो त्यांतच तेजी-मंदी चक्राचें रहस्य आढळतें असा दावा अलीकडे प्रा. **हिक्स** ह्यांनीं केला असल्यामुळें आतांशा तेजी-मंदी-चक्राच्या मीमांसेंत प्रवृद्धि प्रमाण ह्या कल्पनेला फारच महत्त्व प्राप्त झालें आहे.[४८] दहा

---

[४५] The multiplier is the ratio of the change in income to the change in investment.

[४६] The multiplier will be higher greater the marginal propensity to consume.

[४७] (Induced consumption may in turn induce further investment) The acceleration coefficient is the ratio between a net change in consumption outlays and induced investment.

[४८] The main cause of fluctuations in investment is to be found in effect of changes in output (or income) on investment—**Hicks**.

कोटींनीं उपभोग-खर्च वाढल्यामुळें भांडवल गुंतवणींत २० कोटींची वाढ करावी लागत असेल तर प्रवृद्धिप्रमाण दोन होतें. हिक्स ह्यांची शब्द-रचना वापरून असें म्हणतां येईल कीं, गुणकदर्शक आंकड्यानें भांडवल-गुंतवणीचा उत्पादनावर होणारा **परिणाम** (Effect of Investment on Output) व्यक्त होतो, व प्रवृद्धिप्रमाणदर्शक आंकडा उत्पादन वाढीचा भांडवल-गुंतवणीवर होणार परिणाम (Effect of Output on Investment) व्यक्त करतो.

स्वयंवृद्धीचा खुलासा:—गुणकप्रमाण व प्रवृद्धिप्रमाण ह्यांच्यामुळें तेजीची प्रक्रिया स्वयंवृद्धीची कां असते ह्याचा पत्ता लागतो. तसेंच अर्थव्यवहारांत वेगवान आंदोलनें कां होतात ह्याचा खुलासा त्यामुळें होतो.[४९] मूळच्या भांडवलगुंतवणीच्या मानानें उत्पन्नावर, खर्चावर, उत्पादनावर, रोजगारावर होणारा परिणाम गुणक-प्रमाण व प्रवृद्धिप्रमाण ह्यांच्यामुळें मोठा होतो व त्यामुळें भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढती राहून भांडवलगुंतवणहि वाढत्या प्रमाणावर होऊं लागते.

मंदी कां येते ? :—परन्तु तेजीच्या स्वयंवृद्धीची प्रक्रिया जिला शेवट नाहीं अशी नसते. ती प्रक्रिया कधीं ना कधीं तरी संपुष्टांत येतेच. कारण स्वयंवृद्धीच्या प्रक्रियेंतच तिच्यावरच ज्यांच्या मर्यादा पडतील अशा गोष्टी असतात.[५०] आणि त्यांचा जेव्हां प्रभाव पडूं लागतो तेव्हां तेजी थांबते आणि मंदी येते.

तेजीला बाधक ठरणाऱ्या पण तेजीच्या प्रक्रियेंतच आढळणाऱ्या तीन गोष्टी दाखवितां येतील. त्या अशा :—(१) तेजीमुळें उत्पन्नें वाढत जातात. पण उत्पन्नें वाढत गेल्यामुळें वाढत जाणारें उपभोगाचें प्रमाण मात्र कमी होत जातें. ह्याचें कारण कीन्स ह्यांनीं सांगितलेल्या घटत्या उपभोगप्रवृत्तीच्या सिद्धान्तांत आढळतें. ह्या सिद्धान्तानुसार उत्पन्नाचें प्रमाण जसजसें वाढत जातें तसतसें उपभोगाचें प्रमाण कमी होत जातें. त्यामुळें भांडवलगुंतवण जशी वाढवावी तसें गुणक-प्रमाण कमी होऊं लागून स्वयंवृद्धीवर आळा घातला जातो.[५१] (२) गुणकप्रमाण कमी होतें एवढेंच नव्हे तर प्रवृद्धीप्रमाणहि कमी होतें. तेजीमुळें उत्पादनसाधनांचा वापर वाढत जातो. पण ज्या प्रमाणांत तो वाढत जातो त्या प्रमाणांत उत्पादन वाढविण्यास म्हणजेच भांडवल-गुंतवण वाढविण्यास असलेला वाव कमी होत जातो. साहजिकच भांडवल वाढण्याचें

---

[४९] The theory of multiplier and the theory of the accelerator are the two sides of the theory of fluctuations just as the theory of demand and the theory of supply are the two sides of the theory of value—**Hicks**.

[५०] The expansionist process contain within itself self-limiting factors which bring the upward movement to a close.

[५१] The expansion is necessarily halted by the functional relation of consumption to income—**Hansen.**

प्रमाण कमी होतें.[५२] आणि (३) भांडवलगुंतवणीमुळें भांडवलसंचय साहजिकच वाढत जातो आणि त्यामुळेंच भांडवलाची सीमान्त लाभक्षमता कमी होते.[५३] सारांश, तेजी कांहीं काळपर्यंत चालली कीं, भांडवलाची लाभक्षमता कमी होऊन त्यांतून मंदी येते.[५४]

मंदीची प्रक्रिया :—तेजीचें विस्तारानें वर्णन केल्यानंतर मंदीचें तेवढ्याच विस्तारानें करण्याचें प्रयोजन नाहीं. तेजीच्या अगदीं उलट मंदीची प्रक्रिया असते. भांडवलाची सीमान्त लाभक्षमता वाढून तेजी येते. भांडवलाची सीमान्त लाभक्षमता कमी होऊन मंदी येते. भांडवलगुंतवणातील वाढ तेजीला कारणीभूत होते; तर भांडवलगुंतवण पूर्वीच्या मानानें कमी होऊन मंदीला सुरुवात होते. गुणक व प्रवृद्धि ह्या दोन्ही गोष्टी तेजीप्रमाणेंच मंदींतहि आढळतात. फरक एवढाच कीं, त्यांची दिशा उलटी असते.[५५] गुणक दोन असल्यास दोन कोटींनीं जेव्हां भांडवलगुंतवण कमी होते तेव्हां उपभोगावर तेवढाच खर्च कमी होतो आणि त्यामुळें भांडवलगुंतवण अधिकच कमी होते. तेजीला घातक ठरणाऱ्या गोष्टी जेव्हां उलट्या दिशेकडे झुकतात तेव्हां मंदीचें निवारण आपोआप होण्याच्या दृष्टीनें उपयोगी पडतात. त्या अशा :—(१) मंदीमुळें लोकांचें उत्पन्न कमी होतें. पण उपभोगप्रवृत्तीच्या सिद्धान्तानुसार उत्पन्न ज्या प्रमाणांत कमी होतें त्यापेक्षां कमी प्रमाणांत उपभोगावरील खर्च कमी होतो. त्यामुळें भांडवलाची लाभक्षमता झपाट्यानें कमी

[५२] The acceleration of the boom via induced investment falls out as the rate of increase of physical output tapers off when full employment of factors is approached.

[५३] The boom dies a natural death since the very process of investment on which it rests progressively drives the marginal efficiency of capital lower and lower.

[५४] As expansion enters the boom stage the economic forces which tend to lower marginal efficiency of capital begin to assert themselves. The high marginal efficiency of capital is subjected to pressure from two directions—from increasing cost of production of new capital assets as bottlenecks of materials and labour develop and from the increasing abundance of output from recently completed capital assets which tends to lower some yields below expectations. (In this situation) Optimism gives way to pessimism. The turning point from expansion to contraction is explained by a collapse of marginal efficiency of capital—**Dillard**.

[५५] The multiplier operates backward or forward depending on the initial change in the direction of investment.

होण्याच्या प्रवृत्तीला आळा बसतो.[५६] (२) उत्पादन कमी झाल्यामुळें उत्पादन-साधनें निकामी पडतात, त्यांच्या किंमतीहि कमी झालेल्या असतात. त्यामुळें भांडवलगुंतवणीला योग्य अशी परिस्थिति निर्माण होते. (३) मंदीच्या काळांत नव्या भांडवलाची निर्मिति होत नसल्यानें जुन्या भांडवलावरच गुजराण केली जाते. त्यामुळेंच भांडवलाचा सांठा कमी होऊन भांडवलाची लाभक्षमता वाढण्यास मदत होते. ह्या गोष्टी शेवटीं मंदींतून तेजी आणतात.[५७]

तेजी मंदीचक्रांतील चलन संस्थेचें स्थान :—तेजीमंदीचक्राच्या सर्व मीसांमा पाहिल्यानंतर तेजीमंदीचक्रांत चलनसंस्थेचें नेमकें स्थान काय असा विचार मनांत येणें साहजिक आहे. ह्या बाबतींतला आधुनिक विचार असा सांगतां येईल कीं, तेजीमंदीचक्र ही सर्वस्वीं चलनीय घटना आहे व व्यवहारांत तेज़ीमंदीचक्र नेहमींच चलनोद्भूत असतें असें म्हणणें वस्तुस्थितिदर्शक नाहीं. अनुभवाच्या कसोटीला तें उतरणारें नाहीं. केवळ तात्त्विक विचारांत संपूर्णपणें चलनसंस्थेशीं संबंधित असलेलें तेज़ीमंदीचक्र कल्पितां येईल; नाहीं असें नाहीं, तसेंच चलन क्षेत्रांतील घटनामुळें ज्यांचा प्रधानतः उठाव झाला आहे अशीं तेजीमंदीचक्रें प्रत्यक्ष अर्थव्यवहारांत दिसून आलीं असतीलहि; पण तेवढ्यामुळें तेजीमंदीचक्र ही संपूर्णपणें चलन-घटना आहे असें म्हणणें रास्त ठरत नाहीं.[५८]

प्रत्यक्ष अनुभव लक्षांत घेतल्यास असेंच म्हणावें लागतें कीं, चलनक्षेत्रीय व चलनक्षेत्रबाह्य असे आर्थिक अस्थिरता निर्माण करणारे दोन्ही प्रकारचे प्रवाह

---

[५६] As real incomes decline consumption declines proportionately less, until consumption equals income. The shape of the consumption function sets a lower limit to the process of contraction.

[५७] Just as the collapse of marginal efficiency of capital is the predominant cause of contraction in business activity, so its reversal is the chief requisite of recovery.—The interval which must elapse before recovery will set on is conditioned by (i) The time necessary for the wearing out and obsolescence of durable capital and (ii) The time that elapses before excess stocks which accumulate towards the end of the boom are absorbed.

[५८] A monetary theory of the trade cycle can in principle be constructed—That cycles have occurred which have mainly been of this type does not seem to be at all improbable. Nevertheless I find it hard to believe that the monetary explanation can often have been the whole explanation—**Hicks.**

सामान्यतः अर्थव्यवस्थेंत वाहात असतात व त्यांपैकीं कोणत्याहि प्रकारच्या प्रवाहामुळें तेजीमंदीचक्र फिरण्यास एकदां सुरवात झाली कीं, **मुद्दाम प्रयत्न न केल्यास** दुसऱ्या प्रकारच्या प्रवाहांची प्रवृत्ति त्यांना पोषक अशीच असते. म्हणजे चलनक्षेत्रबाह्य घडामोडीमुळें तेजीमंदीचक्र फिरूं लागल्यास चलनक्षेत्रीय घडामोडी तेजीचें किंवा मंदीचें पोषण करण्यास सामान्यतः कारणीभूत होतात. तसेंच चलनक्षेत्रांतून तेजीमंदी-चक्राचा उद्भव झालेला असल्यास चलनक्षेत्रबाह्य घटना पूरक स्वरूपाच्याच असतात. तात्त्विकदृष्टया तेजीमंदी-चक्राचा उद्भव कोठेंही आढळूं शकला तरी प्रत्यक्ष अनुभवाचा विचार करितां तेजीमंदीचक्रास वास्तव अर्थक्षेत्रांतील अस्थिरता निर्माण करणारे प्रवाह कारणीभूत होतात व चलनक्षेत्रीय प्रवाहांमुळें निर्माण होणाऱ्या अस्थिरतेची त्यांत भर पडते व तेजीमंदीचक्राचें पोषण होतें, ही मीमांसा आधुनिक आर्थिक विचारांत ग्राह्य धरली गेली आहे.[५९]

तेजीमंदी-चक्रावरील उपाय-योजना :—तेजीमंदी-चक्रांत चलन-क्षेत्रीय व चलन-क्षेत्रबाह्य असे दोन्ही प्रकारचे प्रवाह कार्यशील असतात. ह्या मीमांसेचा एक महत्त्वाचा परिणाम लक्षांत घेण्याजोगा आहे. तो असा कीं, तेजीमंदीचक्राचा उगम प्रधानतः चलनक्षेत्रबाह्य असला तरी तेजीमंदीचक्राचें निवारण करण्यास चलन-क्षेत्रीय उपाययोजना करतां येते, असें मानण्याकडे आधुनिक चलन-शास्त्रज्ञांचा कल आहे. चलनक्षेत्रीय व चलनक्षेत्रबाह्य प्रवाहांतील मुख्य फरक असा कीं, चलनक्षेत्रीय प्रवाहाना इष्ट वळण देतां येईलच अशी ग्वाही देतां येत नसली तरी तसा प्रयत्न करणें शक्य असतें हें नाकारतां यावयाचें नाहीं. तेव्हां जे चलनक्षेत्रीय प्रवाह स्वभावतः तेजीमंदी-चक्राचें पोषण करतात त्यांनाच तेजीमंदी-चक्रविरोधी वळण देण्याचा प्रयत्न करून तेजीमंदी-चक्राचें निवारण करतां येईल—म्हणजेच तेजीमंदी-चक्राचा उगम कोठेंहि असो, तेजीमंदी-चक्रावर चलन-क्षेत्रीय उपाययोजना करतां येते—ती कितपत पुरी पडेल, कितपत यशस्वी होईल हा भाग वेगळा—हा विचार आधुनिक अर्थशास्त्रांत महत्त्वाचा मानला जातो. म्हणून तर तेजीमंदीचक्र हा विषय चलनशास्त्रांत अंतर्भूत केला जातो.

---

[५९] A more general, and more convincing, approach would be to assume that both sources of instability are, at least potentially, at work and that monetary instability is superimposed upon the real instability—**Hicks.**

: ७ :

विविध चलनव्यवस्था
(MONETARY SYSTEMS)

चलनव्यवस्था व तिचे घटक :––चलनपुरवठा निश्चित करण्यासाठीं व नियंत्रित करण्यासाठीं जी व्यवस्था केली जाते तिला **चलनव्यवस्था** (Monetary System) असें म्हणतात. चलननिर्मिती व नियंत्रण ज्या तत्त्वानुसार होत असतें त्यांचा मुख्यत्वें-करून चलनव्यवस्थेंत समावेश होतो. चलननिर्मिती व नियंत्रणाची जबाबदारी ज्या संस्थांवर असते त्यांना चलनव्यवस्थेचे घटक असें म्हणतां येईल. मागील एका प्रकरणांत जें विवेचन केलें आहे, त्यावरून असें दिसून येईल कीं, चलनपुरवठा करण्याचें कार्य (१) मध्यवर्ती बँक व (२) व्यापारी बँका ह्यांच्याकडून होत असतें. तेव्हां मध्यवर्ती बँक व व्यापारी बँका ह्यांना चलनव्यवस्थेचे घटक समजतां येईल हें स्पष्टच आहे.

सुवर्णपरिमाणव्यवस्था :––चलनव्यवस्थेचे जे विविध प्रकार चलनसंस्थेच्या इतिहासांत दिसून आले त्यांतील **सुवर्णपरिमाणव्यवस्था** (Gold Standard System) हा प्रकार सर्वांत सुपरिचित आहे. पैशाची आवश्यकता मानवाला प्रतीत झाल्यानंतर पैसा म्हणून कोणती वस्तु वापरावी ह्यासंबंधांत अनेक प्रयोग झाले. त्या प्रयोगांतून असें दिसून आलें कीं, कोणत्याही इतर वस्तूपेक्षां सुवर्ण व चांदी ह्या मौल्यवान धातु पैसा म्हणून वापरण्यास सोयीच्या व त्यांच्या अंगभूत गुणामुळें सर्वमान्य किंवा सर्वस्वीकारणीय असतात. साहजिकच इतर वस्तु मागें पडून सुवर्ण व रौप्य ह्या मौल्यवान धातूंचा चलन म्हणून उपयोग करण्याची प्रथा पडली. पुढें राज्यसंस्थेचा जेव्हां चलनव्यवस्थेंत प्रवेश झाला तेव्हां प्रत्यक्ष व्यवहारांतील चलन जरी सुवर्णाचें किंवा चांदीचें असण्याची आवश्यकता राहिली नाहीं व राज्यसंस्थेचे बळ व पत ह्यांचा आधार घेऊन कागदी चलनाला सुद्धां विधिमान्यता व लोकमान्यता मिळूं शकली तरी अनेक कारणांमुळें चलनसंस्था व मौल्यवान धातु ह्यांचा संबंध सुटूं देण्यांत आला नाहीं. जेव्हां चलनव्यवस्था एक अगर अधिक धातूशीं निगडीत असते किंवा निराळ्या शब्दांत प्रत्यक्ष व्यवहारांतील चलनाचें **मूल्यन** (Valuation) धातूंत करण्यांत येतें तेव्हां अस्तित्वांत असलेल्या चलनसंस्थेला **धातु-परिमाण** (Metallic Standard) असें म्हणतात. चलनव्यवस्थेच्या इतिहासांत **द्विधातुक परिमाणाचा** (Bi-Metallic Standard) प्रयोग झालेला आहे. द्विधातुकपरिमाणांत चलनव्यवस्था दोन धातूंशीं, सामान्यत: सुवर्ण व रौप्य ह्यांच्याशीं, निगडीत असते. पण अनेक कारणांमुळें द्विधातुकपरिणाम व्यवस्था गैरसोयीची आहे असें दिसून आल्यामुळें हा प्रयोग यशस्वी झाला नाहीं. परिणामीं **एकधातुकपरिणाम व्यवस्था** (Mono-Metallic Standard) विशेष मान्यता पावली. आणि त्यांतल्यात्यांतही

सुवर्ण व रौप्य ह्यांपैकीं सुवर्णाला विशेष प्राधान्य दिलें गेलें. ह्या घटनांतूनच सूवर्णपरिमाणव्यवस्था उदयास आली. जेव्हां चलनव्यवस्था सुवर्णावर अधिष्ठित असते तेव्हां तिला सुवर्णपरिमाण व्यवस्था असें म्हणतात. पहिल्या महायुद्धापूर्वींच्या काळांत राज्यमान्यता, लोकमान्यता, शास्त्रमान्यता व विश्वमान्यता पावलेली अशी ही एकच चलनव्यवस्था असल्यानें तिचा अभ्यास विशेष बारकाईनें करणें अगत्याचें आहे.

सुवर्णपरिमाणाचें प्रकार:—सुवर्णपरिमाणाचे दोन प्रकार आहेत. पहिल्या प्रकारांत चलन म्हणून शुद्ध सुवर्णाचीच नाणीं वापरली जातात किंवा कागदी चलन प्रसारांत असेल तर त्याला त्या चलनाचें एकंदर मूल्य जेवढें असेल तेवढ्या किंमतीच्या सुवर्णाचें पाठबळ दिले जाते. निराळ्या शब्दांत कागदी चलनाला सुवर्णाचें पाठबळ शंभर टक्के लाभतें.

ह्या प्रकाराला **सुवर्ण-चलनपरिमाण** (Gold Currency Standard) असें म्हणतात.[१] हा प्रकार अस्तित्वांत असल्यास चलन म्हणून वापरण्यासाठीं उपलब्ध होणाऱ्या सुवर्णाइतकाच चलनपुरवठा असतो. सुवर्णावर चलनपरिमिती अवलंबून असण्याचें आत्यंतिक उदाहरण ह्या प्रकारांत दिसून येते. चलनोपयोगी सुवर्णसांठ्याच्या अनुरोधानें सुवर्णपरिमिति कमी जास्त होण्याचें सुवर्णपरिमाणाचें एक वैशिष्ट्य ह्या प्रकारांत प्रकर्षानें दिसतें.[२] दुसऱ्या प्रकाराला **सुवर्ण धातु परिमाण** (Gold

---

[१] Under the gold specie standard the legal tender money of the country in question takes the form of gold coins of a certain fixed gold content—Meade.

[२] Under gold standard, the domestic monetary arrangement is such that is when gold reserve is increased there must be more or less automatic increase in the domestic supply of money and vice versa when gold reserve is reduced.

"The simplest mechanism for ensuring that this relationship holds good when the domestic circulation of money has 100% gold backing. An example of this would be a gold specie standard where gold coins constituted the only form of money in the community. But other forms of 100% money can be imagined. The country might be on a gold bullion standard without any internal circulation of gold coins. But if the banking system would always buy and sell gold freely against notes or bank deposits and it kept 100% per cent of the notes issued and of its deposit liabilities covered by gold, there would once again be an exact equality between the domestic supply of money and the total amount of gold reserves.

Bullian Standard) असें म्हणतात.[3] ह्या प्रकारांत व्यवहारी उपयोगाचें चलन अन्य धातूचें किंवा कागदी असतें. त्या चलनाला सुवर्णाचें पाठबळ दिलेलें असतें; पण तें शंभर टक्के नसतें. ह्या प्रकारांचा विशेष गुण हा कीं, सुवर्णाचें मूल्य विधिमान्य चलनांत निश्चित केलेलें असतें व तें मूल्य त्याच पातळीवर राहील अशी व्यवस्था करण्यास चलनशासनसंस्था बांधील असते. सुवर्णाचें मूल्य चलनांत निश्चित केलेलें असते, ही गोष्ट अशीही सांगता येईल कीं, व्यवहारांतील चलनाचें मूल्य सुवर्णांत ठरविण्यांत आलेलें असतें व तें मूल्य टिकविण्याची जबाबदारी चलनशासनसंस्थेवर असते. थोडक्यांत ह्या प्रकारांत सूवर्ण व विधिमान्य चलन ह्यांचा परस्परसंबंध निश्चित झालेला असतो व तो अबाधित राहावा म्हणून विधिमान्य चलन ठराविक दरानें सुवर्णांत परिवर्तनीय आहे असें जाहीर झालेलें असतें. व तो दर टिकविण्यासाठीं ठरलेल्या दरानें कागदी चलनाऐवजीं सुवर्ण देण्याची व सुवर्णाऐवजीं कागदी चलन देण्याची तयारी चलनशासनसंस्थेला ठेवावी लागते. सोप्या भाषेंत असें म्हणतां येईल कीं, सुवर्णाची किंमत निश्चित करण्यांत आलेली असते व ती किंमत टिकावी म्हणून त्या किंमतीनें कितीही मर्यादेपर्यंत सुवर्णाची खरेदीविक्री करावयास चलनशासनसंस्था तयार असते.

उदाहरणानें वरील विवेचन अधिक स्पष्ट होईल. समजा, १ तोळा = १०० रु. असें समीकरण निश्चित झालें व सुवर्ण व चलन ह्यांच्यांतील हा संबंध टिकविण्याची जबाबदारी चलनशासनसंस्थेवर असली तरी त्याचा अर्थ असा होतो कीं, १ तोळा सुवर्णाचें मूल्य १०० रु. पेक्षां अधिक वा कमी कदापि असणार नाहीं. व त्याचप्रमाणें १०० चें मूल्य १ तोळ्यापेक्षां कधींच कमी असणार नाहीं. ही गोष्ट साधण्यासाठीं एकच गोष्ट चलनशासनसंस्थेला करावी लागेल. ती म्हणजे १०० रु. तोळा ह्या दरानें सुवर्णाची खरेदीविक्री कितीही प्रमाणांत करावयाची तयारी तिला ठेवावी लागेल. तशी तयारी चलनसंस्थेनें ठेवल्यास बाजारांतील सुवर्णाची किंमत १०० रु. पेक्षां कमी अगर अधिक होणार नाहीं हें अगदीं उघड आहे. बाजारांतील सोन्याची किंमत १०० रु. पेक्षां कमी झाल्यास लोक चलनशासनसंस्थेंस सुवर्ण विकूं पाहतील. त्यामुळें बाजारांतील सुवर्णपुरवठा कमी होऊन तेथील किंमत वाढेल. उलट बाजारांतील किंमत १०० रु. पेक्षां अधिक झाल्यास लोक चलनशासनसंस्थेकडून सुवर्ण विकत घेऊन बाजारांत विकूं पाहतील. त्यामुळें बाजारांतील सुवर्णपुरवठा वाढून तेथील किंमत कमी होईल. अशा प्रकारें ठराविक दरानें सुवर्णाची खरेदीविक्री करण्यास चलनशासनसंस्था बांधील असल्यास सुवर्ण व चलन ह्यांचा परस्परसंबंध म्हणजेच सुवर्णाचें चलनांतील व चलनाचें सुवर्णांतील मूल्य स्थिर राहील. सुवर्णाची खरेदीविक्री ठराविक

[3] Under the gold bullion standard, gold coins are not put into circulation but the authority issuing the money of the country in question undertakes to purchase and sell gold at a price fixed in terms of that money.

किंमतीनें करण्यास चलनशासनसंस्था बांधील असणें म्हणजेच चलन ठराविक दरानें सुवर्णांत परिवर्तनीय असणें होय.

कागदी चलन किंमतरूपानें देऊन कोणत्याही दरानें सुवर्णाची खरेदी करण्यास चलनशासनसंस्थेला म्हणजेच मध्यवर्ती बँकेला मुळींच जड जात नाहीं. पण सुवर्णाची कोणत्याही मर्यादेपर्यंत विक्री करण्याची तयारी ठेवणें तेवढें सोपें नाहीं. त्यासाठीं मध्यवर्ती बँकेला नेहमीं पुरेसा सुवर्णसांठा जवळ बाळगावा लागतो. चलनाची सुवर्णातील परिवर्तनीय किंमत टिकवून धरावयाची असेल तर रोख चलनाच्या परिमितीबाबत निष्काळजी राहून मध्यवर्ती बँकेला चालत नाहीं. म्हणून तर जेव्हां कागदी चलनाला सुवर्णाचें पाठबळ शंभर टक्के नसेल तेव्हां सुवर्णसांठ्याच्या अनुरोधानें कागदी चलनाचें प्रमाण निश्चित करावें लागतें. ह्याबाबत नेहमींची पद्धति अशी कीं, कागदी चलनाला सुवर्णाचें पाठबळ किती प्रमाणांत दिलें जावें व कशा प्रकारें दिलें जावें हें कायद्यानें ठरविलें जातें. ह्या बाबतींत सर्वसाधारणपणें दोनापैकीं एक पद्धत अनुसरली जातें. सुवर्णसांठ्याच्या मूल्याच्या किती पट मूल्य असलेलें जास्तींत जास्त रोख चलन काढावयाचें हें ठरवून टाकावयाचें म्हणजेच निराळ्या शब्दांत कागदी चलनाला सुवर्णाचें पाठबळ किती टक्के घ्यावयाचें हें ठरवावयाचें ही एक पद्धत व ठराविक मर्यादेपर्यंत कागदी चलनाला सुवर्णाचें पाठबळ न देतां त्यापुढें मात्र शंभर टक्के पाठबळ द्यावयाचें ही दुसरी पद्धत.[४] ह्यापैकीं कोणतीही पद्धत अनुसरिली तरी कागदी चलनाला सुवर्णाचें अधिष्ठान लाभतें हें उघड आहे.[५]

सुवर्णपरिमाणाचीं वैशिष्टयें :—सुवर्णपरिमाणासंबंधीं वर जो विचार केला आहे त्यांतच सुवर्णपरिमाणाचीं वैशिष्टयें अंतर्भूत आहेत. सारांशरूपानें असें म्हणतां येईल कीं, सुवर्णपरिमाणाची दोन वैशिष्टयें आहेत. विधिमान्य रोख चलन सुवर्णांत परिवर्तनीय असतें हें सुवर्णपरिमाणाचें पहिलें वैशिष्टच होय व रोखचलन निर्मितीला सुवर्णाचें पाठबळ देणें अत्यावश्यक असल्यामुळें सुवर्णपरिमाणावरील देशांत रोख-

---

[४] In all modern communities, only a fraction of the total domestic supply of money is backed by reserves of gold or of other internationally accepted means of payment. In such cases we must distingnish between two possible cases. In the first case, which we will call the fiduciary issue principle only a fraction of the domestic supply of money is backed by gold but it remains true that any increase or decrease in gold reserve will lead to an equal absolute increase or decrease in the domestic supply of money—In the second case which may be called the percentage reserve system once again only a fraction of the total domestic monetary supply is backed up by gold, but in this case it is also true that only a percentage of any marginal increase or decrease is backed up by gold—**Meade.**

चलननिर्मिती मध्यवर्ती बँकेजवळील सुवर्णनिधीवर अवलंबून असतें हे दुसरें वैशिष्टच. कोणत्याही देशांतील चलनशासनसंस्थेला किती प्रमाणांत सुवर्ण उपलब्ध होतें हें अर्थातच प्रामुख्यानें सुवर्णाचें जागतिक उत्पादन व उत्पादित सूवर्णाचें विविध देशांत होणारें वांटप ह्यांवर अवलंबून असतें तेव्हां ह्या दोन गोष्टींवरच सुवर्णपरिमाणा-वरील देशांत रोख चलननिर्मिति अवलंबून असते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पहिल्या वैशिष्टचाचा परिणाम असा होतो कीं, चलनमूल्य व सुवर्णमूल्य ह्यांत भेद राहत नाहीं. पण ह्याचा अर्थ असा होत नाहीं कीं, चलनमूल्य सुवर्णपरिमाण असल्यास स्थिर राहते. ह्याचा अर्थ एवढाच होतो कीं, चलनाची सुवर्णखरेदी करण्याची शक्ति स्थिर राहतें. इतर वस्तूंच्या बाबतींतील क्रयशक्ति कमी-अधिक होऊं शकते व होत असते. दुसऱ्या वैशिष्टचाचा परिणाम असा होतो कीं, रोखचलन-निर्मितीच्या मध्यवर्ती बँकेच्या अधिकारावर आपोआपच मर्यादा पडतात. सुवर्णपरिमाणांत रोखचलननिर्मितीला एक प्रकारचें यांत्रिक स्वरूप प्राप्त होतें असें म्हटलें तरी चालेल रोखचलननिर्मितीची जी पद्धत देशांत अनुसरली जात असेल तीनुसार सुवर्णनिधि वाढल्यास रोखचलननिर्मिति करावयाची व सुवर्णनिधि कमी झाल्यास रोख चलन कमी करावयाचें एवढेंच मध्यवर्ती बँकेचें काम असतें. रोखचलननिर्मिति वाढवावयाची असल्यास ती किती प्रमाणांत वाढवावयाची, रोखचलनपरिमिति कमी करावयाची असल्यास ती किती प्रमाणांत कमी करावयाची ह्या बाबतींतही सुवर्ण परिमाणांत मध्यवर्ती बँकेला फारसें निर्णयस्वातंत्र्य नसतें. कारण अमुक एवढा सुवर्णनिधि असतां किती रोख चलननिर्मिति करावयाची, हें सामान्यतः ठरलेलें असतें व सुवर्णपरिमाणावर निष्ठा असणाऱ्या देशाची मध्यवर्ति बँकेला सुवर्ण-परिमाणानें आंखून दिलेल्या दोन्हीं बाजूंकडील लक्ष्मण-रेषा सहसा ओलांडतां येत नाहीं. सुवर्णपरिमाणांत मध्यवर्ती बँकेनें करावयाच्या चलननिर्मितीबाबतचे नियम ठरलेले व सामान्यतः अनुल्लंघनीय असल्यानें मध्यवर्ती बँकेला यांत्रिक स्वरूप प्राप्त होतें. असें होणें हा सुवर्णपरिमाणाचा एक मोठाच फायदा म्हणून सांगितला जातो.[५] चलननिर्मिती मानवी इच्छेवर अवलंबन न ठेवतां एखाद्या नैसर्गिक प्रवाहावर अवलंबून ठेवल्यास चलननिर्मितीच्या अधिकाराचा दुरुपयोग होणार नाहीं, अशी ज्यांची श्रद्धा असते त्यांना सुवर्णाचें उत्पादन व त्यासाठीं करावा लागणारा खर्च अशासारख्या

[५] The term gold standard may be used in a narrower or in a wider sense. In the narrower sense it signifies a monetary system under which gold coins of standard signification, or gold certificates with 100% gold backing form the circulating medium. In the wider sense, it covers also the case where notes or silver coins are the legal tender, provided they are convertible into gold at a fixed rate—under these conditions, the value of money and the value of gold are rigidly linked together and cannot diverge from one another—**Haberler.**

निसर्गनिर्मित गोष्टीवर चलननिर्मिती अवलंबून असते, हा सुवर्णपरिमाणाचा महान फायदा वाटावा ह्यांत नवल नाहीं. हा फायदा खरोखरच किती महत्त्वाचा आहे, ह्याची चिकित्सा योग्य स्थळीं केली जाईलच; पण रोखचलननिर्मितीला एक प्रकारें यांत्रिक स्वरूप प्राप्त होतें. हा सुवर्णपरिमाणाचा एक फायदा म्हणून अनेकांकडून सांगितला जातो ह्यांत शंका नाहीं. सुवर्णपरिमाणांत मध्यवर्ती बँकेला स्वतःचे निर्णय घेण्यास फारसा अवसर नसल्यानें सुवर्णपरिमाणाला **स्वयंचलित चलनव्यवस्था** (Automatic Monetary System) असें म्हणण्याचा प्रघात आहे. हें वर्णन संपूर्णतया अर्थातच खरें नाहीं. कारण शेवटीं ठराविक नियमानुसार कां होईना पण चलननिर्मिति करण्याचें अथवा चलननियंत्रण करण्याचें काम मध्यवर्ती बँकेलाच करावें लागतें. आणि चलन-निर्मितीचें धोरण सुवर्णपरिमाणाच्या नियमांनीं आंखून दिलेलें असलें तरी त्या धोरणाची अंमलबजावणी करणें ही कांहीं साधीसुधी गोष्ट नव्हे. त्यासाठीं योग्य ती उपाययोजना कोणती, तें मध्यवर्ती बँकेला ठरवावें लागतें. त्या उपाययोजनेचीं पथ्यें पाळावीं लागतात व ती परिणामकारक होत आहेत, हें डोळ्यांत तेल घालून पाहावें लागतें. ह्या गोष्टी आपोआप होत नसल्यानें सुवर्णपरिमाणाला पूर्णार्थानें स्वयंचलित चलनशासन असें म्हणतां यावयाचे नाहीं. पण सुवर्णपरिमाणांत मध्यवर्ती बँकेला चलननिर्मिति विशिष्ट व अनुल्लंघनीय नियमानुसारच करावी लागते, ह्या अर्थानें मात्र सुवर्णपरिमाणाला स्वयंचलित चलनव्यवस्था असें म्हणतां येईल.[७]

सुवर्णपरिमाणाचा आणखी एक नमुना :—सुवर्णपरिमाणाचे वर जे विविध नमुने सांगितले आहेत त्यांत आणखीं एक भर टाकली पाहिजे. ह्या नमुन्याचें व्यवच्छेदक लक्षण असें असतें कीं, चलनाला सुवर्णाचें पाठबळ प्रत्यक्षपणें न देतां अप्रत्यक्षपणें दिलें जातें. म्हणजे चलनाचें पाठबळ म्हणून ज्या देशांत सुवर्णपरिमाण ही चलन-व्यवस्था असेल त्या देशांतील चलनच ठेवलें जातें. अप्रत्यक्षपणें हें सुवर्णाचेंच पाठबळ असते कारण **स्वचलनाला** (Home Currency) पाठबळ म्हणून ठेवण्यांत येणारें

[६] The gold standard is characterised by two salient features. The first is the statutory obligation placed on the monetary authority to maintain convertibility of notes into gold at a fixed rate. This feature gives gold an invariable price but its value—its exchange ratio with other goods or purchasing power—is left to vary with its fluctuating supply and demand. The second feature of gold standard is that the supply of money is left to the repeatedly semi-automatic regulation of so called natural forces such as production and availability of gold for monetary purposes, and not to the discretion of the monetary authority. This is regarded as a great merit of gold standard because it ensures that the monetary supply is free of intervention and possible abuse by political authority.

परचलन (Foreign Currency) सुवर्णपरिमाणाच्या नियमानुसार सुवर्णांत परिवर्तनीय असतें. तेव्हां स्वचलन प्रत्यक्षपणें नसलें तरी अप्रत्यक्षपणें सुवर्णांत परिवर्तनीय असते हें ओघानें आलेंच. सुवर्णपरिमाणाच्या ह्या नमुन्यांत मध्यवर्ती बँकेजवळ सुवर्णसंग्रह नसल्यानें सुवर्णाची विक्री व खरेदी ठराविक दरानें करावयाचें बंधन तिच्यावर अर्थातच घातलेलें नसते. तथापि स्वचलन पाठवळ म्हणून ठेवलेल्या परचलनांत परिवर्तनीय ठेवण्याची आवश्यकता असल्यामुळें स्वचलनाचें परचलनांत परिवर्तन करण्याचा दर निश्चित करावा लागतो व तो स्थिर राखण्याची दक्षता मध्यवर्ती बँकेला घ्यावी लागते. निराळ्या शब्दांत सुवर्णपरिमाणाच्या ह्या प्रकारांत स्वचलनाचें मूल्य सुवर्णपरिमाणावर असलेल्या अन्य कोणत्यातरी देशाच्या चलनांत निश्चित करावें लागतें व तें मूल्य खुल्या बाजारांतही टिकून राहावें म्हणून त्या मूल्यानें परचलनाची खरेदी-विक्री कितीही प्रमाणांत करण्यास मध्यवर्ती बँक बांधील असते. सुवर्णपरिमाणाच्या ह्या नमुन्याला **सुवर्ण विनिमय परिमाण** (Gold Exchange Standard) असें म्हणतात.[८]

सुवर्ण विनिमय परिमाणाचे गुणदोष :—सुवर्ण विनिमय परिमाणाचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे सुवर्णाची होणारी काटकसर. सुवर्णविनिमय परिमाणांत एक प्रकारचें सहकार्य असतें. ह्या सहकार्याच्या योगानें एका देशाच्या मध्यवर्ती बँकेंतील

---

[७] In one sense the functioning of gold standard is never automatic because with the growth of the superstructure of credit money, constant action and vigil on the part of central banks is needed to preserve the free convertibility of the currency into gold. The very maintenance of convertibility has called for monetary management and in that sense and measure gold standard is a managed standard. But in so far as management is needed in gold standard merely for proper compliance with certain rules of the game of the gold standard. "Within these limits of compliance with the rules of the game, the gold standard may justifiably be designated as automatic standard—Gayer.

[८] Under the gold exchange standard gold coins are not put into circulation nor does the monetary authority of the country in question undertakes to buy and sell gold at a fixed price in terms of the notes of the country in question. But it undertakes to buy and sell (at a fixed rate) the money of another country which is itself operating on a gold bullion standard —Meade

The Central bank of the country on gold exchange standard, instead of holding a reserve of gold holds the reserve of money of another country on gold standard.

सुवर्णनिधीच्या आधार अनेक देशांतील चलनाला लाभतो. तसें पाहिलें तर सुवर्ण चलन परिमाण, सुवर्णधातु परिमाण, सुवर्णविनिमय परिमाण ह्या चलनव्यवस्था चढत्या क्रमानें सुवर्णाची काटकसर साधणाऱ्या असतात. सुवर्णचलन परिमाण असतां विशिष्ट मूल्याच्या सुवर्णनिधीच्या आधारें जेवढें चलन काढतां येईल त्यापेक्षां कितीतरी अधिक पट चलन सुवर्ण धातुपरिमाण असतां पेलतां येईल. सुवर्णविनिमय परिमाणांत तर एकच सुवर्णनिधि अनेक देशांतील चलनांचा आधारस्तंभ होऊं शकतो, हें वर सांगितलेंच आहे. सुवर्णपरिमाणाचा जगांत प्रसार होत असतां चलनाची गरजही वाढती होती. त्यावर तोडगा म्हणून सुवर्णपरिमाणाचे सुवर्णाची काटकसर करणारे नवेनवे नमुने पुढें आले असावे असें अनुमान करण्यास हरकत नसावी. सुवर्ण विनिमय-परिमाणाचा दुसरा एक फायदा म्हणजे संबंधित देशाचे ज्या दुसऱ्या देशाचें चलन स्वचलनाचें पाठबळ म्हणून तो देश स्वीकारतो त्या देशाबरोबरचे आर्थिक संबंध घनिष्ठ होतात. ह्याचें मुख्य कारण म्हणजे सुवर्णविनिमय परिमाणाचें स्वरूपच असें आहे कीं, दोन देश त्यामुळें अतिशय निगडीत केले जातात आणि त्या देशांतील चलनांचा परस्परसंबंध एका स्थिर पातळीवर राखला जातो. ही गोष्ट जशी फायद्याची तशीच कधींकधीं तोटयाचीही ठरते. सुवर्णविनिमय परिमाणाचा सर्वांत मोठा दोष म्हणजे त्या चलनव्यवस्थेंतील परावलंबित्व होय. दुसऱ्या देशांतील चलनावर आपली चलन-व्यवस्था अधिष्ठित करावयाची ह्यांत परावलंबित्व अपरिहार्यपणेंच येतें. दुसरा देश जोंपर्यंत सुवर्णपरिमाणावर राहतो तोंपर्यंत आपण अप्रत्यक्षपणें सुवर्णपरिमाणावर राहूं शकतो. पण दुसऱ्या देशानें सुवर्णपरिमाणाचा त्याग केला कीं, आपली इच्छा असो वा नसो आपल्याही सुवर्णपरिमाणाचा त्याग करावाच लागतो—नव्हे आपल्याकडून तो आपोआपच होतो. त्यानंतर जगांतील आपल्या चलनाचें मूल्य त्या दुसऱ्या देशाच्या चलनाच्या मूल्याबरोबर घसरतें किंवा वाढतें. सारांश, सुवर्णविनिमय परिमाणावरील देशाच्या चलनाचें स्वतंत्र अस्तित्व एक प्रकारें नाहींसें होतें. हा सुवर्णविनिमयाचा महान दोष होय. होणारे फायदे तसेंच महत्त्वाचे असतील तरच हा दोष पत्करूनही सुवर्ण विनिमयपरिमाणाचा स्वीकार केला जातो.

सुवर्णपरिमाणाचें आंतरराष्ट्रीय स्वरूप :—सुवर्णपरिमाणाचा विचार येथवर एक अंतर्गत चलनव्यवस्था म्हणून केला; पण पहिल्या महायुद्धापर्यंतच्या काळांत सुवर्णपरिमाणाला जें वैभव प्राप्त झालें होतें तें सुवर्णपरिमाणही त्यावेळीं **आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था** (International Monetary System) होती म्हणूनच झालें होतें हें लक्षांत ठेवणें अत्यावश्यक आहे. सुवर्णपरिमाणाची आंतरराष्ट्रीय बाजू अधिक व अतिशय महत्त्वाची आहे असें निःसंकोच म्हणावयास हरकत नाहीं. कारण एखाद्या देशांतच सुवर्णपरिमाण ही चलनव्यवस्था स्वीकारली गेली आहे ही गोष्ट तात्त्विक दृष्टया शक्यतेच्या कोटींतली असली तरी व्यवहारांत एकटयादुकटया देशाला सुवर्णपरिमाण टिकवून धरणें कठीण जातें आणि त्याहीपेक्षां महत्त्वाची गोष्ट अशी कीं,

सुवर्णपरिमाणाचे खरे फायदे (आणि तोटेही) सुवर्णपरिमाण ही जेव्हां आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था असेल तेव्हांच दिसून येतात. साहजिकच सुवर्णपरिमाणाचा विचार त्याची आंतरराष्ट्रीय बाजू समजून घेतल्याशिवाय पुरा व्हावयाचा नाहीं. म्हणून त्या बाजूची थोडी माहिती येथें दिली आहे. मात्र सुवर्णपरिमाणाचा आंतरराष्ट्रीय दृष्टि-कोनांतून विचार हा विषय आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध ह्या अर्थशास्त्राच्या विभागांत पडत असल्यानें त्याचा समग्र परामर्ष अन्यत्र घेतला जाईल.

आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाण :—जेव्हां एकापेक्षां अधिक देश सुवर्णपरिमाणावर असतात. तेव्हां जी जागतिक चलनव्यवस्था अस्तित्वांत येते तिला **आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाण** (International Gold Standard) म्हणतात. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण असतां देशांतील चलन सुवर्णांत ठराविक दरानें परिवर्तनीय ठेवणें, ठराविक दरानें सुवर्णाची खरेदीविक्री करण्याची तयारी ठेवणें व आपल्याजवळील सुवर्णसांठा लक्षांत घेऊन रोखचलननिर्मितीची कमाल मर्यादा ठरविणें हे तीन नियम तर पाळावे लागतातच पण त्याखेरीज आणखी एक महत्त्वाचा नियम पाळावा लागतो. तो नियम म्हणजे सुवर्णाची आयात-निर्यात अनिर्बंध चालूं देणें. एका अर्थानें ह्या नियमाला आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचें खास वैशिष्टच असें म्हणतां येईल. कारण वर ज्या तीन नियमांचा उल्लेख केला आहे ते एखाद्याच देशानें सुवर्णपरिमाण स्वीकारलें तरी पाळावे लागतील. हा नियम मात्र असा आहे कीं, तो सुवर्णपरिमाणाला आंतरराष्ट्रीय स्वरूप यावयाचें असेल तरच सर्व देशांना पाळावा लागतो. हा नियम पाळण्याचा अतिशय महत्त्वाचा परिणाम असा होतो कीं, सुवर्णपरिमाणावरील देशांतील अंतर्गत चलनांना परस्परांशीं संलग्न केले जातें व त्यांचा जो संबंध जडतो तो स्थिर स्वरूपाचा असतो. ह्या बाबतींत अधिक खुलासा हुंडणावळीच्या दरासंबंधींच्या विवेचनांत केला जाईल. तूर्त सोप्या भाषेंत एवढेंच सांगितल्यास पुरें होईल कीं, जेव्हां दोन अगर अधिक देश सुवर्णपरिमाणावर असतात तेव्हां त्या देशांतील विधिमान्य अंतर्गत चलनांचा परस्पर-संबंध आपोआप निश्चित होतो व सुवर्णाच्या आयात-निर्यातींवर कोणतेही निर्बंध नसतील तर ह्या संबंधाला स्थिर स्वरूप प्राप्त होतें. उदाहरणार्थ, भारत व ब्रिटन हे दोन देश सुवर्णपरिमाणावर असले व भारतांत सोन्याची किंमत ४० रु. तोळा व ब्रिटनमध्यें ४० शिलिंग तोळा अशी ठरविण्यांत आली असली तर ४० रु. = ४० शि. म्हणजेच १ रु. = १ शिलिंग हा रुपया व शिलिंग ह्यांतील संबंध आपोआपच प्रस्थापित होईल व उभय देशांकडून सुवर्णाच्या आयात-निर्यातीवर कोणतेही निर्बंध घालण्यांत आलेले नसले तर हा संबंध टिकून राहील. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणा-कडून दोन महत्त्वाचीं कामें साधलीं जातात. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण असतां एकतर देशोदेशांत चलनभिन्नता असली तरी सर्व देशांतील चलनाचें मूल्यन सुवर्णांत ठरत असल्यानें सर्व देशांना समान असें एक मूल्यमाप उपलब्ध होतें. दुसरें असें कीं, सर्व देशांत सुवर्ण विकून त्या त्या देशाचें चलन मिळविण्याची सोय असल्यानें देशो-देशांतील देण्याघेण्यांचे सर्व व्यवहार चलनांऐवजीं सुवर्णांत केले तरी चालूं शकतें.

सारांश, आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सुवर्णाला **आंतरराष्ट्रीय विनिमय माध्यम** (International Medium of Exchange) व **आंतरराष्ट्रीय मूल्यमाप** (International Unit of Account) हें स्थान प्राप्त होतें. अंतर्गत व्यवहारांत जीं कार्यें विधिमान्य चलनाकडून केलीं जातात तीं आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत सुवर्णाकडून केलीं जातात असें म्हटलें तरी चालेल. [९]

सुवर्णपरिमाणाची व्याख्या :—सुवर्णपरिमाण ही चलनव्यवस्था आन्तरराष्ट्रीय चलनव्यवस्था म्हणूनच एकाकाळीं सुप्रतिष्ठित पावली होती हें लक्षांत घेऊनच सुवर्णपरिमाणाची व्याख्या करणें उचित होईल. म्हणूनच आतां पावेतों सुवर्णपरिमाणाची व्याख्या करणें टाळलें. पण आतां सुवर्णपरिमाणाच्या आंतरराष्ट्रीय बाजूचा प्रस्तुत प्रकरणाच्या दृष्टीनें जरूर तेवढा विचार केला असल्यानें सुवर्णपरिमाणाची व्याख्या करण्यास हरकत नाहीं. ती व्याख्या पुढीलप्रमाणें करतां येईल. जेव्हां (१) चलनशासनसंस्था ठराविक किंमतीनें कितीहि प्रमाणांत सुवर्णाची खरेदी विक्री करण्यास बांधील असते, (२) चलनमूल्य व सुवर्णमूल्य सारखें असतें, व (३) चलनाचा सुवर्णाशीं जो संबंध असतो त्यामुळें चलनाचें बाह्य मूल्य ठरतें, तेव्हां कोणत्याहि देशानें सुवर्णपरिमाणाचा चलनव्यवस्था म्हणून स्वीकार केला आहे असें म्हणतां येईल. [१०]

शासित चलनव्यवस्था :—अंतर्गत विधिमान्य चलन कोणत्या ना कोणत्या मार्गानें एखाद्या धातूशीं—सामान्यतः सुवर्णाशीं—ज्यांत संलग्न केलें जातें व त्यामुळें ज्यांत चलनशासनसंस्थेच्या चलन निर्मितीच्या अधिकारावर अंगभूत मर्यादा पडतात अशा चलनव्यवस्थांचा विचार केला; पण आजच्या जगांत सुवर्णपरिमाण किंवा तत्सम चलनव्यवस्था कोठेंही आढळत नाहीं. आज सर्वत्र जी चलनव्यवस्था आढळते तिला नियंत्रित किंवा **शासित चलनव्यवस्था** (Managed Monetary System) असें नांव देण्यांत आलें आहे. कारण आजच्या चलनव्यवस्थेंत सुवर्णपरिमाणाप्रमाणें

---

[९] International gold standard is established when two or more trading countries are on gold standard and there are no obstacles to the export and import of gold. In that case, the different currencies are rigidly linked together. Under the international gold standard gold functions as an international unit of account and as means of international payment.

[१०] A country is said to be on gold standard (a) When its monetary authority is committed to policy of buying and selling gold at a fixed price in unlimited amounts (b) When the purchasing power of a unit of gold is kept equal to the purchasing power of a given weight of gold and (c) When the external value of a currency is fixed though the medium of gold—**Kurihara.**

चलनशासनाचीं सूत्रें ठरलेलीं नसल्यानें चलनशासनाला यांत्रिक स्वरूप प्राप्त होत नाहीं. त्यामुळें चलनव्यवस्था संपूर्णपणें व सर्वार्थानें शासित असते. **चलनशासन** (Monetary Management) हें आजकाल ह्याच कारणाकरितां अतिशय महत्त्वाचें झालें आहे. आजच्या जगांत चलनशासनाचें वेगळेंच शास्त्र तयार होत आहे व एक प्रकारें चलनशासन ही एक कला होऊं लागली आहे.

शासित चलनव्यवस्थेचीं दोन लक्षणें :—पहिलें लक्षण असें कीं, व्यवहारांत वापरण्यांत येणारें विधिमान्य चलन अपरिवर्तनीय असतें. **अपरिवर्तनीय चलन** (Inconvertible Cuerrency) विनिमयमाध्यम म्हणून वापरलें जातें. तें चलन बहुधा कागदी असतें व त्या चलनाचें कोणत्याही धातूंत किंवा अन्य कशांतही परिवर्तन करून देण्याची जबाबदारी चलनशासनसंस्थेवर नसते. साहजिकच काढलेल्या चलनाला अमुक एक गोष्ट अमुक एका प्रमाणांत पाठबळ म्हणून ठेवलेंच पाहिजे, असा निर्बंध मध्यवर्ती बँकेवर घातला जाण्याचेहि कारण नसतें. पाठबळविरहित अंगभत मूल्य नसलेलें अपरिवर्तनीय असें कागदी चलन लोक सर्रास वापरतात. ह्याचें कारण त्या चलनाला राजमान्यता असते व राज्यसंस्थेवर विश्वास असल्यास लोकमान्यता व राजमान्यता ह्या गोष्टी भिन्न असूं शकत नाहींत हेंच होय.

व्यवहारांतील चलन अपरिवर्तनीय असल्यामुळें चलनपरिमिति कोणत्याही बाह्य गोष्टींमुळें निश्चित होऊं शकत नाहीं हें शासित चलनव्यवस्थेचें दुसरें लक्षण आहे. चलनपरिमिति किती असावी, हें मध्यवर्ती बँकेला स्वतःचें स्वतः निश्चित करावें लागतें. एक प्रकारें अपरिवर्तनीय चलनपद्धतींत मध्यवर्ती बँकेचा चलननिर्मिती व चलननियंत्रणाचा अधिकार अमर्यादित असतो. सोयीसाठीं कायद्यानें कांहीं मर्यादा घातलेल्या असल्या तरी त्या मर्यादांतर्गत असलेलेंही मध्यवर्ती बँकेचें निर्णयक्षेत्र विस्तृत असतें. तेव्हां चलनपरिमिति निश्चित करण्याचा मध्यवर्ती बँकेचा अधिकार आजच्या जगांत अमर्यादितच असतो, असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं. पण अधिकार जेव्हां अमर्यादित असतो तेव्हांच तो वापरण्याची जबाबदारी अधिकांत अधिक वाढते. चलनपरिमिति निश्चित व नियंत्रित करण्याचा आपला अधिकार शासित चलनव्यवस्थेंत फारच काळजीपूर्वक वापरावा लागतो. तो कसा वापरावा, ह्याचीं सूत्रें ठरलेलीं नसल्यानें तर फारच दक्षता घ्यावी लागते. ह्यासंबंधांत येथें मुख्य सांगावयाची गोष्ट अशी कीं, मध्यवर्ती बँकेचा वरवर पाहतां अमर्यादित वाटणारा अधिकार शासित चलनव्यवस्थेंत मध्यवर्ती बँकेच्या लहरीप्रमाणें वापरला जात नाहीं. प्रस्थापित सरकारची जी चलननीति असेल तिच्याशीं सुसंगत ठरेल अशा प्रकारेंच तो अधिकार मध्यवर्ती बँकेनें वापरावा अशीच शासित चलनव्यवस्थेची अपेक्षा असते. हें सर्व लक्षांत घेतां **चलननीतीनुसार चलननिर्मिति** ह्या शब्दांतही शासित चलनव्यवस्थेचें दुसरें लक्षण सांगतां येईल.[११]

शासित चलनव्यवस्थेंत अंतर्गत अर्थव्यवहारांच्या दृष्टीनें चलनाला पाठबळ म्हणून सुवर्णनिधि अगर परचलननिधि ठेवण्याची आवश्यकता नसते हें खरें आहे.

पण ह्याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, कोणत्याही प्रकारचा निधि मध्यवर्ती बँकेला जवळ बाळगावा लागत नाहीं. कारण सुवर्णपरिमाणाचा जगानें त्याग केल्यामुळें आंतरराष्ट्रीय मूल्यमापन म्हणून सुवर्णाचें महत्त्व नष्ट झालेलें असलें तरी आंतरराष्ट्रीय विनिमयमाध्यम म्हणून सुवर्णाचें स्थान अद्यापि अबाधित राहिलेलें आहे. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांतील देण्याघेण्याच्या हिशेबांतीं जीं देणीं शिल्लक राहतात तीं फेडण्याची अन्य कांहीं सोय परचलनरूपानें किंवा कर्जरूपानें न झाल्यास तीं देणीं सुवर्णांतच दिलीं जावीं अशी अपेक्षा अजूनही धरली जाते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांचे साधन म्हणून पुरेसा परचलननिधि किंवा त्याहीपलीकडे जाऊन सुवर्णनिधि बाळगण्याची दक्षता शासित चलनव्यवस्थेंतही मध्यवर्ती बँकेला घ्यावीच लागते.

प्रस्तुत प्रकरणांत विविध चलनव्यवस्थांची व त्यांच्या लक्षणांची केवळ माहिती दिली आहे त्यांच्या गुणावगुणांची चर्चा विशष खोलांत जाऊन येथें केली नाहीं. कारण एकतर त्यांतील कांहीं गुणावगुण आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांशीं संबंधित आहेत. असें असावें हें स्वाभाविकच आहे. कारण अंतर्गत अर्थव्यवहारासाठीं चलनपुरवठा करणें हें जसें चलनव्यवस्थेचें एक कार्य असतें तसेंच आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांची सोय पाहाणें हें सुद्धां चलनव्यवस्थेचेंच कार्य असतें. अशा परिस्थितींत आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांची समग्र माहिती मिळाल्याखेरीज विविध चलनव्यवस्थांच्या गुणावगुणांची पुरी व तौलनिक स्वरूपाची कल्पना येणें शक्य नाहीं. दुसरें असें कीं, चलननीति चलनव्यवस्था ह्यांचा घनिष्ठ संबंध असल्यानें विविध चलनव्यवस्थांच्या गुणावगुणांचा विचार चलननीतीच्या चर्चेच्या संदर्भांतच करतां येईल. हें सर्व लक्षांत घेतां चलनव्यवस्थांच्या गुणावगुणांची व तुलनेची चर्चा लांबणीवर टाकणेंच इष्ट होईल.

---

[११] In a managed monetary system, the currency of a country consists of inconvertible paper and its quantity is ultimately left to the discretion of the central bank in its role as the monetary authority. The central bank, however, is expected to use its position as a monopolist of note issue and its weapons of credit control, in a way consistent with the monetary policy of the state.

आन्तरराष्ट्रीय अर्थकारण व चलनकारण

INTERNATIONAL ECONOMICS AND INTERNATIONAL MONETARY ECONOMICS

: ८ :

आंतरराष्ट्रीय व्यापार
(INTERNATIONAL TRADE)

(अ) आंतरराष्ट्रीय व्यापाराची कारणमीमांसा

देशोदेशांच्या उत्पादनक्षमतेंतील भिन्नता :—आंतरराष्ट्रीय व्यापार होतो, म्हणजेच प्रत्यक देश कांहीं वस्तूंची आयात व कांहीं वस्तूंची निर्यात करीत असतो. ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं, कोणत्याहि देशाला आपल्या गरजा भागविण्याऱ्या सर्व वस्तूंचें पुरेशा प्रमाणांत उत्पादन करणें शक्य नसतें. किंवा तें इष्ट नसतें. कारण आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंचें स्वदेशांत उत्पादन करण्या-पेक्षां परदेशांतून त्या मिळविणें स्वस्त पडतें. असें होण्याचें आद्य कारण हें कीं, देशोदेशांची विविध वस्तूंचें उत्पादन करण्याची क्षमता सारखी नसते. एखादा देश विशिष्ट वस्तूंचें उत्पादन करण्यास इतरांच्या मानानें विशेष पात्र असतो. कारण त्या वस्तूंच्या उत्पादनासाठीं लागणारी उत्पादन साधनांची अनुकूलता त्याला लाभलेली असते. जरूर तीं उत्पादन-साधनें मुबलक प्रमाणांत उपलब्ध होत असतात आणि त्यांच्यांत उत्पादन क्षमताहि भरपूर असते. परिणामीं त्या वस्तूंचा उत्पादन-खर्च इतर देशांच्या तुलनेनें कमी होत असतो. उलट तोच देश इतर कांहीं वस्तूंचें उत्पादन करण्यास तुलनेनें अपात्र असतो. कारण जरूर तीं उत्पादन साधनें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध तरी होत नाहींत किंवा त्यांचा दर्जा चांगला नसतो. सारांश, उत्पादन-साधनांची उपलब्धता सर्वत्र सारखी नसल्यानें विविध वस्तूंचें उत्पादन करण्याची कोणत्याहि देशाची पात्रता सारखी नसणें स्वाभा-विक आहे.[१] ज्याप्रमाणें व्यक्ति व्यक्तींतील गुणभिन्नता व उत्पादन-क्षमतेंतील भिन्नता वैयक्तिक श्रमविभागणीस व तदनुषंगानें व्यक्ती-व्यक्तींतील विनिमयास कारणीभूत होते त्याचप्रमाणें देशोदेशांतील उत्पादनाच्या बाबतींतली संख्यात्मक व गुणात्मक भिन्नता आंतरराष्ट्रीय उत्पादनविभागणीस व विनिमयास कारणीभूत होते.[२]

---

[१] Regions, "are very differently endowed with facilities for the production of various articles. The reason is that they are differently supplied with productive factors. One region may have plenty of iron and coal but little land for wheat growing while another has plenty of wheat lands but a scanty supply of mineral resources. Clearly the former is adopted better to iron production and less well to wheat growing than the latter. It is the proportion of factors in a region which determines its fitness for specific industries"—Ohlin.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा स्वतंत्र अभ्यास कां हवा? :—आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. उत्पादन-साधनांची उपलब्धता व गुणवत्ता देशोदेशांत सारखी नसते. तसेंच देशोदेशांत उत्पादन-साधनांचें **गतिसौकर्य** (Mobility) अत्यल्प असतें. हीहि गोष्ट महत्त्वाची असते. एकाच देशाच्या विविध भागांत सामान्यतः उत्पादन-साधनांचें स्थलांतर जेवढें मोकळेपणें व सौकर्यानें होतें तेवढें विविध देशांत होत नाहीं. उत्पादनाचीं जीं निसर्ग-साधनें असतात तीं जात्याच गति-शून्य असतात. त्यामुळें त्यांच्या बाबतींत, देशांतल्या देशांत सुद्धां, स्थलांतराचा प्रश्नच नसतो. खरा प्रश्न ज्यांच्या बाबतींत स्थलांतर--देशांतर--शक्यतेच्या कोटींतील असतें, अशा उत्पादन-साधनांच्या बाबतींत उद्‌भवतो; पण अशा उत्पादन-साधनांच्या संबंधांत हाच अनुभव येतो कीं, आर्थिक, सामाजिक, राजकीय व वैयक्तिक कारणांमुळें त्यांच्या देशांतरावर बऱ्याच मर्यादा पडतात. मुख्यतः ह्या मर्यादा मानसिक असतात. भाषेच्या, चालीरीतींच्या, कायद्याच्या अडचणीमुळें परदेशीं, विशेषतः वेगळ्या शासन-व्यवस्थेखालीं असलेल्या परराष्ट्रांत स्थायिक होणें कामगारांना जमत नाहीं. परदेशांत गेलेल्या कामगारांचीहि तेथील परिस्थितीशीं बहुधा मन-जुळणी होत नाहीं. त्यामुळें लौकर परत येण्यास ते उत्सुक असतात असा अनुभव आहे. चलनरूप भांडवल कामगारांच्या मानानें अधिक गतिक्षम असतें. कारण भांडवलदाराला स्वतःचें स्थलांतर केल्याशिवाय परदेशांत भांडवल गुंतवितां येतें; पण तरीहि परदेशांत भांडवल गुंतविणें स्वदेशांत भांडवल गुंतविण्यापेक्षां अधिक धोक्याचे असल्यामुळें चलनरूप भांडवलदेखील परदेशात मोकळेपणीं जात नाहींच असा अनुभव आहे. सारांश, आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्पादन-घटकांचें गतिसौकर्य मर्यादितच असतें ही गोष्ट खरी आहे.[३] मात्र ह्या ठिकाणीं एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, उत्पादन घटकांचें **आन्तरविभागीय गतिसौकर्य** (Interregional Mobility) व **आन्तरराष्ट्रीय**

---

[२] Clearly variation in equipment of industrial agents is a cause of inter-regional division of labour and trade, just as varing individual ability is a cause of individual exchange—Each region is best equipped to produce the goods which require large proportions of the factors relatively abundant there. It is, on the other hand, least fit to produce goods requiring large productions of factors existing within its boundaries in small quantities or not at all—**Ohlin**.

[३] In general it may be said, that natural resources are immobile, that obstacles to labour movements consist not so much in actual expenses of transporting the labourer, his family and personal property, as in a psychological aversion to changes, particularly those to something more or less unknown, and that obstacles to capital movement are similarly psychological—**Ohlin.**

गतिसौकर्य (International Mobility) ह्यांच्यातील फरक हा गुणात्मक नसून अंशात्मक आहे. ह्या दृष्टीनें विचार करतां आन्तरराष्ट्रीय व्यापार व राष्ट्रान्तर्गत **आन्तरविभागीय व्यापार** (Inter-Regional trade) ह्यांच्यातील फरकही गुणात्मक नसून अंशात्मक आहे असेंच म्हणावें लागेल. पण तरीहि आन्तरराष्ट्रीय व्यापार हा अर्थशास्त्रांत स्वतंत्र अभ्यासाचा विषय मानला जातो ह्याचें कारण तो फरक फारच मोठा असतो हें होय. ह्याशिवाय आंतरराष्ट्रीय व्यापाराचा स्वतंत्र विषय म्हणून अर्थशास्त्रांत समावेश केला जातो ह्याची आणखीहि कांहीं कारणें आहेत. त्यांतील एक कारण असें कीं, आन्तरराष्ट्रीय व्यापारासाठीं एका देशाच्या चलनाचे दुसऱ्या देशाच्या चलनात रूपान्तर करावें लागतें व त्यांतून बरेंच गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होतात. दुसरें एक कारण असें कीं, आन्तरराष्ट्रीय व्यापारावर व इतर आर्थिक संबंधावर संबंधींत सरकारकडून निर्बंध घातले जाण्याची शक्यता असते. त्यामुळेंहि कांहीं गुंतागुंतीचें व अभ्यसनीय असे प्रश्न निर्माण होतात. ह्या व अशाच कारणामुळें आन्तरराष्ट्रीय अर्थकारण व चलनकारण ही अर्थशास्त्रांत स्वतंत्र अभ्यासाची शाखा मानली जाण्याची परंपरा पडली आहे व आन्तरविभागयीय व्यापार व आन्तरराष्ट्रीय व्यापार ह्यांच्यांतील फरक अंशात्मक आहे, गुणात्मक नाहीं असा आग्रह आधुनिक अर्थशास्त्रांत धरला जात असूनहि ही परंपरा आजतागायत चालू आहे.[४]

आंतरराष्ट्रीय व्यापार हा उत्पादन साधनांच्या मर्यादित गति सौकर्याचा परिणाम :—उत्पादन-घटकांच्या गतिसौकर्यावरील मर्यादा हें आंतरराष्ट्रीय व्यापाराचें एक कारण होय. उत्पादनघटकांचा संचार स्वैरपणें कोठेंहि होऊं शकला असता तर विशिष्ट उत्पादनघटकांची उपलब्धता व त्यांची उत्पादनक्षमता ह्यामुळें देशोदेशांच्या उत्पादनशक्तींत फरक शिल्लक उरलाच नसता. उत्पादन-घटकांच्या स्थलांतरामुळें तो त्वरित नष्ट झाला असता. परंतु उत्पादनघटकांच्या मर्यादित गतिसौकर्यामुळें हा फरक शिल्लक राहतो आणि विशिष्ट उत्पादन-घटकांची उपलब्धता व

[४] International trade is treated as a distinct subject of study partly because of tradition but there is a more solid basis for separate study than tradition. International trade differs from domestic or interregional trade not in kind but in degree. But this difference in degree is of sufficient extent and importance to justify separate study. Factor mobility is far greater between regions than between countries. Equalization of factor prices is also therefore considerably greater. National markets differ on grounds of tastes, customs and habits. International trade deserves to be studied separately also because it involves the use of different money and because it runs between different political units, each with a sovereign government, giving rise to differences in national economic policies.

गुणवत्ता ह्यांच्या अनुरोधानें विविध देश विशिष्ट वस्तूंच्या उत्पादनास पात्र ठरत असल्यामुळें आंतरराष्ट्रीय व्यापार अपरिहार्य ठरतो. सुदैवानें कांहीं अपवाद वगळतां उदाहरणार्थ लवकर नष्ट होणाऱ्या वस्तु, वस्तूंचें स्थलांतर करणें शक्य असतें. हें लक्षांत घेतां असेंहि म्हणतां येईल कीं, अंतर्गत व्यापाराशीं तुलना करतां आंतरराष्ट्रीय व्यापारांत उत्पादनसाधनांच्या स्थलांतराची जागा उत्पादित वस्तूंच्या स्थलांतरानें घेतली असल्याचें आढळून येतें. अंतर्गत अर्थव्यवहारांत उत्पादन-घटकांच्या स्थलांतरावर मर्यादा नसल्यानें कोणत्याहि वस्तूचें कोठेंहि उत्पादन करतां येतें. पण आंतरराष्ट्रीय व्यवहारांत उत्पादन साधनांच्या मर्यादित स्थलांतर-सौकर्यामुळें वस्तु-विनिमयाचा प्रश्न उद्भवतो. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचें हें एक वैशिष्टच होय.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचें मूलगामी कारण :—उत्पादन-घटकांची उत्पादन-क्षमता व उपलब्धता भिन्न असल्यामुळें व त्यांच्या स्थलांतरावर विविध प्रकारच्या मर्यादा पडत असल्यामुळें आंतरराष्ट्रीय वस्तुविनिमयाचा प्रश्न उद्भवतो, असा वरील विवेचनाचा आशय सांगतां येईल. पण आंतरराष्ट्रीय व्यापार होण्याचीं येथवर जीं कारणें सांगितलीं तीं सर्वसाधारण स्वरूपाचीं आहेत, हें विसरून चालणार नाहीं. आंतरराष्ट्रीय व्यापाराची नेमकी कारणमीमांसा सांगावयाची झाली तर असें म्हणावें लागेल कीं, उत्पादन-घटकांच्या उत्पादन-क्षमतेंतील भिन्नता, त्यांची कमी अधिक उपलब्धता व त्यांचे मर्यादित स्थलांतर-सौकर्य ह्या तीन गोष्टींचा परिणाम होऊन विविध वस्तूंचा उत्पादनखर्च भिन्न होत असल्यामुळें त्याच वस्तूची किंमत एका देशांत कमी व दुसऱ्या देशांत अधिक असा प्रकार आढळतो.[५] जेव्हां एखाद्या वस्तूची किंमत स्वदेशांत अधिक असेल व परदेशांत कमी असेल तेव्हां त्या वस्तूची परदेशांतून आयात करण्याची प्रवृत्ति नागरिकांत दिसून येणें साहजिक आहे. अर्थात् स्वदेशांतील किंमत व परदेशांतील किंमत ह्यांची तुलना करतांना वाहतुक खर्च अवश्य विचारांत घेतला जाईल. परदेशांतून वस्तु आणावयाची म्हणजे वाहतुकीवर खर्च करावाच लागतो. तो खर्च विचारांत घेऊनहि जो परदेशी माल स्वदेशी मालापेक्षां स्वस्त असतो त्या मालाची आयात होते व जो स्वदेशी माल परदेशस्थांना आपल्या मालापेक्षां स्वस्त वाटतो त्याची निर्यात केली जाते. हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा नियमच आहे. एकाच वस्तूची किंमत देशोदेशांत भिन्न असते, ह्याचें कारण वस्तूचा उत्पादनखर्च सारखा नसतो हेंच होय. तेव्हां **उत्पादनखर्चांतील भिन्नता हें आन्तरराष्ट्रीय व्यापाराचें मूलगामी कारण आहे** असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.[६]

---

[५] Differences in comparative costs arise because of the fact that different countries have different factor endowments and different commodities are best produced with a predominance of one or the other factor. Trade arises out of differences in relative factor prices. —**Kindleberger**.

उत्पादन-खर्चांतील भिन्नतेचे विविध प्रकार :——उत्पादन-खर्चांतील भिन्नतेचा परिणाम आंतरराष्ट्रीय उत्पादन-विभागणीवर व पर्यायानें आंतरराष्ट्रीय व्यापारावर कसा परिणाम होतो हें आतां पाहूं. उत्पादन-खर्चांत उद्भवणारी तफावत तीन प्रकारची असते. निखालस तफावत, तौलनिक तफावत व समप्रमाण तफावत हे ते तीन प्रकार होत. ह्या तीन प्रकारांचीं उदाहरणें खालीं दिली आहेत. उदाहरणें देतांना सोयीसाठीं दोनच देश, भारत व इंग्लंड आणि दोनच वस्तु, साखर व कापड घेतल्या आहेत.

उदाहरण 'अ' **निखालस तफावत** : (Absolute difference in cost of production)

(१) कापडाचा दरमापीं उत्पादनखर्च इंग्लंडमध्यें रु. १००
(२) कापडाचा दरमापीं उत्पादनखर्च भारतांत रु. १२०
(३) साखरेचा दरमापीं उत्पादनखर्च इंग्लंडांत रु. १२०
(४) साखरेचा दरमापीं उत्पादनखर्च भारतांत रु. १००

उदाहरण 'ब' **तौलनिक तफावत** : (Comparative difference in costs of production)

(१) कापडाचा दरमापीं उत्पादनखर्च इंग्लंडमध्यें रु. १००
(२) कापडाचा दरमापीं उत्पादनखर्च भारतांत रु. ८०
(३) साखरेचा दरमापीं उत्पादनखर्च इंग्लंडमध्यें रु. १००
(४) साखरेचा दरमापीं उत्पादनखर्च भारतांत रु. ६०

उदाहरण 'क' **समप्रमाण तफावत** : (Equal difference in costs of production)

(१) कापडाचा दरमापीं उत्पादनखर्च इंग्लंडमध्यें रु. १००
(२) कापडाचा दरमापीं उत्पादनखर्च भारतांत रु. ८०
(३) साखरेचा दरमापीं उत्पादनखर्च इंग्लंडमध्यें रु. १००
(४) साखरेचा दरमापीं उत्पादनखर्च भारतांत रु. ८०

वरील तीन उदाहरणांपैकीं उदाहरण 'अ' मध्यें आंतरराष्ट्रीय उत्पादन-विभागणी कशी होईल हें अगदीं स्पष्ट आहे. कापडाचा उत्पादनखर्च इंग्लंडमध्यें

उत्पादन-फल-सिद्धान्ताच्या अंमलाचा परिणाम :—उत्पादनसाधनांची उपलब्धता व गुणवत्ता सर्वत्र समान नसल्यामुळें उत्पादनखर्चांत दिसून येणारी मूळची तौलनिक तफावत संबंधित वस्तूच्या अगर वस्तूंच्या उत्पादनाचें प्रमाण कितीहि असो, आंतरराष्ट्रीय व्यापार प्रत्यक्ष सुरू झाल्यानंतर टिकून रहाते असें मात्र नाहीं. ती टिकून न राहण्याचें कारण उघड आहे. तें म्हणजे **उत्पादन फल सिद्धान्ताचा** (Laws of Returns) अनुभव. तौलनिक खर्चांतील मूळची तफावत व तिचें प्रमाण टिकून राहावयाचें असेल तर संबंधित वस्तूंच्या उत्पादनांत नेहमींच स्थिर उत्पादन खर्चाची परिस्थिति (Constant Costs) असली पाहिजे. मागणी वाढल्यामुळें उत्पादन कितीहि वाढवावें लागलें तरी दर मापीं उत्पादनखर्च स्थिरच राहावयाचा असेल तर एक तर वस्तूच्या उत्पादनांत वापरण्यांत येणाऱ्या उत्पादनसाधनांच्या प्रमाणांत बदल होता कामा नये व दुसरें म्हणजे वस्तूचें उत्पादन कितीहि कमी अधिक होवो, त्यामुळें उत्पादनसाधनांच्या किंमतींत फरक पडतां कामा नये. अशी परिस्थिति अपवादात्मकच असूं शकेल. सर्वसाधारणपणें असाच अनुभव येतो कीं, वस्तूंच्या उत्पादनाचें प्रमाण वाढूं लागले कीं वाढत्या उत्पादनफलाच्या अनुभवामुळें कांहीं काळपर्यंत दरमापीं उत्पादनखर्च कमी होत जातो व नंतर घटत्या उत्पादन फलाला सुरवात होऊन दर मापीं उत्पादनखर्च सतत वाढत राहतो. हा सर्वसाधारण उत्पादनफलसिद्धान्त सर्व वस्तूंना लागूं होत असला तरी एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, कांहीं वस्तूंच्या उत्पादनांत—सर्वसाधारणपणें औद्योगिक वस्तूंच्या उत्पादनांत वाढत्या उत्पादनफलाचा म्हणजेच घटत्या उत्पादनखर्चाचा अनुभव येण्याची मर्यादा बरीच मोठी असते व कांहीं वस्तूंच्या उत्पादनांत–मुख्यतः शेती वस्तूंच्या उत्पादनांत ती लहान असल्यामुळें दरमापीं उत्पादनखर्च वाढण्यास तौलनिक दृष्टया लौकरच सुरवात होते. ही गोष्ट लक्षांत घेऊन स्थूलपणें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं कांहीं वस्तु दीर्घकाळपर्यंत वाढत्या उत्पादनखर्चांच्या अंमलाखालीं असतात व कांहीं वस्तु मुख्यत्वे करून घटत्या उत्पादनखर्चाच्या अंमलाखालीं असतात. तौलनिक उत्पादनखर्च सिद्धान्ताच्या व तदनुषंगानें होणाऱ्या आंतरराष्ट्रीय उत्पादनविभागणीच्या विचारांत ही गोष्ट अशा अर्थानें महत्त्वाची आहे कीं, मुख्यत्वेंकरून घटता उत्पादनखर्च दाखविणाऱ्या वस्तूंच्या बाबतींत उत्पादनाचें प्रमाण वाढवत जाणें श्रेयस्कर असल्यानें आंतरराष्ट्रीय व्यापारास सुरवात झाल्यानंतर मूळची तौलनिक तफावत वाढत जाण्याचा संभव असतो. त्यामुळें विशिष्ट देशांत त्या वस्तूंचें उत्पादन होऊं लागलें कीं, तेथेंच तें केन्द्रित होण्याची प्रवृत्ति निर्माण होते. उलटपक्षीं कांहीं वस्तूंच्या उत्पादनांत मागणीमुळें उत्पादन जसें वाढत जातें तशी उत्पादनखर्चांतील मूळची

[१] The one condition, at once essential to and also sufficient for the existence of international trade is a difference in the comparative as distinguished from absolute cost of producing the commodities exchanged—Cairnes.

तौलनिक तफावत कमीं होत असल्याचें दिसून येतें. ह्या गोष्टीचा परिणाम असा होतो कीं, ज्या देशांत मुळांत तौलनिक तफावतीमुळें उत्पादन केंद्रित झालें असेल तो देश संबंधित वस्तूच्या अगर वस्तूंच्या उत्पादनांतील आपलें महत्त्व टिकवूं शकत असला तरी इतर देशांतहि त्या वस्तूचें उत्पादन सुरू होण्यास परिस्थिति अनुकूल ठरते.[१०]

तौलनिक उत्पादन-खर्च सिद्धान्ताच्या व्यावहारिक व तात्त्विक मर्यादा :— (१) परराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंधामुळें पडणारी मर्यादा :— तौलनिक उत्पादन-खर्च सिद्धान्तानुसार आंतरराष्ट्रीय उत्पादन-विभागणी होते कीं नाहीं, हें पहातांना एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती हीं कीं, हा सिद्धान्त परराष्ट्रीय व्यापार संपूर्णपणें अनिर्बंध आहे व त्या व्यापाराची दिशा व स्वरूप ठरलें जाण्यांत निव्वळ आर्थिक प्रवृत्ति व प्रवाहच जोरदार असतात, ह्या गृहीत कृत्यावर आधारलेल्या असल्यानें तशी परिस्थिति जेथें व जेव्हां आढळून येईल तेथें व तेव्हांच हा सिद्धांत लागू पडेल. परंतु प्रत्यक्ष जगांत विशेषतः आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींत निव्वळ आर्थिक प्रवृत्ति जोरदार नसल्यानें व आर्थिक कारणाकरितांहि आंतरराष्ट्रीय व्यापारावर अनेक प्रकारचे निर्बंध घातले जात असल्यामुळें ह्या सिद्धान्ताची व्यावहारिक उपयुक्तता फारच मर्यादित झाली आहे. विशेषतः पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत नियंत्रित आंतरराष्ट्रीय व्यापार हा नियम

---

[१०] In the case of a commodity, prominently under the influence of the Law of Diminishing returns, the country best suited because of its factor supplies to produce the commodity in question will continue to be the major supplier, but it may share the world market with others. On the other hand, in the case of commodities prominently under the influence of the law of Increasing Returns, the initial comparative cost advantage tends to increase as production expands in response to increasing demand. As a result, once their production is localised in certain countries, competition is hard to get started in other countries.

If all commodities were produced under conditions of increasing cost, each country would tend to produce some of very commodity (except those commodities whose money costs f production even for a small output would exceed the prices at which that could be obtained from abroad and specilisation would be only partial) that it would consist in some products being produced to an amount insufficient to supply domestic consumption while other products would be produced in quantities sufficient to meet both the domestic demand and to provide a surplus for export—**Viner.**

व अनियंत्रित आंतरराष्ट्रीय व्यापार हा अपवाद अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. आर्थिक राष्ट्रवादाच्या प्रवाहामुळें, तसेंच आंतरराष्ट्रीय राजकारणांतील तपासणीच्या वातावरणामुळें इतर देशावर––विशेषतः महत्त्वाच्या वस्तूच्या बाबतींत फारसें अवलंबून राहावें लागूं नये ह्या उद्देशानें शक्य तेवढ्या प्रमाणांत स्वयंपूर्ण बनण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशांत पूर्ण रोजगाराची परिस्थिति निर्माण करावयाची असेल किंवा अविकसित देशांचा आर्थिक विकास करावयाचा असेल तर उत्पादन-खर्चाचा विचार न करतांहि विविध उद्योग-धंद्यांना उत्तेजन देणें इष्ट. हा विचार आर्थिक नीति ठरविली जाण्यांत सर्वत्र प्रभावी होत आहे. अशा स्थितींत तौलनिक उत्पादन-खर्चाचा सिद्धान्त बाजूस सारला गेला व त्या सिद्धान्ताच्या विपरीत अशी परिस्थिति आंतरराष्ट्रीय व्यापारांत दिसून आली तर नवल नाहीं. तेव्हां व्यवहारांत ह्या सिद्धान्ताचा उपयोग करतांना विशिष्ट अशी परिस्थिति गृहीत धरली असतां काय होईल, एवढेंच हा सिद्धान्त दर्शवितो हें विसरून चालणार नाहीं.

(२) **आर्थिक परिस्थितींतील गतिमानतेमुळें पडणारी मर्यादा :**—तात्त्विक दृष्टया ह्या सिद्धान्ताबाबत दुसरी एक गोष्ट लक्षांत घेणें आवश्यक आहे. ती अशी कीं, गतिमान परिस्थितीमध्यें उत्पादन-खर्चाबाबतची स्थितीहि सतत बदलत राहणें अपरिहार्य आहे. त्यामुळें आंतरराष्ट्रीय व्यापार अनिर्बंध आहे, अशी कल्पना केली तरी कोणत्याहि वेळेची उत्पादन-विभागणी संपूर्णतया तौलनिक उत्पादन-खर्चाच्या सिद्धान्ताबरहुकूम असेलच असा निर्वाळा देतां यावयाचा नाहीं. कोणत्याहि वस्तूचा उत्पादन-खर्च त्या वस्तूच्या उत्पादन-प्रमाणावर, उत्पादन-तंत्रावर, मागणीवर, उत्पादनघटकांच्या किंमतीवर, उत्पादन-फलसिद्धान्ताचा अनुभव संबंधित वस्तूच्या उत्पादनांत कशा प्रकारें येत आहे ह्यावर अवलंबून असतो. ह्यांपकीं कोणत्याहि बाबतींत बदल झाला कीं, तौलनिक उत्पादनखर्चाची स्थिति पालटते. उत्पादनफल सिद्धान्ताचा अनुभव मागणी वाढत असतां ज्या प्रकारें येतो त्याचा मूळचा तौलनिक तफावतीवर काय परिणाम होतो ह्याचा खुलासा वर केलाच आहे. तसाच खुलासा घटकांच्या किंमतीबाबतहि करतां येईल. संबंधित उद्योगधंदा देशांत संख्यादृष्टया महत्त्वाचा असला व महत्त्वाच्या उत्पादन साधनांचा पुरवठा पुरेसा लवचिक नसला तर उत्पादन घटकांच्या किंमती वाढून तौलनिक खर्चाच्या मूळच्या परिस्थितींत फरक पडणें अपरिहार्य आहे. ह्याचाच अर्थ असा कीं मागणी वाढल्यामुळें तौलनिक उत्पादन-खर्चाच्या मूळच्या स्थितींत फरक पडतो. उत्पादन-तंत्र बदलल्यासहि असाच फरक पडेल. उत्पादन-तंत्र बदलल्यास कदाचित् पूर्वी जेथें उत्पादन शक्य नव्हतें तेथें तें शक्य होऊं लागेल. विविध देशांतील उत्पादन-खर्चांतहि फरक होऊं शकेल. सारांश, एखाद्या वस्तूचा उत्पादन-खर्च एका देशांत अधिक अशी परिस्थिति एकदां दिसून आली कीं तशीच ती कायम राहील असें नाहीं.

(३) **स्पर्धेच्या अभावामुळें पडणारी मर्यादा** :—तौलनिक उत्पादन-खर्चाच्या सिद्धान्ताच्या अनुभवासाठीं आंतरराष्ट्रीय व्यापारांत स्पर्धेची आवश्यकता आहे. स्पर्धेचें अस्तित्व हें तौलनिक उत्पादन-खर्चाच्या सिद्धान्ताचें एक महत्त्वाचें गृहीत कृत्य आहे असें म्हटलें तरी चालेल. कारण स्पर्धेच्या परिस्थितींतच उत्पादनखर्च व किंमती ह्यांच्यांत समन्वय प्रस्थापित होईल. पण देशोदेशांच्या अर्थव्यवस्थेची सध्यांची स्थिति पहातां स्पर्धेचें गृहीतकृत्य वास्तवाच्या कसोटीला उतरणार नाहीं हें उघड आहे. स्पर्धेचा अभाव जेथें असतो तेथें उत्पादन-खर्च व किंमत ह्यांत तफावत पडूं शकते. हें किंमत ठरण्याच्या प्रक्रियेचा ज्यांना परिचय आहे त्यांच्या सहज लक्षांत येऊं शकेल. स्पर्धेचा अभाव असलेल्या परिस्थितींत आंतरराष्ट्रीय व्यापार तौलनिक उत्पादन-खर्चावर अवलंबून असतो, असें म्हणणें योग्य होणार नाहीं. आंतरराष्ट्रीय व्यापार तौलनिक किंमतीवर अवलंबून असतो, मग किंमतींतील फरक कोणत्याहि कारणामुळें उद्भवलेले असोत असें म्हणणेंच अधिक उचित होईल.

(४) **तौलानिक उत्पादनखर्चाच्या सिद्धान्ताचा अपुरेपणा** :— तौलनिक उत्पादन-खर्चाचा सिद्धान्त आन्तरराष्ट्रीय व्यापाराची कारणमीमांसा करण्यास पुरेसा नाहीं. त्या सिद्धान्तावरून आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील पुरवठ्याची बाजू फार समजू शकते. म्हणजे आन्तरराष्ट्रीय व्यापारांत विशिष्ट वस्तूंचा पुरवठा विशिष्ट देशांतर कडून कां होतो ह्याचा उत्पादन-खर्चाच्या बाजूकडून उलगडा त्या सिद्धान्तामुळें होतो. पण त्याचबरोबर मागणीची बाजू त्या सिद्धान्तांत उपेक्षिली आहे हें लक्षांत घ्यावयास हवें. आयात-निर्यात ठरण्यास आयातनिर्यातीच्या किंमती जबाबदार असतात. पण आयात-निर्यातीच्या किंमती केवळ उत्पादन-खर्चानुसार ठरतात, मागणीचा त्याच्याशीं कांहीं एक संबंध नसतो असें म्हणतां यावयाचें नाहीं. किंवा आयात-निर्यातीच्या किंमतीं ठरण्यांत मागणीची बाजू अधिक प्रभावी असतें असें म्हणणें यथार्थ होईल. आयात-निर्यातीच्या किंमती ठरण्यांत **पारस्पारिक मागणी** (Reciprocal demand) हा एक विशेष महत्त्वाचा प्रवाह आहे हें कदापि विसरून चालणार नाहीं. तौलनिक उत्पादन-खर्च व पारस्पारिक मागणी ह्या दोन्ही प्रवाहाची माहिती आंतरराष्ट्रीय व्यापाराचा पुरा खुलासा होण्याच्या दृष्टीनें आवश्यक आहे.[११]

---

[११] International trade does in fact not only depend on comparative cost i. e. on supply but also on conditions of demand —The comparative cost reasoning alone explains very little about international trade. It is indeed nothing more than an abbreviated account of the conditions of supply. It is only when the conditions of demand and of equilibrium are also considered that one is able to describe what happens—**Ohlin.**

(आ) आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभप्रमाण

आन्तरराष्ट्रीय व्यापार हा वस्तुविनिमय :—आन्तरराष्ट्रीय व्यापाराचें स्वरूप मूलत: व परिणामत: वस्तुविनिमयासारखें आहे. म्हणजे आयातरूपानें एखाद्या देशाला जो माल मिळतो त्याची किंमत त्या देशाला निर्यातीच्या रूपानें मोजावी लागते. निर्यात ही आयातीची किंमत किंवा आयातीचा मोबदला असतो असें म्हणण्यास हरकत नाहीं. निराळ्या शब्दांत असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं कीं, आन्तरराष्ट्रीय व्यापारांत कोणत्याहि देशाला आयातीच्या रूपानें लाभ होत असतो आणि तो लाभ साधण्यासाठीं निर्यातीच्या रूपानें होणारी हानि पत्करावी लागते. आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभहानीचा हिशेब हा असा आहे.

आन्तरराष्ट्रीय व्यापारांत भाग घेणाऱ्या कोणत्याहि देशाला असा प्रश्न पडणें स्वाभाविक आहे कीं, आपल्याला त्या व्यापारांत भाग घेण्यापासून लाभ अधिक होतो कीं, आपली हानि अधिक होते? ह्या प्रश्नाबाबत असें सांगतां येईल कीं, कोणतीहि विवक्षित वेळ घेऊन आन्तरराष्ट्रीय व्यापारांत लाभ अधिक होतो कीं हानि अधिक होते, हें ठरवितां येणार नाहीं. कारण आयातीसाठीं निर्यातरूपानें जी किंमत दिली जात असते ती त्या त्या वेळेच्या परिस्थितींत योग्य वाटणारी असते म्हणूनच दिली जात असते. जो लाभ होत असतो त्यासाठीं पत्करावी लागणारी हानि जेव्हां स्वखुषीनें पत्करलेली असते तेव्हां लाभ अधिक कीं हानि अधिक हा प्रश्न खरोखरच अप्रस्तुत ठरतो.

तथापि वरील प्रश्नालाहि कांहीं अर्थ देतां येतो. तौलनिक दृष्टचा विचार करूं लागल्यास वरील प्रश्न अर्थहीन नाहीं हें समजू शकेल. उदाहरणार्थ, १९५८ सालीं भारताला आन्तरराष्ट्रीय व्यापारांत लाभ अधिक कां हानि अधिक ह्या प्रश्नाचें कालनिरपेक्ष असें उत्तर देतां यावयाचें नाहीं. १९४८ च्या तुलनेनें १९५८ मध्यें आन्तरराष्ट्रीय व्यापारांत लाभ अधिक होत आहे कीं हानि अधिक होत आहे, ह्या प्रश्नाचें उत्तर मात्र देतां येईल. कारण हा प्रश्न तौलनिक स्वरूपाचा आहे.

आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभहानीबाबत वरीलसारखा तौलनिक स्वरूपाचा प्रश्न उपस्थित केला असतां त्याचें उत्तर कसें द्यावयाचें हें आतां पाहूं. वर दाखविल्याप्रमाणें निर्यात ही आयातीची किंमत असल्यानें ही किंमत जेव्हां वाढेल तेव्हां आन्तरराष्ट्रीय व्यापारानें संबंधित देशाच्या दृष्टीनें अनुकूल कलाटणी घेतली व उलटपक्षीं म्हणजे निर्यातरूप किंमत जेव्हां कमी होते तेव्हां त्याच व्यापारानें प्रतिकूल कलाटणी घेतली असें म्हणतां येईल. एखाद्या देशाची आयात पूर्वींइतकीच राहून आयातीच्या मोबदल्यांत द्यावी लागणारी निर्यात जर पूर्वींपेक्षां अधिक असली (किंवा निर्यात पूर्वींइतकी राहून आयात मात्र पूर्वींपेक्षां कमी झाली) तर तौलनिक दृष्टचा आन्तरराष्ट्रीय व्यापारांत अधिक हानि होत आहे, असें म्हणण्यास कांहींही हरकत नाहीं. त्याच न्यायानें पूर्वींइतक्या निर्यातीच्या मोबदल्यांत आयात अधिक मिळूं लागली

किंवा पूर्वी इतक्याच आयातीसाठीं द्यावी लागणारी निर्यातरूप किंमत कमी झाली तर आन्तरराष्टीय व्यापार पूर्वीपेक्षां अधिक लाभदायक होत आहे असें म्हणतां येईल. सारांश, आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभ हानि ही तौलनिक कल्पना असून आयात-निर्यातीचा बदलत जाणारा परस्परसंबंध दर्शविणारी अशी ती कल्पना आहे.

आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभहानीचें मापन :—आन्तरराष्ट्रीय व्यापारांत पूर्वीच्या मानानें लाभ अधिक होत आहे कीं, हानि अधिक हें **व्यापारशर्ती** (Terms of Trade) पाहिल्यास सहज समजूं शकतें व्यापारशर्तींत काय द्यावयाचे व त्याच्या मोबदला काय व किती घ्यावयाचे ह्याचा समावेश होतो. व्यापारशर्ती पाहिल्यास व्यापारांत भाग घेणाऱ्या कोणत्याहि पक्षाला काय मिळतें व त्याच्या मोबदला काय गमवावें लागतें हें समजतें. कालोघांत कोणत्याहि पक्षाच्या दृष्टीनें व्यापारशर्ती बदलत असतात. आयात वस्तूंची किंमत कमी न होतां निर्यात वस्तूंची किंमत वाढली तर पूर्वींएवढ्या आयातीसाठीं द्यावा लागणारा मोबदला ओघानेंच कमी होतो व आन्तरराष्ट्रीय व्यापार अधिक लाभदायक ठरूं लागतो. म्हणजेच व्यापारशर्ती संबंधित देशाला अनुकूल होतात. उलट निर्यातवस्तूंच्या किंमतींत वाढ न होता आयातवस्तूंच्या किंमतींत वाढ झाली किंवा निर्यात वस्तूंच्या किंमती आयातवस्तूंच्या किंमतीच्या तुलनेनें कमी प्रमाणांत वाढल्या तर आन्तरराष्ट्रीय व्यापार तुलनेनें कमी लाभकारक होऊं लागेल हें उघड आहे. म्हणजेच व्यापारशर्ती संबंधींत देशाला प्रतिकूल होतात.[१२] तेव्हां आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभहानि ही आयात-निर्यातीचा परस्पर संबंध दर्शविणारी कल्पना आहे, असें म्हणण्याऐवजीं आयातवस्तूंच्या किंमती व निर्यातवस्तूंच्या किंमती ह्यांच्यांतील परस्पर संबंध दर्शविणारी अशी ती कल्पना आहे, असें म्हटलें तरी चालण्याजोगें आहे. आयातवस्तूंच्या किंमतीआयातमूल्य-निर्देशांकानें दर्शविल्या जातात व निर्यात वस्तूंच्या किंमतीनिर्यातमूल्यनिर्देशांकानें दर्शविल्या जातात. हें लक्षांत घेतां निर्यातमूल्य निर्देशांक व आयातमूल्यनिर्देशांक ह्यांच्यांतील परस्परसंबंधानें संबंधित देशाचें आन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभप्रमाण ठरतें असें म्हणणें उचित होईल.[१३]

---

[१२] The trend of the commodity terms of trade is regarded as an index of the direction of change of the amount of gain from trade. A rise in export prices relatively to import prices is a favourable movement of the terms of trade, whereas a rise in import prices relatively to export prices represents an unfavourable movement of the terms of trade.

The terms of trade of a country represent the relation between the prices it gets for its exports and those it is required to pay for its imports. The terms of trade of a country have improved or deteriorated relative to a base period if the price level of exports has increased or decreased, respectively, relative to the prices of imports—**Kindleberger.**

व्यापारशर्ती अनुकूल करणारी परिस्थिति :—कोणत्याहि देशाचें अन्तरराष्ट्रीय व्यापारांतील लाभप्रमाण ज्या आर्थिक प्रवाहावर अवलंबन असतें त्यांच्यांत त्या देशाच्या दृष्टीनें अनुकूल असे फेरफार जेव्हां होतात तेव्हां लाभप्रमाण वाढतें. उलटपक्षीं तें कमी होतें. लाभप्रमाण कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून असतें व त्या गोष्टींत होणाऱ्या फेरफारांचा संबंधित देशाच्या दृष्टीनें अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम नेमका कशामुळें होतो त्याची माहिती थोडक्यांत खालीं दिली आहे :—

(१) **लोकांच्या आवडीनिवडींतील बदल** :—आवडीनिवडी बदलल्यामुळें जेव्हां कोणत्याहि देशांतून निर्यात होणाऱ्या वस्तूंकरितां जागतिक मागणी वाढते तेव्हां सामान्यतः निर्यात वस्तूंच्या किंमती तुलनेनें वाढून लाभप्रमाण वाढण्यास मदत होते. उलटपक्षीं जेव्हां त्या देशाच्या निर्यातीकरितां जागतिक मागणी कमी होते तेव्हां सामान्यतः निर्यातवस्तूंच्या किंमती तुलनेनें कमी होऊन लाभप्रमाण कमी होण्याची प्रवृत्ति दिसून येते. मात्र मागणी वाढल्यास (अथवा कमी झाल्यास) निर्यात वस्तूंच्या किंमती किती प्रमाणांत वाढतील (अथवा कमी होतील), हें केवळ मागणीवर अवलंबून नसून मुख्यतः पुरवठ्याच्या लवचिकतेवर अवलंबून असेल. हा प्राथमिक नियम लक्षांत ठेवलाच पाहिजे. पुरवठा जेवढा अधिक लवचिक असेल तेवढें मागणी वाढल्यामुळें किंमत वाढण्याचें प्रमाण कमी असेल (पुरवठा अति लवचिक असेल तर किंमत कमीच होईल). पुरवठा जेवढा कमी लवचिक असेल तेवढ्या निर्यातीच्या किंमती अधिक प्रमाणांत वाढतील.

---

[13] Terms of Trade of a country indicate the amount of imports obtained in exchange of a unit of its exports. Terms of Trade move in favour of that country when the prices of exports rise relatively to those of imports. The terms of trade move against it when the prices of imports rise relatively to those of exports. We will write e to represent the export commodities, I to represent the import commodities, p for the price index number, o for the initial year and i for the given year. An index of the commodity terms of trade can be represented symbolically as

$$T = \frac{\frac{e\,P\,i}{e\,P\,o}}{\frac{I\,Pi}{I\,Po}}$$

where the index measures the trend of the physical amount of the foreign goods, received in exchange for one physical unit of the export goods, with a rise in the index indicating a favourable trend and vice versa—**Viner.**

(२) **लोकांच्या उत्पन्नांतील व खर्चांतील बदल** :—आयात-निर्यातीसाठीं असणारी मागणी लोकांच्या आवडीनावडीवर ज्याप्रमाणें अवलंबून असते, त्याचप्रमाणें उत्पन्नावरहि अवलंबून असते. म्हणूनच जेव्हां स्वदेशांतील अथवा परदेशांतील लोकांचीं उत्पन्नें वाढत अथवा कमी होत असतात तेव्हां आयातनिर्यातीच्या मागणीवर व पर्यायानें लाभप्रमाणावर अपरिहार्यपणें परिणाम होतो. प्रत्यक्षांत हा परिणाम कोणत्या दिशेनें व किती प्रमाणांत होतो हें :— (अ) उत्पन्नांतील बदलांचें मान व स्वरूप (आ) आयात-निर्यातीच्या मागणींतील बदल व (इ) आयात-निर्यात वस्तूंच्या पुरवठ्याची लवचिकता ह्या वरून ठरतें. उदाहरणार्थ, स्वदेशांतील समस्त खर्च जेव्हां तेजीमुळें अगर शासनसंस्थेच्या प्रयत्नामुळें वाढतो तेव्हां त्यायोगें स्वदेशांतील लोकांचीं उत्पन्नें वाढतात. वाढलेल्या उत्पन्नाचा कांहीं भाग आन्तरराष्ट्रीय व्यापारांत—म्हणजे आयात व निर्यात ह्या दोहोंत—समाविष्ट होणाऱ्या वस्तूंवर खर्च होणें साहजिकच आहे. त्यामुळें आयात निर्यात वस्तूंची मागणी वाढेल. वाढलेल्या मागणीचे त्या वस्तूंच्या एकंदर मागणींत जें स्थान असेल त्या मानानें, तसेंच पुरवठ्याच्या लवचिकतेच्या मानानें, आयात-निर्यात वस्तूंच्या किंमती वाढूं पाहातील. दोन्ही प्रकारच्या वस्तूंच्या किंमती वाढत असतां लाभप्रमाणावर नेमका काय परिणाम होईल. हे अर्थातच आयात वस्तूंच्या कीं निर्यात वस्तूंच्या किंमती अधिक वाढतील ह्यानुसार ठरेल. उलट देशांतील लोकांचीं उत्पन्नें जेव्हां कोणत्या ना कोणत्या कारणानें कमी होत असतात तेव्हां आयातनिर्यात वस्तूंच्या किंमती कमी होऊं पाहातात. कोणत्या किंमती अधिक कमी होतात ह्यावर लाभप्रमाणांतील फेरफार अवलंबून असतो.

अंतर्गत खर्च कमी-अधिक होण्याचा ज्याप्रमाणें आयातनिर्यातीवर व म्हणून लाभप्रमाणावर परिणाम होतो त्याचप्रमाणें परदेशांतील खर्च व त्यायोगें परदेशांतील उत्पन्नें कमीअधिक होण्याचाहि आंतरराष्ट्रीय व्यापारांतील लाभप्रमाणावर परिणाम होतो. उदाहरणार्थ, निर्यातवस्तू प्रामुख्यानें ज्या देशांत जातात त्या देशांत तेजी असल्यास किंवा देशांतील समस्त खर्च अन्य कारणानें वाढत असल्यास निर्यात वस्तूकरितां मागणी, त्यांच्या किंमती व लाभप्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण होते. (आयात वस्तूहि त्याच देशांतून येत असल्यास कांहीं प्रमाणांत त्यांच्या किंमतीहि वाढतील हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे.) उलट बाहेरील मंदीचा निर्यात वस्तूंच्या मागणीवर, त्यांच्या किंमतीवर व लाभप्रमाणावर विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो.

(३) **सरकारची आर्थिक नीति** :—लाभप्रमाण हें आयातवस्तू व निर्यातवस्तूंच्या किंमतीवर अवलंबून असतें. हें वरील विवेचनावरून लक्षांत आलें असेलच. साहजिकच विशिष्ट वस्तुप्रकाराच्या किंमती वाढाव्यात अगर कमी व्हाव्यात असा उद्देश असलेली अर्थनीति जेव्हां शासनसंस्थेकडून स्वीकारली जाते तेव्हां त्या अर्थनीतीचा परिणाम लाभप्रमाणावर होतोच. उदाहरणार्थ, एखाद्या देशानें आयात कमी करण्याच्या

उद्देशानें आयातीवर निर्बंध घातले तर आयातवस्तूंच्या किंमतीवर अर्थातच लाभप्रमाणावर अपरिहार्यपणें परिणाम होतो. हा परिणाम कशा स्वरूपाचा असतो, हें मुख्यत्वेंकरून आयातवस्तूंची मागणी किती लवचिक असते, ह्यावर अवलंबून असतो. आयात वस्तूंची मागणी एकापेक्षां कमी लवचिक (Less than unity) असेल तर मागणी कमी होण्यामुळें होणारें नुकसान भरून काढण्यासाठीं आयात मालाचा पुरवठा करणारें त्या मालाच्या किंमती वाढवतील व अशा प्रकारें आयात वस्तूंच्या किंमती वाढून आयातीवर निर्बंध घालणाऱ्या देशाच्या दृष्टीनें लाभप्रमाणावर प्रतिकूल परिणाम होईल. उलट आयातीची मागणी एकापेक्षां अधिक लवचिक (More than unity) असेल तर आयातवस्तूंच्या किंमती न वाढण्याचा—कदाचित् कमी होण्याचाच—संभव असतो. अशा परिस्थितींत लाभप्रमाणावर विपरीत परिणाम होत नाहीं. अशाच प्रकारचें विवेचन आयातीवरील **जकाती** संबंधांतहि करतां येईल. आयातीच्या मागणीची लवचिकता एकापेक्षां कमी असेल तर जकातीमुळें सामान्यतः आयातवस्तूंच्या किंमती वाढून लाभप्रमाण कमी होईल. पण लवचिकता अधिक असेल तर मात्र आयातवस्तूंच्या किंमती वाढविणें त्या वस्तूंची निर्यात करणाऱ्या देशांना परवडत नाहीं. त्याच प्रमाणें निर्यातीवरील निर्बंधाचा व जकातीचाहि परिणाम लाभप्रमाणावर होतो. निर्यात कमी करण्याचें धोरण असल्यास किंवा निर्यातीवर जकाती बसवल्यास सामान्यतः निर्यातवस्तूंच्या किंमती वाढून लाभप्रमाणावर अनुकूल परिणाम होतो. अर्थात् निर्यात वस्तूंची मागणी एकापेक्षां कमी लवचिक असल्यास असा परिणाम होईल हें विसरून चालणार नाहीं. निर्यात वाढविण्याचा प्रयत्न सामान्यतः निर्यातवस्तूंच्या किंमती कमी झाल्यासच यशस्वी होतो.

(४) **उत्पादन खर्चांतील फरबदल** :—वस्तूंच्या किंमती व त्यांचा उत्पादनखर्च ह्यांचा घनिष्ठ संबंध असल्यानें उत्पादनखर्च कमीअधिक होण्याचाहि लाभप्रमाणावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होतो. उदाहरणार्थ, एखाद्या देशांतील उत्पादनघटकांची उत्पादनक्षमता वाढल्यास वास्तव उत्पादनखर्च त्या प्रमाणांत कमी होऊन निर्यातवस्तूंच्या किंमती सामान्यतः कमी होतात व त्या मानानें लाभप्रमाणहि कमी होतें. **चलनरूप वेतनदर** (Money wage rates) जेव्हां कमी होतात तेव्हांहि—ते एकच देशांत कमी झाले आहेत असें गृहीत धरल्यास—सामान्यतः हाच परिणाम होतो. कोणत्याहि कारणानें उत्पादनखर्च वाढल्यास निर्यातवस्तूंच्या किंमती वाढून लाभप्रमाण वाढतें.

[१४] The more elastic the demand of either country the larger will be the volume of her exports and of imports. But the more also will her exports be enlarged relatively to her imports, or in other worlds the less favourable to her will be the terms of trade—**Marshall.**

आतांपर्यंतच्या विवेचनाचा सारांश असा सांगतां येईल कीं, आयात-निर्यात वस्तूंच्या किंमती ज्या ज्या प्रवाहामुळें बदलूं शकतात त्या त्या सर्व प्रवाहावर संबंधित देशाचें आंतरराष्ट्रीय व्यापारांतील लाभप्रमाण म्हणजेच व्यापारशर्तींची त्या देशाच्या दृष्टीनें अनुकूलता अथवा प्रतिकूलता अवलंबून असतें. ह्या दृष्टीनें विचार करतां (अ) स्वदेशस्थ व परदेशस्थांच्या आवडीनावडी (आ) अंतर्गत व परदेशांतील समस्त खर्चाचें प्रमाण (इ) आयात-निर्यातीवरील निर्बंध व जकाती (ई) आयात-निर्यातवस्तूंच्या उत्पादनखर्चांत होणारे फेरफार हे आर्थिक प्रवाह विशेष महत्त्वाचे असतात. ह्यांतील प्रत्येक गोष्टींतील बदलांचा आयात-निर्यातीच्या किंमतीमानावर काय परिणाम होतो हें मागणी-पुरवठ्याची लवचिकता समजल्या-शिवाय ठरवतां येत नाहीं. तसेंच हे सर्व प्रवाह परस्परांवर परिणाम करणारे असल्यानें आणि एकाच वेळीं निरनिराळ्या देशांत एकाच स्वरूपाचे अथवा उलट स्वरूपाचे बदल होत असल्यानें लाभप्रमाणाचा विचार स्थलकालपरिस्थितिनिरपेक्ष असूं शकतच नाहीं. तात्विक चर्चेंत इतर प्रवाहांत व इतर देशांत बदल होत नाहीं, असें गृहीत धरून एकाच देशांत एखाद्याच प्रवाहांत विशिष्ट दिशेनें बदल झाल्यास त्या देशाच्या लाभप्रमाणावर काय परिणाम होतो, ह्याचेंच फक्त दिग्दर्शन करतां येतें. त्या दृष्टीनें एवढें विवेचन पुरेसें होईल.[१५]

[१५] Terms of trade of a country are influenced by several factors. Out of them, changes in the demand and supply conditions and the reciprocal elasticities of demand and supply are by far the most important. "The terms of trade can be directly influenced by the reciprocal demands and by nothing else. The reciprocal demands in turn are ultimately determined by the cost conditions together with the basic utility functions —Viner.

: ९ :

आन्तरराष्ट्रीय व्यापार-नीति
[INTERNATIONAL TRADE POLICY]

(अ) अनिर्बंध व्यापार-नीति

आन्तरराष्ट्रीय व्यापाराबाबत शासनसंस्थेनें कोणतें धोरण स्वीकारावें हा नेहमींच वादाचा विषय ठरला आहे. ह्या वादांत सनातन अर्थशास्त्रज्ञांनीं नेहमींच हिरीरीनें **अनिर्बंध व्यापाराची** (Free Trade) बाजू मांडली आहे. सनातन अर्थशास्त्राचा अनिर्बंध व्यापाराचा पुरस्कार 'आर्थिक कल्याणा'च्या कल्पनेवर अधिष्ठित आहे व आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधींच्या तौलनिक खर्चाच्या सिद्धान्ताचा त्याला आधार आहे. आर्थिक कल्याणासंबंधींची सनातन अर्थशास्त्राची कल्पना अगदीं सरळ आहे. उपलब्ध साधन-सामग्रीच्या आधारें व त्या साधनसामग्रीचा पुरेपूर उपयोग करून जास्तींत जास्त उत्पादन करणें म्हणजेच आर्थिक कल्याण साधणें होय, असें सनातन अर्थशास्त्र मानतें. जास्तींत जास्त उत्पादन व्हावयाचें असेल तर श्रमविभागणीचे सर्व फायदे मिळविण्या-करितां प्रत्येक व्यक्तीनें ज्या वस्तूच्या उत्पादनाकरितां ती विशेष पात्र आहे त्या वस्तूच्या उत्पादनावर आपलें सर्वस्व केंद्रित केलें पाहिजे. हाच नियम राष्ट्राराष्ट्रांनाहि लागू केला पाहिजे. प्रत्येक देशानें आपल्या साधन सामग्रीचा जास्तींत जास्त फायदा मिळविण्यासाठीं ज्या वस्तूंच्या उत्पादनासाठीं ती साधन सामग्री विशेष पात्र आहे त्यांच्या उत्पादनाकरितां तिच्या उपयोग केला पाहिजे, अशी सनातन अर्थशास्त्राची भूमिका आहे. जी वस्तु परदेशांतून घेतली असतां स्वस्त मिळते ती परदेशी वस्तु विकत घेणें व तिच्या मोबदल्यांत आपण जी वस्तु परकीयाना स्वस्त वाटेल अशा भावानें देऊं शकूं ती देणें ह्यांत गैर असें कांहींच नाहीं, अशा शब्दांत ॲडम स्मिथनें ही भूमिका मांडली.[1] हीच भूमिका तौलनिक अनकूलतेचा सिद्धान्त पुढें मांडून रिकार्डोनें अधिक शास्त्रशुद्ध बनवली. त्यानें असें प्रतिपादन केलें कीं, ज्या वस्तूंच्या उत्पादनासाठीं एखाद्या देशाला तौलनिक अनुकूलता लाभलेली असते त्या वस्तूचें उत्पादन त्या देशानें करणें हें त्या देशाच्या दृष्टीनें तर हितकारक असतेंच; पण इतर देशांच्या दृष्टीनेंहि तसें करणें हितकरक असतें. तसें केल्यानें सर्व वस्तूंचें उत्पादन वाढतें. प्रत्येक वस्तूचा उत्पादनखर्च कमींत कमी होतो, सर्व वस्तु एरवीं मिळाल्या असत्या त्यापेक्षां स्वस्त मिळूं लागतात व देशांतील साधनसामग्रीचा जास्तींत जास्त चांगला वापर केला जातो. स्वयंपूर्णतेच्या मागें लागल्यानें ह्या सर्व फायद्यांना मुकावें लागतें. तेव्हां

[1] What is prudence in the conduct of every private family, can scarce be folly in that of a great kingdom. If a foreign country can supply us with a commodity cheaper than we ourselves can make it, better buy it of them with some part of the produce of our own industry, employed in a way in which we have some advantage—**Smith.**

स्वयंपूर्णतेच्या मार्गें न लागतां प्रत्येक देशानें इतर देशांबरोबर व्यापारी संबंध प्रस्थापित करावेत. ज्या वस्तु आपल्या देशांत चांगल्या व स्वस्त होऊं शकत नाहींत त्यांचें उत्पादन करण्याच्या भरीस न पडतां ज्यांच्या उत्पादनासाठीं सर्व प्रकारची अनुकूलता लाभलेली आहे त्या वस्तूंचेंच उत्पादन प्रत्येक देशानें करावें, असा रिकार्डोच्या प्रतिपादनाचा आशय होता. पोर्तुगाल हा देश त्यानें आपल्या प्रतिपादनांत उदाहरणा-दाखल घेतला होता.[२] तौलनिक अनुकूलतेच्या सिद्धान्तानुसार व्यवहार होणें इष्ट असेल तर अनिर्बंध व्यापाराचें धोरण सर्व राष्ट्रांनीं स्वीकारलें पाहिजे. कारण तें धोरण स्वीकारल्यास आपोआपच तौलनिक खर्चाच्या विचाराला प्राधान्य मिळून त्यानुसार आंतरराष्ट्रीय उत्पादन-विभागणी होईल असा सनातन अर्थशास्त्राचा दावा होता.[३]

अनिर्बंध व्यापार-नीतीचे फायदे :—हा दावा ग्राह्य धरल्यास तौलनिक अनुकूलतेच्या सिद्धान्तानुसार व्यवहार होण्याचे जे फायदे असतात ते सर्व **अनिर्बंध व्यापार-नीति** (Free Trade Policy) चे फायदे ठरतात. ते फायदे पुढीलप्रमाणें सांगतां येतील.

(१) अनिर्बंध व्यापारामुळें आंतरराष्ट्रीय उत्पादन-विभागणी शास्त्रशुद्ध रीत्या होऊन जागतिक उत्पादन जास्तींत जास्त होतें.

(२) अनिर्बंध व्यापारामुळें केवळ जागतिक उत्पादनच वाढतें असें नव्हे; तर अनिर्बंध व्यापारांत सहभागी होणाऱ्या प्रत्येक देशाचें राष्ट्रीय उत्पादन जास्तींत जास्त होतें. कारण देशाची उत्पादनसामग्री तिची उत्पादनक्षमता ज्या उपयोगांत जास्तींत

[२] If Portugal had no commercial connection with other countries, instead of employing a great part of her capital and industry in the production of wines, with which she purchases for her own use, the cloth and hardware of other countries, she would be obliged to devote a part of that capital to the manufacture of those commodities, which she would thus obtain probably inferior in quality as well as quantity—**Ricardo.**

[३] According to classical theory, the gain to a country or a region from foreign trade consists in getting indirectly in exchange for those products in which a country has comparative advantage in production, (or less comparative disadvantage) more goods, or better goods, than could be produced at home with the same quantity of productive resources, it being understood that the possible gain may be used to obtain increased leisure as well as more and better commodities. Foreign trade thus involves some degree of specialisation or of international division of labour. Specialisation, however, is not a good thing, in itself, but is good only so far as it increases real income or yields a national net gain—**Viner**.

जास्त असते त्याचसाठीं वापरली जाते. म्हणजेच निराळ्या शब्दांत अनिर्बंध व्यापारामुळें जागतिक उत्पादनाची विभागणीहि अशा प्रकारें होते कीं, प्रत्येक देशाला त्या उत्पादनाचा योग्य व शक्य तेवढा अधिक वांटा मिळतो.[४]

(३) अनिर्बंध व्यापारामुळें सर्व देशांतील उत्पादन-घटकांचा व त्यांच्या मालकांचा फायदा होण्याचा फारच संभव असतो. असें तीन कारणामुळें होतें. एक तर जेथें त्यांची पात्रता सर्वाधिक असते तेथेंच उत्पादन-घटक वापरले जात असल्यामुळें उत्पादनघटकांच्या मालकांना जास्तींत जास्त मोबदला मिळूं शकतो. दुसरें असें कीं, अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारामुळें श्रमविभागणीचें व तदनुषंगानें होणाऱ्या विशेषीकरणाचें क्षेत्र वाढून उत्पादनघटकांना विशेषीकरणाचे सर्व फायदे मिळूं शकतात. प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीनें विशेषीकरणाचा सर्वांत महत्त्वाचा फायदा असा कीं, उत्पादनघटकाच्या उत्पादनक्षमतेंत चांगलीच वाढ होऊन त्यामुळें त्यांच्या मालकांच्या उत्पन्नांत यथाप्रमाण वाढ होऊं शकते. अशा प्रकारें एका बाजूनें उत्पादनघटक मालकांचीं उत्पन्नें वाढत असतां दुसऱ्या बाजूनें अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आणखी एक इष्ट परिणाम होत असतो; तो असा कीं, विशेषीकरणामुळें वाढलेल्या उत्पादनक्षमतेचा प्रभाव पडून उपभोग्य वस्तूंच्या किंमती मात्र उतरत असतात. म्हणजेच एका बाजूस वाढतें उत्पन्न आणि दुसऱ्या बाजूस घटत्या किंमती अशी सर्वस्वी इष्ट स्थिति घटक मालकांस लाभते.[५]

वरील विवेचनाचा आशय असा कीं, केवळ आर्थिक दृष्टिकोनांतून विचार केल्यास अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचा फायदा प्रत्येक व्यक्तिमात्रास मिळतो व एकाचा फायदा तोच दुसऱ्याचा फायदा, दुसऱ्याचा फायदा तोच तिसऱ्याचा फायदा असें होऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या फायद्यांना जागतिक स्वरूप प्राप्त होतें.

अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे मिळण्यास अनकूल परिस्थिति :— अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे विशिष्ट परिस्थितींतच मिळूं शकतात. त्या परिस्थितीला आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे मिळविण्यासाठीं गृहीत धरावी लागणारी परिस्थिति असें म्हणावें लागेल. अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे

---

[४] The major case which can be made for laissez—faire policies towards international commerce is based on the ground that this permits the most efficient allocation of resources and hence yields the maximum national income.

[५] There are strong theoretical reasons for supposing that the real rewards of productive factors will, in general be augmented by free trade policies—Very likely, the physical productivity of factors will be greater and hence they will be more highly paid, and an enhanced value of consumer goods will reduce their price relative to factor incomes.

अर्थव्यवस्था खालील वैशिष्टयांनीं युक्त असल्यासच संपूणपणें मिळतील ह्याची जाणीव सनातन अर्थशास्त्रज्ञांना पुरेपूर होती :—

(१) अर्थव्यवस्थेंत पूर्ण स्पर्धेचे अस्तित्व असलें पाहिजे. पूर्ण स्पर्धा असल्यास उत्पादनखर्चाच्या पातळीवर किंमती स्थिरावतील व तौलनिक अनुकूलतेच्या सिद्धान्तानुसार होणारा व्यवहार अर्थपूर्ण होईल. उत्पादनखर्चाच्या पातळीवर किंमती येतील अशी हमी नसल्यास तौलनिक अनकूलतेच्या सिद्धान्तानुसार आंतरराष्ट्रीय उत्पादन-विभागणी होईलच व झाली तरी तीं फायदशीर ठरेलच असा निर्वाळा देतां यावयाचा नाहीं.[६]

(२) अर्थव्यवस्थेंत पूर्ण रोजगार आहे, असें अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचे पुरस्कर्ते गृहीत धरतात. जेव्हां पूर्ण रोजगार असतो तेव्हां कोणत्याहि आर्थिक नीतीचा फायदा रोजगार वाढण्यांत होईल असें प्रतिपादन करण्याचें प्रयोजन नसतें. म्हणूनच अनिर्बंध व्यापारनीतीच्या समर्थनाचा मुख्य रोख असा असतो कीं, अनिर्बंध व्यापार-नीतीमुळें उत्पादनघटक आर्थिक दृष्टचा अधिक किफायतशीर अशा व्यवसायांत गुंतवले जातील.[७]

(३) अनिर्बंध व्यापार-नीतीचे पुरस्कर्ते अनिर्बंध व्यापार-नीतीचे फायदे दीर्घ-काळाच्या संदर्भांतच मिळूं शकतील असेंच प्रतिपादितात. अनिर्बंध व्यापाराची नीति एखाद्या राष्ट्रानें स्वीकारल्यास त्या नीतीचे अल्पकालीन असे कांहीं तोटे होऊं शकतील. ह्याची जाणीव ते दर्शवितात. उदाहरणार्थ, अनिर्बंध व्यापार-नीतीनुसार एखाद्या उद्योगधंद्यांतील संरक्षक जकाती काढून घेतल्यास त्या धंद्यांत बेकारी निर्माण होण्याचा संभव असतो; पण त्याच नीतीमुळें इतर उद्योगधंद्यांत वाढ होऊन ही बेकारी नाहींशी होईल असा त्यांचा दावा असतो. तसेंच संरक्षणाच्या धोरणामुळें जरी कांहीं उद्योग-धंद्यांचा व त्यांत काम करणारांचा तात्पुरता फायदा झाल्यासारखा वाटला तरी एकंदरीनें दीर्घकालाच्या संदर्भांत ते फायदे देशाच्या दृष्टीनें तोटचासमान असतात. कारण त्यामुळें अर्थव्यवस्थेला लागणारें चुकीचें वळण टळत नाहीं, असाहि त्यांचा दावा असतो. सारांश, अनिर्बंध व्यापाराचें समर्थन दीर्घकालाच्या संदर्भांतच केलें जातें. त्या समर्थनांत परराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंधामुळें होणारे फायदे उपेक्षणीय तरी समजले जातात किंवा दीर्घकालीन फायद्यापेक्षां कमी महत्त्वाचे व त्यांना विरोधी असे मानले जातात.[८]

---

[६] Free trade argument assumes that markets are free and competitive, so that market price reflects at least approximately relative costs.

[७] The classical free trade argument takes for granted full employment and postulates better quality employment rather than more employment as resulting from free trade—**Viner.**

(४) अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापाराचे फायदे उत्पादनघटकांचें देशान्तर्गत गतिसौकर्य भरपूर असेल तरच मिळतील असें मानलें जातें. उत्पादनघटकांत भरपूर गतिसौकर्य असेल तरच तौलनिक अनुकूलतेमुळें ज्या उद्योगधंद्यांची देशांत वाढ होणें इष्ट असतें ते उद्योगधंदे वाढू शकतील हें उघड आहे. उत्पादनघटकांतील गतिसौकर्याच्या अभावीं केवळ इतर अडथळे दूर केल्यानें इष्ट त्या उद्योगधंद्यांत वाढ व्हावयाची नाहीं. तेव्हां अनिर्बंध व्यापार-नीतीचे फायदे सांगतांना पूर्ण गतिसौकर्य गृहीत धरावें लागावें हें स्वाभाविकच आहे.[९]

(आ) संरक्षण-नीति

संरक्षण-नीतीची आवश्यकता (The case for protection) :—सनातन अर्थशास्त्रानें अनिर्बंध (परराष्ट्रीय) व्यापार-नीतीचा पुरस्कार केलेला असला तरी जगाचा आर्थिक व्यवहार पाहिला तर परराष्ट्रीय व्यापारावर निर्बंध घालण्याचीच प्रवृत्ति राज्यकर्त्यांत अधिक दिसून येते. ग्रेटब्रिटनखेरीज कोणत्याहि देशानें अनिर्बंध व्यापार-नीतीचा मोकळेपणीं कधीं स्वीकार केला असें म्हणतां येत नाहीं. आणि ग्रेटब्रिटनमध्यें सुद्धां मुक्त परराष्ट्रीय व्यापाराचा कालखंड जेमतेम एका शतकाचा होता. पहिल्या महायुद्धापर्यंत खुल्या व्यापाराचा पुरस्कार व कांहीं अंशीं व्यवहार जोरदार होता; पण त्यानंतरच्या जगांत मुक्त परराष्ट्रीय व्यापार हा अपवाद व व्यापारावरील निर्बंध हा नियम झाला आहे, असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. परराष्ट्रीय व्यापारावर निर्बंध घालण्यामुळें विशिष्ट हितसंबंधीयांचा नेहमींच फायदा होतो. राज्यकर्त्यांवर पडणारें दडपण हें बऱ्याच वेळां परराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंधाचें आद्य कारण असतें. तथापि परराष्ट्रीय व्यापारावरील निर्बंधाच्या समर्थनार्थ तात्त्विक दृष्टया महत्त्वाचें असे अनेक मुद्दे विविध अर्थशास्त्रज्ञांनीं मांडले आहेत. त्यांतील विशेष महत्त्वाच्या मुद्द्यांचा परामर्ष खालीं घेतला आहे :—[१०]

---

[८] Free trade analysis is based on long term considerations. Possible short term benefits of departure from free trade are regarded either as negligible or as involving barriers to attainment of the greater long run benefits.

[९] Free trade doctrine assumes effective occupational mobility of the factors in response to differences in real returns. If all factors are permanently frozen to their original occupations, free trade would alter the price structure but it would make no change in the allocation of resources. The greater the degree of occupational mobility, the greater the degree in which the potential benefits of free trade would be realized.

[१०] In the modern world, free trade has become an exception to the general practice of putting restrictions of several kinds and various degrees on foreign trade.

(१) **बालोद्योगांना संरक्षणाची जरूरी** (Infant industry argument) :—मुक्त परराष्ट्रीय व्यापार-नीतीविरुद्ध पहिला महत्त्वाचा आक्षेप फेडरिक लिस्ट ह्या जर्मन अर्थशास्त्रज्ञानें घेतला. त्यानें असा युक्तिवाद केला कीं, सर्वच देशांनीं मुक्त व्यापार-नीति स्वीकारल्यास परराष्ट्रांत ज्या उद्योगधंद्याची वाढ झालेली असते त्यांची स्वदेशांत वाढ करणें कठीण होतें. कारण कोणताहि नवीन उद्योगधंदा लागलीच परदेशी स्पर्धेला तोंड देतां येईल एवढा समर्थ होईल, इतका वाढूं शकत नाहीं. त्यासाठीं कांहीं काळ जावा लागतो. त्या काळांत त्या उद्योगधंद्याला परदेशी उद्योगधंद्यापासून संरक्षण लागतें. या युक्तिवादामागील मुख्य कल्पना अशी आहे कीं, कांहीं उद्योगधंदे असे असतात कीं त्यांची वाढ होण्यास सर्वतोपरी अनुकूल अशी परिस्थिति देशांत असते. पण त्यांची वाढ तरीहि न होण्याचें एकमेव कारण इतरत्र त्यांची वाढ आधींच झालेली असते हें असतें. अशा उद्योगधंद्यांना परकी स्पर्धेपासून योग्य काळपर्यंत संरक्षण मिळाल्यास परदेशी उद्योगधंद्यांच्या बरोबरीस येणें त्यांना शक्य होतें व त्यानंतर संरक्षणाची त्यांना आवश्यकता नाहीं.[11]

व्यवहारांतील अडचणी :—बालोद्योगांचा वर दिलेला जो युक्तिवाद आहे तो तत्त्वतः आजकाल सर्वत्र मान्य केला जातो, तथापि सामान्यतः संरक्षण-नीतीच्या विरुद्ध असणारे अर्थशास्त्रज्ञ त्या युक्तिवादाविरुद्ध असा आक्षेप घेतात कीं, ज्या उद्योगधंद्यांची वाढ देशांत होणें इष्ट व शक्य असूनहि केवळ परदेशी मुक्त स्पर्धेमळें ज्यांची वाढ होत नाहीं त्यांना संरक्षण देणें इष्ट व योग्य असलें तरी संरक्षणासाठीं चुकीचे उद्योगधंदे निवडले जाण्याचा धोका संभवतो. तसेंच योग्य उद्योगधंद्यांना संरक्षण दिलें तरीहि संरक्षणाचा दुरुपयोग होण्याची भीति असते. कारण एकदां संरक्षण मिळालें कीं, त्याचा उपयोग करून संबंधित उद्योगधंद्यांची वाढ करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्याऐवजीं मिळालेल्या संरक्षणाची मुदत लांबवून घेण्याच्या हिकमती लढविण्याचीच प्रवृत्ति त्या उद्योगधंद्यांच्या चालकांत निर्माण होते. संरक्षणाचा फायदा न घेतां आळसाला किंवा आत्मसंतुष्टतेला बळी पडून आपली अपात्रता संरक्षणाच्या पांघरुणाखालीं लपविण्याचाच ह्या चालकांकडून प्रयत्न होईल. हा धोका दृष्टीआड करून चालणार नाहीं. तसेंच मुक्त परराष्ट्रीय

[11] The 'infant industry argument for production asserts that new industries, even when conditions are favourable for their growth, require a measure of protection until they can stand on their own feet. They have to be nursed by protection in order that entrepreneurs gain experience, a sufficiency of skilled labourers and technicians is trained and subsidiary supplying trades are built up. For purposes of this argument an industry is considered an infant if it can be shown that it can become self financing in the long run but is unable to grow in the absence of protection.

व्यापाराच्या तत्त्वाला कोणत्याहि कारणामुळें एकदां अपवाद केला तर तें ठिसूळ होण्याचा व त्यामुळें युक्तायुक्ततेचा विचार न करतां संरक्षण दिलें जाण्याचा व नियमापेक्षां अपवाद अधिक होण्याचा धोकाहि विसरून चालणार नाहीं. आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. ती अशी कीं, बालोद्योगांना दिलें जाणारें संरक्षण जेव्हां संपूर्णपणें समर्थनीय असतें तेव्हांहि त्या संरक्षणाचें फायदे पदरांत पाडून घेण्यासाठीं देशाला कांहीं एक किंमत द्यावी लागते. तिच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. उदाहरणार्थ, संरक्षित उद्योगधंद्यांतील उत्पादनाचें ग्राहकानें द्यावें लागणारें मूल्य तात्पुरतें कां होईना, वाढतें. हा एक प्रकारें त्यांच्यावर बसणारा अदृश्य करच असतो. तसेंच एका धंद्यास दिलेल्या संरक्षणामुळें इतर उद्योगधंद्यांतील उत्पादनखर्च वाढण्याचा व त्यामुळें त्यांनाहि संरक्षणाची आवश्यकता निर्माण संभव असतो. हें सर्व लक्षांत ठेवून बालोद्योगाच्या युक्तिवादानुसार ज्यांना संरक्षण द्यावयाचें अशा उद्योगधंद्यांची निवड अतिशय कांटेकोरपणें झाली पाहिजे व त्यांना द्यावयाच्या संरक्षणासाठीं देशाला पडणारी किंमत शक्य तेवढी कमी होईल अशा पद्धतीनेंच त्यांना संरक्षण दिलें पाहिजे. असें होईलच, असा दिलासा देशोदेशांच्या आर्थिक इतिहासावरून मिळत नाहीं. त्या इतिहासावरून उलट असेंच दिसून येतें कीं, बालोद्योग कोणते हें ठरविलें जाण्याची पद्धत लहरी व अशास्त्रीय असते, संरक्षणाचा गैरफायदा घेतला जाऊन अकार्यक्षमतेलाच प्रोत्साहन मिळते. एकदां दिलें जाणारें संरक्षण कायमचेंच होऊन बसतें व देशांवर पडणारा संरक्षणाचा बोजा कधींच दूर होत नाहीं. अशा प्रकारच्या संरक्षणामुळें विशिष्ट गटाचाच फायदा होतो. सारांश, बालोद्योगाचा युक्तिवाद बरोबर असला तरी त्या युक्तिवादानुसार दिलें जाणारें संरक्षण डोळस नसेल तर त्याचे दुष्परिणामच अधिक होतात, असा विरोधकांचा आक्षेप आहे.[१२]

रोजगार वृद्धीचा युक्तिवाद :—सनातन अर्थशास्त्रज्ञ मुक्त परराष्ट्रीय व्यापाराचा पुरस्कार करतांना पूर्ण रोजगार सर्व देशांत प्रस्थापित झालेला आहे असें गृहीतच धरीत. पूर्ण रोजगार गृहीत धरणें हें अवास्तविक आहे, हें आतां पुरतें सिद्ध झालें आहे. तेव्हां पूर्ण रोजगार गृहीत धरून केलेला मुक्त व्यापारनीतीचा पुरस्कार आतां कमकुवत वाटावा ह्यांत नवल नाहीं. आतां उलट असा युक्तिवाद केला जातो कीं, पूर्ण रोजगाराचा अभाव ही नित्याची स्थिति असल्यामुळें उत्पादनखर्चाचा विचार न करतां देशांत जे जे उद्योगधंदे वाढूं शकतील त्यांना संरक्षण देऊन उत्तेजन देणें अनुचित नाहीं. देशांत जेव्हां बेकारी असते तेव्हां रोजगार कसा वाढवावयाचा हाच प्रश्न महत्त्वाचा असतो. ह्या युक्तिवादाबद्दल एक आक्षेप असा घेतला जातो कीं, ज्या देशांत आयात नियंत्रणें बसवलीं जातील त्या देशांत रोजगार कृत्रिम रीत्या वाढविला जाईल हें खरें; पण त्याचमुळें देशांतील **निर्यात धंदे** (Export Industries) कांहीं प्रमाणांत डबघाईस येऊन त्यांच्यांतील रोजगार कमी होईल. म्हणजे आपला संकुचित स्वार्थ साधणें एवढाच हेतु असेल तर रोजगारवाढीकरितां आपल्या देशांतील उद्योगधंद्यांना संरक्षण देणें उचित ठरेल; पण ज्याला

विशाल दृष्टि आहे त्याला एका देशांतील रोजगार कमी करून दुसरीकडील वाढविण्यांत कांहीं अर्थ आहे असें वाटणार नाहीं. ह्या आक्षेपाला दोन प्रकारें उत्तर देतां येईल. एकतर जोंपर्यंत राष्ट्राराष्ट्रांत जगाची विभागणी झाली आहे तोंपर्यंत आर्थिक नीति स्वहिताचा विचार करूनच ठरविली जाणें स्वाभाविक आहे. त्याबद्दल तक्रार करण्यांत अर्थ नाहीं. अर्थात् ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, स्वहित विचाराच्या आहारीं आऊन कांहींहि केलें तरी तें क्षम्य आहे; पण आपल्या देशांतील लोकांना रोजगार पुरविणें हें कोणत्याहि देशांतील शासनसंस्थेचें प्राथमिक कर्तव्य आहे. त्यासाठीं प्रसंगीं परराष्ट्रीय व्यापार नियंत्रित करावा लागला तरी तें चूक ठरत नाहीं. दुसरी आणि महत्त्वाची गोष्ट अशी कीं, एका देशांत आयात नियंत्रणामुळें रोजगार वाढला तर दुसऱ्या देशाच्या निर्यातीवर त्याचा अनिष्ट परिणाम होईलच असें समजणें चूक आहे. एखाद्या देशांत लोकांच्या रोजगारांत वाढ झाली कीं, त्या देशांत राष्ट्रीय उत्पन्न व राष्ट्रीय खर्च ह्यांत वाढ होते. त्यामुळें अनेक वस्तूंच्या मागणींत वाढ होते. मागणींतील वाढीचा फायदा स्वदेशांतील उद्योगधंद्यांना जसा मिळूं शकतो तसाच तो परदेशांतील उद्योगधंद्यांनाहि मिळूं शकतो. तेव्हां एखाद्या देशांत रोजगारवृद्धीसाठीं परराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रणें घातलीं तरी त्यामुळें एकंदर

[१२] No economist of consequence has ever challenged the theoretical validity of the argument for protection on infant industry grounds, the argument that temporary protection can speed the establishment and development of potentially profitable industries. When the argument has nevertheless been rejected, it has been on historical and practical grounds (such as) (1) The selection of industries to be protected has often been arbitrary or irrational. (2) Once protection is granted on any grounds it opens the door to promiscuous protection. (3) Protection to a particular industry is as likely to stifle or delay its genuine progress towards economic independence as to stimulate it since it provides to those engaged in industry a shelter against the normal consequences of inertia, inefficiency or restrictive monopoly. (4) In past experience, the protection has generally tended to become permanent, instead of being removed either as the industry no longer needs it or as the industry has revealed permanent in capacity to operate without artificial support and (5) The prospect of eventual ability of an industry to operate successfully without protection is not a sufficient claim for even temporary protection, for while the protection is being extended it entails costs for the nation as a whole—These seem to me to all to be weighty objections persuasive as they stand and supported by more than a century of corroborative experience—**Viner.**

परराष्ट्रीय व्यापारावर संख्यादृष्टचा विपरीत परिणाम होईलच असें म्हणणें चूक आहे. किंबहुना आधुनिक अर्थशास्त्रीय विचाराच्या आधारें असेंच म्हणतां येईल कीं, सर्व देशांत पूर्ण रोजगार प्रस्थापित झाला तरच जागतिक व्यापार जास्तींत जास्त होईल.[१३]

आर्थिक विकासाचा युक्तिवाद:—अलीकडील काळांत संरक्षणनीतीच्या समर्थनार्थ आजच्या जगाच्या दृष्टीनें एक अतिशय महत्त्वाचा असा युक्तिवाद पुढें येऊं लागला आहे. तो असा कीं, जगांत आज जे आर्थिक दृष्टचा **अपूर्ण विकसित** (Underdeveloped) देश आहेत त्यांना संरक्षणनीतीचा अवलंब केल्याशिवाय मार्ग नाहीं. प्रस्तुत संदर्भांत अपूर्णविकसित देश म्हणजे प्रामुख्यानें **प्राथमिक उत्पादन** (Primary Production) करणारे देश. अशा देशांत **दुय्यम उत्पादन** (Secondary Production) व **सहाय्यक उत्पादन** (Tertiary Production) ह्यांना अर्थ-व्यवस्थेस मानाचें स्थान नसतें. स्थूलमानानें असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, शेतीप्रधान असणारे व उद्योगप्रधान नसणारे देश बऱ्याच प्रमाणांत अपूर्णविकसित असल्याचें आढळून येतें. अलीकडील काळांत उद्योगजन्य वस्तूंचा वाढत्या प्रमाणांत वापर हें आर्थिक उन्नतीचें, विकासाचें, प्रगतीचें लक्षण समजण्यांत येतें. शेतीप्रधान देशांना औद्योगिक माल मिळविण्याचे दोन मार्ग असतात. शेतकीमालाच्या मोबदल्यांत उद्योगप्रधान देशाकडून तो मिळविणें हा एक मार्ग व औद्योगीकरण करून स्वतःच उद्योगप्रधान बनणें हा दुसरा मार्ग. दुसरा मार्ग स्वीकारावयाचा असेल तर स्वदेशांतील उद्योगधंद्यांना संरक्षण देऊन त्यांची वाढ करावी लागते. पहिला मार्ग स्वीकारणें शेतीप्रधान देशांना अहितकारक असल्यानें दुसरा म्हणजे संरक्षणनीतीचा मार्ग स्वीकारणें त्यांना प्राप्त आहे असा त्या नीतीच्या कांहीं आधुनिक पुरस्कर्त्यांचा दावा आहे.

विनिमयद्वारा औद्योगिक माल मिळविणें शेतीप्रधान देशांना हितकारक ठरत नाहीं. ह्याचें कारण असें सांगितलें जातें कीं, शेतमाल व औद्योगिक माल ह्यांच्यांतील विनिमयाच्या शर्ती नेहमींच शेतमालाच्या उत्पादकांना तोटयाच्या असतात व शेतमालाचें उत्पादन जसजसें वाढवीत जावें तसतशा त्या त्यांना अधि-

[१३] Under modern conditions, there are several ways in which a country can benefit itself by imposing import duties, above all when there is unemployment at home. Not all of these will lead to a contraction of world incomes. It is possible for instance that some import duties may be a necessary part of a National policy whose net effect on the foreign suppliers of taxed goods is not adverse, because of the effect of increased activity in the taxing country on its demand for other imports.

—Mrs. Hicks.

काधिक प्रतिकूल होत असतात. ह्या विधानाचा अर्थशास्त्रीय परिभाषेंत असा खुलासा करितां येईल कीं, शेतमालाची मागणी प्रामुख्यानें बिनलवचिक असल्यानें त्यांचे उत्पादन ज्या मानानें वाढतें त्यापेक्षां अधिक प्रमाणांत त्यांच्या किंमती पडतात. असा प्रकार औद्योगिक मालाच्या बाबतींत होत नाहीं. म्हणून परराष्ट्रीय व्यापारांत असें दिसून येतें कीं, प्रामुख्यानें प्राथमिक उत्पादनांत गुंतलेले अपूर्ण विकसित देश व प्रामुख्यानें दुय्यम व सहाय्यक उत्पादनांत गुंतलेले विकसित देश अंतर्गत अर्थव्यवस्थेच्या मार्गांतील अंगभूत अडथळे अथवा दोष दूर करण्याचा प्रयत्न अशा देशांकडून होत असला तरच संरक्षणनीति त्यांच्याकडून अवलंबिली जाणें न्याय्य व समर्थनीय ठरतें. आपले दोष व अकार्यक्षमता लपविण्यासाठीं संरक्षण नीतीचा अवलंब करणें सर्वथा अनुचित ठरेल. असें होण्याचा धोका सदैव लक्षांत ठेवला पाहिजे व तो टाळला पाहिजे.

परराष्ट्रीय व्यापारांतील लाभ वाढविण्याचा युक्तिवाद:—संरक्षण नीतीच्या समर्थनार्थ आर्थिक राष्ट्रवादाच्या भूमिकेवरून आणखी एक असा युक्तिवाद केला जातो कीं, कोणत्याहि देशाला संरक्षणाच्या मार्गानें परराष्ट्र व्यापारशर्ती आपल्याला अनकूल करून घेणें शक्य आहे. निराळ्या शब्दांत परराष्ट्रीय व्यापारांतील लाभाची जी विभागणी होत असते तींत लाभाचें माप अधिक प्रमाणांत आपल्या पदरांत पडेल अशी व्यवस्था कोणत्याहि देशाला करतां येईल. ह्या युक्तिवादाचा खुलासा असा केला जातो कीं, आयातनियंत्रण—मग तें आयातीवर जकाती बसवून केलेलें असो किंवा प्रत्यक्ष आयात कमी करून केलेलें असो—जेव्हां यशस्वी होतें तेव्हां आयातीचें एकूण मूल्य निर्यातीच्या एकूण मूल्यापेक्षां कमी होऊन आयातकपात करणाऱ्या देशाचा परराष्ट्रीय व्यापारांतील लाभ वाढतो. ह्या युक्तिवादाचा अधिक खुलासा पुढीलप्रमाणें करतां येईल. आयातीवर जर जकाती बसविल्या तर त्यायोगें आयात बरीच कमी होऊन (कारण आयातीच्या किंमती वाढून मागणी कमी होते) एकंदर आयातमूल्य स्थिर असलेल्या एकंदर निर्यातमूल्यापेक्षां कमी होण्याचा संभव असतो. तसें झाल्यास परराष्ट्रीय व्यापार तो करणाऱ्या देशास पूर्वीपेक्षां अधिक लाभ-दायक होईल ह्यांत शंका नाहीं. तसेंच आयात नियंत्रणामुळें आयातीला मागणी कमी होते. त्याचा परिणाम होऊन आयात वस्तूंचें किंमतीमान कमी झाल्यासहि आयातनियंत्रण करणाऱ्या देशाच्या दृष्टीनें परराष्ट्र व्यापारशर्ती सुधारल्याचें दिसून येईल.

वरील युक्तिवादांत कितपत तथ्य आहे तें आतां पाहूं. प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष स्वरूपाच्या आयात-नियंत्रणामुळें संबंधित देशाला परराष्ट्र व्यापारशर्ती अनुकूल व्हावयाच्या असतील तर त्यासाठीं (१) आयातीसाठीं असलेली मागणी भरपूर लवचिक असली पाहिजे. म्हणजेच आयातीच्या किंमती वाढल्या असतां आयातीचें एकूण मूल्य कमी होईल. किंवा एकंदर आयात कमी होत असतां आयातभाव घटतील. (२) निर्यातीसाठीं असणारी परकीयांची मागणी बिनलवचिक असली

पाहिजे. तसें असल्यासच निर्यातीचे भाव वाढवून एकंदर निर्यातमूल्य वाढवितां येईल. (३) परदेशांनीं प्रतिकाराचें धोरण स्वीकारूं नये. प्रत्येक देशानें आंतरराष्ट्रीय व्यापारांत आपल्याच पोळीवर तूप ओढण्याचा प्रयत्न केल्यास कोणासच तें जमणार नाहीं हें उघड आहे. (४) आयातनिर्यात नियंत्रणांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा कार्यक्षम असली पाहिजे. ह्या चारी बाबतींत परिस्थिति समाधानकारक असणें आवश्यक आहे. प्रत्यक्षांत ह्यांच्यांतील विनिमयशर्ती अपूर्णविकसित देशांच्या दृष्टीनें फारशा लाभदायक कधींच नसतात व उत्तरोत्तर त्या अधिकाधिक प्रतिकूल होत जातात. अशा परिस्थितींत संरक्षण नीतीचा स्वीकार करून आपल्या देशांतच उद्योगधंद्यांची वाढ करणें हाच मार्ग त्यांना हितावह ठरतो. हा मार्ग न स्वीकारल्यास त्यांना अपूर्णविकसितच म्हणजे सोप्या शब्दांत दरिद्रीच राहावें लागतें. सारांश आर्थिक विकासासाठीं अपूर्णविकसित देशांना संरक्षणाची आवश्यकता असते.[१४]

वरील युक्तिवादांत बरेंच तथ्य आहे हें मोकळेपणें मान्य केलें पाहिजे. एका परीनें हा युक्तिवाद म्हणजे बालोद्योगाच्या युक्तिवादाची वाढलेली आवृत्ति आहे. बालोद्योगाच्या युक्तिवादांत विशिष्ट उद्योगधंदा अविकसित पण विकासास पात्र असल्यानें त्याला विशिष्ट संरक्षण दिलें पाहिजे अशी भूमिका घेतली जाते. प्रस्तुत युक्तिवाद अधिक व्यापक आहे. विकासाकांक्षी देशांना आधींच विकसित झालेल्या देशाबरोबरील स्पर्धेत टिकाव धरणें कठिण होतें. सबब त्या देशांतील सर्वच उद्योगधंद्यांना कांहीं काळपर्यंत संरक्षण देऊन देशाच्या विकासाचा मार्ग मोकळा करून द्यावा लागतो, असा ह्या युक्तिवादाचा आशय आहे. आर्थिक इतिहासाचा ह्या विकासाला पाठिंबा आहे. कारण जर्मनी, जपान, अमेरिका, रशिया ह्या सर्व देशांच्या विकासाला संरक्षणनीतीनें बऱ्याच प्रमाणांत मदत केली आहे, हें नाकारतां यावयाचें नाहीं. तसेंच अलीकडील आर्थिक संशोधनांत असेंहि दिसून आलें आहे कीं, अपूर्ण विकसित देशांचें औद्योगीकरण झाल्यानें एकंदर जागतिक व्यापारावर विपरीत परिणाम होण्याचें कारण नाहीं. जो देश उद्योगप्रधान होतो त्याच्या आर्थिक गरजा वाढतच जातात आणि त्यामुळें त्या देशाचा परराष्ट्रीय व्यापार वाढत जाण्याचा व तदनुषंगानें इतर देशांच्या केवळ विकास-हेतूनें प्रेरित होऊन कांहीं काळपर्यंत संरक्षण-

[१४] It is often claimed on the strength of both theoretical and statistical analysis that the terms of trade of countries exporting primary products with countries exporting manufactures are generally adverse to the former and have a secular tendency to become worse, or in other words, that in trade between primarily agricultural and primarily industrialised countries the gains from trade go predominently to the latter. It is argued, therefore, that underdeveloped countries can achieve economic progress only by following the path of industrialisation and for this they require the policy of protection.

नीतीचा स्वीकार केला तर त्यांत अनुचित असें कांहीं नाहीं. मात्र ह्या युक्तिवादाबाबत असा इशारा देणें आवश्यक आहे कीं, अपूर्ण विकसित देशांचा आर्थिक विकास खुंटण्याला आधींच विकसित झालेल्या देशांची स्पर्धा हें अनेक कारणांपैकीं एक कारण असतें. विकासाच्या मार्गांतील हें काम इतकें कठीण आहे कीं, परराष्ट्रव्यापार नियंत्रित करून कोणत्याहि देशाला एकतर्फी लाभ करून घेणें शक्य नाहीं असें म्हटलें तर तें चूक होणार नाहीं.[१५]

प्रतिकाराचा युक्तिवाद :—संरक्षणवाद्यांकडून आणखी एक उल्लेखनीय असा युक्तिवाद केला जातो. मुक्त व्यापारनीति आदर्श आहे असें मान्य करूनहि कांहीं संरक्षणवादी अशी भूमिका घेतात कीं, मुक्त व्यापारनीतीचे फायदे ती नीति सर्व देशांनीं प्रामाणिकपणें आचरिली तरच मिळूं शकतात. त्या नीतीचें आचरण सर्व देशांकडून जेव्हां केलें जात नाहीं तेव्हां मुक्त व्यापारनीतीचा स्वीकार करणाऱ्या देशांचाच नेमका तोटा होतो व ती नीति धाब्यावर बसवणाऱ्यांचा फायदा होतो. त्यामुळें जेव्हां इतर देश संरक्षणनीति स्वीकारतात तेव्हां वृत्तीनें मुक्तव्यापारवादी असलेल्या देशालासुद्धां नाइलाजानें संरक्षणनीति स्वीकारावी लागते. तो देश तसें न करील तर परराष्ट्रव्यापारांत आपल्याला किफायतशीर असा सौदा पटविण्याचें व त्यांच्याशीं सौदा करण्याचें एक महत्त्वाचें शस्त्रच गमावून बसेल. आयातीवरील जकातींचा प्रसंगीं खंजिराप्रमाणें उपयोग करतां येतो; तर प्रसंगीं ढालीप्रमाणें करतां येतो हें लक्षांत घेतलें पाहिजे.[१६] म्हणूनच **प्रतिकारक्षम जकातींची** (Retaliatory Tariffs) आवश्यकता निर्माण होते.

व्यापारशर्ती आपल्याला अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न एखाद्या देशानें केला तर तो साधूं नये म्हणून इतर देशांना प्रतिकाराची आवश्यकता भासते. त्यामुळें **जकातींची फळी** (Tariff Wall) त्यांना उभारावी लागते. पण प्रतिकाराच्या जकाती बसवाव्या लागतात ह्याचें एवढें एकच कांहीं कारण नसतें. इतर अनेक

---

[१५] The Terms of Trade argument is unquestionably a theoretically valid argument from a nationalist point of view for protection. What weight shoud be given to it in practice, however, is a reasonably debatable matter.—**Viner**

The Terms of trade of a country will improve by protection policy only if its demand for imports has high elasticity, demand for its exports has low elasticity, other countries do not retaliate and the policy of protection is administered with a high degree of skill and integrity.

[१६] While Free Trade may be correct in principle, nevertheless a liberal trade policy cannot be adopted by a country surrounded by neighbours who have all armed themselves with tariffs.

बाबतींत जकातींचा उपयोग करून प्रतिकार करावा लागतो. त्यांतील कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख खालीं केला आहे.

गृहीत परिस्थितीचा अभाव :—मुक्तव्यापारनीतीच्या सनातन पुरस्कारांत पूर्ण स्पर्धेची परिस्थिति सर्वत्र असते, असें गृहीत धरलें जातें; पण प्रत्यक्ष वस्तुस्थिति त्यापेक्षां फार भिन्न आहे. आजचें जग हें मक्तेदारीचें जग आहे, असें म्हणणें अधिक यथार्थ आहे. मक्तेदारीमय असलेल्या आजच्या जगांत आपल्या देशांत स्पर्धा असली तरी इतरत्र मक्तेदारी असेल तर तिचाहि उपद्रव होऊं शकतो. त्यामुळें फारच सावध राहावें लागतें. दुसऱ्या देशांतील मक्तेदार त्याच्या स्वतःच्या देशांत मक्तेदारीजन्य नफा लाटीत असतो. त्याचा उपयोग करून इतर देशांतील स्पर्धा मारावी ह्या हेतूनें इतर देशांत उत्पादनखर्चापेक्षां कमी भावानें माल विकण्याचा प्रयत्न त्याच्याकडून केला जाणें संभवनीय असतें. जेव्हां एखादा विक्रेता जाणूनबुजून आणि स्पर्धा मारण्याच्या हेतूनें उत्पादनखर्चापेक्षां कमी भावानें आपल्या मालाची परदेशांत विक्री करतो तेव्हां त्या गोष्टीला **भावकापणी** (Dumping) म्हणतात.[१७] भावकापणी करून दुसऱ्याला बुडविण्याचा प्रयत्न करण्याचे प्रकार परराष्ट्र व्यापाराच्या क्षेत्रांत सतत चालू असतात. त्यांपासून कोणत्याहि देशाला सावध राहावें लागतें. जेव्हां दुसऱ्या देशांतील विक्रेते आपल्या देशांत भावकापणी करूं पहातात तेव्हां त्यांच्या मालावर जकाती बसविणें हा एक तोडगा असतो. ह्या जकातींचा उद्देश दुसऱ्या देशांतील मक्तेदारीमुळें निर्माण होणाऱ्या परिस्थितीला तोंड देणें असा असल्यानें त्या एकप्रकारें प्रतिकारोद्देशी जकातीच होत. भावकापणीचा प्रतिकार करणाऱ्या जकातींनासुद्धां मुक्त व्यापारवाद्यांचा विरोध असतो. त्यांचें म्हणणें असें कीं, भावकापणी दीर्घकाळपर्यंत टिकूं शकत नाहीं आणि सतत कमी भावानें एखादा माल भावकापणीमुळें मिळत असल्यास त्या मालाचें उत्पादन आपल्या देशांत करण्यापेक्षां आपल्या साधनसामग्रीचा उपयोग इतर वस्तूंच्या उत्पादनासाठींच करणें इष्ट. इतरत्र स्वस्त मिळणाऱ्या मालाचें आपल्या देशांत उत्पादन करण्याची उचापत करूं नये ह्या मुक्तव्यापाराच्या महान् तत्त्वाला भावकापणीमुळें बाधा येत नाहीं. कारण दुसऱ्या देशांतील माल आपल्याला कां स्वस्त पडतो, ह्याची पंचाईत आपल्याला करावयाचें प्रयोजन नाहीं.[१८] मात्र भापकापणी कधीं कधीं अनिष्ट असते असें मुक्तव्यापारवादी मान्य करतात—विशेषतः जेव्हां ती कायमचीं कीं तात्पुरती हें जर ठरवितां आले नाहीं तर त्रासदायक ठरूं शकते—अशा वेळीं प्रतिकार करणें योग्य ठरतें.

---

[१७] Dumping is now almost universally taken to mean the sale of a goods abroad at a price which is lower than the selling price of the same good at the same time and in the same circumstances at home, taking into account differences in transport costs—**Haberler.**

इतर देशांत मजुरीचे दर मजुरांची लुबाडणूक होत असल्यामुळें किंवा तत्सम अन्य कारणांमुळें उत्पादनखर्च कमी असल्यास तेथील उद्योगधंद्याचा फायदा होणें स्वाभाविक आहे. तसा तो होऊन स्वदेशी उद्योगधंद्यांना त्रास होऊं नये म्हणून देखील प्रतिकारक जकाती बसवाव्या, असा एक मुद्दा प्रतिकारक जकातींच्या समर्थनार्थ मांडला जातो. ह्या मुद्द्यासंबंधींसुद्धां असेंच सांगतां येईल कीं, परदेशाचा उत्पादन-खर्च कमी आहे कीं, नाहीं हा प्रश्न महत्त्वाचा आहे. तो कमी असल्यास कोणत्या कारणाकरितां कमी आहे, हा प्रश्न अप्रस्तुत आहे. उत्पादनखर्चांत असलेला फरक जकातीसारख्या कृत्रिम मार्गानें नाहींसा करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मुळावरच घाव घालण्यासारखें आहे. उत्पादनखर्चांत फरक असतो म्हणून तर आंतरराष्ट्रीय व्यापार होऊं शकतो, हें लक्षांत ठेवलेंच पाहिजे.

प्रतिकारक जकातीसंबंधीं एवढेंच सांगितल्यास पुरें होईल कीं, प्रतिकारक जकातींमुळें सहसा कोणाचा फायदा होत नाहीं. अशा जकातींमुळें केवळ आंतर-राष्ट्रीय तेढ निर्माण होते आणि अशा जकाती बसविण्याचीच चढाओढ सुरू होते. शहाण्या देशानें अशा जकाती टाळाव्या हेंच बरें. आंतरराष्ट्रीय व्यापाराविषयीं आस्था असणारांनीं अनावश्यक जकाती टाळल्या जातील अशी खबरदारी घेणें, हा सर्वोत्तम मार्ग होय.

अनार्थिक युक्तिवाद:—रक्षणनीतीच्या समर्थनार्थ आतांपर्यंत ज्या मुद्द्यांचा विचार केला ते आर्थिक स्वरूपाचे होते; पण स्वदेशी उद्योगधंद्यांना द्यावयाचें संरक्षण हा केवळ आर्थिक प्रश्न नसून त्या प्रश्नाला इतर बाजूहि असतात. निराळ्या शब्दांत रक्षणनीतीच्या समर्थनार्थ अनार्थिक युक्तिवादहि केला जातो. अनार्थिक स्वरूपाचें जे मुद्दे असतील त्यांचा येथें विस्तारानें परामर्ष घेण्याचें कारण नाहीं. अनार्थिक युक्तिवादांतील तथ्यातथ्य तपासण्याचेंहि हें स्थळ नव्हें. तथापि अर्थशास्त्राचा अभ्यास करणारांनाहि रक्षणनीतीची अनार्थिक बाजू माहित असणें आवश्यक असल्यानें अनार्थिक स्वरूपाच्या कांहीं महत्त्वाच्या मुद्द्यांचा उल्लेख खालीं केला आहे:—

(१) **राष्ट्ररक्षणासाठीं स्वयंपूर्णतेची आवश्यकता**:—युद्धाची भीति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत प्रत्येक देशाला लष्करी दृष्टचा सज्ज व स्वावलंबी राहण्याची आवश्यकता असते. त्या दृष्टीनें जे उद्योगधंदे वाढवावे लागतात त्यांच्या बाबतींत

[१८] Even when imports do come in at a lower price than that charged in exporting country or below cost of production, the importing country is in no way injured if the cheap imports are going to continue. It does not make the slightest difference from the standpoint of the importing country whether the goods come in cheaply because the exporting country enjoys a natural comparative advantage or because they are dumped.

—Haberler.

उत्पादनखर्च इत्यादि विचार करून चालत नाहीं. तसेंच युद्धकाळांत अन्नासारख्या महत्त्वाच्या गरजा भागविण्याच्या बाबतींत परावलंबी राहावें लागणार नाहीं अशी दक्षता घ्यावी लागते. त्यासाठीं रक्षणनीतीचा आश्रय घ्यावा लागतो.

(२) अर्थव्यवस्थेची एकांगी वाढ होणें, म्हणजे देश निव्वळ शेतीप्रधान होणें किंवा उद्योगप्रधान होणें हें अनेक दृष्टींनीं अनिष्ट आहे. देशाचा व देशांतील नागरिकांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावयाचा असेल तर कर्तबगारीला वाव देणारी असली पाहिजे. तसेंच इतर अनेक दृष्टींनीं सुद्धां देशांत जेवढी विविधता असते तेवढें चांगलेंच असतें. तरुणांना जीवनाचीं विविध दालनें उपलब्ध होतात, विविध प्रकारची संधि मिळूं शकते. जीवनाचे विविध पैलू अवलोकितां, अनुभवितां येतात. ह्या सर्व गोष्टी विचारांत घेतां अर्थव्यवस्था वैविध्यपूर्ण असणें केव्हांहि चांगलें. ह्या दृष्टीनें सुद्धां कधीं कधीं रक्षणनीतीचा विचार करावा लागतो.[१९]

वरील विवेचनाचे निष्कर्ष :—मुक्त व्यापारनीति विरुद्ध रक्षणनीति ह्या वादांत उभयपक्षांकडून जे मुद्दे उपस्थित केले जातात त्यांवरून असें दिसून येते कीं, केवळ आर्थिक दृष्टिकोनांतून तात्त्विक असा विचार करावयाचा झाला तर मुक्त व्यापार-नीति हीच स्वीकारणीय होय ह्यांत शंका नाहीं; परंतु (१) मुक्त व्यापारनीतीच्या यशासाठीं आवश्यक असलेली परिस्थिति प्रत्यक्षांत आढळत नाहीं. (२) मुक्त व्यापारनीतीला विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट कारणाकरितां--उदाहरणार्थ नव्या-उद्योगधंद्यांची वाढ--मुरड घालावी लागते हें तिचे पुरस्कर्तेहि मान्य करतात. (३) संरक्षणाच्या धोरणाच्या समर्थनार्थ करण्यांत येणारा अनार्थिक युक्तिवाद दुर्लक्षणीय आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे (४) आर्थिक नियोजनाच्या आजच्या ह्या युगांत परराष्ट्रीय व्यापार अनियंत्रित राहील अशी अपेक्षा करणें चूक आहे. ह्या चार महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत घेतां रक्षणनीतीला आज सर्वच देशांच्या अर्थनीतींत प्रधान स्थान आहे. मुक्तव्यापार

---

[१९] In the interests of national defence, each country should avoid too close a dependence upon other countries. If international division of labour is given full scope, it may lead to too great a concentration either on industrial or agricultural production. This may be of advantage in periods of peace, but in times of danger such a country would be without goods of vital importance, previously imported. Hence too close a dependence on the world economy should be avoided even if such avoidance involves an economic loss.

Protection is often advocated to prevent a one sided development of economic life. A diverse economy gives greater opportunities to people and makes life on the whole richer. Development only of industry or agriculture is not desirable.

अभावानेंच तळपत आहे, ह्यांत नवल वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. खेद वाटण्याचेंहि कारण नाहीं. तथापि रक्षणनीतीचा आश्रय केला जाणें अपरिहार्य असलें व अविकसित देशांच्या दृष्टीनें तें अत्यावश्यकहि असलें तरी मुक्तव्यापारनीतीपेक्षां रक्षणनीति आचरणांत आणण्यास फार कठीण आहे. तिचें आचरण करणाऱ्या देशाला कोठें थांबावें, हें समजलेंच पाहिजे; पण सहसा तें समजत नाहीं, हा इशारा दिलाच पाहिजे. तसेंच कित्येकदां रक्षणनीतीच्या पुरस्कारांत राष्ट्रहितापेक्षां विशिष्ट हितसंबंधीयांचा स्वार्थच प्रबळ असतो, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. राष्ट्रहिताचा विचार करतांना देखील फार संकुचित विचार झाल्यास तो त्याज्यच मानला पाहिजे. सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, आपलें नाक कापून घेऊन दुसऱ्यास अपशकुन करण्याची किंवा आपल्या स्वार्थासाठीं दुसऱ्याचा बळी घेण्याची वृत्ति नसावी. युद्धनीतींत आक्रमक हेतु त्याज्य मानला जातो. स्वसंरक्षण योग्य मानलें जातें. तोच न्याय संरक्षणनीतीला लागू करण्यास हरकत नाहीं. आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. रक्षणनीतीचा उपयोग करावा लागत असला तरी त्यामुळें वाटेल ती गोष्ट साधतां येईल, असा विश्वास बाळगण्यांत अर्थ नाहीं. सर्वसाधारणपणें असेंच दिसून येतें कीं, रक्षणासाठीं जे उपाय एका देशाकडून योजिले जातात त्यांचा हटकून प्रतिकार इतर देशांकडून होतो. त्यामुळें कोणाचीहि उपाय योजना यशस्वी होत नाहीं.[२०]

(इ) परराष्ट्र-व्यापार-नियंत्रणाचे विविध मार्ग

आयातीवरील जकाती :—परराष्ट्रव्यापार नियंत्रित करण्याचा आयातीवरील जकाती हा प्रमुख मार्ग होय. जकाती दोन प्रकारच्या असतात. कांहीं जकाती **मापानुसारी** (Specific) असतात. म्हणजे आयात केल्या जाणाऱ्या वस्तूच्या दर मापावर किती जकात आकारावयाची, हें ठरविलेलें असतें. कांहीं जकाती

[२०] The arguments for free trade are clearcut and their application to trade policy is simple. This is not so with arguments for tariffs. The rule of Free Trade that there should be no discrimination between internal and external trade is a simple one. The dictum that tariffs are economically advantageous is not such a simple maxim, for it must also be stated under what conditions they are advantageous and exactly how high they must be. The various arguments for protection are inconsistent with each other and if any one of them is accepted its practical application is by no means clear.

Protection might procure economic advantage in certain cases, if there was a government wise enough to discriminate those cases and strong enough to confine itself to them; but this condition is very unlikely to be filled—**Edgeworth.**

मूल्यानुसारी (ad valorem) असतात. म्हणजे आयात होणाऱ्या वस्तूचें एकूण मूल्य जें असेल त्याच्या किती टक्के रक्कम जकात म्हणून द्यावी हें ठरविलेलें असतें.[२१] मापानुसारी जकातीमध्यें देशांतील किंमती बदलल्या कीं संरक्षणाचें प्रमाण बदलत जातें. मूल्यानुसारी जकातींत असा प्रकार होत नाहीं. विशिष्ट प्रमाणांतच नेहमीं संरक्षण मिळत जातें. मात्र वस्तूचें मूल्य ठरविण्याचा कठीण प्रश्न मापानुसारी जकातींत उपस्थित होत नसल्यामुळें कारभाराच्या दृष्टीनें त्या विशेष सोयीच्या असतात.

परराष्ट्र-व्यापार नियंत्रित करण्याचे जकातीखेरीजहि कांहीं मार्ग आहेत. त्यांतील आत्यंतिक मार्ग म्हणजे परराष्ट्रव्यापारावर संपूर्णतः अथवा अंशतः बंदी घालणें हा होय. परराष्ट्र-व्यापार संपूर्णपणें बंद करणें म्हणजे आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध तोडून टाकण्यासारखेंच आहे. तशीच परिस्थिति उद्भवल्याखेरीज असें सहसा कोणी करीत नाहीं. जेव्हां असें केलें जातें तेव्हां तें करण्याचीं कारणें बहुधा आर्थिक नसून राजकीय असतात. तेव्हां अर्थशास्त्रांत ह्या गोष्टींचा विचार करण्याचें कारण नाहीं. स्वदेशांतील उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळावें म्हणून संपूर्णपणें आयातबंदी करणें हा एक मार्ग असतो. पण तो व्यवहार्य नसतो. कारण इतर देश तोच मार्ग अनुसरून सहज प्रतिकार करूं शकतात. विशिष्ट वस्तूंच्या आयातीला संपूर्णपणें बंदी करणें हा मार्ग मात्र अगदीं अव्यवहार्य नाहीं. म्हणून तो अधिक प्रमाणांत अनुसरला जाण्याची शक्यता असते.

बंदीखेरीज परराष्ट्रव्यापार नियंत्रित करण्याचा दुसरा मार्ग म्हणजे आयातीवर अंशतः बंदी घालणें हा होय. हा मार्ग जेव्हां स्वीकारला जातो तेव्हां संबंधित वस्तूची अगर वस्तूंची आयात जास्तींत जास्त किती करावी हें ठरविलें जातें. तेवढी आयात झाली कीं, त्यापुढें आयात बंद केली जाते. आयातीची मर्यादा ठरविण्याच्या दोन पद्धति आहेत. पहिल्या पद्धतींत कमाल आयातप्रमाण ठरविलें जातें व दुसऱ्या

---

[२०] The present generation of economists looks with greater tolerance on protective duties than their fathers did. Yet it remains true "that international taxes are a dangerous method of pursuing the ends of economic policy. The risk of retaliation which would wipe out the benefits of the tax, and eventually leave the world poorer, is very great. On balance international texes tend to cut down world trade and production. If it is possible to restore national equilibrium by methods which expand international demand rather than contract it, it is clearly better to do so."—**Mrs. Hicks.**

[२१] A tariff may be specific or ad valorem. A specific duty is given amount of money per unit of goods imported. An ad valorem duty, on the other hand, is a percentage of the value.

पद्धतींत संबधित आयात वस्तूवर करावयाचा जास्तींत खच ठरविला जातो. पहिल्या पद्धतींत अर्थातच ठराविक प्रमाणांत आयात केली जाते. मग आयातीवर एकूण खर्च कितीहि होवो. ह्या पद्धतींत संबंधित वस्तूची किंमत वाढल्यास आयातीवर होणारा खर्च वाढतो आणि किंमत कमी झाल्यास आयातीवरील खच कमी होतो हें उघड आहे. दुसऱ्या पद्धतींत एकंदर खर्च ठरविलेला असतो. ह्या पद्धतींत आयातप्रमाण किमतीवर अवलंबून असतें हें सहज समजेल. संबंधित वस्तूची किंमत वाढल्यास आयात कमी होते; तर किंमत कमी झाल्यास आयात वाढते. परराष्ट्र व्यापार नियंत्रित करण्याच्या ह्या मार्गाला **घडा** (Quota) मार्ग म्हणतां येईल. हा मार्ग स्वीकारला असतां **आयातघडा** (Import Quota) ठरविला जातो. आयातघडा आयात-परिमितीच्या अगर आयातीच्या एकूण मूल्याच्या अनुरोधानें ठरविला जातो आयात-घडा भरला कीं, त्यानंतर आयात होऊं दिली जात नाहीं. कधीं कधीं असेंहि केलें जातें कीं, आयातघडा भरेपर्यंत जी आयात होते तिच्यावर संरक्षक स्वरूपाची जकात आकारली जात नाहीं अगर आकारली गेल्यास ती नाममात्रच असते. आयात अजिबात बंद न करतां संरक्षक जकात आकारली जाते.[२२]

परराष्ट्रव्यापार नियंत्रित करण्यासाठीं जकातींचा अवलंब करावयाचा कीं, कोटापद्धतीचा अवलंब करावयाचा, हें ठरवितांना सरकारचें उत्पन्न, देशांतील उद्योग-धंदे व संपत्तीचें विभाजन ह्या तीन गोष्टींवर त्यांचे जे परिणाम होतात त्याची तुलना करावी लागते. जकातीचा कोणताहि दर घेतला तर त्याचें सरकारी उत्पन्न देशाचा औद्योगिक विकास व विभाजन ह्यांपैकीं एका अगर अधिक गोष्टींवर परिणाम होणें अपरिहार्य असतें.[२३] जकातीमुळें सरकारी उत्पन्नांत जी वाढ होते ती सरकारी उत्पन्नावर होणाऱ्या परिणामाचें माप असतें. जकातीमुळें संबंधित वस्तूच्या अंतर्गत उत्पादनांत जी वाढ होते. तो अंतर्गत उत्पादनावर होणारा परिणाम होय आणि संबंधित वस्तूच्या अंतर्गत विक्रीच्या किंमतींत जी वाढ होते तिच्यामुळें विभाजनावर होणाऱ्या परिणामाची कल्पना येते. कारण किंमतींतील वाढ लक्षांत घेतल्यास जकातीचा उपभोक्त्यावर बोजा किती पडतो व जकाती-मुळें संबंधित वस्तूच्या अंतर्गत उत्पादकांचा नफा किती वाढतो ह्याची कल्पना येते.[२४] जेव्हां एखाद्या जकातीमुळें आयात केल्याशिवाय अंतर्गत मागणी भागवितां येईल एवढें उत्पादन वाढूं शकतें तेव्हां त्या जकातीला संपूर्णपणें संरक्षक जकात असें म्हणणें अयोग्य ठरत नाहीं. मात्र आयात जेव्हां अजिबात थांबते तेव्हां जकाती-मुळें सरकारी उत्पन्नांत भर पडत नाहीं हें सहज समजण्याजोगें आहे. अंतर्गत

२२ 'Quota' is an alternate method of controlling foreign trade. It is a quantitative restriction which sets a limit either on the amount or the value of an imported product.

२३ A given tariff may have protective effect, a revenue effect and a redistribution effect.

उत्पादन पुरेसें न वाढतां कांहीं प्रमाणांत आयात चालू राहिली तर सरकारी उत्पन्नांत भर पडते. जेव्हां जकातीमुळें अंतर्गत उत्पादन वाढतें पण ज्या प्रमाणांत आयात कमी होते त्या प्रमाणांत वाढत नाहीं तेव्हां अंतर्गत मागणीच्या मानानें संबंधित वस्तूचा पुरवठा कमी होऊन जकातीपेक्षां अधिक प्रमाणांत किंमत वाढते हाच उपभोक्त्यावर पडणारा बोजा होय. जकातीएवढी किंमतींत वाढ झाली तरीहि एक प्रकारें उपभोक्त्यावरील बोजा वाढतोच; पण ती गोष्ट येथें विचारांत घेतली नाहीं. कारण जकातीमुळें वाढणारें उत्पन्न उत्पादक वर्गाकडे जात नाहीं. तें सरकारकडे जाते व अप्रत्यक्षपणें उपभोक्त्यांनाच त्याचा फायदा मिळतो. प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीनें किंमत, सरकारी उत्पन्न व अंतर्गत उत्पादन ह्या तिन्हीवर होणाऱ्या परिणामांपैकीं अंतर्गत उत्पादनावर होणारा परिणामच विशेष महत्त्वाचा आहे. कारण त्यामुळेंच कोणतीहि जकात संरक्षक ह्या विशेषणाला किती पात्र आहे हें ठरतें. मात्र अंतर्गत किंमतींत वाढ न होतां अंतर्गत उत्पादन वाढलें तरच संरक्षणाचा हेतु साध्य झाला असें खऱ्या अर्थानें म्हणतां येतें. कारण उपभोक्त्यांवर बोजा पडणें हा इष्ट परिणाम म्हणतां यावयाचा नाहीं.

घडा-पद्धतींत आयातीवर निश्चित मर्यादा घातली जाते. विशिष्ट दरानें जकात बसविली असतां जेवढी आयात होईल तेवढाच घडा ठरविला गेल्यास घड्याचे व जकातीचे अंतर्गत उत्पादनावर व किंमतीवर होणारे परिणाम सारखेच असतात. पण कोटा पद्धतीचा एक म्हटलें तर वाईट व म्हटलें तर चांगला परिणाम असा होतो कीं, सरकारला आयातीपासून कांहींच उत्पन्न प्राप्त होत नाहीं. आयातीच्या परवान्यांचा लिलांव केला तर मात्र सरकारला उत्पन्न मिळूं शकतें पण सहसा तसें केलें जात नाहीं. असें असूनहि जकातीपेक्षां घडा पद्धत पसंत करण्याची प्रवृत्ति राज्यकर्त्यांत अलीकडे आढळते. ह्याचें कारण असें सांगतां येईल कीं, विशिष्ट दरानें जकात बसविली असतां आयात किती कमी होईल, हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण घड्याचा परिणाम अगदीं हमखास असतो. आयात जेवढी कमी व्हावी असें राज्यकर्त्यांस वाटत असतें तेवढी आयात कमी होतेच. अर्थात् यासाठीं कार्यक्षम सरकारी कारभार हवा. निश्चितता हा घडा-पद्धतीचा अत्यंत महत्त्वाचा गुण समजला पाहिजे. कांहीं कांहीं वस्तूंच्या बाबतींत परदेशाहून होणारा पुरवठा किंवा त्याकरितां असलेली मागणी अतिशय अलवचिक असते. जकातीमुळें किंमत वाढविली तरी ती कमी

२४ The revenue effect of a given tariff is measured by the amount of the tax which will be paid to the Government on imports. The protective effect is measured by the increase in domestic production and the redistribution effect is measured by the rise in the domestic price of the commodity subjected to tariff. This is the economic rent paid by consumers of the commodity to domestic producers above their costs of production.

होत नाहीं. अशा परिस्थितींत जें हवें तें साधण्यास घडापद्धति राज्यकर्त्यांना आणखी एका कारणाकरितां सोयीची वाटते. ठरविलेला घडा बदलणें जेवढें सुलभ असतें तेवढा जकातींतील बदल सुलभ नसतो. अर्थात् घडापद्धतीचे तोटेहि आहेत. घड्यांत बदल करणें सोपें असल्यानें अधिकाऱ्यांच्या लहरीपणास वाव मिळण्याचा धोका वाढतो. घडा पद्धतीमुळें आयात हमखास कमी होऊन आयात-व्यापारांत मक्तेदारी निर्माण होण्याचाहि संभव असतो. घडापद्धतींत सरकारची नियंत्रणाची पद्धति वाढीस लागते. घडा-पद्धत म्हणजे सरकारकडून होणारा प्रत्यक्षच हस्तक्षेप होय. ह्या सर्व गोष्टी समजून घेत असतां एक गोष्ट लक्षांत ठेवलीच पाहिजे ती अशी कीं, फायदा कशास म्हणावें, तोटा कशास म्हणावें, हें अर्थव्यवस्थेच्या स्वरूपावर व साध्यांवर बऱ्याच प्रमाणांत अवलंबून असते. नियोजित किंवा नियंत्रित अर्थव्यवस्थेंत एखादी घटना हमखास होणें ह्या गोष्टीला फारच महत्त्व असतें. अशा अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें घडा-पद्धत शतपटीनें बरी. उलट सरकारी हस्तक्षेप अपवादात्मक असावा व आपद्धर्म मानला जावा, अशा विचारसरणीला जेथें प्राधान्य दिलें जात असेल तेथें जकात अधिक पसंत केली जाईल. १९३० नंतरच्या जगांत घडा-पद्धतीला महत्त्व प्राप्त झालें आहे. ह्यांतील रहस्य हेंच आहे कीं, अर्थव्यवस्थेंत सरकारी हस्तक्षेप केला जाण्याची प्रवृत्ति वाढत आहे.[२५]

सरकारी हस्तक्षेपाचें वाढतें क्षेत्र :—जकाती बसवून आंतरराष्ट्रीय व्यापाराचें नियंत्रण करण्यापेक्षां घडा-पद्धतींत सरकारचा हस्तक्षेप अधिक प्रत्यक्ष व व्यापक असतो, हें वरील विवेचनावरून दिसून येईल. अलीकडे सरकारी हस्तक्षेपाची प्रवृत्ति वाढत आहे हें वरील विवेचनांत सांगितलें आहे. सरकारी हस्तक्षेपाच्या ह्या वाढत्या प्रवृत्तीमुळेंच आंतरराष्ट्रीय व्यापारांचें नियंत्रण करण्याच्या नवीन नवीन कल्पना निघत आहेत. त्यामध्यें **वस्तुविषयक करार** (Commodity Agreements) व **दुतर्फी व्यापारी करार** (Bilateral Trade Agreements) ह्यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. वस्तुविषयक करार एखाद्या वस्तूच्या आयाती देशांत व निर्याती देशांत केले जातात. अशा करारानें संबंधित वस्तूची आयाती देशानें किती खरेदी करावी, किंमत किती द्यावी, हा सर्व तपशील ठरविला जातो. ह्या पद्धतींत आयाती देशाला हवा असलेला माल निश्चितपणें मिळूं शकतो व निर्याती देशाला माल

[२५] Since 1930, quotas have come to supplant tariffs very widely. The advantages of quotas are certainty and administrative flexibility. Quotas, however "tend to be too restrictive and administratively much more changeable and arbitrary, as contrasted with tariffs which are changed less frequently. Under these circumstances quotas are more expensive for consumers. They further encourage monopolistic tendencies in export-import trade. Besides they lead to the determination of exports and imports not by price system but by fiat.

खपण्याची खात्री निर्माण होते. हा फायदा असला तरी तात्त्विक दृष्ट्या विचार करतां ह्या पद्धतींत मागणी, पुरवठा, भाव ठरविण्याचें बाजारसंस्थेचें कार्य नियंत्रित केलें जातें व सरकारी हस्तक्षेप वाढतो ह्यांत शंका नाहीं.[२६]

दुतर्फी व्यापारी करार :—वस्तुविषयक करारांच्या पुढील पायरी म्हणजे दोन (अगर अधिक) देशांत होणारे व्यापारी करार होत. अशा करारांत उभयदेश परस्परांकडून कोणत्या वस्तु खरेदी करतील, किती प्रमाणांत त्या खरेदी करतील व खरेदी-विक्री कोणत्या किंमतीनुसार होईल, हें ठरविलें जातें. कांहीं कांहीं देशांत व्यापारी करारानुसार होणारी खरेदीविक्री राज्यसंस्थेकडूनच केली जाते. मग प्रत्यक्ष उत्पादन राज्यसंस्थेच्या मार्फत होत असो वा नसो. इतर देशांत राज्यसंस्था विशिष्ट मर्यादेपर्यंतचे आयात अगर निर्यात परवाने देण्यापुरतीच करारानें बांधली जाते. जेव्हां विशिष्ट वस्तूंची अगर वस्तूंची टंचाई असेल तेव्हां माल निश्चित मिळविण्याच्या दृष्टीनें व्यापारी करारांचा ग्राहक देशाला चांगला उपयोग होतो; पण अशा वेळीं ग्राहकांना किंमत जबर द्यावी लागते. उलट विशिष्ट वस्तूंची विक्री जेव्हां कठीण असेल तेव्हां बाजारपेठ निश्चित करण्यासाठीं विक्रेत्या देशांना अशा करारांचा उपयोग होऊं शकतो. पण निश्चिततेचें मूल्य म्हणून सामान्यतः बाजारभावापेक्षां कमी किंमत स्वीकारावी लागते. व्यापारी करारांचा उपयोग **परचलन** जेव्हां दुर्मिळ असतें तेव्हांहि करतां येतो. अशा वेळीं व्यापारी करार अशा प्रकारें केलें जातात कीं, शक्य तों परस्परांच्या देण्याघेण्यांची फिटंफाट व्हावी. आर्थिक नियोजनांच्या काळांत व्यापारी करारांचें प्रस्थ वाढलें असल्यास नवल नाहीं. कारण नियोजनासाठीं परदेशी व्यापाराची जी निश्चितता हवी असते ती व्यापारी करारामुळें बऱ्याच प्रमाणांत लाभते.

राज्यसंस्थमार्फत व्यापार (State Trading) :—हा एक परराष्ट्र-व्यापार-नियंत्रणाचाच मार्ग आहे. हा मार्ग जव्हां स्वीकारला जातो तेव्हां विशिष्ट वस्तूंचा व्यापार करण्याचा एकाधिकार राज्यसंस्था आपल्याकडे घेते. ह्या एकाधिकारामुळें परराष्ट्रांत संबंधित वस्तूची खरेदी करून स्वदेशीं तिची विक्री करणें राज्यसंस्थेला शक्य होतें. आपल्या एकाधिकाराचा उपयोग राज्यसंस्थेला स्वतःसाठीं फायदा मिळविण्यासाठीं ज्याप्रमाणें करतां येतो त्याचप्रमाणें स्वदेशी उद्योगधंद्यांना संरक्षण देण्यासाठींहि करतां येतो. परदेशांतील किंमतीपेक्षां बरीच अधिक किंमत स्वदेशांत सरकारनें आकारल्यास सरकारी महसुलांत घवघवीत भर पडूं शकेल हें स्पष्टच

[२६] Commodity agreements are made between exporting and importing countries. the agreements generally indicate quantities of trade. They also, as a rule, specify prices. These agreements provide an assured outlet for the exporting country or countries and an assured source of supply for the importing country or countries. In theory they are Thoroughly objectionable. Supply and demand are fixed in advance and not left for determination by market forces.

आहे. पण तीच किंमत एवढी जबर ठेवतां येईल कीं, त्यामुळ स्वदेशांतील ग्राहकांना ती न परवडून ते स्वदेशी माल घेण्यास प्रवृत्त होतील. अर्थात् ह्या ठिकाणीं सरकारी एकाधिकार ह्याचा अर्थ परदेशांतून माल न घेणें असाच होईल. कारण खाजगी व्यापाऱ्यांना माल आणतां येणार नाहीं. आणि माल खपत नाहीं ह्या सबबीवर सरकार तो आणणार नाहीं. आयात बंद करण्यासाठीं सरकारी एकाधिकाराचा ज्याप्रमाणें उपयोग होतो, त्याचप्रमाणें घडा-पद्धतीप्रमाणें आयात मर्यादित करण्यासाठींहि करतां येतो. मात्र जेव्हां किंमती वाढतात तेव्हां घडापद्धतीचा फायदा खाजगी व्यापाऱ्यांना मिळतो; तसें मात्र ह्या बाबतींत होणार नाहीं. सर्व फायदा सरकारलाच मिळेल.

निर्यात नियंत्रण :—परराष्ट्र व्यापारावरील नियंत्रणें प्रामुख्यानें आयात कमी-अधिक करण्यासाठीं वापरण्यांत येतात; पण **निर्यात नियंत्रण** (Export Control) हा सुद्धां परराष्ट्र व्यापारावर निर्बंध घालण्याचा उद्देश असूं शकेल. निर्यात व्यापारांत जेव्हां राज्यसंस्था हस्तक्षेप करूं पहाते तेव्हां निर्यात वाढ व्हावी असाच बहुधा राज्यसंस्थेचा हेतु असतो. कारण आपली निर्यात कमी व्हावी असें सहसा कोणत्याच देशाला वाटत नाहीं; पण अपवादात्मक परिस्थितींत निर्यात कमी व्हावी ह्या हेतूनेंदेखील निर्यात व्यापारावर नियंत्रणें बसवलीं जातात. उदाहरणार्थ, देशांत भावफुगवणीची प्रक्रिया दिसून येत असेल तर तिला आळा घालण्यासाठीं देशांतील माल बाहेर जाऊं नये असें वाटून सरकारकडून निर्यात कमी करणारे निर्बन्ध घातले जातात. तसेंच देशांतील विशिष्ट कच्चा माल देशाबाहेर न जातां देशांतील उद्योगधंद्याच्या विकासाला कारणीभूत व्हावा म्हणून देखील कधींकधीं निर्यातनियंत्रण केलें जातें. निर्यात नियंत्रणाचे मार्ग आयात नियंत्रणासारखेच असतात. उदाहरणार्थ, निर्यात कमी व्हावी म्हणून निर्यातीवर जकाती बसवल्या जातात. त्यायोगें निर्यात-वस्तूंच्या किंमती सामान्यतः वाढून निर्यातींतील मागणी कमी होऊन निर्यात कमी होण्याचा संभव असतो. निर्यात जकातीपेक्षां निर्यात घडा ठरविणें म्हणजे कोणत्या मालाची किती निर्यात व्हावी हें ठरविणें हा अधिक सरळ व खचित परिणामकारक असा मार्ग आहे. कारण ह्या मार्गांत इष्ट गोष्ट होण्यासाठीं किंमतींतील फेरबदलावर विसंबून राहावें लागत नाहीं. परराष्ट्र-व्यापार नियंत्रणाचें वस्तुविषयक करार, दुतर्फी व्यापारी करार, राज्यसंस्थेमार्फत व्यापार हे इतर जे मार्ग असतात ते सामान्यतः निर्यात व्यापार वाढण्याकरितां वापरले जातात. ह्या मार्गांनीं गेल्यास आपल्या देशाच्या मालाला देशाबाहेर खात्रीची बाजारपेठ उपलब्ध होऊं शकते. अर्थात ह्या सर्व मार्गांत निर्यातव्यापारांत सरकारचा वाढत्या प्रमाणांत हस्तक्षेप होत जातो हें उघडच आहे.

: १० : भांडवलाच्या आन्तरराष्ट्रीय हालचाली

[INTERNATIONAL CAPITAL MOVEMENTS]

अल्पकालीन व दीर्घकालीन भांडवल :—आन्तरराष्ट्रीय आर्थिक संबंधांत भांडवलाची आयातनिर्यात किंवा अधिक समर्पक शब्दप्रयोग करावयाचा असेल तर भांडवलाची देवाणघेवाण वस्तूंच्या आयातनिर्यातीएवढीच, किंबहुना अलीकडील काळांत जरा अधिकच, महत्त्वाची आहे. भांडवलाच्या देवाणघेवाणीचें स्वरूप सांगतांना जे अनेक प्रकारचे भेद केले जातात, त्यांतील अल्पकालीन भांडवल व दीर्घकालीन भांडवल हा भेद विशेष उपयुक्त आहे. भांडवलाची देवाणघेवाण एक वर्षापेक्षां कमी मुदतीसाठीं झाली असेल तर ती अल्पकालीन मानावी व तिची मुदत वर्षापेक्षां अधिक असेल तर ती दीर्घकालीन समजावी असा सामान्य संकेत आहे.[1] परकीयांच्या आपल्या बँकांतील ठेवी, परकीयांनीं आपल्या सरकारला दिलेलीं अल्पमुदतीचीं कर्जें (अल्प मुदतीच्या कर्जरोख्यांत केलेली गुंतवण) इत्यादि कर्जप्रकारांचा समावेश अल्पकालीन भांडवलाच्या आयातींत होतो. उलट स्वकीयांच्या परराष्ट्रांतील बँकांतील ठेवी किंवा परकी सरकारच्या कर्जरोख्यांत केलेली गुंतवण हीं अल्पकालीन भांडवलाची निर्यात होय. दीर्घकालीन भांडवल सामान्यतः दोन प्रकारें येतें जातें. कर्जरोख्यांची खरेदी-विक्री हा एक प्रकार व **भागरूप भांडवल गुंतवण** (Equity of Ownership Capital हा दुसरा प्रकार. जेव्हां आपल्या देशांतील कर्जरोख्यांची खरेदी परकीयांकडून केली जाते किंवा आपल्या देशांत भागरूप भांडवल गुंतवण त्यांच्याकडून केली जाते तेव्हां भांडवलाची आयात झाली असें म्हणतां येईल. उलटपक्षीं स्वकीयांनीं परदेशांत कर्जरोख्यांची खरेदी करणें किंवा भागरूप भांडवल-गुंतवण करणें ही भांडवलाची निर्यात होय. भागरूप भांडवल-गुंतवण करणाऱ्यांना भांडवल-गुंतवणीच्या प्रमाणांत मालकी हक्क व तदनुषंगानें मिळणारे सर्व अधिकार प्राप्त होतात, हें उघडच आहे. निराळ्या शब्दांत ज्या प्रमाणांत परकीय भांडवल येथें त्या प्रमाणांत परकीयांचे आर्थिक वर्चस्वहि स्वीकारावें लागतें. ही भांडवलाच्या आयात-निर्यातीची एक बाजू असून ती लक्षांत ठेवली पाहिजे एवढी महत्त्वाची आहे. अल्पकालीन काय किंवा दीर्घकालीन काय, भांडवलाची आयातनिर्यात खाजगी रीत्या जशी होऊं शकते तशीच सरकारीरीत्याहि होऊं शकते. अलीकडील काळांत सरकार-

[1] It is useful to divide capital movements into short term and long term. If the maturity period of a credit instrument is less than a year, it gives rise to a short term capital movement. If the instrument has a duration of more than a year or consists of a title to ownership, the capital movement is long term.

मार्फत होणारे कर्जव्यवहार किंवा भांडवलगुंतवणीचे व्यवहार ह्यांना आन्तरराष्ट्रीय आर्थिक संबंधांत बरेंच महत्त्व आहे.

भांडवलाच्या हालचालीमागील हेतु :—भांडवलाची निर्यात करण्यामध्यें जे विविध हेतु असतात त्यांची मीमांसा करणें कठीण आहे. पण कांहीं प्रमाणांत ती करतां येते. ती मीमांसा करतांना अल्पकालीन भांडवल व दीर्घकालीन भांडवल ह्यांतील फरक किंवा कर्जरूप भांडवलाचे व्यवहार व भागरूप भांडवलगुंतवण ह्यांत भेद करणें उपयुक्त ठरतें. अल्पकालीन भांडवलाच्या हालचालींत दोन-तीन हेतूंचें मिश्रण झालेलें आढळतें. त्यामध्यें सुरक्षिततेचा हेतु, अधिक व्याज मिळविण्याचा हेतु ह्यांना प्राधान्य द्यावें लागेल. जेव्हां बँकेंतील पैसा परदेशांत ठेवण्यास लोक उद्युक्त होतात. तेव्हां परदेशांत पैसा अधिक सुरक्षित राहील असें तरी त्यांना वाटत असतें किंवा ठेवीवर अधिक व्याज तरी मिळत असतें. अल्पमुदतीच्या ठेवीवरील व्याज बरेंच कमी असल्यानें व दोन देशांतील व्याजांतील फरकहि किरकोळ असण्याचा संभव असल्यानें व्याजाच्या हेतूपेक्षां सुरक्षिततेचा हेतु अधिक प्रभावी असतो, असें म्हणणें योग्य होईल. तरीपण व्याजाचा हेतु लक्षांत घेतलाच पाहिजे. कारण त्या हेतूच्या अस्तित्वामुळेंच व्याजाचा दर वाढवून परदेशीं ठेवी आकर्षित करणें बँकांना शक्य होतें. जो देश सुरक्षिततेकरितां प्रसिद्ध असेल म्हणजेच ज्या देशाची आन्तरराष्ट्रीय अर्थकारणांत विशेष पत असेल त्या देशांतील व्याजाच्या दराला अल्पकालीन भांडवलाच्या हालचालींच्या दृष्टीनें फारच महत्त्व प्राप्त होतें. सुरक्षिततेच्या किंवा व्याज-वाढीच्या हेतूंप्रमाणेंच सट्टेबाजीचा हेतूहि लक्षांत ठेवला पाहिजे. ज्या देशांतील चलनाचें मूल्य वाढण्याचा संभव वाटत असेल त्या देशाचें चलन अधिक प्रमाणांत प्राप्त करून ठेवणें व योग्य वेळ येतांच त्या चलनाची विक्री करून मोकळें होणें हाहि अल्पकालीन भांडवलाच्या हालचालीमागील एक प्रधान हेतु असतो. प्रस्तुत संदर्भांत एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, भांडवलाची निर्यात आज झाल्यास कालान्तरानें तें भांडवल परत येणें क्रमप्राप्त होतें. असो. सुरक्षिततेचा हेतु व सट्टेबाजीचा हेतु ह्यांना अल्पकालीन भांडवलाच्या हालचालींत प्रधान स्थान असतें व व्याज-वाढीच्या हेतूला त्या मानानें कमी महत्त्वाचें स्थान असतें. हे तिन्ही व विशेषत: पहिले दोन हेतु अशा प्रकारचे आहेत कीं, त्यामुळें अल्पकालीन भांडलाच्या हालचाली फार जलद व मोठ्या प्रमाणावर होऊं शकतात. सुरक्षिततेची भावना फार नाजुक आहे. एखाद्या अफवेनें किंवा एखाद्या किरकोळ गोष्टीनेंहि तिला धक्का बसू शकतो. तसें झाल्यास पूर्वीं सुरक्षित समजला जाणारा जो देश असुरक्षित वाटूं लागेल त्या देशांतील भांडवल लगेच व मोठ्या प्रमाणावर बाहेर जातें. सट्टेबाजीही तर बोलूनचालून त्वरित फायदा मिळविण्यासाठीं केलेली गोष्ट असते. त्यामुळें अर्थातच भांडवलाच्या हालचालीचें प्रमाण वाढतें व वेगहि वाढतो अल्पकालीन भांडवलाच्या हालचाली अशा प्रकारें फार जलद व मोठ्या प्रमाणावर होण्याची

शक्यता नेहमींच असल्यानें आन्तरराष्ट्रीय आर्थिक भांडवली व्यापारांत समाविष्ट होणाऱ्या अल्पकालीन भांडवलाला **चपल अथवा पळपुटें भांडवल** (Hot Capital or money) असें संबोधिलें जातें.

दीर्घकालीन भांडवलाच्या हालचाली :--दीर्घकालीन भांडवल जेव्हां परदेशीं कर्जरूपानें किंवा भागरूप भांडवलगुंतवणूं म्हणून पाठविलें जातें तेव्हांहि अर्थातच सुरक्षिततेचा विचार केला जातोच. पण दीर्घकालीन भांडवल-गुंतवणीसाठीं सुरक्षितता ही किमान आवश्यकता समजल्यास दीर्घकालीन भांडवलाचें देशांतर, तौलनिक व्याजाचे दर व नफ्याचें तौलनिक प्रमाण ह्यांच्यावरच मुख्यत्वें करून असतें असें म्हणणें चूक होणार नाहीं. जेव्हां परदेशांतील व्याजाचा दर स्वदेशांतील व्याजाच्या दरापेक्षां अधिक असतो तेव्हां कर्जरूपानें भांडवलाची निर्यात होते. वास्तविक पाहतां अशा स्वरूपाच्या भांडवलाच्या हालचालीमुळें देशोदेशांच्या व्याजाच्या दरांतील भेद नष्ट होऊन व्याज-समानता प्रस्थापित व्हावयाला पाहिजे; पण तसें होत नाहीं. ह्याचें कारण एकच कीं, भांडवल ह्या उत्पादनघटकांत इतर घटकांच्या मानानें अधिक गति-सौकर्य असलें तरी व्याजाच्या दरांतील तफावत संपूर्णपणें नष्ट व्हावें एवढें तें नसतें. व्याजाच्या दरांतील फरकाप्रमाणेंच नफ्याच्या प्रमाणांतील फरकहि दीर्घकालीन भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय हालचालींच्या दृष्टीनें महत्त्वाचे असतात. ज्या देशांत नफा अधिक सुटत असेल त्या देशांत भांडवलगुंतवण करण्याची प्रवृत्ति इतर देशांतील भांडवलदारांत दिसून येते. साहजिकच नफ्याचें प्रमाण ज्या अनेक गोष्टींवर अवलंबून असतें, त्या सर्व गोष्टींना दीर्घकालीन भांडवलाच्या हालचालींच्या दृष्टीनें महत्त्व असतें. उदाहरणार्थ एखाद्या देशांत भांडवलाची विपुलता आहे कीं, तुटवडा आहे, ही गोष्ट विशष महत्त्वाची असते. भांडवलवैपुल्य ज्या देशांत असेल त्या देशांतील व्याजाचे दर अथवा नफ्याचें प्रमाण भांडवल-तुटवडा असलेल्या देशापेक्षां स्वाभाविकपणेंच कमी असतें. कारण भांडवलगुंतवणाचे मार्ग त्या देशांत संपुष्टांत तरी आलेले असतात किंवा लाभदायक तरी नसतात. ह्याच कारणाकरितां जागतिक आर्थिक इतिहासांत दीर्घकालीन भांडवलाचा ओघ प्रगत राष्ट्रांकडून अप्रगत राष्ट्रांकडे वळलेला दिसून येतो. प्रगत राष्ट्रांत भांडवलगुंतवण किफायतशीर होण्याची शक्यता कालौघांत जेव्हां कमी होते तेव्हां तेथील भांडवलदारांचे डोळे अप्रगत राष्ट्रांकडे वळतात. मात्र अप्रगत राष्ट्रांतील व्याजाचें अथवा नफ्याचें प्रमाण केवळ भांडवल-परिमितीवर अवलंबून असत नाहीं. त्या देशांतील बाजारपेठेचा आकार, उत्पादन-खर्च कमी करण्याची तांत्रिक शक्यता, सरकारकडून उद्योग धंद्यावर लादले जाणारे निर्बंध अथवा दिल्या जाणाऱ्या सवलती व उद्योगधंद्यावर पडणारा करांचा बोजा ह्या गोष्टींवरहि तें अवलंबून असतें. ह्या सर्व गोष्टी कोणत्याहि देशांत ज्या प्रमाणांत अनुकूल अथवा प्रतिकूल असतात त्या मानानें व त्या प्रमाणांत त्या देशांत बाहेरून भांडवल येण्याची संभाव्यता वाढते. अर्थात् भांडवलाच्या आयात-निर्यातींत सुरक्षिततेचा

प्रश्न पायाभूत महत्त्वाचा असतो हें पुनः एकदां आग्रहानें सांगितलें पाहिजे. म्हणूनच ज्या देशांत भांडवल पाठवावयाचें त्या देशांतील राजकीय परिस्थितीचा विचार परकी भांडवलदाराकडून केला जातो. ज्या देशांतील राजकीय परिस्थिति अस्थिर असेल त्या देशाकडे परकी भांडवलाचा ओघ सहसा आपसूकपणें वळत नाहीं राजकीय दृष्टया स्थिर प्रकृति असणाऱ्या देशाकडे परकी भांडवल स्वाभाविकपणेंच अधिक प्रमाणांत आकर्षित होतें. नैमित्तिक घटनांचा परिणाम दीर्घकालीन भांडवलावर अल्पकालीन भांडवलाइतका होत नाहीं, हें जरी खरें असलें तरी दीर्घकालीन भांडवल-गुंतवण करणारे राजकीय परिस्थितीचा दीर्घकालदृष्टया विचार करतात ह्या गोष्टीचा जागतिक राजकारणावर फारच मोठा परिणाम झाला आहे. परदेशांत दीर्घकालीन भांडवलगुंतवण मोठ्या प्रमाणावर करूं पहाणाऱ्या देशांना राजकीय साम्राज्यशाहीची आवश्यकता भासूं लागते व त्यांतूनच साम्राज्यशाही राजकारण उद्भवतें ही गोष्ट उल्लेखनीय आहे.

दीर्घकालीन व अल्पकालीन भांडवलाच्या हालचालींविषयीं वर जी मीमांसा केली आहे ती सारांशरूपानें सांगावयाची झाल्यास असें म्हणतां येईल कीं, (१) भांडवलवैपुल्यामुळें भांडवल-निर्यातीची वृत्ति निर्माण होते. (२) परदेशांत भांडवलावर मिळणारें व्याज स्वदेशांत मिळणाऱ्या व्याजाच्या तुलनेनें वाढणें ही गोष्ट भांडवल निर्यात होण्यास अनुकूल ठरते. (३) कोणत्याहि कारणामुळें देशाबाहेर भांडवलगुंतवण होण्यामुळें अधिक नफा सुटूं शकत असेल तर भांडवल निर्यात होतें. (४) कर-प्रमाणांत होणारे बदल भांडवल-निर्यातीस अनुकूल अथवा प्रतिकूल प्रवाह निर्माण करूं शकतात. स्वदेशांतील भांडवल-गुंतवण तुलनेनें अधिक आकर्षक ठरून भांडवलनिर्यातीस आळा बसतो. उलट परदेशांतील करप्रमाण कमी झाल्यास भांडवल-निर्यातीस प्रोत्साहन मिळतें. (५) परकी चलनाचें मूल्य वाढण्याचा संभव असल्यास अल्पकालीन भांडवल निर्यात करण्याची प्रवृत्ति दिसून येईल. हेतु असा कीं, कर्ज फेडीची वेळ जेव्हां येईल तेव्हां फायदा व्हावा. (६) परदेशांत भांडवलगुंतवणावर जेवढ्या सवलती मिळतील किंवा परदेशीं भांडवल-गुंतवणांतील धोका जेवढा कमी होईल तेवढें भांडवलनिर्यातीस प्रोत्साहन मिळेल. उलटपक्षीं परदेशी भांडवलगुंतवण करण्यांतील धोके वाढल्यास भांडवलनिर्यात कमी होते.[२]

परराष्ट्रीय भांडवलाविषयींचें धोरण :—परराष्ट्रीय व्यापारावर कोणत्याहि स्वरूपाचे निर्बंध घालणें किंवा जकाती बसवून अथवा अन्य मार्गांनीं परराष्ट्रीय व्यापाराच्या मार्गांत अडचणी निर्माण करणें जेव्हां निषिद्ध मानलें जात होतें तेव्हां अर्थातच भांडवलाच्या आन्तरराष्ट्रीय हालचाली अनिर्बन्ध असाव्या हा विचार प्रभावी होता; पण आर्थिक व्यवहारांत आतां निर्बंधयुग अवतरलें असून भांडवलाच्या आन्तर-राष्ट्रीय हालचालींना उत्तेजन देण्यासाठीं अथवा आळा घालण्यासाठीं अनेक प्रकारची उपाययोजना केली जाते. त्या उपायांची (१) चलनीय निर्बंध अथवा सवलती

(२) अर्थसंकल्पीय निर्बंध अथवा सवलती व (३) इतर निर्बंध अथवा सवलती अशी विभागणी करितां येईल. भांडवलाच्या आन्तरराष्ट्रीय हालचालींचा राजकारणाशीं अत्यंत घनिष्ठ संबंध असल्यानें राजकीय कारणाकरितां अनेक वेळां भांडवलाची आयातनिर्यात नियंत्रित करण्यांत येतें. हें लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे. उदाहरणार्थ, एखादा देश राजकीय दृष्टया आपलें विशेष सख्य ज्या राष्ट्रांशीं आहे त्यांत आपलें नागरिक अधिक प्रमाणांत भांडवल गुंतवतील अशी उपाययोजना करितो किंवा ज्या राष्ट्रांच्या राजकारणाचें आपल्याला वावडें आहे त्या देशांकडे आपलें भांडवल वळणार नाहीं अशी दक्षता घेतो. हा अनुभव नित्याचा आहे. आर्थिक कारणाकरितां जेव्हां भांडवलाच्या आयातीवर निर्बंध घातले जातात तेव्हां त्या मागें अन्तर्गत उद्योगक्षेत्रांत परकी भांडवलाची स्पर्धा जाणवूं नये, परत-फेडीचा बोजा असह्य होईल एवढें भांडवल देशांत येऊं नये अशासारखे हेतु असतात. परकीय भांडवल देशांत येऊं नये असें जेव्हां वाटत असतें तेव्हां एकतर परराष्ट्रांत कर्ज उभारण्यास संपूर्णपणें बंदी केली जाते किंवा सरकारी नियंत्रण-यंत्रणा उभारून जरूर तेवढें परकी भांडवल इष्ट वाटेल तेथेंच गुंतवलें जाईल अशी दक्षता घेतली जाते; किंवा परकी भांडवलाला सावत्र भावानें वागविलें जातें. म्हणजे स्वदेशी भांडवलावर चालविलेल्या व्यवसायाला करांच्या अगर अन्य ज्या सवलती दिल्या जातात, त्या परकी भांडवलाला नाकारल्या जातात, एवढेंच नव्हे तर स्वदेशी भांडवलावर नसलेले निर्बंध परकी भांडवलावर घातले जातात. परकी भांडवलाला निरुत्साही करणें हा परकी भांडवलाची आयात नियंत्रित करण्याचा

---

[२] The factors which determine the amount of capital transfers are very complex. Among the more important are the following.

(i) To the extent to which people's savings rise, lendings abroad are likely to increase.

(ii) When the rate of interest abroad rises relatively to the rate at home, lending abroad is likely to be encouraged.

(iii) Increase in profitability of industry abroad induces people to invest a larger proportion of their capital funds abroad.

(iv) Changes in taxation may alter the relative attractiveness of investing capital funds in one country or in other.

(v) When it is expected that the rate of exchange between a country's domestic money and foreign money is likely to depreciate people are likely to lend more abroad for the time being in order to make an exchange profit on their capital when they bring it back later at the depreciated rate of exchange.

(vi) There are many other risks attaching to the ownership of capital in a particular country which may make investment of funds in one country particularly attractive or unattractive.

नेहमींचा मार्ग आहे. ह्याच्या उलट परकी भांडवलाची आयात व्हावी असें वाटत असेल तर—उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं देशी भांडवल कमी पडत असेल तर परकी भांडवलाची आयात इष्ट ठरते—परकी भांडवलाला करांतून सूट देण्यांत येते, परकीय कर्जावर अधिक व्याज दिलें जातें किंवा अशाच प्रकारच्या सवलती दिल्या जातात. भांडवलाच्या निर्यातीवर बंधनें घालण्यांत स्वदेशांत उद्योग-धंद्यांच्या वाढीस भांडवल कमी पडूं नये, स्वदेशी उद्योगधंद्याशीं स्पर्धा करतील अशा देशांत किंवा परदेशी उद्योगधंद्यांत आपलें भांडवल गुंतवलें जाऊं नये अशा-सारखे उद्देश असतात. त्यासाठीं प्रसंग पाहून भांडवल-निर्यातीवर संपूर्णपणें बंदी घालणें, किंवा भांडवल निर्यात सरकारी परवानगीनें व सरकारनें घालून दिलेल्या मर्यादेंतच होईल असें पाहणें किंवा भांडवल-निर्यात किफायतशीर होणार नाहीं अशी नियंत्रणें बसविणें अशासारखें उपाय योजिले जातात. भांडवलनिर्यातीला जेव्हां उत्तेजन द्यावयाचें असेल तेव्हां सामान्यतः परदेशाबरोबर वाटाघाटी करून आपल्या भांडवलाला तेथें जास्तींत जास्त सवलती मिळू शकतील असा प्रयत्न केला जातो. भांडवलाच्या आयातनिर्यातीवरील नियंत्रणामागील हेतूच्या मीमांसेबाबत आतांपर्यंत जें विवेचन केलें आहे तें मुख्यतः दीर्घकालीन भांडवलाच्या हालचालींना लागू पडते. अल्पकालीन भांडवलाच्या हालचालीवर जेव्हां नियंत्रणें बसवलीं जातात तेव्हां त्या मागील मुख्य उद्देश आन्तरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत स्थैर्य प्रस्थापित करणें असा असतो. अल्पकालीन भांडवलाच्या हालचाली फार जलद व मोठ्या प्रमाणा-वर होतात हें ह्यापूर्वी सांगितलेंच आहे. कित्येक वेळां त्या अनपेक्षित रीत्या होतात हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. साहजिकच जलद, अनपेक्षित व मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या अल्पकालीन भांडवलाच्या हालचालीमुळें आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत अस्थैर्य निर्माण होतें व त्यामुळें कित्येकदां अल्पकालीन भांडवलाच्या हालचालीवर अत्यंत कडक असे निर्बंध बसवावे लागतात.

: ११ : आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्याचा तोल
[BALANCE OF PAYMENTS]

आन्तरराष्ट्रीय देण्याघेण्याचा तोल (Balance of Payments) :— आन्तरराष्ट्रीय आर्थिक संबंधांतून आन्तरराष्ट्रीय देणीं-घेणीं निर्माण होतात. उदाहरणार्थ, भारतांतील नागरिकांनीं इंग्लंडमध्यें निर्माण झालेला माल विकत घेतल्यास जेवढ्या किंमतीचा तो माल असेल तेवढी रक्कम हें भारताच्या दृष्टीनें 'देणें' होतें व इंग्लंडच्या दृष्टीनें 'येणें' होतें. त्याचप्रमाणें भारतानें अमेरिकेंतून कर्ज काढल्यास त्यांतून भारताच्या दृष्टीनें प्रथम 'येणें' निर्माण होतें. काढलेल्या कर्जाची रक्कम प्रथम मिळावयाची असते तेव्हां ती त्या वेळेपुरती भारताचें येणें ठरतें. त्याच कर्जामुळें व्याजरूपी देणें निर्माण होतें आणि तेंच कर्ज परतफेडीच्या वेळीं संपूर्णपणें देण्यांत समाविष्ट होतें. तसेंच भारतानें चीनसाठीं कांहीं भेट द्यावयाची ठरविली तर आन्तरराष्ट्रीय आर्थिक संबंधांत ती भेट 'देणें' म्हणून नोंदली जाईल. कोणत्याहि विशिष्ट कालखंडांचा उदाहरणार्थ, वर्षाचा विचार केला तर असें आढळून येईल कीं, त्या कालखंडांत कोणताहि देश इतर देशांचें कांहीं 'देणें' लागतो व त्याचें नांवें कांहीं येणें असतें. **ह्या देण्या-घेण्याचा जो हिशेब असतो त्यालाच आन्तरराष्ट्रीय देण्याघेण्याचा समतोल असें म्हणतात.**[१] हा हिशेब तक्त्याच्या स्वरूपांत तयार केला जातो. ह्या तक्त्यांत एका बाजूला **येणीं** (Receipts) आणि दुसऱ्या बाजूला **देणीं** (Payments) दाखविलीं जातात. ह्या तक्त्यांत देणें किंवा येणें एका रकमेनें दाखविलें जात नाहीं. एका रकमेनेंच देणें किंवा येणें दर्शविल्यास आन्तरराष्ट्रीय आर्थिक संबंधांतील विविधता व देण्या-येण्याचीं विविध उगमस्थानें लक्षांत यावयाचीं नाहींत. म्हणून येणीं किंवा देणीं एका रकमेनें न दाखवितां त्यांचे शक्य तेवढें तपशिलवार वर्णन केलें जातें. देण्या-येण्याच्या हिशेबांत प्रत्येक व्यवहार स्वतंत्रपणें दाखविणें अर्थातच अशक्य आहे आणि तें जमलें तरी अशा तक्त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. त्यामुळें देणीं अगर येणीं निर्माण होण्याच्या कारणांचें वर्गीकरण करून प्रत्येक कारणापोटीं किती देणें निर्माण झालें तें नमूद केलें जातें. थोडक्यांत, आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्याचा समतोल हा कांहीं विशिष्ट पद्धतीनुसार केलेला हिशेब असतो. आणि तो विशिष्ट मुदतीच्या संदर्भांत असतो.[२]

---

[१] The account which summarises a country's economic transactions with all or any others is known as the Balance of International Payments.

[२] The balance of payments for a given period is defined —as a systematic record of all economic transactions during the period between the residents of the reporting country and residents of other countries—**International Monetary Fund.**

आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्यांच्या हिशेबाचा नमुना :–आन्तराष्ट्रीय देण्या-घेण्यांचा हिशेब तयार कसा केला जातो ह्याची कल्पना यावी म्हणून स्थूल स्वरूपाच्या वर्गीकरणावर आधारलेला एक हिशेब खालीं नमुन्यादाखल दिला आहे. त्यावरून असे हिशेब कसे तयार केले जातात ह्याची कल्पना येईल व आन्तरराष्ट्रीय आर्थिक संबंधांचें स्थूल स्वरूप काय असतें ह्याचीहि कल्पना येईल. ह्या हिशेबांत डाव्या बाजूस येणीं व उजव्या बाजूस देणीं आहेत. ज्या आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारामुळें स्वकीयांची परचलनाकरितां (Foreign Currency) मागणी उद्‌भवते ते देणीं निर्माण करणारे व्यवहार होत. ज्या व्यवहारांतून परकियांची स्वचलनासाठीं (Home Currency) मागणी निर्माण होते ते येण्याचे व्यवहार होत.[3]

आन्तरराष्ट्रीय देण्याघेण्याचा समतोल

येणें (Receipts)		देणें (Payments)	
(अ) चालू व्यवहार (Current Transactions)			
बाब	रक्कम रु.	बाब	रक्कम रु.
(१) दृश्य निर्यात	५०००	(१) दृश्य आयात	३०००
(२) अदृश्य निर्यात	५०००	(२) अदृश्य आयात	२०००
[व्यापारांतील तफावत (Balance of Trade) + रु. ५०००]			
(३) परदेशी प्रवाशांचा खर्च	३०००	(३) परदेशांत प्रवाशांचा खर्च	४०००
(४) निरपेक्ष येणीं	३०००	(४) निरपेक्ष देणीं	४०००
(५) व्याज व नफा	४०००	(५) व्याज व नफा	३०००
एकूण चालू व्यवहारांतून येणीं	२००००	एकूण चालू व्यवहारांतून देणीं रु.	१६०००
चालू व्यवहारांतील तफावत (Balance of Current Transactions) + रु. ४०००			
(आ) भांडवली व्यवहार (Capital Transactions)			
(६) दीर्घमुदतीचीं कर्जें व भांडवल गुंतवण	१००००	(६) दीर्घमुदतीचीं कर्जें व भांडवल गुंतवण	६०००
(७) अल्प मुदतीचीं कर्जें	८०००	(७) अल्प मुदतीचीं कर्जें	७०००
(८) कर्जफेड	७०००	(८) कर्जफेड	६०००
एकूण भांडवली येणीं	२५०००	एकूण भांडवलीं देणीं	१९०००

[भांडवली व्यवहारांतील तफावत (Balance of Capital Transactions) +रु. ६०००]

(आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील तूट अथवा वाढावा अर्थात् चालू व्यवहारांतील तफावत + भांडवली व्यवहारांतील तफावत = + १००००)

(इ) पूर्तीचे व्यवहार			
(९) सुवर्ण निर्यात	......	(९) सुवर्ण आयात	......
(१०) परचलन-निधींत घट	......	(१०) परचलन-निधींत भर	६०००
(११) कर्जें अथवा देणग्या	......	(११) कर्जें अथवा देणग्या	४०००
एकूण येणीं (अ + आ + इ) रु. ४५०००		एकूण देणीं (अ + आ + इ) रु. ४५०००	

वरील हिशेबांत देण्याघेण्याचा तपशील दर्शविण्यासाठीं दोन्हीं बाजूंचे प्रत्येकीं अकरा भाग पाडले आहेत. त्यांचा खुलासा पुढीलप्रमाणें करतां येईल.

(अ) बाब १ मध्यें येण्याच्या बाजूस निर्यात होणाऱ्या मालाचें मूल्य व देण्याच्या बाजूस आयात होणाऱ्या मालाचें मूल्य दाखविलें आहे. निर्यात किंवा आयात दृश्य असूं शकते त्याचप्रमाणें अदृश्यहि असूं शकते. दृश्य निर्यातींत आपल्याकडून परदेशस्थांनीं घेतलेला वस्तुरूप माल येतो. त्याचप्रमाणें दृश्य आयातींत आपण परदेशांकडून घेतलेला वस्तुरूप माल येतो. अदृश्य निर्यातींत परदेशी लोकांकरितां आपण कोणतीहि कामगिरी (Service) केली असेल तर तिचा मोबदला येतो. अदृश्य आयातींत परदेशीयांच्या कामगिरीचा त्यांना द्यावयाचा मोबदला येतो. एका देशांतील लोक दुसऱ्या देशांतील लोकांसाठीं किती विविध स्वरूपाची कामगिरी करूं शकतात, हें उदाहरणानें स्पष्ट होईल. भारतीयांनीं इंग्लंडमध्यें खरेदी केलेला माल भारतांत आणावा लागतो. तो माल ब्रिटिश मालकीच्या बोटींतून आणला गेला तर त्याचा अर्थ माल आणण्याची कामगिरी ब्रिटनच्या एका संस्थेनें भारताकरितां केली असें होईल आणि त्या कामगिरीचा मोबदला हें भारताच्या दृष्टीनें ब्रिटनचें देणें होईल. त्या मालाचा विमा उतरविला तर वाहतुकींतील धोका पत्करणें हीसुद्धां एक कामगिरीच होय. तिच्यासाठीं द्यावयाचा मोबदला विमा कंपनी परदेशी असल्यास देण्यांत समाविष्ट होईल. एखाद्या भारतीयानें एखाद्या ब्रिटिश तज्ज्ञाचा सल्ला घेतला तर सल्ला देण्याच्या कामगिरीबद्दल त्या भारतीयानें दिलेला मोबदला देण्याच्या बाजूस दाखल करावा लागेल. अशाच प्रकारच्या कामगिऱ्या जेव्हां भारतीयांकडून इतरांसाठीं केल्या जातात तेव्हां त्याबद्दलच्या मोबदल्याला येण्याच्या बाजूस स्थान मिळतें. कामगिरीबद्दलचें येणें व देणें बाब २ मध्यें दाखविलें आहे. बाब १ व २ मध्यें समाविष्ट होणाऱ्या व्यवहारांना खऱ्या अर्थानें परराष्ट्रीय व्यापार म्हणतां येईल. ह्या अर्थानें परराष्ट्रीय व्यापारांत जे देणें निर्माण होते व जे येणें निर्माण होतें

[3] As in normal accounting practice, the balance of payments is shown in terms of debit and credit entries. All international transactions which give rise to foreigner's money claims on the home country are debit transactions. All those giving rise to domestic money claims on foreigners are credit transactions —Scammell.

तिच्यातील तफावतीला व्यापारातील तफावत किंवा **व्यापार शेष** (Balance of Trade) म्हणतात. परदेशांतील प्रवासी जेव्हां आपल्या देशांत येतात तेव्हां हरप्रकारें खर्च करतात. हा खर्च म्हणजे परदेशी प्रवाशांनीं येथें येऊन खरेदी केलेल्या मालाचा किंवा कामगिरीचा दिलेला मोबदला असतो. परदेशांतील प्रवाशांनीं येथें केलेली खरेदी अप्रत्यक्ष निर्यातच असते आणि म्हणून ती निर्यातींत समाविष्ट झाली तरी चालेल हें तत्त्वत: बरोबर असलें तरी व्यावहारिक सोयीसाठीं परदेशांतील लोकांनीं येथें केलेला खर्च वेगळा दाखविणें आवश्यक असतें. उलट बाजूस आपल्या देशांतील लोकांनीं परदेशांत जाऊन केलेला खर्च येतो. बाब तीन मध्यें अशा प्रकारचें देणेंयेणें येतें. चालू व्यवहारांतील उरलेल्या ज्या दोन अनुक्रमें ४ व ५, आहेत त्यांत वस्तूंचा किंवा व्यापाराचा संबंध येत नाहीं. त्या सर्व व्यवहारांचें वैशिष्टय असें कीं, त्यांच्यामुळें एका देशांतून दुसऱ्या देशांत पैसा जातो. पण त्याला कारण वस्तूंची आयात-निर्यात नसते. एका देशांतून दुसऱ्या देशांत पैसा पाठविण्याचे जें व्यवहार असतात त्यांतील कांहीं व्यवहार निरपेक्ष असतात. म्हणजे देणाऱ्याला आपण दिलेल्या पैशाचा कोणत्या तरी स्वरूपांत मोबदला मिळावा अशी अपेक्षा नसते. उदाहरणार्थ, एका देशाच्या सरकारनें दुसऱ्या देशाच्या सरकारला देणगी दिली तर देणगीरूपानें पाठविलेला पैसा निरपेक्षवृत्तीनेंच पाठविला असें म्हणावें लागेल. परदेशांतील एखादी व्यक्ति आपल्या देशांत येऊन राहिली आणि तिनें आपल्या नातेवाईकाना खर्चासाठीं पैसा पाठविला तर त्यांत कांहीं परत मिळावे अशी बुद्धि नसते. असे सर्व व्यवहार बाब चार खालीं येतात.[3] बाब पांचमध्यें येण्याच्या बाजूस परदेशांत आपल्या देशांतील लोकांनीं गुंतविलेल्या भांडवलावरील व्याज व नफा येतो आणि देण्याच्या बाजूस आपल्या देशांत जें परदेशी भांडवल असतें त्यावरील परदेशांत पाठवावयाचा नफा व व्याज येतें. पहिल्या पांच बाबींत जे आर्थिक व्यवहार समाविष्ट आहेत त्यांना **चालू व्यवहार** (Current Transactions) असें म्हणतात कारण त्या व्यवहारांत भांडवलाची देवाण-घेवाण नसते. अशा व्यवहारांतून जे देणें व येणें निर्माण होतें त्यांच्यातील तफावतीला **चालू व्यवहारांतील तफावत** म्हणतात.

भांडवली व्यवहार :—बाब ६-७ व ८ मध्यें सर्व भांडवली देण्याघेण्याचे व्यवहार नमूद झाले आहेत. परदेशांकडून मिळावयाचीं कर्जें किंवा परदेशांतून आपल्या देशांत होणारी भांडवलगुंतवण प्रथम जेव्हां होते तेव्हां तेवढी रक्कम आपल्यास मिळावयाची असल्यानें, येण्याच्या बाजूस येतें. पण कर्जफेडीची जेव्हां वेळ येते तेव्हां देणें म्हणून दाखविली जाते. हें विधान दीर्घ मुदतीच्या व अल्प मुदतीच्या अशा दोन्ही कर्जांस लागू पडतें. बाब पांचमध्यें समाविष्ट झालेलें व्याज व नफा पूर्वीं झालेल्या भांडवली व्यवहारांतून उद्‌भवलेला असतो, हें सहज कळण्याजोगें आहे. हे भांडवली व्यवहार हे निरपेक्ष केव्हांहि नसतात. आज दिलेल्या कर्जामुळें व भांडवलगुंतवणीमुळें भावी काळांत

कांहीं तरी लभ्यांश मिळेल अशा अपेक्षा असते.[४] भांडवली अर्थव्यवहारांतून जे देणें अथवा जें येणें निर्माण होतें त्यांच्यातील तफावत ही **भांडवली व्यवहारांतील तफावत** होय. चालू व्यवहारांतील तफावत व भांडवली तफावत ह्यांचा एकत्र विचार केल्यास परराष्ट्रीय आर्थिकसंबंध तुटीचे आहेत, कीं बचतीचे आहेत कीं समतोल आहेत ह्याची कल्पना येते.

अनुकूल, प्रतिकूल व समतोलाचे आर्थिक व्यवहार:—आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांतील देण्याघेण्याचा हिशेब प्रचलित हुंडणावळीच्या दरानुसार केला जातो. ह्या हिशेबांत देणें-येणें नेहमींच समान होईल असा भरंवसा देतां येत नाहीं. जेव्हां देण्यापेक्षां येणें कमी असतें तेव्हां आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार प्रतिकूल म्हणजेच तुटीचे आहेत असें मानलें जातें. ह्या परिस्थितींतील तोल हा तुटीचा किंवा **प्रतिकूल तोल** होय. (Adverse or Unfavourable Balance of Payments). उलट देण्यापेक्षां येणें जेव्हां अधिक असते तेव्हां तो प्राप्तीचा किंवा **अनुकूल** तोल होय (Favourable Balance of Payments) ठरतो. जेव्हां देणें आणि येणें समान होतें तेव्हां आंतरराष्ट्रीय व्यवहारांचा समतोल (Equilibrium) होतो.[५]

शेवटीं समतोल होणें अपरिहार्य :—आन्तरराष्ट्रीय आर्थिक संबंधांत नेहमींच्या व्यापारी व भांडवली व्यवहारांतून उद्‌भवलेलें येणें देण्यापेक्षां अधिक किंवा कमी अशी परिस्थिति संभवनीय असली तरी शेवटीं देण्याघेण्याचा हिशेब समतोल होणें अपरिहार्यच असतें. मग नेहमीच्या व्यवहारांत येणें-देणें समान नसेल तर हें कसें होतें? ह्या प्रश्नाचें उत्तर असें कीं, (१) हुंडणावळीच्या ज्या दरामुळें येणें-देणें असमान होतें. तो दर बदलून येणें-देणें समान होतें. येणें-देणें समान व्हावें अशा प्रकारेंच हुंडणावळीचा दर बदलतो किंवा नेहमींच्या दरामुळें येण्या-देण्यांत निर्माण होणारा खड्डा पूर्तीचीं येणीं-देणी निर्माण करून भरावा लागतो. उदाहरणार्थ, एखाद्या देशाचें येणें देण्यापेक्षां कमी असेल तर त्या देशाला एकतर सुवर्णासारखी

---

[४] Capital transfers (are) payments made by way of loan or for the purchase of capital assets for which no current return in the form of an immediate import of goods and services is obtained but from which some future benefit is expected—**Meade.**

[५] A country's balance of payments is said to be favourable or in surplus when the total receipts from its exports etc. to the rest of the world exceed its total payments from its imports etc. from the rest of the world. Conversely its balance of payments is said to be unfavourable or in deficit if its receipts fall short of its payments. Its balance of payments may be said to be in equilibrium when its receipts are equal on account of its transactions with other countries—**Meade.**

सर्वमान्य वस्तु देऊन किंवा आपल्याजवळ जो परचलननिधि असेल त्यांतून जरूर ती रक्कम देऊन (स्टर्लिंग किंवा डॉलरसारखें जगन्मान्य चलन असेल तर सुवर्णाऐवजीं तें बहुधा स्वीकारलें जातें) येण्या-देण्यांतील खड्डा बुजवावा लागतो किंवा खड्डा बुजल एवढ्या रकमेचें कर्ज परदेशांकडून मिळवावें लागतें. म्हणजे देण्याएवढेंच येणें व्हावें म्हणून खास पूर्तीचें येणें निर्माण करून देणें-येणें समान करावें लागतें. देण्या-येण्याच्या ज्या बाबींमुळें आन्तरराष्ट्रीय देण्या-येण्यांत समानता येतें त्यांना पूर्तीच्या बाबी असें म्हणतां येईल.

वरील तक्त्यांतील ९,१० व ११ ह्या बाबी पाहिल्यास पूर्तीची येणीं देणीं कोणत्या स्वरूपाची असतात ह्याची कल्पना येईल. पूर्तीच्या बाबी आन्तरराष्ट्रीय आर्थिक व्यवहाराच्या ताळेबंदांत समाविष्ट केल्यास तो ताळेबंद समतोल झालाच पाहिजे. त्यामुळें जेव्हां आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्याचा ताळेबंद अनुकूल किंवा प्रतिकूल आहे असें म्हटलें जातें तेव्हां पूर्तीच्या बाबी वगळूनच तें विधान केलें जातें, हें लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे. पूर्तीच्या बाबींचें वैशिष्टच असें सांगतां येईल कीं, इतर बाबींमुळें ताळेबंदांत समतोल होऊं शकत नाहीं. ह्याच कारणाकरितां पूर्तीचीं देणीं उद्‌भवलेलीं असतात. पूर्तीचीं नसलेलीं जीं देणीं असतात तीं स्वतंत्र असतात. कारण ताळेबंदांतील इतर बाबींशीं त्यांचा कोणत्याहि प्रकारें संबंध नसतो.[६]

वरील तक्त्यांतील पहिल्या आठ बाबी स्वतंत्र आहेत. व उरलेल्या तीन पूर्तीच्या आहेत एकाच स्वरूपाचा आर्थिक व्यवहार कधीं स्वतंत्र असतो तर कधीं पूर्तीचा असतो. उदाहरणार्थ परराष्ट्रांकडून मिळणाऱ्या कर्जापैकीं कांहीं भाग स्वतंत्रपणें आला असेल तर कांहीं भाग देण्यायेण्याचा खड्डा बुजविण्यासाठीं मुद्दाम मिळविलेला असूं शकेल. सुवर्णाची आयात-निर्यात कांहीं प्रमाणांत व्यापारी स्वरूपांची असते तर कांहीं प्रमाणांत पूर्तीची असते. पूर्तीच्या येण्याचें किंवा देण्याचें आंतरराष्ट्रीय अर्थ-व्यवहारांच्या समतोलांत जें स्थान असतें तें लक्षांत घेऊन अनुकूल समतोल किंवा प्रतिकूल समतोल ह्या कल्पनांचा निश्चित अर्थ सांगतां येतो; एवढेंच काय पण आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहार संबंधित देशाला किती प्रमाणांत अनुकूल अथवा प्रतिकूल आहेत हें मांडतां येतें. जेव्हां आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत पूर्तीच्या येण्याची आवश्यकता असते तेव्हां आंतरराष्ट्रीय अर्थव्यहारांत तूट असते व पूर्तीच्या येण्याच्या एवढी ती रकमेनें असते. उलट जेव्हां आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत पूर्तीची देणीं असतात तेव्हां संबंधित देशाच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत वाढावा

[६] Accommodating payments––their distinguishing feature is that they have taken place only because the other items in the balance of payments are such as to leave a gap to be filled. On the other hand, the distinguishing feature of autonomous payments is that they take place regardless of the size of other items in the balance of payments—**Meade.**

असतो आणि तो पूर्तीची देणीं जेवढीं असतात तेवढा असतो.[७] पूर्तीच्या देण्या-येण्यांच्या अभावीं हुंडणावळीचा दर बदलावा लागतो.

आन्तरराष्ट्रीय देणीं-घेणीं आणि अन्तर्गत अर्थव्यवस्था :—कोणत्याहि देशाची **अन्तर्गत अर्थव्यवस्था** (Domestic Economy) व देशाचें बाहेरील जगावरोबरचे आर्थिक व्यवहार ह्यांचा संबंध काय असतो हें आतां पाहूं. कोणत्याहि देशांतील लोकांचा समस्त राष्ट्रीय खर्च (National Expenditure) त्या देशांतील उत्पादनासाठीं मागणी निर्माण करण्यास कारणीभूत होत असतो. ह्या खर्चांत आयातीं-वर होणारा खर्च अन्तर्भूत करणें योग्य नसतें. कारण हा खर्च राष्ट्रीय उत्पादनास मागणी निर्माण करीत नाहीं. म्हणून हा खर्च एकूण खर्चाच्या हिशेबांतून वगळावा लागतो. पण त्याचबरोबर इतर देशांतील लोकांनीं त्या देशांतील वस्तूंवर केलेला खर्च त्या देशांतल्या उत्पादनासाठीं मागणी करणारा असल्यामुळें एकंदर खर्चांत समाविष्ट करणें आवश्यक असतें. ह्या सर्व गोष्टी विचारांत घेऊन आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्यांचा राष्ट्रीय खर्चावर होणारा परिणाम सांगावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, ज्या देशांचे आन्तरराष्ट्रीय संबंध असतात त्यांचा एकंदर राष्ट्रीय खर्च, रहिवाशांचा एकंदर खर्च उणें आयातमूल्य अधिक निर्यातमूल्य एवढा असतो. थोडक्यांत कोणत्याहि देशाचें राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे राष्ट्रीय खर्च अधिक निर्यात उणें आयात होत. (Domestic Expenditure Less Imports Plus Exports= National Income) राष्ट्रीय उत्पन्न-खर्चावर आन्तरराष्ट्रीय व्यापाराचा परिणाम होत असल्यामुळें अन्तर्गत उत्पादनावर म्हणजेच पर्यायानें—हीच गोष्ट महत्त्वाची आहे—अन्तर्गत उत्पादन-साधनांच्या उपयोगावर परराष्ट्रीय व्यापाराचा परिणाम होणें अपरिहार्य आहे. परराष्ट्रीय व्यापाराचा व देशांतील रोजगारांचा घनिष्ठ संबंध असतो, ही गोष्ट आतां सर्वत्र मान्य केली जाते.[८]

परराष्ट्रीय व्यापाराचा अन्तर्गत उत्पादन रोजगारीशीं घनिष्ठ संबंध असल्या-मुळेंच तेजी व मंदी ह्यांना निसर्गतः सांसर्गिक स्वरूप प्राप्त होतें. उदाहरणार्थ, कोणत्याहि देशांत मोठ्या प्रमाणावर मंदी असेल तर त्या देशांतील लोकांचीं उत्पन्नें कमी होतात. त्यामुळें आयातीवरील खर्चहि कमी होतो. त्यामुळें इतर देशांतील निर्यातीसाठीं मागणी कमी होते. इतर देशांतील निर्यात वस्तूंच्या उत्पा-दनांत गुंतलेल्यांचीं उत्पन्नें कमी होतात आणि तेजीमंदी चक्रावरील प्रकरणांत ज्यांचें वर्णन केलें ते गुणक व स्वयंवृद्धि परिणाम कार्यान्वित होऊन अन्तर्गत वस्तूंच्या

[७] A deficit is measured by the actual amount of accommodating finance required over a given period of time as credits, a surplus as the amount of accommodating finance which must be disbursed as debits—**Scammell.**

[८] There is today a general recognition of the vital relation between domestic employment and International Trade.

उत्पादनास मंदीची बाधा होते. सारांश, आयात कमी झाल्यामुळें एका देशांतील मंदी सर्वत्र पसरते.[१] हें विवेचन अर्थातच सर्वसाधारण व स्थूल स्वरूपाचें आहे. अधिक तपशिलांत जावयाचें झाल्यास ज्या देशांत प्रथम मंदी येते त्या देशांतील लोकांचा आयातीवरील खर्च किती प्रमाणांत कमी होतो हें पाहिलें पाहिजे. शिवाय आयातीवरील खर्चांतील कपात सर्व देशांवर विभागली जाते. त्यामुळें विशिष्ट देशाच्या वांट्यास किती कपात येते हेंहि पाहावें लागतें. तसेंच ज्या देशासंबंधीं विचार करावयाचा असेल त्या देशाच्या अन्तर्गत उत्पादनांत निर्यात वस्तूंच्या उत्पादनांचें स्थान व महत्त्व काय असतें हेंहि पाहिलें पाहिजे. ते अत्यल्प असल्यास अन्तर्गत उत्पादनावर फार मोठा परिणाम होण्याचें कारण नाहीं. इतकें खोलांत जाऊन विवेचन करणें हें ह्या ग्रंथाच्या मर्यादेबाहेरचें आहे; पण जगाचा आतांपर्यंतचा अनुभव पाहतां असें निश्चित म्हणण्यास हरकत नाहीं कीं, एखाद्या महत्त्वाच्या देशांत मंदी सुरू झाली कीं तिचे परिणाम बहुधा सर्व जगाला भोंवतात. तसेंच दोन-चार देश ह्या मंदीच्या वेटोळ्यांत सांपडले कीं, इतरांना सुटकेचा मार्गच राहत नाहीं. कारण मग होणारा परिणाम मोठाच होतो. १९२९ च्या महामंदीस अमेरिकेंत सुरुवात होऊन ती जगभर कशी पसरली हा इतिहास अजूनहि ताजा आहे.

तेजीहि सांसर्गिक :—ज मंदीबाबत खरें आहे तेंच तेजीबाबतहि खरें आहे. एका देशांतील मंदी आयात कमी झाल्यामुळें इतर देशांत पसरतें आणि एका देशांतील तेजी नेमक्या उलट्या कारणामुळें म्हणजे त्या देशांत आयात वाढल्यामुळें इतर देशांत पसरते. त्या देशाची आयात-वाढ म्हणजे इतर देशांची निर्यात-वाढ हें स्पष्ट आहे. त्यामुळें निर्यात वस्तूंचें उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांत प्रथम भरभराटीस सुरुवात होते आणि मग तीच भरभराट इतर देशांच्या ऊर्जितावस्थेस —त्यांना संजीवनी देण्यास—कारणीभूत होते.

प्रस्तुत संदर्भांतच परदेशांकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या केल्या जाणाऱ्या भांडवल-गुंतवणीचा उल्लेख करणें अयोग्य होणार नाहीं. त्यामुळें देशांतील एकंदर भांडवल-गुंतवण वाढल्यास राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर ह्या घटनेचे परिणाम उत्तेजक स्वरूपाचेच होतात. तसेंच परराष्ट्रीय भांडवल-गुंतवणींत कपात झाल्यामुळें एकंदर भांडवल-गुंतवण कमी झाल्यास ही घटना देशांत मंदीचें वातावरण निर्माण करण्यास कारणीभूत होते. ह्या गोष्टीचा येथें अधिक विस्तारानें विचार करण्याचें कारण नाहीं. तेजीमंदी चक्रासंबंधीच्या प्रकरणांत भांडवल-गुंतवणींत फरक पडल्यामुळें जे परिणाम होतात म्हणून सांगितलें आहे तेच परिणाम येथें लागू पडतात. वाढलेल्या

[१] Depression in one country is transferred to other countries having trade relations with that country through a resulting decrease in the letters' imports. The income and employment of other countries contracts sharply via the backward operation of the multiplier.

अगर कमी झालेल्या भांडवल-गुंतवणीच्या परिणामांचा विचार करतांना भांडवल-गुंतवण परदेशीयांनीं केली आहे कीं स्वदेशीयांनीं केली आहे, हा विचार अप्रस्तुत आहे. दोहोंचेंहि उत्पादन-रोजगारावर होणारे परिणाम सारखेच होतात. तरीहि स्वदेशीय भांडवल-गुंतवण व परदेशीय भांडवल-गुंतवण ह्यांत फरक केला जातो. ह्याचें एक अतिशय महत्त्वाचें कारण आहे तें असें कीं, परदेशांकडून आज होणाऱ्या भांडवल-गुंतवणीचा परिणाम भावी काळांतील आर्थिक व्यवहारांवर होतो. परदेशी भांडवल आज येथें गुंतलें कीं, कालान्तरानें त्यावरील नफा परदेशीं पाठवावा लागतो. कर्ज काढलेलें असल्यास व्याज द्यावें लागतें व कर्जफेडहि करावी लागते. ह्या सर्व गोष्टींमुळेंच भावी काळांतील व्यवहारावर परिणाम होतात. ह्या सर्व परिणामांचा व त्यांतून उद्भवणाऱ्या प्रश्नांचा ऊहापोह येथें करावयाचा झाल्यास प्रस्तुत प्रकरणांतील विषयाचा फारच विस्तार करावा लागेल. तो येथें करण्याचें कारण दिसत नाहीं. आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार व अन्तर्गत अर्थव्यवस्था परस्परावलंबी असतात, एवढाच मुद्दा येथें प्रामुख्यानें मांडावयाचा आहे. त्यासाठीं एवढें विवेचन पुरेसें होईल असें वाटतें.

: १२ :

हुंडणावळीचा दर
(THE RATE OF EXCHANGE)

हुंडणावळीचा दर (Rate of Exchange) :—हुंडणावळीचा दर कसा ठरतो, ह्याचा विचार करतांना एक गोष्ट नेहमींच लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, हुंडणावळीचा दर ही एक किंमत असते. आपल्या देशांतील चलनाची परदेशांतील चलनांत जी किंमत केली जाते किंवा परदेशांतील चलनाची आपल्या देशांतील चलनांत जी किंमत केली जाते ती किंमत म्हणजेच हुंडणावळींचा दर होय. आपल्या चलनाची परदेशी चलनांत किंमत व परदेशी चलनाची आपल्या चलनांत किंमत ह्या एकाच गोष्टीच्या उलटसुलट बाजू होत, हेंहि पक्के लक्षांत घेतलें पाहिजे. असें असल्यामुळेंच जेव्हां एका देशांतील पैशाचें बाह्य मूल्य वाढतें तेव्हां दुसऱ्या देशांतील पैशाचें बाह्य मूल्य आपोआपच आणि त्याच प्रमाणांत कमी होतें. ह्याच न्यायानें परदेशी चलनाचें मूल्य वाढणें म्हणजे आपल्या देशांतील चलनाचें मूल्य कमी होणें होय. उदाहरणानें ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल. जेव्हां १ रु. = १८ पेन्स असा हुंडणावळीचा दर आहे असें आपण म्हणतों तेव्हां त्याचा अर्थ १ रुपयाची किंमत १८ पेन्स आहे किंवा १८ पेन्सची किंमत एक रुपया आहे असाच त्याचा अर्थ होतो. **हुंडणावळीचा दर म्हणजे दोन देशांतील चलनांचा परस्पर संबंध** होय असें

म्हटलें तरी चालेल. १ रु. = १८ पेन्स हा दर जेव्हां १ रु. = २४ पेन्स होतो तेव्हां रुपयाचें बाहेरील मूल्य वाढलें. कारण एका रुपयाला अधिक प्रमाणांत परकीय चलन मिळवितां येऊं लागलें असें म्हणावें लागेल. ह्याच वेळीं परदेशी चलनाचें रुपयांतील मूल्य कमी होतें. कारण १ रु. मिळविण्याकरितां अधिक परदेशी चलन खर्च करावें लागतें. उलट १ रु.=१२ पेन्स असा जेव्हां हुंडणावळीचा दर ठरतो तेव्हां रुपयाचें बाह्यमूल्य कमी झालें असें म्हणतां येईल. कारण एक रुपयाच्या मोबदल्यांत मिळणारें परकीय चलन पूर्वीपेक्षां कमी असतें. ह्याचमुळें परदेशी चलनाचें बाह्यमूल्य वाढतें कारण तेवढ्याच परकीय चलनाच्या मोबदल्यांत भारतीय चलन पूर्वीपेक्षां अधिक मिळतें.

हुंडणावळीचा दर हा खरें म्हणजे दोन चलनांतील परस्परसंबंध आहे; पण सोयीसाठीं स्वदेशाचाच विचार करून **हुंडणावळीचा दर म्हणजे परचलनाची स्वचलनांत केलेली किंमत**[1] अशी व्याख्या करण्यांत येते. वरील उदाहरणांत १ रु. = १८ पेन्स हा दर असतां त्या दरानें १८ पेन्स एवढें चलन मिळविण्याकरितां १ रु. खर्च करावा लागतो ही गोष्ट व्यक्त होते. तेवढ्याच परकी चलनांकरितां दोन रुपये खर्च करावे लागतात अशी परिस्थिति निर्माण झाल्यास म्हणजे १ रु. = ९ पेन्स असें ठरल्यास परदेशी चलनाची किमत वाढते आणि आपल्या चलनाचें बाह्य मूल्य कमी होतें. उलट १ रु. = २४ पेन्स अशी स्थिति झाल्यास परदेशी चलनाची किंमत कमी होऊन आपल्या चलनाचें मूल्य वाढतें हें सहज समजेल.

हुंडणावळीचा व्यावहारिक दर (Market Rate of Exchange) :— हुंडणावळीचा दर म्हणजे परदेशी चलनाची आपल्या देशांतील चलनांत व्यक्त केलेली किंमत. हें मनांत पक्कें ठसवून घेतलें म्हणजे हुंडणावळीचा दर कसा ठरतो, ह्यासंबंधीं विवेचन कठिण होत नाहीं. कारण हुंडणावळीचा दर ही एक किंमत असल्यानें इतर किंमतींप्रमाणेंच ती **हुंडणावळीच्या बाजारांत** (Foreign Exchange Market) ठरते व त्या बाजारावर किंवा बाजारांत ठरणाऱ्या किंमतीवर कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण नसल्यास हुंडणावळीचा दर त्या त्या वेळच्या **मागणी-पुरवठ्याच्या परिस्थितीनुसार ठरतो.** ह्या गोष्टी ओघानेंच घेतात. मुक्त असलेल्या **हुंडणावळीचा दर परदेशी चलनाकरितां असलेली मागणी** व **परदेशी चलनाचा पुरवठा समान होईल अशा पातळीवर निश्चित होतो,**[2] असें म्हटल्यास त्यांत चूक होणार नाहीं.

ह्या विधानाचा नेमका अर्थ समजण्यासाठीं परदेशी चलनाची मागणी व परदेशी चलनाचा पुरवठा म्हणजे काय, ह्याचा मात्र खुलासा केला पाहिजे. परराष्ट्रीय व्यवहारांत देणीं परदेशी चलनांत द्यावीं लागतात. म्हणून त्या देण्यांमुळें परदेशी चलना-

[1] Ratio of Exchange is the price of the foreign currency expressed in terms of the national currency.

[2] A free exchange rate tends to be such as to equate the demand for and supply of foreign exchange.

करितां मागणी निर्माण होते. परराष्ट्रीय व्यवहारांतील येणीं आपल्या चलनांत मिळावयाचीं असतात. आपलें चलन मिळावें म्हणून परराष्ट्रीय चलन देऊं केलें जातें. साहजिकच येण्यामुळें परराष्ट्रीय चलनाचा पुरवठा निर्माण होतो.

समतोलक दर :—कोणत्याहि वेळीं ज्या दरामुळें मागणी-पुरवठा समान होईल तो दर हा त्या वेळचा समतोल-दर होय. उदाहरणार्थ येणें १० हजार रुपयांचें व देणें १० हजार शिलिंगाचें अशी स्थिति असतां १ रु. = १ शिलिंग हा **समतोल दर** (Equlibrium Rate) होईल. कारण ह्या दरामुळें परराष्ट्रीय चलनाची मागणी व पुरवठा हीं दोन्हीं १० हजार शिलिंग होतात. आन्तरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार बदलशील असल्यानें परदेशी चलनाच्या मागणी-पुरवठ्याच्या परिस्थितींत सतत बदल होत असतात. त्यामुळें बाजारपेठ कोणत्याहि प्रकारच्या बाह्य हस्तक्षेपापासून मुक्त असल्यास हुंडणावळीचा दर बदलता राहणें क्रमप्राप्त होईल. वरील उदाहरणांतील १० हजार ही रुपयांकरितां मागणी कायम राहून——म्हणजेच परदेशी चलनाचा पुरवठा १० हजार शिलिंग राहून——परदेशी चलनासाठीं मागणी २० हजार शिलिंग झाल्यास मागणीपेक्षां पुरवठा कमी पडून परदेशी चलनाची किंमत वाढेल. ह्या परिस्थितींत १ रु. = ६ पेन्स असा नवा दर ठरेल. म्हणजेच शिलिंगाची किंमत दोन रुपये होईल. उलट बाजूनें परदेशी चलनाकरितां आलेली मागणी कायम राहून आपल्या चलनाकरितां असलेली मागणो—म्हणजेच पर्यायानें परदेशी चलनाचा पुरवठा वाढल्यास परदेशी चलनाची किंमत——कमी होईल हें सहज दाखवितां येईल. वरील उदाहरणांत परकीयांना आपलीं देणीं भागविण्यासाठीं २० हजार रुपये लागूं लागले तर २० हजार शिलिंगांचा पुरवठा होईल; पण मागणी मात्र १० हजार शिलिंगच राहिल्यास शिलिंगांची किंमत निम्मी होईल.

हुंडणावळीचा प्रमाणभूत दर :——हुंडणावळीच्या अनिर्बंध बाजारपेठेंत मागणी-पुरवठ्याच्या परिस्थितीमुळें हुंडणावळीचा दर बदलता रहाणें अपरिहार्य असलें तरी त्या बदलांना योग्य मर्यादेंत राखणारा एखादा प्रमाणभूत (Normal or Standard) हुंडणावळीचा दर असतो काय हा प्रश्न उपस्थित करण्याजोगा आहे. इतर वस्तूंच्या किंमती ठरण्याच्या प्रक्रिया व हुंडणावळीचा दर ठरण्याची प्रक्रिया सारखीच असते, असें वर सांगितल्यामुळेंच हा प्रश्न उपस्थित होतो. कारण इतर वस्तूंच्या किमतींत मुक्त बाजारपेठेंत उत्पादनखर्च ही एक प्रमाणभूत पातळी असते. त्यामुळें उत्पादनखर्चाच्या आगेंमागें किंमत सरकली कीं, लगेच बाजारांत असे प्रवाह वाहूं लागतात कीं, ज्या योगें किंमत उत्पादनखर्चाच्या पातळीकडे झुकावी. ह्या माहितीमुळें हुंडणावळीच्या दराबाबत अशी पातळी असते काय, हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो.

ह्या प्रश्नाचें उत्तर असें देतां येईल कीं, आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण व्यवस्थेंत प्रमाणभूत असा एक हुंडणावळीचा दर असतो. त्या दराहून बाजारपेठेंतील दर

भिन्न झाल्यास अर्थव्यवस्थेचीं चक्रें आपोआपच अशींच फिरतात कीं, प्रमाणभूत दर व बाजारपेठेचा दर ह्यांतील तफावत नष्ट होण्यास मदत होते.

सुवर्णपरिमाणामुळें हुंडणावळींच्या दरांत स्थैर्य कसें येतें ? :––आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण अस्तित्वांत असल्यास संबंधित देशांना पुढील तीन नियम पाळावेच लागतात. (१) मध्यवर्ती बँकेनें चलनाचें मूल्य सुवर्णांत ठरविलें पाहिजे व त्या मूल्यानुसार सुवर्णाची खरेदी-विक्री करण्यास केव्हांहि तयार असलें पाहिजे. (२) मध्यवर्ती बँकेनें चलन-निर्मिति आपल्याकडील सुवर्णसांठ्यांवर अवलंबून ठेवली पाहिजे. सुवर्णसांठा वाढला व कमी झाला कीं, अनुक्रमें तिनें चलन-निर्मिति व चलन-संकोच केलाच पाहिजे. (३) मध्यवर्ती बँकेनें सुवर्णांच्या आयात-निर्यातीवर कोणत्याहि प्रकारचे निर्बंध घालतां कामा नये. ह्या तीन नियमांचें पालन सुवर्ण-परिमाणांवरील देशांनीं केल्यास हुंडणावळीचा प्रमाणभूत दर ठरतो व त्या दरांपेक्षां भिन्न असा दर बाजारांत फार काळ टिकूं शकत नसल्यामुळें हुंडणावळीच्या दराबाबत निश्चितता व स्थैर्य येतें.[3] कसें तें खालीं दाखविलें आहे.

(१) पहिल्या नियमाप्रमाणें दोन देशांतील—विवेचनाच्या सोयीसाठीं दोनच देश घेतले आहेत—चलनाचें मूल्य सुवर्णांत निश्चित झालें––म्हणजेच निराळ्या शब्दांत सुवर्णाची किंमत त्या देशाच्या चलनांत ठरली गेली––कीं, त्या दोन देशांतील चलनाचा परस्परसंबंध आपोआपच ठरतो. उदाहरणार्थ, एक तोळा सोन्याची अधिकृत किंमत ब्रिटनमध्यें ५० शिलिंग व भारतांत ५० रुपये असली म्हणजे १ रु. = १ शिलिंग हा संबंध आपोआप ठरतो व त्यामुळें तो प्रमाणभूत हुंडणावळीचा दर होतो.

(२) ह्या दरापेक्षां भिन्न असा दर बाजारांत ठरल्यास एका देशाकडून सुवर्णाची आयात-निर्यात अपरिहार्यपणें सुरू होते. उदाहरणार्थ, १ रु. = २ शिलिंग असा दर बाजारांत ठरल्यास —

(अ) भारतीयांचे दृष्टीनें परदेशांत सोनें खरेदी करणें स्वस्त होईल. आणि भारतांत सोन्याची आयात व इंग्लंडमधून सोन्याची निर्यात सुरूं होईल.

(आ) ब्रिटिश देणेकऱ्यांना भारतीयांचीं देणीं ब्रिटिश चलनांत देण्याऐवजीं मध्यवर्ती बँकेकडून सुवर्ण घेऊन सुवर्णांत तीं देणें स्वस्त होऊं लागेल. त्यामुळेंहि भारतांत सोन्याची आयात व ब्रिटनमधून निर्यात होईल. नियम तीनप्रमाणें ही आयात-निर्यात अनिर्बंध व्हावी लागेल.

(इ) वरीलप्रमाणें आयात-निर्यात झाल्यास नियम दोनप्रमाणें ब्रिटनला चलन-निर्मिति कमी करावी लागेल व भारतांत ती वाढवावी लागेल. त्यामुळें भारतांतील किंमती वाढून व इंग्लंडमधील किंमती कमी होऊन ब्रिटिश माला-

[3] These three rules are sufficient to ensure the stability of exchange rates between the currencies of the countries on gold standard.

करितां व पर्यायानें ब्रिटिश चलनाकरितां मागणी वाढेल व उलट भारतीय चलनाची मागणी कमी होईल. तसें झाल्यास बाजारांतील दर बदलावा लागेल. अशाच प्रकारचें विवेचन करून रुपयाचें बाह्यमूल्य कमी झाल्यास आपोआप वाहूं लागणाऱ्या प्रवाहामुळें ती कमी होईल हें सिद्ध करतां येईल. प्रमाणभूत दराप्रमाणेंच हुंडणावळीचा दर असल्यास सुवर्णाची आयात-निर्यात होणार नाहीं. इतर कोणत्याहि दरामुळें ती होईल. तेव्हां इतर कोणताहि दर बाजारांत फार काळ टिकणार नाहीं. अशा प्रकारें दोन देशांच्या सुवर्णातील किंमतीमुळें ठरणारा दरच एकमेव समतोलाचा दर होतो. म्हणूनच त्या दराला प्रमाणभूत दर म्हणतां येईल.[४]

समक्रयशक्ति सिद्धान्त (Purchasing Power Parity Theory) :—शासित चलनव्यवस्थेंतील हुंडणावळीच्या दरासंबंधीचा समक्रयशक्ति सिद्धान्त विशेष प्रसिद्ध आहे. हा सिद्धान्त असें सांगतो कीं, **हुंडणावळीच्या ज्या दरामुळें दोन्ही देशांतील चलनाची क्रयशक्ति समान होते तो दर हा प्रमाणभूत मानावा लागतो.** कारण असें दाखवितां येते कीं, अशा दराहून भिन्न असा दर हुंडणावळीच्या बाजारपेठेंत तात्पुरता प्रस्थापित झाला तर तो फार काळ टिकूं शकत नाहीं. त्या दरामुळेंच बाजारपेठेंत मागणी-पुरवठ्यांत बदल करणारे प्रवाह आपोआप उद्‌भवून तो दर बदलतो. नव्हे तो बदलणें अटळ आहे. ज्या दरामुळें दोन्ही देशांतील चलनाची क्रयशक्ति सारखी होते. एक पायरी पुढें जाऊन असेंहि म्हणतां येईल कीं, ज्या दरामुळें कोणत्याहि देशांतील चलनाची अंतर्गत व बाह्य क्रयशक्ति समान होते तोच दर आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांत कायम स्वरूपाचा समतोल प्रस्थापित करूं शकतो. समक्रयशक्ति सिद्धान्त हा थोडक्यांत

---

[४] The sequence of events leading to equilibrium is shown below :—

	Deficit Country	Surplus Country
(1)	An excess of debits over credits.	An excess of credits over debits.
(2)	Gold outflow.	Gold inflow.
(3)	A decrease in gold reserves to support internal currency.	An increase in gold reserves to support internal currency.
(4)	Credit contraction.	Credit expansion.
(5)	A deflation of domestic prices, money incomes, money costs and employment.	An inflation of domestic prices, money incomes, money costs and employment.
(6)	A fall in imports and a rise in exports.	A fall in exports and a rise in imports.
(7)	Equilibrium in the balance of payments.	Equilibrium in the balance of payments.

असा आहे. क्रयशक्ति समान करणारा दर कायम स्वरूपाचा असतो ह्याचा अर्थ तो कधींच बदलत नाहीं असा नव्हे. क्रयशक्तीवर तो अवलंबून असल्यानें संबंधित देशांतील अंतर्गत किंमतीमान बदलून चलनाची क्रयशक्ति बदलली कीं, हुंडणावळीचा दर बदलतो. ह्या सिद्धान्ताचा आशय एवढाच कीं, देशोदेशांतील चलनाच्या अंतर्गत क्रयशक्तीनुसार ठरणारा एक प्रमाणभूत दर असतो. बाजारांतील दराचा कल ह्या प्रमाणभूत दराकडे आकृष्ट होण्याचा असतो.

समक्रयशक्ति सिद्धान्ताचें अधिक स्पष्टीकरण :—समक्रयशक्ति सिद्धान्त हा अर्थशास्त्रांतील एक महत्त्वाच्या सिद्धान्तांपैकीं असल्यामुळें त्याचें अधिक स्पष्टीकरण केलें पाहिजे. समजा १ शिलिंग खर्च करून इंग्लंडमध्यें वस्तूंचें कांहीं एक प्रमाण खरेदी करतां येते, अमुक एवढा गहूं अमुक एवढें कापड किंवा अमुक गहूं, अमुक कापड, अमुक सिमेंट वगैरे आणि तेवढेंच प्रमाण खरेदी करण्यास भारतांत १ रु. खर्च करावा लागतो. ह्या परिस्थितींत १ रु. = १ शिलिंग हा हुंडणावळीचा दर समक्रयशक्ति दर्शविणारा आहे. ह्या ठिकाणीं समक्रयशक्ति सिद्धान्ताच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें असें कीं, ह्या दरापेक्षां भिन्न असा दर बाजारपेठेंत टिकाऊ होणें अशक्य आहे. उदाहरणार्थ, १ रु. = २ शिलिंग हा दर बाजारांत टिकावयाचा नाहीं. कारण हा दर मागणी-पुरवठ्याच्या तात्पुरत्या परिस्थितीमुळें प्रस्थापित झालाच तर ह्या दरामुळें भारतांतील ग्राहकांना इंग्लंडमध्यें खरेदी करणें अधिक फायद्याचें ठरेल. १ रु. खर्च करून इंग्लंडमध्यें त्यांना भारताच्या दुप्पट माल मिळूं शकेल. साहजिकच इंग्लिश मालाला व पर्यायानें इंग्लिश चलनाला भारताची मागणी वाढेल. उलट त्याच कारणामुळें भारतांतील माल इंग्लिश लोकांना महाग वाटेल. भारतीय मालां. साठीं आणि पर्यायानें चलनासाठीं मागणी कमी होईल. निराळ्या शब्दांत १ रु. = २ शिलिंग ह्या दरामुळें परदेशी चलनाची मागणी वाढून पुरवठा कमी होईल. साहजिकच परदेशी चलनाचें कमी झालेलें मूल्य वाढेल व भारतीय चलनाचें मूल्य कमी होईल. उलट प्रकार १ रु. = ६ पेन्स असा दर बाजारांत ठरल्यास होईल. त्या दरामुळें भारतीय मालाला व भारतीय चलनाला मागणी वाढेल व परदेशी चलनाची मागणी कमी होईल व भारताच्या चलनाचें कमी झालेलें मूल्य वाढेल. मात्र १ रु. = २ शिलिंग हा क्रयशक्ति समान करणारा हुंडणावळीचा दर प्रस्थापित झाल्यास तो बदलण्याचें कारण पडणार नाहीं.

तौलनिक क्रयशक्ति बदलली कीं हुंडणावळीचा दर बदलणें अपरिहार्य :— समक्रय शक्ति सिद्धान्तांत आणखी एक गोष्ट अभिप्रेत आहे. ती अशी कीं, जेव्हां जेव्हां अंतर्गत किंमतीमानांत बदल झाल्यामुळें संबंधित देशांपैकीं एका अगर दोन्ही देशांतील चलनाची क्रयशक्ति बदलते तेव्हां हुंडणावळीचा बदलांत बदल करणें क्रमप्राप्त ठरतें. कारण नव्या परिस्थितींत जुना दर टिकून राहणें कठिण असतें. उदाहरणार्थ, १ रु. = १ शिलिंग हा जुना दर आहे असें समजूं, हा दर असतां इंग्लंडमधील किंमतींत दुप्पटीनें व भारतांतील किंमतींत चौपटीनें वाढ झाली म्हणजे

भारतांतील किमतींतील निर्देशांक ४०० व इंग्लंडमधील दोनशें झाला असेंहि समजूं. किमतीमानांतील हा बदल झाल्यामुळें नव्या परिस्थितींत जुना दर चालणार नाहीं. नवा दर ठरावा लागेल. तो कोणता ? इंग्लंडमधील व भारतांतील दोन्ही किमती दुप्पटीनें वाढल्या असत्या तर १ रु. = १ शिलिंग हा दर योग्य ठरला असता. पण भारतांतील किमतीमान अधिक वाढल्यानें भारताच्या चलनाचें अंतर्गत मूल्य अधिक कमी झालें आहे. ही गोष्ट नव्या दरांत व्यक्त व्हावयाची असेल तर रुपयाच्या रूपान्तरांत १ रु. पेक्षां कमी रक्कम मिळाली पाहिजे. ती किती कमी होईल, हें खालील समीकरणांत सांगितलें आहे.

$$\text{हुंडणावळीचा दर} = \text{परकीय चलनाची मूळ किंमत} \times \frac{\text{अंतर्गत निर्देशांक}}{\text{परदेशी निर्देशांक}}$$

म्हणजेच वरील उदाहरणांत नवा दर $= १ \text{ रु.} \times \frac{४००}{२००} =$ म्हणजे २ रु.

म्हणजे २ रुपये ही शिलिंगाची किंमत झाली पाहिजे किंवा १ रु. = ६ d (पेन्स) असा दर ठरला पाहिजे.

वर सांगितलेला बदल न झाल्यास काय होईल ? तो बदल न होणें ह्याचा अर्थ असा होईल कीं, रुपया वस्तुतः ६ पेन्सच्या लायकीचा असूनहि बाजारांत त्याच्या मोबदल्यांत १२ पेन्स मिळत असल्यामुळें इंग्लंडमधील मालाकरितां भारतीयांची मागणी वाढेल व उलट बाजूनें भारतीय मालाकरितां मागणी कमी होईल. अर्थात हा दर टिकणारा नाहीं कारण हा दर रुपयाचें **अतिमूल्यन** (Over Valuation) करणारा आहे. ह्याच न्यायानें जुना दर रुपयाचें **अधोमूल्यन** (Undervaluation) करणारा असेल तर तोहि टिकणारा नाहीं. **जेव्हां किंमतीमानांत बदल झाल्यामुळें दोन देशांतील चलनांची अन्तर्गत क्रयशक्ति बदलते तेव्हां त्या अनुरोधानें हुंडणावळीचा दर बदललाच पाहिजे.** हा समक्रयशक्ति सिद्धान्ताचा खरा गाभा आहे.[५]

समक्रयशक्ति सिद्धान्ताचा अपुरेपणा :—समक्रयशक्ति सिद्धान्तावर अनेक आक्षेप घेतले जातात. त्यांतील दोनच मूलभूत महत्त्वाचे आहेत. त्यांतील पहिला असा कीं, आयातनिर्यातीला जी मागणी असते तिच्या लवचिकतेच्या प्रश्नाची पुरेशी दखल ह्या सिद्धान्तांत घेतलेली नाहीं. एखाद्या देशाच्या चलनाचें प्रचलित दरामुळें अतिमूल्यन झाल्यास निर्यात वाढून आयात कमी होईल आणि त्यामुळें हुंडणावळीचा दर क्रयशक्तीच्या पातळीवर येईल असें हा सिद्धान्त सांगतो. पण परदेशी चलनाचें मूल्य वाढलें म्हणजेच परदेशी वस्तूंची किंमत आपल्या दृष्टीनें वाढली तर आयात कमी होईलच किंवा निर्यात वाढेलच अशी ग्वाही देतां येत नाहीं. कारण आयात कमी होईल किंवा नाहीं, झाल्यास किती कमी होईल, हें आयातीच्या लवचिकपणावर अवलंबून असतें. जेवढी आयात कमी लवचिक तेवढी ती कमी प्रमाणांत कमी होईल. हेंच निर्यातीबाबत म्हणतां येतें. निर्यातीचें मूल्य परकीयाच्या दृष्टीनें कमी झालें म्हणजे निर्यात वाढून हुंडणावळीच्या दरावर समक्रयशक्ति

सिद्धान्ताला पोषक असा परिणाम होईल, असा निखालस निर्वाळा देतां येईलच असें नाहीं. निर्यातीकरितां मागणी जेवढी कमी लवचिक तेवढा हा परिणाम कमी होईल.

समक्रयशक्ति सिद्धान्तावरचा दुसरा मूलभूत आक्षेप असा कीं, आजकाल परदेशी चलनाकरितां जी मागणी असते त्यांतील बराच भाग भांडवली व्यवहारांतून उद्भवलेला असतो. ह्या व्यवहारांचा चलनाच्या क्रयशक्तीशीं संबंध नसल्यामुळें हुंडणावळीचा दर समक्रयशक्तिदर्शक नसला तरी त्यामुळें ह्या व्यवहारांत फरक पडत नाहीं. समक्रयशक्तिदर्शक हुंडणावळीचा दर नसण्याचा परिणाम झालाच तर फक्त परराष्ट्रीय व्यापारावर होतो. हा परिणाम एकंदर देण्याघेण्याच्या मानानें अल्प असला तर हुंडणावळीचा दर बदलेलच असें सांगतां यावयाचें नाहीं. सारांश, समक्रयशक्तिदर्शक नसलेल्या हुंडणावळीचा दर टिकूं शकतो. मागणीचा लवचिकपणा व भांडवली व्यवहारांचें महत्त्व ह्यांची दखल न घेणें हे समक्रयशक्ति सिद्धान्तांतील मूलभूत दोष आहेत.[६]

इतर आक्षेप :—इतरहि कांहीं आक्षेप ह्या सिद्धान्तावर घेतां येतात. पण तुलनेनें ते कमी महत्त्वाचे आहेत. उदाहरणार्थ, जी क्रयशक्ति समान होते असें हा

[५] Exchange rates tend under such a system to be determined by the relative purchasing power parities of different currencies in different countries—**Kurihara.**

According to this theory, the equilibrium rate of exchange between two currencies is that rate which creates equality in their purchasing power. A foreign currency is demanded because of its purchasing power in another country. If the rate of exchange is such that the same amount of money gives greater purchasing power outside the country than at home, the foreign currency is undervalued and pressure to obtain it to take advantage of its greater purchasing power forces the rate upwards. Conversely, if the rate is such that with a given sum more goods can be obtained at home than abroad the foreign currency is overvalued and a low demand for it will cause the exchange rate to fall "The equilibrium level for the rate will be such as will provide no incentive to the nationals of either country to exchange their currencies and import goods from the other rather than obtain exactly similar goods at home. Trade will then be limited to goods in which the one or the other country has a cost advantage—**Scammell.**

[६] Keynes suggested two basic defects of the parity theory viz. (a) its failure to take into consideration the elasticities of the reciprocal demand and (b) its failure to consider the influence of capital movements.

सिद्धान्त सांगतो ती नेमकी कोणती हें विचारतां येईल. सामान्यतः चलनाच्या क्रयशक्तीचें मापन करतांना सर्व महत्त्वाच्या वस्तु घेतल्या जातात. पण त्यांत ज्या वस्तूंचा आंतरराष्ट्रीय व्यापाराशीं संबंध नाहीं अशा वस्तूंचा भरणा मोठा असला तर हुंडणावळीच्या दरानें क्रयशक्ति समान होते असें म्हणणें निरर्थक होतें. कारण ज्या क्रयशक्तीचा हुंडणावळीच्या दराशीं संबंध येत नाहीं तिचा विचार करून काय उपयोग ? ही अडचण निवारण्यासाठीं आंतरराष्ट्रीय व्यापारांत समाविष्ट होणाऱ्या वस्तु घेऊनच स्वतंत्र निर्देशांक करून त्याला समक्रयशक्ति सिद्धान्त लागू करावा लागेल. तसें केल्यास हा सिद्धान्त एवढेंच सांगतो असें म्हणतां येईल कीं, आंतरराष्ट्रीय व्यापारांत समाविष्ट होणाऱ्या वस्तूंची किंमत सर्वत्र सारखी पाहिजे. पण असें म्हणण्यांत ह्या सिद्धान्तानें नवीन असें काय साधलें ? बाजारपेठ जेव्हां एक असते तेव्हां किंमती सारख्या होतात, हें अर्थशास्त्रांतील अगदीं सनातन तत्त्व आहे.[७]

बद्ध हुंडणावळीचा दर:—आतांपर्यंतच्या विवेचनाचा आशय असा कीं, सध्यांच्या चलन-व्यवस्थेंत प्रमाणभूत असा दर आहे असें म्हणतां येणार नाहीं. खास असे प्रयत्न विशिष्ट दर टिकविण्याकरितां केले नाहींत तर आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्यांच्या परिस्थितीनुसार दरांत वारंवार बदल होणें अपरिहार्य आहे. मग आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याची स्थिति बदलण्यास कांहींहि कारण झालेलें असो. कधीं दरांत बदल व्यापारी व्यवहारामुळें होईल तर कधीं भांडवली व्यवहारामुळें होईल. त्यांतहि कधीं हुंडणावळीचा दर निर्यातीच्या मागणींत बदल झाल्यामुळें होऊं शकेल तर कधीं आयातींत बदल झाल्यामुळें किंवा परदेशी लोकांनीं आपल्या बँकेंत ठेवलेला पैसा एकदम काढून घेतल्यामुळें (अथवा अधिक ठेवल्यामुळें) होऊं शकेल. त्यामुळेंच आज आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाण नसलें तरीहि हुंडणावणीचा दर बद्ध (Pegged) करून ठेवला जातो. म्हणजे हुंडणावळीचा दर अधिकृत रीत्या चलनशासन संस्था ठरवते व तो दर स्थिर राखण्याची जबाबदारी स्वतःवर घेते. सहसा हा दर

[७] The purchasing power parity theory suffers from a number of defects. It is merely a truism if it implies that the prices of internationally traded goods are the same everywhere, if one assumes a costless flow of goods. It breaks down completely if the fact that a large number of goods and services do not enter into international trade is taken into consideration. Even the prices of internationally traded goods are different in different countries due to such frictions as cost of transport, tariffs etc. Moreover the theory is applicable only to commodity trade which forms only a part, although an important one, of the balance of payments. As if this is not enough, the theory makes use of index numbers which themselves are not always accurate and reliable. In short the theory is a very imperfect means of calculating the equilibrium rate of exchange between two currencies.

बदलला जात नाहीं. आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत मोठ्या प्रमाणावर उलथापालथ झाल्यामुळें अधिकृत दर स्थिर राखणें अशक्यच झालें तरच हा दर बदलण्यांत येतो. किंवा परिस्थिति बदलल्यामुळें दर बदलून देशाच्या अर्थकारणाच्या दृष्टीनें विशेष फायदा होणार असेल तर हा दर बदलण्यांत येतो. पण एकंदरीनें दर बदलण्यापेक्षां हर उपायांनीं तो स्थिर राखण्याकडे प्रवृत्ति असते. आणि दर बदलण्याचा निर्णय घ्यावयाचाच झाला तर तो अतिशय विचारपूर्वक घेतला जातो. अधिकृत दर वारंवार न बदलणें इष्टच असतें. कारण नेहमीं हुंडणावळीचा दर बदलल्यास आंतरराष्ट्रीय व्यवहारांत अनावश्यक अस्थिरता येते. बद्ध दर प्रतिकूल परिस्थितींतहि स्थिर कसा राखतां येईल ही आजच्या अर्थव्यवस्थेंतील एक महत्त्वाची समस्या आहे. तिचा विचार पुढील प्रकरणांत केला आहे.

समक्रयशक्ति सिद्धान्ताची उपयुक्तता:—हें प्रकरण संपण्यापूर्वीं एक गोष्ट आग्रहानें सांगणें जरूर आहे. समक्रयशक्ति सिद्धान्त आज अनेक कारणांमुळें लागू पडत नाहीं असें वर सांगितलेलें आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे कीं तो सिद्धान्त निरुपयोगी आहे. समक्रयशक्ति सिद्धान्त ज्या कारणामुळें आजच्या परिस्थितींत गैरलागू होतो त्या कारणांना एखाद्या देशाच्या आर्थिक व्यवहारांत महत्त्वाचें स्थान नसेल तर त्या देशाच्या बाबतींत तो सिद्धान्त उपयुक्त ठरूं शकेल. उदाहरणार्थ, एखाद्या देशाच्या परराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत व्यापारी व्यवहारांचेंच प्राबल्य असेल आणि भांडवली व्यवहारांचें स्थान त्या मानानें कमी महत्त्वाचें असेल तर त्या देशाला समक्रयशक्ति सिद्धान्त जरूर विचारांत घ्यावा लागेल.

दुसरें असें कीं, हुंडणावळीचा एखादा दर क्रयशक्तिदर्शक नाहीं म्हणून तो बदलणें अपरिहार्य आहे, असें जरी ठामपणें म्हणतां आलें नाहीं तरी अशा दराचा परराष्ट्रीय व्यापारावर आयात-निर्यातीच्या लवचिकतेच्या मर्यादेंत परिणाम होतो, हें नाकारतां यावयाचें नाहीं. आणि म्हणूनच अधिकृत दर ठरवितांना ज्या अनेक गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात त्यामध्यें देशोदेशांतील चलनांची तौलनिक क्रयशक्ति ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. सारांश, समक्रयशक्ति सिद्धान्त हा निर्णायक नसला तरी मार्गदर्शक आहे.[८]

---

[८] The purchasing power parity doctrine may be imperfect but it remains the only way in which we can calculate the exchange rate. As no other tool is available, we must use the only one which is at hand. If Cautiously used, the theory may be a useful check either upon an existing rate or upon one which is contemplated. Much cf the discredit under which the theory has fallen springs from its improper use. For example, of what use the theory can be when prices are controlled and it is difficult to guess what prices would rule if all controls were abolished? For it is the final and uncontrolled prices which must determine the nature of an eventual equilibrium rate.

: १३ : बाह्य समतोल

[EXTERNAL EQUILIBRIUM]

बाह्य समतोलाची खूण :—कोणतीहि विशेष उपाययोजना केल्याशिवाय आन्तरराष्ट्रीय देणीं व येणीं समान झाल्यास बाह्य समतोल उत्कृष्टपणें साधला असें म्हणतां येईल. पण सहसा तसें होत नाहीं आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचा समतोल ढासळण्याचे प्रसंग उद्‌भवतात व त्यामुळें बाह्य समतोल साधण्यासांठीं एकतर ज्या योगें अधिकृत दर टिकून राहील अशी उपाययोजना करावी लागते किंवा प्रचलित हुंडणावळीचा दर टिकून राहणें शक्य अथवा इष्ट नसेल तर तो दरच बदलला जातो.

हुंडणावळीचा अधिकृत दर कसा टिकवला जातो ? :—हुंडणावळीचा अधिकृत दर प्रथम सरकारकडून जाहीर केला जातो. हा दर टिकवावयाचा असल्यास सरकारला अधिकृत दरानें परदेशी चलनाची कितीहि प्रमाणांत खरेदी अथवा विक्री करण्याची तयारी ठेवावी लागते. सरकारची अशी तयारी असल्यास बाजारांतील दर अधिकृत दरापेक्षां भिन्न होऊं शकत नाहीं हें सहज दाखवितां येण्याजोगें आहे. समजा, १ रु. = १८ पेन्स हा दर टिकविण्याची जबाबदारी भारत-सरकारनें पत्करली आहे. ह्या दराला ब्रिटन व भारत ह्यांच्यांतील देण्या-घेण्यांचा समतोल झाला—म्हणजेच परकीय चलनाकरितां मागणी व परकी चलनाचा पुरवठा सारखा झाला तर बाजारांतील दर व अधिकृत दर ह्यांच्यांत तफावत होण्याचें कारणच पडणार नाहीं. तसें न झाल्यास मात्र भारत-सरकारला अधिकृत दर टिकविण्यासाठीं ब्रिटिश चलनाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करावे लागतील. उदाहरणार्थ, अधिकृत दराला ब्रिटिश चलनाकरिता मागणी कमी व त्याचा पुरवठा अधिक अशी परिस्थिति निर्माण झाल्यास—म्हणजे भारत-ब्रिटन आर्थिक व्यवहारांत भारताच्या दृष्टीनें अनकूल तफावत दिसून आल्यास बाजारांत भारतीय चलनाचें मूल्य वाढूं पाहील व ब्रिटिश चलनाचें मूल्य कमी होऊं पाहील. ही घटना भारत-सरकारला टाळावयाची असेल तर ब्रिटिश चलनाला असलेल्या मागणींतील तूट भरून काढण्यासाठीं अधिकृत दरानें त्याला ब्रिटिश चलनाची आवश्यक त्या प्रमाणांत खरेदी करावी लागेल. त्यामुळें अधिकृत दरास बाजारांतील स्वदेशी चलनाकरितां मागणी-पुरवठा समान होऊन अधिकृत दरच बाजारांत ठरेल. उलट परिस्थिति आन्तरराष्ट्रीय देण्याघेण्याचा तोल भारताच्या दृष्टीनें प्रतिकूल झाल्यास उद्‌भवेल व अर्थातच उलट प्रकारची उपाय-योजना करावी लागेल. भारताच्या दृष्टीनें देण्या-घेण्यांतील तोल प्रतिकूल असणें ह्याचा अर्थ परकीय

चलनाला मागणी फार आहे व पुरवठा कमी आहे असा होतो. त्यामुळें परदेशी चलनाचें मूल्य वाढूं पहातें व पर्यायानें देशी चलनाचें बाह्य मूल्य कमी होऊं पाहतें. ही परिस्थिति टाळावयाची असेल तर परदेशी चलनाच्या पुरवठ्यांत बाजारांत दिसून येणारी तूट भरून काढण्यासाठीं अधिकृत दरानें भारत-सरकारला परदेशी चलनाची विक्री करावी लागेल. तसें त्यानें केल्यास आन्तरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांची परिस्थिति कांहींही असो; हुंडणावळीच्या बाजारांत अधिकृत दरास मागणी-पुरवठा समान होऊन बाजारांतील दर अधिकृत दरापासून भिन्न होणार नाहीं.

वरील गोष्टी जरा निराळ्या प्रकारेंहि सांगतां येतील. जेव्हां परदेशी चलनाची किंमत वाढते तेव्हां सरकारनें अधिकृत दरास—म्हणजे बाजारांतील किंमतीपेक्षां कमी किंमतीस परदेशी चलन देऊं केल्यास—स्वकीयांच्या परदेशी चलनाकरितां असलेल्या मागणीचा ओव सरकारकडे वळून बाजारांतील मागणी कमी होईल आणि त्यामुळें बाजारांतील परदेशी चलनाची किंमत उतरेल. उलट बाजारांतील परदेशी चलनाची किंमत जेव्हां कमी होते तेव्हां परदेशी चलनाच्या मोबदल्यांत बाजारापेक्षां अधिक स्वदेशी चलन सरकारनें देऊं केल्यास परदेशी चलनाची विक्री करण्यापेक्षां सरकारलाच तें विकणें पसंत करतील व त्यामुळें परदेशी चलनाचा बाजारांतील पुरवठा कमी होऊन त्याचें मूल्य वाढेल.

सारांश, हुंडणावळीचा अधिकृत दर टिकविण्यासाठीं त्या दरानें (१) आन्तरराष्ट्रीय देण्याघेण्याचा तोल स्वदेशाच्या दृष्टीनें अनुकूल असतां सरकारनें परचलनाची खरेदी केली पाहिजे आणि (२) आन्तरराष्ट्रीय देण्याघेण्याचा तोल स्वदेशाच्या दृष्टीनें प्रतिकूल असतां परचलनाची विक्री केली पाहिजे. सरकारनें तसें केल्यास हुंडणावळीचा बाजारांतील दर अधिकृत दरापेक्षां भिन्न होणार नाहीं, आणि कदाचित् झालाच तर त्या दोन्ही दरांतील तफावत नष्ट करणारे प्रवाह बाजारांत आपसूक वाहूं लागतील. अधिकृत दरानें परदेशी चलनाची कितीहि प्रमाणांत खरेदी-विक्री करण्याची सरकारची तयारी अधिकृत दर टिकण्याची हमीच होय. परदेशी चलनाची खरेदी म्हणजे स्वदेशी चलनाची विक्री व परकीय चलनाची विक्री म्हणजेच स्वदशी चलनाची खरेदी होय, हें अर्थातच प्रस्तुत संदर्भांत लक्षांत ठेवलें पाहिजे.

हुंडणावळीचा अथवा सुवर्णाचा पुरेसा सांठा आवश्यक:—हुंडणावळीचा अधिकृत दर टिकविण्याच्या यंत्रणेचें वर वर्णन केलें आहे. ती यंत्रणा यशस्वी होण्यासाठीं परदेशी चलनाच्या मोबदल्यांत स्वदेशी चलनाची कितीहि प्रमाणांत विक्री करावयास सरकारनें तयार असलें पाहिजे. ही गोष्ट अर्थात् कठीण नाहीं. कारण स्वदेशी चलन काढण्याचा अन्तिम अधिकार अर्थातच सरकारकडे असतो आणि त्यामुळें हुंडणावळीचा दर टिकविण्यासाठीं कितीहि प्रमाणांत स्वदेशी चलनाचा पुरवठा करणें सरकारला शक्य होतें. म्हणजेच आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्यांचा तोल स्वदेशास अनुकूल असतां हुंडणावळीचा दर टिकविण्याचें धोरण यशस्वी करणें ही गोष्ट जड नाहीं.

हुंडणावळीचा अधिकृत दर टिकविण्याचा खरा प्रश्न आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्यांचा तोल प्रतिकूल असल्यास उद्भवतो. त्या परिस्थितींत अधिकृत दर टिकविण्यासाठीं परदेशी चलनाची कितीहि प्रमाणांत विक्री करावयाची सरकारची तयारी असली पाहिजे, हें वर सांगितलेंच आहे. परदेशी चलनाची निर्मिति करणें कोणत्याहि सरकारच्या अधिकारांत नसल्यामुळें परदेशी चलनाची अमर्यादित विक्री करणें परदेशी चलनाचा (परदेशी चलनाऐवजीं सुवर्ण असलें तरी चालेल. कारण आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्यांत सुवर्ण केव्हांहि, कोठेंहि चालतें) विपुल सांठा सरकार-जवळ असेल तरच शक्य होईल हें उघड आहे. तेव्हां सुवर्णाचा अथवा परदेशी चलनाचा पुरेसा सांठा (पूर्वीच्या अनुकूल तफावतींतून गोळा झालेला) सरकारजवळ असणें हुंडणावळीचा अधिकृत दर टिकविण्याचें धोरण यशस्वी होण्यासाठीं आवश्यक असतें.

आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील प्रतिकूल तफावतीवरील उपाय-योजना :— आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांत प्रतिकूल तफावत असतांहि हुंडणावळीचा दर टिकवावयाचा असेल तर परदेशी चलनाचा अथवा सुवर्णाचा विपुल पुरवठा सरकारजवळ असला पाहिजे, असें वर सांगितलें आहे. पण सतत वर्षांनुवर्षे प्रतिकूल तफावत येत असतां तिला तोंड देण्यास पुरेसा होईल असा—म्हणजे थोडक्यांत अमर्यादित—हुंडणावळीचा सांठा कोणत्याहि सरकारजवळ असणें शक्य नाहीं. आणि समजा, असला तरी तो ज्यायोगें कमी होतो अशी परिस्थिति सतत राहूं देण्यांत फायदा कांहींच नाहीं. उलट हुंडणावळीचा सांठा जेवढा कमी होतो तेवढें भावी काळांत हुंडणावळीचा दर टिकविणें अवघड होऊन बसतें. म्हणूनच आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील प्रतिकूल तफावत ही एक समस्या समजली जाते. तीवर अन्य मार्गांनीं त्वरित उपाययोजना केली जाते. अशा उपाययोजनेचें स्वरूप समजून घेणें व विविध मार्गांचा तौलनिक विचार करणें योग्य चलननीति ठरविण्याच्या दृष्टीनें अत्यावश्यक असतें. प्रतिकूल तफावत असतां त्यावर खालील उपाय गुणकारी ठरविण्याचा संभव असतो. त्यांतील एखादा उपाय सामान्यतः केला जातो किंवा तशीच गरज पडल्यास एकापेक्षां अधिक उपाय योजिले जातात.

(१) **अवमूल्यन** :—अवमूल्यन (Devaluation) म्हणजे हुंडणावळीचा अधिकृत दर बदलून परदेशी चलनाचें मूल्य वाढविणें किंवा पर्यायानें आपल्या चलनाचें बाह्य मूल्य कमी करणें होय.[1] अवमूल्यनाचा अर्थ निश्चित समजण्या-करितां चलनाचें मूल्य धोरण म्हणून मुद्दाम कमी करणें व आर्थिक प्रवाहांच्या ओघांत तें आपोआप कमी होणें ह्यांत फरक आहे हें स्पष्ट केलें पाहिजे. हुंडणा-

[1] Devaluation is deliberate reduction in the external value of a country's currency. This is simply done by fixing a higher price for a foreign currency in terms of a country's own currency.

वळीच्या दराच्या बाबतींत राज्यसंस्थेनें संपूर्णपणें अलिप्ततेचें व निर्हस्तक्षेपाचें धोरण स्वीकारल्यास स्वदेशांतील चलनाकरितां मागणी कमी व पुरवठा अधिक अशी परिस्थिति उद्भवल्यास स्वदेशीय चलनाचें बाह्यमूल्य कमी होईल. पण ती गोष्ट मुद्दाम घडवून आणलेली नसल्यामुळें त्या ठिकाणीं अवमूल्यन हा शब्द वापरण्यापेक्षां **मूल्यपतन** (Depreciation) हा शब्द वापरणें अधिक योग्य होईल. मूल्यपतन बाजारांतील परिस्थितीमुळें होतें व अवमूल्यन जाणूनबुजून केलें जातें हें लक्षांत ठेवल्यास अवमूल्यन म्हणजे नेमकें काय हें समजण्यास अडचण पडणार नाहीं. (अवमूल्यनाच्या उलट **ऊर्ध्वमूल्यन** व मूल्यपतनाच्या उलट **मूल्यवर्धन**). अवमूल्यनामुळें परदेशी वस्तूंच्या किंमती अवमूल्यन करणाऱ्या देशाच्या दृष्टीनें वाढतात. (म्हणजे परदेशांतील किमती पूर्ववतच राहिल्या तरी परदेशीय वस्तूंची स्वदेशीय चलनांतील किंमत वाढते.) आणि परदेशांच्या दृष्टीनें अवमूल्यन करणाऱ्या देशांतील किंमती कमी होतात. (म्हणजे प्रत्यक्ष किंमती कमी न झाल्या तरी परदेशी लोकांना त्यांच्या चलनांत द्यावी लागणारी किंमत कमी होते,) त्यामुळें प्रतिकूल तफावत येणाऱ्या देशांतील मालाला परकीयांची मागणी वाढवून, उलट बाजूनें त्या देशांतील लोकांची परदेशी मालाकरितां असलेली मागणी कमी होण्याचा व त्यायोगें प्रतिकूल तफावत नाहीशीं होण्याचा, निदान बरीच कमी होण्याचा संभव असतो.[२]

अवमूल्यनाची इष्टानिष्टता :—अवमूल्यनाच्या यशस्वितेबद्दल आणि एकंदरीनें अवमूल्यननीतीच्या इष्टानिष्टतेबद्दल पुढील गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत :—

(अ) एका देशाच्या अवमूल्यनामुळें ज्या इतर देशांच्या व्यापारावर अनिष्ट परिणाम होतो त्या देशांनीं आपल्या चलनाचें अवमूल्यन अगर अन्य प्रतिकारात्मक उपाय न योजल्यासच अवमूल्यननीति यशस्वी होण्याचा संभव निर्माण होतो. एका देशाच्या अवमूल्यननीतीचा प्रतिकार दुसऱ्या देशानें कोणत्याहि मार्गानें केल्यास मूळच्या परिस्थितींत बदल होत नाहीं.[३]

(आ) अवमूल्यनामुळें अंतर्गत वस्तूंचा—विशेषतः निर्यात वस्तूंचा उत्पादन-खर्च वाढल्यास अवमूल्यनाचे फायदे कमी होतात. अवमूल्यनामुळें परदेशी मालाच्या किंमती वाढतात. देशांतील उत्पादन परदेशांतून येणाऱ्या यंत्रसामुग्रीवर आणि

[२] If the authorities in the deficit country depreciate the exchange value of the currency of a deficit country—this will cause a net shift of demand away from the products of a surplus country on to the products of the surplus country. This will help to move the balance of trade in favour of the deficit country—**Meade**.

[३] The advantages of devaluation presuppose no immediate retaliation on the part of others, in the form of either counter devaluation or any other retaliatory measures.

त्यांतल्या त्यांत नेहमीं लागणाऱ्या कच्च्या मालाच्या आयातीवर अवलंबून असल्यास त्याचा उत्पादनखर्च साहजिकच वाढतो. म्हणून परदेशी लोकांना किंमती कमी वाटल्यामुळें स्वदेशी मालाची मागणी वाढण्याचा संभव दुरावतो.[४]

(इ) अवमूल्यनामुळें निर्यातींत उल्लेखनीय व उपयुक्त वाढ होणें न होणें निर्यात मालाच्या मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असतें. ती अलवचिक असल्यास परदेशी लोकांच्या दृष्टीनें किंमत कमी होऊनहि एकंदर परदेशी चलनाची प्राप्ति वाढेल एवढी निर्यात मालाला मागणी वाढत नाहीं. त्यामुळें प्रतिकूल तफावत कमी होण्यास मदत होत नाहीं.[५]

(ई) निर्यातीच्या मागणीच्या लवचिकतेप्रमाणेंच आयातीच्या लवचिकतेलाहि महत्त्व असतें. आयातीची मागणी लवचिक नसेल तर अवमूल्यनामुळें परदेशी चलनाची मागणी कमी न होतां उलट वाढते. कारण पूर्वीइतकीच आयात करण्यास अधिक परदेशी चलन लागतें. निर्यातींत वाढ झाल्यास परदेशी चलनाचा पुरवठा वाढतो. पण परदेशी चलनाच्या पुरवठ्यांत होणारी वाढ मागणींत होणाऱ्या वाढीपेक्षां कमी असल्यास अवमूल्यनाचा फायदा अनुभवास येणार नाहीं.[६]

(उ) वरील दोन मुद्द्यांचा सारांश असा कीं, आयात-निर्यातीची तौलनिक लवचिकता अवमूल्यनाचे फायदे किती प्रमाणांत मिळतात, हें ठरविण्याच्या दृष्टीनें महत्त्वाची असते. अवमूल्यन लाभदायक होण्यासाठीं निर्यात व आयात ह्या दोहोंची मागणी लवचिक असावी लागते—म्हणजे ती एकापेक्षां अधिक लवचिक असावी लागते.

(ऊ) अवमूल्यन करणारा देश आयातींवर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्यास अवमूल्यनानें हानीच होते. एकतर आयातींची किंमत वाढते आणि त्यामुळें देशांतील एकंदर किंमतीमान वाढण्याचा संभव असतो. आयातींत आवश्यक वस्तूंचा समावेश असल्यास राहणीचा खर्च वाढतो आणि आयात अलवचिक होऊन तेवढ्याच आयातीसाठीं द्यावा लागणारा वस्तुरूप मोबदला वाढतो.[७]

[४] The export advantages of devaluation are likely to be offset by any appreciable rise in the domestic cost of production, particularly in the export industry—**Kurihara**.

[५] Devaluation will not stimulate exports if the elasticity of foreign demand for exports is less than unity i. e. if broadly speaking that demand is inelastic.

[६] In judging the advantages of devaluation, the elasticity of demand for imports is as much a consideration as the elasticity of demand for exports. The export advantages of devaluation if any will be more than offset if increase in foreign payments on account of devaluation is greater than increase in receipts because of increased exports.

(ए) अवमूल्यनाचा मार्ग वारंवार अनुसरणें धोक्याचें असतें. तसें एखाद्या देशानें केल्यास त्या देशाची आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांतील पत व इभ्रत कमी होते. त्या देशाचा आर्थिक पाया स्थिर नाहीं. त्या देशाच्या सरकारला कोणताहि दर स्थिर ठेवणें जमत नाहीं. अशा समजुती पसरूं लागतात आणि त्यामुळें ज्या निर्यात व्यापाराच्या वृद्धीकरतां अवमूल्यन करावयाचें असतें त्या व्यापाराची बैठकच ढांसळते. शिवाय त्या देशाच्या चलनाच्या बाह्य किंमतीबाबत तर्क-वितर्क सुरू होतात आणि सट्टेबाजांचे फावते.[८]

(ऐ) अवमूल्यनाचा परिणाम अवमूल्यन करणाऱ्या देशावर व इतर देशांवर कोणत्या प्रकारचा होतो, हें अवमूल्यन करतेवेळच्या त्या त्या देशांतील परिस्थितीवर अवलंबून असतें. अवमूल्यन करतेवेळीं अवमूल्यन करणाऱ्या देशांत मंदी असेल तर अवमूल्यनामुळें उत्पादन-रोजगाराला प्रोत्साहन मिळून अवमूल्यनाचा परिणाम चांगला होईल व पूर्ण रोजगार आधींच गांठलेला असेल तर अवमूल्यनामुळें केवळ किंमती-मानांत वाढ होईल. दुसऱ्या परिस्थितींत अवमूल्यनामुळें चलनवाढीसारखेच परिणाम होतील. एका देशाच्या अवमल्यनाच्या वेळीं दुसऱ्या देशांत मंदी असल्यास त्या देशाला अवमूल्यनाचा फटका जाणवेल. तेजी असतां तो फारसा जाणवणार नाहीं. अवमूल्यन करतेवेळीं अवमूल्यन करणाऱ्या देशांत मंदी असेल तरच अवमूल्यन उभय देशांना हितावह होईल. अवमूल्यन करणाऱ्या देशांत तेजी व दुसऱ्या देशांत मंदी असतां अवमूल्यन उभय देशांच्या दृष्टीनें अहितकर ठरेल. दोन्ही देशांत तेजी अगर मंदी असल्यास अवमूल्यनामुळें कोणत्या तरी एका देशाचा फायदा होऊन दुसऱ्या देशास हानि पोंचेल हें ओघानें आलेंच.[९]

चलनघट :—(Deflation) देशांतील एकूण खर्च कमी करणें व त्यायोगें देशांतील एकंदर चलन-पुरवठा कमी करणें हा आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्यांतील प्रतिकूल तफावत कमी करण्याचा दुसरा मार्ग असतो. चलन-घट करण्याकरितां योग्य ती **आर्थिक नीति** (Economic Policy) स्वीकारावी लागते. आर्थिक नीति हा व्यापक

[७] If the devaluing country depends heavily on imports the advantages from stimulation of exports are more than offset. This is so particularly when necessities are imported on a large scale. In that case, cost of living rises, real wages are lowered and terms of trade move against the devaluing country if there is a greater fall in the price of exports than in the price of imports in terms of foreign currency, so that less real imports per unit of export are obtained.

[८] Devaluation has the effect of shaking international confidence in the devalued currency and, therefore, of jeopardizing the very trade which the devaluation is intended to stimulate —**Kurihara.**

शब्दप्रयोग असून त्यांत प्रामुख्यानें **चलन नीति** (Monetary Policy) व **अर्थसंकल्पीय नीति** (Fiscal Policy) ह्यांचा समावेश होतो. योग्य त्या चलन नीतीचा आणि अथवा अर्थसंकल्पीय नीतीचा अवलंब करून चलनघट अथवा चलनवाढ त्यापैकीं जें इष्ट वाटत असेल तें घडवून आणतां येतें. अर्थसंकल्पीय नीतीचा उद्देश एकंदर खर्च वाढावा (अगर कमी व्हावा) ह्या उद्देशानें कर कमी करून (अगर वाढवून) खाजगी खर्चास प्रोत्साहन देणें (अथवा आळा घालणें) किंवा सरकारी खर्चांत वाढ करणें (अगर कमी करणें) असा असतो. जेव्हां चलन-घट व्हावी अशी अपेक्षा असते तेव्हां कर वाढविणें अगर सरकारी खर्चांत कपात करणें हे उपाय योजावयाचे असतात.[१०]

चलन-नीतीचा मुख्य उद्देश व्याजाचा दर कमी करणारे (अगर वाढविणारे) प्रवाह कार्यान्वित करणें असा असतो. व्याजाचा दर कमी-अधिक करूं शकणाऱ्या प्रवाहांपैकीं चलन-पुरवठा हाच एक प्रवाह चलनशासन संस्थेच्या अधिकारांतला असतो. त्यामुळें व्याजाचा दर कमी व्हावा (अगर वाढावा) अशी अपेक्षा असेल तर चलन-पुरवठा वाढविण्याचें (अथवा कमी करण्याचें) धोरण स्वीकारलें जातें. चलन-पुरवठा वाढल्यास (अगर कमी झाल्यास) व्याजाचा दर कमी होऊन (अगर वाढून) भांडवल-गुंतवणीला प्रोत्साहन मिळेल (अगर आळा बसेल) व त्यायोगें एकंदर खाजगी खर्च वाढेल (अगर कमी होईल) अशी शक्यता निर्माण होते. जेव्हां चलन-घट हवी असते तेव्हां अर्थातच चलन-पुरवठा कमी करावयाचें चलन-शासन संस्थेचें धोरण असतें.[११] चलन-घटीच्या धोरणामुळें लोकांचीं चलनरूप उत्पन्नें कमी होतात आणि त्यामुळें त्यांची क्रयशक्ति कमी होऊन एकंदर सर्वत्र वस्तूं-करितां जी मागणी कमी होते त्यांतच आयातींचा समावेश होऊन परदेशी चलनाची

[९] The effects of devaluation on the devaluing country and the affected countries depend on the phase of trade cycle in the countries concerned. Broadly speaking, there is no conflict between external and internal interests if the devaluing country is suffering from depression and the countries affected are in the midst of inflation. Devaluation is unfavourable for both the countries, if there is inflation in the devaluing country and depression in the other country. Devaluation has a favourable reaction on one country and an unfavourable one on the other if both the countries are simultaneously suffering from either deflation or inflation.

[१०] By fiscal policy we mean a change in tax rates or in the amount of Government expenditure which is brought about by the fiscal authorities for the purpose of affecting total domestic expenditure i. e. the total monetary expenditure on all goods and services in the community—**Meade.**

मागणीदेखील कमी होण्याची शक्यता होते. चलनघटीचा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीनें आणखी एक महत्त्वाचा परिणाम होण्याची शक्यता असते. चलनघटीमुळें देशांतील किंमती कमी होऊं पाहतात. तसें झाल्यास स्वदेशी मालाकरितां परकीयांची मागणी वाढण्याचा म्हणजेच निर्यातीला उत्तेजन मिळण्याचा संभव असतो. अशा प्रकारें एका बाजूनें आयात कमी झाल्यास आणि दुसऱ्या बाजूनें निर्यात वाढल्यास आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांतील प्रतिकूल तफावत कमी होण्यास मदत होते, हें सांगावयास नकोच.[१२] चलन-घट अर्थसंकल्पीय धोरणानें झाली किंवा चलननीतीमुळें झाली तरी तिचे परिणाम सामान्यतः एकाच स्वरूपाचे होतात. तथापि दोहोंत निवड करण्याचा प्रसंग आल्यास एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. चलननीति यशस्वी ठरल्यास देशांतील व्याजाच्या दरांत फरक पडतो आणि त्यामुळें आंतरराष्ट्रीय भांडवल-व्यवहारांवर परिणाम होण्याचाहि संभव असतो. चलनघटीमुळें व्याजाचे दर वाढतात. वाढलेले व्याजाचे दर इतर देशांना अनुकूल वाटल्यास भांडवलाची आयात होण्याच्या व त्यामुळें आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांतील तूट भरून येण्याचा संभव वाढतो.[१३]

---

[११] By monetary policy we mean an alteration in the terms on which capital funds can be lent and borrowed—a change which may be called a change in the rate of interest brought about by the banking system through the creation of additional supplies of money in order to ease the terms on which capital funds can be borrowed or through the restriction of monetary supplies in order to harden the terms on which monetary funds can be borrowed.

[१२] Deflation i. e. reduction in the domestic expenditure of any country leads a decrease in income and demand for labour and also some reduction in the level of internal prices. This is expected to bring about a favourable movement in the balance of payments situation.

[१३] The effects of deflationist (or expansionist) financial policy will be very similar whether domestic expenditure is affected by fiscal policy or by monetary policy. But the choice between these two kinds of policy may make a significant difference to the incentive to lend money abroad--The policy of changing the level of domestic expenditure will not have to be carried over for, if it is carried out by means of monetary policy rather than by fiscal policy since monetary policy is capable of influencing not only international trade but also international capital movements.

वर चलन-घटीचे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारावर काय परिणाम होतात, हें सांगितलें आहे. चलनवाढीचे परिणाम नेमके उलट होतात. चलनवाढीमुळें लोकांचीं उत्पन्नें, रोजगार व क्रयशक्ति ह्यांत वाढ होते व त्यामुळें आयात वाढण्याचा संभव असतो. तसेंच किंमती वाढल्यामुळें निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळें आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत आधींच प्रतिकूल तफावत असल्यास ती कमी होते. चलननीतीचा परिणाम होऊन व्याजाचे दर कमी झाल्यास भांडवलाची निर्यात होण्याची शक्यता असते.[१४]

चलन घटीची इष्टानिष्टता :—अवमल्यनाची यशस्विता व परिणाम ह्यांबाबत जे मुद्दे उपस्थित केले होते ते चलनघटीलाहि लागू पडतात. तेव्हां त्यांची पुनरुक्ति न करतां त्यांतील महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष वेधल्यास पुरे होईल. ज्या देशांत पूर्ण रोजगार प्रस्थापित झालेला नसेल त्या देशांत चलनघटीची आर्थिक नीति आत्मघातकी ठरते. कारण चलनघटीमुळें आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांतील समतोल प्रस्थापित होण्यास मदत झाली तरी अन्तर्गत अर्थव्यवस्थेला धक्का बसतो. चलनघटीमुळें किंमतीमान, रोजगार, उत्पादन ह्यांच्यांत कपात व्हावी अशी परिस्थिति उद्भवते. चलनघट हें देशांत मंदी नसतां मंदीला दिलेलें आमंत्रण होय. मंदी आधींच आलेली असल्यास चलनघटीनें तिचा जोर वाढतो. पूर्ण रोजगार आहे आणि चलनवाढ वाजवीपेक्षां अधिक झालेली असल्यांमुळें तिचें दुष्परिणाम अनुभवास येत आहेत अशी परिस्थिति असल्यासच अन्तर्गत अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें चलनघट हितकर ठरते. चलनघटीमुळें निर्यात व्यापाराचा फायदा होतो हें खरें आहे; पण निर्यात वस्तूंच्या उत्पादनाला एकंदर देशाच्या अर्थव्यवस्थेंत फार मोठें स्थान नसेल तर चलनघटीचे दुष्परिणाम अनुभवास येतात. तसेंच चलनघट हा बहुधा आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून करणारा उपाय ठरतो. कारण चलनघटीमुळें अन्तर्गत अर्थव्यवस्थेला बसणारा धक्का बाहेरील देशांपर्यंत पोंचतो. कारण ज्या देशांत चलनघट केली जाते त्या देशाची आयात कमी होते—म्हणजेच इतर देशांची निर्यात कमी होते आणि त्यांच्या व्यापाराला व पर्यायानें अर्थव्यवस्थेला धक्का मिळतो.

अवमूल्यनाप्रमाणेंच चलनघटीचेहि परिणाम इतर देश कोणती नीति अनुसरतात, ह्यांवर अवलंबून असतात. इतर देशांतहि चलनघटीचेंच धोरण असेल तर चलनघट करणाऱ्या कोणत्याहि देशाला निर्यात करण्याचे फायदेसुद्धां मिळवितां येत नाहींत. सर्वच देशांत आयात कमी करण्याच्या (आणि जमल्यास निर्यात वाढण्याच्या) हेतूनें चलनघट केल्यास कोणाचाहि फायदा होणार नाहीं. एकंदर जागतिक व्यापाराचा त्यामुळें संकोच होईल आणि जागतिक मंदीला तें आवाहन केल्यासारखें

[१४] Expansionist financial policy is used for preventing surplus in the balance of payments and a deflationist financial policy is used for the purpose of avoiding deficits.

होईल. चलनघटीची **अन्तर्गत समतोलासाठीं** (Internal Equilibrium) आवश्यकता असेल तरच चलनघटीचें धोरण समर्थनीय ठरतें. अन्यथा कोणत्याहि परिस्थितींत तें धोरण त्याज्यच समजलें पाहिजे. सुवर्णपरिमाण ह्या चलनावस्थेंत हुंडणावळीचा दर स्थिर कसा रहातो ह्यासंबंधीं काळजीपूर्वक विचार केल्यास असें दिसून येईल कीं चलनघट व चलनवाढ ह्या गोष्टींना सुवर्णपरिमाणांत फार महत्त्वाचें स्थान आहे. हुंडणावळीच्या दराला स्थैर्य येण्यासाठीं चलनपरिमितीत बदल होणें सुवर्णपरिमाणांत अत्यावश्यकच समजलेंच जातें व सुवर्णपरिमाणाच्या पुरस्कर्त्यांना त्यांत अनुचित असें कांहीं वाटत नाहीं असें म्हटल्यास त्यांत चूक होणार नाही. पण चलनपरिमितीत बदल झाल्यानें **बाह्य समतोल** (External Equilibrium) साधता आला तरी (तो साधतां येतोच ही कल्पना संशयांतीत नाहीं) त्यासाठीं अन्तर्गत समतोलाचा बळी द्यावा लागतो ही गोष्ट नाकारता यावयाची नाहीं. सुवर्णपरिमाण अप्रिय होण्याची जीं अनेक कारणें होतो त्यांपैकीं हें सर्वांत महत्त्वाचें कारण होय.

आयात कमी करण्याचे व निर्यात वाढविण्याचे प्रत्यक्ष उपाय :—अवमूल्यन व चलन-घट हे दोन उपाय अप्रत्यक्ष स्वरूपाचे असतात. कारण परदेशी चलनाचें मूल्य वाढवून अथवा लोकांचीं उत्पन्नें कमी करून आयात-निर्यातीवर व एकंदर अर्थव्यवहारांवर परिणाम घडवून आणण्याचा हेतु त्यांत असतो.[१५] पण त्या प्रकारच्या उपायाखेरीज आयात-निर्यातीचें व आन्तरराष्ट्रीय स्वरूपाचा इतर अर्थ-व्यवहाराचें प्रत्यक्ष नियंत्रण करून आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहाराचा ढांसळलेला समतोल सावरण्याचा प्रयत्न करतां येतो. अशा उपायांना **प्रत्यक्ष नियंत्रण** (Direct Control) म्हणतां येईल. प्रत्यक्ष नियंत्रणाचा हेतु आन्तरराष्ट्रीय देण्याच्या अगर येण्याच्या विशिष्ट बाबीचें नियंत्रण करून आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांना इष्ट वाटत असेल तें वळण लावणें असा असतो.[१६]

तीन प्रकारचीं प्रत्यक्ष नियंत्रणें :—आन्तरराष्ट्रीय व्यवहारावरील नियंत्रणें तीन प्रकारचीं असतात. **चलनविषयक नियंत्रणें** (Monetary Controls), **व्यापारविषयक नियंत्रणें** (Commercial Controls) व **अर्थसंकल्पविषयक नियंत्रणें** (Fiscal Controls) असें त्यांचें वर्गीकरण करतां येईल. चलनविषयक नियंत्रणें हीं हुंडणावळीच्या खरेदी-विक्रीवर बसवलेलीं नियंत्रणें असतात. व्यापारविषयक नियंत्रणें हीं

---

[१५] Their effects on the balance of payments depend upon the indirect influence which the general mechanism of money prices and money incomes will exercise on the demand and supply of imports and exports—**Meade**.

[१६] Any measure of Governmental intervention which is directly aimed at increasing or decreasing some particular group of payments or receipts in the balance of payments is a measure of direct control—**Meade**.

आयात-निर्यातीवर बसलेविलीं असतात आणि अर्थसंकल्पविषयक नियंत्रणांत आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांवर सरकारनें बसविलेले कर व त्यासाठीं केलेलें अर्थसाहाय्य ह्यांचा समावेश होतो.[१७] ह्यांतील प्रत्येक प्रकारच्या नियंत्रणाविषयीं अधिक माहिती पुढीलप्रमाणें देतां येईल.

(१) **हुंडणावळीच्या व्यवहारांवरील नियंत्रणें** (Exchange Controls) :— हुंडणावळीच्या व्यवहारांवर नियंत्रण घालावयाचें असल्यास हुंडणावळीची खरेदी-विक्री करावयाचा अधिकार चलनशासन संस्था आपल्या हातांत राखून ठेवते. हुंडणावळीच्या बाबतींत मक्तेदारी निर्माण केली तरी चालेल. मात्र हुंडणावळीचा मक्तेदार एखादी खाजगी संस्था नसून सरकारी सस्था असते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. चलनशासनसंस्थेच्या द्वारांच हुंडणावळीची खरेदी-विक्री केली पाहिजे, असा जेव्हां नियम केला जातो तेव्हां अर्थातच हुंडणावळ कोणास विकावयाची, किती प्रमाणांत विकावयाची, आणि कोणत्या दरानें विकावयाची, हें ठरविणें सर्वस्वीं त्या संस्थेच्या हातांत येतें. त्याचा उपयोग करून परदेशी चलनाचा पुरवठा जेवढा होत असतो तेवढीच त्याकरितां मागणी व्हावी—म्हणजे आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत प्रतिकूल तफावत उद्‌भवूं नये अशी दक्षता घेतां यते. हुंडणावळीची मागणी नियंत्रित करण्याचें साधन म्हणून परचलनाचें वांटप (Rationing of Foreign Exchange) सामान्यत: केलें जातें. हें वांटप करतांना प्रत्येक व्यक्तीला जास्तींत जास्त हुंडणावळ किती मिळूं शकेल हें ठरविलें जातें किंवा महत्त्वाच्या उपयोगासाठीं पुरेशी हुंडणावळ मिळावी म्हणून हुंडणावळीच्या उपयोगांचे अग्रहक्क ठरविले जातात व त्यांनुसार प्रत्येक उपयोगासाठीं जास्तींत जास्त हुंडणावळ किती प्रमाणांत देतां येईल हें ठरविलें जातें. हुंडणावळीची मागणी नियंत्रित करण्याचा आणखीहि एक मार्ग आहे. तो म्हणजे विविध उपयोगांसाठीं विविध दर (Multiple Exchange Rates) आकारणें हा होय. मक्तेदाराला मूल्यभेद करतां येतो, हें मक्तेदारींत मूल्यनिश्चिति कशी होते, ह्याची माहिती असणारांना परिचित आहेच. हुंडणावळीच्या व्यवहारासाठीं मक्तेदारीची निर्मिति झाली म्हणजे हुंडणावळीचा दर एकच न आकारला तरी चालूं शकतो. महत्त्वाच्या उपयोगासाठीं हुंडणावळ कमी दरानें उपलब्ध करून दिल्यास—आणि विशेष महत्त्व नसलेल्या उपयोगासाठीं हुंडणावळ महाग केल्यास—दुहेरी फायदा होतो. हुंडणावळीची मागणी योग्य मर्यादेंत राहूं शकते आणि शिवाय हुंडणावळीच्या दुरुपयोगाला आळा बसतो.[१८]

परराष्ट्रीय अर्थव्यवहारांतील नियंत्रणें :—आन्तरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांतील प्रतिकूल तफावत नष्ट व्हावी म्हणून परराष्ट्रीय व्यापारावर जीं नियंत्रणें

[१७] Monetary controls are related to dealings in foreign currency. Commercial controls are related to the actual transactions in goods and services or other forms of international transactions. Fiscal controls are related to taxes and subsidies.

घातलीं जातात त्यांचें स्वरूप काय असतें ह्यासंबंधींची सविस्तर चर्चा मागील एका प्रकरणांत केली आहेत. तिची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. त्यासंबंधांत येथें येवढेंच सांगितल्यास पुरें होईल कीं, आयात अथवा निर्यात कमी अथवा वाढविणें हा व्यापार-विषयक नियंत्रणाचा उद्देश असतो. प्रस्तुत संदर्भात व्यापारविषयक नियंत्रणाचा उद्देश आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांतील प्रतिकूल तफावत कमी करणें एवढाच असतो हें लक्षांत घेतलें पाहिजे. कारण मागील प्रकरणांत व्यापारविषयक नियंत्रणांची चर्चा संरक्षण-नीतीच्या संदर्भात केली आहे.

अर्थसंकल्पीय नियंत्रणें :—अर्थसंकल्पीय नियंत्रणाबाबत आयात-निर्यातीवर (किंवा परराष्ट्रांबरोबर होणाऱ्या इतर कोणत्याहि अर्थव्यवहारांवर) बसविलेल्या करांचा व त्यासाठीं केलेल्या अर्थसहाय्याचा समावेश होतो. देण्याघेण्यांच्या तोलांत समाविष्ट होणाऱ्या बाबींना इष्ट वळण लावणें हा अशा करांचा व अर्थसहाय्याचा हेतु असतो.[१९] जेव्हां आयात कमी व्हावी असा उद्देश असतो तेव्हां आयातीवर जबर कर बसविले जातात. त्यांचा अपेक्षित परिणाम झाल्यास आन्तरराष्ट्रीय देण्या-घेण्यांतील प्रतिकूलता कमी होण्यास ते कारणीभूत होतात. निर्यातीला उत्तेजन देण्यांत निर्यात मालाची किंमत कमी करतां येईल व त्यामुळें निर्यात वाढेल अशी अपेक्षा असते. आयातीला आळा घालणारे कर किंवा निर्यातीला उत्तेजन देणारे अर्थसहाय्य ह्यांचें अपेक्षित कार्य आयातीची किंवा निर्यातीची मागणी लवचिक असेल तरच साधते. अर्थसंकल्पीय नियंत्रणांना प्रत्यक्ष उपाय असेंहि म्हणतां येईल. किंवा अप्रत्यक्ष उपाय असेंहि म्हणतां येईल. देण्या-घेण्याच्या विशिष्ट बाबींना वळण लावणें ह्यावर त्यांचा रोख असतो. हें लक्षांत घेतां त्यांना प्रत्यक्ष उपाय म्हणणेंच उचित होईल

नियंत्रणांची इष्टानिष्टता :—आन्तरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील प्रतिकूल तफावत कमी करण्याचे प्रत्यक्ष उपाय म्हणून जीं विविध नियंत्रणें बसविलीं जातात, तीं

---

१८ Exchange control comes into existence when purchase and sale of foreign exchange is made illegal except through the agency of a control authority. This amounts to monopolisation of foreign exchange dealings. The exchange control authority might resort to rationing of foreign currency in one way or the other and thus restrict its demand. It may also resort to multiple exchange rate by changing a higher price for foreign exchange when it is required for certain purposes than when it is required for other purposes. Such an arrangement is in fact, equivalent to the imposition of an import duty.

१९ Fiscal controls mean use of taxes and subsidies for the purpose of influencing the various items in a country's balance of payments.

अप्रत्यक्ष उपायांपेक्षां प्रभावीं असतात, ह्यांत संदेह नाहीं. अप्रत्यक्ष उपाय सर्वसाधारण स्वरूपाचें असल्याभुळें त्यांचा परिणाम कांहींसा अनिश्चितच असतो. प्रत्यक्ष उपायांचा म्हणजे विशेषतः चलन-विषयक व व्यापार-विषयक नियंत्रणांचा रोख विशिष्ट बाबीवर असल्यानें व त्यांच्या अंमलबजावणींत सरकारचा भाग अधिक क्रियाशील असल्यानें त्यांना यश मिळणें कठीण नसतें. पण म्हणून प्रत्यक्ष उपाय हे अप्रत्यक्ष उपायांपेक्षां सरसकट चांगलेच असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण त्या उपायांतहि कांहीं दोष असतात. प्रत्यक्ष उपायांच्या अंमलबजावणीसाठीं सरकारला खास यंत्रणा उभारावी लागते. ती कार्यक्षम व लांचलुचपतीपासून अलिप्त असली तर ठीक नाहींतर कार्यभाग होण्यापेक्षां कार्यहानि होण्याचा संभव अधिक. नियंत्रणामुळें नोकरशाहीचें प्रस्थ वाढतें व ही गोष्ट बऱ्याच इतर बाबतींत अहितावह ठरते. आयात-निर्यातीवरील प्रत्यक्ष नियंत्रणामुळें निर्यात वाढली व आयात कमी झाली तर संबंधींत वस्तूंचा देशांतील पुरवठा कमी होतो. ही गोष्ट भावफुगवणकारी (Inflationary) असते. भावफुगवणकारी प्रवाहांना मुक्त अवसर देणें विद्यमान परिस्थितींत इष्ट नसलें तर भावफुगवण थोपविण्यासाठीं उपाय-योजना करावी लागते. अशा प्रकारें प्रत्यक्ष उपाय हें प्रभावी असलें तरी बरेंच कटकटीचे व गुंतागुंतीचे असतात. म्हणून परिस्थिति विशेष गंभीर असेल व अप्रत्यक्ष उपायांनीं भागत नसेल तर त्यांचा उपयोग समर्थनीय ठरतो. तसेंच हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं प्रत्यक्ष नियंत्रण हा कांहीं झालें तरी तात्पुरता व वरवरचा उपाय असतो. प्रतिकूल तफावतीचें कारण नैमित्तिक असेल तर तो उपाय करणें फारसें अनिष्ट नसतें. पण अर्थव्यवस्थेंतील कांहीं अंगभूत व मूलभूत दोषामुळें प्रतिकूल तफावत सातत्यानें दिसून येत असेल तर प्रत्यक्ष नियंत्रण पुरें पडत नाहीं.

सारांश :—प्रस्तुत प्रकरणांतील येथपर्यंतच्या विवेचनाचा सारांश असा सांगतां येईल कीं, कोणतीहि उपाययोजना केल्याशिवाय स्वतंत्र आंतरराष्ट्रीय देणीं व येणीं समान होणें ही बाह्य समतोलाची खूण मानतां येईल. स्वतंत्र आंतरराष्ट्रीय देणीं-येणीं समान न होऊन त्यांच्यांत प्रतिकूल तफावत उद्‌भवल्यास (अ) सुवर्ण-निर्यात होते अथवा परचलननिधींत घट होते किंवा (आ) हुंडणावळीचा दर बदलावा लागतो किंवा (इ) प्रत्यक्ष नियंत्रणें बसवावीं लागतात किंवा (ई) अन्तर्गत समतोलाचा बळी द्यावा लागतो. हें लक्षांत घेतां मध्यवर्ती बँकेकडील सुवर्णनिधि अथवा परचलननिधि कमी न होतां, नियंत्रणाचा आधार घ्यावा न लागतां, अन्तर्गत समतोल न बिघडतां व हुंडणावळीचा दर बदलावा न लागतां जेव्हां आंतरराष्ट्रीय देणीं व येणीं समान होतात तेव्हां बाह्य समतोल उत्कृष्टपणें साधला असें म्हणतां येईल. ह्याच अनुरोधानें समतोलक हुंडणावळीच्या दराची अशी व्याख्या करतां येईल कीं, जो दर असतां चार-पांच वर्षांच्या संदर्भांत मध्यवर्ती बँकेकडील सुवर्णनिधि अथवा परचलननिधि कमी होत नाहीं, तसेंच अन्तर्गत समतोल बिघडत नाहीं. आणि जो दर टिकविण्यासाठीं प्रत्यक्ष नियंत्रणाचा आधार घ्यावा लागत नाहीं तो समतोलक दर होय.[२०]

वरील अर्थानें जेव्हां हुंडणावळीचा दर समतोलक नसेल तेव्हां तो बदलला तरी पाहिजे किंवा तो बदलावयाचाच नाहीं असें धोरण असल्यास सुवर्णनिधि आणि/अथवा परचलन-निधींत होणारी घट स्वीकारली पाहिजे किंवा प्रत्यक्ष नियंत्रणें बसविलीं पाहिजेत किंवा अन्तर्गत समतोलाचा बिघाड सहन केला पाहिजे. ह्यांपैकीं सुवर्ण-चलननिधींतील घट स्वीकारणें हा मार्ग कांहीं झालें तरी तात्पुरताच असतो. कारण कोणताहि निधि अमर्यादित नसतो, ही मर्यादा त्या मार्गावर साहजिकच पडते. सतत एखादा निधि कमी होत गेल्यास तो संपुष्टांत केव्हां तरी येतोच आणि हा प्रसंग टाळणें आवश्यक असतें. तेव्हां हा मार्ग दीर्घकाल अनुसरतां येत नाहीं. प्रत्यक्ष नियंत्रणें दीर्घकाल ठेवतां येतात; पण हीं नियंत्रणें दीर्घकालपर्यंत ठेवणें लोकशाही जमान्याशीं सामान्यतः विसंगत असतें. अन्तर्गत समतोलांत बिघाड होऊं देणें हा मार्ग आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाणांत अनुस्यूत होता; पण आजच्या आर्थिक विचारानें तो त्याज्य ठरविला आहे. हें सर्व लक्षांत घेतां हुंडणावळीचा दर बदलावयाचाच नाहीं, हा आग्रह शहाणपणाचा नाहीं हें दिसून येईल. जेव्हां इतर उपाय इष्ट नसतात तेव्हां हुंडणावळीचा दर बदलणेंच श्रेयस्कर असतें. तथापि हुंडणावळीचा दर वारंवार बदलावा लागणें ही गोष्ट इष्ट आहे असें समजतां येत नाहीं. **समतोल भंग** (Dis-equilibrium) होण्याचीं कारणें जर तात्पुरतीं असतील तर इतर उपाय करणें इष्ट असतें. मध्यवर्ती बँकेजवळील सुवर्ण अथवा परचलननिधि भरपूर असेल तर त्यांत घट होऊं देणें हा उपाय सर्वांत कमी अपथ्यकर असतो. त्यानें न भागलें तर तात्पुरती उपाययोजना म्हणून प्रत्यक्ष नियंत्रणांचा आश्रय करण्यास हरकत नाहीं. अन्तर्गत समतोलाचा बिघाड होऊं देणें तात्पुरती उपाययोजना म्हणूनहि इष्ट नसतें. तात्पुरत्या उपाययोजनेनें भागत नाहीं असें जेव्हां दिसून येतें तेव्हां हुंडणा-वळीचा दर बदलणें हाच उत्तम उपाय असतो. अशी परिस्थिति जेव्हां उद्भवते तेव्हां तिला **मूलभूत समतोल भंग** (Fundamental Disequilibrium) असें म्हणतात. अशा परिस्थितीवर उपाययोजना करण्यापूर्वीं **समतोलभंजक प्रवाह** अर्थव्यवस्थेंत कोणते वाहात आहेत ह्याचा कसून शोध घ्यावा लागतो.

अंतर्गत अर्थव्यवहाराचा समतोल व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचा समतोल ह्यांच्यांतील संघर्ष :—आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांतील प्रतिकूल तफावत कमी करण्या-संबंधींच्या उपायांचें जें विवेचन केलें आहे त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होण्याजोगी आहे. पण तरीहि ती विशेष महत्त्वाची असल्यानें तिच्याकडे स्वतंत्रपणें लक्ष वेधणें

२० The requirements of an equilibrium rate are as follows : (i) The balance of payments must be balanced over a standard period without any net change in reserve or gold holdings. (ii) This balance must be attained without direct import controls and (iii) The balance must not be at the cost of either domestic unemployment or inflation.

अगत्याचें आहे. ती अशी कीं, अंतर्गत अर्थव्यवहारांचा समतोल व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचा समतोल ह्यांचा संबंध सामान्यपणें संघर्षाच्या स्वरूपाचा असतो ही गोष्ट लक्षांत ठेवूनच योग्य ती उपाय योजना करावी लागते.[२१] उत्पादन कमी होऊं लागून बेकारी वाढणें किंवा उलटचा बाजूस भावफुगवणीची प्रक्रिया सुरू होणें ही अंतर्गत समतोल ढासळल्याचीं लक्षणें समजलीं जातात. हीं लक्षणें दिसूं लागणें अनिष्ट दिसतें, म्हणून तर चलन-घट हा उपाय सर्वथैव त्याज्य ठरतो. कारण त्या उपायांत आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचा समतोल साधण्यासाठीं जी गोष्ट केली जाते तीच अंतर्गत अर्थव्यवहारांना बाधक ठरते. चलन-घटीमुळें अंतर्गत अर्थव्यवहाराचा अनिष्ट संकोच होण्याचा धोका असतो. अन्तर्गत व बाह्य समतोल ह्या गोष्टी परस्परविरोधी असतात हा अनुभव आन्तरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण व्यवस्थेच्या अमदानींत फार तीव्रतेनें आला. इतर उपायांबाबत निराळचा अर्थानें हेंच म्हणतां येईल. अवमूल्यन व प्रत्यक्ष नियंत्रणें ह्यांमुळें आयात कमी होऊन निर्यात वाढल्यास विशिष्ट परिस्थिति असल्यास अंतर्गत अर्थव्यवहारांना प्रोत्साहन मिळतें. जेव्हां भाव फुगवण होणें इष्ट नसतें तेव्हां ते उपाय योग्य नसतात. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून स्थूल निष्कर्ष काढावयाचा झाल्यास तो असा काढतां येईल कीं, पूर्ण रोजगार जोंपर्यंत प्रस्थापित झालेला नसतो तोंपावेतों चलनघट करणें श्रेयस्कर नसतें. पूर्ण रोजगार प्रस्थापित झालेला आहे आणि भावफुगवणीकडे अर्थव्यवस्थेचा कल दिसून येत आहे, अशी परिस्थिति दिसून येत असल्यास चलन-घट हा उपाय वाजवी असतो. अन्यथा अवमूल्यन व प्रत्यक्ष नियंत्रणें ह्यांवर विसंबणें श्रेयस्कर.

देशोदेशांचें हितसंबंध भिन्न :—आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचें नियमन करण्याचे जे विविध उपाय आहेत त्यांबाबत आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, एका देशाकडून आपल्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत समतोल निर्माण करण्याकरितां जे उपाय योजले जातात ते इतर देशांच्या दृष्टीनें बहुधा अनिष्ट असतात. एका देशानें आयात कमी करण्याचा प्रयत्न केला म्हणजे इतर देशांची निर्यात कमी होणारच. ह्याचाच अर्थ असा कीं, अपवादात्मक परिस्थिति वगळतां देशोदेशांचे हितसंबंध स्वभावतःच भिन्न असतात. त्यामुळें एका देशानें आयात कमी करण्याच्या हेतूनें कांहीं उपाय-योजना केल्यास तिचा तत्सम उपायांनीं प्रतिकार करण्याचीच प्रवृत्ति इतर देशांत दिसून येणेंच अधिक संभवनीय असतें. तसें झाल्यास एक प्रकारचें आर्थिक युद्धच (Economic Warfare) सुरू होतें. परिणामीं कोणाचेंच हित होत नाहीं, असा आर्थिक इतिहासाचा दाखला आहे. ह्या बाबतींत विशेष लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत प्रतिकूल तफावत कमी करण्याचे जे उपाय ह्या प्रकरणांत सांगितले आहेत ते सर्व अनुकूल तफावत निर्माण करण्याकरितां—वाढविण्याकरितां म्हणजेच थोडक्यांत दुसऱ्याचें नुकसान करून आपला स्वार्थ साधण्याकरितां देखील वापरतां येतात. तसें जेव्हां होतें तेव्हां त्या उपायांचें संरक्षक स्वरूप नाहींसें होऊन त्यांना आक्रमक स्वरूप प्राप्त होतें. एखाद्या देशानें

अशा प्रकारच्या आर्थिक आक्रमणास सुरुवात केली तर इतर देशांनीं त्याचा प्रतिकार न केला तरच नवल, सारांश. आन्तरराष्ट्रीय समतोल राखण्याच्या उपाययोजनेंत फार मोठें आर्थिक संघर्षाचें बीज असतें.[२२]

कोणत्याहि उपाययोजनेची इष्टानिष्टता व परिणामकारकता परिस्थिति-सापेक्ष :—हें प्रकरण संपण्यापूर्वी तिसऱ्या एका गोष्टीचा उल्लेख करून तीहि गोष्ट महत्त्वाची आहे हें सांगावयास हवें. आन्तरराष्ट्रीय अर्थव्यवहारांचा समतोल साधण्याच्या विविध उपायांची तात्त्विक चर्चा करून त्याची परिणामकारकता, इष्टानिष्टता व गुणदोष ह्यांबद्दल कांहीं आडाखे बांधतात, कांहीं निष्कर्ष काढतां येतात. हें सर्व खरें; पण त्या उपायांचा अवलंब करावा कीं, न करावा, करावयाचा असल्यास कोणत्या प्रकारच्या उपायांना प्राधान्य द्यावें, एकच उपाय योजावा कीं, मिश्र उपाय-योजना करावी, हें सर्व त्या त्या वेळची आर्थिक व सामाजिक परिस्थिति पाहून तारतम्यानेंच ठरवावयाचें असतें. विविध उपायांची केवळ इष्टानिष्टताच नव्हेतर परिणामकारकता सुद्धां परिस्थितिसापेक्ष असते. हुकमशाही राजवटींत प्रत्यक्ष नियंत्रणें जेवढ्या सहजासहजीं पचतील व रुचतील तेवढीं लोकशाही राजवटींत पचणार नाहींत. लोकशाहींत नियंत्रणें आपद्धर्मच समजलीं जातील व शक्य तेवढ्या लौकर तीं जावींत असा प्रयत्न केला जाईल. अशा समाजांत अप्रत्यक्ष उपायांनाच अधिक प्राधान्य दिलें जाईल. असे उपायच विशेष परिणामकारक ठरतील. राज्यकारभाराची यंत्रणा कार्यक्षम व प्रामाणिक असल्यासच नियंत्रणें यशस्वी होतात. अन्यथा त्यांचा जाचच अधिक होतो. सारांश, कोणत्याहि उपाय-योजनेबाबत निर्णय घेतांना परिस्थितीचा सांगोपांग विचार करावा लागतो.

---

[२१] It is quite clear that "There may often be a conflict between financial policies for internal and external balance—The inflationary policy which will stabilise national income will put the balance of payments even more out of equilibrium, while the deflationary policy which will bring the balance of payments into equilibrium will only serve to intensify the depression of national income—On the other hand, there are often occasions on which the same financial policy is required for the preservation of both internal and external balance --**Meade**.

[२२] If the effect of the policy to be adopted by the authorities of any one country on the other country is to be taken into consideration the field of conflict widens. For what is good for one country may not be good for the other country.

: १४ : आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्था

[INTERNATIONAL MONETARY SYSTEM]

(अ) आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण व्यवस्था

तीन कालखंड:—आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेचा इतिहास तीन कालखंडांत विभागतां येतो. पहिल्या कालखंडाची सुरुवात १८५० च्या सुमारास होऊन पहिल्या महायुद्धानें तो संपतो. ह्या कालखंडांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाची प्रस्थापना होऊन सुवर्णपरिमाणाची उत्तरोत्तर भरभराट होत गेली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांच्या दरम्यानचा म्हणजे १९१४ ते १९३९ हा काळ दुसऱ्या कालखंडांत येतो. पहिलें महायुद्ध चालू असता सुवर्णपरिमाण ही चलनव्यवस्था तात्पुरती स्थगित करण्यांत आली होती. महायुद्ध संपल्यानंतर त्या चलनव्यवस्थेचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न करण्यांत आला; पण तो अयशस्वी ठरून पहिल्या महायुद्धापूर्वी वैभवाच्या शिखरावर चढलेली ही चलनव्यवस्था उत्तरोत्तर ढासळत चालली व ह्याच कालखंडांत तिचा अस्त झाला. रोमन साम्राज्याच्या किंवा कोणत्याहि साम्राज्याच्या पिछेहाटीचा व अंतिम पतनाचा इतिहास जसा मनोरंजक व उव्दोधक असतो तसाच आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाची पीछेहाट हासुद्धां एक मनोरंजक व उव्दोधक असा इतिहासांतील एक भाग आहे. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत सुवर्णपरिमाणाचा ऱ्हास झाला; पण त्याचमुळें जींत सुवर्णपरिमाणाचे फायदे लाभूं शकतील व तोटे मात्र टाळतां येतील अशा आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेची आवश्यकता निकडीनें भासूं लागली व त्यासंबंधीं विचारमंथन सुरूं झालें. त्यांतूनच दुसऱ्या महायुद्धानंतर २७ डिसेंबर १९४५ रोजीं **आंतरराष्ट्रीय चलननिधि किंवा इंटरनॅशनल मॉनेटरी फंड** ह्या संस्थेची स्थापना करण्यांत आली. ह्या संस्थेच्या स्थापनेनें आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेच्या तिसऱ्या किंवा चालू कालखंडास सुरुवात होते.

आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा वैभवकाळ:—सुवर्ण, रौप्य ह्यासारख्या मौल्यवान धातूंचा चलन म्हणून उपयोग फार पूर्वीपासून होत आहे; पण अनेक देशांची चलनव्यवस्था केवळ सुवर्णावरच अधिष्ठित होऊन सुवर्णपरिमाणाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त होण्याची घटना १९ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास घडली असें स्थूलमानानें म्हणतां येईल. १८४८–४९ मध्यें कॅलिफोर्निया व ऑस्ट्रेलिया देशांत सुवर्णाचे साठे सांपडल्यानें सुवर्णपरिमाणाचा स्वीकार अनेक देशांकडून केला जाणें सुलभ झालें. त्यानंतर पहिल्या महायुद्धापर्यंतच्या काळांत सुवर्णपरिमाणाची लोकप्रियता वाढतच गेली व सुवर्णपरिमाणाला शास्त्रमान्यता व राजमान्यताहि लाभून सुवर्णपरिमाण ही आदर्श चलनव्यवस्था समजली जाऊं लागली. ह्या काळांत सर्व प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनीं एक उत्कृष्ट चलनव्यवस्था म्हणून सुवर्णपरिमाणाचा जवळजवळ एकमुखानें पुरस्कार केला व त्यामुळें त्याचा बोलबाला फार झाला.

विसावें शतक सुरू झाल्यानंतर सुवर्णपरिमाण ही आदर्श चलनव्यवस्था आहे, ह्या विचाराबद्दल संशय व्यक्त केला जाऊं लागला व सुवर्णपरिमाणाचें तथाकथित श्रेष्ठत्व निर्विवाद राहिलें नाहीं. हें लक्षांत घेतां १९ व्या शतकाचा उत्तरार्ध हा सुवर्णपरिमाणाचा वैभवकाळ होता, असें स्थूलमानानें म्हणण्यास हरकत नाहीं.

सुवर्णपरिमाणाचे यशापयश परिस्थितिसापेक्ष :—पहिल्या महायुद्धापूर्वींच्या काळांत सुवर्णपरिमाणाला जें अतुलनीय यश लाभलें त्याच्या कारणांचा शोध घेतल्यास असें दिसून येईल कीं, सुवर्णपरिमाणाच्या फायद्यातोटयांपैकीं फायद्यांचें महत्त्व अधिक वाटावें व त्या मानानें तोटयांकडे बरेंच दुर्लक्ष व्हावें अशीच तेव्हांची आर्थिक व राजकीय परिस्थिति होती. पहिल्या महायुद्धानंतर परिस्थिति संपूर्णपणें पालटली व त्यामुळें सुवर्णपरिमाणाचे दुष्परिणामच अधिक नजरेंत भरूं लागले. साहजिकच त्यानंतर सुवर्णपरिमाणाला लाभलेल्या लोकप्रियतेला, राजमान्यतेला व शास्त्रमान्यतेला ओहोटी लागली व त्यामळें त्या चलनव्यवस्थेला पडता काळ आला. सारांश, विशिष्ट परिस्थितींत जेव्हां सुवर्णपरिमाणाच्या फायद्यांना अधिक महत्त्व दिलें गेलें तेव्हां सुवर्णपरिमाण यशस्वी व आदर्श ठरलें व बदललेल्या परिस्थितींत जेव्हां तोटयांना महत्त्व दिलें गेलें तेव्हां तीच चलनव्यवस्था अयशस्वी व टाकाऊ ठरली. ह्यावरून असा बोध घेतां येतो कीं, कोणत्याहि गोष्टीचे गुणदोष परिस्थितिसापेक्ष असतात. सुवर्णपरिमाणाच्या बाबतींत हा अनुभव फार तीव्रतेनें आला.

वरील विवेचनाचें मर्म समजण्यासाठीं प्रथम सुवर्णपरिमाणाचे गुणदोष समजून घेतले पाहिजेत. नंतर पहिल्या महायुद्धापूर्वींची परिस्थिति सुवर्णपरिमाणाला सर्वतोपरी अनकूल कशी ठरली व त्यानंतर परिस्थिति सुवर्णपरिमाणाला बाधक कशी ठरली, हें समजून घेतलें पाहिजे.

सुवर्णपरिमाणाचे गुण :—सुवर्णपरिमाणाचें गुणवर्णन पुढीलप्रमाणें करतां येईल :—

(१) **सुगमता** :—सुवर्णपरिमाणामुळें चलनव्यवस्थेचा कारभार सुगम होतो. सुवर्णपरिमाण ही स्वयंचलित चलनव्यवस्था आहे हें म्हणणें तितकेंसे खरें नाहीं. कारण सुवर्णपरिमाणांतहि व्यवस्थापनाची आवश्यकता असतेच; पण सुवर्णपरिमाणाचें व्यवस्थापन सोपें असतें व त्याला यांत्रिक स्वरूप प्राप्त होतें, हें खरें आहे. कारण सुवर्णपरिमाणाच्या व्यवस्थापनांत महत्त्वाचा असा एकच नियम असतो. त्या नियमाची अंमलबजावणी केली कीं, व्यवस्थापनाचें काम संपतें. सुवर्णनिधींत वाढ झाली कीं, चलनपुरवठा वाढवावयाचा व उलटपक्षीं तो कमी करावयाचा. हाच तो नियम होय. ह्या नियमाप्रमाणें चलनपरिमिति केव्हां व किती वाढवावयाची, हें ठरविणें सोपें असतें आणि त्यामुळेंच मुख्यतः सुवर्णपरिमाणांत सुगमतेचा गुण दिसून येतो.[1]

(२) **चलननिर्मितीची नियमबद्धता** :—सुवर्णपरिमाणांत चलननिर्मितीला यांत्रिक स्वरूप प्राप्त होत असल्यामुळें चलननिर्मितीच्या अधिकाराचा शासनसंस्थे-

कडून दुरुपयोग होण्याची शक्यता त्यांत नसते. चलननिर्मिति सुलभ झाली तर इतर उपायांनीं पैसा उभारण्यापेक्षां चलननिर्मिति करून तो उभारण्याचा मोह राज-कर्त्यांना होण्याचा संभव असतो. सुवर्णपरिमाणांत ह्या मोहाला स्थानच नसतें. कारण सुवर्णाची उपलब्धता लक्षांत घेऊन चलननिर्मिति किती करावयाची, ह्या-संबंधीचे नियम ठरलेले असतात. सुवर्णपरिमाणांत कोणत्याहि देशाच्या चलनशासन् संस्थेकडून होणारी चलननिर्मिति एकप्रकारें मनुष्याधीन नसून निसर्गाधीन असते. कारण सुवर्णाचें उत्पादन व त्यांत होणारी वाढ ही प्रामुख्यानें निसर्गाच्या हातांतील गोष्ट आहे. सुवर्ण ही आधींच खनिज संपत्ति. तिचा साठा मुळांतच मर्यादित आणि तो उपसण्याचें काम कष्टाचें व खर्चाचें असतें. ह्या सर्व गोष्टींमुळें सुवर्णाचें जागतिक उत्पादन वेगानें वाढूं शकत नाहीं. त्यामुळें कोणत्याहि देशांतील चलननिर्मिति आपोआपच मर्यादित होते. तिच्या बाबतींत मानवी हस्तक्षेपाला फारच थोडा अवसर असतो. जागतिक उत्पादनाच्या मर्यादेंत कोणत्याहि देशाला सुवर्णनिधि किती प्रमाणांत उपलब्ध होतो, हें प्रामुख्यानें त्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून असतें. हें लक्षांत घेतां आंतरराष्ट्रीय व्यापार अनिर्बंध आहे, असें गृहीत धरून असें म्हणतां येईल कीं, आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत कोणत्याहि देशाला चलनाचें पाठबळ म्हणून सुवर्ण किती प्रमाणांत उपलब्ध होतें हें अंशतः नैसर्गिक व अंशतः आर्थिक प्रवाहावर अवलंबून असतें. त्यामुळें चलननिर्मिति हा मनुष्याच्या लहरीपणाचा किंवा भोंगळपणाचा खेळ होऊं शकत नाहीं. चलननिर्मिति मानवी दोषापासून अलिप्त ठेवणें हा सुवर्णपरिमाणाचा एक मोठा गुण समजतां येईल.[२]

(३) **हुंडणावळीचें स्थैर्य** :—आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा सर्वांत मोठा गुण हा कीं, त्या चलनव्यवस्थेंत देशोदेशांतील हुंडणावळीचे दर आपोआपच ठरतात व स्थिर होतात. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत बाह्य समतोल आपोआपच साधला

[१] The Gold Standard is said to be an 'automatic' standard. This is not strictly correct because even gold standard requires to be managed, keeping in view the rules of its operation. But it cannot be denied that management of the gold standard is relatively easy. The rules of the Gold Standard are definite and leave no room for doubt regarding the appropriate action on the part of monetary authorities in different situations. In this sense, Gold Standard is much less complicated and much more intelligible than a managed currency system.

[२] In Gold Standard, creation of currency depends on the availability of gold and in that sense is controlled by forces which are beyond human control. This prevents abuse, on the part of monetary authorities, of the power of creation of currency. Human management of currency, it is pointed out, may result in manipulation of currency which is selfish, faulty or whimsical.

जातो. उदाहरणार्थ, एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत प्रतिकूल तफावत दिसून येत असेल तर त्या देशांतून सुवर्णाची निर्यात अपरिहार्यपणें होऊन प्रतिकूल तफावत भरून येते. उलट ज्या देशाचे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहार अनुकूल तफावत दर्शवित असतील त्या देशांत सुवर्णाची आयात होऊन अनुकूल तफावत नाहींशी होते. निराळ्या शब्दांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत पूर्तीची देणीयेणीं मुद्दाम निर्माण करावीं लागत नाहींत. सर्व देशांनीं सुवर्णपरिणामाच्या नियमाचें पालन केल्यास तीं आपो-आपच निर्माण होतात. एवढेंच नव्हे, तर सुवर्णाचें देशांतर अनुकूल अथवा प्रतिकूल तफावतीचें मूळ कारणच नष्ट करण्यास समर्थ ठरतें. प्रतिकूल तफावतीमुळें ज्या देशाला सुवर्णनिर्यात करणें भाग पडलें असेल त्या देशाला चलनसंकोच करावा लागतो. त्यामुळें त्या देशांतील किंमतीमान कमी होऊन त्या देशाच्या मालाला मागणी वाढते. उलट अनुकूल तफावतीमुळें ज्या देशांत सुवर्णाची आयात होते त्या देशाला चलनविस्तार करणें भाग पडून त्या देशांतील भावमान वाढतें व त्या देशाच्या मालाची मागणी कमी होते. दोन देशांत हे जे उलटसुलट परिणाम होतात त्यामुळें दोन्हीं देशांचा ढासळलेला बाह्य समतोल पुनः सावरला जातो. ह्या वर्णनावरून असें कळून येईल कीं, आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण ही हुंडणावळीचे दर व देशोदेशांच्या अर्थव्यवहारांचा बाह्य समतोल अबाधित राहण्याची ग्वाहीच होय.[३]

(४) **आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य** (International Economic Co-operation) :—आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणामुळें हुंडणावळीच्या दराला जें स्थैर्य येतें त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय व्यापारावर चांगला होतो. हुंडणावळीचे दर स्थिर असल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारांतील अनिश्चितता नाहींशी होऊन तो व्यापार वाढण्यास मदत होते. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सुवर्णाच्या आयात-निर्यातीवरील निर्बंधांना स्थानच नसतें. एवढेंच नव्हे तर ज्या देशांनीं आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा मनःपूर्वक स्वीकार केला असेल त्यांनीं आन्तरराष्ट्रीय व्यापारावर कोणतेच निर्बंध घालूं नयेत अशी अपेक्षा असते. ढासळलेला बाह्य समतोल आंतर-राष्ट्रीय सुवर्णपरिमाण अस्तित्वांत असतां कसा सावरला जातो, ह्याचें वर जें वर्णन केलें आहे तें लक्षपूर्वक पाहिल्यास असें दिसून येईल कीं, वस्तूंच्या अथवा भांडवलाच्या आयात-निर्यातीवर निर्बंध घातले गेल्यास ढासळलेला समतोल सहजपणें सावरला जावयाचा नाहीं. म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापार अनिर्बंध असावा हा आंतर-राष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा नियम नसला तरी तसें असणें हें अपेक्षितच असतें. आंतर-राष्ट्रीय व्यापार जेव्हां अनिर्बंध असतो तेव्हां अर्थातच आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याची बैठक पक्की तयार होते. आंतरराष्ट्रीय व्यापार संपूर्णपणें अनिर्बंध असला म्हणजे तौलनिक उत्पादनखर्चाचा सिद्धान्त प्रभावी ठरून त्यानुसार आंतर-राष्ट्रीय उत्पादन-विभागणी होते व त्या व्यवस्थेचे जे कांहीं फायदे असतात ते पदरांत पडण्यास मदत होते हें सांगावयास नकोच. आंतरराष्ट्रीय आर्थिक सह-कार्याचा पाया तयार करण्यास आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा हातभार कसा

लागतो, हें पाहिल्यास असें दिसून येईल कीं, व्यापारी सहकार्यासाठीं व व्यापारवृद्धीसाठीं समानचलनाची जी आवश्यकता असते ती आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणामुळें पुरी होते. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणावर असलेल्या देशांत वरवर पाहतां जरी वेगवेगळें चलन असलें तरी प्रत्येक देशांतील चलनाचें मूल्य सुवर्णांत ठरत असल्यामुळें देशादेशांतील आर्थिक व्यवहारासाठीं सुवर्णाचा विनिमय-माध्यम म्हणून व मूल्यमापन-माध्यम म्हणून उपयोग करतां येतो व अशा प्रकारें आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारासाठीं समानचलनाचा लाभ होतो. एवढेंच नव्हेतर समानचलनाच्या बरोबरीनें समानभावमानाचाहि लाभ होतो. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत

---

[3] The maintenance of stable exchange rates is the most important merit of the International Gold Standard. Countries participating in International Gold Standard are able to maintain external equilibrium without much difficulty. Whenever temporary disequilibrium in the balance of payments of a country occurs, the currency mechanism itself brings about the restoration of equilibrium, provided certain rules of the Gold Standard are observed. The mechanism of restoration of equilibrium is as follows :—In case of a country whose balance of payments has become unfavourable, gold flows out. "The outfow of gold decreases the volume of money in circulation. Consequently prices fall, exports are stimulated and imports are reduced. In the foreign country where the balance of payments has become active the opposite happens. Gold flows in, the volume of currency in circulation expands, prices rise, imports are stimulated and exports are reduced. The movement of gold which is the same thing as the cash payments necessitated by the passive balance of trade produces a gap between the price levels of two countries. This in its turn stimulates a flow of goods in the same direction as the original flow of gold and the flow of gold induces a flow of gold in the opposite direction. The two gold movements, therefore cancel out and the balance of payments is restored to equilibrium by the movement of commodities. Thus payment is made provisionally in gold, but finally in goods. This mechanism thus preserves equilibrium in the balance of payments. It prevents a complete loss of gold by any one country and ensures an appropriate distribution of gold among the Gold Standard countries which participate in world trade. The mechanism of the Gold Standard regulates the movement of gold automatically. It therefore, renders state intervention at once superfluous and ineffective.

कोणत्याहि देशाचा बाह्य समतोल ढासळलेल्या स्थितींत फार काळ राहूं शकतच नाहीं. निराळ्या शब्दांत, एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत अनुकूल अथवा प्रतिकूल तफावत आहे, ही स्थिति आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत फार काळ टिकूं शकत नाहीं. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत अनुकूल अथवा प्रतिकूल तफावत देशोदेशांच्या भावमानांत फरक असल्यासच उद्‌भवतच असल्यामुळें ती स्थिति न टिकणें ह्याचा अर्थ भावमानांतील फरक न टिकणें असाच होतो. म्हणजे आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण असतां भावमान सर्वत्र सारख असलेंच पाहिजे. इतकेंच नव्हेतर कोणत्याहि एका देशाला भावमानासंबंधीं इतर देशांतील भावमानविषयक प्रवृत्तींना विरोधी असें धोरण सुवर्णपरिमाणावर राहावयाचें असल्यास स्वीकारतां येत नाहीं. उदाहरणार्थ, भावमान इतरांच्या मानानें वाढविण्याचें धोरण एखाद्या देशानें स्वीकारल्यास त्याच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर अनिष्ट परिणाम होऊन सुवर्ण गमाविण्याची पाळी त्याच्यावर येईल व साहजिकच सुवर्णपरिमाण टिकवून धरणें त्याला कठिण होईल. तसेंच भावमान कमी करण्याचें धोरण एखाद्या देशानें स्वीकारल्यास त्या देशांत सुवर्णाची आयात होईल व सुवर्णपरिमाणाच्या नियमांचे पालन करावयाचें असल्यास चलनविस्तार करावा लागेल व त्या परिस्थितींत भावमान कमी करण्याचें धोरण टिकूंच शकणार नाहीं. सांगण्याचा मुद्दा असा कीं, आन्तरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत समान भावमान (समानभावमान ह्याचा अर्थ येथें वस्तूंचें सुवर्णांतील मूल्य सारखें असा घ्यावयाचा) अपरिहार्यच होऊन बसतें. अशा प्रकारें समानचलन, समानभावमान, हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्य, बाह्य समतोलाची हमी, अनिर्बंध व्यापार इत्यादि गोष्टींचा लाभ आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणामुळें होऊन आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याची पार्श्वभूमि चांगल्या प्रकारें तयार होते.[४]

सुवर्णपरिमाणाचे दोष :--आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाच्या दोषाचें विवेचन करण्यापूर्वीं एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, ती ही कीं, जी गोष्ट विशिष्ट परिस्थितींत आणि विशिष्ट दृष्टिकोनांतून पाहिल्यास गुण समजतां येते तीच गोष्ट दुसऱ्या परिस्थितींत आणि दुसऱ्या एखाद्या दृष्टिकोनांतून पाहतां दोष ठरते. सुवर्ण-

४ The International Gold Standard creates conditions which are favourable to the growth of international monetary and economic co-operation. As a matter of fact, the International Gold Standard cannot simply be worked in the absence of international co-operation in its true spirit. Quite apart from this, it cannot be denied that the International Gold Standar d is onducive to the growth of international economic relations It resupposes absence of restrictions on international trade and ternational capital movements. It promotes world trade and reign investment by removing all uncertainty in the matter of xchange rate and governmental interference in economic matters.

परिमाणाच्या बाबतींत हा नियम चांगलाच लागू पडतो हें सुवर्णपरिमाणाचे खालीं दिलेले दोष वाचल्यास उमजेल. वर जे गुण म्हणून सांगितले आहेत त्यांनाच प्रसंगीं दोषांचें स्वरूप कसें येतें, ह्यावर प्रकाश पडावा, अशा पद्धतीनेंच विवेचन केलें आहे.

(१) **लवचिकपणाचा अभाव** :—सुवर्णपरिमाणांत सुवर्णाच्या उपलब्धतेवर चलननिर्मिति अवलंबून असते व त्यामुळें ती चलनव्यवस्था सुगम ठरते हें खरें. पण त्याचमुळें सुवर्णपरिमाणांत वेळोवेळीं जरूर असेल तेवढे चलन मिळेलच अशी खात्री देतां येत नाहीं. चलननिर्मिति सहेतुक झाली पाहिजे. कारण चलनपरिमिति किती आहे ह्यावर अर्थकारण फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते हा आधुनिक चलन-शास्त्रांतला एक महत्त्वाचा सिद्धान्त आहे. हा सिद्धान्त मानल्यास सुवर्णपरिमाणाची यांत्रिकता हा दोष ठरतो. देशाच्या आर्थिक नीतीशीं चलननीति सुसंगत असली पाहिजे व चलननीतीच्या अनुरोधानें चलनपुरवठा निश्चित केला पाहिजे. हें लक्षांत घेतल्यास सुवर्णाच्या उपलब्धतेवर चलनपरिमिति अवलंबून ठेवणारी चलनव्यवस्था स्वीकारणें हें निर्बुद्धपणाचें लक्षण आहे असें म्हणावें लागतें. चलनव्यवस्था सुगम असावी अशी अपेक्षा करणें योग्य नाहीं. ती तशी नसणें हेंच साहजिकच आहे. अलीकडे अर्थ-व्यवस्था एवढी गुंतागुंतीची झाली आहे कीं, तिचा कारभार सुरळीत चालण्यासाठीं चलनपुरवठा किती लागतो, हें ठरविणें सोपें नाहीं. आणि गतिमान अर्थव्यवस्थेंत तें एकदां ठरवून चालत नाहीं. परिस्थितींत झपाट्यानें बदल होत असतात आणि त्यानुसार चलनपरिमिति कमी अधिक करावी लागते. ह्या परिस्थितींत लवचिक-पणाचा संपूर्ण अभाव असलेली सुवर्णपरिमाणासारखी चलनव्यवस्था काय कामाची ?

(२) **चलननीति स्वातंत्र्याचा अभाव** :—चलनपरिमिति मानवाधीन नसते, हा सुवर्णपरिमाणाचा ज्यांना गुण वाटतो त्यांना तसें खुशाल वाटो; पण चलन-परिमितीसारखी अर्थव्यवहारांच्या दृष्टीनें महत्त्वाची असणारी गोष्ट निसर्गाच्या लहरीवर अवलंबून ठेवावयाची ह्यांत काय शहाणपण आहे तें कळत आहे. मनुष्याच्या हातून चुका होतात, अधिकाराचा दुरुपयोग होतो हें सर्व जरी खरें असलें तरी त्यावर मनुष्याला बाह्य नियंत्रण स्वीकारावयाला लावून त्याला हतबल करणें हा योग्य उपाय नव्हे. अधिकाराचा योग्य वापर करण्याचें शिक्षण देऊन आपल्या तारतम्य बुद्धीचा योग्य उपयोग मनुष्याला करावयास प्रवृत्त करणें हाच त्यावर खरा उपाय आहे. तेव्हां मानवी व्यवहारांवर मनुष्यबाह्य नियंत्रण ठेवणारी सुवर्णपरिमाणासारखी चलनव्यवस्था चांगली आहे असें म्हणणें कठीण आहे. तसेंच प्रत्येक देशाला आपली चलननीति ठरविण्याचें व त्या अनुरोधानें चलनपुरवठा निश्चित करण्याचें स्वातंत्र्य कांहीं प्रमाणांत तरी हवेंच; पण आंतर-राष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सहभागी होणाऱ्या प्रत्येक देशाला आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांतून सुवर्णार्जन होत आहे कीं, सुवर्ण गमवावें लागत आहे ह्याकडे पाहूनच आपला चलनपुरवठा निश्चित करावा लागतो. निराळ्या शब्दांत वेगवेगळ्या कारणामुळें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत कोणत्याहि देशाला **चलननीतिस्वातंत्र्य**

(Monetary Sovereignty) लाभत नाहीं. चलननीतिस्वातंत्र्याचा अभाव हा सुवर्णपरिमाणांतला एक महत्त्वाचा दोष आहे. ह्यांत बिलकुल शंका नाहीं.[५]

(३) **बाह्य समतोलासाठीं अंतर्गत समतोलाचा बळी** :—सुवर्णपरिमाणामुळें बाह्य समतोल राखणें सुलभ होतें. हा सुवर्णपरिमाणाचा सर्वांत मोठा फायदा आहे. पण हा फायदा मिळविण्यासाठीं अंतर्गत समतोलाचा बळी द्यावा लागतो, हा सुवर्णपरिमाणाचा मोठ्यांत मोठा दोष आहे. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत बाह्य समतोलासाठीं प्रतिकूल तफावतीमुळें सुवर्ण गमाविणाऱ्या देशाला चलनसंकोच करावा लागतो व तसें करण्याचें उत्पादन कमी होणें, रोजगार कमी होणें इत्यादि सर्व दुष्परिणाम पत्करावे लागतात. ह्याच्या उलट आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांतून जेव्हां सुवर्णप्राप्ति होते तेव्हां अंतर्गत अर्थव्यवहारांच्या दृष्टीनें आवश्यक असो वा नसो, चलनविस्तार करावा लागतो व तसें करण्याचेहि जे दुष्परिणाम असतात तेहि मुकाट्यानें स्वीकारावे लागतात. आंतरराष्ट्रीय व्यापारांतील फेरबदलामुळें कोणत्याहि देशाला कधीं सुवर्णप्राप्ति होते तर कधीं सुवर्ण गमवावें लागतें. ह्या दोन गोष्टींचे परिणाम परस्परविरुद्ध असल्यानें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सहभागी होणें ह्याचा अर्थ एक प्रकारें अंतर्गत अर्थव्यवहारांत अस्थिरतेला मान्यता देणें असाच होतो. निराळ्या शब्दांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत बाह्य स्थैर्याकरितां अंतर्गत स्थैर्याचा बळी द्यावा लागतो.[६]

(४) **अप्रगत देशांना विशेष हानिकारक** :—आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणामुळें आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यासाठीं आवश्यक असलेल्या अनेक गोष्टींचा लाभ होतो, हें जरी खरें असलें तरी देशोदेशांत जोंपर्यंत आर्थिक विषमता आहे, तोंपर्यंत म्हणजे जोंपर्यंत कांहीं देश आर्थिक दृष्ट्या बरेच पुढारलेले व कांहीं देश बरेच मागासलेले आहेत अशी स्थिति असते तोंपर्यंत खऱ्या अर्थानें आर्थिक सहकार्य शक्यच नसतें. अशा परिस्थितींत मागासलेल्या व पुढारलेल्या देशांच्या परस्परांबरोबरील आर्थिक संबंधांत मागासलेल्या देशांना कांहीं खास सवलती न मिळाल्या तर त्यांचा आर्थिक विकास होणें कठिण होतें. आंतरराष्ट्रीय सुवर्ण-

[५] Under Gold Standard "Nations were not altogether masters of their own economic fates. They were ruled in no considerable measure by movements of gold in response to fluctuations in the balance of payments—**Hansen.**

[६] The main fault of the Gold Standard was that the external value of a national currency was kept stable at the expense of the stability of its internal value—**Kurihara.**

For such benefit as each derived from participation in an international system, autonomy of action in domestic monetary policy, except between narrowly restricted limits, was the sacrifice demanded—**Gayer.**

परिमाणांत सर्वच देशांना सब घोडे बारा टक्के हा न्याय लावला जातो. कारण सर्व देशांना आपल्या अंतर्गत परिस्थितीचा विचार न करतां हुंडणावळीचा दर स्थिर राखण्याचें, सुवर्णाच्या उपलब्धतेवर चलनपुरवठा अवलंबून ठेवण्याचें व आंतरराष्ट्रीय व्यापार अनिर्बंध ठेवण्याचें मान्य करावेंच लागतें. जेव्हां मागासलेले व पुढारलेले देश ह्यांच्यांत आर्थिक संबंध असतात तेव्हां हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्य व अनिर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापार ह्या दोन्ही गोष्टी पुढारलेल्या देशांच्या दृष्टीनें जेवढ्या हितकर ठरतात, तेवढ्याच त्या मागासलेल्या देशांच्या दृष्टीनें अहितकर ठरतात. पुढारलेले देश व मागासलेले देश हा भेद जरी बाजूला केला तरी सर्वच देशांची आर्थिक परिस्थिति सारखी नसल्यास ह्या विधानाला बाध येत नाहीं. कांहीं देशांचें आर्थिक जीवन प्रामुख्यानें परराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून असतें; तर कांहीं देशांच्या आर्थिक जीवनांत परराष्ट्रीय आर्थिक संबंधांना फारच लहान स्थान असतें. पहिल्या प्रकारच्या देशांना बाह्य समतोलाचें व हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्याचें जेवढें महत्त्व वाटतें तेवढें साहजिकच दुसऱ्या प्रकारच्या देशांना वाटत नाहीं. देशोदेशांच्या आर्थिक परिस्थितींत असे जे फरक असतात ते लक्षांत घेऊन प्रत्येक देशाला आपली आर्थिक नीति ठरविण्याचें योग्य त्या प्रमाणांत स्वातंत्र्य न दिल्यास त्यांच्यांतील सहकार्याला कांहीं अर्थ उरत नाहीं. सहकार्यांत सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला त्यापासून आपला लाभ होईल अशी जाणीव व्हावी लागते. नाहींतर तें सहकार्य तकलुपी असतें, वरवरचें असतें. प्रत्येकाची परिस्थिति जेव्हां भिन्न असते तेव्हां सहकार्यांत प्रत्येकाला समान नियम लावणें योग्य नसतें. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत असा प्रकार होतो आणि म्हणून त्या चलनव्यवस्थेंत सहकार्याचीं बाह्य साधनें जरी निर्माण झालीं तरी सहकार्यासाठीं आवश्यक ती मनोभूमिका तयार होत नाहीं.[७]

पहिल्या महायुद्धापूर्वींच्या काळांत आंतरराष्ट्रीय सुवणपरिमाण यशस्वी होण्याचीं कारणें :—सुवर्णपरिमाणाच्या गुणदोषांचें वर जें विवेचन केलें आहे त्यावरून

---

[७] The International Gold Standard imposes uniformity upon all its adherents irrespective of differences in their individual circumstances. This makes it difficult for back-ward and under developed countries to prosper economically within the fold of International Gold Standard. Even apart from this, the International Gold Standard of the rigid type fails to take account of the frequent divergence of the needs of different nations. This makes real international co-operation between nations impossible. It can truly be said that the International Gold Standard creates the machinery of co-operation but this machinery cannot function smoothly if the spirit of co-operation is lacking. The International Gold Standard by its insistence on rigidity and uniformity hinders rather than helps the promotion of the spirit of co-operation.

एक गोष्ट लक्षांत येऊं शकेल. ती अशी कीं, सुवर्णपरिमाणांत बाह्च समतोल व अंतर्गत समतोल ह्यांच्यांत विरोध दिसून येतो. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत बाह्च समतोलाचा लाभ होतो; पण त्यासाठीं अंतर्गत समतोलाचा बळी द्यावा लागतो. साहजिकच जेव्हां कोणत्याहि देशाला आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सहभागी व्हावयाचें कीं नाहीं हें ; रवावें लागतें तेव्हां खरोखरी बाह्च समतोल व अंतर्गत समतो यांत कशाला अधिक महत्त्व द्यावयाचें, हेंच त्याला ठरवावयाचें असतें. जेव्हां एखादा देश बाह्च समतोलाकरितां अंतर्गत समतोलाचा बळी द्यावयास तयार होतो तेव्हां साहजिकच त्या देशाचा कल आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाच्या बाजूला पडतो. उलट जेव्हां एखाद्या देशाला अंतर्गत समतोलाचें महत्व अधिक वाटतें तेव्हां आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाच्या फायद्यांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति देशांत दिसून येते. ह्या गोष्टी लक्षांत घेतां असें म्हणतां येईल कीं, पहिल्या महायुद्धापूर्वींच्या काळांत अनेक कारणांमुळें बऱ्याच देशांना सुवर्णपरिमाणाच्या फायद्यांचे व विशेषत: हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्याचें महत्त्व अधिक वाटत होतें आणि म्हणून त्या काळांत सुवर्णपरिमाण यशस्वी झालें. निराळ्या शब्दांत, त्या काळांतील परिस्थिति सुवर्णपरिमाणाला अनुकूल अशीच होती आणि म्हणूनच तेव्हां सुवर्णपरिमाणाची भरभराट झाली. पहिल्या महायुद्धापूर्वींच्या काळांत सुवर्णपरिमाणाला अनुकूल असलेली परिस्थिति कोणती तें खालीं थोडक्यांत दिलें आहे.

(१) **ग्रेटब्रिटनचें आर्थिक वर्चस्व** :—पहिल्या महायुद्धापूर्वींच्या काळांत म्हणजे आन्तरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाला आदर्श चलनव्यवस्था म्हणून मान्यता मिळाली तेव्हां जागतिक अर्थकारणांत इंग्लंडला श्रेष्ठत्व मिळालें होतें. हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्याचें महत्त्व फारच वाटावें अशीच त्या देशाची अर्थव्यवस्था आहे, ही गोष्ट उल्लेखनीय आहे. इंग्लंडच्या तेव्हांच्या आर्थिक वैभवाचा डोलारा बहुतांशीं परराष्ट्रीय व्यापारावर होता. परराष्ट्रांत भांडवलगुंतवण करण्यास तें राष्ट्र फारच उत्सुक होतें, हेंहि ह्या संदर्भात लक्षांत घेतलें पाहिजे. साहजिकच हुंडणावळीचे दर स्थिर करून परराष्ट्र-व्यापाराला व भांडवलगुंतवणाला प्रोत्साहन देणारें आन्तराष्ट्रीय सुवर्णपरिमाण हा ग्रेटब्रिटनला एक मोठ्यांतला मोठा वर वाटावा ह्यांत नवल नाहीं. इंग्लंडच्या आर्थिक वैभवाला व वर्चस्वाला आन्तरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाची फारच मोठी मदत झाली असल्यामुळें तत्कालीन इंग्लिश अर्थशास्त्रज्ञांनीं एक चलनव्यवस्था असा आन्तर-राष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा गौरव करावा ह्यांत नवल नाहीं.[८]

[८] The International Gold Standard was essentially an English Standard. The stability of exchange which was the main virute of the International Gold Standard was very much desired by Great Britain then, as her economy largely depended on foreign trade and foreign investments. It is not a matter of surprise, therefore, that when England was the leader of the world, the advantages of Gold Standard should attract greater attention than its faults.

(२) **अर्थशास्त्राची मान्यता**:—त्या काळांत केवळ अर्थकारणावरच नव्हे तर आर्थिक विचारावरहि इंग्लंडचाच प्रभाव होता. त्या काळांत इंग्लंडच्या दृष्टीनें ज्या ज्या गोष्टी इष्ट होत्या त्या स्थलकाल निरपेक्ष चांगल्या असतात असें मानण्याकडे इंग्लिश अर्थशास्त्रज्ञांचा कल होता. साहजिकच तेव्हांच्या इंग्लिश अर्थशास्त्रज्ञांनीं एक उत्कृष्ट चलनव्यवस्था म्हणून जवळजवळ एकमुखानें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांचा पुरस्कार केला. त्यामुळें त्या चलनव्यवस्थेचा बोलबाला फारच झाला. तसेंच तेव्हांच्या आर्थिक विचारांत आंतरराष्ट्रीय व्यापारापासून होणारे विविध फायदे, खुल्या व्यापाराचें महत्त्व, आंतरराष्ट्रीय सहकार्याची आवश्यकता ह्यासारख्या सुवर्ण-परिमाणाला पूरक व पोषक ठरणाऱ्या गोष्टींवरच विशेष भर देण्यांत येत होता. आंतरराष्ट्रीय व्यापारालाच विशेष महत्त्व दिलें गेलें व बाह्य समतोल हेंच आर्थिक नीतीचें साध्य मानलें गेलें; म्हणजे सुवर्णपरिमाण ही चलनव्यवस्था आदर्श ठरावी, हें क्रम प्राप्तच आहे. तेव्हांच्या आर्थिक विचारांत निर्हस्तक्षेपनीतीचा विशेष पुरस्कार केला जात होता, हेंहि ह्या संदर्भांत लक्षांत ठेवलें पाहिजे. सुवर्णपरिमाण निर्हस्तक्षेप नीतींत चपखल बसतें. कारण त्या चलनव्यवस्थेंत चलननियंत्रण राज्यसंस्थेच्या अधिकाराच्या बाहेर पडतें.[१]

(३) **आर्थिक हवामानाची अनुकूलता**:—सर्वच देशांकडून ह्या नाहीं त्या कारणानें हुंडणावळीचें स्थैर्य व बाह्य समतोल ह्यांना महत्त्व दिलें गेल्यामुळें पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळांत सुवर्णपरिमाणाच्या यशाला मदत झाली हें खरें आहे. पण त्याचबरोबर हेंहि मान्य केलें पाहिजे कीं, अंतर्गत समतोलाचा अभाव हा आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा महान् दोष त्या काळांत विशेष जाचक होत नव्हता. अंतर्गत समतोलाचा अभाव त्रासदायक न होण्याचीं तीन कारणें सांगतां येतील :—पहिलें कारण असें कीं, अलीकडील काळाच्या तुलनेनें तेव्हां आर्थिक उलाढालीचें प्रमाण बरेंच कमी होतें. त्यामुळें सुवर्णाच्या हालचाली मोठ्या प्रमाणावर होत नसत व अंतर्गत समतोलाला जाणवेल असा फटकाहि बसत नसे. दुसरें कारण असें कीं इतर देशांकडून आपलीं देणीं सुवर्णातच दिलीं गेलीं पाहिजे असा इंग्लंडचा आग्रह नसे. एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांत प्रतिकूल तफावत दिसून आली तर त्याला सुवर्ण गमवावें लागत असेच असें नाहीं. कारण जरूर तेवढें पूर्तीचें कर्ज देण्यास इंग्लंड बहुधा तयारच असे. तिसरें कारण असें कीं, हुंडणावळीचा दर स्थिर राहावा म्हणून अंतर्गत भावमानांत बदल होण्याचा प्रसंग जेव्हां एखाद्या देशावर येई तेंव्हां तो बदल सुकरतेनें घडून यावा अशीच तेव्हांची अर्थव्यवस्था होती. सारांश, पहिल्या महायुद्धापूर्वीचें आर्थिक हवामान

[१] The economists of the pre-world war I period acclaimed the virtues of Gold Standard almost with one voice. This made the International Gold Standard a very respectable monetary system.

सामान्यतः शांत व आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाच्या दृष्टीनें अत्यानुकूल असेंच होतें. जगाच्या प्रमुख देशांत त्या वेळीं सातत्यानें आर्थिक विकास होत होता व मधूनमधून कांहीं अंशीं मंदी आली तरी तिचा तडाखा विशेष जाणवण्याजोगा नव्हता, हेंहि ह्या संदर्भांत लक्षांत घेतलें पाहिजे. तसेंच अप्रगत देशांत तेव्हां मागासलेपणाची विशेष जाणीव नव्हती व आर्थिक उन्नतीची आकांक्षा प्रज्वलित झाली नव्हती हेंहि लक्षांत घेणें आवश्यक आहे. ह्या सर्व कारणांमुळें तेव्हां आर्थिक क्षेत्रांत फार मोठीं वादळें होत नव्हतीं. त्यामुळें सुवर्णाच्या मोठ्या प्रमाणावरील हालचाली व त्यांतून उद्‌भवणारी कमालीची आर्थिक अस्थिरता ह्या गोष्टी तेव्हांच्या जगाला फारशा परिचित नव्हत्या. साहजिकच अंतर्गत समतोलाचा अभाव हा आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाणाचा मोठा दोष तेव्हां विशेष जाणवत नव्हता.[१०]

आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा पडता काळ :—प्रकट रीत्या शांत असलेल्या पहिल्या महायुद्धापूर्वीच्या जगांतहि बड्या राष्ट्रांच्या आर्थिक स्पर्धेतून निर्माण होणारा असंतोष धुमसत होताच. त्याचेंच पर्यवसान पहिल्या महायुद्धांत झालें. महायुद्धा-सारख्या प्रसंगांत सुवर्णपरिमाण मुळींच उपयोगाचें नसतें. कारण अशा प्रसंगीं चलन-विस्तार खूप व्हावा लागतो. आणि सुवर्णपरिमाणाच्या नियमांना चिकटून बसून तो होऊं शकत नाहीं. त्यामुळें युद्धकाळांत सुवर्णपरिमाण स्थगित करावें लागलें. युद्धो-त्तर काळांत चलनव्यवस्थेची पुनर्घटना करण्यासाठीं ज्या अनेक आंतरराष्ट्रीय परिषदा भरल्या त्यांवर सुवर्णपरिमाणामुळेंच जगाचें भलें झालें आहे; तेव्हां सुवर्ण-परिमाणाचें पुनरुज्जीवन करणें इष्ट, ह्या सनातन विचाराचाच पगडा बसला आणि सुवर्णपरिमाण पुनः प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला.[११] पण हा प्रयत्न अल्पकाळच टिकला. कारण मध्यंतरींच्या काळांत आर्थिक परिस्थिति संपूर्णपणें पालटली होती व नव्या परिस्थितीशीं आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण सुसंवादी नाहीं, हें लौकरच आढळून आलें व सुवर्णपरिमाणाच्या पडत्या काळास सुरुवात झाली. १९२४–२५ च्या सुमारास सुवर्णपरिमाणाचें पुनरुज्जीवन झालें असें म्हणतां येईल. पण अवघ्या दहा वर्षांच्या आंत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा पुरा अस्त झाला. १९३१ मध्यें सुवर्ण-परिमाणाचा महान् अभिमान बाळगणाऱ्या इंग्लंडनें जेव्हां सुवर्णपरिमाणाचा त्याग

---

[१०] The economic climate of that period was very favourable to the working of the International Gold Standard. The importance of maintaining internal equilibrium was not so much appriciated then as now. Besides maintenance of internal equilibrium did not raise difficult problems partly due to the small magnitude of gold movements and partly due to absence of major rigidities in the economic system.

[११] After the first world war, orthodox monetary thinking continued to control international conferences and countries were urged to return to gold—Hansen.

केला तेव्हांच सुवर्णपरिमाणाला ह्यापुढें जगांत स्थान नाहीं, हें निश्चित झालें. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत सुवर्णपरिमाणाचा ऱ्हास होण्याची प्रक्रिया बारकाईनें पाहिली तर असें दिसून येईल कीं, सुवर्णपरिमाणाचा प्रत्यक्ष अस्त होण्यापूर्वींच सुवर्णपरिमाणाचे नियम धाब्यावर बसविण्याची किंवा सुवर्णपरिणामाचें नियम केवळ वाच्यार्थानें पाळून त्या नियमामागील भूमिका धुडकावून लावण्याची प्रवृत्ति दिसून येऊं लागली होती. उदाहरणार्थ आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सुवर्ण गमाविणाऱ्या देशाला चलनसंकोच करणें जेवढें अनिवार्य असतें तेवढें सुवर्णार्जन करणाऱ्या देशाला सुवर्णविस्तार करणें अनिवार्य नसतें. कारण सुवर्णपरिमाणाच्या नियमांत चलननिर्मितीच्या मानानें किमान सुवर्ण किती असावें. हेंच ठरविलेलें असतें. कमाल सुवर्णनिधीचा स्पष्टोल्लेख नसतो. ह्या पळवाटांचा फायदा दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत कांहीं देशानीं घेतला.[१२] तसेंच आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांवर, विशेषत: आंतरराष्ट्रीय व्यापारावर, निर्बंध घालण्यास बंदी नसली तरी तसें करणें हें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणामागील भूमिकेशीं विसंगत समजलें जातें. तरीहि सुवर्णपरिमाणाच्या अमदानींतच आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारावर निर्बंध घातले जाण्यास व त्यांच्यांत वाढ होण्यास सुरुवात झाली. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत वरवर सुवर्णपरिमाण चालू ठेवून त्यामागील भूमिका झुगारून देण्याचा मार्ग कांहीं देशांनीं अनुसरला होता. ह्यावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा प्रत्यक्ष अंत होण्यापूर्वींच त्यांतला जीव निघून जाऊन तें मृतवत झालें होतें.

आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाच्या अस्ताचीं कारणें :—दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण मोडकळीस येण्याचीं कारणें पुढील प्रमाणें सांगतां येतील.

(१) **अंतर्गत समतोलाचें वाढतें महत्त्व** :—पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत कोणत्याहि देशाच्या अर्थकारणांत आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांपेक्षां अंतर्गत अर्थव्यवहारांना अधिक महत्त्व आहे आणि म्हणून हुंडणावळीच्या दरांतील स्थैर्य हें आपलें ध्येय न मानतां मागासलेल्या देशांनीं आपला आर्थिक उत्कर्ष हें आपलें ध्येय

[१२] A gold losing country must deflate credit, prices and income in order to arrest gold outflow or to put it differently to get out of disequilibrium—This means that "A gold losing country must observe the rules of the game at the expense of the domestic stability, whereas a gold receiving country is in no hurry to do so simply because a continuing disequilibrium would result only in more gold reserves--More gold is always welcome for the purpose of accumulating gold reserves and the kind of disequilibrium that results from gold inflow (i. e. a favourable balance of payments) is beneficial to domestic employment.

मानावें व ज्यांचा आर्थिक उत्कर्ष आधींच झाला आहे अशा देशांनीं भावमानांतील स्थैर्य, पूर्ण रोजगार, म्हणजेच थोडक्यांत अंतर्गत समतोलाला आर्थिक नीतीचें साध्य मानावें, हा विचार प्रामुख्यानें पुढें आला. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण ह्या विचाराशीं सुसंवादी नाहीं, हें उघडच आहे. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत मागासलेल्या देशांची कुचंबणा होण्याचा व पुढारलेल्या देशांतहि अंतर्गत समतोल वारंवार विघडण्याचा संभव असतो, हें ह्यापूर्वीं दाखविलेंच आहे. साहजिकच अंतर्गत समतोलाला बाह्य समतोलापेक्षा अधिक महत्त्व दिलें पाहिजे, ह्या नव्या आर्थिक विचारापुढें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा निभाव लागला नाहीं. तथाकथित आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यासाठीं आपल्या आर्थिक उत्कर्षाचा व आशा-आकांक्षाचा बळी द्यावयाचा नाहीं, ही भावनाहि ह्याच काळांत सर्वच देशांत—विशेषतः मागासलेल्या देशांत प्रबळ झाली व ती साहजिकच आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाला बाधक ठरली. अंतर्गत समतोल व आर्थिक विकास हें जेव्हां अर्थनीतीचें व पर्यायानें चलननीतीचें साध्य मानलें जातें तेव्हां त्या साध्याच्या अनुरोधानें प्रत्येक देशांतील चलनपरिमिति ठरविली जावी, हें ओघानेंच येतें प्रत्येक देशाला चलननीतिस्वातंत्र्य असणें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाशीं विसंगत असल्यानें अंतर्गत समतोलाला अधिक महत्त्व प्राप्त झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिणामाचा ऱ्हास होणें क्रमप्राप्तच झालें.[13]

(२) **मोठ्या प्रमाणावरील आर्थिक उलाढालींचा परिणाम** :—पहिल्या महायुद्धानंतर आर्थिक उलाढालींचें प्रमाण प्रचंड वाढलें व त्यामुळें सुवर्णाच्या हालचाली मोठ्या प्रमाणावर होऊं लागल्या. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत जेव्हां सुवर्णाची आयातनिर्यात मोठ्या प्रमाणावर होते तेव्हां अंतर्गत समतोलाला मोठाच धक्का बसण्याचा संभव निर्माण होतो. हा धोका टाळावयाचा असल्यास सुवर्णपरिमाणाचा त्याग करणें किंवा सुवर्णपरिमाण न सोडतां त्यामागील भूमिकेचा अव्हेर करणें ह्याखेरीज पर्याय उरत नाहीं. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत हा अनुभव तीव्रतेनें आला. ह्या काळांत युरोपांतील अनेक देश ऋणको व अमेरिका धनको अशी परिस्थिति नित्याची होती. आपल्या देण्यांची फेड वस्तूंच्या रूपांत अमेरिकेला स्वीकारतां आली असती; पण अमेरिकेंतील अंतर्गत उत्पादन प्रचंड व विविध असल्यानें अमेरिकेला तो मार्ग स्वीकारावासा वाटला नाहीं. आपलीं देणीं सुवर्णांतच दिलीं पाहिजेत, असा आग्रह अमेरिकेनें धरला व युरोपांकडून (फ्रान्स वगळून) अमेरिकेकडे सुवर्णाची एकतर्फी वाहतूक सुरू झाली. बरींच वर्षं सतत सुवर्ण गमाव-

[13] Since the great depression of 1930, a profound change has occurred both in monetary thinking and monetary institutions—In the inter-war period a new standard for monetary policy increasingly won its way. It demanded emancipation from the adjustment process dictated by Gold Standard, freedom to pursue a programme of internal stability and full employment without regard to balance of payments.

ण्याचा ताण युरोपमधील देशांना सहन झाला नाहीं. सुवर्ण सतत गमावण्याचा ताण कोणत्याहि देशाला फार काळ सहन होऊंच शकत नाहीं. कारण एकतर अशा देशाला उत्पादनसंकोच व रोजगारसंकोच ह्यांसारख्या अनिष्ट गोष्टींना तोंड द्यावें लागतें आणि तें द्यावयाची तयारी ठेवली तरीसुद्धां मूळचा सुवर्णनिधि कितीहि असला तरी सतत सवण गमवावें लागत असतां तो किती काळ पुरा पडणार? जेव्हां इतर देश सुवर्ण गमावत होते तेव्हां अमेरिका सुवर्णार्जन करीत होती. सुवर्ण-परिमाणाच्या नियमा ुसार अमेरिकेनें चलनविस्तार केला असता तर इतर देशांवरील ताण बराच कमी झाला असता; पण अमेरिकेनें सामान्यतः तसें न करण्याचेंच धोरण स्वीकारलें आणि त्यामुळें सुवर्णाची एकतर्फी वाहतूक बंद होण्यास मदत झाली नाहीं. ह्या वृत्तांतावरून असें दिसून येतें कीं, पहिल्या महायुद्धापूर्वीं आपली धनकोची भूमिका आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणावर फार ताण पडूं नये अशा पद्धतीनें ग्रेटब्रिटननें जशी वठवली तशी तीच भूमिका पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत अमेरिकेनें वठवली नाहीं. असें म्हणण्यांत अमेरिकेला दोष देण्याचा हेतु नाहीं. इंग्लंडची व अमेरिकेची आर्थिक स्थिति भिन्न असल्याचाहि तो परिणाम असूं शकेल; पण ह्या सर्व गोष्टींकरून एवढाच बोध निघतो कीं, आर्थिक उलाढाली मोठ्या प्रमाणावर होत असतां आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण टिकविणें कठिण असतें. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत आर्थिक उलाढाली केवळ प्रमाणानें मोठ्या नव्हत्या; तर त्या अनिश्चितहि होत्या. विशेषतः अल्पकालीन भांडवलाच्या हालचालीमुळें त्या काळांत आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहारांत कमालीची अस्थिरता आली होती. त्यामुळें सुवर्णपरिमाण मोडकळीस येण्यास हातभार लागला.

(३) **अंतर्गत अर्थव्यवहारांत चिवटपणाची वाढ** :—दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचें अस्तित्व जाचक ठरण्याचें आणखी एक कारण सांगतां येईल. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण अस्तित्वांत असतां त्यांत सहभागी होणाऱ्या देशांतील अंतर्गत भावमानांत वरचेवर बदल होणें अपरिहार्य असतें. ते बदल त्रासदायक ठरावयाचे नसतील तर ते त्वरित झाले पाहिजेत व शक्य तेवढ्या प्रमाणांत सर्वत्र सारखे झाले पाहिजेत. विशेषतः वस्तूंच्या किंमती व वस्तूंचा उत्पादनखर्च ह्यांच्यांतील फरक स्थिर असणें उत्पादन रोजगार स्थैर्याच्या दृष्टीनें आवश्यक असतें. तसें असल्यास आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण असतांहि अर्थव्यवस्थेला पचवतां येणार नाहीं एवढा मोठा धक्का अंतर्गत समतोलाला बसत नाहीं. पहिल्या महायुद्धापूर्वीं स्थलमानानें अशी परिस्थिति होती; पण त्यानंतरच्या काळांत अनेक कारणांमुळें अर्थव्यवस्थेच्या विविध भागांत चिवटपणा अधिक वाढला आणि त्यामुळें भावमानांत फेरबदल होणें कठिण झालें आणि त्याहीपेक्षां भावमानांतील फरकांच्या अनुरोधानें उत्पादनखर्चांत फरक होणें, विशेषतः उत्पादनघटकांच्या किंमतीत व त्यांतहि मजुरीच्या दरांत फरक होणें, अधिक कठीण जाऊं लागलें व त्यामुळें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण टिकून राहण्या-

साठीं आवश्यक असलेल्या अंतर्गत वदलांतील सौकर्य नष्ट झालें व सुवर्णपरिमाण टिकवून धरण्याचा ताण फारच वाढला.[१४]

(४) **आर्थिक हवामानाची प्रतिकूलता** :—वरील सर्व विवेचनाचा आशय असा सांगतां येईल कीं, ज्या गृहीतकृत्यांच्या आधारें सनातन अर्थशास्त्रज्ञांनीं आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा पुरस्कार केला तीं गृहीतकृत्यें पहिल्या महा-युद्धापूर्वींच्या काळांत बरींच वास्तवपूर्ण होतीं; पण त्यानंतर वेगवेगळ्या कारणांमुळें आर्थिक परिस्थिति इतकी बदलली कीं, तींच गृहीत कृत्यें वास्तवतेच्या कसोटीला उतरणें कठिण होऊन बसलें. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचा पुरस्कार करणारे सनातन अर्थशास्त्रज्ञ असें गृहीतच धरून चालत कीं, आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सुवर्णाचें देशांतर वारंवार व मोठ्या प्रमाणावर होणार नाहीं आणि सुवर्णाच्या आयातीचा अथवा निर्यातीचा प्रसंग आला व त्यामुळें चलनविस्तार अथवा चलन-संकोच करावा लागला तरी त्याचे परिणाम फार तर किंमतीमानावरच होतील. अंतर्गत उत्पादन अथवा रोजगारावर त्याचे विपरीत परिणाम होणार नाहींत. निराळ्या शब्दांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणामुळें अंतर्गत समतोलाला वरचे-वर धक्का बसणार नाहीं आणि बसला तरी तो पचविणें कोणत्याहि देशाला जड जाणार नाहीं, अशी आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाच्या पुरस्कर्त्यांची समजूत होती. ही समजूत पहिल्या महायुद्धापूर्वींच्या काळांतहि खरी नव्हती. कारण सर्व देशांची आर्थिक परिस्थिति सारखी, ह्या अवास्तव कल्पनेवर ती समजूत आधारलेली

[१४] The inflexibility of domestic prices and incomes, which is inevitable under modern conditions, largely contributed to the downfall of the International Gold Standard. The classical account of the adjustment process assumes the validity of the quantity theory of money and the efficiency of monetary weapons as determinants of the level of prices. Moreover, it also assumes that the processes of inflating and deflating the system in response to gold inflows and outflows work without friction and that there are no adverse effects on output and employment. It assumes, in other words, that the sole effects of monetary fluctuations would be on prices. None of these assumptions is valid under modern conditions. In brief, the economic climate of to-day is very much unfavourable to the smooth functioning of an International Standard of the type of Gold Standard.

The Gold Standard is at bottom a monetary instrument demanding flexibility of economic structures but since the war it has been operating in a world of growing economic rigidities. —**Gayer.**

आहे.[१५] पण पहिल्या महायुद्धानंतरच्या बदललेल्या परिस्थितींत ती समजूत सपशेल भ्रामक ठरली. दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळांतील आर्थिक हवामान आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाला प्रतिकूल होतें ह्यांत शंका नाहीं.

आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचें भवितव्य :—आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिणाम जें जगांतून नाहींसें झालें तें कायमचें कीं, तात्पुरतें, असा एक प्रश्न उपस्थित केला जातो. वरील विवेचनाच्या आधारें ह्या प्रश्नाचें उत्तर असें देतां येईल कीं, आजचा आर्थिक विचार व आजचा आर्थिक व्यवहार लक्षांत घेतां प्रत्येक देशाला चलन-नीति-स्वातंत्र्य असावें, प्रत्येक देशानें आपल्या चलन-नीतिस्वातंत्र्याचा उपयोग करतांना आपल्या अंतर्गत आर्थिक प्रश्नांना अधिक महत्त्व द्यावें व बाह्य समतोलाच प्रश्न त्या मानानें दुय्यम समजावा, ही विचारसरणी नजिकच्या भविष्यकाळांत मागें पडेलसें वाटत नाहीं. तसेंच मोठ्या प्रमाणावरील व अत्यंत गतिमान अशा आर्थिक उलाढाली, राज्यसंस्थेचा अर्थव्यवस्थेंतील वाढता हस्तक्षेप व अर्थव्यवस्थेंतील चिवटपणा ह्या आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाणाला बाधक ठरणाऱ्या गोष्टीहि चालूच राहतील असें दिसत आहे. हें सर्व लक्षांत घेतां जुन्या स्वरूपांतील आन्तरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाण कायमचेंच गेलें, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.[१६] त्याचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं, असें म्हटलें तर तें चूक होणार नाहीं.[१७]

आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण नाहींसें झालें असलें तरी त्यामुळें आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचें महत्त्व कमी झालें आहे असें मात्र नाहीं. म्हणूनच आंतरराष्ट्रीय स्वरूपाची पण आंतरराष्ट्रीय सुवर्ण-परिमाणासारखी घटक राष्ट्रांना चलननीति-

[१५] The major defect of the classical theory is its lack of realism, for, with its reliance on a simple chain of cause and effect, it makes no allowance for the various conditions under which the adjustment process must operate—for example, the level of employment in the countries concerned—**Scammell**.

[१६] The International Gold Standard has gone never to return.

[१७] The reinstatement of the Gold Standard is out of the question. Whatever may have been its qualities as a system of international adjustment, it must be recognised that the failure of the standard in the inter-war period, the monetary chaos and disorder with which rightly or wrongly, its name is now linked, and the indelible impressions which it has left upon the minds of financial statesmen, all militate heavily against its future use. In the choice between international management and loyalty to a world system on the one hand and national economic autonomy on the other, nations have chosen in favour of the latter—**Scammell**.

स्वातंत्र्य संपूर्णपणें न नाकारणारी चलनव्यवस्था अस्तित्वांत यावी, हा विचार आज चलनशास्त्रांत व अर्थशास्त्रांत प्रभावी आहे. त्या विचारांतून **इंटर-नॅशनल मॉनेटरी फंड** (International Monetary Fund) व **इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँन्ड डेव्हलपमेन्ट** (The International Bank for Reconstruction and Development) ह्या संस्थांचा उदय झाला आहे. आंतरराष्ट्रीय चलन-व्यवस्थेचें आजचें स्वरूप समजण्याकरितां त्या संस्थांचा परिचय असणें आवश्यक आहे.

(ब) इंटरनॅशनल मॉनेटरी फंड

आंतरराष्ट्रीय चलनक्षेत्रांतील अराजक :—सुवर्णपरिमाणाचा अस्त झाल्या-नंतर दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपर्यंतचा काळ हा आंतरराष्ट्रीय चलनक्षेत्रांतील अराजकतेचा काळ होता, असें एका अर्थानें म्हणतां येईल. कारण ह्या काळांत देशोदेशांतील चलन-शासनसंस्थांच्या कारभारावर कोणतेंच आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें नियंत्रण नव्हतें. प्रत्यक्ष नियंत्रणाचा भाग बाजूला सोडला तरी आंतरराष्ट्रीय स्वरूपाची देखरेखहि त्यांच्या कारभारावर नव्हती. हें लक्षांत घेतल्यास हें अराजक कोठल्या मर्यादेपर्यंत पोंचलें होतें हें कळेल. अंतर्गत अर्थकारणाला महत्त्व देऊन बाह्य समतोलाकडे दुर्लक्ष करावयाचें व आंतरराष्ट्रीय देण्याघेण्याच्या व्यापारावरील नियंत्रणाचा आश्रय करावयाचा, हें ह्या काळांतील चलननीतीचें मुख्य सूत्र होतें. आंतरराष्ट्रीय चलनक्षेत्राचा विचार करतां हा काळ प्रामुख्यानें बदलत्या हुंडणावळीच्या दरांचा होता असें म्हणतां येईल. आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांचा समतोल साधण्यासाठीं भावमानांत बदल घडवून आणण्याऐवजीं हुंडणावळीचा दर वेळोवेळीं बदलणें अधिक श्रेयस्कर, हा विचार ह्या काळांत प्रबळ होता. बदलत्या हुंडणावळीच्या दरांच्या समर्थनार्थ सामान्यपणें पुढील मुद्दे मांडले जातात :—

(१) **सुलभता** :—चलनपरिमितींत बदल करून भावमानांत बदल घडवून आणण्यापेक्षां हुंडणावळीच्या दरांत बदल करणें सुलभ असतें. चलनपरिमितींतील बदलांचा भावमानावर होणारा परिणाम अप्रत्यक्ष व अनिश्चित असतो. हुंडणावळीच्या दरांत बदल करणें चलनसंस्थेच्या अधिकारक्षेत्रांतील असतें.[१८]

(२) **एकमेव पर्याय** :—आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांत समतोल साधावाच लागतो. तो साधण्यासाठीं भावमान-उत्पन्नमानांत बदल करणें. हुंडणावळीच्या दरांत बदल करणें व आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारावरील नियंत्रणें बसविणें हे तीन मार्ग असतात. पहिल्या मार्गानें गेल्यास अंतर्गत समतोल बिघडतो व त्याचा उत्पादन-रोजगारावर अनिष्ट परिणाम होतो. तेव्हां त्या मार्गानें जाणें कोणत्याहि देशाच्या दृष्टीनें हितावह नसतें. तिसरा मार्ग स्वीकारणें लोकशाही आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें योग्य नाहीं. शिवाय आंतरराष्ट्रीय

[१८] Of all the variables the exchange rate is the easiest to alter.

व्यापारावर त्या मार्गाचा फारच अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. तेव्हां हुंडणावळीच्या दरांत वेळ पडेल त्याप्रमाणें बदल करणें हाच एकमेव पर्याय शिल्लक राहातो.[१९]

उलट बाजूचा युक्तिवाद :—हुंडणावळीच्या दरांत वारंवार बदल करण्यास विरुद्ध असलेल्यांकडून असा युक्तिवाद केला जातो कीं,

(१) **चूक होण्याचा संभव** :—हुंडणावळीच्या दरांत बदल करणें सुलभ असलें तरी हुंडणावळीच्या दरांतील बदलांचे परिणाम अनिश्चित असतात. त्यामुळें बदललेला दर योग्य असेलच व त्या दरामुळें आंतरराष्ट्रीय देण्यांघेण्यांचा समतोल होईलच, अशी ग्वाही देतां येत नाहीं. सारांश, हुंडणावळीचा दर बदलतांना चूक होण्याचा भरपूर संभव असतो.

(२) **अनिश्चितता** :—हुंडणावळीच्या दरांत वारंवार बदल होऊं लागले तर त्याचा आंतरराष्ट्रीय व्यापारावर परिणाम होतो. हुंडणावळीच्या दरांत सारखे बदल झाल्यास जी अनिश्चितता येते ती आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांना बाधक ठरणें साहजिकच शक्य असतें.[२०]

(३) **देशोदेशांत अनिष्ट चुरस** :—आंतरराष्ट्रीय नियंत्रणाच्या अभावीं आपला स्वार्थ एवढा एकमेव हेतु मनांत धरून हुंडणावळीच्या दरांत बदल करण्याची अनिष्ट चुरस राष्ट्राराष्ट्रांत निर्माण होण्याचा व परिणामीं कोणत्याहि राष्ट्राचा फायदा न होण्याचा धोकाहि लक्षांत घेतला पाहिजे.[२१]

प्रत्यक्ष अनुभव :—सुवर्णपरिमाणाच्या अस्तानंतरच्या काळांतील प्रत्यक्ष अनुभव पाहिला तर तो बदलत्या हुंडणावळीच्या दरांच्या विरुद्धच जातो. ह्या काळांत वर सांगितलेल्या प्रकारची अनिष्ट चुरस देशोदेशांत दिसून आली व कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति दिसून आली. आणि हुंडणावळीच्या

[१९] Variation of the exchange rate is the most appropriate method of adjustment for a full employment world.

[२०] Rates of exchange which are free to alter from day today have a deterrant effect upon buyers and sellers engaged in international trade—Frequent variations in the value of a currency will serve to curtail international investment. The lack of any fixed monetary relationship upon which international borrowing and lending contracts may be based may serve to deter borrowers and lenders from making such contracts.

[२१] Exchange rate changes are a matter of international concern and exchange stability is best achieved by a system of exchange rates which are fixed in the short run but may be varied from time to time to adjust to fundamental changes in the international economy.

दरांतील बदल पुरे पडत नव्हते म्हणूनच कीं काय आंतरराष्ट्रीय व्यापारावर व इतर अर्थव्यवहारांवर निर्बंध घातले जात होतेच. परिणामीं आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधांना ह्या काळांत अत्यंत विकृत असें स्वरूप प्राप्त झालें होतें. ह्या स्थितीवर उपाययोजना म्हणूनच इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाची कल्पना पुढें आली. देशोदेशांतील चलनव्यवस्थेवर व चलननीतीवर कोणत्या तरी स्वरूपाचें आंतरराष्ट्रीय नियंत्रण असणें अत्यावश्यक आहे, ही कल्पना इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या मागें आहे. अशा तऱ्हेचें आंतरराष्ट्रीय नियंत्रण जगांतील राष्ट्रांनीं स्वखुशीनें पत्करलें तरच शक्य आहे हें उघड आहे. त्यासाठीं अशा नियंत्रणाची आवश्यकता आहे, अशी जाणीव स्वतंत्र देशांना झाली पाहिजे. ही जाणीव होण्याच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाच्या अस्तानंतरच्या अराजकाच्या काळांतील प्रत्यक्ष अनुभव फारच उपयोगीं पडला आणि म्हणूनच २७ डिसेंबर १९४५ रोजीं इंटरनॅशनल मॉनेटरी फंड व इंटरनॅशनल बँक ह्या संस्थांची जेव्हां रीतसर स्थापना झाली तेव्हां जगांतील तीस देश ह्या संस्थांचें सभासदत्व पत्करण्यास तयार आहेत असें दृश्य दिसलें. त्यानंतर ह्या संस्थांच्या सदस्यांची संख्या वाढतच गेली. १९५८ च्या एप्रिलमध्यें ती ५८ होती.

इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाची तात्त्विक बैठक :—आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधाची, म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापाराची व आंतरराष्ट्रीय भांडवलगुंतवणाची, वृद्धि करण्याच्या हेतूनें सदस्य राष्ट्रांच्या चलनव्यवस्थेवर व चलननीतीवर नियंत्रण घालावयाचें; पण तें अशा पद्धतीनें घालावयाचें कीं, मागासलेल्या राष्ट्रांचा आर्थिक विकास साधण्याच्या व पुढारलेल्या राष्ट्रांत पूर्ण रोजगारासाठीं आवश्यक असलेली अंतर्गत आर्थिक नीति स्वीकारण्याच्या मार्गांत तीं नियंत्रणें येतां कामा नयेत. ह्या शब्दांत इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाची तात्त्विक बैठक सांगतां येईल. निराळ्या शब्दांत, आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सुप्त स्वरूप असलेल्या आंतरराष्ट्रीय नियंत्रणाला प्रकट स्वरूप द्यावयाचें; पण तें देतांना आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांतला चिवटपणा, बाह्य समतोल व अंतर्गत समतोल ह्यांतील परस्परविरोध शक्य तों टाळावयाचा, हा इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचा हेतु आहे असेंहि म्हणतां येईल. थोडक्यांत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांतले दो टाळणारी पण त्या चलनव्यवस्थेंतील गुणांचा लाभ करून देणारी आंतरराष्ट्रीय स्वरूपाची चलनसंस्था निर्माण करण्यासाठीं इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाची स्थापना झाली आहे असें म्हणतां येईल.

इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या कारभाराचीं सूत्रें :—वरील तात्त्विक भूमिकेच्या अनुरोधानें इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाच्या कारभाराचीं सूत्रें पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आलीं आहेत. त्या सूत्रांचा जरूर तेवढा खुलासाहि तेथेंच दिला आहे.

(१) **हुंडणावळीच्या दरांतील बदलांवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण** :—हुंडणावळीच्या दरांत होणारे बदल आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे असल्यानें त्यांवर आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें नियंत्रण असणें अत्यावश्यक आहे. तथापि हुंडणावळीचे दर अगदीं अपरिवर्तनीय असणें अव्यवहार्य व अंतर्गत अर्थव्यवहारांच्या दृष्टीनें अनिष्ट असल्यानें सब

कारणें असतील तेव्हां फंडाला पूर्वसूचना देऊन योग्य प्रमाणांत हुंडणावळीच्या दरांत बदल करतां येण्याची सोय असली पाहिजे.[२२]

वरील सूत्राच्या अंमलबजावणीसाठीं सदस्य राष्ट्रांतील चलनाचें बाह्यमूल्य सुवर्णांत ठरविलें जातें. व त्यामुळें हुंडणावळीचे दर आपोआपच ठरतात. (फंडाची स्थापना झाल्यानंतर प्रत्येक देशानें आपल्या चलनाचें बाह्यमूल्य ठरवून फंडाला तें कळवावें, असें प्रत्येक सदस्याला सांगण्यांत आलें होतें. हें बाह्यमूल्य मूळचें बाह्यमूल्य म्हणून धरण्यांत आलें. हुंडणावळीच्या दरांचें स्थैर्य राखण्याचा प्रयत्न शक्य तों करीन व देशाच्या आर्थिक परिस्थितींत मूलभूत फरक पडल्यामुळें बाह्य समतोलाचा सातत्यानें भंग होण्याची परिस्थिति उद्‌भवली तरच हुंडणावळीच्या दरांत बदल केला जाईल, असें वचन प्रत्येक सदस्य राष्ट्राला द्यावें लागतें. सदस्य राष्ट्रानें मागितलेला हुंडणावळीच्या दरांतील बदल सबळ कारणाकरितां असेल व दहा टक्क्यापेक्षां अधिक नसेल तर तो मान्य करण्यास फंडाकडून फारशी खळखळ केली जात नाहीं. तसें नसेल तर मात्र बराच विचार करून फंडाचे मत सदस्य राष्ट्राला कळविलें जातें.[२३]

(२) **तात्कालिक आपत्तींत मदत** :—जेव्हां कांहीं तात्कालिक कारणामुळें एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत देण्या-घेण्यांतील प्रतिकूल तफावतीमुळें **समतोलभंग** (Disequilibrium) होण्याची परिस्थिति उद्‌भवते तेव्हां फंडानें त्या देशाला शक्य तेवढी मदत केली पाहिजे; म्हणजे कोणत्याहि देशावर तात्कालिक कारणांकरितां हुंडणावळीचा दर बदलण्याचा किंवा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारावर निर्बंध घालण्याचा किंवा हुंडणावळीचा दर स्थिर राहावा म्हणून अंतर्गत समतोलांत बिघाड होऊ देण्याचा प्रसंग येणार नाहीं. तात्कालिक आपत्तींत सांपडलेल्या देशाला मदत करणें फंडाला शक्य व्हावें म्हणून फंडानें विविध देशांच्या चलनांचा निधि जमविला पाहिजे.[२४]

सदस्य राष्ट्रांवर कोटा पद्धतीनें वर्गणी बसवून फंडानें आपला सुवर्णनिधि व विविध चलननिधि जमविलेला आहे. प्रत्येक राष्ट्रानें आपल्या वांट्याची वर्गणी अंशतः सुवर्णांत व अंशतः स्वचलनांत द्यावयाची असते. प्रत्येक सदस्याला दरवर्षी

[२२] Another danger to which a flexible rate system might be subject lies in the possibility of competitive depreciation. In the absence of any international co-ordinating authority or agreed formula of foreign exchange manipulation the system might lapse into anarchy as countries sought through currency depreciation to wrest markets from rivals—**Scammell.**

[२३] The par values of all member countrie's currencies are defined in gold terms, thus fixing the exchange rates between the currencies—Each member undertakes to promote exchange stability and to propose a change only when it is necessary to correct a fundamental disequilibrium.

फंडाकडून परचलन जास्तींत जास्त किती मर्यादेपर्यंत खरेदी करतां येईल हेंहि ठरविण्यांत आलें आहे. मात्र सदस्य राष्ट्राची प्रतिकूल तफावत फार मोठी आहे किंवा सातत्यानें दिसून येत आहे, असें फंडाला वाटल्यास मदत नाकारण्याचा अधिकार फंडाला देण्यांत आला आहे. हा अधिकार देण्यांतला हेतु स्पष्ट आहे. फंडाचा उपयोग तात्पुरत्या अडचणींसाठींच व्हावयाचा आहे. एखाद्या देशाच्या अडचणी कायमच्या असतील तर त्यावर वेगळी उपाययोजना करणें आवश्यक ठरतें. फंडाला न विचारतां हुंडणावळीच्या दरांत बदल करणाऱ्या देशाला मदत नाकारण्याचा अधिकार अर्थातच फंडाला आहे.[२५]

(३) **आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहार अनिर्बंध असावेत म्हणून प्रयत्न** :—आर्थिक कल्याण व विश्वबंधुत्वाची भावना ह्या दोन्ही गोष्टींसाठीं आंतरराष्ट्रीय व्यापार संपूर्णपणें अनिर्बंध असण्याची व देशोदेशांची चलनें परस्परांत अनिर्बंध परिवर्तनीय असण्याची आवश्यकता आहे.[२६]

कोणत्याहि सदस्य राष्ट्राला फंडाच्या पूर्वसंमतीशिवाय चालू चलनव्यवहारावर निर्बंध घालतां येत नाहींत. अधिकृत दरानें देशोदेशांचीं चलनें परस्परांत परिवर्तनीय असलीं पाहिजेत, हें सदस्याना तत्वतः मान्य करावें लागें; पण द्वितीय महायुद्धोत्तर काळांत पूर्वींचे सर्व निर्बंध एकदम काढणें शक्य नसल्यानें पांच वर्षांच्या काळांत ते हळूहळू काढले जावेत. पांच वर्षांनंतरहि एखाद्या सदस्य राष्ट्राला निर्बंधांची आवश्यकता वाटली तर त्यानें फंडाचा सल्ला घ्यावा व निर्बंध काढावे,

[२४] In order that countries are not forced to meet short-run balances of payments deficits by disturbing domestic equilibrium or by resorting to exchange depreciation or foreign trade control, the fund should make arrangements for making a pool of gold and national currency reserves and allow the member countries an access to it in emergency.

[२५] The pool of gold and national currencies held by the Fund is subscribed by members according to a quota system. Each member has paid a part of its quota in gold and the remainder in its own currency. Each member is entitled to drawing rights on the Fund, in accordance with an agreed formula, in currencies other than its own. The drawing rights are far from automatic. They are subject under the Articles of the Fund to the following two and a number of other conditions. (a) The Fund's resources may not be used to meet a large and sustained outflow of capital. (b) The Fund may deny the use of its resources to any country making an unauthorised change in the par value of its currency.

[२६] The interests of political harmony and economic welfare are jointly served by a system of unfettered multilateral trade and convertible currencies.

असा सल्ला फंडानें देऊनहि त्यानें तो न मानला तर तो फंडाच्या मदतीला अपात्र समजण्यांत येईल.[२७]

(४) **प्रत्येक देशाचा प्रश्न हा सर्वांचाच प्रश्न** :—एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय देण्यांघेण्यांत प्रतिकूल तफावत दिसून आली तर तो केवळ त्या देशाचा प्रश्न आहे असें मानलें जाऊं नये. प्रतिकूल तफावतीच्या देशानें आपला आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांचा प्रश्न सोडविण्यासाठीं जरूर ती उपाययोजना केली पाहिजेच. पण त्याचबरोबरीनें अनुकूल तफावतीच्या देशांनीं देखील पूरक उपाययोजना करून त्या देशाला मदत केली पाहिजे.[२८]

दोन महायुद्धांच्या दरम्यानचा अनुभव लक्षांत घेतां हें सूत्र महत्त्वाचें आहे असें दिसून येईल. एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवहारांत प्रतिकूल तफावत दिसून आली तर त्यावर त्या देशालाच उपाययोजना करावी लागे. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणांत सर्व देशांनीं सुवर्णपरिमाणाच्या नियमांचें पालन केल्यास अनुकूल तफावतीच्या देशांकडून पूरकयोजना आपोआपच केली जाण्याची सोय होती. पण पहिल्या महायुद्धानंतर सुवर्णपरिमाणाच्या नियमांतील पळवाटांचा फायदा घेण्याची प्रवृत्ति दिसून आली व प्रतिकूल तफावतीच्या देशांवर फारच ताण पडला. अनुकूल तफावतीच्या देशांनीं पूरक उपाययोजना तर केली नाहींच; पण उलट अशा तऱ्हेची उपाययोजना केली कीं, त्यामुळें प्रतिकूल तफावतीच्या देशांवरील ताण वाढावा. उदाहरणार्थ, अमेरिकेंत जेव्हां सुवर्णाची आयात होत होती तेव्हां अमेरिकेनें चलनविस्तार तर केला नाहींच; पण उलट वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घालून युरोपमधील राष्ट्रांचा प्रश्न बिकट केला. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य वाढीस लागावयाचें असेल तर असें होणें अनिष्ट आहे.

ह्या सूत्राच्या आधारें फंडाला दुर्मिळ चलनाच्या प्रश्नावर उपाययोजना करतां येईल. जेव्हां एखाद्या देशाच्या मालाला जागतिक मागणी अपार वाढते तेव्हां त्या देशाचें चलन दुर्मिळ होऊन तें मिळविण्याकरितां तीव्र स्पर्धा सुरूं होते. (सध्या डॉलरची परिस्थिति अशी आहे.) निराळ्या शब्दांत, त्या देशाबरोबरील आर्थिक

[२७] No member is allowed to impose without Fund's prior approval restriction on making of payments and transfers for current transactions. As it is recognised that in the abnormal post-war conditions, it might be necessary for countries to retain control, the Fund has provided for the gradual dismantling of controls over a period of five years. "If after five years, a country still retained direct controls, it was to consult with the Fund as to their further retention and if in the face of Fund requesting for their removal, it still retained controls, it might be declared inelligible to use the resources of the Fund."

[२८] A balance of payments disequilibrium is necessarily two-sided and its correction is the joint responsibility of both surplus and deficit countries.

व्यवहारांत इतर सर्व देशांना दीर्घमुदतीच्या प्रतिकूल तफावतीला तोंड द्यावें लागतें. जेव्हां एखादें चलन दुर्मिळ होतें तेव्हां तसें जाहीर करण्याची आणि त्यानंतर त्या चलनाचें वांटप गरजू राष्ट्रांत विशिष्ट तत्वानुसार फंडाकडूनच केलें जाण्याची तरतूद फंडाच्या नियमांत आहे. फंडाच्या सुवर्णनिधीचा उपयोग दुर्मिळ चलनाच्या खरेदी-करतां करण्याचा अधिकारहि फंडाला आहे. दुर्मिळ चलनाच्या देशाकडून त्याचें चलन कर्जरूपानें घेण्याचाहि मार्ग फंडाला अनुसरतां येतो.[२९]

(५) **नियंत्रण संस्थेची आवश्यकता** :--आंतरराष्ट्रीय चलनकारणांतील सह-कार्यासाठीं एका नियंत्रण संस्थेच्या स्थापनेची आवश्यकता आहे. ह्या संस्थेचीं कार्यें व अधिकार शक्य तेवढे स्पष्ट करण्यांत आले तरच ह्या संस्थेला आंतरराष्ट्रीय चलनक्षेत्रांत वजन व प्रतिष्ठा लाभेल.[३०]

प्रत्यक्ष कर्ज देण्याखेरीज सदस्य राष्ट्रांनीं बाहेरून काढलेल्या कर्जाला जामीन राहूनहि बँका सदस्यांना मदत करूं शकते. ह्या पद्धतीमुळें खाजगी व सरकारी भांडवल-गुंतवण परराष्ट्रांत अधिक प्रमाणांत केली जाईल अशी अपेक्षा आहे.[३१]

---

[२९] The recognition of joint responsibility to solve balance of payments problems is a constructive step. Hitherto responsibility of taking suitable action seemed to rest exclusively on deficit countries. Hereafter even the surplus countries will be regarded as morally responsible for helping the deficit countries out of their difficulties and to make a part of the adjustment themselves.

[३०] International monetary co-operation is best effected through an international agency with defined functions and powers.

[३१] International monetary agency must coexist with other agencies each responsible for such problems as employment stabilisation and liberalising of world trade. A high and sustained level of international investment is necessary for the stability of the international economy and the flow of private international investment may be facilitated and increased by the creation of an international investment bank. The provisions governing bank lending are as follows :—(a) Loans are given for specific projects of reconstruction or development. (b) Projects selected are those most useful and urgent for increasing the productive powers of members. (c) Except in special circumstances the bank financing is designed to meet foreign exchange rather than domestic outlays. (d) The bank's relations with a borrower continue even after a loan is made. It is expected to check and scrutinise the expenditure of loan funds. (e) Apart from the loan, the bank is expected to give technical aid to its members such as advice and assistance on technical, managerial marketing or financial aspects of the projects.

ह्याच सूत्राच्या अनुरोधानें फंडाची स्थापना झाली आहे. जगांतील सर्व स्वतंत्र राष्ट्रांना फंडाचें सदस्यत्व खुलें आहे. **फंडाचा कारभार कार्यकारी मंडळा-** (Board of Governors) कडून पाहिला जातो. प्रत्येक सदस्य राष्ट्राला एक गव्हर्नर व आणखी एक प्रतिनिधि नियुक्त करण्याचा अधिकार आहे. गव्हर्नर-मंडळाची सभा सामान्यतः वर्षांतून एकदां होते. नव्या सदस्याला प्रवेश देणें, सदस्यांच्या कोटयांत फेरफार करणें, हुंडणावळीच्या दरांतील फेरफारांना मान्यता देणें न देणें आणि दैनंदिन **कारभार पाहण्यासाठीं कार्यकारी संचालक मंडळा** (Executive Directors) ची निवड करणें हीं कामें गव्हर्नर-मंडळ करतें.

दैनंदिन कारभार पाहण्यासाठीं कार्यकारी संचालक मंडळ असतें. त्यांत बारा सभासद असतात. पैकीं कोटयाच्या रकमेच्या क्रमानें अग्रगण्य ठरणाऱ्या अमेरिका, ग्रेटब्रिटन, चीन, फ्रान्स व भारत ह्या पांच राष्ट्राकडून प्रत्येकीं एक ह्या प्रमाणें पांच सभासद नियुक्त केलेले असतात. उरलेल्या राष्ट्रांकडून पांच सभासद निवडले जातात व दोन अमेरिकन रिपब्लिकस् कडून निवडले जातात. गव्हर्नर-मंडळ व संचालक मंडळावरील प्रत्येक सदस्याला २५० मतें अधिक त्याच्या देशाच्या कोटयाच्या प्रत्येक लाख डॉलरमागें एक मत ह्याप्रमाणें मतें असतात. प्रत्येक सदस्याला सारखा मताधिकार नसतो. हें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

(६) **पूरक आंतरराष्ट्रीय संस्थांची स्थापना** :—फंडाचें कार्य फक्त चलन-व्यवहारापुरतें मर्यादित आहे. पण आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचा प्रश्न इतर क्षेत्रांतहि उपस्थित होतो. त्या त्या क्षेत्रांत काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्था अस्तित्वांत आल्या पाहिजेत. त्या संस्थांच्या सहकार्यानें व त्यांच्या कार्याला पूरक असें फंडाच्या कार्याचें स्वरूप राहिलें पाहिजे.

फंडाखेरीज ज्या आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्था अस्तित्वांत आल्या आहेत त्यांमध्यें जागतिक बँकेचा उल्लेख प्रामुख्यानें केला पाहिजे. आंतरराष्ट्रीय भांडवल-गुंतवण वाढण्याचा प्रयत्न करणें हें ह्या संस्थेचें मख्य कार्य आहे.

फंडाचे सर्व सदस्य ह्या बँकेचे सदस्य असतात. बँकेचें भांडवल कोटा पद्धतीनें उभारलेलें आहे. सदस्य राष्ट्रांना बँकेकडून कर्जें दिलीं जातात. कर्जें देण्यासाठीं नियम करण्यांत आले आहेत. ते असे :—(अ) बँकेनें सर्वसाधारण स्वरूपाचीं कर्जें न देतां विशिष्ट कामांच्या योजनांसाठींच कर्ज द्यावें. (आ) सदस्य राष्ट्रांच्या विकासा-साठीं त्या योजना अत्यावश्यक आहेत, अशी बँकेची खात्री पटली पाहिजे. (इ) त्या योजनांवरील खर्चांत परचलनाचा जेवढा भाग असेल तेवढ्यापुरतीच बँकेवर जबाबदारी असावी. (ई) योजनेवरील सर्व खर्च कर्जरूपानें केव्हांहि देऊं नये. (उ) बँकेनें शक्य तेवढें कमी व्याज आकारावें. (ऊ) व्याजाचा दर सर्वांना सारखा असावा. (ए) कर्ज दिल्यानंतर आपलें काम संपलें, असें न मानतां कर्जाच्या रकमेचा याच कामासाठी व योग्य प्रकारें उपयोग होत आहे ह्याकडेहि लक्ष द्यावें. (ऐ) प्रत्यक्ष

कर्जाशिवाय तांत्रिक व आर्थिक स्वरूपाचा सल्लाहि सदस्य राष्ट्राला जरूर असेल तेव्हां बँकेनें द्यावा.

फंडाचा कारभार :—फंडाची स्थापना होऊन बारा वर्षे झालीं आहेत. ह्या अवधींत फंडाच्या कार्याचा तपशिलवार आढावा घेणें ह्या ग्रंथाच्या मर्यादेबाहेरचें आहे. पण स्थूलमानानें असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं कीं, (१) आंतर-राष्ट्रीय आर्थिक व्यवहारांवरील व चलनव्यवहारांवरील निर्बंध दूर करून घेण्यांत फंडाला यश लाभलेलें नाहीं. त्या बाबतींत फारशी प्रगति झालेली नाहीं, असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.[३२] फंडाला ह्या बाबतींत यश न लाभण्यास कांहीं अंशीं परिस्थिति व कांहीं अंशीं फंडाच्या स्वतःच्या मर्यादा कारणीभूत झाल्या आहेत. सर्वसाधारण आर्थिक परिस्थिति अद्याप अस्थिर, अनिश्चित व घर्षणयुक्त अशीच आहे. देशोदेशांत भीतीचें व संशयाचें वातावरण आहे. अशा स्थितींत निर्बंध आपण होऊन उठविणें, म्हणजे आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखें आहे, असें प्रत्येक देशाला साहजिकच वाटतें. अनिर्बंधविरहित, बहुपंखी व्यापार (Multilateral Trade) आपल्या व सर्वांच्या हिताचा आहे, अशी मनोमन खात्री बऱ्याच देशांना पटावयाची आहे. लहान व मागासलेल्या देशांना पुढारलेल्या देशांचा विश्वास वाटण्याजोगी परिस्थिति अद्याप तरी आली नाहीं. फंडाच्या मर्यादा उघडच आहेत. फंड फार तर शिफारशी करूं शकतो. अंमलबजावणीचे अथवा अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवण्याचे कोणतेहि अधिकार फंडाला नाहींत. त्यामुळें बलिष्ठ राष्ट्रांनीं फंडाच्या शिफारशी न पाळल्यास फंडाला कांहीं करतां येत नाहीं. तसेंच व्यापाराच्या क्षेत्रांत फंडाचें स्थान काय, हें अद्याप निश्चित झालें नाहीं.

(२) हुंडणावणावळीच्या दरांच्या बाबतींत फंडाचें स्वतंत्र अस्तित्व अद्याप डोळयांत भरावयाचें आहे. १९४६ सालीं सदस्य राष्ट्रांनीं आपल्या चलनाचें बाह्य मूल्य जें सुचविलें तेंच फंडानें मान्य केलें. तें बरोबर होतें कीं चूक होतें, ह्या प्रश्नाचा सखोल व सर्वांगीण अभ्यास करून त्यांत अप्रिय बदल सुचविण्याचें धाडस फंडाला झालें नाहीं. १९४९ चें अवमूल्यन फंडाच्या संमतीनें झालें; पण तेथेंच सदस्यांनीं सुचविलें व फंडानें मान्य केलें, असाच प्रकार घडला. सारांश, फंडाच्या ह्या बाबतींतल्या कार्यांत सक्रियत्व दिसून येत नाहीं. मम म्हणण्याच्या स्वरूपाचें कार्य फंडाकडून केलें जातें. फंडाचा सल्ला विचारला जातो, फंडाला आपलें धोरण सदस्यांकडून कळविलें जातें, फंडाची कागदोपत्रीं मान्यता घेतली जाते, असा देखावा मात्र चांगला केला जातो. फंडाला योग्य तो मान दिला जातो, हेंही नसे थोडकें!

(३) फंडाची स्थापना झाल्यापासून डॉलर दुर्मिळ चलन झालें आहे. त्यामुळें डॉलरकरतां नेहमींच मोठी व वाढती मागणी असते. ती मागणी इतकी मोठी आहे कीं,

[३२] The Fund has not been able to make any considerable progress towards the achievement of its main objection viz. abolition of trade and other restrictions.

त्यामुळें फंडाच्या स्वतःच्या निधींचा तोकडेपणा उठून दिसत आहे. साहजिकच फंडासारख्या संस्थेकडून होणाऱ्या मदतीची जेव्हां अत्यंत गरज असते तेव्हां ती मदत मिळूं शकेल कीं नाहीं, ह्याबद्दल संशय व्यक्त केला जातो. असाधारण परिस्थितींत आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण कुचकामाचें होतें, अशी टीका त्यावर केली गेली. फंडाच्या बाबतींत तसाच अनुभव येणार कीं काय, अशी साधार भीति वाटते. डॉलरसाठीं फंडाकडे ज्या मागण्या येतात त्या पुरवितांना अमेरिकेच्या राजकीय व आर्थिक धोरणाचें दडपण फंडावर पडतें, अशीहि तक्रार ऐकूं येते. ती त्या बाबतींत खरी असो वा नसो, एकंदर फंडाच्या कारभारावर अमेरिकेचा प्रभाव विशेष आहे, हें नाकारतां यावयाचें नाहीं. त्यामुळें फंड खऱ्या अर्थानें आंतरराष्ट्रीय आहे, हा विश्वास अद्यापि सर्वत्र दिसून येत नाहीं; हें कटु सत्य स्पष्टपणें सांगितलें पाहिजे.

कांहीं महत्त्वाचे निष्कर्ष :—ज्या पार्श्वभूमीवर फंडाचा उदय झाला ती पार्श्वभूमि व फंडाचें आजवरचें कार्य पाहतां फंडाच्या रूपानें एक आवश्यक असलेली आंतरराष्ट्रीय संस्था व यंत्रणा निर्माण झाली आहे आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याची अत्यावश्यकता आहे व आंतरराष्ट्रीय चलनक्षेत्रांत अराजक असणें कोणत्याहि दृष्टीनें हितावह नाहीं, ह्या गोष्टी लक्षांत घेतां फंडासारख्या संस्थांची काळजीपूर्वक जोपासना झाली पाहिजे व त्यांतील दोष निवारण्याचा प्रामाणिक प्रयत्न सर्व देशांकडून झाला पाहिजे असें म्हणावेसें वाटतें. फंडासारख्या संस्था नष्ट होणें हें प्रतिगामित्वाचें लक्षण ठरेल व आपल्या अगतिकत्वाची अकारण कबुली दिल्यासारखें होईल. अशा परिस्थितींत फंडाच्या कार्यांत सक्रिय व आस्थापूर्वक भाग घेणें व फंडाच्या कार्यांतले दोष नाहींसे करण्याच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत फंडाची शक्ति व उपयुक्तता वाढत जाईल अशा प्रयत्नांना हातभार लावणें हेंच कोणत्याहि आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचें महत्त्व पटलेल्या देशाचें आद्यकर्तव्य आहे. अशा प्रकारच्या सहकार्यासाठीं आजचें वातावरण अनुकूल दिसत नाहीं हें खरें; पण त्यामुळें निराश होणें योग्य नव्हे. कारण प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते ती अशाच वेळीं. एक यंत्रणा उभारण्यांत आली आहे हेंही नसे थोडकें, असें म्हणून ती यंत्रणा प्रभावी कशी ठरेल व तिचें उद्दिष्ट सफळ कसें होईल, ह्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणें हाच प्राप्त परिस्थितींत योग्य मार्ग आहे.[३३]

---

[३३] The Bretton-Woods system with the fund as its institutional centre represents a valuable co-operative element in the international economy and an advance from the condition of freedom bordering on anarchy which preceded it. Now it is established that the fund forms a nucleus around which further cooperative effort can centre. Its abandonment either formally or by tacit agreement would be retrograde—**Scammell.**

चलननीति : साध्यें व साधनें

[MONETARY POLICY : OBJECTIVES & MEANS]

: १५ :

चलननीति

[MONETARY POLICY]

चलननीतीचीं साध्यें (Objectives of Monetary Policy)

भावमानस्थैर्य :—चलननीतीबाबतच्या सनातन विचारसरणींत **भावमानस्थैर्य** (Stability of the Price—Level) हें चलननीतीचें साध्य मानलें गेलें आहे. ह्या विचारसरणीनुसार भावमानस्थैर्य दिसून आल्यास **चलनीय समतोल** (Monetary Equilibrium) साधला आहे असें म्हणतां येतें. भावमान जेव्हां अस्थिर असतें तेव्हां समतोल भंग होतो.

भावमानस्थैर्याला चलननीतीचें साध्य मानण्यामागें चलनसंस्था ही एक सर्वांच्या सोयीसाठीं अस्तित्वांत आलेली संस्था आहे व तिचें कार्य निःपक्षपातीपणें व्हावयाचें असल्यास चलनमूल्यांत म्हणजेच पर्यायानें भावमानांत अस्थिरता असणें योग्य नाही अशी कल्पना आहे. भावमानांत जेव्हां कोणत्याहि दिशेनें बदल होतात तेव्हां त्याचे परिणाम सर्वांवर सारखें होत नाहींत. एकाच बदलामुळें कांहीं वर्गांना फायदा होतो व कांहींना तोटा होतो. असें होऊं नये म्हणून भावस्थैर्य आवश्यक आहे, असें प्रतिपादिलें जातें. भावस्थैर्य केवळ विभाजनाच्या दृष्टीनें नव्हे तर उत्पादनाच्या दृष्टीनेंहि आवश्यक आहे असें समजलें जातें. बाजारपेठेसाठीं उत्पादन ही खाजगी साहसावर अधिष्ठित झालेल्या अर्थव्यवस्थेंतील उत्पादनपद्धति आहे. बाजारपेठेसाठीं उत्पादन करण्यांत अनेक धोके अपरिहार्यपणें येतातच. त्यांतच सर्वसाधारण भावमान कमालीचें अस्थिर असल्यास आणखी एका मोठ्या धोक्याची भर पडते. हा धोका नाहींसा करणें, निदान कमी करणें चलनशासनसंस्थेच्या हातांत असतें. चलनशासन-संस्थेनें ती जबाबदारी पार पाडल्यास उत्पादनांतील एक महत्त्वाचा धोका नाहींसा होऊन उत्पादनवाढीच्या योजना आंखण्यास उद्योगपतींना हुरूप येतो. भावमान-स्थैर्याचा आणखी एक गुण असा सांगतां येईल कीं, चलनमूल्यांतील अस्थिरतेमुळें निर्माण होणारी अनिश्चितता नाहींशी झाल्यामुळें शिल्लक टाकण्यास लोक प्रवृत्त होतात. आजच्या शिल्लकीचें मूल्य भावी काळांत कमी होऊन शिल्लक टाकणाऱ्याला पश्चात्ताप वाटण्याचा प्रसंग येत नाहीं. शिल्लकीचें मूल्य वाढलें तर तें शिल्लक टाकणाराला चांगलेंच असतें. पण त्या बाबतींत तरी अनिश्चितता काय उपयोगाची ? शिवाय किंमती कमी होऊन शिलकीचें मूल्य वाढण्यांत भांडवलगुंतवणीवरच विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो, हें दृष्टीआड करतां येत नाहीं. सारांश, कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तर चलनमूल्यांतील फेरफारामुळें अनिश्चितता निर्माण होणें व विभाजनसांचा बदलणें योग्य नसतें. चलनमूल्य स्थिर राहिल्यास उत्पादनांतील अनिश्चितता संपूर्णपणें नाहींशी होतें किंवा विभाजन न्याय्य होतें, असा ह्या विवेचनाचा अर्थ नाहीं; पण चलनाच्या उपयोगामुळें मूळच्या अस्थिरतेंत भर पडत नाहीं व मूळचा विभाजनसांचा बदलत नाहीं व तसा तो बदलूं नये, असा भावमान स्थैर्याच्या पुरस्कर्त्यांचा दावा आहे.[1]

भावमानस्थैर्याच्या विरोधकांचा युक्तिवाद:—भावमानस्थैर्य हें चलननीतीचें साध्य असूं नये, अशा मताचे जे चलनशास्त्रज्ञ आहेत त्यांचे दोन वर्ग पडतात. पहिल्या वर्गांतील चलनशास्त्रज्ञांच्या मतें दीर्घ कालाच्या संदर्भांत भावमान वाढतें असावें. भावमान वाढतें असल्यास उत्पादकवर्गाचा नफा वाढता राहून उत्पादकांना सातत्यानें प्रोत्साहन मिळतें व त्यामुळें उत्पादनवाढीचा व आर्थिक प्रगतीचा मार्ग सुकर होतो. ज्या अर्थव्यवस्थेंत उत्पादन वाढविण्याची जबाबदारी खाजगी उद्योगपतीवर टाकली जाते त्या अर्थव्यवस्थेंत उद्योगपतींना त्यांच्या कामगिरीचें दिलें जाणारें बक्षिस वाढतें असणेंच योग्य आहे.[२]

वाढत्या भावमानाच्या बाजूनें केल्या जाणाऱ्या वरील युक्तिवादावर अनेक आक्षप घेतले जातात. पहिला आक्षेप असा कीं, भावमान वाढत असतां इतर उत्पादन-घटकांनीं आपलें उत्पन्न वाढावें अशी मागणी केली तर ती नाकारतां कशी येईल? त्यांनीं तशी मागणी केली नाहीं तरी त्यांची फसवणूक काय म्हणून करावी? उत्पादन हें विविध उत्पादन-घटकांच्या सहकार्याचें संयुक्त फळ आहे. असें असतां एखाद्या घटकाची कामगिरीच अधिक व विशेष महत्त्वाची असें म्हणणें हा शुद्ध पक्षपातीपणा आहे. ह्या पक्षपातांत चलनशासनसंस्थेनें सामील होणें योग्य नव्हे. दुसरा आक्षेप असा कीं, वाढत्या नफ्याची उत्पादकांना हमी चलनशासनसंस्थेच्या धोरणामुळें मिळाल्यास अकार्यक्षम उत्पादकांचें आयतेंच फावेल. कारण त्यांची अकार्यक्षमता वाढत्या नफ्याखालीं छपून जाईल. तसेंच उत्पादनतंत्रांत प्रगति करून व त्यायोगें उत्पादनखर्च वाढविण्याचा प्रयत्न करण्याची प्रवृत्ति सर्वसाधारण उत्पादकांत दिसून येणार नाहीं. कारण नफ्याची व तो वाढण्याची खात्रीच असते. त्यामुळें खऱ्या अर्थानें प्रगतीच होणें थांबेल. तिसरा आक्षेप असा कीं, वास्तव आर्थिक परिस्थितींत जी अनिश्चितता असते व नाविन्यामुळें नफा वाढविण्याला नेहमींच जो अवसर असतो तो लक्षांत घेतां वाढत्या किंमतीच्या रूपानें उत्पादनाला कृत्रिम उत्तेजन देण्याचें काय कारण? चौथा आक्षेप असा कीं, किंमती वाढत असतां उत्पादन वाजवीपेक्षां अधिक

[१] A Stable price level ensures justice as between debtors and creditors, as also between recipients of fluid and inflexible incomes. It aids production by eliminating all business risks resulting from the fluctuations in the general price level. What is more important is that a stable price level enables the institution of money to perform its functions smoothly and impartially. It is highly desirable that money which is introduced in the economic system as a matter of convenience should not be a fresh source of friction.

[२] The case for a gradually rising price level rests chiefly upon the continuous incentive to enterprise which it gives to business-men in the shape of large actual and prospective profit—**Gayer**.

होण्याचा संभव असतो, असाच आजवरचा अनुभव आहे. म्हणजे किंमती वाढत्या ठेवणें हें जाणूनबुजून मंदीला निमंत्रण केल्यासारखें आहे. पांचवा आक्षेप असा कीं, भावमान वाढावें असें धोरण स्वीकारल्यास तें किती व केव्हां वाढावें हें निश्चित कशाच्या आधारावर ठरवावयाचें ?[३]

घटत्या भावमानाचा पुरस्कार :—वाढत्या भावमानाच्या पुरस्कारापेक्षां घटत्या भावमानाचा पुरस्कार अधिक परिणामकारक रीत्या करतां येतो. घटत्या भावमानाच्या बाजूनें असा युक्तिवाद करतां येतो कीं, प्रगतिपथावरील अर्थ-व्यवस्थेंत कोणत्याहि वस्तूच्या उत्पादनासाठीं लागणारी घटकरूप साधनसामुग्री—निराळ्या शब्दांत वास्तव उत्पादनखर्च कमी झाल्यास म्हणजेच घटकांची उत्पादन-क्षमता वाढल्यास त्या गोष्टीचा फायदा सर्व समाजाला मिळावयाचा असेल तर त्या वस्तूची किंमत कमी होणें हेंच योग्य आहे. तशी ती कमी झाली तर त्या वस्तूच्या उत्पादकाला कुरकुर करण्याचें बिलकुल कारण नाहीं. कारण घटकांची उत्पादनक्षमता जेव्हां वाढते तेव्हां उत्पादनखर्च कमी होतोच. अशा परिस्थितींत वस्तूची किंमत कमी होण्यांतच न्याय आहे. जेव्हां अर्थव्यवस्थेंत सार्वत्रिक प्रगति होत असते तेव्हां सर्वत्र वस्तूच्या किंमती कमी होऊन घटत्या भावमानाच्या रूपानें समाजाच्या प्रगतीचा प्रत्यय सर्वांना यावा, हेंच विभाजनाच्या बाबतींत चलनाचें कार्य निःपक्ष-पातीपणें होण्यासाठीं आवश्यक आहे. घटकाची उत्पादनक्षमता वाढून उत्पादनखर्च कमी होत असतां भावमानस्थैर्य असणें म्हणजे उत्पादकवर्गाच्या बाजूनें पक्षपातीपणा दाखविण्याजोगें आहे. सारांश, प्रगतिमान अर्थव्यवस्थेंत घटतें भावमान हीच घटना साहजिक व उत्तेजनपात्र आहे.[४]

भावमानस्थैर्य आर्थिक स्थैर्याला विरोधी असूं शकत. हें विधान वरवर पाहत खरें वाटेल असें नाहीं; पण प्रत्यक्ष अनुभव तसा आलेला आहे. तांत्रिक प्रगति होत असतां भावमान स्थिरच जर राहिलें तर उत्पादनखर्च ज्या मानानें कमी होतो

[३] The plea for a rising level of prices has grave defects. It amounts to partiality in favour of a class at the expense of others. It gives protection to inefficient producers and hampers incentive for improving productive efficiency. It encourages over production, and is a sure invitation to depression.

[४] Economic justice would be best promoted in an economically advancing community by a falling price level since all sections of the community should in fairness share the fruits of economic progress. Since the costs of production fall in exact correspondence to the fall in profits, there would be no adverse effects on the profits of producers and they would have no rational grounds for discouragement and the curtailment of activity.

त्या मानानें वस्तूच्या किंमती कमी न झाल्यामुळें उत्पादनाचा नफा वाढतो. त्यामुळें भांडवलगुंतवणीला जें उत्तेजन मिळतें तें तेजीमंदीचक्र फिरूं लागण्यास कारणीभूत होतें असा अनुभव आलेला आहे. तो अनुभवहि प्रगतिमान अर्थव्यवस्थेंत घटतें भावमान हेंच न्याय्य व स्थैर्यपोषक असतें, ह्या सिद्धान्ताला पुष्टि देतो. ह्या अनुभवामुळेंच कांहीं चलनशास्त्रज्ञांनीं तटस्थ चलनाचा तोडगा सुचविला. त्यांच्या मतें चलनसंस्थेमुळें अर्थव्यवहारांत अनुचित हस्तक्षेप व्हावयाचा नसेल तर भावमानस्थैर्यापेक्षां चलनपरिमिति-स्थैर्य हेंच चलननीतीचें साध्य समजलें पाहिजे. चलनपरिमिति स्थिर राहिल्यास आर्थिक परिस्थितींत जे जे बदल होतील त्यांचें यथार्थ दर्शन भावमानांत घडेल. उदाहरणार्थ, उत्पादनघटकांची उत्पादनक्षमता वाढून उत्पादन वाढल्यास चलनपरिमिति स्थिर असतां भावमान आपोआपच कमी होईल. ह्या परिस्थितींत भावमानस्थैर्याचें धोरण स्वीकारावयाचें ठरविल्यास चलनशास्त्रसंस्थेला चलनविस्तार करावा लागेल. तसें करण्याचें वस्तुतः कारण नाहीं.

चलननीति व आर्थिक नीति :—भावमानस्थैर्य अथवा चलनपरिमिति स्थैर्य ह्यांच्या आधारें चलननीतीची इष्टानिष्टता ठरवावी, हा विचार आतां मागें पडला आहे. आधुनिक चलनशास्त्राप्रमाणें व्यापक आर्थिक नीतीचा एक भाग म्हणूनच चलननीतीचा विचार केला पाहिजे. भावमान, चलनपरिमिति एवढेंच नव्हेतर चलननीति ह्या गोष्टी साध्यें नसून साधनें असतात. साधनांना साध्य समजणें ह्यासारखी दुसरी चूक नाहीं. चलननीति हें कशाचें साधन ? ह्या प्रश्नाचें उत्तर असें देतां येईल कीं, देशांच्या अर्थकारणाचें जें साध्य असतें तेंच प्राप्त करून घेण्याच्या अनेक साधनांपैकीं चलननीति हें एक साधन समजलें पाहिजे. ह्यावरून चलननीतीच्या बाबतींत महत्त्वाचे सिद्धान्त मांडतां येतात. ते येणेंप्रमाणें :—

(१) चलननीतीचें साध्य चलनक्षेत्राबाहेर आढळतें. भावमान स्थैर्य व चलनपरिमिति स्थैर्य ह्या गोष्टी चलनक्षेत्रांत येतात. पण चलनसंस्था हीच स्वतः एक साधन असल्यामुळें चलननीतीचें साध्य चलनक्षेत्रांत शोधणें मुळांतच चुकीचें आहे. चलनव्यवस्था हा अर्थव्यवस्थेचा एक भाग असतो आणि अर्थव्यवस्थेचा कारभार कांहीं विशिष्ट गोष्टी साधण्याच्या दृष्टीनें व्हावा अशी अपेक्षा असते. तेव्हां अर्थव्यवस्थेचा भाग ह्या नात्यानें त्या गोष्टी साधण्याला हातभार लावणें हें चलनव्यवस्थेचें व पर्यायानें चलननीतीचें कार्य ठरतें. साहजिकच चलननीतीचें साध्य ज्याला कटाक्षानें चलनक्षेत्रच म्हणतां येईल त्यांत न आढळतां व्यापक अर्थानें आर्थिक व्यवस्थेंत आढळतें.

(२) चलननीति म्हणजे आर्थिक नीति नव्हे. चलननीति हा आर्थिक नीतीचा केवळ एक भाग असतो. साहजिकच चलननीतीची व्याप्ति आर्थिक नीतीपेक्षां संकुचित असते. आर्थिक नीतींत चलननीतीखेरीज व्यापारनीति, अर्थसंकल्पनीति इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. त्यामुळें चलननीति ठरवितांना एक महत्त्वाची गोष्ट ध्यानांत घ्यावी लागते. ती अशी कीं, आर्थिक नीतीच्या इतर अंगाशीं चलननीति सुसंगत असावी लागते. चलननीति, अर्थसंकल्पनीति व्यापारनीति इत्यादि आर्थिक-

नीतीचे भाग परस्परांना पूरक असावे लागतात. तसे ते असणें अपरिहार्यच असतें. कारण आर्थिक नीतीच्या विविध अंगांचें साध्य एकच असलें पाहिजे.

(३) तिसरा सिद्धान्त विशेष महत्त्वाचा आहे. तो असा कीं, चलननीति स्थलकालपरिस्थितिनिरपेक्ष असूंच शकत नाहीं. ह्याचें कारण उघडच आहे. अर्थव्यवस्थेच्या कारभाराचें म्हणजेच आर्थिक नीतीचें उद्दिष्ट काय असावें, हें कायमचें ठरलेलें नाहीं; तसें तें ठरवितां येत नाहीं. सर्वच देशांची आर्थिक नीति सारखी असत नाहीं. असूंहि नये. मागासलेल्या देशांना उत्पादनवाढीचें महत्त्व जेवढें वाटल तेवढेंच पुढारलेल्या देशांना वाटेल असें नाहीं. एकाच देशाची आर्थिक परिस्थिति नेहमींच सारखी असते असें नाहीं. आर्थिक परिस्थितीनुसार आर्थिक नीतींतहि बदल होणें क्रमप्राप्त होतें. युद्धकाळांतील आर्थिक नीति शांतताकालांतील आर्थिक नीतीपेक्षां वेगळी असणारच. युद्धकाळांत युद्धोपयोगी उत्पादनाकडे साधनसामग्रीचा ओघ वळविणें हेंच अर्थव्यवस्थेचें एकमेव साध्य असतें. विभाजनन्यायाचा विचार त्यावेळीं उपेक्षणीय असतो. सारांश, आर्थिक नीति स्थलकालपरिस्थितिसापेक्ष असल्यानें आर्थिक नीतीचा एक भाग ह्या नात्यानें चलननीतीहि तशीच असावी हें स्वाभाविक आहे.[५]

पूर्णरोजगार व चलननीति :—अर्थव्यवस्थेचीं साध्यें स्थलकालपरिस्थितीनुसार बदलत असल्यामुळें विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भातच आर्थिक परिस्थितीचा विचार करावा लागतो व चलनशास्त्रावरील तात्त्विक ग्रंथांत तो विचार स्थूल स्वरूपाचाच असतो.—कारण तात्त्विक विवेचनांत प्रत्येक देशाचा व त्या देशांतील तात्कालिक परिस्थितीचा तपशीलवार विचार करणें अशक्य असतें—असें बजावावें लागतें.

स्थूलमानानें आर्थिक दृष्टचा जे देश प्रगत समजले जातात त्या देशांच्या आर्थिक नीतीचें साध्य **पूर्णरोजगार** (Full Employment) हें असावें, हें तत्त्व आतां बहुतेक मान्य झालें आहे. साहजिकच चलननीतीची आंखणी त्या अनुरोधानेंच

[५] Modern monetary theory has come to realise that monetary policy cannot have ends of its own. Monetary policy is, after all, only a part, although an important part of wider economic policy. As such, monetary policy has to pursue the objectives of economic policy. From this, it follows that (a) The objectives of a sound monetary policy lie outside the monetary sphere. (b) Monetary policy has to be consistent with the other parts of economic policy. The different parts of economic policy have to be essentially complimentary to each other and (c) There cannot be a monetary policy which can be called sound irrespective of the time, place and the condition of its operation. Monetary policy differs from country to country and from time to time. In brief, monetary policy is a relative concept.

व्हावी असें बहुतेक चलनशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ मानतात. पूर्णरोजगाराचें उद्दिष्ट साधण्यासाठीं चलननीतीचा उपयोग केला पाहिजे व तसा तो करणें शक्य आहे, हा आग्रह धरण्याचें श्रेय प्रामुख्यानें कीन्सवादी अर्थशास्त्राला दिलें पाहिजे.

पूर्णरोजगाराची चलननीति :—पूर्णरोजगार हें चलननीतीचें साध्य असलें पाहिजे. ह्याबाबत फारसा मतभेद नसला तरी पूर्णरोजगाराच्या चलननीतीच्या तपशिलाबाबत मात्र बराच मतभेद दिसून येतो. प्रथम प्रथम चलननीतींत समाविष्ट असलेल्या **व्याजनीति** (Interest-Rate Policy) ला कीन्सवादी अर्थशास्त्रांत बरेंच महत्त्व देण्यांत आलें. व्याजनीतीला महत्त्व देणाऱ्यांचा दावा असा होता कीं, व्याजाचा दर ही चलनघटना असल्यामुळें व्याजाचें नियंत्रण चलनशासनसंस्थेला परिणामकारक रीत्या करतां येते. ह्या गोष्टीचा फायदा घेऊन चलनशासनसंस्थेनें **अल्प व्याजनीति** (Cheap Money Policy) स्वीकारावी. म्हणजेच व्याजाचे दर कमी होतील, असें धोरण चलनशासनसंस्थेनें आंखावें. ह्या धोरणाचा पाठपुरावा चलनसंस्थेनें इतक्या मर्यादेपर्यंत केला पाहिजे कीं, पूर्णरोजगारासाठीं आवश्यक तेवढी भांडवल-गुंतवण अर्थव्यवस्थेंत नेहमींच केली जाईल. जेव्हां भांडवल-गुंतवण जरुरीपेक्षां कमी होत आहे असें दिसून येईल तेव्हां व्याजाचा दर कमी होईल, अशी उपाययोजना चलनशासनसंस्थेनें केली पाहिजे व जेव्हां भांडवल-गुंतवण जरुरीपेक्षां अधिक होण्याचा संभव दिसतो तेव्हां व्याजाचा दर वाढविणारी उपाययोजना चलनशासनसंस्थेनें केली पाहिजे हें ओघानें आलेंच. व्याजाच्या दरांत आर्थिक परिस्थितीच्या अनुरोधानें फेरबदल घडवून आणण्याचें धोरण चलनसंस्थेला परिणामकारक रीत्या अनुसरतां आल्यास तेजीमंदीचक्राला पायबंद घालतां येईल असा कीन्सवादी अर्थशास्त्राचा मूळचा दावा होता.[६]

---

[६] In Keynesian economics, as it was first formulated, variation in the rate of interest was regarded as the main anticyclical weapon and as the main instrument of attaining and stabilising full employment. According to Keynesian analysis, the rate of interest is a purely monetary phenomenon and as such it is amenable to control by the monetary authorities. The monetary authorities can and should so exercise their control over the rate of interest, that it is brought down to the level necessary for promoting that volume of private investment required for full employment. In short, modern economic analysis favours the maintenance of a low rate of interest. It is pointed out that continued low interest rates are a major contribution to economic stability and the maintenance of full employment, for low interest rates stimulate business and encourage new enterprise.

पतचलनोपयोगनियंत्रणाचें वाढतें महत्त्व :—व्याजाच्या दरांतील फेरबदलांची परिणामकारकता अनुभवानें संशयास्पद ठरली आहे. व्याजाच्या दरांतील फेरबदल मंदीची तीव्रता फार असेल तेव्हां भांडवलगुंतवण वाढविण्यास किंवा भावफुगवणीच्या काळांत सट्टेबाजीला आळा घालण्यास पुरे पडत नाहींत असें अनुभवानें सिद्ध झालें आहे. तसेंच व्याजाच्या दरांतील फेरबदलांतील परिणाम सर्वच प्रकारच्या भांडवल-गुंतवणीवर सरसकट सारखाच होतो ही इष्ट गोष्ट नव्हे, असाहि अनुभव आलेला आहे. उदाहरणार्थ, सट्टेबाजीला आळा घालण्याच्या हेतूनें व्याजाचा दर वाढविला तर सट्टेबाजीला फारसा पायबंद बसत नाहीं; पण चांगल्या उद्योगधंद्यावर मात्र त्याचा अनिष्ट परिणाम होतो असें दिसून आलें आहे. ह्या सर्व अनुभवांमुळें व्याजाच्या दरांतील फेरबदलांचें महत्त्व अलीकडे चलनशास्त्रांत कमी झालें असून पतचलनोपयोगनियंत्रणावर विशेष भर दिला आहे.[७] कारण व्याजाच्या दरांत बदल घडवून आणणें वाटतें तेवढें सोपें नसतें, असें आढळून आलें आहे. मंदीच्या काळांत व्याजाचा दर बराच कमी करावा लागतो. त्यानंतर तो हवा तेवढा वाढविणें कठिण जातें. तेजीच्या काळांत व्याजाचा दर वाढविला तर त्यानंतर तो खालीं आणणें अवघड होतें. व्याजाच्या दरांत बदल करणें सुलभ आहे, असा कीन्स यांच्या लिखाणाचा सूर आहे; पण अनुभवानें ती कल्पना खोटी ठरली आहे. त्यामुळें व्याजाच्या दरांतील बदलाऐवजीं पतचलनोपयोगनियंत्रण ह्या साधनांचा हवा तसा उपयोग करून तेजीमंदीचक्राला आवर घालण्याचा प्रयत्न शासनसंस्थेनें करावा, ह्या मताला चलन (अर्थ) शास्त्र्यांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. तेजीच्या काळांत सट्टेबाजी-अंदाजबाजीसाठीं होणाऱ्या भांडवलपुरवठ्यावर अधिक व्याज आकारून अगर तशीच वेळ आली असेल तर असा भांडवलपुरवठा करण्यास अजिबात बंदी करून तेजीच्या मुळावरच घाव घालतां येतो आणि असें करतांना नित्याच्या अर्थव्यवहारांना धक्का लावण्याचें कारण पडत नाहीं. मंदीच्या काळांतहि पतचलनोपयोगनियंत्रणाचा उपयोग करतां येतो. उदाहरणार्थ, मंदीच्या काळांत खाजगी खर्च वाढविण्याची आवश्यकता असते. त्या परिस्थितींत उपभोग्य मालावरील खर्च वाढावा, ह्या हेतूनें सवलतीच्या दरानें कर्जें देतां येतात. मंदीचा

[७] On grounds of both experience and monetary analysis, it is now widely accepted that variation of the rate of interest is not a useful method of control—It is not denied that credit restriction and the increasing pressure of rising rate can check a boom—but the effect is to undermine the sound investment in the economy as a whole while affecting but little if at all the speculative extravagances of the boom—A serious defect of this device is that it strikes with most force at just the wrong places. Accordingly, it is increasingly recognised that selective ontrols are likely to be more effective—**Hansen.**

फटका ज्या उद्योगधंद्यांना विशेष जाणवला असेल त्यांना खास सवलती देऊन भांडवलपुरवठा करतां येतो व त्याचा उपयोग उद्योगधंद्यांतच भांडवलगुंतवण करण्यास उद्योगपतींना उद्युक्त करतां येतें. सारांश, आधुनिक **तेजीमंदीचक्रविरोधी** (Anti-Cyclical) चलननीतींत व पूर्ण रोजगाराच्या चलननीतींत व्याजनीतीपेक्षां पतचलनोपयोगनियंत्रणाला अधिक महत्त्व प्राप्त झालें आहे.

अर्थसंकल्पनीतीची जोड चलननीतीला देण्याची आवश्यकता :—पूर्ण रोजगाराचें ध्येय गांठण्यासाठीं तसेंच तेजीमंदीचक्राचें परिणामकारक रीत्या निवारण करण्यासाठीं चलननीति पुरेशी आहे, हा कीन्सवादी अर्थशास्त्रानें प्रथम प्रथम दाखविलेला विश्वासहि ढांसळला आहे. अलीकडील अर्थशास्त्रज्ञ हें मान्य करतात कीं, पूर्ण रोजगारासाठीं चलननीतीला योग्य अशा अर्थसंकल्पनीतीची जोड द्यावी लागते. पूर्ण रोजगारासाठीं ज्यायोगें पूर्ण रोजगार गांठला जाईल एवढा समस्त खर्च व्हावा लागतो. समस्त खर्चाची मर्यादा खाजगी खर्च व सरकारी खर्च मिळून ठरते. चलननीतीचा मुख्य उद्देश, पूर्ण रोजगाराचा अभाव असेल तर खाजगी खर्चाला उत्तेजन देणें हा असतो. पूर्ण रोजगार गांठल्यानंतर भावफुगवणीला आळा बसेल एवढ्या प्रमाणांत खाजगी खर्चावर मर्यादा घालावी लागते. खाजगी खर्च हवा तेवढा कमीअधिक करणें चलननीतीला साधतेंच असें नाहीं. चलननीतीचा योग्य तो उपयोग न झाल्यास सरकारी खर्चांत फेरबदल करून इष्ट परिणाम साधावा अशी अपेक्षा असते. त्यासाठीं योग्य अशा अर्थसंकल्पनीतीची आवश्यकता असते. अशा प्रकारें पूर्ण रोजगार गांठून भावफुगवण होऊं न देतां तो टिकविण्यासाठीं परस्परपूरक अशी अर्थसंकल्पनीति व चलननीति अनुसरावी लागते. पूर्ण रोजगारासाठीं व तेजीमंदीचक्राचें निवारण करण्यासाठीं कोणत्या प्रकारच्या अर्थसंकल्पनीतीची आवश्यकता आहे, हा विषय ह्या ग्रंथाच्या व्याप्तींत बसत नाहीं. पण आर्थिक नीतीचें कोणतेंहि साध्य गांठण्यासाठीं केवळ चलननीति अपुरी पडते, हें लक्षांत ठेवणें अत्यावश्यक आहे. चलनशास्त्राचा अभ्यास करणारानें चलननीतीची परिणामकारता जशी ओळखली पाहिजे तशाच चलननीतीच्या मर्यादाहि ओळखल्या पाहिजेत.

अप्रगत देशाची चलननीति :—प्रगत देशाच्या चलननीतीचें साध्य पूर्ण रोजगार हें असावें, हें आतां सर्वमान्य झाल्यासारखें आहे. पण अप्रगत देशांत पूर्ण रोजगारापेक्षां आर्थिक प्रगतीला अधिक महत्त्व द्यावें लागतें. त्यामुळें चलननीतींत साहजिकच बराच फरक पडतो. प्रगत देशांत मुख्य प्रश्न भांडवलनिर्मितीचा नसतो. उपलब्ध भांडवलाचा भरपूर उपयोग करणें हा तेथें मुख्य प्रश्न असतो. पण अप्रगत देशांत मुळांतच भांडवल कमी असल्यामुळें भांडवलनिर्मितीला उत्तेजन द्यावें लागतें व त्या अनुरोधानें आर्थिक नीतीची व पर्यायानें चलननीतीची आंखणी करावी लागते. चलन-नीति कोणतीहि असो, ती यशस्वी व परिणामकारक करण्याच्या मार्गांतील अडचणीहि अप्रगत देशांत प्रगत देशांतील अडचणींपेक्षां संख्येनें अधिक असतात व त्यांचें निवारण करणेंहि अधिक बिकट असतें.

अप्रगत देशांतील चलननीतीचीं साध्यें :—अप्रगत देशांत मुख्य प्रश्न भांडवल-निर्मितीचा असतो, हें वर सांगितलेंच आहे; पण भांडवलाचा तुटवडा हाच एक प्रश्न प्रगतीच्या आड येणारा असतो असें नाहीं. भांडवलाचा सदुपयोग न होणें ही घटनासुद्धां आर्थिक प्रगतीला मारक होऊं शकते. अप्रगत देशांत असें दिसून येतें कीं, जें कांहीं तुटपुंजें भांडवल असतें तेंसुद्धां आर्थिक विकासासाठीं मोकळेपणीं उपलब्ध होत नाहीं. आपली बचत सुवर्णरूपानें ठेवण्याची किंवा जवळ तशीच पडून ठेवण्याची प्रवृत्ति अप्रगत देशांत विशेष दिसून येते. साहजिकच ती बचत उद्योगधंद्याच्या वाढी-साठीं उपयोगीं पडत नाहीं. तसेंच आर्थिक नियोजनाचा अभाव असेल तर आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत ज्यांना अग्रस्थान दिलें पाहिजे त्या उद्योगधंद्यांतच बचत गुंतविली जाईल, असा निर्वाळा देतां येत नाहीं. त्वरित नफा मिळविण्याच्या आशेनें व्यापारांत किंवा अंदाजबाजींत किंवा कमी महत्त्वाच्या उद्योगधंदांत भांडवलगुंतवण केली जाईल, हा धोकाहि लक्षांत घेतला पाहिजे. अप्रगत देशांचा आर्थिक विकास होऊं लागला म्हणजे आणखी एक धोका संभवतो. आपलें उत्पन्न वाढूं लागल्यावर अधिक बचत करण्याऐवजीं—उत्पन्न वाढलें कीं बचतशक्ति वाढते—उपभोगावर अधिक खर्च करण्याची प्रवृत्ति अप्रगत देशांत दिसून येण्याचा संभव असतो. ही प्रवृत्तिहि परिणामीं आर्थिक उन्नतीला बाधक ठरते. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन लोकांची बचतशक्ति वाढविणें, त्यांना बचत करण्यास प्रवृत्त करणें व बचतीचा उपयोग आर्थिक प्रगति सुकर करण्यासाठींच होत आहे हें पाहाणें, ह्या तीन गोष्टींना अप्रगत देशाच्या आर्थिक नीतींत, व साहजिकच चलननीतींतहि, महत्त्वाचें स्थान द्यावें लागतें. ह्या तीन गोष्टींखेरीज आर्थिक विकास होत असतां आर्थिक विषमता वाढणार नाहीं, शक्य तों कमीच होईल, ह्याकडेहि राज्यसंस्थेला लक्ष पुरवावें लागतें. सारांश, भांडवलनिर्मिति, भांडवलाचा सद्विनियोग व आर्थिक समता हीं अप्रगत देशांतील आर्थिक नीतीचीं तीन उद्दिष्टें मानावीं लागतील. हीं तीन उद्दिष्टें आर्थिक नियोजनाशिवाय सफल होणार नाहींत, असें पटल्यामुळें आर्थिक नियोजनाचा मार्ग स्वीकारण्याची प्रवृत्ति अप्रगत देशांत वाढत आहे.

चलननीतीचीं साधनें (Means of Monetary Policy)

चलननीतीचा तपशील :—प्रगत व अप्रगत देशांतील चलननीतीचीं वर जीं साध्यें सांगितलीं आहेत त्यांच्या अनुरोधानें चलननीतीच्या साधनांचा तपशील स्थूलमानानें सांगावयाचा झाल्यास तो पुढीलप्रमाणें सांगतां येईल :—

(१) **चलनव्यवस्था** हें चलननीतीचीं साध्यें प्राप्त करून घेण्याचें पहिलें साधन होय. ह्या साधनाबाबत सर्वसामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, देश प्रगत असो वा अप्रगत असो, चलनव्यवस्था लवचिक असणें आवश्यक आहे. चलन-व्यवस्था लवचिक असली पाहिजे; म्हणजेच चलनवाढ अगर चलनसंकोच सौकर्यानें करण्याची तरतूद चलनव्यवस्थेंत असली पाहिजे. चलनव्यवस्था लवचिक असली

पाहिजे, हें तत्त्व अर्थांतच प्रगत अर्थव्यवस्थेलाहि लागू पडतें. कारण पूर्णरोजगार गांठावयाचा व टिकवावयाचा असेल तर कधीं चलनवाढ करावी लागते; तर कधीं चलनसंकोच करावा लागतो. चलनव्यवस्था लवचिक असेल तरच ही गोष्ट शक्य होईल, हें उघड आहे. अप्रगत देशाच्या चलनव्यवस्थेंत लवचिकतेचा गुण सामान्यतः चलनविस्तार सुलभ व्हावा, म्हणून लागतो. आर्थिक विकास जसजसा होत जातो तसतशी चलनाची गरजहि वाढत जाते. तुटीच्या अर्थकारणाचें तत्त्व मानल्यास आर्थिक विकास होण्यासाठींहि चलनपुरवठा वाढता असावा लागतो. म्हणूनच चलनव्यवस्था लवचिक असणें आवश्यक आहे.

(२) **मध्यवर्ती बँक** :—चलननीतीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रामुख्यानें मध्यवर्ति बँकेवर असते. त्यामुळें चलननीतीच्या साधनांत मध्यवर्ति बँक व तिचे अधिकार ह्यांना महत्त्वाचें स्थान असतें. ह्या साधनाबाबत आजचा सर्व-संमत विचार असा आहे कीं, चलनपरिमिति ठरविण्याच्या बाबतींत मध्यवर्ति बँकेला व्यापक लवचिक असे अधिकार असले पाहिजेत कायद्यानें किंवा रूढीनें मध्यवर्ती बँकेला जखडून ठेवणें इष्ट नाहीं. देशाची आर्थिक नीति निश्चित करून व राज्य-संस्थेची मध्यवर्ति बँकेच्या कारभारावर योग्य त्या प्रमाणांत देखरेख राहील अशी व्यवस्था करून चलननीतीची अंमलबजावणी कशी करावी, हा प्रश्न मध्यवर्ती बँकेच्या तारतम्यबुद्धीवरच सोपविणें इष्ट ठरतें. हें सूत्र अप्रगत देश व प्रगत देश ह्यांना सारख्याच प्रमाणांत लागू पडतें.

(३) **चलन-पेठ अथवा चलन-बाजार** (Money Market) :—कोणत्याहि देशांतील चलनव्यवस्थेचें सरकार, मध्यवर्ति बँक व सामान्य बँका असे तीन घटक असतात. पैकीं सरकारनें मध्यवर्ति बँकेच्या सल्ल्यानें चलननीति ठरवावी व मध्यवर्ति बँकेनें तिची अंमलबजावणी करावी अशी अपेक्षा असते. मध्यवर्ति बँकेनें चलननीतीची अंमलबजावणी देशांतील इतर बँका व भांडवल-बाजार ह्यांच्या करवीं करावयाची असते. त्यामुळें ह्या संस्थांना किंवा निराळ्या शब्दांत चलनपेढ्यांना अथवा चलन-बाजाराला चलननीतीच्या साधनांत स्थान प्राप्त होतें. इतर बँकांचे व्यवहार मध्यवर्ति बँकेकडून वेळोवेळीं येणाऱ्या आदेशानुसारच व्हावेत अशी अपेक्षा असते. हें सर्व घडून यावयाचें झाल्यास मध्यवर्ति बँका व इतर बँका ह्यांच्यांत पुरेसें सहकार्य असलें पाहिजे तसेंच इतर बँकाचे व्यवहार नियंत्रित करण्याची पुरेशी सत्ता मध्यवर्ति बँकेच्या हातांत केन्द्रित झाली पाहिजे. प्रगत देशांत ही गोष्ट सामान्यतः आढळते. अप्रगत देशांत मात्र ह्या बाबतींत बऱ्याच अडचणी जाणवतात. त्यांतील मुख्य अडचण अशी कीं बँकिंगचा बराचसा भाग मध्यवर्ति बँकेच्या कक्षेबाहेरच असतो. कारण तो पुरेसा संघटित झालेला नसतो व त्यामुळें मध्यवर्ती बँकेची सत्ता त्यावर फारशी चालत नाहीं. अशा अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणें हें अशा देशांतील मध्यवर्ति बँकांचें प्रमुख कर्तव्य ठरतें. ह्या बाबतींत विशेष खोलांत न जातां येथें एवढेंच म्हणतां येईल कीं, बँकिंगचा प्रसार जेवढा अधिक होईल व

बँकिंगचा अथवा चलनपेठेचा जेवढा भाग मध्यवर्ति बँकेच्या नियंत्रणाखालीं येईल तेवढें चलनव्यवस्थेंतील मध्यवर्ति बँकेचें महत्त्व वाढतें. तेव्हां तें उद्दिष्ट डोळ्यापुढें ठेवून मध्यवर्ति बँकेस प्रयत्न करावा लागतो. अप्रगत देशांत बँकिंगचा प्रसार होणें आणखी एका दृष्टीनें आवश्यक असतें. लोकांची बचत वाढविणें व त्या बचतीचा ओघ इष्ट गोष्टींकडे वळविणें ह्या दोन्ही गोष्टी अप्रगत अर्थव्यवस्थेंत विशेष महत्त्व असतात, हें तर सांगितलेंच आहे. पैकीं लोकांची बचत करण्याची शक्ति वाढणें न वाढणें हें मुख्यत्वेंकरून राज्यसंस्थेच्या आर्थिक नीतीवर अवलंबून असते. पण त्या बचतीचा योग्य उपयोग व्हावा ह्या दृष्टीनें चलनव्यवस्थेचा व चलननीतीचा भरपूर उपयोग करून घेतां येतो. बँकिंगची संवय लोकांत भिनल्यास लोकांच्या बचतीचा ओघ बँकांकडे वळवून बँकांकरवीं बचत केलेला पैसा इष्ट उद्योगधंद्यांत गुंतविला जाईल, अशी खबरदारी मध्यवर्ति बँकेला घेणें शक्य असतें. ह्या दृष्टीनें विचार केल्यास अप्रत्यक्ष देशांच्या चलननीतींत बँकिंगचा संख्यात्मक व गुणात्मक प्रसार करणें ह्याला महत्त्वाचें स्थान मिळालें पाहिजे, हें कोणीहि कबूल करील. बँकिंगच्या सोयींची वाढ करणें व बँका लोकांच्या विश्वासाला पात्र होतील अशा प्रकारें त्यांचे व्यवहार चालणें ह्या गोष्टी प्रगत अर्थव्यवस्थेंत कराव्या लागतातच; पण अप्रगत अर्थव्यवस्थेंत ह्या गोष्टींना फारच महत्त्व प्राप्त होत असल्यामुळें तेथील मध्यवर्ति बँकांना ह्या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरवावें लागतें. ह्याच संदर्भात आणखी एक गोष्ट सांगतां येईल. प्रगत राष्ट्राप्रमाणेंच अप्रगत राष्ट्रांतहि अलीकडे पतचलनोपयोगनियंत्रणाला विशेष महत्त्व प्राप्त होऊ लागलें आहे. कारण बचतीचा ओघ अंदाजबाजीकडे किंवा विलास वस्तूंवरील खर्चाकडे वळण्याचा धोका टाळावयाचा झाल्यास निव्वळ **संख्यात्मक नियंत्रणें** (Quantitative Controls) फारशी उपयोगी पडत नाहीं. पतचलनोपयोग नियंत्रणासारखे उपायच तेथें आवश्यक असतात. अशा उपायांचा वापर परिणामकारकरीत्या करणें मध्यवर्ती बँकेला शक्य व्हावयाचें असेल तर इतर बँकावरील तिची सत्ता बरीच व्यापक पाहिजे हें ओघानें आलेच.

(४) **अन्यसाधनें** :—चलननीतीच्या साधनांत ज्या संस्थांचा समावेश होतो त्यांचा विचार येथवर केला. त्याखेरीज ज्या गोष्टींत बदल करून मध्यवर्ति बँक चलननीति साधण्याचा प्रयत्न करते त्या गोष्टींनाहि चलननीतीचीं साधनेंच मानावें लागेल. अशा गोष्टींत हुंडणावळीचा दर, मध्यवर्ति बँकेचा व्याजाचा दर, खुल्या बाजारांतील व्यवहार, पतचलनोपयोगनियंत्रण, मध्यवर्ति बँक व इतर बँका ह्यांचे परस्परसंबंध निश्चित करणारा कायदा व त्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठीं उभारण्यांत आलेली यंत्रणा ह्या गोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. पैकीं हुंडणावळीचा दर एक वेळ चलननीतीचें साध्य मानलें जात होतें; पण अलीकडील विचारानुसार हुंडणावळीचा दर हें केवळ अनेक साधनांपैकीं एक साधन समजलें जातें. ह्या ठिकाणीं उल्लेखिलेल्या गोष्टींचा भरपूर विचार ह्या ग्रंथांत आधींच झालेला आहे.

किंबहुना तोच प्रस्तुत ग्रंथाचा विषय आहे. तेव्हां त्या विचाराची येथें पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. ह्या सर्व साधनांबाबत पुनः एकदां सांगावी अशी महत्त्वाची गोष्ट एवढीच कीं, हीं सर्व साधनें व त्यांची परिणामकारकता परिस्थितिसापेक्ष असते. परिस्थिति पाहूनच ह्या साधनांचा वापर कसा व किती प्रमाणांत करावयाचा, हें ठरवावयाचें असतें. ह्या साधनांचा वापर हवें तें साधण्यांत किती प्रमाणांत यशस्वी होईल, हेंहि अर्थातच परिस्थितीवर अवलंबून असतें. प्रगत व अप्रगत देशांतील चलननीतीचीं साधनें स्थूलमानानें सारखीं असलीं तरी प्रगत व अप्रगत देशांतील चलननीतीच्या तपशीलांत व तिच्या यशाच्या प्रमाणांत फरक पडतो. ह्याचें कारण चलननीति परिस्थितिसापेक्ष असते, हेंच सांगतां येईल. जेव्हां चलननीति यशस्वी होण्याची शक्यता कमी असते तेव्हां चलननीतीखेरीज आर्थिक नीतीचे जे इतर भाग असतात त्यांच्यावर तुलनेनें अधिक प्रमाणांत अवलंबून राहावें लागतें. चलननीतीची परिस्थितिसापेक्षता हा आधुनिक चलनशास्त्रांतील सर्वांत महत्त्वाचा सिद्धान्त आहे, हें आग्रहानें सांगितलें पाहिजे.

अखेरीस सांगावयाचें एवढेंच कीं आधुनिक आर्थिक जीवनांत चलनसंस्थेचें स्थान असाधारण असल्यानें व तिचें महत्त्व निर्विवाद असल्यामुळें चलनशास्त्राचें महत्त्व वाढत असतां शेवटीं कांहीं झालें तरी चलनसंस्था हीसुद्धां एक साधनच आहे ह्या महत्त्वाच्या विचाराकडे दुर्लक्ष करून कदापि चालणार नाहीं. ह्या विचाराचा विसर न पडल्यासच चलनशास्त्र व चलननीति ह्यांचें महत्त्व व त्यांच्या मर्यादा ह्या दोहोंचीहि यथायोग्य जाणीव होईल.

प्रमुख पारिभाषिक शब्द

Accelerator–प्रवृद्धीप्रमाण.
Appreciation–ऊर्ध्वमूल्यन.
Assets–येणीं.
Barter–वस्तुविनिमय.
Bank Rate–बँकरेट.
Balance of payments–देण्यायेण्यांचा तोल.
Balance of Trade–व्यापारतोल.
Cash–रोकड.
Cash Reserve–रोकडनिधि अथवा राखीवरोकड.
Clearing House–वजावाट केन्द्र.
Control–नियंत्रण.
Credit–पतचलन.
Credit Contraction–पतचलनसंकोच.
Credit Creation–पतचलननिर्मिति.
Credit Expansion–पतचलनविस्तार.
Credit Control–पतचलननियंत्रण.
Currency–रोखचलन.
Currency Contraction–रोखचलन-संकोच.
Currency Creation–रोखचलन-निर्मिति.
Currency Control–रोखचलननियंत्रण.
Currency Expansion–रोखचलन विस्तार.
Cash Balance–चलनांश, रोखचलनांश.
Crisis–अरिष्ट.
Comparative Costs–तौलनिक उत्पादनखर्च.
Comparative Advantage–तौलनिक अनुकूलता.
Comparative Costs Theory–तौलनिक उत्पादनखर्च सिद्धान्त.
Cheap Money Policy–अल्पव्याज नीति.
Currency Foreign–परचलन.
Currency Home–स्वचलन.
Deflation (Monetary)–अति चलनसंकोच.
Deflation (Price)–भावघसरण.
Deflation (Hyper)–चलनसंकोचातिरेक.
Deflationary–भावघसरकारी.
Depression–मंदी.
Depreciation–मूल्यपतन.
Devaluation–अवमूल्यन.
Disequilibrium–समतोल भंग.
Disequilibrium—Fundamental–मूलभूत समतोल भंग.
Disequilibriating Forces–समतोल भंजक प्रवाह.
Dumping–भावकापणी.
Exchange Rate–हुंडणावळीचा दर.
Exchange Control–हुंडणावळ नियंत्रण.
Equation of Exchange–विनिमय व्यवहारांचें समीकरण.
Equilibrium–समतोल.
Equilibrium–External–बाह्य समतोल.
Equilibrium–Internal–अन्तर्गत समतोल.
Equilibriating Forces–समतोल प्रस्थापक प्रवाह.
Gold Standard–सुवर्णपरिमाण.
Gold Standard–International–आन्तरराष्ट्रीय सुवर्णपरिमाण.
Gold Currency Standard–सुवर्ण चलनपरिमाण.
Gold Bullion Standard–सुवर्ण धातु-परिमाण.

Gold Exchange Standard–सुवर्ण विनिमय परिमाण.
Inflation–(Monetary) अतिचलनविस्तार.
Inflation (Price)–भावफुगवण.
Inflation (Hyper)–चलनविस्तारातिरेक.
Inflationary–भावफुगवणकारी.
Index No.–निर्देशांक.
Index No. of Prices–भावनिर्देशांक.
Index No. Weighted–भारान्वित निर्देशांक.
Liabilities–देणीं.
Legal Tender–विधिमान्य अथवा राजमान्य चलन.
Liquidity Preference-रोकड प्राधान्य.
Money–चलन
Monetary Authority–चलनशासन-संस्था.
Monetary Phenomenon–चलन घटना.
Monetary Policy–चलननीति.
Monetary Managements–चलन-शासन.
Monetary System–चलनव्यवस्था.
Managed Money–शासितचलन.
Multiplier–गुणक.
Money–Neutral–तटस्थचलन.
Money–Quantity of–चलनपरिमिति.
Open Market Operations–खुल्या बाजारांतील व्यवहार.
Price–भाव.
Price Level–भावमान.
Price Index–भावनिर्देशांक.
Price Control–भावनियंत्रण.
Price Stability–भावमानस्थैर्य.
Purchasing Power–क्रयशक्ति.
Purchasing Power Parity–समक्रयशक्ति.
Policy of Protection–रक्षणनीति.
Recession–घसरण.
Revival–पुनर्जीवन.
Revaluation–पुनर्मूल्यन.
Real Investment–वस्तुरूप भांडवल-गुंतवण.
Store of Value–मूल्यसंग्रह.
Selective Credit Control–पतचलनोपयोग नियंत्रण.
Trade Cycle–तेजीमंदीचक्र.
Terms of Trade–व्यापारशर्ती.
Value of Money–चलनमूल्य.
Value of Money (Internal)–चलनाचें अन्तर्मूल्य.
Value of Money (External)–चलनाचें बाह्यमूल्य.
Velocity of Money–चलनगति.